₹ १५०

# शिवतेज

## दिवाळी अंक २०२५




संस्थापक / संपादक
**स्व.दत्तात्रय सुर्वे**

कार्यकारी संपादक
**केतन दत्तात्रय सुर्वे**

Nirman Greens®

"Nirman greens leading real estate brand of the year 2025"

## A Legacy of Trust, Built One Home at a Time

Rooted in trust and defined by uncompromising quality, Nirman Greens has spent decades crafting spaces that nurture life, comfort, and connection. Every project we create stands as a testament to thoughtful design, sustainable values, and enduring craftsmanship homes that don't just rise, but belong.

From serene greens-capes to smart urban living, our developments are designed to bring balance between luxury and purpose. This Diwali, as we celebrate light, new beginnings, and togetherness, we also celebrate the trust of every family who chose to build their dreams with us. Here's to homes built with heart, memories that last generations, and a legacy that continues to grow brighter with time.
Wishing you a Diwali filled with joy, prosperity, and harmony from all of us at Nirman Greens.



NIRMAN ASTROPOLIS
Tathawade





NIRMAN COSMOPOLIS
Tathawde



K PUNE
Bavdhan



NIRMAN Serenopolis
Tathawde



AMORAPOLIS
Dhanori

NIRVANA — NOTHING BEYOND
Aundh



Astoria Royals
Ravet

## Upcoming projects in Tathwade, Ravet & Baner

Follow us on

Certified by CREDAI

IGBC certified (Nirvana)

+91 096 896 21616

www.nirmangreens.com


आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष२०२५
कात्रज डेअरी
परंपरेचा स्वाद,
गोडव्याची खात्री
कात्रजचे खास
पेशवाई श्रीखंड,
आम्रखंड, बासुंदी!
'AN ISO 22000 : 2005 CERTIFIED DAIRY'
कात्रज
Basundi
'AN ISO 22000 : 2005 CERTIFIED DAIRY'
Katraj
Peshwai
Amrakhand
Net Content
500g
'AN ISO 22000 : 2005 CERTIFIED DAIRY'
Katraj
Peshwai
Shrikhand
www.katrajdairy.com

GMSSM
GIRIVAN

# गिरीवन ग्रुप

Girivan

## पुण्याजवळील नामांकित फार्म्स प्लॉटस् प्रोजेक्ट

## चांगल्या लोकेशनचे प्लॉटस् विक्रीसाठी उपलब्ध

## पिकनिकसाठी सर्वोत्तम

## रजिस्टर्ड को-ऑप.सोसायटी तर्फे संपूर्ण व्यवस्थापन

## दिवाळीनिमित्त हार्दिक शुभेच्छा

**फार्म प्लॉटस्साठी**

-: व्हॉटस्ॲप :-

**9011085644**

-: ईमेल :-

sujatafarms@gmail.com

**पिकनिक आणि इव्हेंटस्साठी**

**9011085642**

@GIRIVAN_PICNICS

@SHANTIVAN_RESORT

www.jalsrushti.com


Riverside

## Jalpushp

For those who love to spend their weekend king size

- Elevated cottages with direct and a better view of the river.
- They come with a majestic king-size canopy bed for you to feel like a royal.
- Cottages have spacious interiors which will give you a feel of living larger than life.
- Huge glass windows for you to wake up to a clear and beautiful view of the river.





Pondside

## Jalaka

For those who love to spend their weekend cozily.

- These cottages are built on ground level for you to get a direct view of the beautiful pond.
- Jalaka has cozy and comfortable interiors for you to spend a comfy weekend getaway.
- The cottages also have a balcony which offers you a peaceful view of the pond.
- The room is designed with beautiful and comfortable wooden furniture.
- These cottages have natural cooling with a porch facing the garden or the lake.

Riverside

## Jal Navka

Overlooking the river, these waterside abodes offer modern comforts and mesmerizing views of natural beauty.

- These cottages are built on ground level for you to get a direct view of the beautiful river.
- Jal Navka has cozy and comfortable interiors for you to spend a comfy weekend getaway.
- The cottages also have a balcony which offers you a peaceful view of the river.
- The room is designed with beautiful and comfortable wooden furniture.
- These cottages have natural cooling with a porch facing the river.





Jalsrushti is an exclusive luxury island resort nestled along the serene banks of the Mula river. Our unique retreat offers unparalleled tranquillity, where each accommodation has been thoughtfully designed to blend seamlessly with nature while providing guests with luxurious comfort and stunning panoramic views of the river.

### Contact Info

At Post Jamgaon, Tal-Mulshi, Pune, Maharashtra 411 040
Phone: 02063110055
Mobile: 08888000055
Email: Reservation



MAKING DREAMS COME TRUE

## Weddings

We know how to make your special moments extra special. At Jalsrushti we have a well-equipped hall as well as a facility to cater to a group of around 50 people. So if you are looking for that destination wedding by the waterside, look no more, get it right here in Pune.



MEMORABLE CORPORATE EXPERIENCES

## Corporates

Jalsrushti specializes in the art of crafting remarkable corporate events at an undistinguished location! From offsite meetings to team-building retreats, from product launches and distributor meetings, our resort and its facilities are perfectly equipped for each event to align seamlessly with your business goals and leave a lasting mark on your team. Discover the ideal fusion of work and leisure at our island oasis.



PICTURESQUE LOCATIONS FOR

## Photoshoots

Nestled along the tranquil Mula river, Jalsrushti Luxury Island Resort is an ideal location for professional photoshoots. We offer our venue for different types of shoots like a pre-wedding photoshoot, glamour photoshoots, etc.


ग्रामपंचायत हिंजवडी
AN ISO 9001:9008 CERTIFIED ORGANIZATION..
सर्व नागरिकांना..
शुभदीपावली...
श्री. गणेश जांभुळकर
सरपंच
सौ.दिपाली.श.जांभुळकर
उपसरपंच
श्री.सोमा प्रभू खैरे
ग्रामपंचायत अधिकारी
-: विद्यमान सदस्य :-
श्री. विक्रम साखरे
मा. सरपंच
श्री.विशाल साखरे
मा. सरपंच
श्री.मच्छिंद्र हुलावळे
मा. सरपंच
श्री.सचिनआबा जांभुळकर
मा. सरपंच
श्री.शिवनाथ जांभुळकर
मा. सरपंच
श्री.प्रदिप वाघमारे
मा. सरपंच
कु.मयूर साखरे
सदस्य
सौ.मनिषाताई.ज.हुलावळे
मा.उपसरपंच
सौ.रेखाताई.सं.साखरे
मा.उपसरपंच
सौ.प्रतिक्षा.शि.घोटकुले
मा.उपसरपंच
सौ.शिवानी.अ.जांभुळकर
मा.उपसरपंच
सौ.पल्लवी.स.गंगावणे
मा.उपसरपंच
सौ.ऐश्वर्या.प्र.वाघमारे
मा.उपसरपंच
सौ.शुभांगी.सु.साखरे
मा.उपसरपंच
समस्त ग्रामस्थ हिंजवडी आणि
ग्रामपंचायत कर्मचारी
सौ.आरती.वै.बेंद्रे
सदस्या

# भारती विद्यापीठ, पुणे
# भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय, पुणे

NAAC A++ Grade with CGPA of 3.60 (4th Cycle)
Category- I University Status by UGC
NIRF Ranking - 59

**मध्यवर्ती कार्यालय :** भारती विद्यापीठ भवन, एल.बी.एस. मार्ग, पुणे-३०. फोन : ०२०-२४४०७१३१/१३२/१३३/१६३
**Website : www.bharatividyapeeth.edu, www.bvuniversity.edu.in**

महाराष्ट्रातील कृतिशील विचारवंत द्रष्ट्या समाजसुधारक नेत्यांच्या कार्यातून व विचारातून प्रेरणा घेऊन मा.डॉ. पतंगराव कदम यांनी वयाच्या १९व्या वर्षी १० मे १९६४ रोजी **'गतिमान शिक्षणातून समाज परिवर्तन'** हे संस्थेचे ध्येयवाक्य निश्चित करून भारती विद्यापीठाची स्थापना केली. भारती विद्यापीठाच्या १८० घटक संस्था या मा. डॉ. पतंगराव कदम यांची दूरदृष्टी आणि सामाजिक बांधिलकीचा आविष्कार आहेत.



## डॉ. पतंगराव कदम
संस्थापक-कुलपती
भारती विद्यापीठ व
भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय



## आमदार डॉ. विश्वजीत पतंगराव कदम
कार्यवाह, भारती विद्यापीठ,
प्र-कुलगुरू,
भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय
विधानसभा सदस्य, माजी मंत्री, महाराष्ट्र शासन

## भारती विद्यापीठ

- पूर्व प्राथमिक ते पीएचडीपर्यंतचे शिक्षण देणाऱ्या १८० हून अधिक घटक संस्था.
- १२ शहरांमध्ये शैक्षणिक संकुले.
- आदिवासी, ग्रामीण व शहरी भागात ९९ गुणवत्ताधारक शाळा.
- ४७ देशांतील ८०० हून अधिक परदेशी विद्यार्थी.
- १० लाखांहून अधिक माजी विद्यार्थी.

## भारती विद्यापीठ (अभिमत विश्वविद्यालय) (२९ घटक संस्था)

- राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद (नॅक) यांच्याकडून मूल्यांकन 'अ+' दर्जा (२०१७) प्राप्त
- केंद्रिय मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे एन.आय.आर.एफ. रँकिंग मध्ये देशात ५९ वे स्थान
- विश्वविद्यालय अनुदान आयोग प्रदानित श्रेणी-१ विश्वविद्यालय
- भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास विभागाकडून 'अ' दर्जा प्राप्त
- विविध राष्ट्रीय सर्वेक्षणांमध्ये उच्च मूल्यांकन
- जागतिक दर्जाचे संशोधन व असंख्य पेटंटस्

## उच्च शिक्षण विद्या शाखा

वैद्यकीय
श्रवणशात्र
जैविकतंत्रज्ञान
सामाजिकशास्त्रे
जैविक
दंतचिकित्सा
नर्सिंग
तंत्र निकेतन
कला
कृषी
आयुर्वेद
वाणिज्य
विधी
दृश्य कला
परफॉर्मिंग आर्टस्
होमिओपॅथी
व्यवस्थापन
पर्यावरणशास्त्र
विज्ञान
नेत्र चिकित्सा
हॉटेल व्यवस्थापन
वास्तुरचनाशास्त्र
शारीरिक शिक्षण
औषधनिर्माणशास्त्र
अभियांत्रिकी
समाजकार्य
छायाचित्रकला

## शैक्षणिक परिसर





पुणे जिल्हा परिषद व राज्य शासन आदर्श पुरस्कार प्राप्त
ग्रामपंचायत मारुंजी
.''उत्कर्षाची वाट उमटली
विरला गर्द कालचा काळोख
क्षितिजावर पहाट उगवली,
घेऊनिया नवा उत्साह सोबत
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..!!''
सौ.नंदा संजय बुचडे
सरपंच
सौ.बायडाबाई.हि.बुचडे
उपसरपंच
सर्व
नागरिकांना
शुभ
दिपावली
श्री. ईश्वर रघुनाथ बुचडे
मा.सरपंच / वि.सदस्य
श्री. आकाश मच्छिंद्र बुचडे
मा.सरपंच / वि.सदस्य
श्री. देवीदास भिमराव बुचडे
मा.उपसरपंच / वि.सदस्य
श्री. कृष्णा उमाजी बुचडे
मा.सरपंच / वि.सदस्य
सौ. जयश्री रामदास कवडे
मा.सरपंच / वि.सदस्या
सौ. कावेरी संदीप बुचडे
मा.सरपंच / वि.सदस्या
सौ. विमल तानाजी लांडे
मा.सरपंच / वि.सदस्या
सौ. प्रिती शशीकांत जगताप
वि. सदस्या
सौ. प्रणोती सुधीर कांबळे
वि. सदस्या
सौ. रुपाली तुषार जौंजाळे
वि. सदस्या
श्री.तुळशीराम.व्ही.रायकर
ग्रामपंचायत अधिकारी
: शुभेच्छुक :
समस्त ग्रामस्थ मंडळी
आणि ग्रामपंचायत कर्मचारी


दिवाळीचे तेज उजळून
प्रत्येकाच्या अंगणात,
मदतीची भावना रुजू
मनामनांत !
शुभ
दिपावली
अमित तोरडमल
सरचिटणीस, भाजपा कोथरूड मध्य मंडल
BJYM
दुष्यंत मोहोळ
अध्यक्ष : भारतीय जनता युवा मोर्चा, पुणे शहर

# भावपुर्ण श्रध्दांजली



## स्व. दत्तात्रय सुर्वे

मा. पंचायत समिती सदस्य, मुळशी

मा. उपाध्यक्ष पुणे जिल्हा भा.ज.पा.

– संपादक –

मुळशी दिनांक (साप्ताहिक)

शिवमार्ग (मासिक), शिवतेज (पाक्षिक)

# संपादकीय





मनाच्या दीपोत्सवात उजळले विचारांचे तेज यंदा ‘शिवतेज’ दिवाळी अंक प्रकाशित करताना आपण तेजाच्या परंपरेशी जोडले जात आहोत ज्ञानाचं, विचाराचं आणि कृतीचं तेज.

देशात पुन्हा मोदी सरकार स्थापन झाले,तर महाराष्ट्रातही नवी राजकीय मांडणी आकारास आली.पेहालगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने ‘ऑपरेशन सिंदूर’द्वारे ठोस प्रत्युत्तर दिले. काही भागात अतिवृष्टी आणि पूरस्थिती, तर काही ठिकाणी दुष्काळ अशी परिस्थिती निर्माण झाली. कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल शिक्षण,सायबर जनजागृती आणि ओटीटीवरील मराठी सर्जनशीलतेमुळे समाज नव्या दिशेने वाटचाल करत आहे.

यंदाची दिवाळी प्रकाशासोबत बदलाचीही आहे तंत्रज्ञान, हवामानबदल आणि नातेसंबंधांच्या नव्या युगात प्रवेश करणारी. परंपरेचा सन्मान राखत नव्या मूल्यांचा स्वीकार करणे हीच या उत्सवाची खरी ओळख ठरावी.

यंदाच्या अंकातील कथा आपल्या आजूबाजूच्या जीवनाशी घट्ट जोडलेल्या आहेत. ‘निरंतर प्रेमाचा शोध’, ‘मला आई व्हायचंय’, ‘शर्यत’, ‘नस्पृहता’ आणि ‘काळजाचा तुकडा’ या कथांमधून माणुसकीचा उबदार स्पर्श जाणवतो. तर ‘झडप’, ‘धुरपाई’, ‘गजरा’, ‘आर्यनची गोष्ट’ यांसारख्या कथांत मानवी स्वभावाचे विविध पैलू उलगडले आहेत. ‘दोन अधिक / दोन उणे’, ‘शेजारधर्म’, ‘जिद्दी लाली’ या कथा दैनंदिन जीवनातील साधेपणा आणि नात्यांची ऊब सुंदरपणे टिपतात.

लेखविभागात इतिहास,संस्कृती, कला आणि समाज यांचा सुंदर संगम दिसतो. ‘महाराष्ट्र गडांचा अभिमान’, ‘ठेकेबाज संगीताचा ठेकेदार’, ‘कुसुमाग्रजांचा ईश्वरशोध’ या लेखांमधून ज्ञानाचा दीप उजळतो.‘वॉशिंग्टन मधील प्रा.डॉ.माधवी खरात. यांचा शापित प्रतिभाशाली कलावंत चित्रकार विन्सेंट व्हेन गॉन हा लेख ’‘झोंबी’, ‘विधवा स्त्रीची घालमेल’, ‘रथ एक : चाके दोन’ हे लेख सामाजिक वास्तव मांडतात,तर ‘गोमातेचे आध्यात्मिक महत्व’आणि ‘ज्योतिषशास्त्राची उपयुक्तता’हे लेख परंपरेतील आध्यात्मिक मूल्यांची जाणीव करून देतात.

या सर्व लेखनाचा हेतू एकच माणसाच्या मनातील चांगुलपणाचा, विचारांचा आणि संवेदनांचा प्रकाश अधिक तेजस्वी करणे.दिवाळीच्या या सणात जे दिवे आपण बाहेर लावतो,ते आपल्या अंतरंगातही पेटले पाहिजेत.आपल्या मनातील अंधार दूर करून नव्या प्रकाशाचा, नव्या विचारांचा आणि नव्या बदलांचा दीप उजळवणं हीच खरी दिवाळी! या अंकाच्या माध्यमातून विचारांना उजाळा देण्याचा, मूल्यांना बळ देण्याचा आणि प्रत्येक वाचकाच्या मनात एक नवा दीप प्रज्वलित करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

“शिवतेज” अंकाच्या यशामागे ज्या व्यक्तीचा हात आहे ती म्हणजे स्व. दत्तात्रय सुर्वे एक संवेदनशील संपादक, जिद्दी साहित्याप्रेमी आणि विचारवंत व्यक्तिमत्व त्यांनी “शिवतेज” हा दिवाळी अंक राज्यभर पोहोचवला. त्यांच्या दूरदृष्टीने आणि अथक प्रयत्नांनी या अंकाला ओळख, प्रतिष्ठा आणि सन्मान मिळवून दिला. राज्यभरातील अनेक दिवाळी अंक स्पर्धांमध्ये त्यांनी बक्षिसे मिळवून “शिवतेज” या नावाला तेज दिले.

आज ते आपल्यात नाहीत,पण त्यांची प्रेरणा,त्यांचे मार्गदर्शन आणि त्यांचा शब्दांचा वारसा आजही जिवंत आहे. हा अंक म्हणजे त्यांच्या स्मृतींना वाहिलेली एक शब्दरूपी पुष्पांजली त्यांच्याच तेजातून फुललेला आमचा साहित्यदीप. या प्रवासात आमच्या सर्व हितचिंतकांचे, साहित्यिकांचे, जाहिरातदारांचे,वाचकांचे आणि शिवतेज परिवारातील प्रत्येक सदस्याचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो. आपल्या प्रत्येकाच्या सहकार्यामुळेच “शिवतेज” हे नाव आज महाराष्ट्राच्या साहित्यविश्वात अभिमानाने झळकत आहे. आपण सर्वांना आनंदी, निरोगी, समाधानकारक आणि समृद्ध दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

**–केतन दत्तात्रय सुर्वे**
कार्यकारी संपादक





**कै.दत्तात्रय सुर्वे**
संपादक

शिवतेज दिवाळी अंक २०२५
वर्ष-३५ वे, दिवाळी अंक-३६ वा,
ऑक्टो-नोव्हें.२०२५

कै. दत्तात्रय नारायण सुर्वे
संस्थापक संपादक- शिवतेज
संस्थापक संपादक- साप्ताहिक मुळशी दिनांक
संस्थापक संपादक- मासिक शिवमार्ग

संपादक- स्व. दत्तात्रय सुर्वे
मानद संपादक- आ.शरद ढमाले
email : dattasurve27@gmail.com
email : vinitasurve25@gmail.com

उपसंपादक- राजेंद्र कृष्णा कापसे

कार्य.संपादक- श्री. केतन द. सुर्वे

मुखपृष्ठ रचना- सौ. स्नेहल शशिकांत अरगडे

व्यवस्थापिका- श्रीमती विनिता सुर्वे

मुद्रणशोधन- श्रीमती.प्रभावती मचाले, स्नेहल केतन सुर्वे

-संपादकीय कार्यालय-
१०/६४,पी.एम.सी.कॉलनी, शास्त्रीनगर,कोथरूड,पुणे-३८
मो-९७६५६२६८२८,९३७२१११५७५, ८२०८२६०४७१

मुंबई कार्यालय- श्री.श्रीकांत मयेकर
११४/१०,बी.डी.डी.चाळ, शिवराम अमृतवार मार्ग,वरळी, मुंबई- ४०००१८ मोबा-९८२१४६९०७२
Email- shrican@gmail.com
मुद्रक - किरण प्रोसेस,शॉप नं.१,१८७/१, यशोसुमन अपार्ट.ओंकारेश्वर मंदिर पथ, शनिवारपेठ,पुणे-३०,दूर-०२०-२४४३०८१३

वितरक- मुंबई-लक्षराज पेपर एजन्सी
द्वारा-माधवी मांजरेकर,बुगडे निवास, वीर सावरकर मार्ग,शिवाजीपार्क, मुंबई-४०००२८ मो.-०९८२१४६९०७२

पुणे वितरण- पूनम एजन्सी,संदेश एजन्सी, तेजस न्यूज पेपर एजन्सी-अनिल शिंदे (कोथरूड) वीर न्यूज पेपर एजन्सी, शिवतेज न्यूज पेपर एजन्सी पौड पेपर एजन्सी

मूल्य : १५० रुपये

शिवतेज हा दिवाळी अंक मालक,मुद्रक,प्रकाशक,कार्य. संपादक श्री.केतन दत्तात्रय सुर्वे यांनी किरण प्रोसेस, शॉप नं.१,१८७/१,यशोसुमन अपार्ट.ओंकारेश्वर पथ, शनिवारपेठ,पुणे-३० येथे छापून १०/६४,पी.एम.सी. कॉलनी, शास्त्रीनगर, कोथरूड,पुणे-४११०३८ येथे प्रसिध्द केला.

शुभदीपावली

शिवतेज

विशेष सहकार्य-
विजय(बापू) ढमाले,प्रभाकर ढमाले, शंकर(बंडू) केमसे, अनंत ढमाले, रांमचंद्र ठोंबरे, सगरे सर,राजेंद्र बांदल,मधुराताई भेलके, शरद खराडे, निलेश सुर्वे, ज्ञानोबा घाडगे, अशोक साठे,अनंता सुर्वे,आर.डी शिंदे,ॲड.संजय मारणे, मनोहर आप्पा गुंड, लक्ष्मण ठोंबरे,महेश मालुसरे,रमेश जोरी,बंडू गुजर,आकाश काळजे. मुळशी पत्रकार संघ. मा. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मा. संचालक, माहिती कार्यालय, मा. उपसंचालक,विभागीय माहिती कार्यालय, पुणे विभाग, मा.जिल्हा माहिती अधिकारी, पुणे जिल्हा,सर्व शासकीय अधिकारी, सर्व सरपंच, उपसरपंच,सर्व ग्रामविकास अधिकारी,सर्व लेखक,सर्व जाहिरातदार

**या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी, लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. पुणे न्यायालयीन कक्षेत सर्व वाद विवाद राहतील**
**- संपादक**

# शिवतेज

वर्ष-३५ वे, दिवाळी अंक-३६ वा,
ऑक्टो- नोव्हें.२०२५

# अंतरंग

## कथा विभाग

१) निरंतर प्रेमाचा शोध — ०५
– अजित यशवंत कारखानिस
२) मला आई व्हायचंय — १३
– संतोष जाधव.
३) शर्यत — १८
– उत्तम सदाकाळ
४) निस्पृहता — २२
– प्रा.देवबा शिवाजी पाटील,
५) काळजाचा तुकडा — २७
– अविनाश भोंडवे.
६) 'झडप' — ३२
–डी.बी.जगत्पुरिया
७) धुरपाई — ३५
–आर.डी.शिंदे
८) बंगाली काळी जादू — ३८
– श्री.एकनाथ गायकवाड
९) गजरा — ४२
–अरुण सावळेकर
१०) आर्यनची गोष्ट — ४६
– प्रिया फुलंब्रीकर
११) अंकुर — ४९
–रत्नाकर वाणी
१२) दोन अधिक /दोन उणे — ५३
– विनायक दिनकर ढवळे
१३) शेजारधर्म — ५५
–सौ.भारती सावंत
१४) जिद्दी लाली — ५७
–सौ रमा परांजपे
१५) मितभाषी — ६०
– व्यंकटेश देवनपल्ली,.
१६) आशिर्वाद.... — ६३
–पुरुषोत्तम प्रोहोणकार
१७) हुंदका — ६६
–डॉ.आप्पासाहेब पाटील
१८) उडणारी पाखरं — ७०
–नलिनी भोसेकर
१९) कुंडली — ७२
– विनय मिरासे अशांत

## लेख विभाग


१) महाराष्ट्र गडांचा अभिमान,संस्कृतीचा गंध ७९
–केतन सुर्वे
२) ठेकेबाज संगीताचा ठेकेदार – संगीतकार–ओ. पी.नय्यर तारीफ करू क्या मै उसकी – ८०
– दिलीप कुकडे
३) क्रिकेटमधला शापित यक्ष ८३
–गुरुप्रसाद दि पणदूरकर –
४) प्रतिभाशाली कलावंत ८६
– प्रा. डॉ. माधवी खरात
५) झोंबी: ग्रामीण शिक्षण व्यवस्थेवरील .... ८९
– किरण शिवहर डोंगरदिवे–
६) अठराशे सत्तावन्नचे स्वातंत्र्य समर ९३
–रामकृष्ण भगवंत अघोर
७) कुसुमाग्रजांचा ईश्वरशोध ९६
–डॉ.प्रकाश जाधव
८) सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव – रामराज्याच्या दिव्य युगाचा प्रारंभ!–– १०१
–श्री.अभय वर्तक,प्रवक्ते–सनातन संस्था
९) सर्वकारण सामाजिक प्रदूषण १०४
– धीरज वाटेकर
१०) व्यक्तीगत आणि सामाजिक स्तरावर ज्योतिषशास्त्राची उपयुक्तता ११०
–श्री.राज कर्वे,
११) माझ्या लावणीचा संस्मरणीय प्रवास ११२
–उद्धव भयवाळ
१२) पुण्यतिथी ११५
–श्री.विठ्ठल कदम,
१३) विधवा स्त्रीची घालमेल ११७
–ॲड रामचंद्र बाजीराव पाचुनकर
१४) आईचं घर ११९
–शब्दांकन प्रकाश देशपांडे
१५) देह–देश आणि देव १२१
– आनंद देशमुख
१६) चला झिम्माड होऊ १२३
– सौ. भारती सावंत
१७) हुंदका १२५
–प्रा.भरत खैरकर
१८) एक ध्यास परिपूर्णतेचा...... १२७
आसावरी अभिजीत ऐनापुरे
१९) पती पत्नीचे नाते जन्मजन्मांतरीचे १२८
–सौ.स्नेहा मुसरीफ,
२०) रथ एक : चाके दोन १३१
–नागेश शेवाळकर,
२१) मागे वळून पाहताना.. १३४
–डॉ.पूजा पराग सामंत
२२) गोमातेचे (देशी गायीचे)आध्यात्मिक महत्व १३६
– सौ.मधुरा धनंजय कर्वे,
२३) फटाके..आनंद दायक की हानिकारक १४०
–सौ. स्नेहा मुसरीफ
२४) नशिबाचे भोग १४३
– सुतेजा सुभाष दांडेकर
२५) जपानमधील बुद्ध मंदिरे १४६
– अंजली फडके
२६) देशातील नं.१ पीडीसीसी बँकेचा लौकिक १४८
– ह.भ.प. रामचंद्र महाराज भरेकर
२७) एक तिबेटी लोककथा १५२
– समीर गायकवाड
२८) ती, आरसा आणि मी... १५३
– शीला पतकी
खास डिश –स्नेहा मुसरिफ १५६


## काव्य विभाग


जिजाऊ – प्रा.देवबा पोटील १६१
पत्रिका हेतु – अविनाश खरे १६२
शोधूनही सापडेना – तुकाराम खिल्लारे १६२
धुंद उधाणवारा,–भारती सावंत १६३
चालायचे पुन्हा पुन्हा–तुकाराम खिल्लारे १६४
कर्मकांड–प्रा.विश्वनाथ गायकवाड, कवेतलं आभाळ–नलिनी भोसेकर १६४
मोकळीच मी–नलिनी भोसेकर, १६५
हायकू बाशोचे–तुकाराम खिल्लारे १६५
कन्यारत्न –प्रिया फुलंब्रीकर १६६
बळीराजा–आनंद देशमुख १६६
शोध,कवी,नांव– पुरूषोत्तम रोहणकार १६७
चीतचोर– वर्षा सांबरे १६७
झुंजार– विश्वनाथ गायकवाड १६७
सण अपूर्वाय –हेमंत मुसरीफ १६८
जीवनाचे गणित– रामचंद्र पाचूणकर १६९
आपली मराठी/भक्त मागणी– बाबू डिसोजा १६९
संचित – वर्षा झांबरे १७०
लाक्षागृह – आनंद देशमुख, शाळू दिवस – विलास कदम १७१
आयना, पावसाळा– अरूणकुमार यादव १७२
माझा सखा– लक्ष्मीकांत भोसेकर १७२
घर सजवितांना, दिवसाकाठी एकदा तरी –पंडित हिंगे १७३
राशीभविष्य : चिंतामणी देशपांडे गुरूजी १७४


**रेखाचित्रे** : प्रतिक काटे ■ **व्यंगचित्रे** : राम मांडुरके

**■ सल्लागार**
शंकर टेमघरे, ओजाळे सर, शशिकांत अरगडे, गीता देशपांडे,राजेंद्र मारणे, दत्तात्रय उभे, हनुमंत सुर्वे, सुनिल शिंदे, विनोद सुर्वे, विष्णू सुर्वे, ज्ञानेश्वर सुर्वे, आदित्य सातपुते,




गुऱ्हाळ व्यवसायाला प्रतिष्ठा
प्राप्त करुन देणारे
कै. लक्ष्मणराव तुकाराम मारणे संचलित,

# मुरलीधर
## रसवंती गृह व स्नॅक्स सेंटर

**१४८४, शुक्रवार पेठ, शनिपार चौक, बाजीराव रोड, पुणे २.**
**संपर्क : सौ. मधुरा भेलके(मारणे) मोबा. : ९४२२३२३११२**

---

**निसर्गरम्य मुळशी तालुक्यातील खारवडे येथे**
**वेणू ॲग्रो टुरिझम फार्म्स संचालित,**

the farmstead
A COUNTRYSIDE AFFAIR

नदी काठ, शिवार फेरी, कॅम्पिंग, बोन फायर, भाजी शेती, रेन डान्स, कॉन्फरन्स रुम, डेस्टिनेशन वेडिंग, प्री-वेडिंग लोकेशन, मैदानी खेळ, बैठे खेळ, अस्सल महाराष्ट्रीयन जेवण

**खारवडे, लवासा रोड, ता. मुळशी, जि. पुणे**

**संपर्क : ७८७५७५७५७०, ८३०८३०१८००**
**वेबसाईट : www.thefarmstead.in**

## कथा विभाग

# निरंतर प्रेमाचा शोध

अजित यशवंत कारखानिस

सुरजकुमार आपल्या मित्राच्या घरी एका कोपऱ्यात जुन्या रद्दी सामान ठेवलेल्या खोलीत, "इस्माईल खान " यांच्या शेरोशायरी के साथ,हे पुस्तक चाळत बसला होता.

सुरजकुमार याचा चेहरा काळवंडला होता व चेहऱ्यावर ३/४ दिवस दाढी न केलेली नाही,हे स्पष्ट दिसत होते.तरी मन मात्र त्या पुस्तकात असलेल्या शेरोशायरी या मध्ये गुंतलेलं होतं.

सुरजकुमार याला काव्य,गजल,शेरोशायरी या विषयी विलक्षण छंद व आवड होती.लहान असल्या पासूनच त्यांचे मन कविता व काव्य यात रमत होते. शाळेत असतानाच तो कविता करू लागला होता.या बाबतीत त्याचे मित्र सवंगडी व काही शिक्षकवर्ग त्याचे कौतुक करत. तर घरात मात्र त्याची ही आवड,कोणाला फारशी पसंत नव्हती. त्याचे वडील एका सरकारी खात्यात कारकुनी करत होते.



सुरजकुमार लहान असतानाच त्याच्या आईने जगाचा निरोप घेतला होता. मोठा भाऊ"किरणकुमार" एका खाजगी कंपनीत चांगल्या

पदावर होता. पण त्याला लहान भावाविषयी फारशी आस्था नव्हती आणि त्याची पत्नी म्हणजे सुरजकुमार याची वहिनी तर त्याचा तिटकारा करत होती.

कॉलेजचे रंगीबेरंगी जीवन हा सुरजकुमार याच्या जीवना तील अत्यंत सुंदर व आनंददायी काळ होता. गोरापान व उमद्या व्यक्तीमत्व असलेला सुरजकुमार मात्र कॉलेजमध्ये विलक्षण लोकप्रीय होता आणि याला कारण होते ते त्याने रचलेल्या सुंदर कविता, शेरोशायरी, गझल जे तो वेळोवळी कालेज मधील समारंभात ऐकवीत होता आणि सर्व त्यांचे कौतुक करत होते. कालेज मधील मुलींचा घोळका नेहमीच त्याच्या भोवती जमत होता आणि त्याच्या कविता हे त्यांचे प्रमुख कारण होतं.पण सुरजकुमार याला त्यांच्याकडे बघण्यात देखील रस नव्हता.दिवस रात्र त्याचे मन वेगवेगळ्या कवितांमध्ये नखशिखांत गुंतले होते.

कॉलेजमध्ये असलेल्या एका छोट्या समारंभासाठी प्रसिध्द शायर... इस्माईल खान... हे प्रमुख पाहुणे होते आणि त्यांच्या समोर आपली शायरी सादर करण्याची संधी सुरज ला मिळाली.त्याने स्वतः लिहिलेली शायरी ऐकून इस्माईल खान खूप प्रभावित झाले आणि त्याची खूप प्रशंसा केली.त्याचबरोबर एका गोष्टीची जाणीव करून दिली.ते म्हणाले ..बेटा... तुला शायरीचे वरदान आहे .पण एका शायर चे आयुष्य नेहमी एकाकी असत.जग त्याला कधीच ओळखू शकत नाही. त्याची नेहमीच हेटाळणी केली जाते.हा शायर ला मिळालेला शाप आहे आणि मी व माझे आयुष्य देखील त्याला अपवाद नाही". यानंतर काही महिन्यांनी शायर इस्माईल शेख यांचे निधन झाले. पण एका यशस्वी शायर चे हे शब्द आयुष्यभर सुरजकुमार याच्या मनाचा पाठलाग करत राहीले.

या समारंभात "वैजयंती" नावाची एक सुंदर मुलगी आली होती. तिची एक मैत्रीण याच कॉलेजात शिकत होती आणि आपल्या मैत्रीणी बरोबर वैजयंती आली होती. या वैजयंती ला देखील शेरोशायरी व काव्य, या विषयात रुची होती.

सुरजकुमार याने, स्टेज वरून सादर केलेला शेरोशायरी व गझलांचा नजराणा ऐकून ती, चांगलीच प्रभावित झाली होती.कार्यक्रम संपल्यावर तीने आपल्या मैत्रीणी तर्फे सुरजकुमारशी ओळख करून घेतली आणि त्याच्याशी या विषयावर गप्पा मारल्या. त्यात दोघांनाही जाणवले की दोघांच्याही या विषयात सारख्याच आवडी-निवडी आहेत, दोघांचीही मते जुळतात आणि मग वरचेवर त्यांच्या भेटी होऊ लागल्या. अठरा एकोणीस वर्षांचे कोवळे वय, सहवास आणि मनपसंत मैत्री. बघता बघता ते एकमेकांच्या प्रेमात कधी पडले हे, दोघांनाही कळले नाही. एकमेकांची वाट पहाणे, एकमेकांविषयी वाटणारी हुरहूर. एकत्र असताना जगाचा पडलेला विसर. तरूण वयातला अत्यंत आनंदाचा काळ.

कालेज शिक्षण संपले. पण वैजयंती व सुरजकुमार यांचे प्रेमप्रकरण चालुच राहीले आणि वैजयंती लग्नाचा विचार करू लागली. सुरजकुमार मात्र अजूनही आपल्या शायरी व कवितांच्या दुनियेतून बाहेर आला नव्हता. पण वय वाढत होतं आणि आता लग्न करून सुखाने संसार करावा असं वैजयंतीला वाटत होतं. यात काही गैर नव्हते.पण लग्न करायचे व संसार करायचा तर पैसे कमावणे आवश्यक होते.वैजयंती चे आई-वडिल देखील या नात्यालाअनुकूल नव्हते. सुरजकुमार याचे फक्त शेरोशायरी व गझलांच्या विश्वात रमणे त्यांना साफ नामंजूर होते.वैजयंती लाखात एक अशी देखणी होती. मोठमोठया श्रीमंत घरातून लग्नासाठी मागण्या येत होत्या. त्या सर्वांना नकार देवून तिने सुरजकुमार सारख्या कफल्लक माणसाशी लग्न करण्याचा विचार करणे,त्यांना साफ नामंजूर होते.

संसार हा विषय वरचेवर काढू लागले होते आणि शेवटी दोघांनी घरच्याघरी रजिस्टर पद्धतीने लग्न केले.पण दोघे आशिर्वाद घेण्यासाठी घरी गेले तेव्हा त्यांना पहिला धक्का बसला. वहिनीने दोघांना घरी प्रवेश देण्यास साफ नकार दिला. उलटपक्षी सुरजकुमार याचे कपडेलत्ते व सामान बाहेर काढले आणि पुन्हा या घरी पाऊल सुद्धा ठेवायचे नाही अशी अशी सक्त ताकीद दिली. भाऊ किरण काहीच बोलला नाही.म्हणजे एका अर्थाने त्याचा वहिनीच्या निर्णयाला समर्थन होते.वैजयंती हिच्या पित्याच्या घराची दारे त्यांच्या करता, लग्न झाले त्याच क्षणी,बंद झाली होती.शेवटी सुरज याच्या एका मित्राच्या मदतीने,एका जुन्या मोडकळीस आलेल्या चाळीत, नाममात्र भाड्याची एक खोली त्यांना मिळाली आणि त्यांचा संसार सुरू झाला.पण संसार म्हटला की पैसे हे लागतातच. वैजयंती हिच्या मैत्रीणीच्या मदतीने, तिला एका मोठया कपड्यांच्या दुकानात,सेल्स गर्ल ची नोकरी मिळाली.सुंदर व अंगात असलेल्या गुणांमुळे वैजयंती यशाची एक एक पायरी वर चढू लागली. सुरजकुमारवर तीचे प्रेम होते आणि त्याने देखील आपल्या सारखी छान नोकरी करावी,चांगला पैसा कमवावा,आपल्याकडे गाडी व बंगला असावा आणि फावल्या वेळात आपला शेरोशायरी व गझल याचा छंद जोपासावा,असे तीचे स्वप्न होते.पण सुरजकुमार तिच्यात एक चिरंतन प्रेम शोधत होता. संपत्ती,पैसाअडका, गाडी, बंगला अशा गोष्टींचा त्याला तिटकारा होता.एकीकडे ती करियर मध्ये यशस्वी होत होती. तर दुसरीकडे सुरजकुमार याची, कुठलीच गोष्ट यशस्वी होत नव्हती. एक दोन ठिकाणी त्याला छोट्या नोकऱ्या सुद्धा मिळाल्या होत्या. पण त्या टिकवून ठेवणे त्याला जमले नाही. त्यामुळे संसाराचा सारा भार वैजयंती वरच पडला होता. हळू हळू त्यांच्यात दुरावा निर्माण होऊ लागला.हा संसार पाच वर्षे टिकला आणि वैजयंती हिने त्याला सोडून जाण्याचा निर्णय घेतला. एक पती म्हणून आपण सपशेल नालायक ठरलो,हे सुरजकुमार याला कळत होते.पण काव्य निर्मिती, शेरोशायरी व गझल लिहिणे, या एकाच मार्गावर आपण यशस्वी होऊ यावर त्याचा ठाम विश्वास होता.शेवटी वैजयंती त्याच्या आयुष्यातून निघून गेली.वैजयंती गेल्यावर सुरजकुमार यांचे आयुष्य सैरभैर झाले.तरूण वयातील कालेज जीवनापासून प्राप्त झालेले व आयुष्यातले पहिले

प्रेम विसरणे कोणालाही येवढे सोपे नसते.वैजयंती गेली. पण तिच्या आठवणी कायम त्याचा पिच्छा पुरवित राहिल्या.

सुरजकुमार याला पुन्हा पुन्हा इस्माईल खान यांचे शब्द " शायर चे आयुष्य नेहमीच एकाकी असते व त्याला साऱ्या जगाची हेटाळणी सहन करावी लागते " आठवले. आता त्याला त्याचा प्रत्याक्ष अनुभव येत होता.आता या जगात तो आणि त्याची शायरी, गझल व कविता येवढेच त्याच्या सोबतीला होते.एकाकी व अपयशी आयुष्य, या विचारांचा कडेकोट झाला की तो विसरण्याचा एकच उपाय असतो आणि तो म्हणजे दारू.सुरजकुमार दारू प्यायला लागला आणि अशाच दारूबाज मित्रांच्या संगतीत रमू लागला.पण पोट भरायला पैसे लागतातच. मग त्यासाठी, एखाद्या भिकारी माणसा सारखे जे जे समोर येईल ते ते सुरजकुमार करू लागला. अगदी सामान उचलणे व गाडीत ठेवणे, शिक्षित असल्याने कुठे कोणाला हिशोब लिहून देण्यापर्यंत सगळे.संध्याकाळी मित्रांबरोबर स्वतः ला दारूच्या नशेत बुडवून टाकायचे आणि दारूच्या नशा उतरली की लेखणी हाती घेऊन शेरोशायरी,गझल व वेगवेगळ्या प्रकारचे काव्य लिहून काढायचे.लिहिलेले कागद फायली ला लावायचे आणि प्रकाशकांना गाठून त्यांना ते लेखन छापण्यासाठी विनवणी करायची. प्रत्येक ठिकाणी नकार." एकदा वाचून तरी बघा ", काकुळतीला येऊन सुरजकुमार पुन्हा पुन्हा विनवणी करत होता. पण प्रत्येक ठिकाणी हेच उत्तर मिळत होते की " आम्ही आमच्या छापखान्यात कुठल्या नवख्या शायर ची शायरी छापत नाही " आणि प्रत्येक प्रकाशक त्याला अक्षरशा हाकलून लावत होता.बघता बघता वैजयंती सोडून गेली व भरकटलेले आयुष्य जगण्यात ५/६ वर्षे उलटून गेली.शायरी लिहिलेल्या कागदपत्रांच्या ३/४ फाईल्स झाल्या होत्या. पण छापून प्रकाशित करायला कोणीही तयार झाले नाही.शेवटी त्याच्या सहनशक्तीचा चा अंत झाला. स्वतःहाच्या आयुष्या विषयी वाटणारा तिटकारा पराकोटीच्या अवस्थेत पोचला आणि उद्वेगाने तो उठला, आपल्या शेरोशायरी च्या तीन फाईल्स उचलल्या आणि बाजारात एका रद्दी च्या दुकानात जाऊन रद्दी म्हणून देऊन टाकल्या. नंतर सरळ दारूचा गुत्ता गाठला आणि रात्री झोकांड्या खात आपला एकुलता एक मित्र"सुदर्शन " याने दिलेल्या एका जुनाट चाळीत एक जुने नको असलेले सामान ठेवायच्या खोलीत आला.

दुसऱ्या दिवशी सुरजकुमार उठला तेव्हा रात्रीच्या दारूची गुंगी उतरली होती आणि मग पोटाची खळगी भरण्यासाठी, काम शोधायला बाजारात गेला. इतर हमाल लोकांसारखे हमाली करू लागला.हे आता त्याचे रुटीन लाईफ झाले. पडेल ते काम करायचे,दोन घास खाण्यासाठी चार पैसे कमवायचे,दारू प्यायची आणि दिवस ढकलायचा.मनाच्या या विचित्र व काहीशा भयाण अवस्थेत एक वर्ष निघून गेले.त्या दिवशी नेहमीप्रमाणे सुरजकुमार बाजाराच्या दिशेने निघाला आणि त्याने पाहीले की एक वृद्ध गृहस्थ एका ठिकाणी,भरपूर सामाना सहीत उभा होता. बहुतेक त्याला कुठे तरी जायचे होते आणि या सामाना सहीत कसे जायचे, हा प्रश्न होता. सुरजकुमार ला काम व पैसे,या दोनही गोष्टींची अतोनात गरज होती.तो पुढे आला आणि सामान हाती घेऊन त्याला मदत करण्याची इच्छा दर्शवली.त्याने ते मान्य केले व सुरज त्याला व्यवस्थित घरी सोडून आला. परत येण्याचा रस्ता, कोठी वाले लोकांच्या वस्तीतून जात होता. येत असताना त्याला एका कोठीतून एक मधूर गझल ऐकू आली आणि त्याला आश्चर्याचा धक्का बसला.कारण ऐकू येणारे ते मधूर स्वर म्हणजे त्याने स्वतः लिहिलेली गझल होती. सुरज धावतच त्या कोठीत शिरला.

" ए .... कोण आहेस तू?"

आतल्या कोठीच्या वयस्कर मालकीण बाईंनी विचारले."

मी आत्ता एक गोड स्वरात गझल ऐकली ! कोण म्हणत होतं ती गझल ?"!

तुला ऐकायची आहे?आणि मजा पण करायची आहे?पण त्याला पैसे लागतात ? पैसे आहेत ?"

पैसे नाहीत माझ्याकडे !"

ए भिकारी.....निघ इकडून!तुझ्या सारख्या माणसाची ही जागा नाही !मजा करायला इथे पैसा मोजायचा असतो !"

अतिशय खजील व लाजिरवाण्या अवस्थेत सुरजकुमार बाहेर आला व जिन्याच्या पायऱ्या उतरून खाली उतरला."

थांबा..... मी गात होते ती गझल !"

मागून आवाज आला. सुरजकुमारनी मागे वळून पाहीले. एक मध्यम उंचीची,खूप सुंदर नाही. पण आकर्षक दिसणारी एक तरूण स्त्री उभी होती.

॥कुठे मिळाली ही गझल तुम्हाला ?"

" का ??? असं का विचारता आहात ?

" कारण मी लिहिली आहे ती गझल ! खाली "सुरज" असं नाव आहे आणि "चंद्रा" चे चित्र आहे "

हे शब्द ऐकताच त्या स्त्रिच्या चेहऱ्यावरचे भाव बदलले."

'तुम्ही लिहिली आहे ?तुम्ही शायर आहात ?"

" हो....

.....मला शायरी करण्याचा छंद आहे !"

जरा दोन मिनिटे थांबा.... मी खाली येते !"

ती आत गेली आणि लगेच खाली आली.

"जवळच माझे घर आहे ! घर म्हणजे एक झोपडी आहे !आपण माझ्या घरी जाऊ !" सुरजकुमारला घेऊन ती घरी आली आणि दोघांनी शायरी या विषयावर खूप गप्पा मारल्या. सुरज ला समजले की या मुलीचे नाव आहे " फातिमा "आणि ती वेश्याव्यवसाय करून पोट भरणारी स्त्री आहे. एक अनाथ मुलगी.पण लहान पणापासूनच शेरोशायरी व गझल याची आवड असणारी सामान्य मुलगी.सुरजकुमार यानी रद्दी म्हणून दुकानात दिलेले शायरी असलेले कागद, या फातिमाबाई हिने, पदरचे पैसे देऊन खरेदी केले होते आणि त्यातलीच एक गझल, आपल्या मधूर आवाजात गायलेली सुरजकुमार याने ऐकली होती. त्या नंतर ती वरचेवर सुरजला भेटू लागली आणि हळू

हळू तिच्या मनात सुरज विषयी भावबंध जुळले. पण लगेच आपण एक वेश्या आहोत हे आठवले की ती आपल्या विचारांना मनातच ठेवत होती. दिवसा मागून दिवस जात होते. पण सुरजकुमार याच्या आयुष्यात काही फरक पडत नव्हता.फक्त आपली शायरी कुणाला तरी आवडते आहे ही भावना त्याला सुखवीत होती आणि या गोष्टी बद्दल तो फातिमाबाई हिचा कायमस्वरूपी ऋणी होता.तिच्या वासनेने बरबटलेल्या घाणेरडया जगातून बाहेर काढून,तिला चांगले आयुष्य जगता यावे, यासाठी धडपड करत होता. पण यश मिळत नव्हते.

घरदार सोडून बारा वर्षे उलटून गेली होती. घराची आठवण आली की मन कासावीस होत होते. आपल्या रक्ताच्या नात्याचा मोठा भाऊ व पित्याची आठवण मन कासावीस करत होते आणि सुरजकुमार आपल्या घरी गेला.पण वहिनी ने दारात अडवले. भाऊ किरणकुमार समोरच होता पण तो काही बोलला नाही.

"'किरण दादा... फक्त एकदा बाबांना भेटायची इच्छा आहे ! पुन्हा त्रास देणार नाही !"

बाबांना भेटायचय? बाबांना भेटायचंय ?? ये आत ये !"

किरण दादा तिटकाऱ्याच्या स्वरात म्हणाला.मान खाली घालून सुरजकुमार आत गेला आणि त्याने समोर पाहिले. आतले दृश्य पाहून त्याचे मस्तक बधीर झाले. समोरच्या भिंतीवर त्याच्या वडिलांचा फोटो लावला होता आणि त्या फोटोला हार घातला होता. वडील हे जग सोडून गेले होते.



सुरजकुमार ओक्साबोक्शी रडू लागला. काही क्षणानंतर त्याने स्वतःला सावरले.

'किरण दादा.... हे सर्व कधी झालं आणि मला का कळवले नाही ? मी काय गुन्हा केलाय ?"

तू मुलाचे काय कर्तव्य पार पाडलेस ?तू बाबांसाठी काही केलस ? आज ८/१० वर्षांनी इकडे त्यांना भेटायला आलास ! म्हातारपणी मी त्यांची सेवा केली ! तू तुझ्या गाणे बजावण्यात आणि दारू पिणे यात गुंग होतास !असा मुलगा देवाने कोणालाही देऊ नये !आता निघ इथूनताबडतोब आणि पुन्हा आम्हाला तोंड दाखवू नकोस !"

अत्यंत निराश व खजील अवस्थेत सुरजकुमार तिकडून निघाला. मनाची अवस्था विचित्र झाली होती आपण जगण्यास सर्वस्वी नालायक आहोत.आपल्या आयुष्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीला आपण फक्त दुःख च दिले. वैजयंती नी आपले सारे आयुष्य अर्पण केले आणि आपण काय केले?तिचे आयुष्य उद्ध्वस्त केले. आपण चांगले शायर होऊ शकलो नाही आणि आता फातिमा ती फक्त आपल्या गझल व कव्वाली च्या ओढीने आपल्यासाठी जे करता येईल ते करते. आपण अव्वल शायर आहोत असे प्रत्येकाला सांगते. पण आपण आज ती ज्या घाणीत अडकलीय, त्यातून बाहेर काढण्यासाठी काहीच करू शकलो नाही.धिक्कार असो आपल्या अस्तित्वाला.आता जगण्यात काही अर्थ नाही आणि त्याने आत्महत्या करण्याचा विचार पक्का केला.

शहराबाहेर असलेल्या खूप खोल व जोरदार पाण्याचा प्रवाह असलेल्या नदीच्या दिशेने सुरजकुमार निघाला.पण त्या आधी एक पत्र फातिमाबाई हिच्या नावाने लिहिले, त्यावर तीचा पत्ता लिहून ते पत्र पोस्टाने पाठवून दिले.नदीला लागून असलेल्या कड्यावरुन, प्रचंड प्रवाहाकडे स्थीर व एकटक नजरेने सुरजकुमार पहात होता. मनात विचारांचा गोंधळ उडाला होता आणि क्षणात तो या प्रवाहाचा एक भाग होणार होता. शेवटी परमेश्वराचे चिंतन करीत व आयुष्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तिची मनोमन क्षमा मागत, सुरजकुमार नी पाण्यात उडी मारली. जबरदस्त वेगाने वाहणाऱ्या व फेसाळलेल्या लाटांनी त्याला आपल्या पोटात सामावून घेतले आणि एका अध्याय समाप्त झाला.पण माणसाची कृती आणि त्या कृतीचा होणारा परिणाम, यांच्या मध्ये नियती नावाची एक अदृष्य शक्ती वास करत असते आणि इथेही तेच झाले. आत्महत्या करण्यासाठी त्याने पाण्यात उडी मारली होती. पण नियतीच्या मनात काही तरी वेगळेच होते.

तीन दिवसांनी ते पत्र फातिमाबाई हिच्या हाती लागलं आणि तीला अपार दुःख झाले.ती सुरजकुमारच्या प्रचंड प्रेमात होती.ती एक वेश्या होती आणि अनेक पुरूषी शरीराने तीला स्पर्श केला होता.वेश्याव्यवसायात तिच्या मनातली प्रेम ही भावनाच मेली होती. पण सुरजकुमार तिच्या आयुष्यात आला आणि पहिल्यांदाच प्रेमाने तिच्या मनात जन्म घेतला होता. त्याने आपल्या सारख्या वेश्ये

बरोबर लग्न करावे,अशी तिची अपेक्षा देखील नव्हती.पण तो आपल्या आयुष्यात असावा, त्याचा सहवास लाभावा, एवढीच माफक इच्छा होती. पण नियतीने तीच्या बरोबर

एक क्रूर खेळत होती. फातिमाबाई दुःखाने खचून गेली होती. सुरजकुमारचा सहवास हा एकमेव आनंद तीच्या जीवनात, योगायोगाने आला होता.पण तो देखील नशिबाने तिच्या कडून हिरावून घेतला होता.आता फक्त भयाण व संपूर्ण दिशाहीन आयुष्य उरले होते. वेश्या व्यवसायातच असलेल्या तिच्या मैत्रिणींनी तिला समजावण्याचा खूप प्रयत्न केला. आपण शरीर विक्री करणाऱ्या वेश्या आहोत. आपल्याला अशा प्रकारे कोणा एका व्यक्ती विषयी भावनाशील होऊन चालणार नाही.पण फातिमाबाई या दुःखातून बाहेर येवू शकली नाही. पुढचे दोन महिने असेच गेले. सुरजकुमारनी अशी अचानक आत्महत्या का केली?तीचे मन हा प्रश्न तीला पुन्हा पुन्हा विचारत होते.

अचानक तीला आठवले. सुरजकुमार आपली शायरी प्रकाशित करण्याचा आटोकाट प्रयत्न करत होता आणि त्या प्रयत्नांत त्याला अपयश येत होते. हेच त्यांचे मनस्वी दुःख होते, ज्यामुळे त्याने आत्महत्या करण्याचा निर्णय घेतला असावा. आता तो तर या जगात नाही. पण त्याने लिहिलेल्या शायरी चे कागद आपल्याकडे आहेत आणि आपण त्याची ही इच्छा पूरी केली तरच त्याच्या आत्म्याला शांती मिळेल. फातिमा उठली आणि लगेच कामाला लागली.बाजारात जावून ३/४ प्रकाशकांचे पत्ते मिळवले, सुरजकुमारच्या शायरी चे कागद दाखवले आणि ती शायरी छापून प्रकाशित करायची विनंती केली. पण तीची निराशा झाली." आम्ही कोणत्या नवीन शायरची शायरी छापत नाही "अशा प्रकारची उत्तरे मिळाली.

काय करावे असा विचार करत असतानाच तिच्या एका मैत्रिणीने एक माहिती आणली. कोणतरी सिन्हा नावाचे प्रकाशक आहेत व ते नवीन लेखकांचे साहित्य छापतात आणि ते एक अतिशय प्रामाणिक गृहस्थ आहेत.

मग लगेच फातिमा या सिन्हा यांना भेटायला गेली.हे सिन्हा साहेब एक वयस्कर वृद्ध गृहस्थ होते.

'नमस्ते सिन्हा साहेब....माझे नाव फातिमा आणि या शायरीच्या फाईल्स !कसही करून या

छापून प्रसिद्ध करा !मी तुमचे उपकार जन्मभर विसरणार नाही!"

सिन्हा साहेबांनी फाईल घेतली आणि ४/५ पाने वाचली.

"वा... खूप सुंदर शायरी ! कोण आहेत हे सुरजकुमार?आणि ते का आले नाहीत ?"

सिन्हा साहेब..... सुरजकुमार आता या जगात नाहीत! पण त्यांची शायरी या जगात राहिली पाहिजे!माझ्या करता ते माझे सर्वस्व होते ! त्यांची शायरी तुम्हाला देखील आवडली आहे! मग छापाल ना तुम्ही ती ?"

"फातिमा बेटा.... मला माफ कर ! मी सध्या कर्जबाजारी आहे आणि छापण्यासाठी हल्ली बरेच पैसे लागतात ! म्हणून सध्या मी फक्त, ज्या कुणाला जे हवे,ते माफक पैसे घेऊन छापून देतो ! आता ही सर्व शायरी छापायची म्हणजे एक पुस्तक छापावे लागेल आणि त्या करता बराच पैसा लागेल ! मग तूच सांग कसं हो म्हणू मी तुला !"

कमीतकमी किती पैसे लागतील ?"

अत्यंत निराश होऊन फातिमाने विचारले.

'मुखपृष्ठ डिझाईन, कमीतकमी संख्या, छापाई आणि प्रसिद्धी चा खर्च, हे सर्व विचारात घेऊन

४० ते ४५ हजार ! कमीतकमी इतका तरी खर्च येईलच !"

बापरे ??? इतका ?"

" हो बेटा ! इतका खर्च तर येईलच !"

'ठिक आहे..... मी बघते काय करता येईल.

फातिमा घरी आली आणि तिने माळ्यावर ठेवलेली एक बॅग काढली. बॅगेच्या तळाशी काही नोटांची बंडल्स ठेवली होती.ती सर्व बाहेर काढली.पेटीत एका कोपऱ्यात गळ्यातली सोन्याची माळ बाहेर काढली.ही माळ फातिमा हिला शरीर विक्री केल्या नंतर,खूश होऊन एका धनाढय कस्टमरनी दिली होती. नंतर सोन्याची कानातली रिंग उतरविली. कोणाच्या मनात शंका येईल की एका गरीब वेश्येकडे ही संपत्ती कशी काय आली?तर याचे उत्तर आहे की प्रत्येक धंदा करणाऱ्या वेश्येला जाणीव असते की आज आपण आकर्षक दिसतोय. पण ७/८ वर्षांनी आपले सौंदर्य रहाणार नाही. मग पुढे कस्टमर मंडळींचा आपल्यातील रस उरणार नाही.मग पैसे मिळणे कठीण.आयुष्याचा हा टप्पा कुठलीही वेश्या टाळू शकत नाही आणि त्या कठीण काळाकरीता साठवलेली ही संपत्ती असते. या व्यतिरिक्त थोडीफार किंमत असलेली प्रत्येक वस्तू तिनी जमा केली.पैसे,दागिने व किमती वस्तू एका पिशवीत जमा केल्या आणि तडक सिन्हा साहेबांचे घर गाठले.

सिन्हा साहेबांनी दार उघडले. बाहेर फातिमा उभी होती.

"फातिमा बेटा... सकाळी आपण भेटलो होतो ? मी तुला वस्तूस्थिती नीट समजावून सांगितली होती! मी नाही प्रकाशित करू शकत तुझ्या सुरजकुमारची शायरी !"

फातिमा काही न बोलता टेबलापाशी गेली.आपल्याकडे असलेली थैली उघडली आणि पैसे, दागिने व किमती वस्तू बाहेर टेबलावर ठेवल्या.

"सिन्हा साहेब.....आता मी पूर्ण भिकारी झाली आहे!ही माझी जीवनभर ची कमाई आहे ! हे सर्व घ्या आणि माझ्या सुरजची शायरी प्रकाशित करा !"

सिन्हा साहेब गहिवरून गेले. एक गरीब वेश्या. आपल्या आयुष्यभराची कमाई एका अशा माणसा करता उधळून टाकते, जो या जगात नाही. आहेत त्या फक्त त्याच्या आठवणी.असं प्रेम सिन्हा साहेब पहिल्यांदाच पहात होते.

"फातिमा ....ही शायरी छापली जाणारच ! आणि ती प्रसिद्ध सुद्धा होणार ! ही आता माझी जबाबदारी ! "

फातिमा च्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य पसरले.

दुसऱ्या दिवशी सकाळी सिन्हा कामाला लागले. त्यांनी त्यांच्या ओळखीच्या एका मार्केटींग कंपनीला देखील या कामाची माहिती दिली आणि सुरजकुमार याच्या शायरी चे प्रिंटिंग चालू झाले.त्यांनी " हे फातिमाबाई हिच्या सौजन्याने " असे नमूद केले.

पुस्तक बाजारात आले आणि जबरदस्त धमाका उडाला. लोकांनी या शायरीचे, न भूतो भविष्यती असे स्वागत केले.गेल्या कित्येक वर्षात इतकी सुंदर आणि रसिकांच्या मनाचा ठाव घेणारी शायरी आली नव्हती.चारी दिशांनी चौकशी होवू लागली. कोण आहेत हे शायर "सुरजकुमार".इतके दिवस कुठे होते हे सुरजकुमार.

सुंदर शायरी ...सुंदर शायरी.वर्तमानपत्रांनी रकाने भरभरून सुरजकुमार ची तारीफ केली.टीव्हीवर बऱ्याच मान्यवरांचे, या शायरी वर चर्चा होवू लागल्या.सिन्हा साहेबांनी, फातिमा ला बोलावून, तिला हे सर्व दाखवले आणि कित्येक दिवसांनी फातिमाच्या चेहऱ्यावर समाधानी हास्य आले. पण तिला वाईट देखील तितकेच वाटले. हे सर्व सुरजकुमार असतानाच झाले असते तर किती छान झाले असते.पण शेवटी त्याच्या शायरी ला न्याय मिळाला. पुस्तकाची पहिली प्रत लोकांनी दोन दिवसांत संपवली आणि दुसरी प्रत कधी येणार, या लोकांच्या विचारण्यावर उत्तर देताना, सिन्हा साहेबांची दमछाक झाली. पैशाचा प्रचंड ओघ चालून आला. सिन्हा साहेबांनी पहिल्यांदा, गहाण ठेवलेले फातिमा चे सर्व दागिने सोडवून आणले आणि तिच्या स्वाधीन केले. त्याच बरोबर अजूनही पैसे येणार आहेत याची कल्पना दिली.साधारण आठवडयानंतर सिन्हा साहेबांच्या केबिन वर कुणीतरी टक टक केले. बाहेर एक जोडपे उभे होते.

" या.....आत या !"

नमस्कार. मी किरणकुमार ! सुरजकुमारचा मोठा भाऊ !"

आणि मी त्याची लाडकी वहिनी !"

'बोला.....काय करू शकतो मी तुमच्यासाठी ?"

साहेब...या जगात त्याच्या नंतर फक्त आम्ही त्याचे जवळचे नातेवाईक आहोत! म्हणून त्याच्या पैशावर आमचा हक्क आहे ! जास्त नाही पण ८/१० टक्के !"

" पण मला तर फातिमा कडून समजलय,की तुम्ही त्याला धक्के मारून हाकलून दिले होते !"

त्या छिनाल बाईचे काय ऐकता ? मी त्याची लाडकी वहिनी होते !माझ्या शिवाय त्याचे पान हालत नव्हते !"

" ठिक आहे.... मी विचार करीन !"

तेवढे ८/१० टयाचे लक्षात ठेवा साहेब !"

मनुष्य स्वभावाचा हा इरसाल नमुना पाहून ते थक्क झाले. त्यांना फातिमा कडून सर्व आधीच समजले होते.

सुरजकुमार याने पाण्यात उडी मारल्यावर त्याच्या नाकातोंडात पाणी गेले आणि पाण्याच्या प्रचंड प्रवाहाने तो वाहून गेला.प्रेतासारखे झालेले त्याचे शरीर,पाणी पूर्ण,नाकातोंडात गेल्यामुळे,त्याची शुद्ध हरपली.परतु चार दिवसांनी,शहरापासून ५०/६० मैल इतके दूर असलेल्या एका खेडेगावात किनाऱ्याला लागले.मासे पकडायला आलेल्या काही कोळी बांधवांनी त्याचे बर्फा सारखे थंड पडलेले शरीर, तो मेला आहे असे समजून त्याचे शरीर गावाच्या चावडीवर आणले आणि त्यांनी त्या शरीराला अग्नी द्यायची तयारी केली.पण नियतीची इच्छा वेगळीच होती.काही वैयक्तिक कारणाने चावडीवर आलेल्या गावाच्या वैद्यबुवांनी सहज त्याची तपासणी केली आणि त्यांना जाणवले की व्यक्ती अजून मेलेली नाही, तर कोमात गेली आहे. त्यांनी ते शरीर तालुक्यातील एका हॉस्पीटलात भरती केले.हास्पीटलात असलेल्या डॉक्टर व नर्सेस यांनी त्याला शुद्धीवर आणण्याचे खूप प्रयत्न केले.पण सुरजकुमार शुद्धीवर आला नाही. शेवटी त्यांनी प्रयत्न करणे सोडून दिले.प्राण गेले नसल्यामुळे त्याला बाहेर देखील काढता येत नव्हते. शेवटी एका बेडवर त्याला झोपवले व ते आपल्या कामात मग्न झाले आणि पुढचे चार महिने सुरजकुमार याचे शरीर कोमात होते.

एका संध्याकाळी नर्सेस आपली ड्युटी संपल्यावर, त्यांच्या पैकी एकीचा वाढदिवस साजरा करण्यासाठी,हॉस्पिटल मध्ये असणाऱ्या छोटया खोलीत जमणार होत्या.पण नेमका संध्याकाळी त्या खोलीचा फ्यूज गेल्यामुळे, त्यांना ही जागा रद्द करावी लागली. मग काय करायचे ?आता केक सुद्धा आला होता. मग कमी बेड असलेल्या वार्डमध्ये एका कोपऱ्यात हा,समारंभ करायचे ठरले. याच कोपऱ्यात, गेले चार महिने कोमात असलेल्या सुरजकुमारचा बेड होता.

समारंभ चालू झाला आणि एका नर्सने सर्वांच्या आग्रहास्तव कविता आणि शायरी गायला सुरुवात केली. सुरजकुमार च्या शायरीची तीसरी प्रत बाजारात आली होती.त्यातलीच शायरी ती गात होती आणि कोणाचाही विश्वास बसणार नाही,अशी एक गोष्ट घडली. चार महिने कोमात असणाऱ्या सुरजकुमारनी डोळे उघडले. वैद्यकीय ज्ञान व ठोकताळे,या सर्वांच्या पलिकडले असलेल्या निसर्गाने एका चमत्काराचे दर्शन घडवले.सुरजकुमार चक्क उठून बसला.

'कोण गातय ही शायरी ?"

सर्व नर्सेसनी चमकून मागे वळून पाहीले व काही क्षण त्या

पहातच राहील्या.धक्का ओसरल्यानंतर त्या " डॉक्टर... डॉक्टर " ओरडत त्या,डॉक्टरांकडे धावल्या.डॉक्टर आले व त्यांनी सुरज कुमारला तपासायला सुरुवात केली.

'डॉक्टर ....मी ठिक आहे ! मला सांगा ही शायरी कुठे मिळाली ? "का बरे ?तुम्ही असं का विचारता आहात ?"

कारण ही शायरी मी लिहिली आहे ! माझे नाव आहे सुरजकुमार ! यातला प्रत्येक शब्द माझा आहे !"

त्यानंतर डॉक्टर थांबा थांबा म्हणत असताच सुरज तिकडून निघाला व आपल्या शहरात आला.सुरजकुमार च्या हातात त्यानेच रचलेल्या शायरी चे प्रकाशित झालेले व समाजात विलक्षण गाजलेले

पुस्तक

होते. त्यावर असलेल्या प्रकाशकाच्या पत्यावर पोचला.बाहेर रिसेप्शन च्या काचेतून त्याने पाहीले की मोठा भाऊ किरणकुमार,वहिनी व मित्र सुदर्शन आत म्हातान्या सिन्हा यांच्या बरोबर बातचीत करत होता.बाजूची खिडकी उघडी होती.आतले संभाषण बाहेर स्पष्ट ऐकू येत होते आणि हे संभाषण,आपल्या शायरीच्या पुस्तक प्रकाशनामुळे मिळालेला जबरदस्त फायदा,या संदर्भात आहे हे सुरजकुमारला समजले होते.

'सुरजकुमार तुमचा छोटा भाऊ होता व पाच टक्क नफा तुम्हाला द्यायला माझी हरकत सुद्धा नाही! पण केव्हा?तो या जगात नसेल तर!पण कशावरून तो मेलाय ?

साहेब....काय बोलताय?आम्ही आमच्या हाताने त्याला अग्नी दिलाय ! हे श्री सुदर्शन....माझ्या भावाचे सगळ्यात जवळचे मित्र ! विचारा त्यांना !"

'येस सिन्हा साहेब....सुरजच्या अंतिम अग्नी संस्काराचा ॥

मी साक्षीदार आहे! स्मशानात स्त्रिया येत नाहीत! पण या त्याच्या वहिनी..... स्मशानात सुद्धा आल्या होत्या ! त्यांचा लाडका भावोजी सुरज त्यांना मुलासारखा होता !"

सुरजकुमार याचा मित्र सुदर्शन बोलत होता आणि सुरजकुमार सर्व बाहेर ऐकत होता.मानवी मनाचा इतका स्वार्थी नमुना पहात होता.

तुंम्हाला पाच टक्के फायदा मिळेल! यातला एक टक्का माझा !तसे नाही झाले तर तुमचे बिंग मी स्वतः फोडीन आणि तुमचे खरे रूप मी जगासमोर उघड करीन !"

बाहेर पडता सुदर्शन बोलत होता आणि सुरजला ऐकू येत होते.

'किरण भाऊ.... मी जिवंत आहे ! मी सुरज.. तुझा भाऊ !"

किरणकुमार,वहिनी व सुदर्शन,तिघांनी दचकून समोर बधितले. समोर सुरजकुमार उभा होता. हा मेला नसेल तर आपल्याला काही मिळणार नाही,हे त्यांनी एका क्षणात ओळखले.

"कोण सुरज ?? माझा भाऊ सुरज तर केव्हाच स्वर्गवासी झालाय ! तू कोणीतरी तोतया आहेस !"

नाही भाऊ..मी सुरजकुमार आहे ! सुदर्शन.... तू तर माझा मित्र आहेस !तू सुद्धा मला ओळखले नाहीस ?"

नाही.... तू सुरज नाही तर कोणीतरी लबाड माणूस आहेस ! माझा मित्र सुरजकुमार आता या जगात नाही ! चल निघ इथून !"

आणि त्यांनी सुरजला धक्के मारून हाकलून लावले.

"शहरात एक सभा आयोजित करण्यात आली होती. ही सभा " स्वर्गवासी शायर सुरजकुमार याचा सन्मान करण्यासाठी व त्याला मरणोत्तर पारितोषक बहाल करण्यासाठी होता.फातिमा हिला सिन्हा साहेबांनी पहिल्या रांगेत, मानाचे स्थान दिले होते. स्टेजवर सुरजचा भाऊ किरणकुमार,वहिनी व मित्र सुदर्शन होते आणि मरणोत्तर पारितोषक देण्याचा क्षण माननीय राज्यपाल साहेबांच्या हस्ते, आयोजित केला होता.प्रेक्षक वर्गात सुरज ची, काडीमोड घेतलेली पत्नी वैजयंती देखील होती. वेश्या व्यवसायात,फातिमा बरोबर असणाऱ्या, तिच्या काही मैत्रिणी आल्या होत्या. त्याही सुरजकुमारला चांगल्या ओळखत होत्या. या कार्यक्रमाला सुरजकुमार आला होता. दैवाची काय विचित्र लीला असतात. खुद्द स्वतः हा नी रचलेल्या शायरीचा सन्मान व मिळालेले मरणोत्तर पारितोषक सोहळा सुरज स्वतः आपल्या डोळ्यांनी पहात होता. स्टेजवर मान्यवर सुरजकुमार ची तारीफ करत होते.जीवंत असताना समाजाने त्याला सन्मान दिला नाही म्हणून समाजाला दोष देत होते आणि स्टेजवर बसलेला सख्खा भाऊ, वहिनी व जीवलग मित्र,आपण जिवंत आहोत हे माहीत असूनही,निर्लज्जपणे ऐकत होते.सुरजला त्यांची व या समाजाची घृणा वाटत होती.पैसा,धनदौलत,मानसन्मान याची ओढ, त्याच्या मनात कधीही नव्हती. पण आता मात्र या सर्वांविषयी वाटणाऱ्या घृणेने त्याचे मन व्यापून टाकले होते.नको या समाजात राहणे. नको हा समाज. नको ही माणसं .या विचारांच्या लाटा पुन्हा पुन्हा त्याच्या मनावर आदळत होत्या.शेवटी सुरजकुमार हा समारंभ सोडून जाण्यासाठी उठला.

"सुरजकुमार... शायर सुरजकुमार जीवंत आहेत !"



प्रेक्षकांमध्ये बसलेल्या,फातिमा ची एक मैत्रीण जोराने ओरडली. मग बाकीच्या मैत्रीणींचे लक्ष गेले व त्याही जोराने ओरडू लागल्या आणि काही क्षणातच पूर्ण सभागृहात " सुरजकुमार.... सुरजकुमार " असा प्रचंड जल्लोष सुरू झाला.प्रत्येक जण सुरजकुमारशी हात मिळवण्याच्या इच्छेने त्याच्या दिशेने झेपावू लागला आणि सभागृहात प्रचंड गोंधळ उडाला.चेंगराचेंगरी

झाली.लोक जखमी झाले. पोलिस आले त्यांनी सभागृह रिकामे केले.ॲम्ब्युलन्स मागविण्यात आल्या व इजा झालेल्या लोकांना इस्पितळात नेण्यात आले. या चेंगराचेंगरीत फातिमा जखमी होऊन बेशुद्ध पडली.पण तिच्या चेहऱ्यावर मात्र स्मितहास्य होते. कारण तिला समजले होते की तिचा सुरजकुमार जिवंत आहे.

स्टेजवर असलेल्या सिन्हा साहेबांना देखील समजले होते की सुरजकुमार जिवंत आहे आणि त्यांना खूप आनंद झाला. ते स्वतः स्टेजवरून खाली उतरले आणि सुरजकुमार याला,हात धरून मानाने स्टेजवर घेऊन आले. स्टेजवर भाऊ किरणकुमार,वहिनी व सुदर्शन बसले होते. त्यांचे चेहरे मात्र साफ पडले होते.

तुम्ही दोघे व मिस्टर सुदर्शन... तुम्ही पैशासाठी खोटं बोललात ! तुमची खरी जागा तुरुंगात आहे ! पण तुमचे सुरजकुमारशी रक्ताचे नाते आहे आणि फक्त या एका कारणामुळे मी तुंम्हाला दोन मिनिटे देतो! ताबडतोब निघा इथून आणि पुन्हा आलात तर तुमची रवानगी सरळ तुरुंगात करायला मला वेळ लागणार नाही.

॥सुरजकुमार व सिन्हा साहेब स्टेजला लागून असलेल्या एका खोलीत बसले होते.

" सुरजकुमार.. तू तडक मला का भेटला नाहीस ? इथे सभागृहात खाली प्रेक्षकात का बसलास ?"

'मी आलो होतो ! तुमच्या ऑफिसात आलो होतो!पण तिकडे विचित्र अनुभव आला, त्यानंतर कुणाला भेटायची इच्छा च राहीली नाही !"

आच्छा....कधी?आणि असं काय झालं ?

मग सुरजकुमारनी दोन दिवसांपूर्वी तो सिन्हा साहेबांच्या ऑफिसमध्ये आला असताना भाऊ, वहिनी व सुदर्शन याची झालेली भेट, त्यांचे संभाषण, त्यांना आपण जीवंत आहोत, हे माहीत असतानाही पैशासाठी, जाणीवपूर्वक,ते मान्य करण्यास दिलेला नकार, या सर्व गोष्टी सिन्हा साहेबांना सांगितल्या.

साले हरामखोर लोक!मी आत्ता त्यांना उगाच सोडून दिले ! त्यांना पोलिसांकडेच द्यायला पाहिजे होते !"

"जाऊ द्या.....माझे नशीबच खराब की अशी माणसे माझ्या आयुष्यात आली! मी कमनशीबी आहे!माझ्या वर

नशीबाची कृपा नाही !"

"नाही सुरजकुमार....देवाची पूर्ण कृपा आहे तुझ्यावर आणि म्हणूनच कविता, शायरी व गझलांचा नजराणा तू लोकांना देऊ शकतोस, ज्यातील प्रत्येक शब्द लोकांच्या काळजाला भिडतो.

! तू आत्ता म्हणालास की अशी निर्दयी व भावनाशुन्य माणसे तुझ्या नशिबात आहेत ! पण त्याच नशिबाने एक अशी व्यक्ती तुझ्या आयुष्यात आणली की तशी व्यक्ती एक लाखात नाही, तर एक करोड लोकांच्या आयुष्यात देखील येत नाही !"

"सुरजकुमारनी प्रश्नार्थक नजरेने सिन्हा साहेबांकडे पाहीले.

तू हा विचार कर..... तू इतके प्रयत्न केलेस ! पण तुझ्या हयातीत तू तुझी शायरी छापू शकला नाहीस! पण लौकिक अर्थाने तुझ्या निधना नंतर, ती प्रकाशित झाली आणि अजरामर झाली ! हे कसे शक्य झाले ?"

'हो......मला देखील हे कोडे उलगडलेले नाही !"

ती व्यक्ती तुया आयुष्यात होती म्हणून आणि फक्त म्हणूनच हे शक्य झाले ! मी स्वतः कर्जबाजारी होतो व काही करू शकत नव्हतो !पण एक सामान्य व वेश्या व्यवसायात असलेली " फातिमा "ने आपल्या जन्मभराची मिळकत,आपल्या निधन पावलेल्या प्रियकराची शेवटची इच्छा पूर्ण करण्यासाठी उधळून टाकते.अशी प्रेमिका मिळण्याकरता साता जन्माची पुण्याई लागते.

सिन्हा साहेब भरभरून बोलत होते आणि प्रत्येक शब्द त्याचे हृदय पिळवटून जात होते. एकेक प्रसंग त्याला आठवत होता. एकदा त्याच्या हाताला जखम झाली होती,तेव्हा ही फातिमा किती अस्वस्थ झाली होती ती. तो दारू प्यायला बसत असे तेव्हा " आता बास झाले. आता आणखी नको असे ती पुन्हा पुन्हा सांगत असे. हे ते ती सर्व आपल्या काळजीपोटी होते,हे त्याला आत्ता समजत होते.

'सिन्हा साहेब..... मी निघतो! आता पुन्हा या शहरात येणार नाही ! नको ही माणसं !"

कुठे जाणार ?"

'दूर कुठेतरी, जिथे मला कोणीही ओळखणार नाही ! ही प्रसिद्धी, ही धनदौलत आणि श्रीमंती यांचा तिटकारा वाटतो मला!याचे मला कधीच आकर्षण नव्हते !"

आणि सुरजकुमार निघून गेला.

सुरजकुमार फातिमाच्या झोपडी सारख्या घरी पोचला तेव्हा संध्याकाळ झाली होती. त्याला पाहिल्यावर तीचा चेहरा उजळला.

"फातिमा.....मी शहर सोडून कुठेतरी दूर चाललो आहे ! तू येशील माझ्या बरोबर ?माझ्याशी लग्न करशील ?'

फातिमाचा चेहरा विलक्षण आनंदाने फुलून निघाला. सुरजनी हात पुढे केला व फातिमानी आपला हात त्याच्या हातात दिला आणि हातात हात घेऊन दोघे, कुठेतरी निघून गेले. परत ते कोणालाही दिसले नाहीत. जन्मभर निरंतर प्रेमाचा ध्यास घेतलेल्या दोघांचा शोध संपला होता आणि खऱ्या अर्थाने आत्ता सुखी जीवन सुरू झाले होते.


**लेखकः अजित यशवंत कारखानिस**
**मोबा.-९८२०२०९७७५**

■■■

कथा

# मला आई व्हायचय

– संतोष जाधव



"एक विचारू ?"

"आज चक्क परवानगी. "

"तसं नाही ग,अगदी सहज. "

"बोल. "

"लग्न करताना माझ्यात काय बघितलस ? "

"आता हे काय नवीन. "

"सांग ना. "

"अरे पण.. "

"तू सांगणार आहेस की नाही ? "

"सांगते रे,पण कशाला ? "

"ते सांगतो पण तू आधी सांग. "

"खर सांगू,मला नाही आठवत.तीस वर्षे झाली आता. "

"अस कस म्हणतेस. "

"अरे खरच,बाबांनी एक दिवस अचानक सांगितल की बघायला माणसं येणार आहेत, साडी नेसून तयार रहा.त्यांना का,कशाला अस विचारायची हिम्मत नव्हती.आईला विचारलं तर तिला ही काही माहीत नव्हतं. मग काय तुम्ही सर्व जण आलात. तुम्हा सर्वांमध्ये मला कोणाशी लग्न ठरतंय हे ही माहीत नव्हतं. सगळे गेल्या नंतर कोणीतरी सांगितलं तो सफेद शर्ट मधला मुलगा.. "

"मग तू होकार कसा दिलास ?. "

"मी होकार द्यायला कोणी मला विचारलच नाही. पुन्हा एके दिवशी बाबा म्हणाले मुलांकडून होकार आलाय. पत्रिका पण छान जुळली आहे. तयारीला लागा. "

"म्हणजे तू मला पसंत केलंच नाहीस. "

"पसंतीचा प्रश्नच नव्हता. बाबानी सांगितलं आणि मी तयार झाले. बाबा जे करणार ते चांगलच करणार हा विश्वास होता. "

"विश्वास की भीती ? "

"कदाचित दोन्ही ही. तशी भीती होतीच पण तेवढाच विश्वास ही होता. "

"मग आपल्या मुलांचा आपल्यावर विश्वास नाही का ? "

"काय झालंय... "

"तन्वी.. "

"आता तन्वी च काय ? "

"मला तिचं काही कळत नाही, आता हा तिसरा मुलगा... त्याला ही नकार सांगितला आहे तिने. "

"ठीक आहे ना.. नसेल कोणी आवडला तिला. "

"न आवडायला काय कमी होती त्या मुलांमध्ये ? "

"एखादी गोष्ट आवडली नाही म्हणजे तिच्यात काही कमी असते किंवा ती वाईटच असते असे नाही.. "

"म्हणजे ? "

"म्हणजे, तुला लाल रंग आवडतो ? "

"नाही. "

"पण मला आवडतो. "

"नेमक काय म्हणायचं तुला ? "

"निसर्गाने रंग तयार केले.. पण सर्वांना सर्वच रंग आवडतात असे नाही ना,एखाद्याला काळा रंग आवडतो तर एखाद्याला लाल... म्हणून कोणताच रंग वाईट नसतो, फक्त प्रत्येकाची आवड वेगळी."

"अग हो पण तूच म्हणालीस ना बाबांच्या विश्वासावर तू लग्न केलेस..मग मी पण बापच आहे ना तन्वीचा..मग ही अस का करतेय..का माझ्यावर विश्वास नाही तन्वीचा.. "

"तस नाही. "

"मग कसं? "

"मला एक सांग आपल लग्न झालं तेव्हा तुला किती पगार होता?"

"पाचशे पन्नास रुपये. "

"आणि जेव्हा कामाला लागलास तेव्हा ? "

"दोनशे रुपये. "

"आता पण दोनशे मध्ये करशील का नवीन काम ? "

"कसं शक्य आहे. "

"का शक्य नाही ? "

"अग तेव्हा परिस्थिती वेगळी होती,आता वेगळी. तेव्हाचा काळ वेगळा होता, आता बदललंय सर्व."

"तेच तर म्हणतेय मी,तेव्हाचा काळ वेगळा होता, आता बदललंय सर्व.तीस वर्षापूर्वी जे मी केलं तेच तन्वी आता का करेल ?"

सुनीता बोलत होती आणि मी फक्त तिच्याकडे पाहत होतो.एका वाक्यात सर्व प्रश्नांची उत्तरे दिली होती तिने आणि काय चुकीचं बोलली.खरच काळ बदलला,सुनीता ने सुद्धा हा बदल स्वीकारला. पण माझ काय ?अजूनही मी त्याच चौकटीत राहिलो..फक्त सातवी शिकलेली मुलगी म्हणून मी नकार द्यायला निघालो होतो हिला त्यावेळी...आणि आज...खरच काही निर्णय हे खूप वर्षांनी जरा जास्तच पटतात.

सुनीताच्या बोलण्याने मी शांत झालो खरा पण पुढे काय ? कितीही झालं तरी बापाच काळीज,गप्प कस बसेल.

शशांक पगारे,दिसायला तसा देखणाच. उत्तम पगारची सरकारी नोकरी,एकुलता एक, मुंबईत स्वतःचा रूम. अजून काय हवे ?तो साला एकबोटे रोज ऑफिस मध्ये आला की एकच,काय मग आता सरकारी जावई..सावंत तर त्या ही पुढे,तुझ्या मुलीला पसंत नसेल तर मला सांग,स्थळ चांगल आहे. शेवटी आज ठरवलं,तन्वी ला स्पष्टच विचारायच.ऑफिस मधून संध्याकाळी जरा लवकरच निघालो. घरी जाताना गुलाबजाम घेतले.तन्वी ला खूप आवडतात.

हातपाय धुवून सोफ्यावर बसलो.इतक्यात सुनीता चहा घेऊन आली.सोबत माझ्या आवडीचे दडपे पोहे.

"दडपे पोहे !! मस्तच.. "

"तुम्हांला आवडतात ना. "

"हो तर. "

"तन्वी ने केले आहेत. "

"अरे व्वा. क्या बात है ! पण तन्वी आज लवकर आली. "

"हो, दुपारीच आली. "

"का ग ? तब्येत बरी आहे ना ? "

"हो, थोडं डोक दुखत होतं पण आता ठीक आहे. "

"अच्छा. "

पोहे मस्तच झाले होते.आई नेहमी करायची. तीला जाऊन दोन वर्ष झाली. त्यानंतर जास्त नाहीच झाले, पण आज तन्वी ने दिल खुश कर दिया. मी चहा आणि पोहे खाण्यात दंग होतो. इतक्यात सुनीता ने एक फोटो समोर ठेवला.

"कोणाचा फोटो ? मी विचारले. "

"कसा आहे ? "

"ठीक आहे. पण आहे कोण हा काळ्या. "

"काळ्या काय म्हणता?आपला होणारा जावई आहे तो. "

"काय..? " मी जवळ जवळ ओरडलोच.

सुनीता माझ्या बाजूला येऊन बसली. तन्वी समोर उभी होती. घरात अचानक एकदम शांतता पसरली.मी गप्प होतो. दडपे पोहे का हे लक्षात आलं होतं. गुलाबजाम तर आता बॅगेतच राहणार होते. माझ्या हातावर हात ठेवत सुनीता म्हणाली, पोरीला आवडलाय हो...त्यानंतर तासभर तरी फक्त सुनीताचा आवाज घरात ऐकू येत होता.मध्येच कधीतरी तन्वी चा हुंकार.

काही लढाया या फक्त लढण्यासाठी असतात, जिंकण्यासाठी नसतातच.आपण फक्त लढायचं. जिंकणारा गडी आधीच ठरलेला असतो,सुनीता आणि माझ्यातली लढाई ही त्यातलीच. दर वेळी मी फक्त लढतो, जिंकते तीच.आज ही तेच झालं.लग्नाची तारीख ठरली.सुशांत चे येणे जाणे होऊ लागले घरी.मुलगा तसा चांगला होता.मला ही जावई म्हणून आवडू लागला होता.तन्वी पण खुश होती आणि हो,हल्ली वरचेवर दडपे पोहे होत होते.बघता बघता लग्नाची तारीख जवळ आली. खरेदी झाली.

लग्न अगदी छान झालं.प्रत्येक जण म्हणत होता,अगदी लक्ष्मी नारायणाचा जोडा दिसतोय.बापाला अजून काय पाहिजे?एका बाजूला

आनंदाने मन भरून आलं होतं पण एक बाजू रिकामी झाली होती. रोज सकाळी बाबा मी येते म्हणून हाक ऐकू येणार नव्हती.आईच्या मागे राहून हट्टाने सगळ्या गोष्टी पूर्ण करून घेणारी माझी परी आता रोज दिसणार नव्हती. शनिवारी रात्री हक्काने डोक्यावर तेल घालून मालिश करणारी तन्वी आता मात्र फोनवरच भेटणार होती. निसर्गाचा चमत्कार म्हणतात तो हाच का?एका क्षणात सर्व देणारा हाच निसर्ग त्याच क्षणाला भरपूर काही घेऊनही जातो.कोणतीच गोष्ट फुकट मिळत नाही हेच खरं,मोबदला हा द्यावाच लागतो. पण प्रत्येक बाप हा मोबदला द्यायला आनंदाने तयार असतो हे ही तेवढच सत्य.

आज सहा महिने झाले. महिन्यातून वेळ मिळेल तसा मी तन्वी कडे जाऊन येतो. फार छान चाललंय. पोरीचा संसार बघण्याची गमंतच वेगळी.

कधी एकदा आजोबा होतोय या आशेवर वर्ष कसं गेलं कळलंच नाही.

बरेच दिवसांनी आज संध्याकाळी तन्वी चा फोन आला.

“आई मी बोलतेय. ”

“बोल,कशी आहेस ? ”

“मी मस्त,बाबा कुठे आहेत ? ”

“अग ते जरा चव्हाण काकांसोबत गेले आहेत,येतील एवढयातच.

“आई, ऐक ना.. तुला काहीतरी सांगायचे आहे. ”

“अगं मग बोल ना. ”

“नाही फोन वर नाही. ”

“काही टेंशन ? ”

“नाही.. ”

“नाही कसं.. तुझा आवाजच सांगतोय,काहीतरी बिनसलय. ”

“तसं काही नाही आई,फक्त मला फोन वर नाही सांगायच आहे. ”

“मग ये घरी आता,उदया रविवार आहे. थांब एक दिवस..सुशांत ला पण घेऊन ये. ”

“येते,सुशांत बाहेर गेलाय ऑफिस च्या कामनिमित्त,सोमवारी येईल. ”

“बरं तू निघ मग,बाबा खुश होतील तुला बघून. बरेच दिवस तुझ्या हातून डोक्याला मालिश नाही ना.. जरा वैतागलेत.”

“बरं ठेव फोन, निघते लगेच.”

बऱ्याच दिवसांनी तन्वीच्या हाताने मालिश होत होते. जरा मस्त वाटत होतं.सकाळच्या नाश्त्यासाठी दडपे पोह्याची ऑर्डर आताच देऊन ठेवली होती.सुनीताने आधीच दम देऊन ठेवलाय, उगाच जास्त लाड करू नका.पण खरं सांगू का..तन्वी आली की लाड करायला नाही तर तिच्या कडून लाड करवून घ्यायला आवडतं. तो आनंद काही वेगळाच.जणू काही पोरगी आली की दिवाळीचा बोनसच आला...सगळी वर्षभराची हौस फिटवून घ्यावीशी वाटते. पण आज काहीतरी वेगळाच मूड होता तन्वीचा. पटापट सर्व आवरून आई सोबतच गप्पा मारत होती.रात्री उशिरापर्यन्त दोघी गप्पा मारत होत्या.बराच वेळ वाट पाहून झोप कधी लागली ते कळलंच नाही.

दोन दिवस कसे गेले समजलेच नाही.पण या दोन दिवसांत तन्वी जरा डिस्टर्बच वाटली. ती गेल्याशिवाय सुनीता मला सांगणार नाही हे निश्चित होतं. कधी नव्हे ते यावेळी तन्वी जाण्याची वाट पहात होतो कारण त्या शिवाय काय नेमक घडलंय ते कळणार नव्हतं आणि ते कळल्याशिवाय मला चैन पडत नव्हतं.

“बोल, काय झालयं नेमकं ? ”

“काही नाही. ”

“काही नाही कसं, मला काही कळत नाही का. तन्वी यावेळी जरा टेंशन मध्ये वाटली मला. तुला बोलली असेलच. ”

“कस सांगू तेच कळत नाही . ”

“उगाच प्रस्तावना नको, काय ते सांगून टाक लवकर. ”

“तन्वी कधीच आई होऊ शकत नाही. ”

“काय ?.. ”

“हो. ”

“अग पण कस..आता कुठे एक वर्ष झालंय लग्नाला.. अजून वेळ नाही गेलीय..एक काम करू आपण चांगल्या डॉक्टर ला दाखवू. उदयाच जाऊ. मी बोलतो सुशांत जवळ. ”

“अहो,जरा ऐकाल माझं.. ”

“काय ऐकू. पोटच्या पोरीला मूल होऊ शकत नाही हे ऐकल्यावर एक बाप म्हणून काय करावं अशी तुझी अपेक्षा आहे. ”

“तुम्ही थोड शांत व्हाल का ? ”

“सुनीता अग कसं शांत राहू.. आणि मुळात तू एवढी शांत कशी राहू शकतेस. ”

बोलता बोलता डोळे कधी पाण्याने भरले कळलेच नाही. सुनीताने पाण्याचा ग्लास पुढे केला. मला काहीच सुचत नव्हते. अचानक कुणीतरी समोर आलं आणि सणसणीत कानाखाली मारली तर कशी अवस्था होते अगदी तशीच अवस्था माझी झाली होती. पाण्याचा ग्लास एका दमात रिकामा केला. ग्लास ठेवायला गेलो पण हातातून कधी निसटला आणि खाली पडला ते कळलेच नाही. सुनीतानेच तो ग्लास उचलला आणि माझ्या जवळ आली. काही वेळ आम्ही दोघे तसेच शांत होतो.

“तुम्ही उगाच त्रास करून घेऊ नका.”

“पण का?काय गुन्हा केला आपण..आपल्याच नशिबात का?आणि तू एवढी गप्प कशी राहू शकतेस. तुला अजिबात त्रास होत नाही का?आणि तन्वी,तिची काय अवस्था झाली असेल हे कळल्यावर?”

“कालची रात्र रडून घालवली आहे मी. तुम्हांला आज कळलयं, मला दोन दिवसांपूर्वी.आपणच का, याच उत्तर आता माझ्याकडे पण नाही. आणि त्रास मला पण होतोय पण तो वेगळ्याच गोष्टीचा.”

“कसला ? ”

“तन्वीला लग्नाच्या आधीपासूनच याची कल्पना होती.”

“लग्नाच्या आधीपासून कसं माहीत असणार?काहीतरीच काय बोलतेस तू.”

“कारण दोष तन्वी मध्ये नाही, सुशांत मध्ये आहे.”

“काय ?”.. मी जवळजवळ ओरडलोच.

“हो.”

मला काय बोलावं हेच सुचत नव्हतं.डोक अगदी सुन्न झालं होतं,हातापायाला दरदरून घाम सुटला होता.नशिबाला दोष देऊ की

पोरीला दम देऊ...काहीच कळत नव्हतं.प्रेम आंधळ असते हे यालाच म्हणतात का..माझी पोरगी एक वेडी पण त्या सुशांत ला पण कळत नव्हत का ? नुसते प्रश्न आणि प्रश्न. आताच्या आता सुशांत ला फोन करून जाब विचारावा अस वाटत होतं. लगेच फोन घेतला आणि सुशांत ला कॉल लावला पण हिने अचानक पणे फोन माझ्या हातातून हिसकावून घेतला आणि जवळजवळ ओरडलीच माझ्यावर.

"रागाच्या भरात उगाच काहीतरी करू नका."

"तुझं तर मला काहीच कळत नाही."

"मला तुमचं रागावणं कळतयं पण फक्त एकदा माझं शांत पणे ऐकून घ्याल. माझ्यावर आहे ना विश्वास ?. "

"बोल."

"आधी शांत व्हा..बसा निवांत इथे. मी चहा करते लगेच.. "

"अग वाजलेत किती आणि आता कुठे चहा. "

"थोडं बर वाटेल. बसा. "

मला खुर्चीवर बसवून सुनीता किचन मध्ये गेली. सुनीताचं ना मला खूप आश्चर्य वाटतं. एवढी शांत कशी काय  राहते. इथे माझे ब्लड प्रेशर हाय होतंय आणि ही निवांत चहा करायला गेली.

सुनीता चहा घेऊन आली.

काही वेळ असाच गेला.

"तुम्हांला आठवतंय मागे दीड एक वर्षांपूर्वी तन्वी चा अपघात होता होता वाचला होता.थोडक्यात निभावलं होतं."

"हो, ते कस विसरेन मी."

"ती थोडक्यात वाचली कशी माहीत आहे ?"

"नाही. "

"सुशांत मुळे. "

"काय.. "

"हो, त्याच्यामुळेच. पण त्या गडबडीत त्याला जबर मार लागला. महिनाभर हॉस्पिटल मध्ये ॲडमिट होता. "

"अग पण ही कधीच नाही बोलली. "

"कशी बोलणार ? दोघेच फिरायला गेले होते, ऑफिस ला दांडी मारून.लग्नाच्या आधीची गोष्ट आहे. "

"व्वा.हे पण पराक्रम आहेत का ?"

"हो, तो पर्यंत आपल्याला सुशांत बद्दल तन्वी ने काहीच सांगितल नव्हतं. "

"आणि तुला हे सर्व कसं माहीत ?"

"आता तन्वी आली होती तेव्हा सांगितले तिने. "

"पण मग आता का ?"

"कारण त्याच अपघातात सुशांत ला खुपच दुखापत झाली आणि तो त्याचं बाप होण्याचं सुख हरवून बसला."

"बापरे..हे एवढ सगळ झालं. या पोरीने आजपर्यंत हे सर्व लपवून ठेवलं. "

"लपवून ठेवलं खरं पण त्या दोघांच खरचं खूप प्रेम आहे एकमेकांवर. "

"पण मग आताच का तन्वी ने हे सगळं सांगायच कारण."

"ते कारणच मला त्रास करतंय. "

"आता अजून कुठले वेगळे कारण."

"तन्वी ला आता आई होण्याच सुख हवं हवंस वाटतंय. आता तिला आई या शब्दाचा खरा अर्थ समजलाय.आई होणं हे किती आनंदाच असतं हे आता तिला कळतंय.आता तिला बाळाची ओढ लागलीय.सुशांत समोर बोलू शकत नाही म्हणून माझ्याकडे बोलली आणि हो,तिला तिच्या निर्णयाचा पश्चाताप वैगेरे अजिबात होत नाही आहे पण इतरांची रांगती मुले पाहून जीव बावरतो हो तिचा. प्रेमाचा पण एक बहर असतो. पहिल्या पावसात मातीचा सुगंध येतो पण नंतर..पावसात भिजायला कितीही आवडलं तरी नंतर गरम पाण्याची आंघोळ गरजेची असतेच ना अगदी तसच..गरज..शरीराची, मनांची,अगदीच म्हणायला गेलं तर या समजाची पण. प्रेमात जग नाही दिसत पण याच जगात राहायच असत हे नंतर लक्षात येतं."

सुनीता बोलत होती आणि फक्त पहात होतो.तिच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आत्मविश्वास जाणवत होता.मुलीची काळजी होतीच पण त्याचबरोबर एक वेगळीच जाणीव पण दिसत होती. तन्वीची घालमेल तिला परफेक्ट समजली होती आणि मलाही तिने एक क्षणात समजावली होती.माझा राग कुठल्या कुठे गायब झाला होता आणि त्यांची जागा आता काळजी ने घेतली होती. या एका वर्षात काय काय सोसलं असेल माझ्या पोरीनी.आज ऊर अगदी भरून आलाय.आता जवळ असती तर अभिमानाने जवळ घेऊन शाबासकी दिली असती पोरीला.

"असे काय बघताय."

"तू नसतीस तर काय झालं असतं माझं. ."

"गप्प बसा. आता पुढे काय करायचं ते बघा."

"मला तर काहीच सुचत नाही."

"पण मला सुचलयं, सुचलयं म्हणण्यापेक्षा विचार पक्का केलाय."

"नेमकं काय."

"तुम्हीच मघाशी म्हणाला होता ना, आपल्याच नशिबात का ? ."

"हो. ."

"तन्वी चा वाढदिवस येतोय पुढल्या महिन्यात."

"अरे हो."

"दर वर्षी प्रमाणे या ही वर्षी आपल्या नेहमीच्या ठिकाणीच करू."

सुनिताचे हे वाक्य ऐकलं आणि तिला नेमकं काय म्हणायचं ते लक्षात आलं.माझ्या प्रश्नाचे उत्तर मला मिळाले होते.दोन मिनिटे शांततेत गेली.कोणीच कोणाशी बोलत नव्हतं. भयाण शांतता काळीज चिरत होती.न राहवून मीच विचारलं

"तरी पण आपणच का ? ."

"सकाळी बोलू. आता खरंच शांत झोपा."

महिनाभर तन्वी माझ्या समोर आलीच नाही.मी ही जास्त फोन नाही केले.मी नसताना फोनवर सुनीताजवळ बोलायची. फक्त पप्पा कसे आहेत हे विचारायला विसरायची नाही.उद्या पोरीचा वाढदिवस.हा वाढदिवस खूप वेगळा होता.ठरल्याप्रमाणे सकाळी सुशांत आणि तन्वी दोघेही गाडी घेऊन आले. आम्ही निघालो. दोन ते अडीच तास लागले पोचायला.तन्वी च्या अगदी पहिल्या वाढदिवसापासून आम्ही इथे येतोय.आतापर्यंतचे सर्व वाढदिवस इथेच साजरे झालेत. नेहमीप्रमाणे खाऊ, कपडे, वह्या आणि पुस्तके अश्या अनेक वस्तू सोबत आणल्या

होत्या.

पालवी,पनवेल लगतच हे अनाथ आश्रम आहे,

तीस ते पस्तीस मुले असतात इथे. कधी गरीब घरातील तर कधी हरवलेली.फार गोंडस मुले.दर वर्षी या मुलांसोबत आम्ही इथे असतो. छान श्रीखंड पुरी,कधी गुलाबजाम तरी वार असेल तर मासांहरी जेवण इथेच बनवतो.यांच्या सोबतच खातो.संपूर्ण दिवस या मुलां सोबत मजा करतो,त्यांना त्यांच्या गरजेच्या भेटवस्तू देतो.शक्य होईल तेवढी आर्थिक मदत करतो.वाढदिवसाचा केक पण यातील मुलेच कापतात.दिवस छान गेला.

निघताना नेहमी मुलांकडे पाहून वाईट वाटतं समाधान एवढंच की या एका दिवसांचा सुगंध आश्रमात अनेक दिवस दरवळत राहतो.

निघायची वेळ झाली.

तन्वी अजूनही मुलांमध्येच रमली होती. माझा संपूर्ण दिवस तिचा हसरा चेहरा पाहण्यात साजरा झाला.दरवर्षी पेक्षा यावर्षीची तन्वी खूप वेगळी होती.एवढी वेगळी का ते आम्हांला समजत होतं.सुनीता मुलांना अनेक सूचना देण्यातच दंग होती.ती इथे आली की या मुलांमध्ये हरवून जाते. सुगंध फक्त आश्रमातच नाही तर आमच्या घरात पण बरेच दिवस दरवळत राहतो.

शेवटी मीच पुढाकार घेतला म्हटलं निघा आता.

सामानाची आवराआवर केली.आश्रमातील मंडळी निरोप द्यायला अंगणात आली होती.अजूनही इथले अंगण शेणाने सारवलेले असते. त्याचा एक वेगळाच सुगंध.

निघताना तन्वीच्या गालावर हात फिरवत सुनीता म्हणाली

“तू खुश आहेस ना बाळा. ”

“हो ग आई, इथे आले की खूप समाधान मिळते. ”

“तन्वी तू नेहमी म्हणायचीस ना आपण इथेच का येतो. ”

“हो, आणि तू नेहमी सांगेन कधीतरी असं सांगून टाळायचीस.”

“आज सांगते. ”

“खरंच ?

“हो.

“अहो, सांगू ना.. ”

मी मानेनेच होकार दिला कारण बोलायला शब्दच फुटत नव्हते.

“तन्वी ऐक, तुझी आणि आमची पहिली भेट इथेच झाली, अगदी आजच्याच दिवशी. ”

“आई.... ”

तन्वी च्या तोंडातून एवढेच शब्द बाहेर आले.ती नुसती बघतच राहिली. सुशांत नुसता स्तब्ध झाला होता. पोरीचे पाण्याने भरलेले डोळे पाहून माझ्या सुद्धा गंगा जमुना वाहायला सुरुवात झाली. तिचे डोळे पुसतच सुनीताने तिला जवळ घेतेले. बराच वेळ तिच्या मिठीतच होती.एक वेगळीच शांतता पसरली होती.

मी सुशांत च्या खांद्यावर हात ठेवत त्याला जवळ घेतले.

आश्रमतल्या दोन मुलांनी पाण्याचे ग्लास आणले आम्हां सर्वांसाठी. ग्लासातले पाणी संपले पण डोळ्यातील थांबत नव्हते.

“तन्वी बेटा, सावर स्वतःला.” सुनीता म्हणाली.

“तू ज्या दिवशी भेटलीस तोच आमच्या आयुष्यातला सर्वात आनंदाचा आणि भाग्याचा क्षण म्हणून याच दिवशी आपण इथे येतो आणि तुझा वाढदिवस साजरा करतो ”

“अग आई पण मी इथे कशी आणि का ? ”

“तू इथे कशी या खोलात आम्ही नाही शिरलो.पण लग्न होऊन अनेक वर्षे झाली पण पाळणा हलत नव्हता.अनेक डॉक्टर,उपास झाले पण काही होतं नव्हते.अगदीच काही पर्याय नाही म्हणून हा मार्ग निवडला.ज्या दिवशी आलो त्याच दिवशी तुला पाहिले. याच अंगणात खेळण्यात मग्न होतीस. पहिल्याच दिवशी खूप खेळले तुझ्यासोबत मी. पण खरं सांगते तुला भेटेपर्यंत माझं मन तयार होतच नव्हतं.मला बाळ हवच होतं पण असं...धीर होत नव्हता. पण तुला पहिले आणि लळा लागला तुझा. सर्व कायदेशीर बाबी पूर्ण केल्या आणि मला सोन्यासारखी तू भेटलीस. ”

तन्वी फक्त सुनीता कडे बघत होती. मायेचे ते रूप जणू डोळ्यात साठवत होती.

“एक सांगू . ”

“सांग ना आई. ”

“मी निर्धार पक्का कधी केला माहीत आहे ?”

“कधी. ”

“हे म्हणाले, जशी तुला बाळाची गरज आहे तशी या मुलांना देखील आई हवी आहे..तुझ्या एका निर्णयाने एका मुलाला आई भेटेल. होशील ना.. मग काय झाले तुझी आई. ”

“तन्वी ने सुनीताच्या पायावरच डोके ठेवले. तिला उठवत सुनीता म्हणाली ‘एक सांगशील बेटा..’

“बोल ना ”

“एवढे वर्ष तुझ्या पासून हे लपवलं, तुला राग नाही आला ना... ”

“आई, तू काय केलं आहेस तुला नाही माहीत. तू नसतीस तर माझं काय झालं असतं, हा विचारच करवत नाही. खरच तुम्ही ग्रेट आहात दोघे. ”

सुनीताने पुन्हा तिच्या गालावर हात फिरवीत विचारले,

“तन्वी बेटा एक करशील. ”

“काय करू सांग ना. ”

“तुला याच वास्तु मध्येच तुझी आई भेटली..याच आनंदाची परतफेड करशील. होशील इथल्या एका बाळाची आई. ”तन्वी चा चेहरा बघण्यासारखा झाला.ती माझ्याकडे पहात होती. मी मानेनेच संमती दिली. सुशांत ने उभ्या जागीच हात जोडले.

आज पहिल्यांदा सुशांत च्या डोळ्यात एक वेगळाच आत्मविश्वास दिसला. जबाबदारी घेण्याची एक जबरदस्त तयारी दिसली. त्याला काय म्हणायचं ते त्या चेहऱ्यात दिसलं. काही वेळ आम्ही सगळेच शांत होतो.कोणीच काही बोलत नव्हते.

इतक्यात काहीतरी पडल्याचा आवाज आला म्हणून आम्ही वळून पाहिले तर तन्वी समोर एका चिमूरडीने खेळण्याची टोपली उपडी केली होती. त्या दोघींचा भातुकलीचा खेळ मस्त रंगात आला होता आणि आम्ही त्या एका नुकत्याच जन्म झालेल्या आईचा आंदोत्सव भरल्या डोळ्याने पहात होतो.

**लेखक : संतोष जाधव.**

■■■

कथा

– उत्तम सदाकाळ

# शर्यत



लबाडवाडी एक छोटंसं खेडेगाव. शे दीडशे उंबरा असेल गावात. गावाचं नाव लबाडवाडी असलं तरी गाव म्हणावं एवढं लबाड नव्हतं. नाही म्हणजे उडदामाजी काळे गोरे असतातच. तशी बोटावर मोजण्याएवढी धुर्त, कावेबाज माणसं होती गावात. पण लबाडवाडी तशी सरळ मनाची. कुणाशी एक नाही की दोन नाही. आपण भलं आणि आपलं काम भलं. गावाला शेतीवाडी भरपूर. गावाच्या पूर्वेकडून वाहणाऱ्या नदीला बारामाही पाणी. त्यामुळे लबाडवाडीचे मळे हिरव्या पाचूचे. सदा बहरलेले.

लबाडवाडीच्या चारी बाजूला चार डोंगर. रखवालदारासारखे ठाम उभे. दहा बारा किलोमीटरचा परीघ असेल, एवढा गावाचा शिवार. त्यामुळे पिकपाण्याला तोटा नव्हता. एकंदर लबाडवाडी सुखी समाधानी.गाव तिथं बारा भानगडी असतात. तशा लबाडवाडीतही त्या होत्याच. गावात राजकारणाचं वारं शिरलेलं. सुखानं नांदणाऱ्या लबाडवाडीचे दोन तट पडले होते. पण त्यांना जोर चढायचा निवडणूकीपूर्वीच. नंतर मात्र पुन्हा शांतता असायची.

लबाडवाडी परंपरेने सारे सण उत्सव आनंदाने साजरे करी. गावात चैत्री पौर्णिमेला जंगी यात्रा भरायची. पण चैत्री पौर्णिमेच्या आदल्या दिवशी चावदशीला गावाच्या कुलदैवताला म्हणजे भैरोबाला जायला लागे.

भैरोबाचं ठाणं गावापासून पाच सहा किलोमीटर लांब होतं. रांजण्या डोंगराच्या पायथ्याला जंगलात झाडांच्या जाळीत भैरोबा बसलेला. लबाडवाडी न चुकता दरवर्षी चावदशीला भैरोबाच्या दर्शनाला बैलगाडया घेऊन जायची.

लबाडवाडीच्या उत्तरेला असलेल्या भैरोबाच्या मंदिराकडे जायला पक्का रस्ता नव्हता.शेताशेतातून जाणारी कच्ची गाडीवाट असायची. पिकाच्या गव्हाळ्या मोकळ्या असल्या की त्यातूनच गाडया देवाकडं दामटल्या जायच्या.

लबाडवाडीतल्या प्रत्येक घरातून बैलगाडी जुंपली जायची. घरातली सगळी लहान थोर माणसं गाडीत बसून देवाला मोठया आनंदाने निघायची. गावातल्या शे दीडशे गाडया एकाच वेळी जाताना

तो तांडा भलताच मनमोहक दिसायचा. गव्हाळीतून गाडया जाताना मागे धुळीचे लोटच्या लोट उसळायचे.

अशा वातावरणात साहजिकच गाडीवानांना चेव चढायचा. गाडया जोरात दामटल्या जायच्या. अन्?मग सुरू व्हायची बैलगाडयांची शर्यत.तिला लबाडवाडीकर कलाकली म्हणत.या कलाकलीचं लोकांच्या मनात एक प्रतिष्ठेचं स्थान होतं. देवाला जाताना अन्? येताना ज्याची बैलगाडी सर्वात पुढं असायची ती बैलगाडी शर्यत जिंकायची. गाडीला वेळेचे बंधन नसायचे.पण सर्वात पुढं असणं महत्वाचे. ज्याची गाडी पुढं तो कलाकली जिंकणार. अशा बैलगाडीची चर्चा वर्षभर गावकऱ्यांच्या तोंडी असायची. शर्यत जिंकणे मोठं मानाचं समजलं जाई.

आता सर्वत्र होणाऱ्या बैलगाडयांच्या शर्यती यांत्रिक झाल्यात. ठराविक अंतर ठराविक वेळेत पूर्ण करणं बक्षिसपात्र होतेय. त्यात बैलगाडीत गाडीवानाचा तपास नसतो. एक गाडी ओढायला चार चार बैल असतात.पण लबाडवाडीची शर्यत अगदीच वेगळी होती. गाडीला दोनच बैल. त्यात गाडीत दहापंधरा माणसं. म्हातारे कोतारे, पोरं सोरं, आयाबाया सगळ्यांचा त्यात भरणा. एकाचवेळी शे दिडशे गाडया संगतीने धावणार. असे सगळे लटांबर घेऊन धावताना अपघात घडायचे. तरीही या शर्यती आवडीने खेळल्या जायच्या. सर्वांना सुरक्षित घेऊन बैलगाडी दामटताना एक वेगळाच रोमांच असायचा.

अशा या शर्यतीत लबाडवाडीतली एक बैलगाडी दरवर्षी हमखास जिंकायची. मानाचा तुरा गाडीवान वर्षभर गावात मिरवायचा. तो गाडीवान होता गावचा पाटील. खंडू पाटील त्याचं नाव.या शर्यतीसाठी त्याचे खोंड आधीच कसून सराव करायचे. आजपर्यंत खंडू पाटलाने देवाला जाताना अन्? माघारी फिरताना कुणालाच पुढं निघू दिलं नव्हतं.

खंडू पाटलाचे यश लबाडवाडीत एकाच्या नजरेत सारखे खुपायचे, दरवर्षी जंग जंग पछाडूनही त्याची हार व्हायचीच. दरवर्षी अपमानाचं लोढणं त्याच्या गळ्यात अडकले जाई. पण तरीही पुढच्या वेळी तो जोमाने शर्यतीसाठी सज्ज व्हायचा. पराजय पायदळी तुडवून विजयाची वरमाला हस्तगत करू पाहणारा लबाडवाडीतला तो वीर होता गावचा सरपंच भैरू.

भैरूला यशाने नेहमीच हुलकावणी दिली होती. या वर्षी कलाकली जिंकायचीच असा भैरू सरपंचाने निर्धार केला होता. त्यासाठी त्याने बेल्ह्यावरून खास नविन खोंडं आणले होते. लबाडवाडीपासून भैरोबाच्या मंदिरापर्यंत रोज त्यांची शर्यतीची रंगीत तालीम घेतली जायची.

भैरू सरपंचाने यावर्षी लग्न केले होते. शर्यत जिंकून नव्या नवरीला मानाची भेट द्यायची असा त्याचा विचार होता.त्यासाठी तो खोंडांना रोज सराव अन्? खुराक देत होता. या कामात त्याच्या मदतीला त्याचा शेतगडी सुभान्या असायचा.

सुभान्या हा एक इरसाल नमुना होता. सांगेल ते काम विनातक्रार करणारा. सांगकाम्याच होता तो. स्वतःच्या बुद्धीचा वापर तो कमी करायचा. मालकाचा शब्द त्याला प्राणापेक्षाही प्रिय असायचा. मालकाच्या शब्दाप्रमाणे वागायला तो एका पायावर तयार असायचा. भैरूला त्याच्या मदतीचा फार आधार होता. तर सुभान्याला भैरूशिवाय दुसरा आधारच नव्हता.

मालक भैरोबाची शर्यत जिंकण्यासाठी किती जिवापाड प्रयत्न करताहेत हे त्याला दिसत होते. त्याचाही जीव त्यांच्यासाठी तिळतिळ तुटत होता.यावर्षी मालकांना शर्यत जिंकून द्यायचीच असा सुभान्याने सुद्धा पण केला होता. तो नवीन बैलांना शर्यतीसाठी तयार करत होता. नविन खोंडही विजेच्या चपळाईने धावत होते. शर्यत जिंकून देण्याची त्यांच्यात धमक आहे हे सुभान्याला ठायी ठायी जाणवत होते.

चैत्र महिना सुरू झाला. जिकडे तिकडे यात्रांचा हंगाम होता. लबाडवाडी चावदशीची वाट चातकासारखी बघत होती. बैलगाडया ठाकठोक करून सज्ज झाल्या. चिलीपिली यात्रेच्या शेव रेवडया अन्? जिलेबीसाठी कासाविस झाली. बाया बापे यात्रेच्या दिवसाची वाट बघू लागले.

भैरूचे नवे खोंड, त्याची बैलगाडी, सुभान्या जय्यत तयारीत होते. पाटलाने मात्र जास्त मेहनत घेतली नव्हती. त्याचा त्याच्या बैलावर विश्वास होता. यंदाचीही शर्यत आपणच मारू असं त्याचं मन त्याला सांगत होतं.

अखेर एकदाचा तो दिवस उजाडला. सकाळपासूनच लबाडवाडी घाईगडबडीत होती. कधी एकदा बैलगाडीत बसून कलाकली करत भैरोबाला जातोय असं ज्याला त्याला वाटत होतं. बायांनी ठेवणीतल्या साडया काढल्या. कुलूपबंद डब्यातले दागिने अंगावर रुळू लागले. पुरुष माणसे पांढरेशुभ्र धोतर, पायजमे घालून बगळ्यासारखे सजले. लहान मुलांच्या उत्साहाला तर नुसती भरतीच आली होती.

भैरूचीही तयारी झाली. त्याची बायको नटून थटून तयार झाली. नागीणीवानी सळसळणारे नवे खोंड नव्या कोऱ्या गाडीला त्याने जुपले. नवकोरी साडी घातलेली नवीकोरी बायको नव्याकोऱ्या गाडीत बसली. गाडी हाकायला भैरूच होता. तो आंणि त्याची बायको असे दोघेच त्या गाडीत बसले. बाकीचे घरातील सगळे लहानथोर दुसऱ्या गाडीत बसले. त्या गाडीचा गाडीवान सुभान्या होता.

भैरूची गाडी भैरोबाच्या रस्त्याला निघाली. भैरूची गाडी बघताच पाटलाची गाडी लगेच त्याचे मागे रस्त्याला लागली. हां हां म्हणता लबाडवाडीच्या शे दिडशे गाडया बगळ्याच्या माळेवानी ओळ धरून निघाल्या. बायको गाडीत असल्याने भैरूला चेव चढला होता. त्यात शर्यत जिंकायचीच ह्या इच्छेने तो धुंद झाला होता.

गाडी रस्ता अक्षरशः लोण्यासारखा मऊ होता. रस्त्यावर सगळी लालेलाल मातीच होती. तो लालेलाल धुराळा उडवत बैलगाडया पुढं पुढं सरकत होत्या.

भैरूच्या गाडीजवळ पाटलाने गाडी आणली. दोघांची नजरा नजर झाली. पाटलाच्या गाडीतसुद्धा त्याची बायको होती. भैरूकडे

बघत पाटील मुद्दाम त्याला खिजवत बोलला,

"भैरू औंदा जय्यत तयारी दिसतेय बाबा तुझी. कलाकली जितायचा ईचार हाये का काय ? बैल नवं, गाडी नवी. वा.. वा.. काय थाट हाय तुझा? त्यात बायकोबी नवी. पण भैरू खर सांगू का तुला? तू कितीही आटापिटा केला ना, तरी तुझी जीत होणार न्हाई. हे सुद्धा तेवढंच खरं."

पाटलाचं बोलणं धुडकावून लावत भैरू उत्तरला, "आस्सं काय ? बघू बघू कोण जिततय त्ये? दरवर्षी जिताया ती

काय तुझी वतनदारी नाही. या येळेला तुला माती चारतोच बघ." भैरूच्या या दणकेबाज उत्तरानं त्याच्या बायकोचा चेहरा अभिमानानं फुलून गेला. तिनं दिमाखात पाटलाच्या बायकोकडं बघितलं. तिच्या नजरेला नजर भिडवत पाटलीणबाईनं नाक तोंड मुरडलं.

भैरूने बैलांचे कासरे ढिले सोडले... ढवळ्या पवळ्या चला सुटा रे..! असा आवाज देत भैरूने गाडी दामटली. भैरूची बायको भैरूला चिकटून बसली. भैरूची गाडी सुसाट सुटलेली बघून पाटलाने भिर्रर्र......... असा पुकारा केला. तसे त्याचे अनुभवी बैल चौकडीवर पळत सुटले. भैरू अन्? पाटलांच्या गाडयांमागे गावातल्या बाकीच्या गाडया भिंगरीवानी पळायला लागल्या.

मातीचा लाल धुराळा उडाला. त्या धुराळ्यात समोरचे नीट दिसेना. कुणाची गाडी पुढे अन्? कुणाची गाडी मागे, काही अंदाजच येईना. फक्त बैलांना पळविण्यासाठी गाडीवानांचा होणारा आरडाओरडा तेवढा ऐकू येत होता. लहान मुलांचे रडणे अन्? महिलांचे किंचाळणे गाडयांच्या खडखडाटात विरून जात होते. कलाकलीला मस्त रंग चढला होता. बैलगाडयांमध्ये सगळे धुळीने लाल होऊन गेले होते. गाडया वाऱ्याच्या वेगात धावत होत्या...

भैरोबाच्या मंदिराजवळ पहिली गाडी पोहचली ती खंडू पाटलाचीच.

पाटलाच्या गाडीनंतर भैरूची गाडी येऊन भैरोबाच्या मंदिराजवळ थांबली. भैरूने मान खाली घातली होती. त्याच्या बायकोच्या चेहऱ्यावर नाराजी पसरली होती. एवढे सारे परिश्रम करून सुद्धा देवाला जाताना भैरू शर्यत हरलाच होता. पाटील अन्? पाटीलणबाई मात्र आनंदाने गालात खुदूखुदू हसत होते. हसता हसता पाटीलणबाई भैरूच्या बायकोला टोमणा मारतच म्हणाली,

"सरपंचीणबाई.. नुस्ती बैलं तापाड असून भागत न्हाई. नवराबी नागावानी सळसळणारा असावा लागतो म्हणलं. एकदा का त्यो गाडी हाकाया बसला का जिंतल्या बिगर उतरला न्हाय पायजे. त्याच्या नुसत्या ईशाऱ्यावर बैलं नाचली पाहिजेत. तर शर्यत जितता येती. सरपंचीणबाई ,तुम्ही पार म्हातारे झाले तरी कलाकलीत पाटलाला हरवायची गोष्ट जमणार न्हाय. माझा पाटील खरा मर्द हाय. आख्ख्या गावात दरवर्षी त्योच जिततोय बरं."

पाटीलणबाईच्या या टोमण्याने भैरूच्या बायकूचं टाळकं हललं. ती रागाने लालेलाल झाली. पाटलीणबाईला ती काहीच बोलली नाही. पण भैरूचा तिनं पारं घाम काढला.

"कारभारी.... ऐकल ना? काय म्हणाली ती हडळ ? म्हणे नवरा सळसळणारा हवा. घामटा काढणारा हवा. तिचा पाटील म्हंजे खरा मर्द. मग अजून का वांझोटी हाय. मुडदा बसविला तिचा. माझा पाणउतारा करते काय ? तिलाबी दावते माझा नमुना. कारभारी तुमी आता कायबी करा पण जाताना कलाकली तुमीच जितली पाहिजे. मग मी उतरवते तिचा नखरा. पण जर का तुमी परत हरला तर मी थेट माहेर गाठीन सांगून ठिवते हां."

बायकोच्या या इशाऱ्याने भैरू हबकलाच. त्याच्या डोक्यात ईचाराचं मोहळ उठलं. अन्? त्याला रामबाण उपाय सुचला. त्या उपायाच्या मदतीने तो पाटलाला धूळ चारणार होता. त्यानं सुभान्याला जवळ बोलावलं. अन्? भैरू त्याला हळू आवाजात बोलला,

"सुभान्या नीट कान देवून ऐक. गाडीतली समदी मान्सं देवळात दर्शनाला गेलीत. आसपास कुणीच न्हाय. तू एक काम कर."

"काय करू मालक ? तुम्ही फक्त बोला. लगेच करून टाकतो."सुभान्या उतावीळ नवऱ्यासारखा बोलला.

"सुभान्या आधी मी काय बोलतोय ते ऐक मग उडया मार पोरांसारख्या."

"जी मालक."

"हां... तर मी म्हणत होतो... समदी मान्सं देवळात गेलीत. ती बाहेर यायच्या आत मी सांगतो ते काम तू गुपचूप कर. येताना पाटलानं मला कलाकलीत हरवलंय. त्या पाटलीणीची जीभ लय चुरूचुरू करतेय. मला त्यांची परतफेड करायचीय. आता घरी जाताना कलाकलीत पाटील हरला पाहिजे. तवा तू गुपचूप जा आन्? गाडीची कानखिळ काढून घे."

भैरू सुभान्याला एका करवंदाच्या जाळीआड नेवून महत्वाची कामगिरी समजावून सांगत होता. सुभान्याही नंदीबैलासारखी मुंढी हलवत होता. मालकाने बैलगाडीची कानखिळ काढायला सांगितल्यावर त्याच्या मनात एक शंका आली, तसा तो बोलला,

"पण मालक.... कानखिळ काढल्यावर गाडीचं चाक निघंल. गाडी उलटेल ना ?"

त्याची शंका दाबत भैरू सुभान्यावर डाफरला,

"सुभान्या, मी सांगतोय तेवढं कर. आक्काल पाजळू नगं. गुपचूप जावून गाडीची कानखिळ काढ. पाटील हरलाच पायजे. तशी माझी अन्?कारभारणीची विच्छा हाय."

भैरूच्या दरडावणीच्या बोलण्याने सुभान्या मनातली शंका पार गाडून टाकत बोलला,"मालक तुमी काळजीच करू नका. आत्ता जातो आन्? कानखिळ काढतो. त्यात काय आवघड हाय. काम फत्ते झालं म्हणून समजा."भैरूला कामगिरीची हमी देत सुभान्या तेथून सटकला. अन बैलगाडया जेथे सोडल्या होत्या, त्या ठिकाणाकडे तो गुपचूप जावू लागला.

भैरू मात्र इकडे तिकडे बघत थेट भैरोबाच्या मंदिरात घुसला.

सगळ्यांचे देवदर्शन झाले. भैरोबाचा तळीभंडार आटपला.

शेरणी वाटून झाली. सगळी माणसे आपआपल्या बैलगाडयांकडे परतू लागली.

भैरोबाच्या जत्रेचा कार्यक्रम उरकला. पोरासोरांनी शेव रेवडया शर्टाच्या, चड्डीच्या खिशात कोंबल्या. हातात रंगीबेरंगी फुगे, पिपाण्या घेऊन पोरं गाडीत चढली. गाडीवानांनी बैलगाडया जुपल्या. आणि गाडया परतीच्या प्रवासाला निघाल्या.

गाडी जुपून माघारी फिरताना पाटील भैरूला म्हणाला,

"काय भैरू? आता माघारी जाताना लावतोस ना शर्यत? का येतो मागून गोगलगाईवानी ?"

खंडू पाटलाच्या या खोचक बोलण्याने भैरू उसळला. "आरं घाबरून गप राहणाऱ्या अवलदीचा न्हाय मी. जीवात जीव असेपर्यंत लढणाऱ्याची जात हाय माझी. चाल होऊन जावू दे फैसला. बघतोच मी तू कसा जिंकतो ते. आज तुला न्हाय हरवले तर नावं सांगणार न्हायी. आन माघारी जाताना मी परत हरलो, तर व्हटावरची अर्धी मिशी भादरून टाकीन समजलं का?" भैरू आवेशात नको ती पैज लावून बसला. त्याला शब्दात पकडत पाटील म्हणाला,

"भैऱ्या, मग तुझी अर्धी मिशी उतरलीच म्हणून समज. आज तुला काय मी जितू देणार न्हाय."

दोघांनीही आपआपल्या बैलगाडया दामटल्या. परत एकदा कलाकलीचा धुराळा आभाळात उडाला.

भैरूची खिलारी जोड वाऱ्याच्या वेगात पळत सुटली. पाटलाची गाडी पार मागं राहिली. भैरू अन्? त्याच्या बायकोच्या अंगात आनंदाचं उधाण आलं. लाडाने भैरूची बायको भैरूला अधिकच घट्ट बिलगली. भैरूच्या अंगात हजारो मुंग्या धावायला लागल्या.

आता कलाकली आपणच जिंकणार याची भैरुला खात्री पटली. पाटलाची गाडी मागं दिसतसुद्धा नव्हती. भैरूची खोंडं ऊर फुटेपर्यंत धावत होती. जणू बिचाऱ्यांना मालकाच्या अर्ध्या मिशीची काळजी होती.

भैरू मनातच विचार करत होता, "अजूनपर्यंत पाटलाची गाडी आपल्यापर्यंत पोहचली नाही. आता त्याची आपल्याला हरवायची टाप न्हाय. समोर लबाडवाडीची घरं दिसाया लागलीत, म्हंजे आपण जितल्यातच जमा आहोत. पाटलाच्या गाडीची कानखिळ सुभान्यानं काढल्यानं चाक निघून त्याची गाडी पालथी झाली आसलं. आन्? पाटील माती खात बसला आसल." भैरूच्या मनात असे विचार चालू होते. एवढयात काय झाले कुणास ठाऊक... भैरूची गाडी एकदम आचका देत एका बाजूने वर उसळली. अन गव्हाळीतल्या मातीत उलटली. भैरू अन्? त्याची बायको मातीत एकमेकांच्या अंगावर आदळले.

बैलगाडीचं एक चाक उतारा उताराने धूम पळत सुटलं. मातीने लडबडलेला भैरू अन्? त्याची बायको एकमेकांच्या आधारानं उठू लागले. तेवढ्यात खंडू पाटलाची गाडी मागून पुढं निघाली...

भैरूने चकित होऊन तोंडाचा आ वासला.

पाटलाच्या गाडीची दोन्ही कानखिळं शाबूत होती. भैरूच्या जवळून जाता जाता पाटील खवचटावानी बोलला,

"भैरू काय रे ही अवस्था ? मला वाटलं आज मी हारतोय की काय. तू हरणावनी पुढं निघून गेलास. मी घाबरलोच होतो. पण नशीब तुझ्या भल्यावर नाही बघ.गावाच्या पार जवळ येऊन तू मातीत चितपट झालास. तुझ्या कपाळी ईजय न्हाय बाबा. उद्या अर्धी मिशी भादरायला मात्र विसरू नकोस. हा मी चाललो तुला हरवून. याही वर्षी कलाकली मीच जितली." असं म्हणत विजयी विरासारखा खंडू पाटील लबाडवाडीकडे निघून गेला.

पाटलाच्या गाडीमागोमाग लगेच सुभान्याची गाडी आली. मालकाजवळ गाडी थांबवून त्यानं खाली उडी मारली. मालकाकडे येत तो आनंदाने बोलला,

"मालक झालं नव्हं मनासारखं?"

"काय मनासारखं झालं?" भैरू रागावून बोलला.

"ते हेच की... सिनेमातल्या नटनटीसारखं तुमाला मातीत लोळायचं होतं. काय बी म्हणा. पण तुमी लई रंगेल बरं का मालक !"

सुभान्या आनंदाने भैरूशी बोलत होता. भैरू मात्र वेड लागल्यागत त्याच्याकडे पाहत म्हणाला, ""सुभान्या,तू काय बोलतोय माझ्या टक्कुऱ्यात काय बी घुसंना बघ.नीट काय ते सांग"

"आवो मालक, तुमाला पिच्चरवानी गाडीतून असं मातीत पडायचं होतं. बाईसायबांना मिठीत घ्यायचं होतं.म्हणून तर तुमी मला गाडीची कानखिळ काढाया लावली ना?"

"म्हंजी ? तू खंडू पाटलाच्या गाडीची कानखिळ न्हाय काढलीस?"

"न्हाय बा... तुमी त एवढंच म्हणलात, गपचूप जावून गाडीची कानखिळ काढ. जास्त आक्कल पाजळू नको. तशी तुमची अन्? बाईसाहेबांची विच्छा हाय. मग मी गुपचूप तुमच्याच गाडीची कानखिळं काढली. म्हणून तर तुमची गाडी मातीत उलाथली. तुमी अन्? बाईसायब एकमेकांच्या अंगावर पडलात. तुमी त्यांना मिठीत घेतलत अन् .. सुभान्याला पुढं बोलू न देता भैरू ओरडला,

"आरं घुबडा... खंडू पाटील कलाकलीत हरावा म्हणून त्याच्या गाडीची कानखिळ काढायला सांगितली व्हती म्या.तू आपल्याच गाडीची कानखिळ काढून माझी इज्जत पार धुळीला मिळविली. माझी अर्धी मिशी आता तुझ्यामुळंच भादरावी लागलं. माझा शर्यतीमधला विजय तर तू घालवलाच. पण उद्या बायकोबी माहेरा जाईन. याला तूच कारणीभूत हायेस. थांब वहाणेनं आता तुझं तोंडच रंगवतो." वैतागलेला भैरू सरपंच पायातली वहाण काढून सुभान्याच्या मागं धावला. अन्?भेदरलेला सुभान्या नव्या खिलारी खोंडाना लाजविल अशा वेगात लाल मातीचा धुराळा उडवत पळत सुटला.

**– उत्तम सदाकाळ**
**अ-३, सप्तशृंगी सदन ,सूर्योदय रेसिडेन्सी**
**रविवार पेठ ,शिवजन्मभूमी जुन्नर**
**पिन- ४१०५०२, मोबा.९०११०१६६५५**

■■■

कथा



# निस्पृहता

प्रा.देवबा शिवाजी पाटील

विकास हा एक गरीब तरुण एम.कॉम होऊन अधिव्याख्यात्याच्या नोकरीसाठी बऱ्याच कॉलेजसमध्ये मुलाखती देत फिरत होता.असे फिरण्यात त्याचे बरेच पैसे खर्च झालेत. आता विकासजवळ तर वेगवेगळ्या गावच्या कॉलेजेसमध्ये प्राध्यापकाच्या नोकरीसाठी मुलाखतींना जाण्यासाठी पैशांची खूप चणचण भासू लागली.कायमस्वरुपी प्राध्यापकाच्या नोकरीसाठी त्याच्याजवळ कॉलेजच्या संस्थाचालकांना पडद्याआडची देणगी म्हणजे टेबलाखालून लाचरुपी डोनेशन द्यायला लाखो रुपये नसल्याने तो गरजवंतास अक्कल थोडी ह्या न्यायानुसार रामनगर शहरातच एका सुप्रख्यात कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात तासिका तत्वावरील तात्पुरत्या जागेवर वाणिज्य विषयाचा प्राध्यापक म्हणजे खरे तर तात्पुरता अधिव्याख्याता म्हणून लागला.त्याने आपले विभागप्रमुख देवरे सर ह्यांच्याद्वारा आपला कामावर हजर होण्याचा जॉइनिंग रिपोर्ट कार्यालयाला पाठवला व त्यांच्या मार्गदर्शनाखाली

आपल्या नेमलेल्या घड्याळी तासिका घेऊ लागला.

विकासचे हे कॉलेज म्हणजे खूपच नावाजलेले होते. कॉलेजला जाणा–या रस्त्याचे दूतर्फा हमरस्त्यावरील प्रवेशद्वारा पासूनच तर थेट कॉलेजच्या मुख्य प्रवेशद्वारापर्यंत कडूनिंब,आंबा, वड, पिंपळ, बदाम अशी हिरवीगार भरपूर मोठमोठी झाडे लावलेली होती. प्रशस्त इमारत, अनेक वर्गखोल्या, अद्ययावत विज्ञानाच्या प्रयोगशाळा, सुसज्ज ग्रंथालय, सुंदर सभागृह, विस्तीर्ण आवार, भले मोठे खेळाचे पटांगण, आजूबाजूला हिरवागार व रंगीबेरंगी फुलांचा सुंदर मनोरम्य बगीचा, आवारात अनेक शोभेची व इतरही मोठमोठी हिरवीगार झाडे, वर्गखोल्यांसमोर निलगिरीचे सुंदरसे गगनचुंबी वृक्ष होते. विद्यार्थ्यांना बसण्यासाठी झाडांभोवती गोलाकार वा चौकोनी पार, बगीचातही मुलामुलींना बसण्यासाठी सिमेंटचे अनेक बाक, बगीचात मृदू मुलायम अशी हिरवळ अर्थात लॉन आदि सुविधांनी युक्त असे हे कॉलेज होते.

विकासला तेथे शासकीय नियमानुसार रोजचा एक तास असे आठवडयाचे सात तास मिळालेत. त्याचे त्याला अडीचशे रुपये तासाप्रमाणे वर्षाचे कसेतरी तीसेक हजार भेटतील असा याने आपला हिशेब लावला होता. कारण ज्या दिवशी कॉलेजच्या दुस–या एखाद्या कामानिमित्त, कॉलेजमधील कार्यक्रमानिमित्त, मुलांचे परीक्षेचे अर्ज भरण्याचेवेळी तास न झाल्यास किंवा मुलांनी सामायिक चाट मारल्यास त्याचे पैसे कापल्या जाणार होते.मुलांचे झेंडा ते झेंडा असे कॉलेजमध्ये येणे व तासिका करणे असायचे. त्यातही काही विद्यार्थी हे अबक–दुबकच तासिका करायचे तर काही पौर्णिमेलाच उगवणारे चंद्र असायचे.त्यामुळे खरे कॉलेज हे पाच महिन्यांचेच असायचे. त्यातही सण, उत्सव, समारंभ, दिवाळीच्या व इतर शासकीय सुट्या असायच्या. मुलांच्या परीक्षेतही काही दिवस जायचेत.

विकास जरी तात्पुरता त्या कॉलेजमध्ये लागला होता तरी तो सर्वात कनिष्ठ असल्याने कॉलेजमध्ये त्यालाच कुणीही कोणतेही जबाबदारीचे काम सांगायचे. त्याच्या भीडस्त स्वभावामुळे तो ती कामे नाकारू शकत नव्हता. त्यामुळे त्याला कॉलेजमध्ये दिवसभर काही ना काही काम हे असायचेच. म्हणून त्याने महाविद्यालयाच्या जवळच एका मोहल्ल्यात एका गरीब माणसाची त्याच्या घराच्या मागच्या बाजूला असलेली एक छोटीशी कमी भाड्यावाली टिनाची खोली भाड्याने घेतली व त्यात तो राहू लागला.

आजच्या भरमसाठ महागाईच्या काळात अत्याल्प पगारावर भागविणे म्हणजे मुतात मासोळ्या मारण्यासारखे असते. ते खूपच कठीण असते. जावे त्याच्या वंशा तेव्हाचे ते कळत असते. तसेच त्याचा तात्पुरत्या तासिका तत्ववरील जागेवर पगार खूपच कमी असल्याने व तोही वर्षाच्या शेवटी मिळणारा असल्याने कॉलेजमध्ये असतांना जसा आपला हात नि जगन्नाथ असा तो स्वयंपाक करायचा व आपले भागवायचा तसाच आताही आपल्या घरून आणलेल्या एका स्टोव्हवर हाताने आपला स्वयंपाक करून आपल्या बाहेरच्या मेसच्या जेवणाचा खर्च वाचवीत होता आणि कसेतरी आपला उदरनिर्वाह करत होता.

विद्यार्थ्यांना शिकवताना अध्यापनाचे ध्येय चांगल्या रीतीने साध्य करण्यासाठी वेळकाळ यांचे बंधन नसावे लागते आणि व्यर्थ वेळखाऊ अडथळ्यांचा व्यत्याय नसावा लागतो हे विकास जाणून होता. दुस–यांचे वाईट चिंतण्यात, त्यांच्या आयुष्यात उगीचच डोकावण्यात आपला अमूल्य वेळ गमविण्यापेक्षा आपण भले व आपले काम भले आणि स्वतःच स्वतःचा दीपक होत स्वतःलाच प्रकाशित करावे अशा विचारांचा तो होता.

विद्यार्थ्यांच्या मनात आपली जागा पक्की करून ती टिकवून ठेवणे खूप कठीण असते.पण आपल्या सखोल अभ्यासाने, विषयाच्या परिपूर्ण ज्ञानाने,शिकवण्याच्या उत्कृष्ट हातोटीने,विद्यार्थ्यांना पदोपदी त्यांच्या अडचणींमध्ये सहकार्य करण्याच्या मनमिळाऊ सुस्वभावाने विकासने विद्यार्थ्यांच्या मनात तशी आपली जागा निर्माण केली होती व ती कायम टिकवूनही ठेवली होती.त्यामुळे जवळपास सारेच विद्यार्थी तो दिसला म्हणजे त्याला नम्रतेने नमस्कार करीत होते, चांगला मान देत होते. सारे विद्यार्थी त्याच्यावर खूप प्रेम करायचे. त्याच्याकडे असलेल्या माणुसकी व समजुतदारपणामुळे त्याला कॉलेजमध्ये खूप प्राध्यापक मित्र झाले होते.

तासिका तत्वावर पहिल्याच वर्षी कॉलेजमध्ये लागून दोन महिने झाल्यानंतर एकदा सायंकाळी विकास असाच आपल्या खोलीवर अभ्यास करत बसलेला असताना त्याच्या वर्गातील दहाबारा श्रीमंत मुलेमुली त्याचेकडे त्याच्या खोलीवर आलेत.

नमस्कार सर. "त्यांनी विकासला एकमुखाने नमस्कार केला.

विकासने "नमस्कार." म्हणत त्यांना बसण्यासाठी खाली एक सतरंजी टाकली. तीवर ते सारे मुलेमुली बसले. "सर,तुम्ही दररोज सायंकाळी एक तास आमची लेखाकर्म ह्या विषयाची शिकवणी घ्या ना." त्यांपैकी एकजण म्हणाला.

" अरे माझ्याकडे तर साधी बसण्याचीही काहीच व्यवस्था नाही तर ....

त्याचे वाक्य पूर्ण होण्याच्या आतच त्यापैकी दोनतीन मुले बोलली, " सर आम्ही खाली ह्याच सतरंजीवर बसत जाऊ.

"सर,आम्ही येताबरोबर रोज आधी तुमची खोली झाडून साफ करत जाऊ..." मध्येच त्यांच्यासोबतच्या दोनतीन

मुली बोलल्या.

"मग आम्ही बसण्यासाठी सतरंजी अंथरत जाऊ." पुन्हा दोनतीन मुले बोलली.

"निळा,काळा,हिरवा व लाल रंगांचे मार्करचे पेन व पांढ–या सनमायकाचा बोर्डही आम्हीच घेऊन येतो सर. काही मुले म्हणाली.

"मुलांनो, खरे तर असे असते की स्वयंस्फूर्तीने व स्वयंअध्ययनाने अभ्यास होईल अशीच अभ्यासक्रमाची रचना केलेली असते. स्वयंप्रज्ञ विद्यार्थी तयार करणे हाच शिक्षणाचा मूळ उद्देश आहे. त्यामुळे वर्गात व्यवस्थित शिकविल्या गेले, विद्यार्थ्यांने

तन्मयतेने वर्गात नीट लक्ष दिले,व्यवस्थित टिपणे घेतली, घरी त्यावर चिंतन, मनन, लेखन करून चांगला सराव केला, सुयोग्य अभ्यासतंत्र वापरले, आपला गृहपाठ वेळच्या वेळी पूर्ण केला व दररोज नियमितपणे मनःपूर्वक तल्लीनतेने अभ्यास केला तर शिकवणीची काहीच जरुरी नसते. मग शिकवण्या लावून कशाला नाहक शारीरिक व मानसिक ताण वाढवून घ्यायचा?"विकासने त्यांना समजाऊन सांगत प्रतिप्रश्न केला.

"सर, खरे तर असे आहे की आम्ही थोडेस ढ ही आहोत म्हणून आम्हाला शिकवणीची गरज भासते."दोन तीन मुले बोलले.

"वास्तविक पाहता कोणताच विद्यार्थी हा ढ नसतो. प्रत्येकजण आपापल्यापरीने हुशार असतो. प्रत्योकाजवळ काहीना काही बुध्दिमत्ता ही असतेच. प्रत्येकाजवळ थोडीफार क्षमताही हमखास असतेच. अभ्यासाची आवड, कोणत्याही परीक्षेत वा कार्यात यश मिळविण्याची प्रबळ आंतरिक इच्छा, आपल्या बुध्दिमत्तेनुसार व कार्यक्षमतेप्रमाणे प्राप्त परिस्थितीचा अनुकुल वापर,उपलब्ध साधनांचा उचित उपयोग, योग्य दिशेने व योग्य मार्गाने चिकाटीने केलेले प्रयत्न, सुयोग्य पध्दतीने केलेला अभ्यास यांच्या जोरावर सुयश मिळविणे काही फारसे कठीण काम नाही." विकासने त्यांना पुन्हा खुलासेवार समजावले.

"सर,पण आम्हाला हा विषय जरा कठीणच जातो.त्यामुळेही आम्हाला ट्युशनची आवश्यकता आहे."जणू काही ट्युशन लावाय चीच असे ठरवून आल्यासारखेच ती मुले बोलत होती."

"कोणत्याही वर्गाचा व विषयाचा अभ्यासक्रम हा त्या त्या वयाच्या मुलांच्या बौध्दिक पातळीचा, त्यांच्या क्षमतेचा नि आकलनशक्तीचा विचार करून त्यांना समजेल असाच आखलेला असतो. तो कठीण नसतोच व योग्य पध्दतीने सातत्यपूर्वक अभ्यास केल्यास तो सोपाच जातो. पण कारे मुलांनो,तुम्हाला वर्गात तर मीच हा विषय शिकवतो ना?तरीही मग तुम्हाला ह्या विषयाच्या शिकवणीची का गरज भासते ?" विकासने त्यांना विचारले.

"सर,तुम्ही खूपच चांगले शिकवता. तुमचे शिकवणे आम्हाला एकदम समजते. म्हणूनच तर आम्ही तुमच्याकडेच शिकवणी लावायला आलोत ना?" त्यांपैकी एका विद्यार्थ्याने विकासलाच प्रश्न केला.

" मीही तर तेच म्हणतो ना तुम्हाला. मीच वर्गात शिकवणारा असल्याने तुम्हाला शिकवणी लावून विनाकारण पैसे खर्च करण्याचे काहीच कारण नाही. "विकासने सांगितले.

"सर,तुम्ही चांगले शिकवता ह्याबद्दल काहीच दुमत नाही. पण लेखाकर्म हा विषय तसाही कठीणच आहे. त्यातही आमचे इंग्रजी माध्यम आहे. तुम्ही वर्गात चांगले मन लावून शिकवता त्यामुळे तो आम्हाला चांगला समजतो व सोपीही जातो. पण त्याची जर तुम्ही शिकवणी घेतली तर आमचा त्याचा पुन्हा सराव होईल, चांगल्याप्रकारे उजळणी होईल व तो

आम्हाला आणखीही जास्त सोपा जाईल,आम्हाला परीक्षेत आणखी जास्त चांगले मार्क्स मिळतील."तिसरा मुलगा म्हणाला.

"सर, पाचही बोटे तर सारखी नसतात ना ? तसेच प्रत्येकाची बुध्दीही थोडीफार कमीजास्त असतेच हे तुम्हीही जाणता व ब–याचदा आम्हाला वर्गात सांगतासुध्दा. त्यामुळे कोणाला कोणता विषय कठीण जातो तर कोणाला दुसरा एखादा कठीण जातो. कुणाला सारेच विषय सोपे जातात. आम्हाला मात्र हा विषय कठीण जातो." एक मुलगी म्हणाली.

" एका वर्षाचे महत्व काय असते हे परीक्षेत नापास होणारा विद्यार्थीच जाणतो. एका मिनिटाचे महत्व काय असते हे प्रवासाला जातांना गाडी हुकलेल्या माणसालाच समजते. एका सेकंदाचे महत्व हे एखाद्या अपघातात एक सेकंदाने वाचलेल्या माणसालाच समजते. तुम्ही जर आमची शिकवणी घेतली तर आमची नापास होण्याची काळजीच राहणार नाही, आमची ती भीती कायमचीच दूर निघून जाईल सर."दुसरी मुलगी कळकळीने बोलली.

" खरोखर तसे जर तुम्हाला वाटते तर मी तुम्हाला कॉलेजमध्येच रोजचे तुमचे कॉलेजचे तुमच्या वेळापत्रकातील सगळे तास संपल्यानंतर दररोज एक तास विनामूल्य शिकवत जाईल. मग तर झाले. मी उद्याच ह्यासंदर्भात आपल्या प्राचार्यांशी बोलतो व तुम्हाला सांगतो. चालेल ना?" विकासने त्यांना सांगितले व प्रश्नही केला.

ती मुलेमुली ह्यावर मात्र निरुत्तर झाली व " ठीक आहे सर. " असे म्हणत विकासशी सहमत होऊन निघून गेली. विकास कॉलेजशी संबंधित प्रत्येक गोष्ट आपले विभागप्रमुख देवरे सरांना सांगायचा व त्यांचा सल्ला घ्यायचा.दुस–या दिवशी कॉलेजमध्ये गेल्यावर आपले विभागप्रमुख देवरे सरांना त्याने कालचा किस्सा सांगितला व त्यांच्या सोबत प्राचार्यांना भेटण्यास त्यांच्या कार्यालयात गेला. प्राचार्यांना नमस्कार झाल्यानंतर त्यांनी बसा म्हटल्यावर हे दोघेही त्यांच्या समोरच्या खुर्च्यामध्ये बसले.

"सर काल संध्याकाळी बी. कॉम. भाग १ इंग्रजी माध्यमाची दहाबारा मुलेमुली माझ्या खोलीवर आली होती. ती मला शिकवणी घेण्याचा खूप आग्रह करीत होती. मी त्याांना खूप समजाऊन सांगितले पण ती ऐकतच नव्हती. त्यामुळे मी त्यांना आपले मा. प्राचार्य परवानगी देतील तर कॉलेजमध्येच नियमित तास झाल्यानंतर दररोज एक तास त्यांना विनामूल्य शिकवत जाईल असे सांगितले. " त्याने प्राचार्यांना सांगितले.

"हो,मला माहीत आहे. काल रात्री मलाही आणि आपल्या अध्यक्ष अण्णासाहेबांनासुध्दा गावातील काही बड्या असामींचे फोन येऊन गेलेत.तुमचे शिकवणे बघून तुम्ही त्या मुलांची ट्युशन घ्यावी ह्याबद्दल तुम्हास सांगा असे त्यांचे म्हणणे होते. आपले अध्यक्ष अण्णासाहेबांचेही असेच म्हणणे आहे की तुमच्या अभ्यासाचा, ज्ञानाचा, विद्वत्तेचा, शिकवण्याचा,कौशल्यांचा जर विद्यार्थ्यांना जास्तीचा फायदा होत असेल तर तुम्ही टयुशन घ्यायला आमची

काहीच हरकत नाही. " प्राचार्य म्हणाले.

" पण सर शिकवणीचे पैसे घेणे हे काही माझ्या तत्वात बसत नाही. आपण परवानगी देत असाल तर आपले रोजचे नियमित तास संपल्यानंतर कॉलेजच्या एका वर्गखोलीत मी त्यांची दररोज विनामूल्य ट्युशन घ्यायला तयार आहे." विकास म्हणाला.

"पैसे घेणे न घेणे हा तुमचा प्रश्न आहे. पण हल्ली तुम्हाला तर पैशांची सख्त गरज आहे. तरीही तुम्ही उदार मनाने विद्यार्थ्यांच्या भल्यासाठी ट्युशनचे पैसे नाकारत आहात हा तुमच्या मनाचा मोठेपणा आहे. त्या मुलांनीही त्यांच्या पालकांना ह्या सगळ्या गोष्टी सांगितल्या आहेत.ते गडगंज श्रीमंत पालक हे ऐकून आश्चर्यात पडले.असो. विकास माणसाला दिशा दाखवणारा व्यक्ती जर योग्य मिळाला तर दिव्याचा प्रकाशसध्दा सूर्याचे काम करतो.तू विद्यार्थ्यासाठी तसेच कार्य करत आहे ह्याचा आम्हा सर्वांना अभिमान आहे. तुम्ही उद्यापासून त्या मुलांचीच काय इतरही मुलांमुलींची तुमचे आपल्या कॉलेजचे शिकवण्याचे नियमित तास संपल्यानंतर आपल्या समोरच्याच वर्गखोलीमध्ये शिकवणी घेऊ शकता.मी चपाराश्याला तो वर्ग तुमच्यासाठी कॉलेज संपल्यानंतरही एक तास उघडा ठेवण्याची सूचना देतो."प्राचार्यांनी सांगितले.

ते दोघेही प्राचार्यांच्या कार्यालयातून बाहेर आले आणि अशारीतीने विकासने प्राचार्यांच्या परवानगीने दररोज दुपारी १२ वाजता कॉलेजचे नियमित तास संपल्यावर त्याच नाही तर वर्गातील इतर सर्वच मुलांना तोच विषय पुन्हा कॉलेजच्याच त्या वर्गखोलीत फुकट शिकवणे सुरू केले.

असेच काही दिवस निघून गेले.एका दिवशी रात्री विकासचा आपल्या खोलीवर स्वयंपाक सुरू असतांनाच कॉलेजमध्ये त्याच्या तासिकांना नेहमी गैहजर असणारे बी. कॉम. भाग १ मराठी माध्यमाची चार मुले त्याच्याकडे आलेत. नमस्कार सर."असे म्हणत त्यांनी विकासला नमस्कार केला.

"नमस्कार." असे म्हणत विकास स्वयंपाकातून उठू लागला.

ते बघून ती मुले म्हणाली, "सर तुम्ही उठू नका. आम्ही तुमच्याशी थोडेसे बोलायला आलो आहोत. तुम्ही तुमचा स्वयंपाक सुरू ठेवा. आम्ही उभे राहूनच तुमच्याशी थोडे बोलतो.

"पण मी काही तुम्हाला ओळखले नाही." विकास त्यांच्याकडे बघत म्हणाला.

"सर आम्ही तुमच्या वर्गातील बी.कॉम. पार्ट वन मराठी माध्यमाचे नागरे, फाळके, वनारे, चव्हाण. त्यांनी आळीपाळीने आपली आडनावे विकासला सांगितली.

"अच्छा! म्हणजे तुम्ही माझ्या तासांना चाटा मारणारे विद्यार्थी आहात तर ?" विकासने त्यांना विचारले. तो मुलांची हजेरी नावानुसार घ्यायचा त्यामुळे ते विद्यार्थी त्याच्या लक्षात होते.

" हो सर,आम्ही तुमच्याच तासांना चाटा मारणारे नसून आम्ही कॉलेजमध्ये कधीच न येणारे विद्यार्थी आहोत. " त्यांपैकी एकाने उत्तर दिले.

"मग आता येथे कशासाठी आलेत माझ्याकडे ?" विकासने त्यांना विचारले.

"सर,आम्ही तुमची कीर्ती ऐकून आलो आहोत.तुम्ही लेखाकर्म खूप चांगले शिकवित असता हे ऐकून तुम्हाला एक विनंती करायला आलो आहोत. "एकजण नम्रतेने बोलला.

"बोला काय म्हणणे आहे तुमचे?" विकासने त्यांना प्रश्न केला.

"सर, तुम्ही रोज रात्री आमची लेखाकर्म ह्या विषयाची शिकवणी घ्या अशी आमची तुम्हाला हात जोडून विनंती आहे."त्यातील एकजण नम्रतेने म्हणाला.

"अरे, मागेच माझ्याकडे शिकवणीसाठी दहाबारा मुले आले होते तर त्यांना मी नाही म्हणून सांगितले. कारण मी शिकवणी मुळीच घेत नाही. माझ्या तत्वाला ते पटत नाही. तुम्ही कॉलेजमध्ये नियमित येत जा. कशाला शिकवणी लावून नाहक आपले पेसे खर्च करता?" विकास त्यांना बोलला.

"सर,आम्ही कॉलेजमध्ये नाही येऊ शकत. "त्यातील एकाने म्हटले.

का नाही येऊ शकत तुम्ही कॉलेजमध्ये ?" विकासने त्यांना प्रश्न केला.

" सर आम्ही रोज सकाळी ८ ते सायंकाळी ८ वाजेपर्यंत एम. आय.डी.सी.त कामाला जात असतो. संध्याकाळी तर

बोलायचे ८ असतात पण रोज किमान १० वाजेपर्यंत आम्हाला काम करावे लागते."एकजण उत्तरला.

"काय रोज १४ तास काम करता तुम्ही?मग जेवण केव्हा करता ?" विकासने आश्चर्याने त्यांना प्रश्न केला.

" हो सर. आम्ही एम.आय. डी. सी.त हमाली कामे करत असतो. आम्ही काम नाही केले तर आमचे शिक्षण तर दूरच राहील पण आम्ही खायलाही मोताद होऊ एवढे आम्ही गरीब आहोत. " एकजणाने उत्तर दिले.

"बसा, आधी खाली बसा तुम्ही." विकासने त्यांना खाली बसण्यास सांगितले.

विकासने उठत आपले हात धुतले व त्यांना बसण्यासाठी सतरंजी टाकू लागला. त्यांपैकी एका विद्यार्थ्याने त्याच्या हातातील सतरंजी घेतली व त्यानेच ती तेथे अंथरली.विकास व ती चारही मुले सतरंजीवर बसली. विकासने आपुलकीने त्यांची चौकशी केली. त्यांनीही न संकोचता त्यांची सर्व परिस्थिती विकासला सांगितली.

ती ऐकून विकास त्यांना म्हणाला, "मुलांनो, मीही तुमच्यासारखाच गरीब घरातून आलो आहे. त्यामुळे मी शिकवणी मुळीच घ्यायची नाही असे मी माझ्या मनाशी पक्के ठरवले आहे. कारण श्रीमंत मुले शिकवणी लावतात परंतु त्यात गरीब मुलांची पंचायीत होते, त्यांचे मरण होते. "

ते ऐकून ती मुले खूप नाराज झाली.विकास पुढे म्हणाला, "काही हरकत नाही. पण मी तुमची शिकवणी नक्कीच घेणार. " हे

ऐकताबरोबर त्यांचे चेहरे आनंदाने फुलले.

सर आम्हाला एकेकाला किती किती पैसे द्यावे लागतील शिकवणीचे ?" एकाजणाने विचारले.

"एक नवा पैसाही द्यावा लागणार नाही.मी तुमचीही शिकवणी फुकटच घेणार आहे. तसेच गावात तुमच्यासाठी सकाळी कॉलेज व दुपारून ४ ते ८ पर्यंत करण्यासारखे काही अर्धवेळ काम असल्यास तेही शोधतो. म्हणजे तुमचे कॉलेजही होईल व तुम्हाला तुमच्या दैनंदिन खर्चपाण्याला थोडेफार पैसेही मिळतील." विकासने त्यांना सांगितले.

"ठीक आहे सर. आपले आमच्यावर खूप उपकार होतील." ते चौघेही एकसुरात बोलले.

"तुम्ही उद्यापासूनच तुमचे काम आटोपल्यावर माझ्याकडे रोज रात्री शिकवणीसाठी येत जा. तुम्ही जेव्हा केव्हा याल तेव्हा एक तास मी तुमची शिकवणी घेत जाईल. " विकास म्हणाला.

धन्यवाद सर." असे म्हणत त्यांनी विकासला हात जोडून नमस्कार केले व ते जाण्यासाठी निघाले.दुस–या दिवशी रात्री ते चौघे व त्यांच्यासोबत आणखी तसेच दोघे गरीब विद्यार्थीही विकासकडे आलेत. आधीच्या चौघांनी त्या दोन विद्यार्थीची विकाससोबत ओळख करून दिली. तेही त्यांच्यासारखेच एम. आय. डी. सी. त हमाली कामे करणारे मुले होती व त्यांच्याच वर्गातील होती. असे ते एकूण सहा मुले रोज रात्री विकासकडे शिकवणीसाठी येऊ लागले.

विकासच्या छोट्याशा खोलीत विकास व ती मुले दाटीवाटीने सतरंजीवर बसत असत. विकास एका मोठ्या दगडी पाटीवर लेखणीने त्यांना समजाऊन सांगत शिकवायचा. अशी त्यांची सहाही जणांची शिकवणी सुरू झाली.

समाजात जो इतरांसाठी निरपेक्षपणे खपतो तो सर्वांना हवाहवासा वाटतो. विकासचे तसेच होते. विकास गरीब मुलांना फुकट शिकवतो हे जेव्हा विकासच्या गरीब घरमालकाला समजले तेव्हा त्याने त्याची बाजूची तशीच एक रिकामी असलेली खोली विकासला ट्युशन घेण्यासाठी विनामूल्य वापरायला दिली. विकासने त्यांचे खूप खूप आभार मानले. त्या मुलांनी चटकन ती खोली साफही केली. आता त्या खोलीत त्यांची मोकळीचाकळी शिकवणी सुरू झाली.

गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणात मदत करीत त्यांचे शिक्षण पूर्ण करण्याचा त्याने विडाच उचलला होता.तो आपल्या विद्यार्थ्यांसाठी निरपेक्षतेने, निस्वार्थीपणे झटत होता. म्हणूनच तो कॉलेजमध्ये सर्वांचा आवडता झाला होता व त्याला सर्वच विद्यार्थी मान देत होते, त्याचा आदर करत होते. हेच बघून काही जळक्यांचे पोट दुखत होते व ते द्वेषभावनेतून विकासच्या कामात अडथळे आणत होते, अडचणी निर्माण करत होते, त्याच्या प्राचार्य व अध्यक्षांजवळ चुगल्या लावत होते.

इतरांना मदत करण्याच्या त्याच्या प्रवृत्तीमुळे त्याला असा ब–याच वेळा मनस्ताप सहन करावा लागे. त्याच्या स्वभावाचा गैरफायदाही घेतल्या जात असे पण ह्या गोष्टी त्याच्या मागाहून ब–याच उशीरा लक्षात येत असत. मग तो ते सारे डोक्यातून काढत असे आणि पुन्हा त्याचे ये रे माझ्या मागल्या असे परोपकाराचे वागणे सुरू होत असे.

त्याच्या विरोधात कुणी कितीही काड्या केल्या तरी प्राचार्य, कॉलेजचे अध्यक्ष अण्णासाहेब व संस्था पदाधिकाऱ्यांचा त्याच्यावर पूरा भरोसा होता. तो जे काही करत आहे ते विद्यार्थ्यांच्या हिताकरताच करत आहे ह्याचा त्यांना पूर्णपणे विश्वास होता. त्यामुळे त्यांचे विकासला त्याच्या कार्यात पाठबळच होते. विकास कॉलेजचे कोणतेही काम प्रामाणिकपणे अंग झोकून पार पाडायचा. विभागप्रमुखांनी वा प्राचार्यांनी सांगितलेले काम असो का कॉलेजचे अध्यक्ष अण्णासाहेबांनी सांगितलेले काम असो, तो ते इमानेइतबारे करीत तडीसच न्यायचा. त्यामुळे त्याच्या कामावर त्याचे विभागप्रमुख देवरे सर, त्याच्या कॉलेजचे प्राचार्य व अध्यक्षही खूप खूश होते. त्यांचा विकासवर खूपच विश्वास बसला होता.

विकासने ह्या मुलांच्या संदर्भात त्यांना आपल्या कॉलेजमध्ये कोठेतरी कामाला लावण्याची आपल्या प्राचार्यांना विनंती केली. प्राचार्यांनी अध्यक्षांनासुध्दा ही गोष्ट सांगितली. तेव्हा त्यांनी ताबडतोब त्यांपैकी एकाला कॉलेजमध्ये प्राचार्यांच्या कार्यालयासमोर तर दुसऱ्याला अध्यक्षांच्या केबिनसमोर बसण्यासाठी तात्पुरते चपराशी म्हणून कामाला लावले.मग तिसऱ्या विद्यार्थ्याला कॉलेजमधील मुक्त विद्यापीठाचे काम दिले तर चवथ्याला अध्यक्षांनी कॉलेजच्या ग्रंथालयात पुस्तकांची विद्यार्थ्यांसोबत देवाणघेवाण करण्यासाठी कामाला लावले.

ही गोष्ट विकासच्या वर्गातील श्रीमंत विद्यार्थ्यांना माहीत झाली.त्यांनी आपासात चर्चा करून आपापल्या वडिलांना सांगून त्यांपैकी पाचव्याला गावात एका मेडिकल दुकानावर तर सहाव्याला पुस्तकांच्या दुकानावर कॉलेज संपल्यावर दुपारून चार ते संध्याकाळी आठपर्यंत कामाला लावले. असे त्या सहाही मुलांना अर्धवेळ काम मिळाले व ते कमवा नि शिका ह्या धोरणानुसार नियमित कॉलेजही करू लागले. विशेष म्हणजे त्या श्रीमंत मुलांनी विकासला तो नाही नाही म्हणत असतानासुध्दा ह्या गरीब मुलांना त्याला शिकवणे सोयीचे जावे म्हणून एक पांढरा सनमायका बोर्ड व चार रंगांचे चार मार्कर पेनही आणून दिलेत.अर्थात ते विद्यार्थी असूनही विकास त्यांचे आभार मानायला विसरला नाही.

**प्रा.देवबा शिवाजी पाटील,**
**गोविंदनगर,(नांदुरा रोड),**
**खामगाव.जि.:– बुलडाणा.४४४३०३**
**मो.९४२०७९५३०७**

■■■

**कथा**



# काळजाचा तुकडा

**अविनाश भोंडवे**

प्रभाकर देशपांडे बागेत आले, तेंव्हा उगवत्या सूर्याच्या किरणांनी साऱ्या झाडांची पानं चकाकू लागली होती. जॉगिंग ट्रॅकवर पळणाऱ्या तरुणांच्या आणि भरभर चालणाऱ्या वयस्कांच्या गर्दीवर त्यांनी नजर टाकली, पण त्यांचा नेहमीचा ग्रुप त्यांना दिसेना.

बागेत थोडेसं आत आल्यावर त्यांनी इकडे तिकडे पाहिले. दोन छोटे पक्षी एका झाडावरून चिव चिव करत, त्यांच्या खांद्यावरून उडाले आणि दुसऱ्या झाडावर जाऊन बसले.ते आणखी आत चालत गेले. पुढे गालिचा पसरल्यासारखी हिरवळ होती. हिरवळीच्या कडेने फुलझाडं लावली होती. त्यातल्या फुलांवर रंगीबेरंगी पंख फडफडवत होती,मध्येच एखाद्या गुलाबावर बसून मकरंदाचा आस्वाद घेत होती.हिरवळीच्या पलीकडच्या बाकड्यावर त्यांची नेहमीची चौकडी त्यांना दिसली. पांढऱ्या शॉर्ट्स, रंगीत टीशर्टस आणि स्पोर्ट्स शूज घातलेले साठे,कामत, शिंदे आणि देशमुख, असे चौघे अगदी निवांतपणे हसत, गप्पा मारत, विनोद करत बागेतल्या आनंदाचे क्षण वेचत बसले होते.

"या देशपांडे, वेलकम वेलकम बॅक." प्रभाकर आल्याचे पहाताच साठेंनी हसत स्वागत केले आणि त्यांच्याशी हस्तांदोलन केले.चौघेही उठून उभे राहिले. शिंदे आणि देशमुखांनी त्यांची गळाभेट घेतली. प्रभाकरांच्या पाठीवर थोपटत कामात म्हणाले, "किती दिवसांनी आलात? सुनीता वहिनी गेल्यावर पहिल्यांदाच."

"हो, दीड महिन्यानं... आज तिला जाऊन बरोबर दीड महिना झाला." प्रभाकरांचा चेहरा गंभीर झाला. मित्रांवरची नजर हटवून ते

दूरवर शून्यात पाहत राहिले.

"करमत नसेल ना आता?"

"हो ना. घर खायला उठतं. माझी बहीण राहिली होती दहा एक दिवस.पण तीही निघून गेली.सुरुवातीला लोक भेटायला येत होते, त्यांच्याशी बोलणं व्हायचं. तेराव्या नंतर लोकांचं येणं कमी झालं. त्यानंतर हिचे बँक अकाउंट्स,लॉकर,एलआयसीच्या पॉलिसी सगळं करण्यात आठ पंधरा दिवस गेले.कालच हिचे कपडे आणि काही गोष्टी वृद्धाश्रमात देऊन आलो."

देशपांडे बोलायचं थांबले. त्यांचे डोळे भरून आले होते. आवाज कातर झाला होता. डोळ्यावरचा चष्मा काढून खिशात ठेवला. खिशातून रुमाल काढून त्यांनी डोळे पुसत ते म्हणाले, "चिमणा चिमणी जशा एकेक काडी आणून घरटं बांधतात ना... तसं आपण बारीक सारीक इतक्या गोष्टी जमवतो... की आपल्यानंतर त्याचं काय करायचं हा प्रश्न उभा राहतो. सुनीताच्या अशा सगळ्या गोष्टी पुठ्ठ्याच्या बॉक्सात भरून टाकल्या आणि एका खोलीत ठेवून तिला कुलूप लावून टाकलंय."

"सुनील गेला का?" देशमुखांनी प्रभाकरच्या मुलाची, सुनीलची चौकशी केली.

सुनील बारा वर्षापूर्वी अमेरिकेला शिकायला गेला, त्यानंतर त्याला तिथेच चांगली नोकरी मिळाली, तिथल्याच एका ग्रीनकार्ड होल्डर भारतीय मुलीबरोबर त्यानं लग्न केलं आणि तो कायमचा अमेरिकन झाला होता.

सुनीलचं नाव ऐकताच प्रभाकर पुन्हा हळवे झाले. त्यांनी डोळे घट्ट मिटले. एक अश्रू डाव्या गालावर ओघळला. डोळे उघडून म्हणाले, "सुनीता गेल्यानंतर तीन दिवसांनी आला. फ्लाईटचं बुकिंग मिळालं नाही म्हणाला. एकटाच आला. सांगत होता, बायकोला रजा नाही मिळाली... आणि..." असं म्हणताना त्यांना एक हुंदका आला. ते मान खाली घालून मुसमुसू लागले.देशमुख त्यांच्या पाठीवर थोपटत राहिले.

चष्मा वर उचलून बोटांनी डोळे पुसत प्रभाकर म्हणाले, "तो आला... पण घरी नाही उतरला. हायवेवरच्या फाईव्हस्टार हॉटेलात उतरला. सकाळी टॅक्सी करून यायचा,दुपारी बाहेर जेवून यायचा. रात्री आठला परत टॅक्सी करून हॉटेलात झोपायला जायचा. नाही म्हणायला, स्वयंपाकाची बाई आली नाही, म्हणून एक दिवस मला दुपारी ऑनलाईन ॲपवरून पोळी भाजी मागवली होती... बस्स. ना त्यानं आल्यावर मला मिठी मारली. ना आईच्या फोटोसमोर अश्रू ढाळले..."

सगळेच एकदम गंभीर झाले. बराच वेळ कुणी काहीच बोललं नाही. बागेतल्या पक्ष्यांची चिवचिव आता कमी झाली होती. फिरायला येणाऱ्यांची वर्दळ वाढू लागली होती. ते चौघे प्रभाकरला निरखत होते. आणि प्रभाकर बागेतल्या अशोकाच्या थरथरत्या शेंड्याकडे पहात होते.

शेवटी निःशब्दता भंग करत शिंद्यांनी सुचवलं, "चला, सगळे चहा प्यायला जाऊ."

चहा झाल्यावर सगळे आपापल्या घरी निघाले. साठयांनी प्रभाकरला सांगितलं," उद्यापासून रोज येत जा रे... वाट पाहतो."

"नक्की येत जाईन.मला ही आज खूप दिवसांनी बरं वाटलं." बोलताना प्रभाकरचा चेहरा थोडा आनंदी वाटत होता.

घराचं गेट उघडून प्रभाकर त्यांच्या बंगल्याच्या आवारात आले. आत आले की आपल्या दुमजली मोठया घराकडं वरपासून खालपर्यंत नजर टाकण्याची त्यांना सवय होती. घराकडं असा दृष्टीक्षेप टाकल्यावर, त्यांचा उर अभिमानानं भरून यायचा. पंचवीस वर्षांपूर्वी खूप खटाटोप करून त्यांनी ही वास्तू उभी केली होती. ती बांधताना त्यातल्या विटांपासून फर्निचर पर्यंत, फरशांपासून संडास बाथरूममधल्या सोयींपर्यंत आणि विजेच्या उपकरणांपासून शोकेसमधल्या वस्तूंपर्यंत प्रत्येक गोष्ट त्यांनी आणि सुनीतांनं दहा बारा दुकानात जाऊन मुक्रर केल्या होत्या. घरातल्या इंचा इंचामध्ये त्यांचे रोम न रोम भिनले होते.

पण आज त्या घराकडं बघताना त्यांना नैराश्य आलं. आपण एवढं मोठं घर बांधलं,ते आपल्या मुलासाठी... तो मोठा झाल्यावर त्याच्या कुटुंबाला जागा कमी पडू नये, म्हातारपणी नातवंडांना खेळवायला आपल्याला अडचण येऊ नये यासाठी. पण आपला तोच मुलगा इथं येण्याऐवजी हॉटेलमध्ये राहतो?असं विचार तरी कसा केला त्यानं?

ते घरात आले आणि दिवाणखान्याच्या खिडक्या उघडून सोफ्यावर बसले. त्यांच्या डोळ्यासमोर लहानपणचा सुनील आला. चुणचुणीत सुनील त्यांना सतत प्रश्न विचारायचा.

"बाबा, सूर्य मोठा की चंद्र?"

"बाबा, बटन लावलं की लाईट कसा लागतो?"

"बाबा, तुम्ही सचिनला पाहिलंय मुंबईत?"

"बाबा, सोलर पॅनेल काय असतं?"

"बाबा हे काय असतं? बाबा ते काय असतं? हे असं का? तसं का नाही?"

एक ना दोन... त्याच्या शंकांचा भडिमार मिनिटा मिनिटाला चालू असायचा. आपण त्याला चेष्टेने शंकासूर असं नावंही ठेवलं होतं.

शाळेत तो हुशार होता. अगदी दर वेळी पहिला नंबर यायचाच असं नाही, पण पहिल्या पाचात यायचा. आपल्या मनात त्यानं डॉक्टर व्हावं असं वाटत होतं, पण त्याला इंजिनीअर व्हायचं होतं. त्याच्या आईचा त्याला पाठिंबा असायचा. तो कॉम्प्युटर इंजिनियर झाला. नंतर वर्षभर इथं नोकरी केली. त्यावेळी तो किती साधा होता. त्याचं ऑफिस घरापासून खूप लांब होतं, तरी सकाळी ७ वाजता म्हणजे ७ वाजताच कामावर जायचं, म्हणून तो पहाटे लवकर उठून जायचा. रात्री उशीरा यायचा.

नोकरी करताना त्यानं आपल्याला सांगितलं, "मला पुढचं शिकायला अमेरिकेला जायचंय. त्याच्या परीक्षा असतात, त्यासाठी

क्लास लावायला लागेल."सुनीलनं यावेळी मी हे करू का?म्हणून विचारलं नव्हतं. मी हे करणार असं सांगितलं होतं. त्यानं आपल्याला न विचारता घेतलेला पहिला निर्णय होता. त्यावेळेस आपल्या लक्षात आलं नाही,पण आता कळतंय की त्या दिवसानंतरच तो बदलत गेला. बदलला तो... पण इतका?

शाळेपासून तो त्याच्या आईच्या गळ्यातला ताईत होता. तिच्या काळजाचा तुकडा होता. शाळेतून आला की सुनीताच्या गळ्यात पडून शाळेत घडलेलं सगळं सांगायचा.

एकदा त्यानं तिला सांगितलं, "आई, आज की नाही, आमच्या वर्गात एक मुलगा ना,खूप गडबड करत होता. मग त्याला टीचरनी वर्गाबाहेर अंगठे धरून उभं केलं."

तिच्या लक्षात आलं, काय झालं असेल ते, तिनं विचारलं, "कोण रे तो मुलगा?" सुनीलला नाव काही सांगता येईना...

तिनं त्याला त्याच्या मित्रांची नावं घेऊन विचारलं, "कोण आशुतोष का?"

"नाही."

"मग सूरज का?"

"नाही."

त्याच्या आणखी दोन तीन मित्रांची नावं घेत तिनं विचारलं, "मग....अं अं... सुनील का?"

मान खाली घालत, गाल फुगवत तो म्हणाला, "हो."



आजही त्यांना तो प्रसंग आठवून हसू आलं. सुनीतानं त्याच्यासाठी खूप केलं. तो शाळेत जायचा तेंव्हा, इंजिनिअरिंगला असतानाही आणि नोकरीला जाण्यासाठी सकाळी पाच वाजता उठून आवरायचा तेंव्हासुद्धा. तो जाताना त्याला खायला करणं आणि त्याचा टिफिन भरून देणं तिनं सोडलं नाही. सुनीलनं शाळेला, कॉलेजला कधीही दांडी मारली नाही आणि त्याच्या आईनं त्याचं खाणं पिणं आणि उरकून देण्याच्या कामातून कधीही रजा घेतली नाही. तो आजारी पडला, तर तीच रात्रभर जागायची त्याच्यासाठी. परीक्षांच्या अभ्यासासाठी तो रात्रभर जगायचा,तेंव्हा रात्री एक वाजलेले असो, नाही तर दोन, ती झोपेतून उठून त्याला चहा करून द्यायची.

त्याला अमेरिकेतल्या युनिव्हर्सिटीमध्ये ॲडमिशन मिळाल्यावर, तिथल्या फीसाठी आपण बँकेचे एज्युकेशन लोन काढलं. पण बँकेचे पैसे मिळायला उशीर होणार होता. सुरुवातीच्या फीसाठी आणि विमानाच्या तिकीटासाठी पैसे कमी पडत होते. तेंव्हा सुनीतानेच स्वतःचे दागिने मोडून त्याला पैसे दिले. तो तिकडं गेला, तेंव्हा एकही दिवस असा गेला नाही, की जेवताना तिनं त्याची आठवण काढली नाही... आणि एकही अशी रात्र गेली नाही, की तिनं त्याच्यासाठी अश्रू ढाळले नाहीत. आणि तरीही, अमेरिकेतल्या त्याच्या एमएस परीक्षेत पास झाल्याचं, त्यानं कळवलं नाही. त्याला तिथं जॉब लागल्याचंही कळवलं नाही. त्यानं तिथं घर घेतलं, कार घेतली हे जन्मदात्या आईला सांगण्याची त्याला गरज वाटली नाही.

अमेरिकेतल्या स्टुडन्ट व्हिसानंतर, त्याला तिथला वर्क व्हिसा मिळाला. ही अमेरिकेत स्थिरस्थावर होण्याबाबतची त्याची पुढची पायरी होती. त्या व्हिसासाठी त्याला भारतात यावं लागलं. तो आला पण दिल्लीला उतरला. तिथे पाच दिवस राहून घरी दोन दिवसांसाठी आला.

सुनीताला खरंच खूप आनंद झाला होता. त्यावेळी तिला आपल्या कर्तबगार मुलाला अमेरिकेत जॉब मिळाल्याचं, घर आणि गाडी घेतल्याचं कळलं. तो घरी आला, त्या दिवशी ती त्याला म्हणाली, "सुनील, अरे तू एवढं घर घेतलंस अमेरिकेत,आता आम्हाला घेऊन चल की अमेरिका बघायला."

"आई, अगं तिथली हवा तुम्हाला मानवायची नाही. आणि तिथलं जेवण सगळं नॉनव्हेज असतं. सगळ्या खाण्यात सर्रास गोमांस असतं.तुम्हाला नाही चालायचं ते. आणि मी दिवसभर ऑफिसात असणार, तुम्हाला बाहेर जाऊन कुणाशी बोलताही येणार नाही. तुमचं इंग्लिश आणि त्या लोकांचं अमेरिकन इंग्लिश... एक शब्दही समजणार नाही. कसं जमणार तुम्हाला?."

"अरे किमान बाबांना तरी ने."

"बाबांना नेऊन तू एकटी राहणार? नको."

दुसऱ्या दिवशी तो परत अमेरिकेसाठी निघून गेला. प्रभाकरना एक गोष्ट लक्षात आली, की लहानपणी प्रत्येक गोष्टीच्या शंका विचारणाऱ्या या आपल्या शंकासूराची... आता स्वतःची मतं निर्माण झाली आहेत... आणि आता तो शंका विचारणाऱ्या बालकाच्या भूमिकेत नाही,तर आईवडिलांनी काय करायचं हे सांगण्याच्या भूमिकेत आलाय.

पण त्यांना हा प्रश्नही सतावायचा की त्याला आपण अमेरिकेत यायला का नकोय? का त्याचे असे विचार झालेत? त्यांना समजत नव्हते,की

तो त्याचा जॉब, त्याची कर्तबगारी आपल्यापासून का लपवतोय? का तो दूर राहण्याचा प्रयत्न करतोय? सुनीता आणि प्रभाकर याबद्दल खूप वेळा बोलले. आपलं काही चुकलं का? आपल्या संगोपनामध्ये काही त्रुटी राहून गेल्या का? आधी त्यांना वाटायचं की तो गोंधळलाय, काय करावं... त्याला खूप काम असतं तिकडं त्यामुळे त्याला वेळ मिळत नाही, काही घडामोडी सांगायला.

सुनीता आजारी पडली, तब्येत गंभीर आहे, हे कळवूनसुद्धा तो आला नाही.आईच्या जीवनातल्या अंतिम क्षणीही तो दूर राहिला. डोळे मिटण्यापूर्वी तिच्या तोंडावर त्याचंच नाव होतं,पण आई  गेल्यावर तिला अग्नी देण्याचं कर्तव्य पार पडायलाही त्यानं रस दाखवला नाही.इतका बदलला आपला पोटाचा गोळा?कसा एवढा निष्ठुर झालास तू सुनील.

दुपार उलटली तरी ते त्याा आठवणीत गुंगून गेले होते. अशाच एका दुपारी त्याचा फोन आला. आपल्या घरातल्या घड्याळात दुपारचे दोन वाजले होते, अमेरिकेतल्या सुनीलच्या घरात रात्रीचे साडेबारा झाले होते. त्यांचा फोन वाजला. सुनीलचा व्हॉट्सॲपवर व्हिडिओ कॉल होता.

“बाबा, आम्ही आताच लग्न करून आलोय.” त्याचा आवाज किती थंड होता. किती परका वाटला. त्यानं शेजारी उभ्या असलेल्या एका गोऱ्या चिट्ट्या, उंच आणि घाऱ्या डोळ्याच्या मुलीकडं हात दाखवत म्हणाला, “धिस इज नॅन्सी, माय वाईफ.”

प्रभाकरांना आयुष्यात बसलेला तो सर्वात मोठा धक्का होता. त्याच क्षणी त्यांना वाटलं की तो धक्का नव्हता,ती वंचना होती. आईवडिलांची. “हाय डॅड” त्या गोऱ्या मुलीने एखाद्या दोस्ताला करावे त्या आवाजात त्यांना विश केलं.

“ओके बाबा. आम्ही आता अलास्काला निघालोय. बाय.”

“सुखी व्हा पोरांनो”. हे शब्द बोलण्यापलीकडे काहीच शिल्लक नव्हतं. प्रभाकरांना वाटून गेलं, की संपलं सगळं. एकुलत्या एक मुलाचं लग्न हा आईवडिलांच्या दृष्टीनं त्यांच्या आयुष्यातली मोठी घटना असते, एक माईलस्टोन असतो. संसाराच्या ज्या जबाबदाऱ्या मी आणि सुनितानं ठरवल्या होत्या, त्यात सुनीलचं शिक्षण, त्याचं करीअर आणि लग्न हेच महत्वाचं होतं आपल्यासाठी. पण त्यानं मला तर सांगितलंच नाही, पण सुनीतालाही सांगितलं नव्हतं.जर सांगितलं असतं आधी... तो लग्न करतोय म्हणून... आम्ही त्याला नाही म्हणलं असतं का?

मागच्या वेळी तो भारतात आला होता, तेंव्हा तिनं विचारलं होतं. “सुनील तुझं शिक्षण झालं. परदेशातली नोकरी पक्की झाली. आता लग्न करून टाक आणि आम्हाला मोकळं कर.”

त्यावर तो म्हणाला होता, “लग्न करायलाच पाहिजे का? नाही केलं तर काय बिघडतं?”

मी सांगितलं होतं,” अरे प्रत्येक गोष्टी ठराविक वयात व्हायला लागतात. आता तू अठ्ठावीस वर्षांचा झालास. लोक आम्हाला विचारतात, लग्न कधी करताय मुलाचं म्हणून.”

“ म्हणजे, लोक म्हणतायत म्हणून मी लग्न करायचं?”

“तसं नाही रे, माणसाच्या आयुष्याचे टप्पे असतात, हे तुझं वय गृहस्थाश्रमाचं आहे. लग्न करणं, मुलं होणं, हे सगळं वेळीच व्हावं लागतं. शिवाय आपल्याला आधार लागतोच. मनुष्य देहाच्या गरजाही असतात.”

“पण लग्न केल्यावर मूल व्हायलाच पाहिजे का?”

सुनीताच्या आणि माझ्या लक्षात आलं, पोरगा असं बोलतोय, म्हणजे त्याला अमेरिकेचं वारं  लागलंय. तिथले विचार राज्य करतायत मनावर. सुनीताला शाळेतली अंगठे धरायच्या शिक्षेची गोष्ट आठवली. त्यावेळी ती त्याला जशी बोलण्यात पकडायची, तसं तिनं विचारलं, “तू बघून ठेवलीयेस का कुणी? कुठं जमवलंयस का?”

पण सुनीलने अमेरिकेत गेल्यावर लहानपणच्या त्या गोष्टी भूतकाळाच्या समुद्रात विसर्जित करून टाकल्या होत्या. आईवडिलांच्या विचाराच्या तो कित्येक पुढे गेला होता.



“लग्न ही माझ्या मते आयुष्यातली आवश्यक गोष्ट नाही... माझं लग्न ही माझी वैयक्तिक आणि खाजगी गोष्ट आहे. तुम्ही त्याच्यात लक्ष घालू नका.” त्यानं तो विषय तिथंच संपवला. मग कुणीच काही बोललं नाही त्या विषयावर. सुनीता मात्र आशा बाळगून होती, तो कधीतरी तयार होईल लग्नाला. त्याच्यासाठी ती मुलीसुद्धा पाहत होती. त्यांचे बायोडेटा ती त्याला पाठवायची पण त्यानं ते इमेल कधी उघडलेच नाहीत.

अमेरिकन सूनबाईला व्हिडिओ कॉलवर बघितली आणि त्यानंतर महिन्याभरातच सुनीताचं कॅन्सरचं निदान झालं. त्यानंतर तीन वर्षं तिची ट्रीटमेंट चालू होती, त्याला बोलवूनही तो आला नाही.

वेळ नाही म्हणाला. मरणाच्या दारात असलेल्या आईसाठी त्याला वेळ नव्हता.

"मला यायला जमणार नाही. मी येऊन काय करू? तुम्हाला ट्रीटमेंटसाठी पैसे लागले तर मला कळवा" असं म्हणाला तो चक्क. माणसं एवढी बदललात? आपलीच मुलं एवढी कृतघ्न होऊ शकतात?

असल्या गोष्टी आठवल्या की त्यांना कधी कधी वाटायचं, खरंच, अमेरिकेला आपण पाठवला, तो सुनील नक्की हाच होता ना? आत्ता जो आहे, तो आपलाच सुनील आहे की त्याचा कुणी डुप्लिकेट? की अमेरिकन सायन्स फिक्शन सिनेमात दाखवतात, तसा त्याचा क्लोन तर वावरत नाही ना, सुनील म्हणून?

एकदा सुनीताही म्हणाली होती, "माझा विश्वास नाही त्या गोष्टींवर... पण मला आताशा वाटायला लागलंय, कुणी तरी करणी केल्येय आपल्या सुनीलवर."

सगळ्या विचारांनी प्रभाकरना गरगरू लागले. संध्याकाळचे पाच वाजले होते. सकाळी मित्रांबरोबर घेतलेल्या चहानंतर पोटात काहीच गेले नव्हते. पण त्यांना भूकही लागली नव्हती. काही खावे, असंही वाटत नव्हतं. गेले दीड महिना त्यांची अन्नावरची वासनाच उडली होती.

सुनीता असती तर एव्हाना दोन वेळा चहा झाला असता, दुपारचं जेवणही झालं असतं. चार वाजता पुन्हा काही तरी स्नॅक्सही मिळाले असते. प्रभाकरना संध्याकाळी काहीसं खावंसं वाटतं म्हणून सुनीता अनेक पदार्थ बनवायची. कधी दहीवडे, कधी भजी, कधी सुरळीच्या वड्या, सामोसे, मटार करंज्या... ते पदार्थ बनतानाच त्यांच्या तोंडाला पाणी सुटायचं. पण आता ते आठवूनही त्यांच्या तोंडाची कोरड काही जायची नाही.

सुनीता गेल्यावर त्यांची बहीण रहायला आली होती, दहा दिवस. तिनं एक स्वयंपाकाची बाई लावली होती कामाला. पण बहीण गेल्यावर त्या बाईंनी केलेला स्वयंपाक तसाच पडून राहायचा. कधी तरी थोडासा भात ते खायचे... पण बाकीचा स्वयंपाक दुसऱ्या दिवशी ओल्या कचऱ्याच्या डब्यात जायचा. मग त्यांनी त्या बाईंना झाडणं, पुसणं आणि कपडे धुण्यासाठी ठेवलं होतं. आता तर त्यांना खावंसं ही वाटायचं नाही आणि कुठं जावं असं ही वाटायचं नाही. रोजची अंघोळ आणि दात घासणही नकोसं वाटायला लागलं होतं. दुथडी भरून वाहणाऱ्या एखाद्या नदीत, मध्येच एखादा भोवरा तयार व्हावा आणि वाहणारं पाणी थांबून, सगळं काही भोवऱ्यात खेचलं जावं, तसं आपण नैराश्याच्या खोल खोल गर्तेत ओढले जातोय याची कल्पना त्यांना येऊ लागली होती.

हे सगळं बदललं पाहिजे असं त्यांना वाटायचं. कटू असलं तरी ते सत्य आहे... इथून पुढं आपल्याला एकट्यानंच जगण्याची सवय लावली पाहिजे, हे त्यांना समजलं होतं. सकाळी बागेत जाऊन आल्यावर त्यांना थोडं बरं वाटलं होतं. आताही कुठं तरी जावं का?

प्रभाकरना वाटलं की सुनीलपाशी ही मनातली वादळं उघडी करावीत. त्याला लिहून कळवावं ... म्हणून ते टेबलापाशी गेले, कागद शोधायला त्यांनी टेबलावरच्या पुस्तकांची चळत उचलली. पुस्तकांखाली त्यांना एक मोठा लिफाफा दिसला. त्यांनी तो उघडला. आत कागदावर पाच सहा ओळी लिहिलेल्या होत्या. त्यावरचं अक्षर होतं.

"बाबा, आता तुम्हाला एकच पर्याय आहे. तुमचं घर विका आणि अमेरिकेला या. तुमच्या राहण्याची मी व्यवस्था करेन. इथल्या राहण्या खाण्यासाठी घराचे पैसे उपयोगी पडतील. तुमची तयारी झाली की कळवा – सुनील."

किती तरी वेळ खुर्चीत बसून प्रभाकर टेबलावरच्या त्या कागदाकडं बघत राहिले. मनात विचारांची चक्रं वेगानं फिरत होती. त्यांच्या लक्षात आले, तेंव्हा सगळीकडं अंधार पडला होता. त्यांनी उठून दिवे लावले, कपडे बदलले. त्यांना कडकडून भूक लागली होती. त्यांनी गाडी काढली आणि मेनस्ट्रीटवरच्या एका हॉटेलात गेले. त्यांनी शाकाहारीच जेवण मागवले आणि ते पोटभर जेवले.

घरी गेल्यावर त्यांनी कॉम्प्युटर सुरु केला आणि सुनीलला ईमेल केला.

'प्रिय सुनील,

अनेक आशीर्वाद,

तुझे लिहिलेले पत्र मी आज पाहिले, त्यामुळे उत्तरास उशीर झाला.

तू म्हणतोस, माझ्यापुढे एकच पर्याय आहे, घर विकायचं आणि तुझ्याकडं येऊन रहायचं. पण तूच म्हणाला होतास, मला तिथली हवा, जेवण मानवायचं नाही. मला तिकडच्या लोकांशी बोलता पण येणार नाही. त्यामुळे तू सुचवलेला पर्याय मला मान्य नाही. पण माझ्यापुढं दुसराही एक पर्याय आहे. तो मी स्वीकारला आहे.

कळावे,

तुझा बाबा.'

सुनीलला इमेल पोचला. पण दुसरा पर्याय कोणता, हे तो कुठल्या तोंडाने विचारू शकत होता?

दुसऱ्या दिवशी प्रभाकर सूर्योदयापूर्वी पुन्हा बागेत गेले. त्यांची चौकडी वॉकिंग ट्रॅकवर रमत गमत गप्पा मारत चालत होती. त्यात सामील होऊन प्रभाकर पूर्वीप्रमाणे गमती सांगू लागले, इतरांच्या किश्श्यांवर झालेल्या हास्यात सामील झाले,त्यांच्या हातावर टाळ्या दिल्या. फिरून झाल्यावर सगळे हिरवळीपासल्या बाकड्यावर बसले.


साठे म्हणाले, "प्रभाकर पंत, आज एकदम चेंज दिसतोय तुमच्यात.अगदी पहिल्यासारखे वाटताय. काय जादू घडली एका दिवसात?"

प्रभाकर म्हणाले, "मी एक महत्वाचा निर्णय घेतलाय. घर विकायचं आणि वृद्धाश्रमात जाऊन रहायचं."

**(लेखक– अविनाश भोंडवे.)**

■■■

## कथा



वेधक चाकोरीबाह्य कथा

# ‘झडप’

डी. बी. जगत्पुरिया

पायात फाटकी चप्पल परिधान करणारा सांबा बघता बघता करोडपती झाला.त्याच्या गावातील लोकांना आश्चर्याचा जबर धक्का बसला.त्याचा बालमित्र सुधीर मात्र त्याच्यापासून दुरावला. सांबाने त्याला विचारलं –

“सुधीरऽ असा दुरावा का म्हणून ?”

“सांबाऽ खरं सांगतो. तू खूप मोठा झालाय. मला संकोच वाटतो. पण एक सांगतो. कष्टाचा घाम गाळून पोट भरतं.पण करोडोंची माया अवैध काम केल्याशिवाय जमत नसते !”

“म्हणजे? मी वाईट काम केलंय, हे तू म्हणतोय ?”

“हो ! हो !! हो !!! आता आपली मैत्री विसर. मी अब्रूदार माणूस. माझा मार्ग वेगळा. तुझा वेगळा.”

प्रत्येकजण सांबा व त्याच्या घराकडे शंकेने पाहू लागला. प्रत्येकाच्या मनात एकच प्रश्??न... सांबाकडे चारचाकी गाडी कुठून आली ? कशी आली ?? नाना शंकांचे तीक्ष्ण बाण त्याच्या सर्वांगाला

टोचू लागले.

"मी मुख्यमंत्री मॅडमचा विश्वास जिंकला. मर्जी जिंकली." त्या म्हणाल्या – "जाऽ तुला काही कमी पडणार नाही. ऐश कर ! वाट्टेल तसा खर्च कर !!" असा खुलासा तो करू लागला. पण त्यावर कुणीच विश्वास ठेवला नाही. विश्वास मर्जी कशामुळे जिंकली ? या प्रश्? ?नाचं नेमकं उत्तर तो देऊ शकला नाही.

सत्य लपत नसते. ते कुठल्याही मार्गाने बाहेर येते. जे सत्य बाहेर आले ते भयंकर कटू सत्य होते.सांबा बांगला देशात पाठवण्यासाठी गाय तस्करी करतो हे स्फोटक सत्य बाहेर आले. या क्रूरपणे निर्दोष मुक्या गाई कत्तलीसाठी पाठऊन तो खोर्? ?याने पैसा कमवतोय हे विदारक सत्य समोर आले. त्याच्या या काळ्या कारनाम्यात संबंध राज्य सरकारच लिप्त असल्याचे स्फोटक सत्य एका झुंजार पत्रकाराने समोर आणले. तो मजकूर सांबाच्या फोटोसह त्या वृत्तपत्रात कव्हर स्टोरी म्हणून छापला गेला.

सांबाने या अवैध धंद्यात अनेक लोकांना गुंतऊन मजबूत गँग तयार केली होती. मोठ्या रकमेचं आमिष दाखवलं जात होतं. त्यामुळे भल्याभल्यांचे इमान विकत घेता येत होते. स्वस्त रकमेत गाई खरेदी करणे, त्यांना पश्चिम बंगालच्या जवळच्या पण बांगलादेश सीमेच्या जवळ आणणे, तिथून गाईंना अत्यंत निर्दयपणे क्रेनच्या मदतीने उचलून राज्याच्या सीमेपलिकडे फेकणे. तिथून कत्तलखान्यात नेऊन गोमांस तयार करणे असा क्रूरतेने बरबटलेला हा नापाक धंदा होता.

सांबा राजरोसपणे उजळ माथ्याने फिरत होता. विरोधी पक्ष ओरडत होता.पण हा राज्य सरकारला बदनाम करायचा विरोधकांचा कट आहे म्हणून परदा टाकला जात होता.

ज्या पत्रकाराने हा खुलासा केला त्या पत्रकाराच्या घरावर सांबाच्या गुंडांनी हल्ला केला. त्याची पत्नी–मुलं दयेची भीक मागू लागले. या हल्ल्यात पत्रकाराचे दोन्ही पाय अधू झाले. गुंडांनी पत्रकाराला बजावले.

"सांबा साहेब सज्जन आहेत. देवध्यानी आहेत. ते मंदिरात जाऊन अन्नदान करतात. त्यांची पुन्हा बदनामी करू नका. पुन्हा, असा अपराध केल्यास जिवाला मुकावं लागेल!" गुंडांनी बजावले.

पत्रकाराने पोलीस खात्यात सर्व वरिष्ठांकडे तक्रार केली. गृहखात्यालाही तक्रार पाठवली. छापलेला अंक पुरावा म्हणून जोडला. गृहखात्याकडून तपास युद्धपातळीवर सुरू असल्याचे पत्र आले. पत्रकाराला बरं वाटलं. त्याच्या आशा पल्लवीत झाल्या. पंधरा दिवसांनी दुसरे पत्र आले. त्यात लिहिलं होतं –

"पत्रकार साहेब,

स.न.

आपल्या पत्रानुसार पोलीस खात्याला चौकशीचे कठोर निर्देश दिले. आपल्या तक्रारीत लिहिल्यानुसार यात जराही तथ्य नसल्याचे निदर्शनास आले.

महोदय, प्राप्त माहितीनुसार श्री सांबा हे सत्ताधारी पक्षाचे ऊर्जावान युवानेते आहेत. त्यांनी अनेक मंदिरांना दान दिले आहे. गोर–गरीब, अंध–अपंगांना वस्त्रदान, अन्नदान केले आहे. आपण अशा उमेदीने सत्कार्य करणार्? ?या कर्तबगार नेत्याची प्रतिमा मलिन करू नये. यापुढे असे घडल्यास त्याचे गंभीर परिणाम आपणास भोगावे लागतील, याची आपण गांभिर्याने नोंद घ्यावी. कळावे.

गृह सचिव

राज्य सरकार"

लढाऊ बाण्याच्या झुंजार पत्रकारांनी सरकारी पत्र वाचून कपाळावर हात मारून घेतला ! थोर समाजसेवक सांबाचा गोरख धंदा अधिक जोमाने सुरू झाला. सांबाकडून राज्य सरकारच्या अनेक मंत्र्यांना–संत्र्यांना वजनदार पॅकेज पोहचत होतं.सुधीर सर्वोच्च स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झाला होता. त्याची केन्द्र सरकारच्या सीबीआय विभागात उच्चाधिकारी म्हणून निवड झाली होती. सुधीरच्या धमनीतलं तेजोष्ण रक्त हा अन्याय पाहून सळसळत होतं. राज्यसरकारच्या पोलीस खात्याचं सरकारीकरण होऊन ते षंढ झालं होतं.

सुधीर गावी आला होता. त्याला प्रयागने विचारलं –

"सुधीरऽ उन्मत्त सांबाचा कुणी बंदोबस्त करणार की नाही ?"

"प्रयागऽ, चिंता करू नकोस. काळ प्रत्येकाला कसोटी लावत असतो. !"

"पण कधी ? तो जनतेचा नि गोधनाचा शत्रू आहे."
"काळाने ठरवलं तर त्याचा बंदोबस्त आमचं खातंच करेल !" सुधीर म्हणाला.

"सुधीर मुख्यमंत्री मॅडमचा तो आवडता माणूस आहे. त्याच्यावर कोण हात टाकेल ? "

"काळ! तू फक्त बघ."

मुख्यमंत्री सुमित्रा मॅडमची राहणी, पेहराव साधा–सरळ आहे. या एका गुणामुळे जनतेला भुरळ पडली. त्यांना जनतेने सतत मुख्यमंत्रीपदी बसवलं. पण त्यांनी जनतेचा भ्रमनिरास केला. महागाई प्रचंड वाढली. कामशिनखोरीचा बाजार वाढला. नळ कनेक्शन घेणे,वीज मीटर बसवणे,बांधकाम परवानगी घेणे या गरजेच्या कामांसाठीही लोकांना कमिशन द्यावे लागले. मग अशी साधी मुख्यमंत्री काय कामाची असा जटिल प्रश्? ?न सामान्य जनतेला पडू लागला.

मॅडमच्या चंगळखोर राज्यात मंत्री मात्र चरबी चढल्याने मस्त झाले. अनेकांनी भरपूर माया जमवली. काहींच्या घरात नोटांचे ढीग सापडले. सरकार जनतेची सेवा करण्यासाठी असतं की गबर होण्यासाठी? असा प्रश्? ?न जो–तो विचारू लागला. नुकत्याच झालेल्या निवडणुकीत हे भ्रष्ट कमिशनखोर सरकार जाईल असं मतदारांना वाटत होतं. पण ते पुन्हा सत्तारूढ झाले. एक घटना मात्र चांगली घडली. यावेळी मजबूत लढाऊ विरोधी पक्ष निर्माण झाला. पण उन्मत्त, बेबंद सत्ताधार्? ?यांनी दहशत माजवली. ज्यांनी मतं दिली नाहीत त्यांच्या घरात शिरून सत्ताधारी गुंडांनी लूटपाट केली. अनेकांची घरं जाळली. अनेक लोकांनी शेजारच्या राज्यात आश्रय घेतला. अनेक माय–मावल्यांना आपली अब्रू राखता आली

नाही. इथल्या मतदारांना सरकारच्या नावावर महाकलंक असलेल्या अशा महाभ्रष्टांचा राग का येत नाही? याची चर्चा सुरु झाली. विरोधी पक्षाने राज्यपालांकडे तक्रार केली. राज्यात सरकार मृतप्राय आहे. गुंडांच्या टोळ्याच समांतर सरकार चालवत आहेत. हे जनकल्याण करणारे नव्हे धनसंचय करणारे वसुली सरकार आहे. सदर सरकार हे लोकांनी लोकांसाठी चालवलेले सरकार नसून गुंडांनी, माफियांनी, भेसळखोरांनी, तस्करांनी स्वतःच्या कल्याणासाठी चालवलेले सरकार असल्याची झोड वृत्तपत्रांनी व वृत्तवाहिन्यांनी उठवली. मुख्यमंत्री सुमित्रा मॅडम क्रोधाने संतप्त झाल्या.संतप्त होण्यात त्यांचा हातखंडा आहे. केन्द्रीय संस्था त्यांच्या भ्रष्ट लोकांचा तपास करू लागल्या तरी त्या संतप्त होतात. प्रधानमंत्र्यांवर वारेमाप आरोप करीत सुटतात.

मुख्यमंत्री मॅडमचा चेहरा नेहमी रागाने संतप्त असतो. फक्त निवडणुकीच्या काळात त्या स्वतःला खूप विनम्र असल्याचं दाखवतात. मुख्यमंत्री हा महामंत्र्यांपेक्षाही मोठा असतो असं त्या मानतात.त्यांच्या राज्यात कुणीच प्रचाराला येऊ नये असं त्यांना वाटतं.त्यांच्यावर बांगलादेशी घुसखोरांवर,रोहिंग्यांना अनुकंपा दाखवून नागरिकत्व द्यायचे आरोप झाले.मतांच्या डबुल्यासाठी नराधम राजकारणी कोणत्याही थराला जाऊ शकतात. जनरेटयामुळे, माध्यमं, विशेधीपक्ष यांच्या दबावामुळे महामहीम राष्ट्रपतींनी या जनद्रोही सरकारला बरखास्त केलं. राज्यात राष्ट्रपती राजवट लागू झाली. सुमित्रा मॅडमने सवयीप्रमाणे केन्द्र सरकारने लोकशाहीचा खून केल्याचा गलका केला. लोकशाही नावाचा हा विचित्र आरोप !

सीबीआयचे क्राईम इन्स्पेक्टर सुधीर यांच्याकडे गो तस्करीचा तपास आला. सांबाची पैसा कमवायची हाव वाढली होती, मुक्या गाईंना अवजड क्रेनच्या मदतीने राज्याच्या सीमेपलिकडे फेकतांना त्याला जराही लाजलज्जा वाटत नव्हती. या मलईदार धंद्यात तोंडाला चटक लागल्यामुळे तो स्वतःच महापशू झाला होता. मध्यरात्री हप्तेबाज पोलीस कर्मचारांच्या दिमतीत त्यांचा हा उद्योग चालायचा !सुधीरने मजबूत सापळा रचला. पुरेसा स्टाफ सोबत घेतला. सांबाच्या माणसांनी गाईला क्रेनला बांधताच सुधीरने ऑर्डर दिली!सांबा व त्याच्या साथीदारांना, हप्तेबाज पोलिसांना बेड्या ठोकल्या. दुसर्? ?या दिवशी कोर्टात नेण्यापूर्वी या कर्तबगार मंडळीला विविध कलमं लाऊन त्यांची मुख्य रस्त्यावरून वरात काढण्यात आली. सुधीरने घातलेली झडप अचूक होती.अपराध्यांचे त्राता हरवले होते.जनतेच्या तीक्ष्ण नजरेचे बाण अपराध्यांच्या सर्वांगाला टोचणारे होते. सांबा तोंड लपवत जड पावलांनी चालत होता! तिकडे ईडीलाही सांबाच्या अनेक घरांच्या छाप्यात नोटांचा मोठा ढीग हस्तगत झाला होता. हा जनतेच्या घामातून लुटलेला हरामाचा पैसा आहे! असं घरांच्या भिंती ओरडून ओरडून सांगत होत्या ! हरामाचा पैसा !!

**– डी. बी. जगतपुरिया**
**मो. ९८६०४८५३९८**
**'संगर', पाण्याच्या टाकीजवळ,**
**मीरानगर, पडेगांव, औरंगाबाद – ४३१००२**

■■■




# भैरव भेळ

**आमच्याकडे उत्तम प्रकारची चविष्ट, चटकदार भेळ मिळेल.**

**शॉप नं. १, मरेचाळ, प्लॉट नं. १३, सर्व्हे नं. ८८/४, गुजरात कॉलनी, कोथरूड, पुणे–४११ ०३८**

**प्रोप्रा :**
**रविंद्र सोंडकर, मो. ९९२२५५८४१७**
**अथर्व सोंडकर, मो. ९९२१५३४२४१**

कथा



# धुरपाई

आर.डी.शिंदे

वडिलाची आई – माझी आजी धुरपाई : मोठ्या म्हणजे माझ्या आजोबापेक्षा देखणी अति उंच गोरीगोमटी, सडपातळ, काटक. तिन्ह्याच्या दक्षिण भागातील पाथरी हे तिच माहेर...लांबून नात निघाल्यान दक्षिण सोलापूर तालुक्यातील कंदलगाव इथ लग्न झालेलं. घरी गाई म्हशी बैलबारदाना – खाण्यापिण्याची दुध दही तुपाची चंगळ होती .तिला दोन मुल तीन मुली होत्या. माझे वडील हिरा आत्यानंतर जन्मले. साहजिकच त्यांना सर्वांच प्रेम माया मिळाली .पैलवान फिका पडावा असा बांधा. दुधातुपाच्या माऱ्यात ते शुध्द शाकाहारी झाले .धाकटा भाऊ खुनशी –दोघांच शेवट पर्यंत कधीच जमल नाही बघता दोघांचा संसार फुलत गेला .सततची भांडण किरकिरीन आई वडील सोलापूरला निघून गेले . मी मात्र शिक्षणासाठी गावीच राहिलो .

एकदा बडची कर्नाटक कडील काही मंडळी यल्लाम्माचा झगा घेऊन आली त्यांचा मुक्काम घराजवळच होता .त्यातली एक गोरी

गोमटी युरोपियन बायका फिक्या पडाव्यात अशी रूपवान कासावा होती.कुरूप आजोबाच्या नजरेत ती अडकली .भाळली .. फसली . झग्यासोबत आलेले लोक महिनाभर राहून कमाई करून निघून गेले.कासावा गेली नाही.इथच राहिली.कुटुंबात एका जोगतीनीची भर पडली ..आजोबांन तिची वेगळी राहण्याची सोय केली . साऱ्या गावात चर्चेचा कुतूहालाचा विषय.. साडीन गुंडाळलेला भला मोठा झगा..झग्यात देवीचा पितळी झग्या भोवती वरती पितळी शेम्ब्या ..साताठ गाणारी – झगा घेऊन नाचणारी मंडळी तिचा आवाज चांगला होता, चवंडक वाजविण्यात तिचा हातखंडा आवाज कमी जास्त करण चवंडक्याच्या ठेक्यात सामुहिक यल्लाम्माची गाणी म्हणत ती वेगळ्याच दुनियेत गुंगून जाई.

जात्यावर भविष्य सांगण्यात ती एक्स्पर्ट होती. जात्याचा वरील भाग उभा ठेऊन उजवीकडून डावीकडे – डावीकडून उजवीकडे फिरवी..जात फिरल कि भूतबाधा नाही अन जड झाल कि....

समोर ओढा कसही ... शक्तीनिशी फिरवा जात हलत नसल्यास या वेळी करणी – भूतबाधा हमखास प्रत्येक वेळी " होगु होगु निन्न मनिगे होगु "तुझ्या घरी जा नाहीतर पुटपुटत–जात्याच्या पाया पडण त्रागा करण कानडीतून भुताला शिव्या देण ..जमिनीवर हात आपटू सराप देण.. मोकळे केस.. सैल अंगान अंह अंह करत घुमण.. ती स्थूल होती,सहसा उठून न बसणाऱ्या कासाव्वा आईला हे मी नेहमी कुतूहलान पाहत होतो .समोरच्या परडीत

चोळीच्या खणात लपेटलेला देवीचा मुखवटा ..मागे मोर पिसं सुटी नाणी ..धान्य पीठ .. खारीक खोबर आणि बरच कांही या वेळचा रणरागीनीतील भेसूर अवतार गळ्यात कवड्याची माळ ..कपाळभर लावलेली हळद ..विजलेल्या सुम्बाचा उग्र वास धूर धडकी भरवणारा होता ..तिला शांत करण्यासाठी कुणीतरी पाण्यात बुडविलेला लिंबू डोळ्यावरून फिरवी .. पुन्हा पूर्व पदावर येई . भुताचा शिदा त्यात हळद कुंकू –नारळ –ओटीच सामान –: नैवेद आदीचा भरणा असे .या वस्तू लांब कुठेतरी अंधारात कुणाला न दिसलं असं झुडुपाच्या मागे १. उतरून टाक .उतारा आल्यासच काहीही देवाचरणी परडीत टाक,भल होईल म्हणायला विसरत नसे

...गुण येत असल्यान घर सतत भरलेल राही.तिला बक्कळ पैसा कोरडा शिदा भरपूर मिळू लागला .नारळ तर पोत्यांनी ...सतत पान खात असल्यान तिच तोंड नेहमी रंगलेलं दिसे. पानाची चंची ती डाव्या बाजूच्या बगलेत चोळीत झापून ठेवी.

शेवटी सवत ही सवतच असते. वल्लच्या फांदीला आग लावणा–या कासावाला धुरपाई खूप भीत होती .जाता येता तिला घालून पाडून बोलणं शिव्या देणं बोंबा मारणं – बडवून घेणं या कालव्यात मी कावरा बावरा होई .एकदा आजोबां आणि त्यांच्या मित्रमंडळीनी मिळून चारपाच बैलगाड्या केल्या आणि आम्ही दक्षिण तालुका सोलापूर हत्तरसंग कुडल जिथं सीना आणि भीमा नद्याचा संगम होतो ते ठिकाण सोलापूर – कर्नाटकच्या सीमेलगत कुडलसंगम म्हणून प्रसिध्द आहे . हे हेमाडपंथी मंदिर लिंगायत समाजाचं काय समंध महाराष्ट्र – कर्नाटकातील भाविकांचे श्रध्दास्थान.. तिथ निघालो .बैलगाडीत बसून कंठाळा आल्यानं धुरपाई ढांगा टाकत अनवाणी चालू लागली .सतत अनवाणी चालल्यान तिच्या पायाचे तळवे जणू गेंड्याची कातडीच फुफुटयातून चालताना अचानक तिच्या पायात काटा घुसला पावलागणिक वेदना झाल्या तरी ती कुनाजवळ बोलली नाही मात्र लंगडत होती. एक रात्र काढून गावी आलो.पायात रुतलेला काटा काढण्याचा प्रयत्न मी खूपवेळा केला दररोज तिचा पाय टोकारोत होतो पण काटा काहीकेल्या निघत नव्हता. तशात रोजच्या कामात ती कंठाळत नव्हती .तीन महिन्यात पायात काटा तसाच .एकदा तळवा सुजला–पाणी येऊ लागलं मी प्रयत करतच होतो .दोन्ही अंगठ्यांनी फोडाला दाबताच भस्कन काटा बाहेर निघाला काटा जाड टोकदार काळा करंगळी एव्हडा होता .काटा निघताच धुरपाईन चक्क माझे पाय धरले.

पाया पडण्यावरून आठवलं ..तिच्या सोबत रस्त्यातून जाताना कुठलाही पुरुष दिसला कि " पाया पडते जी " हे चक्र दिवसभर चालू. मला राग येत होता पण तिला सांगायला धाडस कधी झाल नाही .धाकटया कामतीत धुरपाईच्या नात्याात थोरली बहिण सखुला दिल होत .कांही दिवसातच तिला सासुरवास सुरु झाला .सर्वजन वैतागले. धुरपाईसोबत मीही निघालो .तिथ गेलो .पाहतो तर काय एका कोप–यात सखू अवघडून बसलेली, बघताच रडायला लागली .मीही तिच्या सोबत ओक्साबोक्सी रडलो . धुरपाईन नाही नाही त्या शिव्या सराप दिला उपयोग झाला नाही .भल्या पहाटे गावाकडे निघालो .आता सूर्य बराच वर आलेला रस्त्याात धूरपाईच पाया पडते जी –रडण– कोरवली येईपर्यंत चालूच होत.कुणी विचारलं तर ती रडत म्हणे, " काय करू नात जावई मेला आताच माती लोटून गावाकडे निघाले ... रस्त्यात कडेला कोरवलीत एक मळा दिसला .तिथ घर बैल बारदाना पुष्कळ... माणसं कामाला लागली होती . " पोरगं भुक्याजलय भाकरी चटणी असलं तर ध्या " एका बाईला धुरपाईन विनंती केली .ती दयाळू होती .तीन चारपाच भाकरी भाजी दिली .झाडाखाली ढेकळात बसून खाताना हायस वाटल .मोट चालू होती .पाटाच थंड पाणी पिऊन आभार मानून गावाकडे निघताना मी खूष झालो कारण कंदलगाव हाकेच्या अंतरावर होत .

यात बरेच दिवस गेले. सर्व समान घेऊन कासावा बडचीला निघून गेली. विना आत्या मेली .नारळाच्या ढीग यात तिला जाळलं. दरम्यानच्या काळात मला नोकरी लागली,लग्न झालं,मूल झाली .चुलता अचानक कुटुंबासह धुळ्याकडे निघून गेला. आजोबा आजी एकाकी पडल्या त्यांना सोलापूरला आणलं .

धुरपाई सुनेला म्हणजे माझ्या आईला खूप घाबरत होती ती खादाड असल्यान तिला भूक सहन होत नव्हती.....पत्नीचा दोघही खूप लाड करायचे.आई बेरकी ..कुणालाही घरकामात मदत करू देत नव्हती.साहजिकच दोन्ही वेळेचा भला मोठा स्वयपाक तोही चुलीवर ..बहिणीची वेणीफणी ...शाळा हिच्याकडेच पत्नीला होणारा जाच त्रास आजोबा आजीला मुळीच आवडत नव्हता ते बहिणींना

शिवीगाळ करायचे.सुनीता दोघांची लाडकी.आई कुठे बाहेर गेली कि सुनिताकडून एक भाकर घेऊन धुरपाई झटक्यात फस्त करी .ऑफीसला जाताना हे आण ते आण सांगायला विसरत नसे .मी लाड पुरवायचो .तिच खाण मला माहित होत .गावी असताना अंबाड्याच्या भाजीचा भला मोठा गोळा .. सोबतीला घासागणिक हिरव्या मिरच्या अन चतकोर भाकर खाताना मी तिला कित्येक वेळा पाहिलं आहे .मटन प्राणप्रिय..वयमानपरत्वे मोठ्या(आजोबा) शक्तिहीन झाले. लघवीच्या आजाराने हैराण झाले .केलेले उपाय वाया गेले .त्यातच मेले .मोठयाच्या जाण्यानं धुरपाई खचली .खंगली .खच्चून खाणाऱ्या धुरपाईन अन्न पाणी सोडल.मरायला टेकली .त्यातच मेली .

तिच्या मरणाचा किस्सा अजब जादुही खजील व्हावा तसा ..हा हा म्हणता गावोगावी निरोप गेला ..सर्व गोतावळा ..शेजारी जमा झाले .. घरातील रडण बोंबा ठोकणं कुणीही थांबवू शकलं नाही अनोळखी परके सुद्धा ओक्सा बोकशी रडावेत अशा गुणगान करत विशिष्ठ हेलात रडणारे नातेवाईक..हारतुरे गाडा मयतीच सामान सुद्धा आलच.गरम पाणी तयार होत..बायकांनी चादरीचा गोल पडदा केला धुरपाईची अंघोळ झाली .हिरवं लुगड वरून पांढर कापड हार तुऱ्यांनी ताटी सजली .. काय झालं कुणास ठाऊक धुरपाईन चक्क डोळे उघडले .बोलू लागली बांधलेल्या सुतळ्या तोडत उठून बसलीही ..जमलेल्या लोकात कुजबुज सुरु झाली .हा दैवी चमत्कार वाऱ्यासारखा पसरला आलेले नातेवाईक हसत –आनंदात आपापल्या गावी निघून गेले .धुरपाई एक वर्ष तरी खातपीत नातवंड– परतुंन्डात रमली .मरण कुणाला चुकलंय ?दुसऱ्या वर्षीही ती पुन्हा मेली..आलेले पै पाहुणे शेजारीपाजाऱ्याच्या साक्षीनं पुन्हा एकदा जिवंत झाली

( या वेळी कुणीतरी तिच्यावरून कोंबडी उतरून टाकली ) जगली .हा निसर्गाचा न उलघडणारा उलटा फेरा यमालाच माहित ..तिसऱ्यांदा मात्र यम पूर्व तयारीनिशी आला असावा. धुरपाई मेली ती कायमचीच .... तिसऱ्या मरणाची हॅट्रीक न करता .धन्य ती धुरपाई |

– आर.डी.शिंदे
४०१ लिजंड-प्रेस्टीज क्रोम जवळ,
बी.टी.कवडे रोड, सोलापूर हायवे ४११ ०१३
मोबा. : ९०११६७२०९९

■■■




Prop. :
**Kumar Satish Bagade,**
Managing Director
Mob. : 9359500500

Bagade Jewellers
88, Gujrat Colony, Saraaj Bazar
Kothrud, Pune-411 038
bagadejewellerspune.com
bagadejewellers_pune

कथा

# बंगाली काळी जादू

श्री.एकनाथ गायकवाड



संपूर्ण गाव टग्यांचं.पंचक्रोशीत कोण गावाच्या वाटेला जात नव्हतं. गावात मुसलमानाचं एकच घर. पण तरीसुद्धा सगळे गावटगी हुसेनभईला टरकून असायचे. आणि याचं कारण म्हणजे हुसेन भई बद्दलच्या वेगवेगळ्या बोलवा, दंतकथा. तो चेटूक करतो, करणी करतो .चिखलाचा,लाकडाचा रेडा तयार करून त्याला छोटा नांगर ओढायला लावतो.वांग्याच्या देठाला बैलगाडीचे चाक लटकवतो. अशा सांगोवांगीच्या अनेक कथा माणसं सांगायची.

आपण एकविसाव्या शतकात जरी वावरत असलो, तरी अजूनही आपल्या मनातून या अंधश्रद्धा जाता जात नाहीत. कोणत्याही गोष्टींची मीमांसा होत नाही.वैज्ञानिक सत्य जाणलं जात नाही. तर याउलट जादूचे प्रयोग थेटरला तिकिटावर लावले जातात .आणि त्यांचे कार्यक्रम तुफान गर्दी खेचतात. अगदी विज्ञानाचे पदवीधर ही बाबा,बुवा,भगत यांच्या भजनी लागलेले दिसतात. चमत्काराशिवाय नमस्कार नाही असे म्हटले जाते.आणि म्हणून चमत्कार करणारे हे लोकांचे श्रद्धास्थान बनतात.

पूर्वी लग्नसमारंभात वराती समोर लेझीम पथकाचा खेळ रंगायचा. गावोगावच्या पथकांमध्ये चुरशीचे सामने हि व्हायचे. आमच्या गावचे लेझीम पथक ही सर्वत्र मशहूर होते.जिथे जाईल त्या गावच्या पथकाला हरवून यायचे,याचं एक कारण सांगितले जाते. हे पथक हुसेनभईला आपल्या सोबत घेऊन जात असे. असे सांगतात की

म्हातारा हुसेनभई परगावच्या पथकाचा डाव रंगात आला की आपली दाढी पिरगळायचा. दाढीचे केस चावायचा.आणि मनातल्या मनात काहीतरी मंत्र पुटपुटायचा.प्रतिस्पर्धी पथकातील वाजवणाराची हलगीचं नेमकी फुटायची.आणि खेळाचा बेरंग व्हायचा. आणि आमच्या गावच्या लेझीम पथकाचा डाव असा रंगायचा,इतका रंगायचा की त्या गावातले पाहणारे लोक उत्स्फूर्तपणे, लेझीम पथकावर गुलाल आणि चुरमुरे उधळायचे.

विट्याचा बयाजी पोतराज वरचेवर आमच्या गावी यायचा. हलगी वाजवत ओव्या म्हणत लक्ष्मी देवीच्या नावाने धान्य,पैसे गोळा करायचा. त्यामुळे तो साऱ्यांच्या परिचयाचा झाला होता. त्याची आणि हुसेनभईची पण चांगली दोस्ती जुळली होती.कारण त्यालाही जादूची काळी विद्या शिकण्याची आवड होती. हुसेनभईने त्याला थोडीफार विद्या शिकवली होती म्हणतात.हुसेनभई सहसा कुणाला ती जादूची विद्या शिकवत नव्हते.कारण बरेच वेळा ही विद्या शिकणारा माणूस त्यांच्यावरच ती विद्या उलटून मृत्यू पावतो,असेही म्हटले जाते.

आता गावोगावी मनोरंजनाची भरपूर साधने उपलब्ध आहेत.पण पूर्वी काही फिरस्ते लोक कधी कधी यायचे.आणि लोकांचे मनोरंजन करायचे. त्यामध्ये डोंबरी, बहुरूपी, तुंबडी वाले,वाघ्या मुरळी, जोगती,असे काही लोक कलाकार असायचे. त्यापैकीच एक म्हणजे गारुडी. त्याच्याजवळ असणाऱ्या पेटाऱ्यात भलेमोठे नाग ठेवलेले असायचे .आणि त्यां नागांना ते पुंगीच्या साह्याने डोलायला लावायचे .तसेच ते छोटे छोटे जादूचे प्रयोग करायचे. असाच एकदा गारुडयाचा खेळ रंगात आला होता. आणि तो खेळ पाहायला हुसेन भई आणि बयाजी पोतराज पण आले होते. आणि बयाजीने आपल्या अल्पस्वल्प जादूचा प्रयोग करून गारुड्याची पुंगी वाजायची बंद केली .मग मात्र त्या गारोड्याने थयथयाट करायला सुरुवात केली. खेळात व्यत्यय आणणाऱ्याने समोर यावे.असे आव्हान दिले.शिव्या घालायला सुरुवात केली. पेटाऱ्यातील एकाहून एक अस्सल असणाऱ्या जनावरांना हातात घेऊन तो लोकांच्या दिशेने येऊ लागला.अर्थात त्यांचे दात अगोदर पडलेले असतात.पण सामान्य माणसांना या गोष्टीची कल्पना नसल्यामुळे लोक घाबरून पाठी मागे सरकू लागले.गारुड्याचा तो रुद्रावतार लोकांच्या मनात धडकी भरवू लागला .आणि मग थोड्यावेळाने बयाजी पोतराज आणि त्या गारुडयांमध्ये जादूचा सामना सुरू झाला. डाव प्रतिडाव पडू लागले.एक तर वेळ अशी आली की बयाजी जमिनीवर गडबडा लोळू लागला.

पाहणारी माणसं म्हणून लागली आज पोतराजाचं काही खरं नाही.आता हा गारोडी याला जिवंत सोडणार नाही. पण

पोतराजाचा पाठीराखा असणाऱ्या हुसेनभईने आपली दाढी पिरगळून दातात पकडली.मनातल्या मनात पुटपुटायला सुरुवात केली. आणि बयाजी लोळायचा थांबला.उलट गारोडी जमिनीवर लोळू लागला. त्याच्या तोंडातून रक्त पडू लागले.असा सगळा हा जादूचा असंर चालू होता. गारोड्याने ओळखले, समोरचा प्रतिस्पर्धी जरी काळ्या विद्येत कच्चा असला, तरी त्याचा कोणी तरी पाठीराखा गुरु इथेच कुठेतरी गर्दीत बसलेला आहे. आणि तो या क्षेत्रात आपणाला वरचढ ठरणार आहे .आणि त्या गारोड्याने हात जोडले. तो म्हणाला," गरिबाच्या पाठीवर मारा, पण पोटावर मारू नका. मी हात जोडतो.पाया पडतो.मला माझा पोटापाण्याचा धंदा करू द्या."मग पुन्हा सगळं वातावरण पुर्ववत झालं. त्या गारुड्याची स्थितीही पूर्ववत झाली. पुंगी चा आवाज ही पुन्हा सुरू झाला.

एका चिनी लोक कथेतही काळ्या जादूचा उल्लेख आलेला आहे.लाकडी पूल हॉटेल नावाच्या हॉटेलची मालकीण जादूगार होती. त्यावेळी परदेशातून चीनच्या दिशेने जाणारे व्यापारी, आपल्या नोकर-चाकरांसह त्या हॉटेलात मुक्कामाला थांबायचे. त्यांच्या जेवणाखाण्याची सोय ती मालकीण करायची.पण तिचे स्वयंपाक घर म्हणजे जादूची खोली होती.ती एकटीच त्या ठिकाणी जायची. त्या खोलीत जाऊन छोट्या लाकडी बैलांना छोटा नांगर जुंपायची. खोलीतील थोडी जमीन वापरात आणून ती गहू पेरायची. उगवलेल्या गव्हापासून पीठ तयार करायची. त्यापासून चपात्या बनवायची .हे सगळे जादूच्या साह्याने घटका भरत ती पूर्ण करायची. सर्व लोकांची ती एकत्रित पंगत बसवायची. पंक्तीत जेवणाऱ्या लोकांना त्या तयार केलेल्या चपात्या वाढायची.लोकांनी चपाती खाल्यानंतर त्यांचे गाढवात रूपांतर व्हायचे.आणि त्या गाढवांची पुन्हा ती विक्री इतरत्र जाऊन करायची. पण तिचे हे कृत्य, चाऊ नावाच्या एका मोठया व्यापाऱ्याच्या नोकराणीने चोरुन पाहिले. आणि तिने युक्ती केली. तिने आपल्या जवळच्या चपात्या आपल्या मालकाच्या, म्हणजे चाऊच्या ताटात, हॉटेल मालकिणीच्या नकळत ठेवल्या. आणि त्याच वेळी ती उठुन बाहेर गेली. जाताना तिने जादूच्या चपात्या सोबत घेतल्या आणि हॉटेल मालकिणीच्या जेवणाच्या डब्यातील चपात्या काढून घेऊन त्या ठिकाणी त्या ठेवल्या. व ती परत येऊन जेवायला बसली. सर्वांचे जेवण होत आल्याचे पाहून हॉटेल मालकीन जेवायला गेली.तीने तिच्या डब्यातील जेवण खाताच तिचे गाढवीत रुपांतर झाले.अशा तऱ्हेने नोकराणीच्या चतुरपणा मुळे चाऊचा जीव वाचला.त्या दोघांनी इतर गाढवा सोबतच गाढवीत रूपांतर झालेल्या,हॉटेल मालकिणीचा ही सौदा केला.नंतर दोघांनी लग्न करून सुखाने संसार केला.

आणखी एक सांगी-वांगीची गोष्ट. एका आटपाट नगरातील विद्वान भरपूर ज्ञान मिळवायचे या उद्देशाने घराबाहेर पडला .त्याने देशभ्रमण करायला सुरुवात केली. वेगवेगळ्या प्रदेशातील विद्वानांच्या संपर्कात गेला. फिरत फिरत बंगाल प्रांतात जाऊन पोहोचला. पण तिथे गेल्यावर मात्र त्याची गृहदशाच बदलली.तो एका बंगाली विद्या जाणाऱ्या, चेटूक करणाऱ्या स्त्रीच्या संपर्कात आला. दोघांचे मेतकुट जमले. त्यातून त्यांनी लग्न केले. आणि ज्ञानप्राप्तीचा उद्योग अर्ध्यावर सोडून ते आपल्या नगरात परत आले .नवीन संसार सुरु झाला . नव्या नवलाईचे चार महिने संपले . आणि दोघांच्यामध्ये कुरबुरीला सुरुवात झाली. त्याचा परिणाम असा झाला, की तो

नेहमी आनंदित हसरा असा असणारा विद्वान. तो निराशाग्रस्त झाला. अगदी खंगल्यासारखा दिसू लागला. दिवसभरातला बराचसा काळ बाहेर घालवू लागला. निराशाग्रस्त माणसे शक्यतो दोन पर्याय निवडतात. एक तर आत्महत्या तरी करतात.किंवा बाबा,बुवा,फकीर यांच्या भजनी लागतात.मंदिराचा आश्रय घेतात.त्याप्रमाणे तो माणूस गावातील शंकराच्या मंदिरात फिरत फिरत गेला. तिथे एक संन्यासी आला होता .त्या संन्याशाच्या पायावर त्याने डोके टेकवले.आणि तो रडू लागला. संन्याशाने त्याला उठवले. आणि रडण्याचे कारण विचारले. त्याने कारण सांगताच,संन्याशी म्हणाला," बाबा रे संसार हेच दुःखमूळ आहे. "

हे महाराज मग मी काय करू?"

तुला काय करावं वाटतं?"

" मला तुमच्यासोबत यावं वाटतं."

"आणि तुझा प्रपंच, घरदार?"

"सगळं सोडावं वाटतंय."

" तसं तुला करता येणार नाही.

का?"

संन्यास हा विनापाश व्यक्तीने घ्यायचा असतो. तुझं लग्न झालेलं आहे. बायको आहे. "

तिच्यापासून दूर जाण्यासाठी तरी मी धडपडतोय."

" का बरे?"

तिनेच तर धमकी दिली आहे.

कोणती धमकी?"

"हिच की तिचं मी सारे काही ऐकलं पाहिजे, नाहीतर माझं ती मांजर बनवणार.

"मग त्यात काय झालं? बाहेर वाघासारखे वावरणारे सगळेच नवरे घरी मांजर बनून राहतात. "

"ते वेगळं,पण ती मला खरोखरच मांजर बनवण्याची धमकी देते. तिला बंगाली विद्या येते.

अरेरे! प्रकरण फार अवघड आहे म्हणायचं?"

हो म्हणून तर भीती वाटते . "

"पण मला एक कळेना ही बंगाल प्रांतातली बाई तुझ्या घरी कशी काय आली?"

" ती कुठली येते,मीच बंगाल प्रांतात जाऊन ती ब्याद मागे लावून घेतली. आणि आता पस्तावतोय."

"हा असा सारा मामला आहे तर!"

पुढे काय करायचं, सांगा."

"सोपं आहे मला एक सांग, तू आजारी पडल्यावर काय करतोस?"

डॉक्टर कडे जातो."

डॉक्टर काय करतो?"

" औषध देतो.

"न तपासता देतो ?"

"नाही तपासून देतो."

बरोबर आहे, रोग निदान करून, आजाराचे मूळ शोधून औषध देतो. आता या तुझ्या आजारावरचं मूळ तर सापडलं."

"काय मूळ सापडलं? आणि या आजाराच्या मुळाचा आणि माझ्या घरगुती प्रकरणाचा काय संबंध येतोय?"

अरे मुळापर्यंत गेलं तर उत्तर मिळणारच की."

"ते कसं काय?"

हे बघ ही बाई तू बंगाल प्रांतातून घेऊन आलास. बरोबर आहे ना ?"

"होय."

"मग त्या प्रांतात हिच्यापेक्षा जादा विद्या जाणारी एखादी बाई असणारच की."

"होय मग "

"अरे मग काय . या पहिलीला न समजता गुपचूप जा बंगालला. आणि हिच्यापेक्षा वरचढ ठरणारी बाई घेऊन यायचं. आहे काय

त्यात अवघड.

पण एखादी सापडेल का तशी पॉवरची एखादी जादूगारीण . "

"प्रयत्न तर करून बघ. हा फक्त एक लक्षात ठेव. परत आल्यानंतर अगोदर माझ्याशी सल्ला मसलत करायला विसरू नकोस." "ठीक आहे खूप उपकार झाले तुमचे."

असे म्हणून त्याने संन्याशाचे पुन्हा दर्शन घेतलं.आणि लवकरच घरातील स्त्रीला न सांगताच बंगालला निघून जाण्याचं ठरवले.

एक-दोन दिवसांतच तो न सांगता घरातून बाहेर पडला. प्रवास करत करत बंगाल प्रांतात गेला. त्याला पहिल्या स्त्री पेक्षा वरचढ ठरणारी स्त्री भेटली. त्याने आपले बंगाल प्रांतात येण्याचे कारण त्या स्त्रीला सांगितले. ती म्हटली," एवढेच ना? मग काय घाबरायचं कारण नाही. तुम्ही एकच गोष्ट करा करायची. आम्ही दोघी समोरासमोर जवळ आलो की, आमच्या दोघींच्या अंगावर हे मंत्रभारीत काळे तीळ टाकायचे." असे म्हणून तिने तिळाची पुडी त्याच्या हाती दिली." मग त्याने काय होणार ?" पुडी खिशात ठेवून त्याने विचारले. "आमच्या दोघींचं घारीत रूपांतर होणार."

मग पुढे काय करायचं?"

" लक्षात ठेवा मी पांढरी घार होईन, आणि तिचे रूपांतर काळ्या घारीत होईल

"त्यामुळे काय होणार? ती उडून जाणार काय?"

" तिला तसं जाऊ द्यायचं नाही . "

"मग काय करायचं ?"

"काठी घ्यायची आणि त्या काळंद्रिला मारून टाकायचं . "

"ठीक आहे, तसेच करेन."

हा पण लक्षात ठेवायचं काठीचा फटका काळ्या रंगाच्या घारीलाच द्यायचा. नाहीतर पांढरी घार, म्हणजे मलाच मारून टाकाल आणि पुन्हा तिच्या तावडीत सापडाल."

नाही नाही तसं होणार नाही. नेमकं त्या काळ्या घारीचाच


शुभ दीपावली
सर्वांना दीपावली
निमित्त आपुलकीच्या
आणि मंगलमय शुभेच्छा !
श्री.शंकर हिरामण मांडेकर
आमदार भोर-राजगड-मुळशी विधानसभा
/Shankarmandekar




."नक्षत्रांची करीत उधळण, दीपावली ही आली..
नवस्वप्नांची करीत पखरण, दीपावली ही आली..
सदिच्छांचे पुष्पे घेउनी, दीपावली ही आली..
शुभेच्छांचे गुच्छ घेउनी, दीपावली ही आली..
दीपावलीच्या तेजोमयी शुभेच्छा!!!"
सर्व नागरिकांना..
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
दिवाळीच्या या शुभ समयी जग डुलते आनंदात..
झळाळती लक्ष ज्योती..घरी दारी आंगणात
श्री. दादाराम मनोहर मांडेकर
सदस्य : मुळशी कृषीउत्पन्न बाजार समिती
सौ. मीनाताई दादाराम मांडेकर
मा.सरपंच : चांदे, ता.मुळशी, जि.पुणे




सर्व नागरिकांना
दिपावली
निमित्त हार्दिक शुभेच्छा
॥ विद्या परम देवतम ॥
कोराईगड शिक्षण संस्था संचालित
सोनु अनाजी वाळंज माध्यमिक विद्यालय
आंबवणे, ता.मुळशी, जि.पुणे
श्री. नंदकुमार सोनू वाळंज
संस्थापक अध्यक्ष - कोराईगड शिक्षण संस्था, आंबवणे
अध्यक्ष - मावळ वार्ता फाऊंडेशन
विश्वस्त - लोणावळा कॉलेज
✼ शाळेची वैशिष्ट्ये ✼
✼ ISO मानांकन २०१५
✼ उत्कृष्ट निकालाची २२ वर्षाची परंपरा
✼ उच्चशिक्षित - प्रशिक्षित शिक्षकवर्ग
✼ अद्यावत विज्ञान व संगणक कक्ष
✼ शालेय उपक्रमांचा भरीव सहभाग
✼ गरजु विद्यार्थ्यांना अर्थिक हातभार
✼ ई लर्निंग सुविधा
✼ समाजातील नावलौकिक व्यक्तिंचा गौरव
✼ साहित्य अकादमी पुणे यांसकडुन गौरव
✼ भारती विद्यापीठ पुणे ग्रीन स्कुल अवार्ड
✼ निसर्गरम्य परिसर
✼ सर्व सुविधायुक्त इमारत
✼ संपर्क ✼
श्री.भटू देवरे मुख्याध्यापक
श्री.गणपत मेंगडे खजिनदार
श्री. किसन गोरे सचिव
श्री. विनय विद्वांस उपाध्यक्ष
सौ.वत्सलाताई वाळंज
सदस्या - कोराईगड शिक्षण संस्था, आंबवणे
मा. अध्यक्ष - लायन्स क्लब ऑफ लोणावळा खंडाळा




Canary Islands
RESORT & SPA
श्री. मिलिंद नंदकुमार वाळंज
चेअरमन - कॅनरी आयलॅन्ड



पुन्हा एक नवे वर्ष, पुन्हा एक नवी आशा,
तुमच्या कर्तुत्वाला पुन्हा एक नवी दिशा
नवे स्वप्न, नवे क्षितीज, सोबत माझ्या
दिवाळी आणि नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा...!!!
आपणा सर्वांना..
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
श्री.अंकुश वाशिवले
मा.सरपंच बार्पे-तिस्करी ग्रामपंचायत,
मुळशी,पुणे
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार
सौ.कोमलताई गणेश वाशिवले
मा.सभापती पंचायत समिती,मुळशी,पुणे



॥ श्री.म्हसोबा,भैरवनाथ,काळूबाई,शंकर मंदिर ट्रस्ट ॥
मु.खारावडे,ता.मुळशी,जि.पुणे
।।म्हसोबायै नम।।।
रजि.नं.ए-२०८९
आपणा सर्वांना
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
म्हसोबा
सर्वत्र प्रेमाचा सुगंध पसरला
आनंदाचा दिवस आला
एकच देवाकडे प्रार्थना,
सुख-समृद्धी लाभूदे तुम्हाला
दीपावलीच्या मनःपूर्वक शुभेच्छा!!!"
आपणा सर्वांच्या सहकार्याने..
पूर्णत्वाकडे संकल्पाची वाटचाल...
श्री.म्हसोबा दर्शनसाठी वेबसाईट पहा- www.mhasobakharawade.org
श्री.म्हसोबा मंदिर खारावडे येथे भाविकांची /देणगीदारांची मदत स्विकारली जाईल


सर्व नागरिकांना
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
लक्ष लक्ष दिव्यांनी उजळुन निघो
ही निशा घेऊनि येवो नवी उमेद नवी आशा,
सोबत आमच्या लक्ष लक्ष शुभेच्छा!
मा.श्री.शांतारामदादा इंगवले
माजी गटनेते-जिल्हा परिषद, पुणे


शुभ दीपावली
ही दिवाळी
तुम्हा सर्वांना लाभदायक
व आरोग्यी जावो
ह्याच शुभेच्छा !
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार
Our Venture
ARNAVEE ENTERPRISES
MARUNJI
COTTONAVENUE
MARUNJI
Pearl RESORT
ROYAL
NETWORK SERVICES
THE PROPERTY GROUP
श्री. समिर पांडुरंग बुचडे
(अध्यक्ष, राष्ट्रवादी युवक काँग्रेस मुळशी तालुका)
सौ. पुनम समिर बुचडे
(मा.सरपंच, ग्रामपंचायत मारुंजी)
पारंपारिक शुभ कार्ये फक्त इथेच साजरी होतात!!!
॥ढेपेवाडा॥®
भारतीय संस्कृतीचा एक अनमोल वारसा!!!
सहकुटुंब वास्तव्यासाठी आणि सहलींसाठी
तसेच साखरपुडा, लग्न, मुंज, वाढदिवस, स्नेहसंमेलने इ.
कौटुंबिक कार्ये आणि दिवाळी, भाऊबीज इत्यादी सण
पारंपारिक पद्धतीने साजरे करण्यासाठी उत्तम ठिकाण!!!
पुणे ऑफिस: चंद्रशील लँडमार्कस्, २-योगेश्वरी सोसायटी, मेंहदळे गॅरेज रोड, एरंडवणे, पुणे-४११००४ • वेळ: स.१० ते सायं.६ वा.
फोन: ९८२२६४०५९९ , ९७६३२७६२३२ • Email: dhepewada@gmail.com • www.dhepewada.com


सर्व नागरिकांना
शुभ दिपावली
समाजाभिमुख,लोकप्रिय व झुंजार नेता..
मा.श्री.शरदभाऊ ढमाले
माजी आमदार-मुळशी-हवेली विधानसभा
सदस्य- महाराष्ट्र राज्य भाजपा कार्यकरणी
तुमच्यासोबत सदैव असो आनंद,कधी न होवो निराशा
आम्हा सगळ्यांकडून, दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
शुभेच्छुक,
श्री.अनिकेत प्रभाकर ढमाले
सरचिटणीस : भा.ज.पा. युवा मोर्चा, पुणे जिल्हा

निकाल लागणार, ते पण एका फटक्यात ."

"हा मग ठीक आहे.

पण मला एक सांग, तिला मारून टाकलं. आणि तू पांढऱ्या घारीच्या रूपात असणार. मग आपणाला संसार कसा करता येणार ?"

"हा त्यावरचा पण उपाय माझ्याकडे आहे ." असे म्हणून तिने दुसरी एक पुडी काढून त्याच्या हातात दिली." आता या पुडीत आणखी काय आहे ?"त्याने पुडी खिशात ठेवत प्रश्न केला. "पांढरे तीळ."

" पांढरे तीळ? स्वयंपाकाला वापरायचे का?"

"नाही नाही .

"मग त्याचं काय करायचे?"

"त्या काळंद्रिला मारल्यानंतर हे पांढरे तीळ माझ्या अंगावर, म्हणजेच पांढऱ्या घारीवर टाकायचे. म्हणजे माझे पुर्ववत स्वरूप मला प्राप्त होईल.आणि आपणाला गुण्यागोविंदाने संसार करता येईल".

ठीक आहे.आता आपण आमच्या गावी जाऊ. तिथे गेल्यावर ठरल्याप्रमाणे करूया."

असे सर्व व्यवस्थित ठरवून,आखणी करून तो विद्वान आणि त्यांनं शोधून काढलेली ती स्त्री परतीच्या प्रवास करत गावात आले.त्याने आपल्या घराकडे न जाता तडक शंकराचे मंदिर गाठले.संन्याशाकडे ते दोघे गेले.त्यांना सर्व वृत्तान्त सांगितला .संन्याशी म्हटला,ठीक आहे चला आता आपण तुझ्या घराकडे जाऊया .तिघे जण मिळून घराकडे आले.पहिल्या बायकोने या तिघांना पाहिले थोडावेळ ती गडबडून गेली .आणि आपल्या नवऱ्याकडे जळजळीत नजरेने पाहत ती कडाडली,"मला न सांगताच कोठे निघून गेला होता?"

गेलो होतो असंच फिरायला."

आणि ही सटवी कोण आहे?"

" सटवी नव्हे तुझी सवत आहे. माझी नवी बायको."

" थांबा आता तुम्हाला तसं सोडत नाही. तुमच्या दोघांचीही आता मांजरच करून टाकते ."

त्यावर नव्या नवरीनेही पदर खोचला. आणि तीही कडाडलील," कुणाची मांजरं बनवतेस भवाने ? तुझाच मी उंदीर बनवून टाकते ."आणि मग त्या दोघीही एकमेकींशी भांडायला भिडल्या. भांडता भांडता त्या पाठीमागून आणलेल्या स्त्रीने त्या विद्वानांना इशारा केला. त्याबरोबर त्याने आपल्या हातात पुडी घेतली. त्यातील काळे तीळ भांडणाऱ्या त्या दोघींच्या अंगावर फेकले. आणि आश्चर्य घडले. त्या दोघींचे घारीत रूपांतर झाले. एक काळी घार आणि दुसरी पांढरी घार.तो धावत घराच्या कोपऱ्यात गेला. तिथे ठेवलेली काठी घेऊन आला. आणि त्याने काळ्या घारीला काठीचा अचूक तडाखा दिला. तिला पंख सुद्धा फडफडायची संधी दिली नाही. आणि खिशातून दुसरी पुडी बाहेर काढली. त्यात पांढरे तीळ होते . त्यातील तीळ तो त्या पांढऱ्या घारीच्या अंगावर टाकणार, तेवढयात संन्याशी ओरडला, "थांब गडबड करू नको."

आणि त्या संन्याशाने हातातल्या काठीचा जबरदस्त तडाखा पांढऱ्या घारीला दिला. काळ्या घारी सारखाच तिचा पण एकाच फटक्यात जीव गेला .आणि मग तो माणूस संन्याशाकडं खाऊ का गिळू अशा नजरेने पहात ओरडला," काय केलंसा हे? तिला का मारलं?"

शांत हो जरा.केलं ते बरोबर केलं. "संन्याशाने उत्तर दिले. "काय बरोबर केलंत? तिने तर आपल्याला मदत केली होती. पहिलीपासून माझी सुटका केली होती.

होय बरोबर आहे,पहिली पासून सुटका केली होती.पण पहिली पेक्षाही ही जास्त जाणकार आहे,ज्ञानी आहे.पहिली जर तुझं मांजर बनवणार होती.पण या दुसरीने तुझं बेडूक किंवा घुबड बनवले तर बनवले असते,त्याचे काय?"


आणि मग त्याला संन्याशाचे म्हणणे पटले.आपण पांढरे तीळ टाकून आणखी एका नव्या संकटाला कसे आमंत्रण दिले असते,असा विचार त्याच्या मनात आला.त्याने संन्याशाच्या पायावर डोके टेकवले. आणि त्याची माफी मागितली .आणि मनापासून आभार ही मानले.

**श्री एकनाथ गायकवाड**
**त्रिंबक (मालवण)**
**मो.नं.९४२११८२३३७**

■■■



कथा



# गजरा

अरुण सावळेकर

नव वर्षाची संधी घेवून उगवलेला गुडी पाडव्याचा दिवस. भल्या पहाटे वर्षारंभाच्या स्वागताला सुस्नात होऊन सिध्द झालेली श्रीकला गर्द केशरी झेंडुच्या फुलांची माळ गुंफण्यात मग्न झालेली. पहाटेच्या दवात न्हालेली परसबागेतली हिरवळ तरारुन यावी तसे नुकतेच न्हालेल्या श्रीकलेच्या लांबसूद मऊ केशकलापावर नि गालाओठांवर निथळणारे पाणथेंब हलकेच आपल्या ओठांनी टिपून घ्यावेत असे श्रीला वाटले.

फुलमाळांची गुंफण चालु असताना झेंडुंच्या गर्द केशरी रंगाने फुलं ओवणारी श्रीकलेची बोटं अन फुलमाळेचा दोरा देखील केसरी रंगगंधीत होऊन गेल्याचे पाहून श्री नकळत पुटपुटला आपल्या दोघांचं आयुष्य देखील असंच रंगगंधानी न्हाऊन निघावं हो कि नाही प्रिये.

काहीवेळा एखाद्या शब्दाचा अर्थगंध इतका आकर्षक वाटतो कि एखादा रंगीत मणी हाताळावा तसा तो शब्द पुन्हापुन्हा उच्चारावा.

श्रीकलेला श्री फुलवेडी म्हणायचा. आपल्या लांबसडक केसात फुलं माळायची तिला भारी हौस. श्री ला वेणीफुलांचा विशेष हव्यास नव्हता. त्याला वाटायचं उमलत्या फुलकळ्या झाडावेलींवरच शोभुन दिसतात. रंगसंगतेतली झाडावरची फुले खुडून फ्लॉवरपॉटसारख केसात खोचली की ती काळवंडतात, आपल अस्तित्व हरवून बसतात. श्रीकलेच्या केशसांभारावर मात्र श्री घायाळ होऊन गेला होता. तिच्या मोकळ्या सोडलेल्या दाट केसांच्या सुगंधी जाळीत श्री दिसेनावा व्हायचा. आजच्या नववर्षाचा शुभदिवस श्रीकलेच्या सहवासातच घालवायचा, मनसोक्त भटकंती करावी, शॉपिंग करावी,

फुलबाजारात तिला घेऊन मिरवावं, सुगंधी फुलांनी सजवावं, तिची फुलांची हौस पुरी करावी. मस्त हॉटेलात जेवण करावं अन रात्री उशीरा घरी परतावं.श्री ने आखलेल्या कार्यक्रमाने सुखावलेली श्रीकला भराभर आवरुन तयार झाली अन दोघेही बाहेर पडली.

रमतगमत बाजारात भ्रमंती चालू असताना शॉपिंग उरकताच श्रीने कार फुलबाजाराच्या दिशेने वळवुन प्रवेशव्दारातच थांबवली. विविध रंगगंधात सजवलेली टवटवीत सुगंधी नि शोभिवंत फुलांच्या राशी, पुष्पगुच्छ, फुलमाळा, जाई–जुई, मोगरा, बकुळफलांचे ताजेतवाने मोहक गजरे पाहुन श्रीकला मोहरली.आनंदान ओसंडून जाणाऱ्या तिच्या चेहऱ्याकडे कौतुकाने पहात एक बकुळ फुलांचा गजरा हातात घेत श्री ने फुलवाल्याला किंमत विचारली.

"फक्त वीस रुपये साहेब" फुलवाल्याला नम्र स्वर.

फुलांची वेणी–गजऱ्यांची रुची नसलेल्या श्री च्या चेहऱ्याकडे श्रीकला पाहतच राहिली, नंतर भानावर येत फुलवाल्याला म्हणाली,

"छे, छे, इतका महाग गजरा? दहा रुपयांना दे

"ताई, साहेब रोज इथुनच गजरा नेतात. त्यांनी कधी भाव कमी केला नाही. तुम्ही मात्र एकदम निम्मे " पुडा बांधीत फुलवाला म्हणाला.

श्रीचे लक्ष नव्हते. तो पाकीटातून पैसे काढण्यात गुंतला होता.

काय? श्रीकला एकदम किंचाळली. तिच्या चेहऱ्यावरचे भाव भराभर बदलत होते. चेहऱ्यावरचे प्रसन्न भाव नाहिसे होऊन राग, मत्सर, संशयादी विकारांनी डोक्यात गर्दी केली होती.

"श्री हा फुलवाला काय म्हणतोय बघ" चढ्या आवाजात श्रीकलेने विचारले.

"काय म्हणतोय, सहजतेने श्रीने विचारले. तेवढयात फुलवाल्याने फुलाचा पुडा श्रीच्या हाती दिला.

काळ्या ढगांची गर्दी दाटलेल्या नभातून हलक्या शिडकाव्याची अपेक्षा असतानां अचानक विजेचा कडकडाट कानी पडावा असं काहीसं श्रीकलेच्या रागाने फणफणाऱ्या चेहऱ्याकडे पाहून श्री ला वाटलं, अन्? तो चकित झाला.

पुढच्याच क्षणी फुलपुडा श्रीच्या हातातून हिसकावुन घेत श्रीकलेने तो फुलवाल्याच्या समोर भिरकावला अन म्हणाली, "हा घ्या पुडा, नकोच मला तो आता"

"हे काय? आवडला नाही गजरा? आणखीन दुसरा, मोगऱ्याचा हवा असेल तर तोही घे" रुसतेस काय अशी श्री समजुतीच्या स्वरात म्हणाला.

"काय झालं मॅडम? फुलवाला देखील अचंबित झाला होता.

"नको म्हंटलं ना! काही गरज नाही" असे म्हणत फणकाऱ्याने श्रीकला दुकानाबाहेर पडून चालायला लागली.

"हिला अचानक काय झालं? कसला राग आला?" असं म्हणत श्री तिच्या पाठोपाठ घरी निघाला.

घरात शिरताच तिला जवळ घेऊन श्री ने विचारले "श्रीकले झालं तरी काय तुला एकाएकी ? इतका छान कार्यक्रम आखला होता. सगळा विचका झाला" श्री ला दूर ढकलित श्रीकला म्हणाली "मी, मी केला विचका? आज मला समजलं मला गजरा वेणी आणून देण्यात का टाळाटाळ करीत होतात तुम्ही. माझ्या आवडीनिवडीत मुळी रसच नव्हता तुम्हाला, नाटकी कुठले?" डबडबलेल्या डोळ्यातील अश्रुंना निकराने थोपवित श्रीकला म्हणाली.

श्री आगतिक झाला होता. त्याचं भावनाशील मन लहानसहान गोष्टीत, नव्हे, एकढचातेवढ्या प्रकाराने उचंबळुन, गहिवरुन यायचं आणि मग हे बरोबर का ते बरोबर अशा संभ्रमात तो पडायचा.

"अगं पण एकाएकी तुला झालं तरी काय?" अचानक मुड कसा गेला तुझा?

"काय झालं म्हणून मलाच विचारता? खोटारडे कुठले आता सांगा मला, कुणाकुणाला गजरे वाटीत फिरता तुम्ही?"

"मी गजरे वाटीत फिरतो, मला गजरेवाला समजतेस की काय?" विस्मयाने श्री म्हणाला.

"मग त्या फुलवाल्याला वेड लागलंय? मघाशी काय बडबडला माहितेय?

"काय बडबडला? मी नाही ऐकलं?

"पुन्हा खोटेपणा. म्हणे साहेब रोज इथुनच गजरे नेतात. म्हणाला ी नाही?

सांगा ना ?कितीजणीना रोज गजरे वाटता तुम्ही? महिलामंडळ चालवता कि काय?

श्रीकला चवताळुन बोलत होती. रागाने तिच्या नाकपुडया थरथरत होत्या.

श्रीच्या डोक्यात लख्ख प्रकाश पडला. त्याला हसावे कि रडावे कळत नव्हते. श्रीकलेचा रडवेला चेहरा अन झरणारे डोळे पाहुन त्याक्षणी तिची कणव न येता तिच्या भाबडेपणाची गंमत वाटत होती.

"आणखी काय म्हणाला तो फुलवाला?" श्रीने खोडकर स्वरात विचारलं.

"ऐकताना उकळ्या फुटताहेत काय? आधी मला तिचं नांव सांगा"

"अगं कुणाच नांव? कोण कुठली ती? मी बापुडा, श्री ला पुन्हा चेष्टा सुचली.

"तुम्ही बापुडे काय? कोण मेली कुठली, मी थोडावेळ अधिक थांबले असते तर त्या फुलवाल्याने आख्खी कुंडली मांडली असती तुमची"

"बघ आता, बिचाऱ्या फुलवाल्याला कुडमुडया जोतीषी बनवलयंस तू, तुला नक्की काय बोलायचे काय सांगायचे तेच कळत नाहीये" श्रीने परत तिची फिरकी घेतली.

"सांगते ना आणि त्या सटवीचा नाव–पत्ता द्या. भेटलंच पाहिजे तिला" ?

श्रीकलेचा सात्विक राग आणि आवेश बघुन अखेर श्री खो–खो हसत सुटला.

श्रीकला, प्रिये अग डोंगर पोखरून केवळ उंदीर काढलास कि गं."

"विषयाला बगल देऊ नका. कसला डोंगर? कुठला उंदीर? कुठले डोंगर-टेकडया पालथे घालता तिला भेटायला. मला आत्ताच्या आत्ता तिचं नांव-पत्ता- मोबाईल नंबर समजल्याशिवाय मी इथून हलणार नाही नि तुम्हालाही हलु देणार नाही, समजल?" असे बजावित श्रीकलेने श्री समोर बसकण मारली.

"श्रीकला अगं हे सारे थोतांड आहे, बिनबुडाचे आक्षेप आहेत गं त्या बावळट फुलवाल्याचं बालीश बोलणं ऐकून आजचा दिवस आपण खराब करणार आहोत का? शांत हो. नीट विचार कर उगीच निरर्थक... "म्हणजे मी निरर्थक १------ तेवढयात दाराची बेल वाजली अन श्री दार उघडायला गेला. बाहेर आलेल्या पाहुण्यांनी दोघांच तात्पुरतं भांडण शमवलं असलं तरी ठिणगी विझली नव्हती. ती धुमसत राहिली होती. लुटुपुटीच्या भांडणातलं दोघाचं पापभिरुत्व जणु एकमेकांना सुचवित होतं" "मनाचे कानेकोपरे कुणिही डोकावून पहावं अशा उघडयावर पडु नयेत." संशयाचा भुंगा श्रीकलेच्या मनात शिरुन भणभणू लागला तशी ती व्याकुळ झाली. नाना शंकाकुशंकांनी तिला भडांवुन सोडलं. श्रीच्या आयुष्यात फक्त मी आणि मीच असताना आणखी कुणी बया येऊ कशी शकते? आणि तिला रोज गजऱ्याचा रतीब घालतो श्री, मला गजरे, वेण्या केसात माळण्याची हौस असताना माझ्याकडे मात्र कानाडोळा. हे शक्य नाही. माझा श्री तसा नाहीच मुळी. माझ्यावर किती भरभरुन प्रेम करतो तो. माझा एकही शब्द खाली पडू देत नाही. मी आणि श्री क्षणभरही एकमेकांशिवाय राहू शकत नाही. अष्टौप्रहर एकमेकांच्या संगतीत असतो आम्ही.

पण मग हे गजरा प्रकरण काय असेल? आणि श्रीला त्याबद्दल कसलाही खेद नाही, खंत नाही. पण तो फुलवाला कशाला खोटं बोलेल? माझच चुकलं, घटकाभर थांबुन श्रीच्या समोर त्या फुलवाल्याची झाडाझडती घ्यायला हवी होती. म्हणजे दुध का दुध आणि पानी का पानी झालं असतं. कसलं दुध आणि कसलं पाणी? श्री ताकास तूर लागू देत नाहीये. किती वेंधळी आहे मी.. एक ना दोन नुसती प्रश्नांची जंत्री, आगीत तेल ओतून स्फुलिंग भडकविणारी

नंतर एक एक प्रसंग श्रीकला आठवू लागली, श्रीचे कपडे परटाला देण्यासाठी काढतांना एका उल्लेखन शर्टच्या कॉलरवर गुलाब पाकळी चिकटलेली... मी श्री ला गमतीनं विचारलं "श्री अरे हे काय?" गुलाबाची पसरण कोणी केली रे तुझ्यावर?" काय भानगड आहे? श्री सहजपणे म्हणाला "अग परवा नाही का मित्राच्या छोटया मुलीचा वाढदिवस साजरा झाला, त्यावेळी गुलाबाच्या पाकळ्या वरण मला पटलं ते कारण. त्यानंतर उधळल्या तिच्यावर, त्यातली एखादी चिकटली असेल. अधुनमधुन ऑफिसमध्ये अर्जंट काम असले की घरी परतायला श्रीला उशीर होणार हे गृहित धरले तरी एक दोन वेळा श्री मध्यरात्रीपर्यंत गायब होता याचे नक्की कारण काय असेल? तेही दुर्लक्षित केलं, कारण एकमेकांवरील आमचा प्रचंड विश्वास. पण अखेर विश्वासाला सुरुंग लागला. अविश्वासाची दरी निर्माण झाली आमच्या दोघांत. मन पोखरणाऱ्या संशयाच्या सूईनं श्रीकला हैराण झाली होती.

अनाठाई घेतलेल्या संशयामुळे वा गैरसमजुतीमुळे कुतुहलाच्या आणि कर्तृत्वाच्या विश्वातील कुणाच्याही घरातील चहाच्या पेल्यातील वादळाचे समुद्रातील झंझावातात परिवर्तन झाल्याचे आभास होऊ लागतात अन्? मग सुरु होतात संशयकल्लोळाचे नवेनवे अध्याय.

श्रीने तऱ्हेतऱ्हेने हसतखेळत, गमंतीजंमती, कधी नरमाईने, कधी गंभीरपणे श्रीकलेची मनधरणी करण्याचा प्रयत्न चालू ठेवले पण श्रीकला आपल्या मतावर ठाम होती. आयूष्यातील संघर्षमय जगात हळवं होऊन चालत नाही. झाडावरुन फणस पडल्याचा आवाज ऐकुन आभाळ कोसळल्याच्या भीतीनं धावत सुटणाऱ्या सशासारखां हळवेपणा असतो. हळवं होण्यापेक्षा मोकळ ढाकळं व्हा. आयूष्य सुखद जगण्याकरिता अबोलीच्या गजऱ्यावरुन अबोल झालेल्या श्री- श्रीकलेच्या सुन्या सुन्या घरात एका सुटीच्या दिवशी श्रीच्या बोलघेवडया आतेबहिणीने सुलभेने प्रवेश केला. सुलुच्या अचानक येण्याने श्री श्रीकला दोघांना हायस वाटल, मनावरील ताण सैलावला, गप्पागोष्टींच्या फैरी झडु लागल्या. दुपारचे जेवण उरकताच सुलुने शॉपिंगला जायचे म्हणून दोघांना बरोबर येण्याचा अग्रह केला. श्रीने कंटाळा आला असल्याचे सांगुन श्रीकलेला सुलुबरोबर पाठवले.

दोघी बाहेर पडल्या, मनासारखी खरेदी आटोपल्यावर गप्पा मारण्याच्या ओघात दोघी फुलबाजारात दाखल झाल्या. वहिनी तुला फुलांचा गजरा आवडतो ना चल आपण गजरे विकत घेऊ असे म्हणत श्रीकलेने नको नको म्हणताना तिला फुलबाजारात नेमक्या त्याच फुलवाल्याच्या दुकानात दोघी शिरल्या. फुलवाल्याला पहाताच श्रीकलेने तुसडेपणाने मान फिरवली. बकुळीचा एक टपोरा गजरा निवडून सुलुने विचारले,

"काय रे केवढ्याला देणार गजरा ?"

"फक्त वीस रुपये ताई

"एवढा महाग? अरे दहा रुपयाच गजरा वीस रुपयाला, दुप्पट भाव

"दुप्पट कशाला सांगेन, ताई रोजचा भाव आहे. अहो,तुमचे साहेब रोज इथुनच गजरा घेतात "कोण साहेब? अरे मला गजरा घालणारा आला नाही अजुन आयुष्यात. श्रीकलेकडे मिस्कीलपणे पहात सुलु म्हणली. असं होय. चुकलंच माझं ताई माफ करा.

करा.

त्याचं काय आहे, आमच्या धंद्यातली नेहमीची ट्रिक आहे. गि-हाईकांना आकर्षित करण्याची, अहो बाईसाहेबांसमोर साहेबांच कौतुक केल कि, बाईसाहेब खुलतात अन मग सांगेन त्या भावात फुलांची विक्री होते.या बाईसाहेबांना विचारा ना त्या दिवशी साहेबांना घेऊन बाजारात आल्या, साहेबांनी छानसा गजरा घेतला, पण कायं झालं कुणास ठाऊक? गजऱ्याचा पुडा माझ्यासमोर टाकुन ताई

रागारागाने निघून गेल्या.

सुलु श्रीकलेच्या चेहऱ्याकडे पहात राहिली. श्रीकलेच्या डोळयांच्या कडा ओलावल्या होत्या. चेहऱ्यावर रडवेला भाव. श्रीला किती मनस्ताप दिला आपण. अपराधी भावनेने श्रीकलेचे मन गहिवरुन आले. जडावलेले पाय ओढीत श्रीकला दुकानाबाहेर पडली. पाठोपाठ सुलुदेखील गजऱ्याचा पुडा घेवुन समाधानाने बाहेर पडली. श्री व श्रीकलेचे मनोमिलन घडवुन आणल्याचा आनंद सुलुच्या चेहऱ्यावर दिसत होता. दोघी निःशब्दपणे चालत होत्या.

स्नेहाच्या निखळपणाची साक्ष पटल्याखेरीज स्नेह मोकळा होत नाही, पण तशी खात्री पटली कि तो सैलावू लागतो. श्रीकलेचा आत्मविश्वास परत आला होता. तिचं अपराधी मन पुन्हा पुन्हा बजावित होतं मी स्वप्नातही श्रीवर न केलेले आरोप निष्कारण ओढवुन घेऊन अर्थाचा अनर्थ केला होता. इतका निष्ठूरपणा कसा झाला माझ्याकडून. श्री किती दुखावला असेल. झालं गेलं विसरुन श्री मला क्षमा करेल का? मनात अढी तर नाही ना बाळगणार.

नाही, माझा श्री तसा नाही, तो क्षमाशील निर्मल मनाचा आहे.

सुलु श्रीकलेच्या झरणाऱ्या डोळयांकडे अन दुःखी चेहऱ्याकडे पहात मिस्किलपणे हसत होती.

श्रीने सुलुला विश्वासात घेऊन आखलेला प्लॅन पूर्णपणे यशस्वि झाला होता.श्रीने खिडकीतून दोघींना घरात शिरताना पाहिलं,अन्? गुपचुपपणे तो बेडरुममध्ये जाऊन डोळे मिटून पडला. घरात शिरताच अधीर होऊन श्रीकला श्रीचा शोध घेत घरभर फिरु लागली. बेडरुममध्ये शिरताच शांतपणे झोपलेल्या श्रीकडे पहाताच तिला भडभडून आले अन्? तिरीमिरीने ती श्रीकडे झेपावली. श्रीच्या कुशीत शिरुन तिने आपल्या अश्रुंना वाट करुन दिली. श्रीकला शांत होईपर्यंत श्री तिला थोपटीत राहिला.

सारं कसं शांत झाल्यावर श्रीकलेने आणि श्री ने मनापासून सुलुला धन्यवाद दिले. श्री म्हणाला बाईसाहेब गैरसमज किती पक्के असतात याविषयी एक आख्यायिका सुध्दा म. गांधीजीच्या नावावर खपवलेली आहे.

गांधीजी खादी रंगवायला रंगकामगाराकडे सुपुर्द करतानां त्याला पुन्हापुन्हा बजावीत होते, "हे पहा रंग मुळीच जाता कामा नये. अगदी पक्का, खूप पक्का रंग बसला पाहिजे, अगदी गैरसमजाइतका पक्का, कितीही धुवा, जाणार नाही.

**अरुण सावळेकर**
**१३६, नारायण पेठ,**
**सीताफळ बाग कॉलनी, पुणे - ४११०३०.**
**भ्रमणध्वनी : ९८२२४ ७०७२२**
**निवास : ०२० - २४३५५००६**

■■■

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ**
'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे - ४. फोन : ०२०/२५६५९४६५/६६/६८

**मंडळाची पाठ्येतर व इतर प्रकाशने**

मंडळाची पाठ्येतर व इतर प्रकाशने

**शालेय विषयांचे आकलन सुलभ होण्यासाठी पाठ्यपुस्तक मंडळाची पाठ्येतर व इतर प्रकाशनाची पुस्तके उपलब्ध आहेत.**
कला, कार्यानुभव व शारीरिक शिक्षण शिक्षक हस्तपुस्तिका इ. १ ली ते ३ री
मराठी/इंग्रजी शिष्यवृत्ती इ. ५ वी भाग १,२; मराठी/इंग्रजी शिष्यवृत्ती इ. ८ वी भाग १,२

ई-बालभारती मार्फत e-Learning app इ-१ ली ते १० वी, Playstore वर उपलब्ध



- कथा स्वातंत्र्याची
- शिल्पकार स्वातंत्र्याचे
- गोष्ट स्वातंत्रलढ्याची
- छत्रपती शिवाजी महाराज स्मृतिग्रंथ
- शालेय मराठी शब्दसंग्रह
- बालभारती उत्तम संस्कार कथा : भाग १,२,३
- शिकुया मजेत इ.१ व २ री स्वा. पु. (मराठी, हिंदी व उर्दू)
- किशोर मासिक वार्षिक वर्गणी रु.८०
- निवडक किशोर खंड क्र.१ ते १४
- मराठी विश्वकोश खंड व सीडी
- माझा इंग्रजी मराठी 'शब्दकोश'
- स्वाध्याय पुस्तिका ८ वी ते १२ वी
- माहीत आहे का तुला? भाग १,२
- ५० किशोर गोष्टी

**शैक्षणिक संस्था, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांना मंडळाच्या भांडारातून किरकोळ खरेदीवर मंडळाच्या नियमानुसार वटाव देण्यात येत आहे. तसेच निवडक किशोर खंड १ ते १४ व किशोर ५० गोष्टी भाग १ साठी ५०% वटाव.**

**वरील पाठ्येतर व इतर प्रकाशने खरेदीकरिता मंडळाच्या खालील विभागीय भांडार व्यवस्थापकांशी संपर्क साधावा.**
विभागीय भांडारे - पुणे (९४२३००५०७०), मुंबई (गोरेगाव) (९४२३००५०७१),औरंगाबाद (९४२३००५०७३), नागपूर (९४२३००५०७२) नाशिक (९४२३००५०७४), लातूर (९४२३००५०७५), कोल्हापूर(८७९९९०९६५६), अमरावती (९४२३००५०७७), पनवेल (९४२३००५०७८)

कथा

# आर्यनची गोष्ट

प्रिया फुलंब्रीकर



गोष्ट तशी अलीकडचीच. आर्यन नावाच्या एका मुलाची.

गजबजलेल्या शहरातील एका टोलेजंग इमारतीमध्ये आर्यन हा बारा वर्षांचा इयत्ता सातवीत शिकणारा एकुलता एक मुलगा त्याच्या आई–बाबांबरोबर राहात होता.त्याचे आई–बाबा दोघेही नोकरी करायचे. बाबांची पूर्ण वेळ म्हणजे सकाळी नऊ ते संध्याकाळी सहा वाजेपर्यंत नोकरी असायची,तर आईची नोकरीची वेळ सकाळी आठ ते दुपारी चार वाजेपर्यंत असायची.

दररोज आई सकाळी स्वयंपाक करून तिचा,बाबांचा आणि आर्यनचा डबा भरायची. डबा घेऊन स्कुटरने बाबा घरापासून लांब अंतरावर असलेल्या ऑफिसला सात वाजताच निघायचे. त्यांच्या मागोमाग सव्वा सातला रिक्षावाले काका आले की घराला कुलूप लावल्यावर भरलेले डबे घेऊन आई आणि आर्यन एकाच रिक्षातून

निघायचे. ऑफिसला जाताना मध्येच वाटेवर आई आर्यनला त्याच्या शाळेच्या दारापाशी सोडायची आणि मग ती रिक्षाने पुढे ऑफिसला निघून जायची. आर्यनच्या शाळेची वेळ सकाळी साडेसात ते दुपारी एक पर्यंत अशी होती.त्यामुळे तो घरी आई यायच्या आधी पोहोचायचा. त्याच्याकडे घराची एक किल्ली दिली असल्याने तो कुलूप उघडून घरात शिरायचा. पण आई घरी येई पर्यंत त्याला इतका कंटाळा यायचा की त्याचे मन टी व्ही, खेळ,अभ्यास अशा कशा कशातच रमायचे नाही. मग त्याने एक शक्कल लढवली आणि बाबांची परवानगी घेऊन त्यांचा जुना मोबाईल फोन स्वतःकरता वापरण्यासाठी घेतला.

आर्यनने मोबाईल फोन वापरण्यास सुरुवात केल्या नंतर लगेचच त्याला त्या मोबाईल फोनचे वेडच लागले.दिवसेंदिवस मोबाईलवर वेगवेगळी गेम्सची ॲप्लिकेशन्स डाऊनलोड करायची आणि त्यावरून विविध गेम्स खेळायची त्याला चटक लागली. अगदी जेवताना,टी व्ही बघताना, अभ्यास करताना सुद्धा तो मधून मधून सारखा मोबाईल वापरू लागला. या सवयीमुळे त्याचे इतर कशातच लक्ष लागेनासे झाले.अभ्यासातील एकाग्रता पूर्णपणे नाहीशी झाली. याचा परिणाम त्याच्या शाळेच्या परीक्षेतील गुणांवर झाला. परीक्षेत कायम पहिल्या तीन क्रमांकात येणारा आर्यन आता शेवटच्या तीन क्रमांकात येऊ लागला. एके दिवशी तर त्याचे डोळे दुखायला लागून डोळ्यांतून घळाघळा पाणी वाहू लागले म्हणून तपासणीसाठी आई–बाबांनी त्याला डोळ्यांच्या डॉक्टरांकडे नेले, तर मोबाईल सतत वापरल्यामुळे दृष्टिदोषाचा विकार जडल्याचे निदान झाले. आता सतत वापरासाठी जाड भिंगाचा चष्मा वापरणे भाग पडले. एवढे होऊन देखील त्याचे मोबाईलचे व्यसन काही कमी होण्याचे चिन्ह दिसेना. वडिलांनी गोड बोलून त्याला कळकळीने समजावून सांगितले,प्रसंगी ओरडून सुद्धा सांगितले;तरीही त्याच्यावर ढिम्म परिणाम झाला नाही. त्याचे आपले मोबाईल वापरणे चालूच राहिले आणि या त्याच्या अतिरेकी मोबाईल वापरामुळे त्याची आई तर अगदी रडकुंडीला आली. बरं, जबरदस्तीने त्याच्याकडून मोबाईल फोन हिरावून घेतला तर तो जीवाचे बरे वाईट करू शकेल अशी आई–बाबांना भीती होती. मग आईने न राहवून गावाला राहात असलेल्या सासूर–सासऱ्यांना म्हणजे आर्यनच्या आजी–आजोबांना फोन केला आणि ही गोष्ट त्यांच्या कानावर घातली. हा सर्व प्रकार ऐकून आजी–आजोबांनी पुढच्याच आठवड्यात आर्यनच्या शहरातील घरी राहायला यायचा बेत आखला. त्याप्रमाणे लगेचच पुढील आठवडयात आर्यनचे आजी–आजोबा घरच्या गाडीतून त्यांच्या मोती कुत्र्याला घेऊन आर्यनच्या घरी दीड महिन्यांसाठी वास्तव्यास येणार असे ठरले.

अन्?अखेरीस तो शनिवार उजाडला.ट्रींग ट्रींग.बेल वाजल्यावर दार उघडताच दारात आजी–आजोबा आणि मोतीला पाहून आर्यनचा आनंद गगनात मावेनासा झाला. आर्यनला पाहून मोती तर खुश होऊन शेपटी हालवत उड्या मारू लागला आणि आर्यनचे हात चाटू लागला. आर्यनच्या आजी–आजोबांनी मनाशी ठरवलेच होते की त्यांच्या लाडक्या नातवाला म्हणजेच आर्यनला काही एक कळू न देता आपण त्याला मोबाईलच्या अतिवापरापासून परावृत्त करणार आहोत. याकरता नामी युक्ती वापरून गावाहून येताना आजोबांनी आपल्या बरोबर मोतीला देखील आणले होते.

मुलांना वेळ द्या

त्या दिवशी शनिवार असल्याने आर्यनची शाळा सकाळी अकरा वाजताच सुटली होती म्हणून दुपारी आर्यनने घरी आजी–आजोबां समवेत जेवण केले.जेवण करताना त्याने आजी–आजोबांशी मनसोक्त गप्पा मारल्या. मग संध्याकाळी आजोबा मोतीला बाहेर फिरवायला म्हणून आर्यनला घेऊनच घराबाहेर पडले.घरासमोरील मोकळ्या मैदानावर आर्यन मोती बरोबर चेंडू खेळू लागला.आर्यन चेंडू लांबवर फेकायचा आणि मोती तो चेंडू बरोबर शोधून आर्यनकडे परत द्यायचा असा त्यांचा खेळ फारच रंगला. शिवाय त्या मैदानावर आर्यनच्या सोसायटीतील बरेच मित्रमैत्रिणी त्याला भेटले.त्यांनी आर्यनला ओढतच त्यांच्या खेळात सामील करून घेतले.ते दृश्य पाहून आजोबा गालातल्या गालात हासत होते. त्यांना आपला नातू मोकळ्या हवेत खेळत असलेला पाहून मनापासून आनंद होत होता आणि आपला हेतू पहिल्याच दिवशी बऱ्याच अंशी सफल झाला या गोष्टीचे समाधान वाटत होते. पण मोबाईलच्या आहारी गेलेल्या नातवाला मोबाईलच्या विळख्यातून पूर्णपणे बाहेर काढायचे होते.हे काम त्याला कळू न देता त्यांना अत्यंत खुबीने पार पाडायचे होते. मग जरा वेळाने अंधारून आल्यावर आकाशात चांदण्या दिसू लागल्या तेव्हा त्यांनी आर्यनला हाक मारली.आर्यन जरासा नाखुशीनेच मित्रमैत्रिणींच्या घोळक्यातून बाहेर पडत आजोबांच्या दिशेने येत असताना म्हणाला, "हे हो काय आजोबा? अजून एक डाव खेळायचा बाकी असताना तुम्ही चला म्हणत आहात." यावर आजोबा हासून उद्गारले, " अरे ही दिवेलागणीची वेळ झाली. आता घरी परतायलाच हवे नाहीतर तुझी आई काळजी करत इथे शोधायला यायची." दिवेलागण म्हटल्यावर आर्यनचे लक्ष वर आकाशाकडे गेले. आकाशाच्या पटलावर एक एक करून चांदण्या उगवत होत्या. मग आजोबा उगवलेल्या शुक्र, मंगळ अशा प्रत्येक ग्रहाची त्याला माहिती देऊ लागले. वाटेत ग्रहांची रंजक माहिती घेत घेत ते त्रिकुट घरी पोहोचले तेव्हा रात्रीचे आठ वाजले होते. आर्यनने घरी पोहोचल्यावर बाल्कनीचे दार उघडले आणि परत बाल्कनीतून मोकळा वारा अंगावर घेत तो आकाशदर्शनाचा आनंद घेऊ लागला. आता काही ग्रह तो ओळखू लागला होता आणि आजोबांकडून इतर ग्रहगोलांची माहिती घेण्यासाठी त्याची उत्कंठा शिगेस पोचली होती.आज मोबाईलचा त्याला पूर्णतः विसर पडला होता.

दुसऱ्या दिवशी रविवार हा सुट्टीचा दिवस असला तरी आजी व आजोबांनी त्याला पहाटे पाचलाच उठवले. आजीने त्याला आणि मोतीला दूध दिले.मग लगेचच आर्यन व मोती यांना घेऊन आजोबा टेकडीवर जाण्यास निघाले. आर्यनने मोतीला घेऊन पळत पळतच टेकडी चढली. मागाहून आलेल्या आजोबांनी आर्यनला माथ्यावर नेऊन उगवता सूर्य दाखवला. केशरी रंगांचे तेजस्वी सूर्यबिंब पाहून आर्यन सुखावला. आजोबांनी आर्यनला सूर्यमालेबद्दल माहिती

दिली.सूर्याचे व सूर्यमालेतील इतर ग्रहांचे महत्व जाणून घेतल्यावर सूर्यास वंदन करून तिथे आजोबांनी आर्यनला प्राणायाम आणि बारा सूर्यनमस्कार घालण्यास शिकवले. हा व्यायाम झाल्यावर शेवटी पुढील श्लोक आजोबांनी अर्थासहित आर्यनला शिकवला : –

सर्वे भवन्तु सुखिनः सर्वे सन्तु निरामयाः|
सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित् दुःखभाग्? भवेत्॥

श्लोकाचा मराठी अर्थ –

सगळे सुखी होवो,सर्व निरोगी राहोत, सर्वजण मंगलमय घटनांचे साक्षीदार बनोत आणि कोणाच्याही वाटयाला दुःख येऊ नये.

या श्लोकानंतर शांतिमंत्र म्हटल्यावर आर्यनच्या अस्वस्थ मनास शांती लाभली आणि त्याने जराशीही चुळबूळ न करता थोडा वेळ आजोबांबरोबर पद्मासनात डोळे मिटून ध्यान केले.

वाचाल तर वाचाल!

टेकडीवरची शुद्ध हवा, हिरवीगार वनराजी, किलबिलाट करणारे पक्षी यामुळे आर्यनला तिथून हालूच नये असे वाटत होते. तो डोळे भरून ते सर्व दृश्य मनात साठवू लागला. पण आता मोती भुकेने चुळबुळ करू लागल्याने ते सर्वजण टेकडी उतरू लागले. आर्यन आणि मोती तर धावत धावतच टेकडी उतरले. आजोबा विविध प्रार्थना व श्लोक म्हणत मागोमाग पायथ्याशी आले. सर्वजण घरी पोहोचल्यावर आईने मस्तपैकी इडली–सांबार आणि फ्रुट सॅलड असा नाश्त्याचा बेत तयार करून ठेवला होताच. अशी आर्यनच्या सुट्टीच्या दिवसाची सुंदर सुरुवात झाली. नाश्ता केल्यावर तो मोबाईलकडे गेम खेळण्यासाठी वळणार तेवढयात बाबांनी, “आर्यन, लवकर आंघोळ करून घे बरं,“ असे फर्मानच सोडले. त्याचे आजोबांनी कारण सांगताच आर्यन भलताच खुश झाला. आजोबा आर्यनला पुस्तकांच्या दुकानात नेऊन त्याच्या आवडीची पुस्तके आणि आजोबांना त्याच्याकरता महत्वाची वाटणारी इतर पुस्तके घेऊन देणार होते. मग काय स्वारी एकदम खुश झाली! आर्यनने भरभर आंघोळ केली आणि आजोबांनी पण स्नानसंध्यादी प्रातःकर्म लवकर आटोपून त्याला ते बाजारातील प्रसिद्ध बुक डेपो मध्ये घेऊन गेले. त्या पुस्तकांच्या जंगलात आर्यन अगदी हरखून गेला. आजोबांनी त्याच्या आवडीप्रमाणे त्याला पाहिजे ती परीकथा, शौर्यकथा, गोष्टींची पुस्तके तर घेऊन दिलीच; शिवाय नित्य म्हणावयाची स्तोत्रे,श्लोक,सुविचार,योगासने,पर्यावरण,

सूर्यमाला आणि सौर ऊर्जे विषयक माहिती पुरवणारी पुस्तके देखील घेऊन दिली. इतकी सारी पुस्तके भेट मिळाल्याने खुशीत येऊन आर्यन आजोबांबरोबर घरी परतला. दुपारच्या गरमागरम जेवणानंतर आर्यन ती पुस्तके वाचण्यात एवढा गढून गेला की त्याला मोबाईल फोनचे स्मरणसुद्धा झाले नाही. आर्यनला वाचनाची इतकी गोडी लागलेली पाहून त्याचे आई–बाबा खुश झाले.

निरोगी शरीर निरोगी मन

रोज पहाटे आजोबा आर्यनला लवकर उठवू लागले. त्याला कधी टेकडीवर तर कधी घरातील गच्चीवर नेऊन त्याच्याकडून बारा सूर्यनमस्कार, प्राणायाम करून घेऊ लागले आणि हळूहळू एक एक करून इतर आसने देखील शिकवू लागले. तसेच निरनिराळी स्तोत्रे, श्लोक पाठ करून घेऊ लागले. त्यानंतर शाळेच्या वेळेच्या आत तो भरभर आटपून तयार होऊन शाळेत अधिक उत्साहाने जाऊ लागला.

पुढच्या सुट्टयांच्या दिवशी आजी आणि आजोबांनी आर्यनला प्राणी–वनस्पती–वस्तू संग्रहालय,उद्याने,मंदिरे आणि इतर ऐतिहासिक वारसा स्थळे, इत्यादी ठिकाणी नेऊन आणले. रविवारी पहाटे आजोबा मोती आणि आर्यनला घेऊन टेकडीवर जात. रोजची संध्याकाळ तर मैदानावर मोती बरोबर चेंडू खेळण्यात आणि इतर सवंगडयंसमवेत खो खो सारखे मैदानी खेळ खेळण्यात जायची. यामुळे आर्यनला भूक लागून व्यवस्थित जेवण जाऊ लागले आणि रात्री डोळे मिटल्या मिटल्या झोप पण येऊ लागली.आर्यनला बोधपर अनुभवसिध्द माहिती सांगणे,गोष्टींची पुस्तके वाचून दाखवणे, अभ्यास करून घेणे आणि व्यायाम करवून घेणे यामध्ये आजोबांचे दिवस छान जाऊ लागले.

ज्ञान,मनोरंजन,व्यायाम,सकस आहार आणि पुरेशी झोप अशा आदर्श जीवनशैलीमुळे आर्यनच्या मनात व शरीरात सकारक ऊर्जा उत्पन्न होऊन त्याच्यात एका महिन्यातच सुयोग्य बदल घडून आले. रात्री भीतीदायक स्वप्ने पडणे बंद होऊन त्याला झोप नीट लागू लागली.त्याचा चष्म्याचा नंबर कमी झाला. त्याचे शारीरिक व मानसिक आरोग्य तर सुधारलेच;शिवाय चाचणी परीक्षेत तो वर्गात पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला. मुख्य म्हणजे त्याला लागलेले मोबाईलचे व्यसन त्याच्याही नकळत पूर्णपणे सुटले. समोर मोबाईल असून देखील दिवसातून ठराविक वेळेतच आवश्यक वाटल्यास तो मोबाईल वापरू लागला. ही कमाल करून दाखवल्याबद्दल आर्यनच्या आई आणि बाबांनी आजी–आजोबांचे मनापासून आभार तर मानलेच; शिवाय आजी–आजोबा गावाला परतल्यावर त्यांची भूमिका बजावण्याचे वचन आई–बाबांनी त्यांना दिले. त्याकरता त्यांनी मोती सारखेच एक देशी कुत्राचे पिल्लू आर्यन करता दत्तक घेतले. आर्यनने त्या पिल्लाचे नाव शेरू असे ठेवले.आता आई–बाबा घरी नसतील तेव्हा आर्यन सोबत घरी शेरू असणार होता आणि वाचून त्यावर मनन व चिंतन करायला घरात भरपूर पुस्तके उपलब्ध होती.

आजी–आजोबांनी दिलेला वेळ सत्कारणी लागला

आपला हेतू साध्य होऊन कार्यपूर्ती झाल्याचे समाधान आजी–आजोबांना वाटत होते. मग गावाला परत जायचा दिवस उजाडल्यावर आर्यन, त्याचे आई–बाबा आणि शेरू यांचा निरोप घेऊन आजी,आजोबा आणि मोती मोटारीतून त्यांच्या गावाकडे निघाले. “लवकर परत नक्की या हं, “ असा हात हलवत जड अंतःकरणाने आर्यनने त्यांना निरोप दिला.

आता आर्यनच्या डोक्यावर चढलेले मोबाईल फोनचे भूत पूर्णपणे उतरले आहे आणि विवेकशीलतेची धरलेली कास आयुष्यात तो कधीच सोडणार नाही याची आर्यनचे आई–बाबा व आजी–आजोबांना मनोमन खात्री होती.

**– प्रिया फुलंब्रीकर**

■■■

कथा



# अंकुर

रत्नाकर वाणी

"एविशू बस्स झाले. उठ की आता. किती वेळ विचार करत बसशील.देश चालवणारे अर्थमंत्री पण देशाचे अंदाज पत्रक बनविताना एवढा विचार करित नसतील.बापूंचा फोन आला आणि तू इतका विचारात पडला.हे घर आपल्या दोघांचे आहे ना !मग आपण दोघे विचार करून प्रश्न सोडवू. उठ आता कपडे बदल तोंड धू. मी मस्त पैकी खाण्यासाठी गरमा गरम भजी बनविते व गरम वाफाळलेला आले घालून चहा बनविते. बाहेर कसे छानसे पावसाळी मंद धुंद वातावरण आहे. पहिल्या शिडकाव्याने मातीचा छानसा सुगंध सुटलाय बघ !"असे म्हणत श्वेताने विश्वासला हात धरून उठविले.

सहजा सहजी ऐकेल तो विश्वास कसला. तो जाउन कॉटवर बसला व परत विचारात गुंतला. श्वेता पण त्याच्या शेजारी बसली. विशूने श्वेताचा हात आपल्या हातात घेतला. क्षणभर

श्वेता मोहरली.आनंदली.रोमांचित झाली. श्वेताचा हात हळुवार पणे कुरवाळीत विशू बोलता झाला.अगं !बापू आर्थिक अडचणीत आहेत. पेरण्या जवळ आल्यात. शेत तयार करायला. बी आणायला पैसा पाहिजे. त्याविना पेरणी होणार नाही. पेरणी न झाल्यास वर्ष कोरडे जाईल.अनेक समस्या निर्माण होतील. आपल्याला काहितरी करायला पाहिजे.गेले दोन महिने आपणच आर्थिक विवंचनेत असल्यामुळे बापुंना पैसे पाठवू शकलो नाही. वाट पहात आहेत आपल्या मदतीची. म्हणून फोन केला.हे ऐकून श्वेता थोडी धीर गंभीर झाली. तिचा रोमान्स मावळला.धीर देत म्हणाली, "तु म्हणतोस ते सगळ खरंय. पण असे हतबल होउन चालणार नाही. माझे तुझ्यावर व तुझ्या सर्व कुटुंबियावर प्रेम आहे. त्यात बापुंवर जास्तच. त्यांनीच घरचा कर्ता पुरूष म्हणून सर्वांचा विरोध डावलत आपल्याला समजून घेत आपल्या विवाहास मान्यता दिली व मला सुन म्हणून स्विकारले.

विश्वास व श्वेता एकाच गावातले, एकच शाळा व एकाच कॉलेजातून पदवी संपादन केलेले विद्यार्थी.विश्वास शेतकऱ्याचा मुलगा.गावात बापू शेतकरी म्हणून ओळखले जात होते.बापू मेहनती शेतकरी.श्वेता त्याच गावातील सुसस्कृत घरातील, सरकारी अधिकारी भगवानराव यांची मुलगी.दोघेही एकुलते एक.श्वेता आठवी इयत्तेत असतांना भगवानरावांची बाभूळगावी,जिथे बँक. शाळा,कॉलेज,दवाखाना,अशा प्राथमिक सुसज्ज सुविधा उपलब्ध असलेल्या ठिकाणी बदली झाली. श्वेता व विश्वास दोघे अभ्यासात हुषार होते.नेहमी त्यांचा पहिल्या ५ क्रमांकामध्ये आलटून पालटून नंबर असायचा.सहाजिकच दोघांमध्ये वह्या,पुस्तके देणे घेणे वरून मैत्री झाली.दोघेही स्नेहसंमेलन व विविध खेळण्याच्या स्पर्धेत हिरीरीने सहभागी होत.त्यात त्याची मैत्री दृढ होत गेली व मैत्रीचे प्रेमात रूपांतर झाले.कधी कॉलेजच्या व्हरांडयात तर कधी खेळाच्या मैदानावर,झाडाखाली दोघे गप्पा मारतांना दिसत.दोघेही पदवी परिक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. त्यांचे प्रेम प्रकरण फडतरे प्राध्यापिके शिवाय कोणाला माहित नव्हते.कॉलेजमध्ये झालेल्या कॅम्पस इंटरव्ह्यूत विश्वासची निवड झाली व शहरामध्ये त्याची नियुक्ती झाली.

वर्ष सहा महिने लोटले तसे उभयतांच्या घरात विवाहाचे वारे वाहू लागले.श्वेता साठी वर संशोधन सुरू झाले.श्वेताला चांगली स्थळे सांगून आली.पण तिला फक्त विश्वासशीच विवाह करावयाचा होता म्हणून ती चांगली स्थळे असून देखिल नाकारत होती. तिचे विश्वासवर नितांत प्रेम होते.ती त्याच्याशिवाय अन्य कोणाचा विचारच करू शकत नव्हती.आपल्या मनातले आई वडिलांना सांगायचे कसे हा मोठा गहन प्रश्न तिच्या समोर होता.तिने या गोष्टीची विश्वासला देखिल कल्पना दिली.

एके दिवशी आईने श्वेताला तिच्या अपेक्षां व अडचणी जाणून घेण्यासाठी मन मोकळे तिच्याशी चर्चा केली तेव्हा श्वेताने आपले प्रेम प्रकरण व विश्वासविषयी सर्व माहिती आईला सांगीतली. ते ऐकून तिच्या पायाखालची वाळू सरकली. भूकंपाचे जोराचे हादरे बसावे असे तिला झाले. ती खूप रागावली.अबोला पण धरला. पण आईचे हृदय ते एक दिवस पाघळले.तिने हिमतीने श्वेताच्या वडिलांकडे ही गोष्ट काढली. वडिलांनी देखिल राग राग केला. इकडे विश्वासच्या घरी देखिल काही फारशी वेगळी परिस्थिती नव्हती. दोन्ही कुटुंबांकडून या प्रेम विवाहास विरोध होता. विश्वासने आपल्या कुटुंबियांना समजाविण्याचा खूप प्रयत्न केला. पण विरोध कमी होत नव्हता.

दरम्यान सुटीवर आलेल्या विश्वासची फडतरे प्राध्यापिकेशी भेट झाली. गप्पांच्या ओघात लग्नाचा विषय निघाला. कुटुंबियांच्या विरोधा बद्दल सांगितले.दोन्ही कुटुंबियांची पण भेट घडविण्याचा प्रयत्न अयशस्वी झाल्याचे पण त्याने सांगितले.फडतरे मॅडमच मनात त्याच्या विषयी सहानुभूती जागृत झाली.त्यांनी विश्वास व श्वेता दोघांची एकत्र भेट घेउन दोघांचे विचार ऐकले उभयतांना समजाविले.

दोघांचे एकमेकांवरील निस्सीम प्रेम व एकमेकाशिवाय राहणार नसल्याचे लक्षात आल्यावर मध्यस्थी करण्याचे ठरविले. उभयतांच्या कुटुंबियांना भेटून सत्य परिस्थीतीची कल्पना दिली. समुपदेशन केले.दोघेही सज्ञान आहेत.हुषार आहेत.गेली सहा वर्षे एकमेकास चांगले ओळखतात.त्यांचे एकमेकावर निस्सीम प्रेम आहे. सामंजस्याने दोघांचा संसार सुखी होउ शकतो.बळजबरीने मनाविरूध्द विवाह जमविल्यास सुखी संसाराची निश्चिती नाही. हल्लीच्या प्रगल्भ विचाराच्या व सुशिक्षित तरूण पिढीतील मुला मुलींच्या बदलेल्या मानसिकतेने प्रेम विवाह ही सर्वसामान्य गोष्ट झाली आहे. काही अंशी समाजाने देखिल या प्रेम विवाहाच्या प्रथेस कालमाना नुसार काळाची गरज समजून अंगिकारले आहे. अनेक प्रेम विवाह सुखाने संसार करित असल्याची उदाहरणे आहेत. असा सारासार विचार करता विश्वास व श्वेता यांचा प्रेम विवाह काही अपवाद ठरणार नाही. कदाचित काही असंतुष्ट नातेवाईक, आप्तेष्टांच्या रोषाला सामोरे जावे लागेल पण काही काळापुरते. जसजसे दिवस जातील तसा रोष मावळेल व ते पुन्हा आपल्यात मिसळतील. शिवाय मी विश्वास व श्वेतास चांगली ओळखते. त्यांच्या वर्तणुकीने दोन्ही कुटबांच्या घराण्याच्या इभ्रतीला कदापि तडा जाणार नाही याची उभयता काळजी घेतील असा विश्वास आहे . विवाह प्रसंगी आपण आपल्या समाजातील रीती रिवाज व चालीरीती देखिल पार पाडू शकता. अशा अनेक प्रकारे उभय कुटुंबियाना फडतरे मॅडमने समुपदेशन करित समजाविले. दोघेही एकुलते एक असल्याने बाल हट्टापुढे त्यांना माघार घ्यावी लागली. विश्वास व श्वेताचा विवाह संपन्न झाला. दोघे संसाराला लागली.

आपल्या सीमीत पगारातून देखिल विश्वास नित्य नेमाने यथाशक्ती आपल्या कुटुंबियांना अर्थिक मदत करत होता.पण गेली दोन महिने काही अपरिहार्य कारणास्तव त्याला मदत करणे शक्य न झाल्याने नियमात खंड पडला. पेरणी पाण्याचे दिवस होते. पेरणी करणे आवश्यक होते. न केल्यास संपूर्ण वर्ष कोरडे जाण्याची भीती होती. बापुने आजतागायत कोणत्याही बँकेचे कर्ज न घेता सात बारा कोरा ठेवला होता. यावेळी बापुंचा हात फारच अडचणीत

आला म्हणून नाईलाजास्तव विश्वासला फोन करावा लागला. चार वर्षापूर्वी देखिल अशीच परिस्थिती निर्माण झाल्याने बापुने स्वतःला संपविण्याचा प्रयत्न केला होता. याची विश्वासला तीव्रतेने आठवण आली. त्यावेळी विश्वासची आई व विश्वासने त्यांना खूप समजावले व अनर्थ टळला. त्याची पुनरावृत्ती घडू नये अशी भितीयुक्त शका विश्वासचे मनात आली.शेतीमध्ये कष्ट फार तर उत्पन्न कमि अशी स्थिती आहे.शेतकऱ्याचा मुलगा असल्याने शेतकऱ्यांच्या विविध समस्यांशी चांगला अवगत होता बाजारात शेतमालाला भाव नाही, खते,बी बियाणे,शेतीची अवजारे यांची कमतरता.अशा एक ना अनेक कारणांनी शेतकरी राजा गांजला जातो.

कधी कोरडा, तर कधी ओला दुष्काळ,कधी नैसगिक आपत्ती,तर मानव निर्मित समस्या. शेतीत काम करणाऱ्या मजूरांची वाणवा आणि मिळालेच तर वाढती मजूरी. हे कमि की काय म्हणून याची कल्पना विश्वासने श्वेताला दिली. श्वेता जे आजपर्यंत केवळ बाहेरून ऐकत आली ते स्वतः अनुभवू लागली. तिला बापूंच्या फोनचे गांभीर्य कळले. पैसा कसा उभा करायचा असा उभयतां पुढे मोठा यक्ष प्रश्न उभा ठाकला. मन चिंताग्रस्त झाले.

रात्री श्वेताच्या वडीलांचा फोन आला त्यावेळी सर्व हकिकत व बापूंच्या अर्थिक अडचणी बद्दल सांगितले."बाबा तुम्ही काही तरी कराना !"अशी हक्काची लडिक विनंती केली.एक कष्टाळू व प्रामाणिक शेतकरी ज्याने उभ्या आयुष्यात कधीही कर्ज घेतले नाही, अडचणीत आल्याचे ऐकून त्याना वाईट वाटले.मदत करण्याचे त्यांनी मनोमनी ठरविले. सकाळीच तलाठी ऑफिसमध्ये जाउन तलाठयांची भेट घेतली व सविस्तर माहिती देत मदतीची अपेक्षा केली. तलाठयांनी सर्व शहानिशा करून मदत करण्याचे आश्वासन दिले. आठवडया भरातच बापूना तलाठी कार्यालयात पाचारण करण्यात आले. त्यांचे बँक अकाउंट नबर,आधार कार्ड नबर व आवश्यक कागदपत्रांची पुर्तता करून घेण्यात आली व त्यांच्या अकाउंटला २५,०००/– रूपयांची रकम त्वरीत सहाय्य म्हणून जमा करणेत आली.

बापुंची चिंता मिटली. बी,बियाणे व खते खरेदी करून वेळेत पेरणी झाली.पण कोणासही न सांगता किंवा न भेटता हे कसे झाले याचे बापूंना कोडे पडले. विश्वासकडे चौकशी करता सुन, श्वेता व व्याही भगवानराव यांच्या सहयोगाने मदत मिळाल्याचे समजले व कोडे उलगडले. बापूंनी सूनेचे कौतुक करित आभार मानले. यावर श्वेता अदबिने म्हणाली,"हे हो काय बापू.आभार कसले मानता.मी या घरची सून आहे. मोडकळीस जाणारे घर सावरणे व कुटुंबातल्या प्रत्येकाची काळजी घेणे हे माझे आद्य कर्तव्यच आहे.ते मी केले व करित राहीन. यासाठी माझ्या बाबांची मदत घेतली एवढेच."

आठवडया भरातच शेतातील कामे संपवून बापू व विश्वासची आई नर्मदाताई भगवान रावांचे आभार मानण्यास त्याच्या घरी भेटीसाठी गेले.भगवानराव व श्वेताची आई लता ताईंनी त्यांचे स्वागत केले. चहा पाणी फराळ झाला तसे नर्मदाताई म्हणाल्या. " तुमचे लई उपकार झाले बघा. न्हाय तर या साली पेरणी झालीच नसती बघा. वरीस फुकट वाया गेलं असतं. " भगवानराव मध्येच त्यांना अडवित म्हणाले, "अहो, ताई यात उपकार काय आणि आभार मानण्यासारखे तर काहीच नाही. मी मुलीच्या सांगण्यावरून मजपरीने सामाजिक काम केले. मुलीचा संसार सावरणे हे बाप म्हणून माझे कर्तव्य आहे. तिने कल्पना दिली नसती तर मला समजले पण नसते व मी काहीच केले नसते. सीमेवर जवान आणि शेतात शेतकरी यांच्या जोरावरच देशातील सर्व सामान्य जनता सुखाने जगते आहे. शासनास दोघांची काळजी आहे.शेतकरी म्हणजे आम्हा सर्वांचा अन्नदाता.तो शेतात राबला व धान्य पिकविले तरच या जनतेस दोन वेळ जेवावयास मिळेल अन्यथा उपाशीच रहावे लागेल.भाविक व कष्टाळू शेतकरी व्याही म्हणून माझ्या मनात तुमचे बद्दल व तुमच्या कुटुंबियां बद्दल नितांत आदर व प्रेम आहे.तुमच्या सारखे व्याही मिळाले हे आमचे भाग्यच समजतो.आपले प्रेम असेच कायम राहो व नाते दृढ होत जावो ही परमेश्वराजवळ प्रार्थना.

पेरण्या झाल्या. पाउस वेळेवर पडला. शेतकरी सुखावला. रोवलेली बीजे अंकुरली. मातीच्या कुशीतून डोके बाहेर काढून डोकावू लागली. आठवडया भरातच पिके चांगली तरारली. आपल्या हिरव्यागार दोन कोवळया पानांनी हवेच्या मंद झुळुकी सोबत मजेत डोलू लागली. मन हरकले. नेत्र सुखावले.

बापूंनी भगवानराव व लता ताईंना हिरवी गार झालेली शेती पाहण्यास बोलाविले. कोणतेही आढेवेढे न घेता सबबी न सांगता दोघेही रविवारी सकाळी शेतावर हजर झाले. नजर जाईल तेथपर्यंत निसर्गाने अंथरलेला हिरवीगार गालिचा पाहून मन आनंदले. नेत्र सुखावले.

एवढयात 'फिरत्या चाकावरती देसी मातीला आकार,विठ्ठला तू वेडा कुंभार' गाण्याची धून गात बापूंचा मोबाईल वाजला.बापुंनी 'जय हरी' म्हणत फोन उचलला

'बापू मी विश्या बोलतोय' तिकडून विश्वास चा आवाज आला.

'हां बोल बाळा, कसे हायती तुमी ? बापूंचा प्रश्न.

'आम्ही चांगले आहोत. तुमची अन्? मायची तब्येत कशी आहे ? विश्वासच प्रश्न.

'आमी बी ठीक हाय.आता आमी शेतावर आलोया. संग तुझे सासू सासरे बी हायती.पेरल्यालं समदं बीज अंकुरल हाय. लई झॅक हिरवगार दिसतया. ' बापू मोठयाने ओरडून सांगत होते.

बापू तुम्हाला पण एक खूप आनंदाची बातमी द्यायची आहे. असे म्हणत त्याने फोन श्वेता कडे देत म्हणाला. 'घे तू सांग' . श्वेता नाकारत म्हणाली 'नाही तू सांग' विश्वास परत म्हणाला, 'नाही तू सांग.' अशाप्रकारे दोघांमध्ये ३/४ वेळा 'तू सांग'चा संवाद बापुच्या कानावर पडला. 'तू सांग' चे पुढे गाडी जाईना म्हणून बापू लटक्या रागाने म्हणाले, अरे काय चाललंय 'तू सांग' कुणीबी सांगा पण लवकर सांगा की.

शेवटी श्वेताने फोन घेतला अन्?लाजत म्हणाली, "बापू तिकडे शेतात बी रूजलं अंकूर फुटला तसा आमच्या कडे पण

आमच्या प्रेमाला प्रेमांकुर फुटलाय."

"काय म्हटली पोरी मला काय बी उमजना. परत सांग ." बापू म्हणाले.

श्वेता परत तेच म्हणाली, "बापू आमच्या प्रेमाला प्रेमांकुर फुटलाय."

काहीच न कळल्यामुळे "वाईच थांब जरा" म्हणत फोन लताताईंकडे देत म्हणाले, "ताई ही पोरगी काय म्हणतेय मला काय बी कळत नाहीय. बघा जरा. "घे पोरी तुझ्या मायशी बोल. "

आईकडे फोन दिल्यावर तिने लाजतच आईला सांगीतले. "आई आमच्या प्रेमाला प्रेमांकुर फुटलाय. लवकरच तुम्ही सगळे आजी आजोबा होणार आहात". लता ताईंनी आनंदाच्या भरात फोन बंद न करता सर्वांना ही गोड बातमी दिली. बापू व नर्मदाताईंचे अभिनंदन केले. शेतात बीयांना फुटलेला अंकुर व श्वेताच्या उदरात त्यांच्या प्रेमाला फुटलेला प्रेमांकुर या मुळे सर्वजण सुखावले. चेहयावर तेज आले.

नर्मदाताई म्हणाल्या, "त्यास्नी म्हणावं आता लई जपावं लागन. कुठ घाई गर्दी करू नग. आराम कराया गावाकड चालली ये. आमी समदे हायती तुझी काळजी घ्याया." मोठयाने बोलल्यामुळे नर्मदाताईंचा सल्ला श्वेताला न सांगता ऐकू गेला. तिने "हो" म्हणून होकार दिला व फोन बंद केला.

आभाळ झाकाळले. आकाशात काळया ढगांनी गर्दी केली. मेघराजाने कोवळया अंकुरावर प्रेमाची वृष्टी केली. अंकुर प्रेमात न्हाऊन निघाली. वायाच्या झुळुके संगे डोलू लागली.सर्व मंडळी आनंदाने घरी परतली.

**- रत्नाकर वाणी**
**'प्राजक्त' बंगला, स.नं. १४/ १/२,**
**थिटे नगर, आय.टी. टॉवरचे मागे,खराडी, पुणे ४११ ०१४.**

■■■





कथा

विनायक दिनकर ढवळे

# दोन अधिक/दोन उणे



आनंदराव आणि आनंदीबाई दोघांच्या चेहऱ्यावर त्यांच्या नावाप्रमाणेच आनंद ओसंडून वाहत होता.सासरी आणि माहेरी आनंदोत्सव सुरु झाला होता. तिच्या सासू-सासऱ्यांना तिला कुठे ठेऊ अन कुठे नको असे झाले होते.सात वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर देवानं आनंदीबाईंची कूस उजवली होती ,इतकेच नव्हे तर प्रतीक्षेचे फळ म्हणून जुळ्या मुलांच्या रूपात , दुप्पट आनंद पदरात टाकला होता. सर्व देव-देव झाले,नवस-सायास झाले,ज्योतिषी ,बुवा,गंडे-दोरे,उपवास-तापास सर्व काही झाले .शेवटी देवाजीच्या मनात आले तेव्हाच त्याने सर्व कसर भरून काढली .

आनंदराव आणि आनंदीबाईंनी, दोन्ही मुलांच्या बाबतीत, त्यांचे जेव्हढे म्हणून लाड पुरवता येतील तेवढे पुरविले .प्रसंगी कर्ज काढूनही हौस-मौज पुरवली.वंशाचा दिवा नाही ,वंशाचे दिवे ना,त्यांचा हिरमोड करून कसं चालणार.त्यासाठी मुलांवर करावयाच्या संस्कारालाही फाटा द्यायचे धारीष्ट पती-पत्नीने दाखवले .आमची दोन अधिक

दोन ,चार चाकांची गाडी आहे असे आनंदराव टेचात सांगत. दिवस जात होते,महीने गेले आणि वर्षेही भराभर गेली .मध्यानीच्या सूर्याने पश्चिमेचा प्रवास सुरु केला.आनंदरावांनी पन्नाशी पार केली . मुलांची शिक्षणे झाली .घराच्या बाहेर पडलेल्या पिलांना ,घरी परतायची इच्छा होईना . थोरला शिक्षणासाठी परदेशात गेला .जाताना आनंदरावांचा बँक बॅलन्स संपवूनच .धाकटयाने त्याच्याच पावलावर पाऊल टाकले .आनंदरावांच्या घरावर कर्जाचा बोजा टाकून तोही परदेशी रवाना झाला.

आनंदरावांना आता वार्धक्याने गाठले होते.त्यातच नियतीच्या एका तडाख्याने ,त्यांच्या अर्धांगिनीला त्यांच्यापासून हिरावून घेतले .आता ते एकटे झाले होते. पूर्ण एकाकी.त्यांना साथ होती ,पूर्वीपासून त्यांच्या घरी असलेल्या त्यांच्या घरगडयाची .घरच्या दिव्यांनी केलेल्या अंधारात आशेचा किरण .त्याचं नावही ,त्याला सार्थ असेच "हनुमान" होते.तो त्यांचा अगदी दास झाला होता .आनंदरावांचं सगळं –सगळं तो बघत होता .सगळं म्हणायला त्यांच्यापाशी होतं तरी काय.त्यांच्या म्हातारपणाशिवाय . आनंदरावांना तो अगदी वडिलांसारखा मानत असे.

आनंदरावांचं दुखणं आताशा वाढू लागलं होतं.तुटपुंज्या पेन्शनीला खर्चाची वाढती भाजणी पुरी पडेनाशी झाली होती. आनंदरावांच्या सांगण्यावरून त्यानं मोठया मुलाला फोनही केला आणि परिस्थितीची पूर्ण कल्पना दिली.त्यानं थोडे पैसे पाठवलेही.पण औषधपाण्याच्या खर्चात ते कधी संपले ते कळलेही नाही .दुसऱ्या चिरंजीवांनी तर फोन घ्यायचेही कष्ट घेतले नाही.शेवटी तो दिवस उजाडला .आनंदरावांनी हनुमानाकडून पाणी घेतले ते शेवटचेच .त्यानं मनाचा खंबीरपणा दाखवत थोरल्या मुलाला फोन केला.

"हनुमान बोलतोय "

"काय रे सकाळी सकाळी फोन करतोयस .काही काम धंदा नाही का?

"मालक ,मोठे धनी नाही राहीले. तुम्ही ताबडतोब निघा.शेवटचे दर्शन तरी होईल "हनुमान

"हे बघ वेडपटपणा करू नकोस .मला भारतात यायला जमणार नाही .तूच सगळं बघ.मला नंतर खर्चाची रक्कम कळव.मी तुझ्या खात्यात पैसे पाठवीन आणि हो बाबांच्या गळ्यात सोन्याची चेन आहे ना,ती नीट काढून ठेव. मी ठेवतो आता."

हनुमान सुन्न झाला .वंशाच्या दोन दिव्यांच्या दोन तऱ्हा.त्याने आजूबाजूचे लोक गोळा केले. लहानपणीच पितृसुखाला पारख्या झालेल्या हनुमानाने आनंदरावांचे अग्निसंस्कार पार पाडले.त्यांना आपल्या पित्यासमान मानूनच.दवाखान्यातून बाहेर पडता –पडता सुहासिनी आकाशात तरंगायला लागली होती. तिच्या चेहऱ्यावर नावाप्रमाणेच हास्य फुलले होते. डॉक्टरांनी तिला तपासून गोड बातमी सांगितल्यावर तर ती आनंदाच्या शिखरावर गेली .लग्नाला ४–५ महिनेच झाले होते आणि लगेचच नवीन पाहुण्याच्या आगमनाची चाहूल लागली होती.घरी जाऊन सर्वाना गोड बातमी कधी सांगेल असे तिला झाले होते.

"सुहासिनी,बातमी तर गोड सांगितलीस .पण तुला एक सांगते.आमच्या घराण्यात सगळ्यांना पहीला मुलगाच झाला आहे.तेव्हा घराण्याची परंपरा पुढे चालू राहीली पाहीजे बरं का " सुहासिनीची सासू जरा तोऱ्यातच म्हणाली. शेवटच्या बरं का वर तिनं जरा जास्तच जोर दिला होता.

सुहासिनींच्या पुनर्जन्माची तारीख जवळ येऊ लागली होती.पहीले बाळंतपण आईकडेच करायचे ,अशी तिच्या सासरची रीत असल्याने ती आईकडेच बाळंतपणाला आली होती. प्रसवकळा सुरु झाल्या तशी ती हॉस्पिटलमध्ये दाखल झाली.

"अभिनंदन "आजी तुम्हाला दोन नाती झाल्या आहेत. प्रसूतिगृहाच्या दरवाजाच्या बाहेर येत नर्स उद्गारली.

बाळंतपण सुखरूप पार पडल्याने आणि लग्नानंतर वर्षाच्या आतच आजी झाल्याने सुहासिनीची आई खुश झाली होती.

तिन–चार तासांनी सुहासिनी पूर्ण भानावर आली .दोन्ही मुलींना तिनं छातीशी कवटाळले .आई झाल्याचा आनंद केवळ आईच उपभोगू शकते.तेवढयात तिला सासूचे बोलणे आठवले .तिच्या घराण्याची परंपरा खंडीत झाली होती. सुहासिनीला ठाऊक होते की ,मुलगा किंवा मुलगी होणेन ,हे सर्वस्वी पुरुषावर अवलंबून असते. हो पण अतिसुशिक्षित सासूला हे सांगायचे म्हणजे मांजराच्या गळ्यात घंटा बांधण्यासारखे होते. तिच्या सासूच्या लेखी सुहासिनीने दोन मुलींना जन्म देऊन बेरजेचे गणित सोडवण्याऐवजी वजाबाकीची गणित सोडवले होते.कारण मुलगी म्हणजे परक्याचे धन .प्रसूतीनंतर च्या दुसऱ्या दिवशी तिचा नवरा आला .मनात थोडा नाराजच होता . त्यालाही मनोमन वंवशाच्या दिव्याची इच्छा होती.

बाळंतपणानंतर सुहासिनी नवऱ्याबरोबर त्याच्या नोकरीच्या गावी गेल्याने सासू आणि जावांच्या रोजच्या त्रासातून वाचली .पण सासूच्या टोमण्याने तिच्या मनात घर केले होते. तिने दृढ निश्चय केला की, मुलींना चांगलं वाढवायचं ,खूप–खूप शिकवायचं आणि वजाबाकीची बेरीज करायची.तिच्या जावांच्या वंशांच्या कहाण्या वेळोवेळी तिच्या कानावर येत होत्या,पण त्याकडे ती जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत होती .तिची सासूही आता हे जग सोडून गेली होती.

वर्षामागून वर्षे गेली.सुहासिनीच्या दोन्ही मुली आता मोठया झाल्या होत्या.तिने केलेल्या उत्तम संस्कारामुळे मोठी डॉक्टर झाली.तिने स्वतःला समाजसेवेत झोकून दिले.धाकटीही तिच्या खांद्याला खांदा भिडवून समाजसेवेत अग्रेसर झाली.सुहासिनीला कृतकृत्य झाल्याचे समाधान लाभले .प्रत्येकाच्या आयुष्यात येणारा दिवस तिच्या नवऱ्याच्याही आयुष्यात आला .त्याची जीवनयात्रा संपली .जग रहाटीला फाटा देऊन शेवटच्या यात्रेचे सारथ्य करायला पुढे दोन जावई आणि मागे दोन्हीही मुली होत्या .दोन उणे नाही तर दोन अधिक दोन चार झाले होते. सुहासिनीने वजाबाकीचे नाही तर ,बेरजेचे गणित सोडविले होते.

**– विनायक दिनकर ढवळे**

**भ्रमणध्वनी :– ९१ ९३२२८११४५८**

■■■

कथा



# शेजारधर्म

सौ.भारती सावंत

आज बागेत गर्दी कमी होती. नेने,पाठक, कुलकर्णी आणि रेगे हे चौघे एकाच ऑफिसमधून निवृत्त होऊन एकाच एरियात रहायला आले होते.सकाळ आणि संध्याकाळ बागेत फिरून प्राणायाम,व्यायाम आणि थोडया गप्पा करून घरी परतत असत. यातील नेन्यांची आणि कुलकर्णींची मुले लग्नानंतर परदेशी स्थायिक झाल्याने मिस्टर आणि मिसेस एवढेच त्यांचे कुटुंब!चौघांच्या बायकाही कधी कधी संध्याकाळच्यावेळी बागेत यायच्या,पण वृद्धावस्था आणि गुडघेदुखीमुळे फिरणे कमीच व्हायचे.मग चौघी मिळून तब्येतीच्या कुरबुरी,जोडीदारांच्या कागाळ्या उगाळत बसत.पाठक आणि रेगे यांना मुलीच असल्याने त्या लग्न करून आपापल्या घरी सुखात राहत होत्या. नाही म्हणायला एखाद्या शनिवार रविवारी आई वडिलांना भेटायला चक्कर मारत पण त्यांच्याही नोकऱ्यां,मुलेबाळे यामुळे त्यांना क्वचितच वेळ मिळत असे.मुली रहायला आल्या की पाठक आणि रेगेबाई बागेत येत नसत. आपल्या मुलींना चारीचीज करून खायला घालावे असे त्या ठरवत.परंतु नेने आणि कुलकर्णी यांची मुले परदेशात असल्याने वर्षातून एकदाच महिन्याची सुट्टी घेऊन भारतात येत.पण महिन्याभरात घरात त्यांचा वेळ कमीच जाई. मित्रमंडळ, नातेवाईक,भटकंती आणि हॉटेलिंग यातच महिना कधी संपून जाई तेही कळत नसे. त्यामुळे मुले आली काय आणि गेली काय असे त्यांना काही फरक पडत नसे. नाही म्हणायला नातवंडांचा मात्र त्यांना चांगला सहवास मिळत असे.

मुले आणि सुना आपल्या मुलांना वृद्ध आई-वडिलांकडे सोपवून फिरायला,शॉपिंगला जात.त्यामुळे आजी-आजोबांना नातवंडांशी खेळायला,गप्पा मारायला खूप आवडायचे. त्यांच्या सहवासात ते

खुश असत.कारण त्यांना दटावणाऱ्या ममा डॅडापेक्षा लाड करणारे आजीआजोबा फार आवडत असत.चारी वृद्ध जोडप्यांचा वेळ एकमेकांच्या सहवासात चांगला जात असे. कोणी आजारी पडले की एकमेकाला मदत करायला ते नेहमी तत्पर असत.

एके दिवशी मात्र रेग्यांच्या छातीत अचानक दुखू लागले. यांच्या पत्नीला काय करावे तेच कळेना!मुलींना फोन करू की वृद्ध मित्रांना कळवू की पहिले डॉक्टरांना फोन करू? इकडे रेगे छातीवर हात दाबून विव्हळत होते.तेव्हा मिसेस रेग्यांनी आधी डॉक्टरांना फोन करत सांगितले,"डॉक्टर ताबडतोब या!माझ्या मिस्टरांना छातीत वेदना होत आहेत.चौघांही जोडप्यांचे फॅमिली डॉक्टर एकच असल्याने त्यापैकी कोणीही बोलवले की डॉक्टर हातातील काम टाकून पळत येत असत. येताना इतरांनाही फोन करून कल्पना देत.रेगे वहिनींनी डॉक्टरांना फोन करून आपल्या मुलीला फोन लावला पण तिचा फोन नॉट रिचेबल दाखवत होता. त्या मनाने घाबरून गेल्या होत्या. इतक्यात पाठक, कुलकर्णी धावतच आले. कारण डॉक्टरांनी पोहोचेपर्यंत त्यांच्या छातीवर हाताने दाब देण्याचे सांगितले होते. रेग्यांची अवस्था पाहवली जात नव्हती. वेदनेने ते अक्षरशः तळमळत होते. कुलकर्णी पुढे आले आणि रेग्यांच्या छातीवर आपले दोन्ही हात एकावर एक ठेवून दाब देऊ लागले.पाच मिनिटात डॉक्टरही तिथे पोहचले. त्यांनी रेग्यांना वेदनाशामक इंजेक्शन दिले आणि म्हणाले, " रेगे, तुम्हाला माईल्ड हार्ट अटॅक आला होता परंतु आता चिंता करण्याचे काही कारण नाही. तुम्ही आराम करा. मी लिहून दिलेली औषधे वेळेत खा" एवढे सांगून डॉक्टर जायला निघाले. रेगे वहिनी डॉक्टरांचे पुन्हा पुन्हा आभार मानत होत्याा.

थोड्या वेळाने रेग्यांना थोडाफार आराम पडला. रेगे वहिनींच्या जीवात जीव आला. त्यांनी मुलीला पुन्हा फोन लावला. आता मात्र मुलीने फोन उचलला रेगेवहिनी म्हणाल्या," अगं अनिता तू कुठे आहेस?तुला मी कधीपासून फोन करत होते परंतु तुझा फोन नॉट रिचेबल येत होता."आईचा फोन ऐकून रेग्यांची मुलगी ही काळजीत पडली. तिने विचारले, "आई तुम्ही सर्व व्यवस्थित आहात ना? का फोन केला होतास?" तसे रेगेवहिनी रडकुंडीला येत म्हणाल्या," अगं तुझ्या बाबांची तब्येत अचानक बिघडली पण तू काळजी करू नकोस. डॉक्टरांनी इंजेक्शन,औषध दिल्याने आराम पडला आहे.आपल्या कुलकर्णी आणि पाठक भाऊजींनी खूपच मदत केली.ऑफिस सुटल्यावर तू आरामात ये. सगळे काही ठीक आहे"अनितालाही बाबांची तब्येत ठीक असल्याचे ऐकून बरे वाटले. तिने आईला "ऑफिस सुटल्यावर येते" असे सांगत फोन खाली ठेवला. रेग्यांना औषधामुळे झोप लागली. तसे कुलकर्णी आणि पाठक त्यांना म्हणाले, " वहिनी तुम्ही काही खाल्ले आहे का?" त्यांनी "नाही" असे सांगताच कुलकर्णींनी आपल्या पत्नीला फोन करून रेगे पतीपत्नीसाठी जेवण घेऊन यायला सांगितले.

चौघांचीही आर्थिक परिस्थिती चांगली असल्याने त्यांनी घरकामासाठी मोलकरणी ठेवल्या होत्याा. पुढील पंधरा मिनिटात कुलकर्णीबाई गरम गरम जेवणाचा डबा घेऊन पोहोचल्या.


रेग्यांनाही जाग आली होती.सर्वांनी आग्रह करून रेगे पती–पत्नींना जेवण खायला लावले. दोघांच्या डोळ्यातून अश्रू पाझरत होते.आपल्या मित्रांची आज आपणास किती मदत झाली याचा विचार मनात येऊन रेग्यांनी आपले हात जोडले आणि म्हणाले, "अरे दोस्तांनो,फार धन्यवाद !आज तुम्ही नसता तर माझी अवस्था फार बिकट झाली असती. तुमचे उपकार मी कधीच विसरणार नाही". तसे तिघेही दोस्त म्हणाले, "अहो रेगे, धन्यवाद कसले करताय!आपण एकमेकांसाठी नाही करायचे तर कोणी करायचे? वेळ आणि प्रसंग सर्वांवर येऊ शकतो." पाठक म्हणाले, "गेल्या वर्षी माझ्या पतीची तब्येत खराब झाली तेव्हा तुम्ही किती पळापळ केली होती आणि कुलकर्णींचा बाईक अपघात झाला तेव्हा आपणच त्यांना डॉक्टरांकडे नेले होते. एकमेकां साह्य करू, अवघे धरू सुपंथ" असे म्हणून रेगे पती–पत्नींना आराम करायला सांगून सर्वजण आपापल्या घरी गेले.

रेगे पती–पत्नी आपल्या मित्रांच्या सहकार्याने भारावून गेले होते. आज रेग्यांना हृदयविकाराचा लहान झटका येऊन गेला होता पण प्रसंगावधान राखून पत्नीने डॉक्टरांना फोन केल्याने त्यांचे जीवावरचे संकट टळले होते.तसे मित्र आणि त्यांच्या बायकांनी त्यांना जेऊ घातले, सांत्वन केले. रेग्यांच्या डोळ्यांतून अश्रू पाझरत होते.ते आपल्या पत्नीचा हात हातात घेऊन म्हणाले, "रेणू आज तुझ्यामुळे माझा जीव वाचला. तुझे मानावेत इतके उपकार कमीच!" तसे रेगे बाई म्हणाल्या, "अहो उपकार कसले? मी तर माझे कर्तव्यच केले. माझ्या कुंकवासाठी मी इतकेही नाही करायचे तर मनुष्य धर्माचा उपयोग काय?" भारावलेल्या मनाने दोघे बसले असतानाच अनिता, त्यांची मुलगी धापा टाकतच घरी पोहोचली. आपल्या बाबांना सुखरूप पाहून ती आनंदाने आईच्या गळ्यात पडून रडू लागली. तिचे डोळे पुसत रेणुताई म्हणाल्या, "अग वेडे! आता तुझे बाबा ठणठणीत आहेत मग रडतेस कशाला? डोळे पूस आणि काहीतरी खाऊन घे" अनिताने येताना आईबाबांसाठी फळे, मिठाई, ड्रायफ्रूट्स आणले होते.ते आपल्या हाताने तिने बाबांना भरवले. आपल्या लेकीचे आपल्यावरील प्रेम पाहून वृद्ध दांपत्य सुखावले.मुलगी जन्माला आली तेव्हा वंशाला दिवा नाही म्हणून अनेक लोकांनी रेग्यांना टोमणे मारले होते पण आज तीच मुलगी वृद्ध आई–वडिलांची तब्येत बरी नसल्याचे कळताच धावत आली होती.आपल्या आई–बाबांची ती काठी झाली होती.रेणूताईंना आपल्या लेकीचा खूप अभिमान वाटला.आपल्या जीवनाचे सार्थक झाले असे वाटत त्यांनी पदराने आपले डोळे पुसले आणि तिला खाण्यासाठी काही बनवावे म्हणून उठून स्वयंपाकघरात गेल्या.

**– सौ.भारती सावंत**
**खारघर, नवी मुंबई**
**मो.बा.९६५३४४५८३५**

■■■

**कथा**



# जिद्दीलाली

सौ रमा परांजपे

"माणसाच्या अंगात जिद्द आणि चिकाटी असल्यास तो काहीही करू शकतो.मग तो अपंग असला तरी,याच उत्तम उदाहरण म्हणजे आपली "लाली"."

आजच्या कार्यक्रमात " लालीला" आदर्श शिक्षिका पुरस्कार मिळणार होता. त्यामुळे गावातील वातावरण खूपच आनंदी होते.कार्यक्रमाला खूपच गर्दी झाली होती.

शिक्षणमंत्री आले होते. अनेक मोठे लोक हजर होते. .

दोन्ही मुले "लालीला" व्हिलचेअर वरुन घेऊन आली. .टाळ्यांच्या कडकडाटात तिचे जोरदार स्वागत झाले. लालीकडे पाहून आमच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. आम्ही दोघे दिसताच ती खूपच गलबलली.

"लाली" स्वतःला सावर. आज तुझ्याआयुष्यातील सर्वात महत्वाचा आणि आनंदाचा दिवस आहे.

" हास, अशीच हसत रहा". माझं हे माझे वाक्य ऐकून लालीच्या चेहऱ्यावर हास्य आले.ते पाहून मला खूप समाधान वाटले.

बऱ्याच जणांची भाषणं झाली.सर्वांनी लालीचे खूप कौतुक केले.

मला भाषण करायला सांगितले.पण मला झालेल्या अतिआनंदामुळे मी काही बोलू शकलो नाही.

शेवटी लालीला बोलायला सांगितले.तिने तिच्या ह्या यशाचं सगळं श्रेय मला दिलं.आपल्या ह्या अवघड वाटचालीचा आढावा सांगितला.खूप छान भाषण केले.

शेवटी ती म्हणाली ,"आज गुरूजींनी भाषण केले नाही.त्याच

मला काहीच वाटल नाही.कारण हा आजचा दिवस खरतर त्याच्यामुळचं तर मला लाभला आहे.

म्हणजे त्यांनी" न बोलता,करुनच दाखविलं आहे."

कार्यक्रम सुरू होता.माझ्या डोळ्यांसमोर लालीच्या जीवनाचा चित्रपट उभा राहिला.

मी शिक्षणाधिकारी झालो.त्यामुळे मी सारखा फिरतीवर .

असेच मी एका शाळेत इन्स्पेक्शनला गेलो

. मी असा अचानक आलेला पाहून गुरुजींची चांगलीच तारांबळ उडाली.गुरुजींच्या चेहऱ्यावर खूप टेन्शन दिसत होते.

ते बघून मी म्हणालो काय हो,"तम्ही एवढ्या टेन्शन मध्ये का? काय झाल?"

काही झालं नाही हो सर,मुळात शाळेचा पट चाळीस त्यातले दहा ते पंधरा मुल फक्त हजर असतात. नेमकी त्यातली चार हुशार मुलं आज आलीच नाहीत..खरंतर ती दोन बहीण,भावंडं, शाळा बुडवत नाहीत.आज काय झाले आहे काय माहित?.

असु दे, असु दे, हो. तुम्ही अजिबात काळजी करू नका .अशी शाळा चालवणे म्हणजे सोपं काम नाही. किती अडचणीतून जावे लागते,त्याचा मी चांगलाच अनुभव घेतला आहे.

इथे जवळच माझं गाव आहे.नोकरीला लागल्या,लागल्या,मी पहिल्यांदा याच शाळेत हजर झालो.

अहो आता किमान तीस मुलं तरी येत आहेत आणि ती आपण होऊन शाळेत येतात तरी.!मला तर रोज मुलं गोळा करून शाळेत आणावी लागत होती.त्यावेळी मला मुलांना गोळा करताना, खूप बोलणी खावी लागायची.

मी मुलांना सकाळी दहा वाजता बोलवायला त्यांच्या घरी जात होतो.तेव्हा बायका–मुलांना घरी दडवून ठेवायच्या.

पण माझा आवाज आला की"लाली"नावाची एक चुणचुणीत मुलगी मोठ्या आवाजात रडायची. मग तिचं बघुन बाकीची मुलं शाळेत जायचं म्हणून खूप रडायची. त्यातल्या त्यात लालीला अभ्यासाची खूप ओढ होती.

मुल खूप जोरात रडायची.त्यामुळे मग मला शिव्यांचा भडिमार सुरू व्हायचा.

" ए मास्तरडया तुला काय कामधंदा न्हाई व्हय र.कशाला आमच्या पोरांस्नी साळेचं वंगाळ व्यसन लावतोयास."भडव्या तुज वाटूळ, वाटूळ, व्हईल."

आर बाबा,समदी पोरं साळंत गेली तर गुरढोर वळवाया कोन तुझा बाप येणार हाय व्हय?.

आमी काय उपाशी मरु व्हय.?

असं काय काय वाट्टेल ते बोलायचे. पण मी चिकाटी सोडली नाही. ते ऐकून घेऊन, मी मुलं गोळा करून शाळेत आणत होतो.

एकदा तर एका आजीनी मी दिसल्यावर माझ्या दिशेने दगड भिरकावला. तो माझ्या डोक्याला लागला.चांगली मोठी खोप पडली. खूप रक्त यायला लागलं. मी बेशुद्ध पडलो.मग मात्र सगळी खूप घाबरली.मी थोड्या वेळाने सावध झालो.जखमेवर हळद लावुन पट्टी बांधली.

सगळी घाबरुन उभी होती.. त्यांना वाटलं आता मी पोलीसांना बोलावतो तो की काय!सगळे मला नमस्कार करून म्हातारीच्या वतीने माफी मागू लागले.

आमची चुकी झाली.आमास्नी एक डाव माफी करा. पोलिसास्नी बोलवू नगसा.ते लै मारत्याती.

ठीक आहे. "पण माझी एक अट आहे".उद्यापासून मुलांना रोज शाळेत पाठवायचं. नाहीतर मी पोलिसाला बोलवणार.

नग, नग,झाडून समदी पोरं साळंत येत्याल.पर पोलीस नग.

मग त्या भितीनं मुलं शाळेत येऊ लागली.

अहो,त्यांची तरी काय चूक.घरी खायची भ्रांत, कोणाच्या अंगात धड कपडा नाही, पायात चप्पल नाही. परिस्थितीमुळे तेही गांजलेले. त्यांना शिक्षणाचे महत्व काय कळणार?मग मात्र मी ठरवले.आपण जास्ती, जास्त शिक्षणाचा प्रसार करायचा.

माझ्या घरची परिस्थिती चांगली होती.मी रोज मुलांना काहीतरी खायला देऊ लागलो. अजून मधून कपडे पुरवू लागलो. खाण्याच्या ओढीने मुलांना अभ्यासाची गोडी लागली.

सगळ्या मुलांच्यात लाली खूप हूषार होती. शिकवलेले सगळे तिला लगेच समजायचं.गणितं तर पटापट सोडवायची.माझ्या आई–वडीलांना ती खूप आवडत होती.माझी आई शिवणकाम करत होती.ते ही लाली शिकली.आईला तिचा फार अभिमान वाटायचा. लाली संसार खूप छान टुकिने करेल असे आई म्हणायची.

काही वर्षानी माझी बदली झाली. आम्ही जाणार म्हणून लाली खूप रडली. पण माझा नाईलाज होता.मी दुसऱ्या गावी हजर झालो. मग माझ्या लांब–लांब बदल्या होत गेल्या. त्यामुळे या गावाशी काही संबंध आलाच नाही.

आता त्या मानाने शाळेत खूपच बदल झाला आहे.हे बघून बरं वाटलं .

अहो परवा" माझी आई" निबंध स्पर्धेत तुमच्या शाळेतील मुलांचा पहिला नंबर मिळाला. तो मुलगा कुठे आहे? त्यानं खुप छान लिहिलाय निबंध. बोलवा ना त्याला,!

हो, हो त्याला बोलवायलाच मुलांना मी पाठवलं आहे.

मुलं शिरपाला बोलवायला गेली होती.

अरे,शिरप्या शाळेत मोटं साहेब आले हायेती.तुला बुलिवलय.

मी येणार नाही.

अरे दोस्ता,चल किर .गुरुजी वाट बगत्याती.

मला अगोदर माझा काल तुम्ही दडवलेला डबा आणून द्या!.

आणुन देतो चल .

मग शिरपा त्याची बहीण. बाली आली.

पण ती दोघं दारातच उभी राहिली.

नाम्या अगोदर माझा डबा दे.

मग न्याम्याने डबा दिला.

डबा बघून शिरप्याला फार आनंद झाला.होता. ते त्याच्या

चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते.तो सारखा डबा छातीशी धरून नमस्कार करत होता.

गुरुजी त्याच्याकडे बघत होते. त्यांनी विचारले," "का रे आज शाळेत का आला नाहीस" ?

अहो, सर काल पोरांनी माझा डबा दडवला होता.त्याचा मला फार त्रास झाला.

अरे एवढं काय आहे त्या डब्यात?

तो डबा मला माझ्या आईने खूप विश्वासाने दिला आहे. तिच्या त्यात खूप आठवणी आहेत.ती लहानपणी शाळेत जाताना फडक्यात भाकर घेऊन जायची.नुसता भाकरीचा तुकडा बघून सगळे हसायचे.पण ती तरी काय करणार घरात काही नव्हतंच.

ते गुरुजींनी बघितले.आई अभ्यासात हुशार होती.मग तिच्या गुरुजीने तिला डबा बक्षीस दिला. तो डबा जर हरवला तर आईला किती वाईट वाटेल."आधिच माझी आई खूप दुःखीआहे. त्यात ती पांगळी आहे.त्यात बापू जेलमध्ये आहे."

हॅडमशीनवर माझी आई कपडे शिवती. तिला कशाला त्रास द्यायचा. आमच्यावर खूप प्रेम आहे. ती आम्ही शिकावे म्हणून खूप कष्ट करते. आमचा अभ्यास घेते.तिनच आम्हाला शुध्द बोलायला शिकविल.

त्याच्या हातातला डबा साहेबांना ओळखीचा वाटला. तेवढ्यात शिरपाची बहीण "बाली" आत आली.

तिला बघता क्षणी साहेब एकदम उभारले.

अगं, "लाली" असे ते म्हणाले.

अहो, मी "लाली" नाही. लाली ची पोर बाली आहे.

साहेबांनी आईचे नाव घेतले. ते ऐकून दोघाना धक्का बसला आणि आनंदही झाला.

तुम्हाला माझी आई ठाऊक आहे? तुमची ओळख आहे?बालीने विचारले.

हो मी तिला शिकवत होतो. आईला बोलवतेस का? मला तिला भेटायचं आहे.

हे ऐकून बाली रडू लागली. माझी आई पांगळी आहे. ती पायऱ्या चढू शकत नाही.

अगं,मग रडतीस कशाला. मी तुमच्या घरी येईल.

हे ऐकून "बाली" आनंदाने नाचू लागली.

अहो,दुसरी दोन मुले का आली नाहीत?

लगेच भिमा ओरडला ,अव गुरुजी ती दोघबी भिकारी झाली.

भिकारी? म्हणजे काय?

अहो सर तो एक जोकच आहे. माझी आई निबंध स्पर्धेत " स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी"हे वाक्य आले तेव्हापासून कोणाचीआई गेली की ही सर्वजण तो भिकारी झाला असे म्हणतात.

सर मी त्याना खुप समजावले.पण काही उपयोग नाही.

मग आम्ही बालीच्या घरी गेलो. दारातच लाली बसली होती. तिने मला लगेचच ओळखले.

गुरुजी म्हणत,तिने माझ्या पायावर डोकं ठेवून नमस्कार केला. माझं मन गलबलून गेलं.

तिला धड काही करता येत नाही, ते बघून मला खूप वाईट वाटलं .एवढी हुशार, देखणी, "लाली" तिची काय ही अवस्था. मी म्हणालो. लाली हे काय झाल. ?

ती रडू लागली. बाळ रडू नको. काय झालं ते सांग.

तुमची बदली झाली. तेव्हा मी सांगत होते मला शिकायचे आहे. पण बापाने माझे लग्न केले.मला शिकायचे होते. तेव्हा नवरा म्हणाला, लग्नानंतर शिकवीन. पण कुठले काय त्याला शिकलेली बायकोच नको होती. कसा तरी संसार चालला होता.एकदा मी पेपराचा पडलेला कागद मी वाचत होते. नवरा आला माझे लक्ष नव्हते. त्याचा त्याला राग आला.

"आली मोठी शहाणी साहेबीण"असं म्हणत माझ्या पायावर जोरात कुऱ्हाड मारली.मी जीवाच्या आकांताने ओरडले. तो पळून गेला.

लोकांनी मला तालुक्याच्या दवाखान्या नेले. औषध-पाणी सुरू झाल. माझा निम्मा पाय तुटला होता. त्यामुळे मी चालू शकत नाही.

नवऱ्याला पोलिसांनी पकडले. खुनाचा प्रयत्न केल्यामुळे त्याला जन्मठेपेची शिक्षा झाली.

मी ही अशी.पदरात दोन पोरं.पण तेव्हा तुमच्या आईने मला शिवण शिवायला शिकविले होते.त्याचा उपयोग झाला.मी बचत गटाकडून अपंग म्हणून शिवण मशिनची मागणी केली.मी शिवण शिवुन पोरांना सांभाळते आहे. मी शिकले नाही तरी मी मुलांना मोठं करणार .त्यांना शिकविणार मी त्यांचं नशीब बदलणार. लाली आत्मविश्वासाने बोलत होती.

तिचं बोलणं ऐकून मला तिचा फार अभिमान वाटत होता. आता तू काही काळजी करू नको. पुढच्या महिन्यातच मी रिटायर्ड होणार आहे.मी आमची फॅमिली इथेच राहायला येणार आहोत. आता मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी माझी. आणि हो तू पण पुढे शिकायचंस अभ्यास करायचा. मी तुला नोकरी लावून देणार.

तिच्या डोळ्यात पाणी आले.मी अभ्यास करीन.मनापासुन करीन. मला शाळेत नोकरी करायची आहे. ते माझं स्वप्न होतं.

जरी मी चालू शकले नाही, तरी पांगुळगाड्यावर बसून मी शाळेत जाईन.

तिचं हे स्वप्न मी पूर्ण करायचे ठरवले. म्हटल्याप्रमाणे ती शिकली.ह्या वयात ,इतक्या वर्षांनंतर आणि अशा अवस्थेत शिकणं.

"खरंच तिच्या जिद्दीला त्रिवार प्रणाम".

अपंगाच्या संस्थेतर्फे तिला शाळेत नोकरीही मिळाली.तिचा "व्हिलचेअर" वरुन नविन प्रवास सुरू झाला. मुलं ही चांगली शिकली आणि आज हा तिचा आदर्श शिक्षिका सोहळा पहाताना माझे मन भरुन पावले.

"माझा आनंद गगनात मावेनासा झाला होता"

माझी अवस्था बघून माझ्या सौ ने मला सावरले.मी भानावर आलो.

"परमेश्वराची लिला अगाध आहे".याची प्रचिती आली..,......

**सौ रमा (वसु) गोपाळ परांजपे.**
**सातारा ४१५००२, मोबा.-९८५००७६९२६**

■■■

कथा

# मितभाषी

व्यंकटेश देवनपल्ली



मृदुला किचनमधे होती पण आज रविवार असल्याने शाळेत वेळेत पोहोचण्याची घाई गडबड नव्हती. चिरंजीव पुलकित कालच मामाच्यासोबत आजोळी गेला होता. गेला महिनाभर मुकेश कुठल्यातरी प्रोजेक्टचं काम घरी बसूनच करतोय त्यामुळेही घाई नसते.तो रविवारीदेखील लॅपटॉपवर बिझी असतो.तिने आतूनच हाक मारली, "अहो, ब्रेकफास्टला येताय ना." मुकेश हॅन्डवॉश करून डायनिंग टेबलाजवळ  येऊन बसला. ती कृतकोपाने म्हणाली, "अहो, वर्क फ्रॉम होम आहे म्हणून काय रविवारीसुद्धा काम करायचं असतं का? बरंब्रेकफास्ट झाल्यानंतर माझ्यासोबत मंदिरात याल का?" यावर मुकेशने काहीही न बोलता होकारार्थी मान डोलावली.

त्यानं निमूटपणे ब्रेकफास्ट संपवून टाकलं आणि मृदुलेकडे पाहत शातपणे म्हणाला, "मृदू, मी तुझ्याशी कधीच खोटं बोलत नाही. मी जे हे वर्क फ्रॉम होम करतोय ना, ते काम कंपनीचं नाहीये. गेला महिनाभर मी कंपनीला दांडी मारलीय. एका प्रायव्हेट क्लाएंटचा जॉब करतोय. हा जॉबही दीड लाखाचा आहे. असो. तू तयार होऊन ये, आपण मंदिरात जाऊ या." ती आ वासून पाहत राहिली.तो कामावर कशासाठी जात नाहीये हे विचारायला तिचं मन धजावलं नाही. इतक्या वर्षात पहिल्यांदाच तिचं मन सैरभैर झालं होतं. 'हा माणूस गेला महिनाभर घरीच आहे, पण हे एका शब्दानंही बोलला नाही' या गोष्टीचं तिला वाईट वाटलं. थोडयाच वेळेत ती तयार होऊन आली आणि तिने थेट प्रश्न केला, "अहो, तुम्ही कामावर का जात नाही. त्याचं काय कारण आहे, एवढं तरी मी तुम्हाला विचारू शकते ना?"

"अगं, दुसरं काय, कंपनीतलं विषाक्त वातावरण! अधिकारी वर्गाचा पक्षपातीपणा, श्रेय लाटण्यासाठी लोकांची चालत असलेली किळसवाणी धडपड पाहून मला अक्षरशः शिसारी आली. मृदू, त्या वातावरणातून बाहेर पडण्यासाठी मी फक्त महिना-दीड महिन्याची गॅप घेतली आहे. नोकरी सोडलेली नाहीये," मुकेशनं सहजपणे सांगून टाकलं.

"अहो, आजकाल सगळ्याच क्षेत्रात कमी अधिक प्रमाणात

हेच सगळं सुरू आहे. साहेबांचे लांगुलचालन करून,कमी वकूब असलेली माणसं पदोन्नती घेऊन वरच्या जागा पटकवतात हे निर्विवाद खरं आहे. त्यामुळे असं घाबरून पळून जायचं नसतं. आपलं काम इमाने इतबारे करून अशावेळी शांत राहणे एवढंच आपल्या हाती असते. फार तर जे सहकारी आपले मनापासून समर्थन करतात ना, अशा लोकांच्या संपर्कात राहून स्वतःसाठी शांतता शोधायचा प्रयत्न करायचा, एवढंच."

"पण मृदू, इतर क्षेत्रांपेक्षा आमचे ऑटोमेशन क्षेत्र थोडे वेगळे असते. विविध उद्योगांतील वस्तु निर्मितीत जे शारीरिक श्रम पडतात, ते श्रम कसे कमी करता येईल आणि त्यांची कार्यक्षमता कशी वाढवता येईल ह्यासाठी आमचा कटाक्ष असतो. श्रम करण्यासाठी स्वयंचलित प्रणाली विकसित करणे हे महत्वाचे उद्दिष्ट असते. उदाहरणच सांगायचं झालं तर, तिरूमलामधे मोठया प्रमाणात लाडू बनवायचे असतात तर ती प्रक्रिया सुलभ पद्धतीने कशी करता येईल त्यासाठी यंत्रणा निर्माण करणे. त्यासाठी मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल आणि सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग सारख्या विविध इंजिनिअरिंग शाखांमधील तत्वे एकत्रित करून ही प्रणाली तयार करायची असते.

आमचे चीफ इंजिनिअर वर्मा सांगतील त्या इक्विपमेंट्सच्या डिजाईन मी तत्परतेने करत होतो. प्रत्यक्षात अंमलात आणण्यात यशस्वी होत होतो. पण त्याचं अख्खं क्रेडिट मात्र चीफ इंजिनिअर वर्माकडे जात होतं. काही वेळेला वर्मा त्यांच्या गुडबुक्समधील लोकांची नावं ते पुढं करत होते. बोर्ड ऑफ डायरेक्टरच्या मीटींगमध्ये मी बनवलेले डिझाइन्स सादर करून ते वाहवा मिळवत होते. हे सगळं काही सहकारी मित्रांनी माझ्या कानावर घातलं.काही वेळेला आपली गैरहजेरीदेखील मॅनेजमेंटला आपलं महत्व जाणवून देण्यासाठी पुरेशी असते म्हणून मी ही गॅप घेतलीय.राजिनामा दिलेला नाहीये." मुकेश पहिल्यांदाच इतकं घडाघडा बोलत होता.

"अहो,वाघाचं कातडं पांघरून लांडगा कधी वाघ होत नसतो, वर्मासारखी माणसं कधी न कधी उघडे पडतातच.बावनकशी सोनं ते कुठेही वितळवलंत ना,ते सोनंच असतं,असो.चला, निघू या."

मृदुला निमूटपणे स्कूटरवर बसली. तिच्या डोक्यात मुकेशचाच विचार घोळत होता.मुकेश अभ्यासात हुशार होता. फिजिक्स आणि मॅथ्स या विषयात टॉपर. पुढे इंजिनिअरिंगमधेही डिस्टिंक्शन. आयआयटीमधून ऑटोमेशन इंजिनिअरींगची मास्टर्स डिग्री मिळवली. त्याने प्राध्यापकी जरी केली असती तरी भावी पिढीतल्या कित्येक मुलांचं कल्याण झालं असतं. पण त्याचा मुखदुर्बळ स्वभाव नडला. त्याला नाशिक सोडायचं नव्हतं. केवळ एका मित्राच्या भिडेखातर आणि पार्टनरशीपच्या आमिषाने त्यानं त्या फर्ममध्ये ऐन उमेदीची सात वर्षे वाया घालवली. पार्टनरशीप तर लांबच, राब राबून त्याच्या पदरी काहीच पडलं नाही. भरभराटीत चालणारी कंपनी भागीदारांच्या आपापसातल्या तंटयामुळे फर्म डबघाईला आली. मुकेशनं ठरवलं असतं तर लार्सन ॲन्ड टुब्रो, सिमेन्स इंडियासारख्या कुठल्याही ऑटोमेशन कंपनीत सहज वर्णी लागली असती. पण नाही. त्याने स्वतःला नाशिकच्या परिघात बंदिस्त करून ठेवलं होतं. युनिक इक्विपमेंट्स प्रा. लिमिटेड कंपनीत अर्ज केला. लगेच त्यांच्या एचआरकडून फोन आला आणि त्याच दिवशी त्याला नेमणुकीचं पत्र मिळालं. आजही स्वतःच्या हिमतीवर एक महिन्याचा गॅप घेऊन लाख–दीड लाख कमवतोय.

माझे बाबा म्हणजे खरे रतपारखीच. बाबा शिक्षणखात्यात होते आणि मुकेशचे वडील आदर्श शिक्षक पुरस्कार विजेते. त्यामुळे ते एकमेकांना ओळखायचे. मुकेशचं स्थळ सांगून आलं. त्यावेळी ते नुकतेच मास्टर्स डिग्री घेऊन आले होते. त्यांच्याकडे नोकरीही नव्हती. मी बीए, बीएड करून प्राथमिक शिक्षण मंदिरात मी शिक्षिका म्हणून रुजू झाले होते. मामंजीनी मागणी घालताच माझ्या बाबांनी एका शब्दाचाही विचार केला नाही. आमच्या ते लग्नासाठी तयार झाले. एवढा उच्च विभूषित मुलगा आहे तर आज न उद्या कुठंही नोकरी मिळेलच. मुकेशविषयी माझ्या बाबांना केवढा विश्वास होता. मामंजीनीदेखील लेकीच्या मायेनंच वागवलं. एकदा बोलता बोलता त्यांनी जे सांगितलं ते मनावर कायमचं कोरलं गेलं. 'मृदुला, मुकेशला सांभाळून घे. आईच्या प्रेमाला पारखा झालेला पोर आहे. त्याला आईची माया दे, कधीही दुखावू नकोस.' त्यामुळे मी मुकेशला कधी एका शब्दानं टोकलं नाही. अर्थात मुकेशही माझी तेवढीच काळजी घेतो. त्या विचाराच्या तंद्रीत ते काळाराम मंदिराजवळ येऊन पोहोचले. उभयतांनी दर्शन घेतलं. बाहेर येताच, "मी अभिषेकाची पावती करून येते, तुम्ही पार्किंगमधून स्कूटर बाहेर काढा." असं मृदुलेनं सांगितलं.

काळाराम मंदिराच्या काऊंटरवर अभिषेकाची पावती करताना तिनं मुकेशचं संपूर्ण नाव सांगितलं, येत्या सोमवारी अभिषेक करा, असं म्हटल्यावर, तिच्या मागे उभे असलेल्या गृहस्थाच्या डोक्यात ओळखीचं काही चमकून गेलं. मृदुला मागे वळताच, त्या गृहस्थाने विनंतीवजा प्रश्न केला, "वहिनी, माफ करा. मुकेश कुठं आहेत? तुम्ही दोन मिनिट थांबाल का? मला त्यांच्याविषयी थोडं बोलायचं आहे. मी देणगीची पावती भरून आलोच." मृदुला भांबावून गेली कारण तिनं त्यांना ओळखलं नाही. त्या गृहस्थाने पटकन पाचशेच्या दहा नोटा काऊंटरमध्ये सरकवल्या, नाव विचारताच त्यांनी 'कृपायाचक' इतकंच लिहा असं सांगितलं. देणगीचे पैसे भरून होताच ते मृदुलाकडे आले आणि म्हणाले, "तुम्ही मला ओळखलं नसणार. मी नितीन नार्वेकर, युनिक इक्विपमेंट्स."

युनिक इक्विपमेंट्स हे नाव ऐकताच, तिनं पटकन सांगितलं, "हो, मुकेश इथंच आहेत. ते बाहेर स्कूटरवर थांबले आहेत,माझी वाट पाहत."असं म्हणताच नितीन लगबगीने पुढे निघाले.स्कूटरवरून बसून राहिलेल्या मुकेशकडे हस्तांदोलनासाठी हात पुढे करत ते म्हणाले, "मी नितीन नार्वेकर, एमडी युनिक इक्विपमेंट्स." मुकेश एकदम दचकून उभा राहिला. दोन्ही हात जोडून त्याने सस्मित मुद्रेने त्यांना नमस्कार केला.

"मुकेश, कालपरवाच तुमची भेट घ्यायचीच होती. पण

जमत नव्हतं.आपली भेट काळाराम मंदिराजवळ व्हायची होती. असो. तुम्ही आजकाल कंपनीच्या फ्लोअरवर येत नाही,असं कळलं. काही अडचण आहे का?"मुकेशनं काही उत्तर दिलं नाही,ते मृदुलाकडं पाहत म्हणाले, "वहिनी, मी तुमच्या घरी चहा घ्यायला येतोय, चालेल ना?"मृदुलासाठी हे सगळं अनपेक्षितच होतं. "मुकेश,तुमच्या स्कूटरची चावी माझ्या ड्रायव्हरकडे द्या.तो पार्किंगमधे ठेवून येईल.तोच नंतर इकडे येऊन तुमची स्कूटर घेऊन येईल. तुम्ही दोघे कारमधे बसा."असं म्हटल्यावर त्या दोघांना काहीच बोलता आलं नाही. ड्रायव्हर येताच कार मुकेशच्या घराकडे निघाली. मुकेशचं घर अतिशय नीटनीटके ठेवलेले होते.सगळे कसे जागच्या जागी. नाही म्हणायला एका कोपऱ्यात छोटया छोटया सुबक अशा कित्येक मोटारी हारीने उभ्या होत्या.

"शांताराम, तुम्ही रिक्षा घेऊन जा आणि पार्किंगमधून साहेबांची ती स्कूटर घेऊन या." असं नितीनने सांगताच ड्रायव्हर निघून गेला.

"वहिनी, आम्ही दोघं गप्पा मारतो तोवर तुंम्ही झकासपैकी चहा करा. बाकी काही नकोय." फिल ॲट होम करण्यासाठी नितीन म्हणाला.

मृदुला आत जाताच त्यांनी बोलायला सुरूवात केली, "मुकेश, मला माहीत आहे की तुम्ही मितभाषी आहात ते.आज मी तुमच्या घरी आलोय ते एका कंपनीचा एमडी म्हणून नव्हे तर एक मित्र म्हणून आलो आहे असे समजा. माझ्याशी मोकळेपणाने बोलायला हरकत नाही. बरं,मला आधी हे सांगा की तुमचं नाव मुकेश कसं? सहसा महाराष्ट्रीयन लोकात अशी नावं नसतात."

मुकेशन पहिल्यांदा तोंड उघडलं. "सर माझे बाबा मुकेशचे जबरदस्त फॅन होते. त्यांच्यावरच्या प्रेमापोटी त्यांनी माझं नाव मुकेश ठेवलं. मुकेशची गाणी ऐकणे, एवढाच त्यांचा छंद होता. त्या छंदातच ते परमानंद शोधायचे. 'दिल जलता है तो जलने दे' पासून ते 'सजन रे, झूठ मत बोलो खुदा के पास जाना है'अशी एकाहून एक जबरदस्त गाणी ऐकून ऐकून मलाही पाठ झाली आहेत.आई लहानपणीच गेली. बाबांनी पुन्हा लग्न केलं नाही. घरात ते आई आणि बाबा ही दोन्ही पात्रं लीलया पार पाडायचे. वडील आणि मुलगा एवढंच आमचं विश्व होतं. कुणी भावंडं नाहीत.बाबा हाडाचे शिक्षक होते. विद्यार्थ्यांच्यात लोकप्रिय शिक्षक होते.मी जे काही शैक्षणिक यश मिळवलं आहे ते केवळ त्यांच्यामुळेच. गेल्या वर्षी ते अचानक गेले आणि माझं भावविश्वच कोलमडून गेलं." काही काळ स्तब्धता पसरली. किचनमधेही त्या दोघातलं संभाषण मृदुलाच्या कानी पडत होतं.ती चहा बिस्कीटं घेऊन आली आणि त्यांच्या सोबतच बसली.

चहा घेऊन होताच नितीन उत्साहात म्हणाले, "वहिनी, चहा अतिशय फक्कड झालाय. बरं, आता ताकाला येऊन मी भांडं कशाला लपवू? मी सरळच विचारतो. मुकेश कधी येताय कंपनीच्या फ्लोअरवर? जे काही घडलं होतं, ते मला सगळं कळलं आहे. वर्मा साहेबांचं बिंग फुटताच ते कंपनीला राजिनामा देऊन गेले आहेत. आता तुम्हाला चीफ इंजिनियरची जागा सांभाळायची आहे. 'सॅलरी चाळीस लाख पर ॲनम.'कंपनी तुमचीच आहे असं समजा. एक लक्षात ठेवा, 'दिल जलता है तो उसे जलने नहीं देना है,उसे बुझाने की कोशिश करना है. तसंच 'आंसू न बहा' इथवर ठीक आहे, पण योग्य ठिकाणी 'फरियाद'तर केलीच पाहिजे. जसं अन्याय करणं हे पाप आहे, तसं अन्याय सहन करत राहणं हेदेखील मोठं पाप आहे. मुकेश, असं मितभाषी राहून चालणार नाही. अहो, बोलणाऱ्याची मातीही खपते, परंतु न बोलणाऱ्याचे मोतीही खपत नाहीत.ही म्हण तर तुम्ही ऐकली असेलच. आजकाल केवळ मेहनत करून फळ मिळत नसते. वन हॅज टू बी स्ट्रीट स्मार्ट. असो. कंपनीच्या फ्लोअरवर मी तुमची आतुरतेने वाट पाहतो. " तेवढ्यात शांताराम स्कूटर घेऊन आला.


"सर, नक्की येतो. प्रत्यक्षात कंपनीच्या एमडीने अशी प्रेमळ साद घालावी याहून दुसरे मोठे भाग्य नाही. जय श्रीराम!" नितीनना निरोप देण्यासाठी उभयता पती-पत्नी आनंदाने गेटच्या बाहेर आले. धूळ उडवत सुसाट वेगात निघालेली नितीनची कार नजरेआड होईपर्यंत ते दोघेही पाहत उभे राहिले.

**- व्यंकटेश देवनपल्ली,**
**९५३५०२२११२**

■■■



कथा



# आशिर्वाद...

पुरुषोत्तम प्ररोहणकार

सायंकाळी प्रदर्शनीत मी फिरत होतो.घरी,एकटा, करमत ही नाही.आणि,जय घरी येणार नव्हताच एवढयात ! त्याची नाटकाची तालीम सुरु होती.तो येईल तर, रात्री, बाराच्या पुढे !तरीही,मी–स्वयंपाक केला. माझं आणि जयचं जेवण टेबलवर मांडून ठेवलंय. आल्यावर तो जेवण–मी–गरम–करेन !

हा मधला कालखंड – माझ्या सारख्या म्हाताऱ्याला फार त्रासदायक जातो.

त्यात माझी जात–लेखकाची–!

मी कथा–कादंबऱ्या लिहिण्यातच मग्न असतो. त्या कथा कादंबरीतील नायक–नायिकेचं प्रेम, त्याचं जीवन उत्तरार्ध त्याच्या जीवनाचा–त्यातल्या त्या मी आनंद उपभोगतो.सांगायचं तर,मी प्रदर्शनीतच हिंडत होतो.आणि हिंडत असतांना एक तरुणी मुलगी माझ्या अंगावर पडली.

“माय गॉड..... व्हॉट–नॉन्सेस–

ती बाजूला उभी असलेल्या मैत्रिणीवर भडकली–

“लाज–वाटायला पाहीजे तुला?सरळ एका म्हाताऱ्या माणसावर जाऊन पडले मी !“

“सॉरी,कांचन.“ती बाजू सावरु लागली, अग, ही,माया–स्नेहा आहे ना? हसता–हसता मला लोटलं–अन्? मी तुझ्या अंगावर जाऊन पडलेय. अन्? त्या अंकलवर.“

त्या सगळ्या मुली माझ्या जवळ आल्या.

“अंकल...त्याचं काय झालं?“

“मला कळलं बेटा ?

“कांचनला माफ करा अंकल !“

आणि–

कांचन रडूं लागली होती.

शेवग्याची शेंग दिसावी तशी सज्यावली होती कांचन ! फार

गोरी नाही. फार काळी नाही अशी मध्यम स्वरुपाची मुलगी ! वय– जास्तीत जास्त सोळा–सतरा वर्षाचं असावं.तिचे डोळे केवढे बदामी होते.

मी–त्या प्रदर्शनी मधून–माझ्या जय साठी वाढदिवसा निमित्त एक सप्रेम भेट घेतलीय.सोन्याची साखळी !नेट, वीस

हजार-पाचशे नोटा मोजल्यात.आणि-प्रदर्शनी बाहेर असलेल्या स्टॉलवर मिठाई, गुलाबजाम, बर्फी, खारा, फरसान वगैरे साहित्य घेतले.आणि-ॲटोरिक्षा करुन मी घरी आलो.त्यावेळी रात्रीचे साडे आठ वाजले होते.सतरा आक्टोबर !'जय चा जन्मदिवस !

म्हणून,आज त्याच,कार्यक्रमाचं आयोजन सुरु !

रात्री कार्यक्रमाला जय'चे सर्वच मित्रमंडळी आली होती. काही त्याच्या वर्गातल्या मुलीही आल्या होत्या. आणि त्यात आली होती मला प्रदर्शनात भेटलेली कांचन-हि !

'अंकल- तुंम्ही.....

"हो- बेटी......

"मला ओळखलं ?

"कालच प्रदर्शनात आपला परिचय झाला ना ?"

"मला वाटलं नव्हतं आज अशी अचानक पुन्हा आपली भेट होईल म्हणून !"

"मला हे सारं अनपेक्षितच आहे." पार्टी दोन वाजेपर्यंत रंगली. सगळी मंडळी गेली आणि एकटी राहीली कांचन !

"बाबा मी कांचनला तिच्या घरी सोडून येतो.

"कांचनच्या घरी ......'

"माझं घर दूर आहे. वस्ती सोडून आता एवढी रात्र झाली. एकटीला भिती वाटतेय."

"पण तुझ्या घरी हा जय आला तर तुझे आई-वडील......

"काहीही म्हणणार नाही. उलट त्यांना आनंद वाटेल. आणि तस्सा ही जय पहील्यांदाच घरी येत नाही. नेहमीच येतो.

"नेहमीच ?"

"म्हणजे तस्सा नेहमी नाही. अधून-मधून.."

"हिनं वाढदिवसाची भेट म्हणून सोन्याची आंगठी ?"

दोघं बोललीच नाहीत.

"म्हणजे तुमची जुनी ओळख दिसतेय.

"तशी जुनी नाही बाबा.

"एकमेकांच प्रेम आहे का?"

अचानक अनपेक्षित प्रश्नांन दोघंही चपापलीत, माझ्या लक्षांत आलं हे !

"बाबा"कांचन आता अंकलची....बाबा..वर आली होती. यात सारं काही समजलं मला. सूज्ञ व सुजान माणसाला प्रत्येक प्रसंगी शब्दांची गरज असतेय असं नाही.

"जा बेटा रात्र होते. कांचनला पोहचून ये. फक्त मोटर सायकल आरामशीर चालव.

"हो - बाबा......."

कांचन मोटर सायकलवर जयच्या पाठीमागे बसली. त्याच्या खांद्यावर हात ठेवला. "येते बाबा मी -बाय ऽ

"बाय डॅड,,

ती गेलीत.त्या रात्री,मला झोपच आली नाही. भूतकाळातील आठवणीचे स्मृतींच्या कॅलेंडराचे पाने फडफडू लागलीत.

माझा.....माझा स्वतःचा संसार होता. अनुरुप पत्नी....तीनं मुलं- एक मुलगी. सरकारी नोकरीवर असल्याने प्रत्येक मुलांची स्वतंत्र इस्टेटीची सोय मी करुन दिलेली होती.माझ्यात एक वाईट गुण होता. आता, माणूस म्हटला की तो देव कधीच नसणार? त्याला- गुण अवगुण असणारच.तसाच, मला अवगुण होता. दारु पिण्याचा. पण त्यालाही लिमिट होतं. पण काही मित्रमंडळीच्या गोतावळ्यात दारु ही जास्त व्हायची. अन्?-मग घरी भांडण सुरु व्हायचे !

अशाच एका पार्टीतून मी घरी बम पिऊन आलो.

आणि घरात रात्राभर भांडण चाललीत. एव्हांना,

मी रिटायर्ड झालो होतो.त्यामुळे नोकरीचं जू माझ्या मानेवर नव्हतं. आणि कुटुंबाचे ही काही हाल बेहाल अशी परिस्थिती नव्हती म्हणून,मी एक वेगळाच निर्णय व निर्धार केला.मनांत निश्चय केला घर सोडणे-कायमचे- महत्वाचे !आणि,त्या रात्री, सगळ्यांना झोपेत ठेवून मी घर सोडले ते कायमचेच ! अशा शहरात आलो मी जिथं घरच्यांना थांगपत्ता ही लागणार नाही. घर भाडयाचं घेतलं. घराला पाटी लावली सुयश-कोचिंग-क्लासेस'विद्यार्थी माझ्याकडे शिकवणीला येऊ लागलेत. कारण मुळात शिक्षकच होतो.

महिन्याचे तीन-साडे तीन हजार मिळत. त्यात मी माझं एकटयाचं पोटं भरत होतो.त्यात कथा-कादंबऱ्या लिहिण्याची रॉयल्टी मिळत होती. दिवस बरे चालले होते.एक दिवस,संकष्टी चतुर्थीच्या दिवशी मी श्री गणेशाच्या मंदिरात देव दर्शनाला पहाटेच गेलो.

मंदिरात किती प्रसन्न आणि प्रशांत वातावरण होतं. माणसाचं मन आल्हादित व्हावं. चित्र शांत राहावं.देवदर्शन घेऊन मोवरल्या प्रांगणात सिमेंटच्या बाकड्यावर मी बसलो. तर अस वाटलं स्वर्ग सुखाचा आस्वाद आणि आनंद उपभोगतंय.

एवढ्यात,बाजूच्या हिरवळीवर झाडाच्या रांगेत कुण्या अनामिक लेकराच्या रडण्याचा आवाज येऊ लागला. तो आवाज ऐकून मी बेचैन झालो. तसाच पळत गेलो.पाहातो तर,समोर एका पांढ्या शुभ्र कापडात एक जास्तीत-जास्त दहा दिवसाचं तान्हुल रडतेय !मी याा तान्हुल्या'च्या आईचा बराच आरडा ओरडा करुन शोध घेण्याचा प्रयत्न केला. पण व्यर्थ !कुण्या अनैतिक संबंधातून जन्मलेला हा जीव असावा. हे ओळखायला मी दुधखुळा निश्चितच नव्हतो.मला त्या तान्हुल्याच्या रडण्याचा आकांत माझ्या ह्दयाला भोकं पाडत होता.मला राहवलं नाही

तसं कुणालाही राहावत नसतेय. सडकेनं चालतांना एखाद्याचा ॲक्सिडेंट होतो. तो जीव मरणप्राय यातना-वेदना भोगतो. आपण पाहतो. शेवटी, पाहावत नाही आणि मग आपणच त्याला दवाखान्यात घेऊन जातो ?

कां ?

कां?असं व्हावं ?उत्तर सोपं आहे. त्याच्या व्यथा - वेदना- यातना तुम्हाला पाहावत नाही. म्हणूनच आपण सारं काही करतो. तो घायाळ जीव आपला जिवलग नसतांना ही !

तस्संच माझं झालं.

त्या तान्हुल्याला नाईलाजानं घरी मी घेऊन आलो. एक नर्स ठेवली.त्याला लहानचं मोठं केलं.आज–माझा जय–वीस वर्षाचा आहे. पाहता–पाहता वीस वर्षाचा काळ कसा निघून गेला हे कळलं सुध्दा नाही.

आत्ताच, पार्टी संपल्यानंतर–कांचनला मोटर सायकलवर बसवून तो तिच्या घरी गेला.मी बेडवर जागा आहे. साऱ्या जुन्या आठवणी आठवल्या मला !

कांचन मघाशी बोलली,"तशी जुनी नाही, बाबा .......

"एकमेकाचं प्रेम आहे का ?"

दोघंही अबोल !

मोटर सायकलवर कांचन जयच्या खांद्यावर हात ठेवून गेलीय......

माझ्या मनांत विचार खेळत होता.कांचनला माहित नाही मी जयचा खरा बाप नाही म्हणून !

आणि

'जय ला माहीत नाही मी त्याचा बाप आहे की नाही म्हणून ?

हा विचार माझ्या मनांत बराच दिवस खेळत होता.

एका सकाळी,घर वाजले,जय घरी हजरच होता.

त्यानंच दार उघडलं.

"कांचन.....?"ती हसली.'जय माझ्याजवळ आला.

"बाबा.... कांचन....

मी स्वयंपाक करता करता थांबलो.

"कांचन आली तिला सांगतो जा म्हणून.......

"का ?"

"आत्ता प्रत्येक कां वर उत्तर असतेच काय आपल्याजवळ?

तसंच–

'कारण ? ह्या विषयावरचं बोलणं.

"काय कारण, कारण की ह्या कारणान्वये हा शब्दाला किती महत्व द्यावं ?"

"हे ज्याच त्यानंच ठरवावं. तिचा निर्णय ती ठरवीन." जय मनापासून खूष झाला. "बोलवतो बाबा तिला !" कांचन आली.

गुलाबी साडी,तस्साच ब्लाऊज, ओढणी ही तशीच !

क्षणभरानं म्हणालो,"

"बैस बेटा जय कांचनला बसवं.......

थोडा थांबलो.म्हणालो,

"तुला चहा हवा की कॉफी ?"

"काहीही नको. मला हवा तो आशिर्वाद !"

"आशिवांद ?"

"तुमची सून म्हणून........"

जय जवळ आला. बोलायची हिम्मत करत नव्हता. काय बोलावं आणि काय बोलू नये.अशी त्याची अवस्था !

मी सगळं आटोपून बैठकीत येऊन बसलो. ?"

"बाबा....

आता, माझी शक्ती परीक्षा होती. मी जयच्या लग्नाला परवानगी द्यावी की नको ?

मध्येच कांचन बोलाली,

"बाबा आत्ताच सांगतेय– मी मागासवर्गीय आहे. महार–जातीची आहे. तेव्हा, तुमच्या घरी मी सून म्हणून?"

"सून........?"

"एका ब्राम्हणाच्या घरी महाराची पोरगी.......

मी नाही म्हटलं तरी मनातून हल्लोच.

"पण बेटा......

"बाबा– तुमच्या...पण..मध्ये सगळं काही ..कळलं.. "थोडं बेटा, समजून घे. बाळ, जय, तू सुध्दा.

जय बोलण्याच्या मूड मध्ये नव्हताच.

अखेर,

नाईलाजानं जाती–रिवाज पाहून मी निराश झालो.

पण

एकच–

एकच समाधान आहे. –जयला हवी ती पत्नी मिळाली आणि मला हवी तशी सून !

मी दोघांना तोंड भरुन आशिर्वाद दिला.

**– पुरुषोत्तम प्ररोहणकार**
**हातरुण ४४४१०९ ता.बाळापुर,जि.अकोला**

■■■



कथा

# हुंदका

डॉ.आप्पासाहेब पाटील



हिराच्या मागचा रोजगार सुटलाय आणि घरदार सुराला लागलय....फक्त पोराच्या लग्नाची बघाबघी चाललीया....तोपर्यंत पहाटे खुरुडयातल्या कोंबड्यानं बांग दिली....... अन हिराला स्वप्नातून जाग आली.... आणि स्वतःशीच हसली. शेजारी झोपलेल्या दोन वर्षाच्या कैलासच्या डोक्यावरून तिनं हात फिरविला...... आणि अंगावरलं पांघरून बाजूला केलं आणि कामाला लागली. हिरा तशी खूप धीराची आणि खंबीर बाई होती.रूपानं काळी परंतु नाकेडोळे चांगली होती. तरतरीत चेहऱ्याची,मध्यम बांध्याची, आडव्या अंगाची तिचे डोळे नेहमीच हिऱ्यासारखे चमकायचे.तिच्या डोळ्यात जशी चमक होती तशी अंगातसुद्धा धमक होती. कपाळावर मोठी लालभडक टिकली लावल्यामुळे आणि नेहमी हसतमुख चेहरा त्यामुळे तिचं व्यक्तिमत्व अधिकच उठावदार दिसायचं. गरिबा घरची लेक पण तिने जगण्याबद्दल कधीच कुरकुर केली नाही की वाटयाला आलेल्या भोळसट नवऱ्याबद्दल कधी तक्रार केली नाही.

जीवनातल्या अनेक समस्या सहजपणे स्वीकारून ती प्रत्येक गोष्टीला जिद्दीनं तोंड देत होती. येईल त्या दिवसाला ती सामोरी जात होती. हिरा चारचौघीत वागाय, बोलाय आणि कामाला लई इमानदार म्हणून तिची ओळख होती. सारं गाव तिला नावजायचं. ''येडया खुळ्याच्या पदरात टाकल्या परंतु कधी वाकडं पाऊल पडू दिलं नाही !" नवऱ्याची किंमत ठेऊन सगळ्या घरादाराची मानमरताब राखून राहत होती !कामाचा मेळ घालत होती तसाच नात्यांचाही मेळ घालत होती. बेरीज वजाबाकी यात पण ती हुशार होती.पण अशिक्षित आई-वडील आणि परिस्थितीमुळे पुढे शिक्षण घेता आले नाही.पदरात पडलेला भोळाभाबडा नवरा,घरात थकलेली सासूसासरा, नवऱ्यापेक्षाही भोळसट दोन दीर आणि सोबतीला गरिबी. तिच्या दिरांची तऱ्हा तर मुलका वेगळीच होती.नशीबच त्यांचं उलट. थोरला दीर उत्तम याचाही स्वभाव भाबडा होता. कामात, बोलण्यात आणि वागण्यातही तो तसाच. घरातून सायकल घेऊन बाहेर जायचा एकच छंद. सायकल बाजूला धरून चालवतच राहणार.सायकलवर बसायचं तो विसरून जाणार.सायकल चालवताना शून्यात हरवलेली नजर. सुकलेला चेहरा आणि ओठ. डोक्यावर पांढरी गांधी टोपी,अंगात

सदरा आणि लेंगा पायात तुटकं शिल्पर. फारसा कुणाशी बोलणार नाही. नुसती डावी भवई उडवणार. अशा माणसासोबत प्रपंच कसा करायचा ?असा प्रश्न उत्तमच्या बायकोच्या मनात आला असेल त्यामुळे उत्तमच लग्न झाल्यानंतर दोन तीन वर्षातच बायको वर्षभराच्या मुलाला घेऊन माहेरी गेली ती परत आलीच नाही. धाकटा विश्वास तो तर थोरल्यापेक्षाही अती भोळसट होता. फक्त तो कुणाला दगड मारत नव्हता.

पण त्याला सारं गाव छरिक विश्वास म्हणूनच ओळखत होतं. रानातलं काम केलं तर केलं नाही तर जेवण करायचं आणि झाडाखाली ताणून द्यायची.गावात,रानात पाहिजे तिथं फिरून यायचं नाही तर गावातल्या देवळाच्या गच्चीत जाऊन निवांत झोपायच. असा विश्वासरावांचा दिनक्रम होता.थोरल्या उत्तमच्या पाटचा विलास तो नाशिकला नोकरीला होता.त्यानं मात्र या चौघा भावात आई वडिलांचं नाव काढलं होतं.त्यानं नाशकात चांगला जम बसवला होता.त्याची पोरं चांगली शिकत होती. विलास कधीतरी आदनमधनं गावाकडे चक्कर मारायचा पण दुर्मिळच. आणि तीन नंबरचा भानुदास म्हणजे हिराचा नवरा.सगळं गाव त्याला भाना म्हणायचं. या दोघांना मोठया दोन मुली थोरली संगीता आणि दुसरी आशा. आणि धाकटा मुलगा त्याच नाव कैलास.

दुष्काळ गावाच्या पाचवीला पुजलेला होता. चौघा भावांची मिळून चार एकर शेती हुती पण पाणी नसल्यामुळे सगळी शेती कोरडवाहू होती.अगदी बेताची परिस्थिती असल्यामुळे आठवडयाचा बाजारहाट आणि तेला मिठाला पैसं कुठून येणार म्हणून हिरा गावातला मोठा पुढारी टगु आण्णाच्या शेतात मजुरी करायची. टगु आण्णाच्या शेतात द्राक्षाच्या बागेतली भांगलन, शेंडाबाळी, छाटणी, पेस्ट लावणे, गऱ्या घेणे, खात घालणे, घड बुडवणे, झाडं बांधणे, टिबक बांधणे अशा कामाबरोबरच हायब्रीड खुरपाय तर कधी खुडाय, गहु काढाय तर कधी शेणखतं घालाय अशी एक ना अनेक कामं वर्षभर करायला गावातली बरीचशी लोकं जायची. त्यात हिरा पण होती.

द्राक्ष बाग त्यावेळी जरा कौतुकाचा विषय होता.भानाला त्यातलं कुठलच काम नीट जमायचं नाही.तसा इतरही कामात फारसा चलाख नव्हताच चार रुपये वाढून यावती म्हणून ....हिरा एक दिवस भानाला आपल्या सोबत घेऊन गेली आणि टगु अण्णाला म्हणाली,आण्णा !..आमच्या नवऱ्याला साधं सोपं काम द्या... त्यास्नी यील असं.. आणि त्याला बायकांची हजरी द्या...! पण त्याला कामाला घ्या.! ती दोन हायती ! पण ईडी..! कामाचं कोणच नाय... घरात गडी माणसं लय असून काय उपयोग नाय..मी एकटीच घर चालवतीया..जरा नवऱ्याचा हातभार लागला तर बरं हुईल बघा..! टगु अण्णापण तसा मोठया दिलाचा माणूस.. गावात अनेकांना मदत करायचा...हिरा त्यांच्या वस्ती शेजारीच राहायला होती. शेजारधर्म आणि एखाद्या गरिबाला मदत म्हणून अण्णा म्हणाले उद्यापासून भानाला घेऊन ये !

काम कुठलंही असू द्या हिरा नवऱ्याला आपल्या शेजारी पात धरायला लावायची.कारण आपली पात वडतवडत ती नवऱ्याचीही पात वडायची.मग कधी कधी टगु अण्णा आणि अण्णाची बायकु रखमा मावशी दोघांनापण हिराची दया यायची.मग रखमा मावशी भानाला रानातल्या काम करणाऱ्या सगळ्या माणसांसाठी पाणी आणायला लावायची, कधी कधी त्यांच्या जनावरांना वैरण काढायला सांगायची.तर कधी वैरणीच्या मुठी गोळा करा लावायची.भाना पाणी आणायला गेला आणि वाटत कुणी भेटलं आणि तंबाखू मागितली की त्याला आपल्या पिशवीतली तंबाखू देतादेता आपण कुठे चाललोय हे विसरूनच जायचा.मग ध्यानात येईपर्यंत तिथच बसून राह्यचा. मग मागुन त्याला शोधत आलेला माणूस त्याला आणि पाण्याची घागर घेऊन जायचा.

भानाला ऐकाय कमी येत होतं त्यामुळे एकदा भानापुढे बघून चालायला लागला की मागणं कितीही बोंब मारली तरी तो मागं वळून बघायचा नाही.पण अतिशय गरीब गडी. कुणाला तोंड वर करून कधीच बोलायचा नाही. कामावर असताना डोक्याला टॉवेलची टापरी असायची.अंगात हाफशर्ट, हाफपॅन्ट असायची. पायात प्लास्टिकचे चप्पल. तोंडात तंबाखूची गोळी त्यामुळे कायम मारुतीगत तोंडाचा चंबू केलेला असायचा. आणि कायम आपल्याच नादात असणार.असा भानाचा घुमांडा स्वभाव होता. त्यामुळे भानाकडे कधीही कोणतही जोखमीचं काम नसायचं.अशा नवऱ्यासोबत हिरा आनंदाने प्रपंच करत होती.

तऱ्हेवाईक आणि भोळ्याभाबडया दिरांना सांभाळत होती. जेऊ खाऊ घालत होती.त्यांच्या लहरी स्वभावाला ती तोंड देत होती.दिवसभर लोकांच्यात मोलमजूरी करताना घरच्या चार जनावरांसाठी वैरणपण काढायची आणि संध्याकाळी सहा वाजता काम सुटल्यावर जाताना झणझणीत दोन बीडं वैरणीचं झालं की एक नवऱ्याच्या डोक्यावर द्यायची आणि एक बिंडा आपल्या डोक्यावर घ्यायची.कधी कधी पोरीपण शाळेच्या सुट्टीच्या दिवशी पेंडीभर का असेना..... पण वैरणकाडी करू लागायच्या.

राहत्या छपराच्या पुढच्या बाजूलाच जनावरांच छप्पर होतं.त्याता एका बाजूला वैरणीचं बीडं टाकून हातात खराटा घेऊन भाना शाणघाण करायचा.तर इकडं हिरा घरातला पसारा आवरून भांडकुंड घासून चहा ठेवायची. म्हाताऱ्या सासू सासऱ्याला चहा देऊन मग ही दोघंबी पोराबाळासकट चहा प्यायची.तोपर्यंत कोंबड्या कुर कुर्?करत छप्परात यायच्या.त्यांना मका ज्वारी खायला टाकून बाहेर अंगणात ठेवलेली खुरुडी आणू छप्पराच्या वळचणीला ठेवायची.तोपर्यंत म्हैशीच्या धारचं टायमिंग व्हायचं. भानाला धारपण रेटत नव्हती. धार काढून घरापुरत टिकलाभर दूध ठेवून बाकी लिटर दीड लिटर डेअरीला घालायला भानाकडे किटली द्यायची.


म्हैस घ्यायला पाच हजार रुपये उचल घेतलेली त्यासाठी दूध घालायलाच लागायचं. तोपर्यंत अंधार पडलेला असायचा.रात किडयांची किरकिर चालू झालेली असायची.

देवाला दिवा लावून हिरा जेवण करायला लागायची. बाभळीची आंबटवल्ली काटकं चुलीत घालून कागद कापडाचा बोळा त्या

लाकडाच्या मधी घालून वरून रॉकेल ओतून काडेपेटीने पेटवायची....ते जळण धुपत धूपत कशी तरी चुल पेटायची. चुलीवर तवा ठेवायची. परातीत भाकरीचे पीठ घेऊन मळून भाकरी थापून तव्यात टाकल्या का नाय तोपर्यंत म्हाताम्हातारी जेवणासाठी हाका मारायची.. हिरा ...हिरा ....अग ये हिरा ...भाकरी वाढ की ग...म्हणून त्यांच्या हाका यायच्या. तव्यातल्या पहिल्या दोन गरम गरम भाकऱ्या झाल्या की म्हाताम्हातारीच्या ताटात वाढून त्यात पळ्या दोन पळ्या कालवण ओतून त्यांच्या पुढं ठेवायची.तोपर्यंत अंगणात भानाच्या अंगाभोवती खेळणाऱ्या पोरांच्या पोटात कावळं ओरडाय लागायचे. त्यांना पण हिरा जेवायला घालायची..

बसली....

तोपर्यंत तिच्या लक्षात आलं म्हाता म्हातारीला उडप्याची भजी लय आवडतात..म्हणून गाडीत बसल्याली उतरली आणि भजी, चिरमुर घेऊन आली. कित्येक दिवस झाले बंद तुटलेलं स्लीपर ती तारनं शिवून घालत होती तिला नवं स्लीपर घ्याच होतं पण पोरांना पुस्तकं,शाळेचा ड्रेस घ्यायचा होता म्हणून तिनं तो विचार बाजूला ठेवला. हिरा घरात पोहचतीया... तोपर्यंत थोरल्या आणि धाकटया दिराची हाणामारी चालू होती.....थोरल्याची सायकल धाकटा विश्वास घेऊन गावात गेला होता...म्हणून त्याला दगुड मारला!असं उत्तम म्हणाला. दोघांची समजूत घालून हिरान हातातली पिशवी छप्परात ठेवली. आणि साडी



हिरा वैनी ...!हिरा वैनी ...!अशा हाका मारत टगु अन्नाचा पोरगा दारात आला.भाकरी थापता थापता भरका हात घेऊन हिरा छप्पराच्या बाहेर गेली.उद्या सकाळी सात वाजता रामापुरच्या वाटंला बागत शेणखत घालायला जायचं हाय..अण्णानं सगळ्या बायकास्नी लवकर यायला सांगितलंय...कारण त्या दिवशी मंगळवार होता. मंगळवारी तालुक्याचा बाजार असायचा. आठवडी बाजारासाठी सकाळी लवकर जाऊन लवकर सुट्टी केली जायची.. आठवडयाच्या कामाचं थोडयाशा आलेल्या पैशात हिरानं गावातल्या काळू नानाच्या किराणा दुकानाची थोडी उधारी भागवली. पिठाच्या गिरणीची उधारी भागवली. थोडं थोडं उसनं घेतल्याल पैस दिलं. आणि राहिलेल्या पैशानं बाजारात माळवं घेतलं आणि घरी जाण्यासाठी वडापच्या गाडी

बदलून कामाला लागली.दुष्काळ पडला त्या वर्षी हिराला आणि तिच्या नवऱ्याला नाला बिल्डिंगच्या कामावर जावं लागलं तेही दिवस हिरा कधीही विसरू शकणार नाही.प्यायच्या पाण्यासाठी खूप वणवण करावी लागली.एकेकावेळी चटणी भाकरीवर दिवस काढावे लागेल. जनावरांची तर लईच उपासमार व्हायची.. दिवसभर नुसत्या माळांनी कुसळ खुरटायची ..

कालांतरानं गावात अनेक दिवसापासून चर्चा होत होती त्या आरफळ योजनेच्या कॅनलला पाणी आलं.कॅनल गावाच्या बाजूने गेला होता.त्यामुळे आजू बाजूच्या शेताशिवारात पाणी फिरल होतं.कोरडवाहू शेतीला कायमस्वरूपी पाण्याची सोय झाली.आता सगळी शेती पिकणार लोकाचा रोजगार करायची गरज पडणार नाही आणि

आपल्याला चांगल दिवस येणार असं हिराला वाटत होतं.......आणि हुबेहूब तसच दिवसागणिक घडत होतं.

गेली दोन वर्षे हिराच्या मळीच्या रानात एका एकऱ्यात सत्तर टन ऊस निघाला होता.बरीच वर्षे रानं पडीक होती त्यामुळे पिकं चांगलीच जोमात यायची.माळाला पण बाजरी, गहू, भुईमुगाच्या शेंगा,तूर असं कायबाय झालं होतं.घर अगदी टांगटुगित चाललं होतं.आता शेंडफळ कैलास मोठ्ठा झाला होता. शाळेत फारशी गती नसल्यामुळे दहावीतून शाळा सोडून आता तो मिळलं ते काम करून हिराला हातभार लावत होता. आता बागायत शेती आणि त्यामुळे वाढवलेली दोन दुबती जनावरं असल्यामुळे डेअरीला रोज सात आठ लिटर दूध जात होत.आठवडयाला येणाऱ्या बिलातून गाडीचा हप्ता भागत होता.आत्ता कैलास आईला आणि भावला म्हणजेच हिरा आणि भानाला पाहिजे तिथं गाडीवरून घेऊन जात होता.पोराबाळांसाठी घेतलेल्या कष्टाचा चीज झाल्याचं त्यांना मनोमन वाटत होतं.

थोरली आशा आणि मधली राणी दोघींचीपण पाच सहा वर्षापूर्वीच लग्नं झाली होती.आशाचा पहिला मुलगा मुका होता. तो बोलावा म्हणून हिरानं अनेक देव धर्म केले. नवस केले. पण काय उपयोग झाला नाही.नातवाच्या मुकेपणाच दुःख उराशी बाळगून ती जीवनाची वाट हसतखेळत चालत होती. दिवसा मागून दिवस जात होते.छप्पराच्या जागी आता मजबूत भिंतीच शेडवजा घर बांधलं होतं.त्या घरात टीव्ही पण आली होती हळूहळू भौतिक सुख देणाऱ्या वस्तू वाढत होत्या आणि हिराच्या कष्टाचं चीज होत होतं.पोराच्या लग्नासाठी पै–पई आता साठवून ठेवाणे सुरू होतं.कैलास सागावला एका छोटयाशा कंपनीत काम करू लागला होता.नोकरी करत थोडीफार वडिलार्जित जमीन आणि दुभती जनावरं तो हिरा आणि बापाच्या मदतीने बघत होता.

आता घरात प्रत्येक गोष्ट कैलासशी चर्चा करून बोलून हिरा करत होती. कैलास आपल्या भावी जीवनाची, लग्नाची स्वप्नं बघत होता. लवकरच कैलास त्याच्या भावी सुखी संसाराला सुरुवात करणार होता परंतु नियतीला ते मान्य नव्हते. तो काळा दिवस उजाडला. हिराला त्या दिवशी खूपच अस्वस्थ वाटत होते. कोणत्याच कामात लक्ष लागत नव्हते.नुसती रुखरुख लागली होती.सकाळपासून तिचा जीव नुसता मुलाच्या विचारानं वेडा झाला होता. तरीपण पोरगं कामावर जायचं आहे म्हणून हिरानं सकाळी लवकर उठून डबा करून दिला. सात वाजता गाडीला किक मारून कैलास सागावच्या दिशेने निघाला. हायवे क्रॉस करताना भरधाव ट्रकनं कैलासला उडवलं. कैलासच्या डोक्याला हेल्मेट नव्हतं त्यामुळे डांबरीवर पडून त्याचा जागीच मृत्यू झाला.एका क्षणात होत्याचं नव्हतं झालं.

दोन पोरींच्या पाटीवर झालेलं सगळ्यात लाडकं पॉर. पोटाला धरून वाढवलेलं...त्याच्या भरवशावर भविष्याच्या सुखाची स्वप्न हिरानं बघितली होती.हिरानं पोराबाळांच्यासाठी आयुष्यभर साऱ्या गावाचा रोजगार केला.उन्ह,वारा,पाऊस काय बघितलं नाय. आपला जीव मारून पोरास्नी जगवलं. घरात सगळ्यात पोरग हुशार होतं.सगळी काम चलाकीने करायचं.कैलासनं पण न कळत्या वयापासून आई वडिलांच्या सोबत कष्ट उपसाय सुरुवात केली होती.

कैलासची जिद्द होती आपल्या आईवडलाच्या मागचा रोजगार संपवायचा. त्यांना सुखाचं दिवस दाखवायचं. ह्या सगळ्या गोष्टी क्षणभरात मातीमोल झाल्या.सगळ्या घराच्या स्वप्नांचा चक्काचूर झाला.वीज लखलखावी तसा हा सगळा विचार आणि हिरा व भाऊ कैलासच्या डोळ्यापुढं क्षणभर तरळून गेले. काही क्षणातच त्याचा देह निष्प्राण झाला. त्याच्या भावी आयुष्याच संसार सुखाचं स्वप्न हे स्वप्नच राहिलं. काळीज पिवळटून टाकणारी कैलासच्या मृत्यूची बातमी गावात पसरली. पण कैलासच्या आईला ही बातमी सांगायच धाडस कोणाच्यातच नव्हतं.

दारात गावातली माणसं आणि पै पावणं  जमायला लागली होती नेमकं कुणाच्या बाबतीत काय घडलय काहीच कळत नव्हत तिला.दोन दीरपण मामाच्या गावच्या यात्रेला गेलं होतं.भानापण आदल्या दिवशी लेकीकड गेला होता.जसजशी माणसं जमायला लागली तसतशी तिला शंका आली.आपल्याच घरातल्या कुणाच तरी बरवाईट झालय म्हणून.पण नेमकं कुणाच्या बाबतीत घडलय तेच कळना.तेवढ्यात अँब्युलन्स दारात आली अन कैलासचा निष्प्राण देह दारात आणून ठेवला.हिराने पांढर कापडवर करून चेहरा पाहिला तसा उर बडवून घेत हंबरडा फोडला. पुत्र वियोगाचा शोक पाहून सबंध गावाच्या डोळ्यातून घळाघळा  पाणी वाहत होतं...

हिराच्या सगळ्या स्वप्नांचा चुराडा झाला होता.म्हातार पणाची काटी देवानं हिसकावून घेतली होती.कधी कुणाच वाईट बघितलं नाय.का कधी कुणाच्या वाळल्या पाचुळ्यावर पाय दिला नाय...हातातोंडला आलेला घास परमेश्वरानं हिसकावून घेतला !....काय एवढं पाप केलं होतं म्हणून ह्यो दिवस बघायची वेळ आली....कुणाची नजर लागली काय माहित... ?असे असंख्य विचार हिराच्या मनात फेर धरून नाचत होते...लय जिकिरीन प्रपंच उभा केला होता....आता सून यायची होती.तिच्या हातच बसून खायचं दिवस होतं.पण....पण...नियतीला ते मान्य नव्हतं..हिराच्या आयुष्याची परवड पुन्हा सुरु झाली होती...पुन्हा नव्या जोमानं हिराला कंबर कसून संसाराची मोट बांधायची होती....

परवा यात्रेनिमित्त गावी गेलो होतो हिरा वहिनी भेटल्या, त्यांना पाहून माझं काळीज गलबलून गेलं.काय विचारावं..कसं बोलावं तेच कळत नव्हतं..तरीपण ...काय चाललंय...वहिनी..?मी बोललो......आता बरंच म्हणायचं !हुंदका आवरत गहिवरल्या स्वरात हिरा वहिनी बोलल्या.......माझ्या आधी देवानं त्याला नेलं...आपल्या दु;खाला लगाम लावत भरलेले डोळे पदरानं पुसत हिरा वहिनी वस्तीच्या दिशेने चालू लागल्या... या स्त्रियांकडे किती सोशिकपणा आणि जगण्यातला चिवटपणा आहे.........यांची परवड कधी संपणार ? असं स्वतःशीच पुटपुटत मी त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडं बघतच उभा राहिलो..

**– डॉ.आप्पासाहेब पाटील**

■■■

कथा



# उडणारी पाखरं

नलिनी भोसेकर

फोन वाजला, तसं उठून फोन घेत स्मिता म्हणाली,
बोल उमा,
स्मिता घरीच आहेस ना? येऊ का तुझ्याकडे?
उमा,अग हे काय विचारतेस? घरी ये.
कुठेही जायचं नाही तू ये.
येते. ठेवते गं फोन.

उमा नाराजद झाली का.तिच्या जिवाभावाच्या मैत्रिणीकडे स्मिताकडे यायची. तिच्या मनाची उदासी अवस्था स्मिताशी बोलून मोकळी व्हायची.दोघींची मुले परदेशात स्थायिक झालेली.स्मितानं मानून घेतलं.आणि स्वतःला तिने वाचन,लेखन,पेंटींग यात स्वतःला गुंतवलं.एकटी राहून ती नावाप्रमाणे स्मितवदनी होती.महिला मंडळातील महिलांचे कार्यक्रम बसवित होती.स्पर्धा घेणे यातून खूप महिला तिच्या मैत्रिणी झाल्या होत्या.तिच्या कामात ती रमून गेली होती.

तासाभरातच दारावरची बेल वाजली.स्मिताचा स्वैपाक झालाहोता. उमाला आवडतात.तशी कुरकुरीत कांदा भजी तिनं केली होती. स्मितानं दार उघडलं.दोघी एकमेकींच्या गळ्यात पडल्या.उमाचा हात धरून तिला सोफयावर बसवत स्मिता म्हणाली,

तू नास्ता करून आली असशील तरी कुरकुरीत कांदाभजी तुझी वाट पहाताहेत. आधी गरम गरम भजी कॉफी घेऊ चालेल ना?

चालेल नाही वाही पळेल, उमा हंसत म्हणाली,तिच्या हंसरा चेहरा पाहून स्मिताला बरं वाटलं.स्वैपाकघरात घेऊन तिनं चिवडा–भजीच्या प्लेटी भरल्या,मुलांना माझी पर्वा नाही,या उमाच्या कुरकरीला आज पळवून लावायचे.आज बोलून टाकू असं तिनं मनाशी ती हॉलमध्ये आली.

डायनिंग टेबलावर प्लेटी ठेवल्या.उमा उठून टेबलावजवळ

आली दोघीजणी भजी,चिवड्याचा आस्वाद घेऊ लागल्या.

मस्तच झालीत भजी, उमा म्हणाली.

खाणं संपल्यावर स्मितानं विचारलं,

कॉफी आताच आणू की नंतर?

स्मिता,मला बोलायचं होतं,तुला ठावूक आहे,

प्रशांत-सुशांतचा फोन आला होता? दिवाळीत ते म्हणाले कां?

नाही इकडे थंडी फार असते.तू आजारी पडशील.एकूण काय मी तिकडे येऊ नयेच असंच.ते नेहमी सारखंच, उमा म्हणाली.

थंडी आहे हे खरंच आहे ना?

अग,नातवंडांना भेटावस वाटतं,ते विसरायचं

अगं,त्याचीपण सोय झालीय ना उमा? मोबाईलमध्ये ती पण सोय आहे ना? त्यातून नातवंड-सूना,मुलगे सगळे दिसतात आणि बोलतात,आपणही बोलतो त्यांच्याशी.एवढं पुरेस वाटत नाही तुला?

मला वाटतं,वृध्दपणी अजिर्ण होईल असं काही करूच नये,खाण नाही.बोलणं,पहाणंपण नाही.

उमा,तुला भाषण वाटेल,पण बोलावचं लागेल.बोलू?

बोल,गं तुझ्या बोलण्यानं तर माझं मन शांत होतं.बोल,

उमा,आपल्याला माहित आहे.पाखरं पंख आले की,उडतात ती उडणारी पाखरं बळून बघतात कां?त्यांनी सोडलेल्या त्या घरट्याकडे?जिथं ती बाळ होती.आणि तिथूनच ती मोठी होऊन पंख घेऊन आता उडू लागली.झेपावली आकाशाकडे,उमेदीनं उत्साहीनं.त्यांनापण आज उद्या घरटं तयार करावं लागणारचं होतं नां?मग तूच सांग त्यांनी उडतांना त्या घरच्याकडे कां वळून बघावं.

पाखरांचेपण आईबाबा पण असतात ना?ती झेपावणाऱ्या पाखरांकडे समाधानं बघतात.त्यांना पंख येई तो त्यांच्या आईबाबांनी त्यांना चोंचीने भरवलं आणि पल्लेदार पंख आल्यावर त्यांना उडू दिलं. समाधानानं उडाली ती,नव्या जगाकडे.एकटं जगण्याचं भयपण नाही.

उमा,आपण कां नाही असं सहजपणे जगणं जगत?कां व्यवहाराची,कर्तव्याची पुटं लावतो त्यांना आपल्या मुलांना? आपण कां नाही पाखरांसारखे आईबाबा होत? तू माझ्या बोलण्याचा राग मानू नकोस तुला अशी उदास झालेली मी पाहू शकत नाही.तुझंपण एक विश्व आहे त्यात तू रमून जा.अलिप्त होऊन जा,मुलांच्या संसारातून.हे गुंतणं मनाचं.या गुंतलेल्या मनाला सोडवून घे.म्हणजे पुढचं हे बोनस जीवन समाधानानं जगण्याचे नवे धुमारे आणून देईल.

मग तिच्या पाठीवर हात ठेवित स्मिता म्हणाली,उमा आता आपलं वय म्हणजे संध्याकाळ,सूर्यासारखी अस्ताला जाण्याची वेळ येईल तेंव्हा शांतपणे निघून जाण्याचं.त्या साठीच तर मनाचं दुभंगलेपण,दुखावलेपण घालवून टाकला पाहिजे.

अस्ताला जाणाऱ्या सूर्याकडे बघ.रंगांची उधळण करीत ढगांवर सोनेरी मुलामा देत,दिवस कारणी लागला म्हणून हंसत,प्रसन्नपणे तो असताला जातो.त्यानं अनेक छटांनी रंगावलेलं गुलाबी-लाल,पिवळसर सुंदर दिसणारं आकाश,आपण हॉस्टेलला होतो तेंव्हा त्या रंगाकडे कितीतरी वेळ पहात असायचो आठवतं नां?

सूर्याला नमस्कार करून,अस्ताला जाणाऱ्या त्याला ,मनात साठवत परत खोलीत यायचो.त्या रंगाच्या प्रेमातच पडलो होतो. आपण. ते रंगरंगुल आकाश निरखत सुट्टीच्या दिवशी आपला सगळा वेळ जायचा.निसर्गातल्या सानिध्यातले ते कांही क्षण.त्यातले थोडेतरी रंग आले ना आपल्या आयुष्यात ?

आता ते रंग पुन्हा जगण्याचे दिवस आलेत. निवांत वेळ आहे.अजुन हाती-पायी धड आहेत. पेन्शनीतील छोडे -थोडे पैसे बाजूला ठेवून छोट्या-छोट्या सहली करता येतील.साड्यांचा सोस नव्हताच.पुरेशा साड्या आहेत. तो खर्च होत नाही. वरखर्च आपला नाहीच.खाणं आणि लाईट बील.एवढा खर्च झेपतोच.पैसे बाजूला ठेवून वर्षातून दोन सहली होतील.आपण निसर्गात रमणाऱ्या होतो.

मध्यल्या काळात कर्तव्याच्या गोष्टी करण्यात तारूण्य गेलं. मुलांना मार्गी लावलं.संसाराचं सुखदःखाची फुगडी हंसत घातली.साजरं केलं सगळं पाखरांना पंख आले,उडाली आणि आपापल्या घरट्यात स्थिरवली.त्या पंखांना बळ देण्याचं आपलं काम पार पडलय.

आपल्याला इथं पाःवलं त्यांचं आपण चीज केलं?डावललं नाही. पहिला नंबर नसेल मिळाला.पण बऱ्यापैकी गुण मिळवून सेकंडमध्ये कां होईना पास झालो. झालो ना?उमाच्या पाठीवर स्मितानं थाप मारली.दोघी हंसल्या.मग स्मिता म्हणाली.

उमा,काय कंजूस आहे गं?इतकं बोलले.त्याला टाळ्या नाही कां वाजवायच्या.होस्टेलला होतो,माझ्या वक्तृत्वाला तुझ्या टाळ्या मला प्रोत्साहित करायच्या.

तिच्या गळ्यात पडत उमा म्हणाली, आपण बालपणापासून आता वृध्दपणीपण एकमेकींना मैत्रीत घट्ट बाधलेल्या सखी.आपण एकमेकींच्या आयुष्यातल्या प्रशंसेला टाळ्या वाजवल्या. त्याचवेळी आनंदाश्रूंची पखरण केली. आता उतार वयात टाळ्या.प्रशंसा बाजूला ठेवून जीवापाड जपलेलं हे मैत्र्य भगवंताच्या घरी जाई तो जपायचं तिचे डोळे भरून आले.

ये वेडाबाई,यहा रोना मना है.चल कॉफी घेऊ तुला-मला आवडणारी जायफळ घालून केलेली.स्मिता म्हणाली.


स्मिता,तुझं पटलं मला.आता मी पाखरांच्या आईसारखी होईन तुझ्यासारखं.तू सहजपणे. हे गुंतणं सोडलसं.मी पण या क्षणापासून सोडलंय.

ये हुई ना बात.आता कॉफी घेता घेता ठरवू कुठं सहलीला जायाचं ते स्मिता कॉफी आणायला उठली.उमाच्या चेहऱ्यावर प्रसन्नता फुलून आली होती.

**- नलिनी भोसेकर**
**१२०,विरंगुळा,डॉ.बाबासाहेब**
**आंबेडकर हॉसिंग सोसायटी,**
**येरवडा ,पुणे -६**

■■■

कथा



# कुंडली

विनय मिरासे अशांत

चिमणी पाखरं चित्रपटातील  पद्मिनी कोल्हापूरेच्या पात्राची तिच्या नवऱ्याच्या दारुडेपणामुळे झालेली दारुण–दुःखावस्था, शीतल साबळेनी पाहिली अन्?तिने टी.व्ही. बंद करुन पट्कन उशीत मान खुपसुन स्फुंदुन रडायला सुरवात केली. बराच वेळ ती तशी स्फुंदत राहिली.अशा अवघडलेल्या अवस्थेत पोटात बाळ असतांना जिवाला अधिक त्रास करुन घेणे बरे नाही,असा विचार करुन तिने मनाची कशीबशी समजूत काढली. पण, पाण्याच्या खोलात शिरलेली मासोळी, डोळयाचे पाते लवते न लवते तोच सुर्रकन वर यावी तशी तिच्या मनात – आपल्या दुर्दशेची चिंता उमटून आली. “आपल्या नवऱ्याचे दारुचे व्यसन वाढतच राहिले आणि आपल्या बाबांचे एखादया वेळेस काही बरेवाईट झाले तर कसं व्हायचं आपलं, कोण देईल आपल्याला आधार! भाऊ नाही म्हणून ठीक, पण असता तरी– आपला संसार सोडून त्याने आपल्याला आधार दिला असता? बहिणी आहेत दोघी. घरच्या बऱ्याही आहेत. पण फोनवरुन विचारपूस करण्यापलीकडे आणखी काय करतात त्या! कधी येऊन भेटत नाहीत वा चार पैशाची मदत करीत नाहीत. बाबांची पेन्शन–त्यामुळे त्यांचा आर्थिक आधार आणि आईचा भावनिक आधार एवढंच काय ते आपलं भांडवल.कसं व्हायचं आपलं !दारुचं व्यसन वाढून हा माणूस एखादया दिवशी मधातच.... ? तर तर काय मग, विधवेचं जीवन जगायचं! नोकरी कोण देईल? नवऱ्याच्या जागी नोकरी मिळायला तो नोकरीत कायम तर असायला हवा. हा असा रोजंदारीवरील कामगारासारखा. मग कशी मिळेल आपल्याला नोकरी? तो मधातच मेला तर..... पण छे!हे काय आपण मृत्यूचं घेऊन बसलो नवऱ्याच्या!जिथे आपलाच मृत्यू झालाय, तिथे नवऱ्याच्या मृत्यूचं काय?” तिच्या अंतर्मनानं प्रश्न टाकला.आपला मृत्यू? छे, कसं शक्य आहे! मनाच्या दुसऱ्या बाजूनं प्रश्न केला. होय आपला मृत्यू! ज्या दिवशी – प्रणित सोबत लग्न न करण्याचा निर्णय– आपल्या आईवडीलांनी घेतला आणि ते

जुळलेले लग्न मोडून –या दारुडयाच्या व बदमाश माणसाच्या पदरात मायबापांनी आपल्याला बांधलं त्याच दिवशी आपण मेलो! छे! छे! असं कसं! आपण तर संसार करतोय.आपल्या पोटात बाळ वाढतंय. मग असं कसं म्हणतोय आपण? असं म्हणणं योग्य का? पुन्हा पहिलं मन बोललं. नाही तर काय, मृत्यू नाही तर आणखी काय? या अशा जगण्याला काय जगणं म्हणायचं? जिवंत असणं म्हणायचं? मनाचं हे व्द्वंद्व वाढत जाऊन शीतल – मोठयाने ओरडण्याच्या स्थितीत आली. अन्? तेवढयात बाहेरचा दरवाजा खटखटला म्हणून तिला उठावं लागलं. तिने, दोन जिवांवर ऊठून, स्वतःला दरवाजाकडे ढकलत नेलं. दरवाजा उघडला. पाहते तो दरवाज्यात प्रणित उभा. त्याला दरवाज्यात पाहून, तिचा आपल्या डोळ्यांवर विश्वासच बसेना.आपण स्वप्नात तर नाही ना!ती बावचळली. बराच वेळ प्रणितकडे पाहत उभी राहिली.शेवटी न राहवून प्रणितच बोलला–"काय ओळखलं नाही काय?अगदी मूर्तीसारखी निश्चल उभी आहेस. घरात ये सुध्दा म्हणत नाहीस. म्हणून म्हणतोय"तो म्हणाला. त्याच्या चेहऱ्यावर ते त्याचं नेहमीचं लाघवी हास्य. प्रत्येक स्थितीत आनंदी राहणारा आणि जीवनाकडे एक आशयगर्भ काव्य म्हणून पाहणारा एक सशक्त कवी, उत्तम निवेदक,उत्कृष्ट वक्ता, अभिनय गुणसंपन्न नाटयकलावंत, चांगला चित्रकार व हसमुख चेहऱ्याचा उमदा युवक असलेला प्रणित – तिच्याकडे पाहून हसत होता.तिने लगबगीने स्वतःला सावरलं.. " ये ना, आत ये" ...... म्हणत ती दारातून बाजूला झाली. त्याला बसण्याचा इशारा करुन, ती आत गेली. न्हाणीघरात जाऊन तिने आपल्या तोंडावर पाणी मारले. केस नीट केले. आणि अंगावर ओढणी घेऊन ती बाहेर आली. तोपर्यंत प्रणित आत येऊन– बाहेरच्या खोलीतल्या त्या छोटया दिवानवर बसला होता.तिने बाजूची खूर्ची समोर ओढली.आणि तिच्यावर बसून,ती काही बोलणारं तोच प्रणितच पुन्हा बोलला."अगं! इकडे अमरावतीला आलो होतो ऑफीसच्या एका कामासाठी. सकाळीच निघालो चंद्रपुरवरुन. काम आटोपून परत चंद्रपूरला जाणे शक्य होणार नाही. त्यामुळे गावालाच जाऊन मुक्काम करावा लागेल.शिवाय यवतमाळची इथून शेवटची गाडी रात्री ९ वाजताची – तीही पांढरकवडयाला आपल्या गावावरुन जाते.आणि मुख्य म्हणजे तिचा आपल्या गावाला स्टॉप आहे. म्हणून म्हटलं अनायसे वेळ आहे भरपूर,तर तुला भेटावं. तू मागे फोनवरुन पत्ता दिला होता.तो शोधत शोधत आलो. आणि तशीही अमरावती माझ्यासाठी काही नवीन नाही.इथे गांधी चौकापर्यंत ऑफीसच्या एका कर्मचाऱ्याने त्याच्या गाडीवर सोडून दिलं. त्याला इकडेच काम होतं. तो घरापर्यंतच आणणार होता. पण घर शोधायला वेळ लागला असता. म्हणून मीच त्याला नाही म्हटलं. मग मीच घरमालकाचे नाव आणि शेजारची खूण सांगत शोधत शोधत आलो इथपर्यंत.बरं ते असू दे.कशी आहेस तू? एकदम छान ना! असायलाच हवं! माणसानं नेहमी कसं अगदी फ्रेश असायला पाहिजे. होय ना. " शीतल यावर

काय बोलते याचा अंदाज घेण्यासाठी तो – पुन्हा काही विचारण्याच्या तयारीत तिच्याकडे पाहू लागला.

"अरे पण, तुझ्यासारखं साऱ्यांनाच कसं जमेल आनंदी रहायला! तुझं एक वेगळंच आहे. कोणत्याही स्थितीत तू आनंदीच राहातो. आणि आनंदी राहण्यासारखी परिस्थिती असतांना कोण दुःखी राहील? कुणाला हौस का असते रडत बसण्याची आणि दुःखी राहण्याची"ती म्हणाली. अगदी बरोबर! तू म्हणते ते ठीक! पण शीतल, रडण्याने वा दुःखी राहाण्याने वाईट परिस्थिती संपत असते काय? की परिस्थितीत काही फरक पडत असतो? परिस्थितीत फरक पडलाच तर तो आपल्या संयम पूर्ण वागण्याने व गंभीर विचार करुन काही आवश्यक निर्णय घेण्याने. रडण्याने प्रश्न सुटतनसतात. बरोबर आहे ना."? तो म्हणाला. यावर काही बोलावसं तिला वाटलं नाही. प्रणितच्या या बिनतोड युक्तीवादावर खरं म्हणजे तिच्याजवळ उत्तरही नव्हतं. मोठ मोठया वक्तृत्व आणि वादविवाद ती निरुत्तर तरी कशी करणार होती.तिने

स्पर्धा जिंकणाऱ्या या बुध्दिमान–साहित्यिक तरुणाला–काही बोलायच्या ऐवजी खाली मान घालून अश्रू गाळायला सुरुवात केली.प्रणितने ते पाहिले अन्?तो बावचळला.क्षणभर त्याला काय करावे सुचेना. लगबगीने स्वतःला सावरुन तो उभा होत म्हणाला __"'अगं अगं, शीतल !काय हे? रडतेस कशाला?मी काही तुला चुकुन वाईट बोललो काय किंवा काही चुकीचं वागलो काय ? सांग ना !,वाईट तू नाही वागला प्रणित. परंतु जे वाईट वागले, त्यांचं तू आणि मी काहीच करु शकत नाही,करु शकलो नाही–हे काय कमी भयंकर आहे. ज्या रुढी परंपरा व अंधविश्वासांनी तुला आणि मला जन्मभरासाठी वेगळं केलं,त्यांचं आपण काय करु शकतो ?" शीतल म्हणाली. व शुन्यात बघत निश्चलपणे बसून राहिली. त्यावर प्रणित बोलला–"

" अगं, आता त्या मागच्या गोष्टी काढून काही फायदा आहे काय? झालं गेलं विसरुन जे आपल्या वाटयाला आलं ते स्वीकारायचं आणि त्यात कसा आनंद निर्माण करता येईल ते बघायचं. एवढंच आपल्या हाती आहे, होय ना!"..... "बरोबर आहे. तू साहित्यिक माणूस ! पुस्तकातलंच बोलणार! पण पुस्तकात अन्? प्रत्यक्षात बराच फरक असतो प्रणित! वाटयाला आलं ते जर भीषण असेल तर ते कसं पेलायचं आणि पेलत पेलत कसं जगायचं, सांग ना !, पुस्तकातल्या काल्पनिक जगासारखं हे जग आहे का?....सांग." "बिलकुल नाही." मला तुझं हे म्हणणं बिलकुल मान्य नाही. अगं, पुस्तकात जे लिहिलं जातं, ते कुठुन येतं?मानवी जीवनावरच ते आधारित असतं ना? ठीक आहे, त्यातला काही भाग काल्पनिक असेलही. पण तोही वास्तवाशी जुळणाराच असतो. घडू शकणारं असंच ते काल्पनिक असतं. घडू न शकणारं काल्पनिक कुणी वाचेल तरी काय? मग तू कशी म्हणतेस, पुस्तकातलं जग पूर्ण काल्पनिक असतं. तसं असतं तर, पुस्तके वाचल्याच गेली नसती. त्यांच्यावर नाटकं वा चित्रपट निघाले नसते. पुस्तकं गाजली नसती. आणि त्यांना पुरस्कारही मिळाले नसते. तू म्हणतेस पुस्तके काल्पनिक असतात. मग प्रा.सदानंद देशमुखांच्या बारोमास मधील संपूर्ण जीवन

काय काल्पनिक आहे? बाबाराव मुसळेंच्या हल्या हल्या दुधु दे मधील जीवन संघर्ष ऐकीव आहे की उध्दव शेळकेंच्या धग मधलं जीवननाटय न घडणारं आहे? अगं ते सगळं वाचतांना अंगावर शहारे येतात, मनाची शकले होतात, वाचक हादरुन जातात, का उगीच?लेखक एकतर स्वतः भोगलेलं किंवा इतर कुणी भोगलेलं व त्यांनी पाहिलेलं वा ऐकलेलं लिहीत असतात. अर्थात त्याला, म्हणजे त्या वास्तवाला आपल्या प्रतिभा सामर्थ्याने, ते सजवून मांडतात एवढंच.पण ते असो. ते राहू दे. आपण एकमेकांची चौकशी करायची सोडून हे काय भलतंच बोलत बसलो. बरं आता सांग, कशी आहेस तू? प्रणितच्या या प्रश्नाचं उत्तर

मध्?देण्याचं टाळून, शीतल उठली. "थांब मी खाण्याचं काही करते तुझ्यासाठी" असं म्हणत ती आत गेली. तसा प्रणित झटकन पुढे होऊन म्हणाला– " नको नको शीतल! प्लीज नको! अगं ऑफीस येच भरपूर नाश्ता आणि चहा झाला. आता पोटात मुळीच जागा नाही. पुन्हा कधी आलो म्हणजे घेईन नाश्ता चहा. निघतो आता मी. बस्स, तुला भेटायचं, पहायचं दोन शब्द बोलायचं आणि निघायचं असं ठरवून आलो मी. मग निघू ना मी?" तो– तिला ऐकू जावे म्हणून मोठयाने म्हणाला "अरे पण, दोन घोट चहा तर घे माझ्या हातचा.आता त्याशिवाय तुला मी आणखी काय देऊ शकते?" ती आतूनच त्याच्याकडे पाहत म्हणाली. एवढया वेळचा हसत खेळत बोलणारा–उमदा प्रणित तिच्या या वाक्याने आतून हलला.उगीच पुन्हा आपल्यालाही कटू आठवणींच्या गांधील माशा उठून त्यांचा त्रास होऊ नये म्हणून,त्याने विषय बदलून काढता पाय घेण्याचे ठरविले. शिवाय शीतलचा नवरा तो दारुडया वॉचमन घरी येण्यापूर्वी निघणं आवश्यक होतं.तसं शीतलचं आणि त्याचं एकदोनदा मोबाईलवर बोलणं झालं होतं " येशील तेव्हा, दुपारच्या चार–पाच वाजताच्या आत ये, आणि लवकर निघ, त्या दारुडयाचा काय भरोसा ! त्याच्या घाणेरडया मनात आणि सडलेल्या पोटात भलतंच काही यायचं" असं ती बोलली होती.ते आता आठवून तो उभ्या जागेहुन मोठयाने म्हणाला'शीतल, ए शीतल, अगं ऐक माझं. प्लीज ऐक! चहा वगैरे काहीच करु नकोस. तू भेटलीस, बोललीस, यातच सारं आलं. चहाचं काय, पुन्हा घेता येईल कधीतरी. निघतो मी आता. असू दे चहा."म्हणत प्रणितने चल बाय म्हणत दाराच्या बाहेर पाऊल टाकलं. शेजारपाजाऱ्यांच्या खोचक व बोचक नजरा टाळत तो झपाटयाने तिथून निघून मुख्य रस्त्यावर आला. त्याच्या, फाटकातून निघून बाहेर जात असलेल्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत शीतल बराच वेळ दारात उभी राहीली.आपल्या हातून फार मोठं मौल्यवान असं काहीतरी निघून जाते आहे,गेलं आहे.या दुःख भावनेने ती व्याकूळ झाली.एक लांब सुस्कारा सोडत ती परत वळली. पण तिचं मन मात्र प्रणितच्या मागोमाग भूतकाळात निघून गेलं. तिला आता प्रकर्षानं मागचं सारं आठवू लागलं. तिनं ते झटकायचा खूप प्रयत्न केला.पण एका हाताने हाकलेल्या माशा तो हात बाजूला होताच पुन्हा ताटातल्या अन्नावर येऊन बसाव्यात, तशा आठवणी तिला पुन्हा पुन्हा छळू लागल्या.

भूतकाळातल्यात्या दिवशी शहरातल्या साईबाबांच्या मंदीरात त्या दोघांनी–बाबाच्या मूर्तीसमोर बसून प्रथम ध्यान केलं.त्यांची प्रार्थना केली. अन्? एकमेकांचे जीवनसाथी होण्याचं ठरविलं.शीतलच्या ते बऱ्याच दिवसाचं मनात होतं.पण प्रणितला ते बोलून दाखवण्याची तिची हिम्मत होत नव्हती. प्रणितच्या मनातही हे बरेचदा आलं होतं. पण तोही, ही गोष्ट काढायला भीत होता. आपली ही, तात्पुरती बीएड.कॉलेजची नोकरी,अगदी तुटपुंजा मिळणारा पगार, वडीलांची जेमतेम आर्थिक परिस्थिती आणि आणखी बऱ्याच अडचणी –यामुळे,आपल्याला खूप आवडणाऱ्या – चुलबुल्या, हसऱ्या,मोकळया स्वभावाच्या,उच्चशिक्षित व देखण्या शीतलला आपण हे कसं म्हणायचं,या पेचात तोही होता. पण एक दिवस त्याच्या वडीलांनी तो घरी आला असतांना त्याच्या लग्नाचा विषय काढला. आणि त्याने मनातली गोष्ट वडीलांना बोलून दाखविली. त्याच्या वाढत्या वयाची चिंता वडीलांनी बोलून दाखविताच तो म्हणाला"बाबा योग्य वेळ येईल तेव्हा मी लग्न नक्कीच करेल. पण त्यासाठी तुम्हाला त्रास घ्यायची मुळीच गरज नाही. तुमची सुनबाई ठरली आहे. लोखंडे मामांची शीतल पाहिली असेल नं तुम्ही? ते दिग्रसचे लोखंडे मामा. आईचे मावसभाऊ,दिनकरराव लोखंडे, त्यांची सर्वात लहान मुलगी शितल, माहित आहे नं तुम्हाला?'

"अरे हो हो,आठवते आठवते. मी तिला एवढयातच घाटंजीच्या एका लग्नात पाहिली. तुझी आई होतीच सोबत. लोखंडे साहेबांनीच तिचा परिचय आमच्याशी करुन दिला. मुलगी लग्नाची आहे म्हणून सांगितलं.मलाही ती आवडली. पोरगी चांगली शिकलेली आहे. देखणी आहे.तुमचा जोडा चांगला होईल"यावर प्रणित काहीसा लाजला अन्? म्हणाला, "शिवाय बाबा तीही चांगली आर्टीस्ट आहे. विणकाम, भरतकाम तर तिला येतंच पण शिवाय ती चांगली गाते. गायनाच्या तीन परीक्षा दिल्या आहेत तिने. संगीतातच करिअर करायचं आहे तिला.आपल्याला लग्नाची काही घाई नाही.पण आतापासून गोष्ट काढून ठेवली, तिच्या आईवडीलाजवळ म्हणजे बरं. नाही तरं ते, दुसरीकडे कुठंतरी पक्कं करायचे अन्? मग आपल्या हाताशी आलेलं निसटून जायचं."–प्रणितने घाईघाईने सारं बोलून टाकलं. अनंतरावाना प्रणितच्या वडीलांना हेच हवं होतं. पण प्रणितजवळ गोष्ट काढायला ते कचरायचे. आता प्रणितने स्वतःच सारं सांगितल्यामुळे, त्यांचा मार्ग मोकळा झाला. शीतलच्या वडीलांना हस्ते परहस्ते निरोप पाठवून त्यांनी 'तुमची मुलगी आमच्या प्रणितसाठी आम्हाला करायची आहे असे सुचविले. शीतलच्या आईने ही गोष्ट यवतमाळला राहुन संगीताचे शिक्षण घेत असलेल्या शीतलला फोनवरुन सांगितली आणि शीतलला आभाळ ठेंगणं झालं. झाडाचं एखादं टपोरं फळ पाहिजे असावं,ते कसं मिळेल याचा विचार चालू असावा आणि ते फळ आपसूक पुढयात टपकावं, तसं तिचं झालं.तिने झटकन मोबाईलवर नंबर दाबून प्रणितचे अभिनंदन केले.दोघांनीही प्रथम एकमेकांशी कोडयात बोलून

हास्य विनोदात आपापली मने एकमेकांजवळ व्यक्त केली.

साईबाबांच्या मंदीरातील प्रार्थनेनंतर गोष्ट पुढे सरकली. दोघांच्याही घरी चर्चा सुरु झाल्या. दोन्ही घरांनी एकमेकांना आपली पसंती कळविली. वर्षा दीड वर्षातच लग्नाचा बार उडवून टाकू असे दोघेही होणारे व्याही एकमेकांना बोलले.शीतल आणि प्रणित भावी वैवाहिक आयुष्याची स्वप्ने रंगवू लागले. दिवस निघून जात चालले. आणि एक दिवस अनंतरावांना– शीतलच्या वडीलांचा फोन आला. अनंतरावांनी हॅलो म्हणताच ते म्हणाले " हे पहा अनंतराव. तुमच्या आमच्या मुलामुलीच्या सोयरीकीचं जे काही आपलं बोलणं झालं होतं ते आता रद्द समजा. आता आम्ही मोकळे आणि तुम्ही मोकळे. माफ करा! पण... प्रणितच्या वडीलांना हे ऐकून धक्काच बसला. ते ताडकनं म्हणाले " अहो पण काय झालं काय? असं का बोलता आहात तुम्ही? कुणी काही सांगितलं का प्रणित बद्दल? हो सांगितलं, पण ते इतर कुणी नाही तर ज्योतीषकारांनी सांगितलं.आपली सगळी बोलणी झाल्यावर शीतलची आई आमच्या गावातील एका ज्योतीषकारांकडे गेली. तिने प्रणितची आणि शीतलची कुंडली काढून मागितली.जोतीषकार बुवांनी एकवीसशे रुपये दक्षिणा घेऊन ती काढून दिली.अन्? सांगितले की,दोघांच्या कुंडल्या जुळत नाहीत. त्यामुळे हे लग्न करणे धोक्याचे राहील. लग्नानंतर दोघापैकी कुणाच्याही एकाच्या जिवाला धोका होऊ शकतो." मग सांगा कसे करायचे आम्ही हे लग्न........ "अनंतरावानां हे ऐकून विलक्षण संताप आला. पण स्वतःला सावरत ते संयमाने म्हणाले" अहो पण, लोखंडे साहेब, तुंम्ही एवढे शिकलेले,सवरलेले. कृषी खात्यातले मोठे अधिकारी आणि तुम्ही अशा कुंडल्या फिंडल्यावर विश्वास ठेवता!अहो हे सारं काल्पनिक असतं. जोतिषी अंदाजाने काहीतरी सांगतो आणि आपण ते खरं मानतो.तसं नसतं तर,ज्योतीषकाराने सांगितले ज्यांच्या कुंडल्या जुळातात म्हणून– त्यांची लग्ने मोडली नसती. वा त्यांच्या पैकी एकजण कोणी देवाला प्रिय झाले नसते. मी अशी –कुंडल्या पाहून व जुळतात म्हणून सांगूनही मोडलेल्या लग्नांची,शंभर उदाहरणे तुम्हाला देऊ शकतो. उगीच काहीतरी काल्पनिक गोष्टीवर विश्वास ठेवायचा!"

अहो पण काल्पनिक असतं असं समजून आपण दोघांचं लग्न लावून द्यावं अन्? उद्या काही बरं वाईट झालं तर काय घ्या! त्यापेक्षा विषाची परीक्षा न घेतलेलीच बरी. आमचं काही मनं होत नाही बुवा हे लग्न करुन द्यायला. तेव्हा आता तुमचं तुम्ही पाहून घ्यावं हेच खरं."ते म्हणाले ,अहो पण लोखंडे साहेब, माझं ऐकुन तर घ्या. मी काय म्हणतो."अनंतराव काकुळतेने बोलले "हे पहा, मला ऐकवण्यापेक्षा तुम्ही तुमच्या बहिणीला काय सांगायचे ते सांगा. तिचा या लग्नाला ठाम विरोध आहे. माझ्यापेक्षाही तिचा भविष्यावर आणि कुंडलीवर अधिक विश्वास आहे. मी एक वेळ तुमचं ."लोखंडे साहेबांनी म्हणणं समजून घेईल पण ती मानायला तयार नाही. त्यामुळे मलाही वाटतं की,...... कुंपणावरची भूमिका घेतली. त्यामुळे अनंतरावांचा अगदीच नाईलाज झाला.त्यांनी पुन्हा तीन चार दिवसांनी लोखंडे साहेबांना फोन करुन त्यांची आणि शीतलच्या आईची समजूत काढायचा प्रयत्न केला. पण ते दोघेही मानले नाही. त्यांनी लग्नाला ठाम नकार दिला.प्रणितच्या कानावर ही गोष्ट कशी घालावी याचा मोठा पेच अनंतरावांना पडला. शेवटी एक दिवस त्यांनी मनाचा हिय्या करुन प्रणितच्या कानावर ही गोष्ट टाकली. प्रणितने ते ऐकलं आणि त्याला प्रचंड धक्का बसला. आता तो मुंबईच्या एका शासकीय कार्यालयात बऱ्यापैकी पदावर सरकारी नोकरीवर लागला होता.अर्थात याहीपेक्षा वरचे पद मिळविण्यासाठी त्याचे प्रयत्न चालूच होते.सगळया प्रकारच्या परिस्थितीला,आनंदाने स्वीकारणारा प्रणित हे ऐकुन मात्र पूर्ण गळला. त्याच्या डोळयात टचकन पाणी उभे राहिले.ऑफीसला चार दिवसांची सुटी टाकून तो तडक गावी निघून आला.एक दिवस घरी अस्वस्थतेत घालवून तो दुसऱ्या दिवशी सरळ शीतलच्या घरी गेला. ......जाण्यापूर्वी त्याने शीतलला फोन करुन –तुझ्याशी महत्वाचं बोलायचं आहे. तुझ्या आईबाबांसमोर बोलू. तू ताबडतोब तुझ्या घरी निघून ये असे सांगितले. "शीतल आणि तो दोघेही जवळपास सारख्याच वेळी तिच्या घरी पोहचले. शीतलने पोहोचताच – कुंडलीच्या विषयावरुन आईबाबांना रागवायला सुरुवात केली. प्रणीतने तिला आवरले. तिच्या आईवडीलांना अत्यंत शांतपणाने आणि विविध उदाहरणांनी त्याने कुंडलीचा प्रकार कसा भ्रामक व अविश्वासार्ह आहे. हे परोपरीने सांगितले. पण शीतलच्या



आईवडीलांनी काही केल्या ते मान्य केले नाही. त्यांचं आपलं एकच कुंडलीची भविष्यवाणी खरी ठरली तर. प्रणितने– मोठ मोठया तथाकथित भविष्यवेत्त्यांनी केलेल्या भविष्यवाण्या कशा फोल ठरल्या हे उदाहरणांनी पुन्हा पटवून दिले. पण शीतलच्या आईवडीलांनी टस की मस केलं नाही. शीतलनेही अगदी जीव तोडून हे कुंडलीच प्रकरण खोटं असतं, त्यावर विश्वास ठेवू नका, आमच्या जीवनाशी खेळू नका असं अगदी निकरीने सांगितलं. पण तिच्या आईवडीलांनी ते मानलं नाहीच. ते आपल्या निर्णयावर ठाम राहिले.

डबडबल्या डोळ्यांनी आणि प्रचंड जड अंतःकरणाने शीतलने त्या दिवशी प्रणितला आपल्या घरुन निरोप दिला. आपल्या आईवडीलांनी – प्रणितला जेवणाचं काय पण साधं चहाचंही विचारु नये याचे तिला खूपच वाईट वाटले. हृदयावर हजार किलोचं वजन घेऊन तिने डोळ्याआड होणाऱ्या प्रणितला पाहत आपले डोळे पुसले. कधी न रडणाऱ्या प्रणितच्याही डोळयात अश्रू आलेले तिने पाहिले. आणि ती अधिकच केवीलवाणी झाली. प्रेम वगैरे नसलं, तरी प्रणित आणि शीतल ही एकमेकांची पसंती होती.एकमेकांना आयुष्याचा जोडीदार म्हणून त्यांच्या मनांनी मान्यता दिली होती. शासकीय मान्यता मिळालेल्या शाळेला – कोणत्या एखाद्या क्षुल्लक कारणामुळे बंद करावे लागावे–तसे त्या दोघांनाही आपापल्या आयुष्याच्या पुस्तकातील एका पानावरील हे महत्वपूर्ण प्रकरण– मिटवून टाकावं लागलं. प्रणितपेक्षा शीतलला ते अधिक जड गेलं. उदासीनता व वैफल्यात तिचे जीवन जाऊ लागले. अनेकदा तिच्या मनात आत्महत्येचाही विचार आला. परंतु–प्रणित हा धक्का सहन करु शकणार नाही. या विचाराने तिने तो मोह टाळला.आयुष्याला ओझं बनवून ती जगू लागली. कसेबसे दिवस ढकलू लागली. आता तिने संगीताचे शिक्षण सोडले.गायनही सोडले.एखाद्या जिवंत प्रेतासारखी ती जगू लागली.पहायला आलेल्या मुलांसमोर – निर्जीवपणे उभी राहू लागली.आणि एक दिवस तिला पहायला आलेल्या अमरावतीच्या एका मोठया शाळेत क्लार्क असलेल्या मुलाशी तिच्या आईवडीलांनी तिचे लग्न पक्के केले.अर्थात जोतिषाकडून कुंडली पाहूनच.यावेळी कुंडली जुळली.एवढेच नव्हे तर,मुलगा अत्यंत सद्गुणी,सदाचारी व निर्व्यसनी असल्यामुळे दोघांचा संसार यशस्वी होईल असे जोतीषकाराने ठामपणे सांगितले.अर्थात त्यासाठी त्याच्या हातात लोखंडे साहेबांना पुरते एकवीसशे रुपये ठेवावे लागले.दिवस भराभर निघून गेले.शीतलच्या आईवडीलांनी झपाटयाने लग्नाची तयारी केली आणि फेब्रुवारीच्या २६ तारखेला पंचाग पाहून तिचे लग्न पार पडले. रमण साबळे नावाच्या आपल्या या नवऱ्यासोबत शीतलने आठ–दहा दिवस काढले असतील नसतील. तोच शीतलला पहीला धक्का बसला.अमरावतीच्या एका मोठया शाळेत क्लार्क असल्याचे सांगून शीतलशी लग्न करणारा तिचा नवरा प्रत्यक्षात कंत्राटी पध्दतीवर काम करणारा चौकीदार वजा चपराशी आहे. असे तिला तिच्या शेजाऱ्यांकडून कळले. तिने त्या रात्री ते त्याला विचारले.त्यावर त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली. शीतलने खात्री करायची म्हणून आपल्या अमरावतीच्या एका मैत्रीणीला त्या शाळेत जावून विचारायला सांगितले. मैत्रीणीने चौकशी केली. आणि सत्य बाहेर आले. केवळ आर हजार रुपये पगारावर काम करणारा तो चौकीदार होता. शीतलने तो धक्का कसाबसा पचवला. मुळातच मन नसलेल्या आपल्या त्या दोन छोटया छोटया खोल्यांच्या फाटक्या संसारात ती कसाबसा जीव लावू लागली. आणि एक दिवस तिला सायंकाळचा–उशिरा घरी आलेल्या नवऱ्यांच्या तोडांचा भयंकर घाणेरडा वास आला. तो दारुचा वास शीतल सहन करु शकली नाही. तिने नाकतोंड दाबून कशीबशी रात्र काढली. सकाळी त्याबद्दल विचारताच त्याने प्रथम वाद घातला आणि शीतल निक्षून बोलताच तिच्या अंगावर हात घातला. मग हे नित्याचेच झाले. घरात पैसे देणे नको, काय लागते सवरते ते विचारणे नको, कधी प्रेमाने दोन शब्द बोलणे नको, वेळेच्या आत घरी येणे नको. हे सर्व शीतलला सहन करावे लागू लागले. हेही त्याने केलेली एक वेळ ठीक. परंतु त्याच्या पोटात दारु आणि तोंडाला दारुचा वास असतांना बळजोरी शीतलला असहय होऊ लागली. ती जिवाच्या आकांतांने विरोध करु लागली. परंतु शेजारच्या लोकांना उगीच तमाशा दिसू नये म्हणून ती तेही सहन करत गेली. तिच्या मनातल्या वैवाहिक सुखांच्या कल्पनांचा आणि पतीप्रेमाबद्दलच्या भावनांचा पार जळून कोळसा झाला. संसाराचं तिने रेखाटलेलं सुखी चित्र– दारु आणि मटक्याच्या आहारी गेलेल्या–तिच्या नवऱ्याने पार लाथेखाली घेऊन तुडवून टाकले.आता शीतलला,आपली कुंडली जुळविणाऱ्या त्या जोतीषकारा च्या नरडीचा घोट घ्यावासा वाटू लागला.त्याचबरोबर फारशी चौकशी न करता आपल्याला या व्यसनी माणसाच्या पदरात बांधणाऱ्या आईबापाचाही तिला खूप राग येऊ लागला.परंतु त्यांना काही बोलण्याचे तिने टाळले.आता अडीअडचणीला त्यांचाच फक्त आधार होता. वडील एकदोनदा भेटायला आले, त्यावेळी तिने भराभर

काहीबाही कारणे सांगून त्यांना गावाकडे रवाना केले.अगदी अळीमिळी गुपचिळी सारखे.आता रमणचे पिण्याचे प्रमाण खूपच वाढले होते. दारु पिऊन तो कामावर जात असल्यामुळे त्यांच्या संस्थेने एक दिवस त्याला कामावरुन काढून टाकले. त्यामुळे तो अधिकच तोल सोडून वागू लागला. एक दिवस त्याने घरातल्या खर्चासाठी आणि आपल्या दारुच्या सोयीसाठी शीतलच्या कानातील सोन्याचे रिंग जबरदस्तीने हिसकावून नेले शीतलने तेही आईबाबांना कळविले नाही.आता तेही रोजचेच झाले.शीतल–लंकेची पार्वती झाली. रोजची मारहाण, खाण्यापिण्याचे कसेबसे, प्रेमाचे चार शब्दही नाही,आणि भयानक शिवीगाळ त्यात पोटात वाढू लागलेलं बाळ या सर्वांनी कावलेली शीतल एकदिवस आपलं मन मोकळं करण्यासाठी– त्याला सांगून माहेरी आली. हातापायाच्या काडया झालेली, डोळे खोल गेलेली आणि चेहरा निस्तेज झालेली– एकेकाळची आपली देखणी मुलगी तिच्या आईबाबांनी पाहिली आणि त्यांचा बांध फुटला. कसे बसे स्वतःला सावरुन, त्यांनी पोरीचा तुटू पाहणारा संसार सांभाळून ठेवण्याचे भरसक प्रयत केले. चार माणसांना घेऊन जाऊन

त्यांनी जावयाला– दारु न पिण्याबद्दल परोपरीने समजावले. नोकरी नाही म्हणून त्याला धंदा करण्यासाठी तीन लाख रुपये सर्वसमक्ष दिले. मध्यस्थाच्या साक्षीने शीतलला त्याच्याकडे पुन्हा पाठविले. शीतलचे चार दिवस कसे बसे चांगले गेले.आणि पुन्हा येरे माझ्या मागल्या सुरु झाले. पुन्हा जुनेच सारे. त्यात आपल्या वडीलांनी दिलेले तीन लाख रुपये– नवऱ्याने दारुत आणि वरळी मटक्यात गमावले हे तिला कळले. आणि तिच्या जिवाने ठाव सोडला. पण पोटातल्या बाळासाठी ती जगू लागली. तो त्याही परिस्थितीत तिच्या देहामनाचा विचार न करता.आपली शारीरिक भूक तिच्यावर भागवू लागला. शीतल आता पुरतीच त्रस्त झाली. नवऱ्याजवळ राहणे तिला आता असहय झाले.अन्?तेवढयात तिला माहेरी येण्यासाठी निमित्त सापडलं.डॉक्टरांनी तपासून तिला बाळंतपणाची तारीख सांगितली तसे वडील तिला येवून माहेरी घेऊन आले.

नव्या बाळाच्या आगमनामुळे थोडीशी सुखावलेली शीतल काही दिवस जात नाही तोच पुन्हा काळजीने त्रस्त झाली.आरती नावाच्या अमरावतीच्या तिच्या मैत्रीणीने तिला फोनवरुन कळविले की आता तिचा नवरा दारु पिऊन रस्त्यावर कुठेही पडून असतो. त्याला कपडयाची भ्रांत नसते.एखाद्या दिवशी तो ट्रक किंवा गाडीखाली येण्याची शक्यता आरतीने बोलून दाखविली. पण शितलला त्याचे फारसे वाईट वाटले नाही.कारण ते तर तिने आता गृहीतच धरलं होतं. निदान त्या दारुड्या व्यसनी माणसाच्या छळातून मुक्तता तरी होईल याचा तिला थोडा बहुत का होईना आनंद होता. पण त्याचबरोबर चप्पलमध्ये खालून घुसलेला काटा अधुनमधून पायाला बोचावा तशी तिला बाळाच्या आणि आपल्या भवितव्याची चिंता बोचू लागली.दिवस निघून गेले.आणि एक दिवस तिने एका गोंडस बाळाला जन्म दिला. शीतलच्या वडीलांनी जावयाला फोन केला. फोन वाजून वाजून बंद पडला. पण कुणी तो उचलला नाही. तसा तिच्या वडीलांचाही धीर संपला.बाळाकडे पाहून शीतल कसेबसे दिवस काढू लागली. अन्?एक दिवस शीतलच्या – खेडयावर राहणाऱ्या – सासऱ्याने आपला मुलगा अती दारु सेवनामुळे लीव्हर डॅमेज होवून इर्वीन हॉस्पीटलमध्ये मरण पावला असे कळविले. शीतलवर आभाळ तर कोसळले नाही पण ती आतून पार कोसळली. जोतीषकाराने दोघांचा संसार यशस्वी होईल असे ठामपणे सांगितले होते. पण त्याच्या त्या शास्त्रशुध्द कुंडलीने, पूर्णपणे जुळणाऱ्या कुंडलीने – ना तिच्या नवऱ्याचा जीव वाचवला, ना तिचा संसार वाचवला. ज्योतीषांची कुंडली पूर्णपणे फेल ठरली होती. ती कुंडली पूर्णपणे भंकस ठरली होती. त्या जुळलेल्या कुंडलीनेच शीतलच्या संसाराचा नायनाट केला होता. भविष्यकाराची कुंडली ना तिच्या संसाराला, ना तिला सावरु शकली.

**विनय मिरासे अंशांत**
**५६७ / प्रयास प्रेरणा नगर,**
**उमरसय यवतमाळ**
**मो. ९४२०३६८२७२**

■■■



# ढेपेवाड्याची
## संस्कृतीवर्धक दशकपूर्ती !!!

दशदिशांच्या ऊर्जेतून साकारलेल्या आणि पारंपारिक भारतीय कला, संस्कृती आणि वास्तुरचनांचा वारसा जपणाऱ्या ढेपेवाड्याला ह्या वर्षी १० वर्षे पूर्ण होत आहेत. केवळ आजच्या पिढ्यांनाच नव्हे तर येणाऱ्या अनेक पिढ्यांना आपली वाडा संस्कृती व त्यातील राहणीमान पर्यटनाच्या माध्यमातून तिथे प्रत्यक्ष राहून अनुभवता यावे हे सन २००० साली पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरायला २०१४ साल उजाडले. वाड्याच्या बांधकामाचा काळ ४.५ वर्षांपर्यंत लांबल्यामुळे खर्चात प्रचंड वाढ होऊन डोक्यावरचे कर्ज वाढले होते. पर्यटनाच्या कुठल्याही मापदंडात ही वास्तू बसत नसल्याने आमचे तन, मन, धन आणि व्यावसायिक कारकिर्दीची ४.५ वर्षे देऊन उभी राहिलेली ही वास्तू लोकांच्या पसंतीस उतरेल की  नाही आणि पुढील काळात ह्या वास्तूचा प्रचंड देखभाल खर्च परवडेल की नाही ही चिंता सतावत होती. मात्र पहिल्यापासून आजवर पर्यटकांनी दिलेल्या प्रतिसादामुळे ही वास्तू आज दहाव्या वर्षातही आपल्या संस्कृतीचा वारसा जपण्यात यशस्वी ठरली आहे.

गेल्या दहा वर्षाच्या कारकिर्दीत अनंत आठवणींचा खजिना ढेपेवाड्याच्या वास्तूने गोळा केला आहे. त्यात सर्वात महत्वाचे म्हणजे भारत सरकारकडून दि. १४ जानेवारी २०१६ रोजी मिळालेल्या बौद्धिक स्वामित्व हक्कांनुसार  ढेपेवाडा ह्या संकल्पनेला मराठा वास्तुशैलीवर आधारित आणि मराठी संस्कृती जपणारी गेल्या दोनशे वर्षात बांधलेली पहिली नवीन वास्तू  असा  बहुमान मिळाला आहे. त्यानंतर दि. १३ ऑक्टोबर २०१८ रोजी ढेपेवाडा संकल्पनेला मिळालेल्या बौद्धिक स्वामित्व हक्कानुसार ढेपेवाडा ही भारतीय कला, संस्कृती आणि वास्तुरचनेचा वारसा जपणारी पूर्णपणे नव्याने बांधलेली भारतातील पहिली वास्तू ठरली आहे. ढेपेवाड्याची वास्तू सोशल मिडीयाच्या माध्यमातून कोट्यावधी लोकांपर्यंत पोहोचली असून ढेपेवाड्याच्या संकेतस्थळाला गेल्या १० वर्षात जगभरातल्या जवळपास १.७५ कोटी नेटीझन्सनी भेट दिली आहे.

शिवकालीन अंगाई, ‘सुभेदार’ चित्रपट, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षणाच्या चळवळीवर आधारित शॉर्ट फिल्म, मराठी तारकांची पारंपारिक दिवाळी ह्या चित्रकृतींबरोबरच आपल्या पारंपारिक सणांचे  सांस्कृतिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून तयार केलेले माहितीपट तसेच अनेक जाहिराती ह्या वास्तूत चित्रित झाल्या आहेत. शास्त्रीय,उपशास्त्रीय संगीताच्या मैफिलींद्वारे  दिग्गज गायकांचे सप्तसूर ह्या वास्तूत घुमतात आणि त्या सुरांचे निनाद इथेच वास्तव्य करतात. कवितांच्या मैफिली, नाटकांचे प्रयोग देखील इथे रंगतात.

दिवसभराच्या / रात्रीच्या वास्तव्याच्या सहलींद्वारे अनेक कुटुंब मराठमोळ्या पारंपारिक वास्तुरचनेतील राहणीमानाची अनुभूती घेतात. सुरभी हांडे, सिद्धार्थ चांदेकर, रोहित राऊत ह्यां सारख्या सेलिब्रेटींबरोबरच देशविदेशातील अनेक तरुण, तरुणी ह्या वास्तूत लग्नगाठ बांधत आपल्या वैवाहिक आयुष्याची सुरुवात करतात. वाढदिवस, मुंज, साखरपुडा, केळवण, डोहाळजेवण इ. कौटुंबिक कार्यक्रमांद्वारे अनेक अतिथी चांगले स्मृतिगंध इथे ठेऊन जातात.

गेल्या दहा वर्षात पूर्ण पारंपरिकपणे लग्न करण्याचा प्रघात असो, लोकांनी आपआपल्या फ्लॅटमधील अंतर्गत रचनेमध्ये केलेले जुन्या वाड्यांमधील फर्निचर असो, जुन्या वास्तूंचे संवर्धन किंवा नव्याने वाडे बांधणे असो, तसेच वाडा नावाने किंवा वाड्यासारखी अंतर्गत रचना केलेली रेस्टॉरंटस असो, ह्या सर्व बदलांना कारणीभूत ढेपेवाड्याची वास्तू ठरली आहे असे अनेक लोक आम्हाला सांगतात तेव्हा छान वाटतं. गेल्या दहा वर्षात लोकांनाही पुन्हा आपल्या पारंपरिक संस्कृतीकडे व त्यातील राहणीमानाकडे वळावेसे वाटते आहे हे देखील ढेपेवाड्याच्या वास्तूने अप्रत्यक्षरीत्या साध्य केले असाही अभिप्राय लोकांकडून आम्हाला मिळतो. असे अभिप्राय आम्हाला निश्चितच सुखावून जातात आणि आमचे बळ अजून वाढवतात

ढेपेवाड्याची वास्तू ही एक कलाकृती आहे असे आम्ही मानतो, ही कलाकृती अत्यंत मनापासून घडवणाऱ्या आणि तितक्याच मायेने सांभाळणाऱ्या मोलाच्या हातांमुळेच ढेपेवाड्याने इतिहास घडवला असं म्हणायला हरकत नाही.
आजवर निरपेक्षपणे साध्य केलेले  हे यश चिकाटीने टिकवून ठेवणे तसेच आपल्या भारतीय पारंपरिक वास्तूरचनेचा, कला, संस्कृतीचा वारसा येणाऱ्या अनेक पिढ्यांपर्यंत पोहोचवणे हाच उद्देश ठेवून आणि दशदिशांनी मिळालेल्या ऊर्जेचा वर्षाव आपल्या अतिथींवर करत या पुढील काळात ढेपेवाड्याची वास्तू मार्गक्रमण करणार आहे, अर्थात ह्यासाठी आजवर मिळाला तसा अतिथींचा पाठींबा या पुढील काळात देखील निश्चितच मिळेल ह्याची खात्री वाटते.

श्री. नितीन ढेपे व सौ. ऋचा ढेपे
dhepewada@gmail.com

लेख विभाग

# महाराष्ट्र गडांचा अभिमान, संस्कृतीचा गंध



दिवाळीच्या दिव्यांनी उजळलेल्या प्रत्येक घराबरोबरच आपल्या अंतःकरणातही एक ज्योत प्रज्वलित होते.ही ज्योत असते परंपरेची, अभिमानाची, वारशाची. महाराष्ट्र या भूमीच्या मातीमध्ये ज्या ज्या ठिकाणी पाऊल टाकावे, तिथे शौर्य,भक्ती आणि संस्कृतीची गाथा कानावर पडते. हे चित्र म्हणजे जणू या गाथेचे सजीव प्रतीक आहे.

## सिंहासनावरील छत्रपती

सिंहासनावर आरूढ छत्रपती शिवाजी महाराज जणू सह्याद्रीच्या गर्भातून उगवलेला तेजस्वी सूर्य! त्यांच्या डोळ्यांत दुरदृष्टीचे तेज,अंगी पराक्रमाचा जाज्वल्य आत्मविश्वास आणि अंतःकरणात प्रजाजनांविषयी अपार माया. त्यांच्याभोवती उभे असलेले गड–किल्ले म्हणजे जणू निष्ठावंत सेनापती. प्रत्येक किल्ला ही एक कथा कुणाचा शौर्यसंग्राम, कुणाचे बलिदान, कुणाचा विजय! रायगडाची भव्यता,प्रतापगडाची अभेद्यता आणि तोरण्याचे इतिहासातील स्थान  हे सारे मिळून स्वराज्याचा इतिहास घडवतात.

## वाद्यांची सुरेल जत्रा

या चित्राच्या पायथ्याशी विसावलेली वाद्ये तंबोरा,विना आणि तबला  ही केवळ साधी वाद्ये नाहीत.ती महाराष्ट्राच्या आत्म्याची सूरधारा आहेत.

**विना :** जणू संतांच्या ओव्यांना स्पर्श करणारी गूढ सरिता. तुकाराम महाराजांच्या अभंगांतून उमटणारी भक्ती,ज्ञानेश्वरीच्या शब्दांना साजेशी माधुर्याची छटा हीच विना देते.

**तंबोरा :** त्याच्या निनादात आकाशाची पोकळी भरते, स्वरांच्या शुद्धतेचे रक्षण होते.जणू हा तंबोरा म्हणजे संगीताचा श्वासच!

तबला : त्याच्या ठेक्यात जीवनाचा ताल आहे. लयबद्ध गतीत चालणाऱ्या पावलांची आठवण देणारा तबला भक्ती, शास्त्रीयता आणि लोककलेला जोडतो. ही वाद्ये म्हणजे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक प्रवासाची दिशा दाखवणारे दीपस्तंभच!

## गड आणि संस्कृतीचा संगम

महाराष्ट्राचा इतिहास जसा रणशौर्याने भारलेला आहे, तसाच तो भक्ती, कलेने आणि संस्कृतीनेही समृद्ध आहे. एका बाजूला तलवार उपसून लढणारा मावळा तर दुसऱ्या बाजूला विना झंकारणारा संत  ही दोन्ही रूपे महाराष्ट्राच्या मातीचीच. गड–किल्ल्यांच्या अभेद्य भिंतींमध्ये जशी रणगर्जना घुमली,तशीच मंदिरांच्या ओव्यांमध्ये विना–तंबोऱ्याची सुरेल गीते गुंजली. हा वारसा म्हणजे जणू "पराक्रम आणि परंपरेची द्वंद्विनी" जी आपल्या अस्तित्वाला समृद्ध करते.

## संदेश

दिवाळीच्या या प्रकाशपर्वात, जेव्हा आपण आकाशदिवे लावतो, तेव्हा त्या प्रत्येक दिव्यात आपल्याला शिवचरित्राचा प्रकाश दिसावा,संस्कृतीच्या वाद्यांचा निनाद ऐकू यावा आणि गड–किल्ल्यांच्या छायेतून धैर्याची जाणीव व्हावी.महाराष्ट्र म्हणजे फक्त एक भूभाग नाही;ती एक गाथा आहे पराक्रमाची,भक्तीची, संस्कृतीची.शिवरायांचे तेज आणि संतपरंपरेची माधुरी यांचा संगम म्हणजेच आपल्या भूमीची खरी ओळख.

"गडांचा गडगडाट, संतांच्या ओव्यांचा झंकार,आणि लोकसंस्कृतीची झंकार  या सर्वांचा संगम म्हणजे महाराष्ट्र."

**– केतन दत्तात्रय सुर्वे**
**(कार्यकारी संपादक–शिवतेज,साप्ताहिक मुळशी दिनांक)**

■■■

### ठेकेबाज संगीताचा ठेकेदार– संगीतकार– ओ. पी.नय्यर

# तारीफ करू क्या मैं उसकी .. ओ. पी. नय्यर

– दिलीप कुकडे




घोडयांच्या टापांचा ठेका गाण्यात ऐकला की,पूर्वीचे जुन्या जमान्यातील हिंदी सिनेसंगीताचे शौकिन,हे गाणे ओ.पी.नय्यरचे असणार हे शपथेवर नव्हे तर पैजेवर सांगत,अन त्यांचा हा अंदाज सहसा कधी चुकत नसे.तसा महिमा होताच संगीतकार ओ.पी. नय्यरचा.घोडयांच्या टापांच्या ठेकयावर तशी अनेक नव्या–जुन्या संगीतकारांनी असंख्य गाणी दिलीत अन ती लोकप्रियही झालीत. परंतु टाळ्यांचा जबरदस्त ठेका व घोडयांचा टापांचा ठेका ही संगीतकार ओ.पी.नय्यरचीच मक्तेदारी होती हे एकमुखाने सिनेरसिकांनी जणू मान्यच केले होतें.

जणू ती त्यांची खास खासियत होती. हे सर्व आठवण्याचे एकमेव कारण म्हणजे यंदा १६ जानेवारी २०२५ पासून सुरु होते आहे ओ.पी.नय्यर यांची जन्मशताब्दी ... १६ जानेवारी १९२६ हा ओ.पी.नय्यरचा जन्मदिनांक....ते हयात असते तर त्यांचा शतकमहोत्सवी वर्धापनदिन सोहळा त्यांच्या करोडो चाहत्यांनी किती थाटामाटात साजरा केला असता याची नुसती कल्पना केली तर अंगावर रोमांच उभे राहातात. त्यांचा जन्मशताब्दि सोहळा आज त्यांच्या विना त्यांच्या निव्वळ आठवणीवर साजरा करण्याचा प्रसंग किती मनाला असंख्य वेदना देणारा असला तरी त्यांच्या ठसकेबाज संगीताच्या स्मरणाने तो एका रम्य अशा संगीतमय आठवणींच्या दुनियेत आपणाला घेऊन जातो यात शंका नाही .

ओ. पी. नय्यर नावाच्या अवलिया संगीतकाराने आपल्या संगीताची जादू रसिकांवर कशी केली किंवा एका रिदम किंगचा जन्म कसा झाला हे जाणण्यापूर्वी, त्याने या क्षेत्रात भक्कम पाय रोवण्यापूर्वी जो तीव्र संघर्ष केला,ज्या अनंत अडचणी,हाल–उपेक्षा व अवमान यांचा सामना केला तो कमी प्रेरणादायक नाही.लाहोर येथे जन्मलेल्या गाता गळा असलेला ओ. पी. सिनेसृष्टीत आला तो इथे नायक बनण्यासाठी . तरी संगीताची बीजे जन्मतःच अंतःकरणात रुजलेली असल्यमुळे तो संगीतकार म्हणूनच रुजला वाढला अन फोफावला.सिनेसृष्टीत दाखल होण्यापूर्वी लाहोरला असतानाच तो ११ व्या वर्षापासून लाहोर आकाशवाणी केंद्रावर स्टाफ आर्टिस्ट म्हणून संगीतविभागात कामाला होता. तेथे असतानाच वयाच्या केवळ १४ व्या वर्षी त्याने प्रितम आ न मिलो ही गैरफिल्मीरचना कंपोज केली.ती ओ.पी.नय्यरची पहिली संगीतरचना विलक्षण गाजली.( नंतर त्याने ते गाणे परत मिस्टर ॲण्ड मिसेस ५५ वापरले. असो.)

या " प्रितम आ न मिलो "गैरफिल्मी गाण्याच्या लोकपियतेने अनेक चित्रपटनिर्माते व दिग्दर्शकाचे ओ.पी.नय्यरक डे लक्ष वेधले.त्यानंतर आकाशवाणीवर काम करत असतानाच, अन सहाय्यक म्हणून सिनेसृष्टीत अन्य संगीतकारांकडे म्हणून काम करत असतानाच लाहोर मधील विख्यात निर्माते–दिग्दर्शक स्व. दलसुख पांचोली आणि स्व.गुरुदत्त यांचेही त्यांच्याकडे लक्ष वेधले जाऊन त्यांच्या १९४७ सुमारास आलेल्या कनिज आसमान या चित्रपटाचे संगीत ओ.पी.नय्यरला देऊ केले.त्याचे संगीताची दखल कुणीच घेतली नाही.एवढच नाही तर.त्याचे त्यांनंतरचे आलेले "छमछमाछम " बाज " इत्यादि चित्रपटसुध्दा सांगितिक दृष्टया

अदखलपात्र ठरले.त्यानंतर बाज चित्रपटाला दिलेल्या संगीताचे पैसे गुरुदत्तकडे मागण्यासाठी,पैशाच्या तंगीमुळे ओ.पी.नय्यर त्याच्याकडे गेला असता, त्याला पुढील चित्रपटांच्या संगीतासाठी

# ग्रामपंचायत भुकूम

सर्व नागरिकांना

## दिपावलीच्या

हार्दिक शुभेच्छा



."नक्षत्रांची करीत उधळण, दीपावली ही आली..
नवस्वप्नांची करीत पखरण, दीपावली ही आली..
सदिच्छांचे पुष्पे घेउनी, दीपावली ही आली..
शुभेच्छांचे गुच्छ घेउनी, दीपावली ही आली..
दीपावलीच्या तेजोमयी शुभेच्छा!!!"



**सौ. सुवर्णा रामदास आंग्रे**
सरपंच

**श्री. सचिन पोरटराव आंग्रे**
उपसरपंच



**सौ. गौरी प्रसाद भरतवंश**
मा.सरपंच/वि.सदस्या



**सौ.रेखाताई योगेश वाघ**
मा.सरपंच/वि.सदस्या



**श्री.निलेश जयसिंग ननवरे**
मा.उपसरपंच/वि.सदस्य



**श्री. सचिन बाळासोहेब हगवणे**
मा.उपसरपंच/वि.सदस्य



**सौ. मयुरी अभिलाष आमले**
मा.सरपंच/वि.सदस्या



**सौ. सुवर्णा सुभाष पानसरे**
वि.सदस्या



**श्री. अंकुश खाटपे**
मा.उपसरपंच/ सदस्य



**श्री. भागवत यादव**
ग्रामपंचायत अधिकारी

**समस्त ग्रामस्थ मंडळी आणि**
**ग्रामपंचायत कर्मचारी**



सप्तरंगात रांगोळीच्या
सुखाचे दीप उजाडू दे,
लक्ष्मीच्या पावलांनी घर सुख,
समृद्धी ने भरू दे.!
शुभ
दिपावली
निमित्त आपणास व आपल्या परिवारास
मनःपूर्वक शुभेच्छा.!
श्री. महादेव
(आण्णा) कोंढरे
• कार्याध्यक्ष-राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार, पुणे ग्रामीण जिल्हा
• अध्यक्ष- राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार, मुळशी तालुका
• माजी सभापती पंचायत समिती, मुळशी
@mahadeoannakondhare @mahadeo_kondhare @kondharemahadeo

Chaitanya Vidya Pratishthan's

# PERIWINKLE ENGLISH MEDIUM SCHOOL & JR. COLLEGE

Periwinkle English Medium School & Jr. College
"Knowledge that Never Fades"
Government Recognized

## Shaping Future Innovators & Achievers

### Why Choose Us?

- Highly Qualified Faculty
- Multilingual Approach
- Personalized Attention
- Holistic Development
- Safe & Secure Campus
- Advanced Computer Lab
- Smart Classrooms
- Extracurricular Excellence
- Reliable School Transport
- Student/Parents app

- Playgroup
- Pre-Primary
- Primary
- Secondary
- Jr. College























## Admission Open

**For more info Contact:**

**7757020060 | 58 | 65 | 56 | 9822762176**


शुभ दिपावली
."दिवाळी अशी खास, तिच्यात लक्ष्मीचा निवास,
फराळाचा सुगंधी वास, दिव्यांची आरास,
मनाचा वाढवी उल्हास,
अशा दिवाळीच्या शुभेच्छा तुमच्यासाठी खास..!!"
सर्व नागरिकांना दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..!!
शुभेच्छुक,
शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे
मा.श्री.अमितभाऊ अशोक कुडले
उपजिल्हाअधिकारी युवासेना पुणे जिल्हा



NIRVANA CREATORS & DEVELOPERS
NIRVANA
LAKEVIEW RETREAT
www.nirvanalakeview.com
शुभदीपावली...
@t - Valne, Mulshi, Dist. Pune
YOUR LAKEVIEW ABODE
TO A REFRESHING LIFESTYLE
Director :
Harish Shastri
: Contact :
9822023135 / 9226027430
9226027432
Viman Nagar
Baner
Baner
NIRVANA ZEN
experience zen in your life
VASTU
NIRVANA
1,2 & 3 BEDROOM FLATS & SHOPS
BANER - PASHAN LINK ROAD
NIRVANA
DREAMS
BANER
3 BHK LUXURIOUS FLATS
4 SIDE OPEN
NIRVANA
Towards Ultimate Creativity
CONTACT NO.
9822023135 / 9527033111
www.nirvanadevelopers.com



स्व.ह.भ.प.बबनराव नथुजी नागरे



स्व.लक्ष्मीबाई बबनराव नागरे

# शुभदीपावली...

आपल्या पवित्र स्मृतिस
विनम्र अभिवादन..

.“यशाची रोशनी, समाधानाचा फराळ,
मंगलमय रांगोळी,
मधुर मिठाई, आकर्षक आकाशकंदील,
आकाश उजळवणारे फटाके,
या दिवाळीत हे सगळं तुमच्यासाठी
दिवाळीनिमित्त सर्वांना लक्ष लक्ष शुभेच्छा”



अ‍ॅड.श्री.राजेंद्र बबनराव नागरे
मोबा.- ९९२२७६४७६४

## श्री असोसिएटस्

ADVOCATE


शुभेच्छुक,

अ‍ॅड.श्री.चेतन राजेंद्र नागरे
( अ‍ॅडव्होकेट मुंबई हायकोर्ट )

डॉ.श्री.रोहन राजेंद्र नागरे
( एम.बी.बी.एस.,एम.एस.- आर्थो.)

कु.अव्दिका चेतन नागरे

नागरे परिवारातर्फे दीपावलीच्या सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा..!!


दिवे तेवत राहो,
सर्वांचं घर प्रकाशमान होवो,
सर्व स्वप्नं पूर्ण होवो,
हे दिवस असेच झगमगत राहोत,
दिवाळीच्या खूप खूप शुभेच्छा..!!
सर्व नागरिकांना..
शुभ
दिपावली
श्री.बाळासाहेब चांदेरे
शिवसेना जिल्हाप्रमुख पुणे
माजी सभापती- पंचायत समिती मुळशी, पुणे
शिवसेना


स्नेहाचा सुगंध दरवळला..आनंदाचा सण आला..
एकच मागणे दिवाळी सणाला..सौख्य, समृद्धी लाभो सर्वांना.!
शुभदीपावली
प्रा.सौ.सविताताई सुहास दगडे
मा. अध्यक्षा
जिल्हा परिषद पुणे
राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार


चंद्राचा कंदील घरावरी, चांदण्यांचे तोरण दारावरी..
क्षितीजाचे रंग रांगोळीवरी, दिवाळीचे स्वागत घरोघरी..!!
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!
सर्व नागरिकांना..
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
मा.श्री.राहुल गजानन दुधाळे
( मा.सरपंच बावधन ) । शिवसेना शाखा बावधन । समस्त ग्रामस्थ बावधन
शिवसेना

ॲडव्हान्स देऊन,काही पाश्चात्य संगीताच्या रेकार्डचा गठठा त्याच्या हाती ठेवून,गुरुदत्तने त्या पाश्चात्य संगीता बरहुकूम चाली बांधण्यास सुचवले. चित्रपट होता आरपार.....चित्रपट रीलीज झाला अन ओ. पी.नय्यर नावाच्या संगीतकाराचा डंका सर्वत्र पिटला जाऊ लागला. त्याची तकदिरच बदलली. कभी आर कभी पार लागे तीरे नजर, ये लो मै हारी पिया, इत्यादी सर्वच गाण्यांनी सर्वत्र धमाल केली. त्यानंतर त्याला कधीच मागे वळून बघावे लगले नाही. त्या चित्रपटापासून जणू चित्रसृष्टीला जणू एक ऱ्हिदमकिंगच गवसला.

""संगीतकार ओ. पी. नय्यरचे नाव घेतले की अनेकांच्या ओठावर त्यांच्या संगीतात न्हालेली घोडयांच्या टापांच्या ठेक्यावरील अनेक ठेकेबाज ठसकेबाज उडत्या चालीची गाणी आठवतात. मांग के साथ तुम्हारा.. (नया दौर),जरा हौले हौले चलो मेरे साजना ( सावन की घटा), "बदल जाये अगर माली चमन होता नही खाली ( बहारे फिर भी आयेगी) इटका इक्का पानका दुका ..ये है शहर कलकत्ता( हावडा ब्रिज), ..."पिया पिया पिया ना लागे मोरा जिया ... तुम तो बसी हो .." ( बाप रे बाप) इत्यादी गाणी म्हणजे ओ.पी.हे समिकरण लोकांच्या डोक्यत पक्के बसले की घोडयांच्या टापांचा ठेका ही जणू त्याची मक्तेदारीच झाली. तरी पण त्यांची केवळ हीच ओळख नव्हती.या टिपीकल गाण्यांपेक्षाही तो वेगळा होता हे त्याने अनेकविध प्रकारचे संगीत देऊन सिध्द केले.

त्याच्या संगीतात त्याने भारतीय रागदारीचा ज्या खुबीने वापर केला ते पाहता,त्याला भारतीय शास्त्रीय संगीतातील .रागदारीमधील ओ की ठो ही कळत नाही हा त्याचा दावा फसवा वा तकलादू वाटू लागतो.भारतीय शास्त्रीय रागदारीतले उस्तादसुध्दा थवक व्हावे अशी करतूद त्याने त्याच्या काही गाण्यत करुन दाखवली कीअस्स्ल भारतीय वाद्यांचा नेमका अचूक वापरसुध्दा, भल्याभल्यांना चकित करुन गेला.सतार, ढोलकी,तबला, सारंगी, कोका, व्हायोलिन बांसरी सह सेक्सोफोन, गिटार,पियानो, पियानो ॲकॉर्डियन, इलेक्टिक गिटार, हवई गिटार इत्यादी देशी विदेशी वाद्यांचा एकाच वेळी,एकाच गाण्यात नेमका उपयोग करावा तो ओ.पी.नेच... त्याची " मनमोरा बावरा, अकेली हूँ मै पिया आ ना.." चैनसे तुमने कभी हमको तो जिने ना दिया.."छोटासा बालमा देखो बिजली बोले बिनबादलकी जादूगर सांवरियाँ", तू है मेरा प्रेमदेवता,बेकसी हदसे जब गुजर जाये..छम छम घुंगरु बोले मेरी चाल नशिली..."अशी एक से बढकर एक अफलातून अशा अस्सल भारतीय रागदारीवरील त्यांच्या रचना ऐकल्यावर त्याला भारतीय शास्त्रीय संगीतातील ओ की ठो कळत नाही या वक्तव्यावर विश्वास ठेवणे अशक्य होते. पियानो आणि हॉर्मोनियम वर त्याची विलक्षण हुकुमत होती.ते त्यांच्या चाली बहुतेक वेळा पियानोवरच बांधत असत. त्यांच्या सर्व वाद्यावर असलेली हुकुमत त्यांच्या विविध शैलीतील असंख्य गाण्यातून असंख्य वेळा अनेकविध प्रकारे पहावयास ऐकावयास मिळते. कि बस पूछो ..." मेरी बेरुखी तुमने देखी है लेकिन नही तुमने देखा तडपना किसीका .."मै सोया अंखियाँ मिचे.." आंखोसे जो उतरी है दिलमे तसबिर है एक दिवानेकी..."यासारख्या तालवाद्यविरहित गाण्यातील मजा काही औरच होय.त्याचप्रमाणे, कोका वा सारंगी चा बेमिसाल वापर ऐकावा तर तो ओ.पी.च्याच संगीतात.ताल वा ठेका हा तर त्यांचा जीव की प्राण...टाळयांचा ठेका वापरवा तर तो ओ. पी. नय्यर यांनीच....."हमदम मेरे प्यार ना जानो चाहत के इकरारको .. जान ले जहा याद करोगे इक दिन मेरे प्यारको"हम दम मेरे मान भी जाओ कहना मेरे

मेरा नाम चूं चूं चूं "...ये चांद सा रोशन

प्यारका," हुजूरेवाला गर हो इजाजत.. उडे जब जब जुल्फे तेरी," चेहरा, ये झील सी नीली आंखे .."आदि गाण्यातील टाळयांचा जबरदस्त ठेका आपल्या हृदयाचा ठेका चुकवतो. जीव कासाविस करतो .

पंजाबी लोकसंगीतचा एक अनोखा तडका ओ.पी. नय्यरच्या संगीतात जाणवतो तो वैशिठयपूर्णच म्हणावा लागेल..." सरपर टोपी लाल हाथमे रेशमका रुमाल (तुमसा नही देखा ), " कजरा मुहोबतवाला अंखियनमे तूने डाला" ( किस्मत ), सुभानल्ला हाये हंसी चेहरा हाये "(काश्मीर की कली )," रेशमी सलवार कुरता जाली का....व " ये देश है वीर जवानोका ".. (नया दौर) आये है दूरसें मिलने हुजूरसे..." (तुमसा नही देखा)यासारख्या पंजाबी ठेक्यावर तत्कालीन रसिक वेडावले होते.

ओ.पी.नय्यरची हलकीफुलकी उडत्या चालीची गाणी किंवा युगुलगीते. विशेषतः अशी गाणी जॉनी वॉकरवर चित्रित झाली असली तर कहर उडवीत. उदा. ... जाने मेरा जिगर किधर गया रे.." सुनो सुनो जी चॅटर्जी मेरे दिलका मॅटरजी.."... ए दिल है मुश्कील जीना यहाँ... "गरीब जान के तुमहीने दर्द दिया है तुमही दवा देना..." किवा सुन सुन बालमा मुझको तुमसे प्यार हो गया

उधर तुम हंसी हो इधर दिल है जवॉ है..." सुनिये मिस्टर चालबाज,अशी धुंदफुंद करणारी उडत्या चालीची हलकीफुलकी गाणी केवळ ओ. पी. च देऊ जाणे.तशा प्रकारवी गाणी हेच मुळी ओ. पी. नय्यरचे वैशिठय होते.अशा गाण्यांचे त्यांचे जे वैशिष्ठयपूर्ण असे खास ओ. पी. टच असलेले वाद्यवुद संयोजन असे ते फक्त ओ. पी. नय्यरच करू जाणे. इतर कोणी त्याची नक्कल करायचे धाडस करत नसत...."दूजा करे तो गोता खाय " ही म्हण प्रत्ययास येई.मदन मोहन यांच्याप्रमाणे त्याच्यावर फलॉप चित्रपटांचा लोकप्रिय सुपरहिट संगीतकार असा शिक्का त्याच्यावर कधी बसला नाही. उलट त्याच्या केवळ नावावर आणि निव्वळ ठेकेबाज संगीतावर त्याचे चित्रपट बॉक्सऑफिसवर सुपरहिट होत.राज कपूर (दो उस्ताद) देव आनंद ( जाली नोट) असो नाहीतर भारत भूषण ( फागून) वा देव मुखर्जी ( एक बार मुस्करा दो) किंवा सुनील दत्त ( प्राण जाय पर बचन न जाये) असो हे चित्रपट त्या त्या काळातील आघाडीच्या नायकांवर नव्हे तर ओ.पी.नावाच्या संगीताच्या जादुगरामुळे गाजले. त्या चित्रपटांना वा कलाकारांना जी लोकप्रियता आणि प्रसिध्दी मिळाली, बॉक्स ऑफिसचा जो काही लाभ झाला, तिकिटाच्या बारीवर जे

काही व्यवसायिक यश मिळाले केवळ ओ. पी. च्या संगीताची जादू होती.त्यांच्या एकटयांच्या जीवावर चित्रपट चालत हे व्यावसायिक गुपित नव्हते. तर वास्तव होते. जॉय मुखर्जी, विश्वजित, शम्मी कपूर, भारत भूषण, प्रदीपकुमार यांची तर ओ. पी.नय्यर ही जणू जीवनरक्षक प्रणालीच होती.फिर वही दिल लाया हूँ, तुमसा नही देखा, काश्मिरकी कली, दिल और मुहोबत, किस्मत, ये रात फिर ना आयेगी, फागुन, हे चित्रपट स्टार व्हॅल्युवर नव्हे तर ओ. पी. नावाच्या तिकिटखिडकीवरच्या जादुमुळे चालले.हे कुणीही मान्य करेल.. ओ.पी.नय्यरला तसे सर्वसाधारणपणे लो बजेटचे चित्रपट मिळायचे. त्याला बडया बॅनरचे चित्रपट अपवादानेच मिळाले. (नया दौर, फिर वही दिल लाया हूँ,) छोटे मोठे मधल्या फळीतले निर्माते वा बॅनर मध्येच त्याला आपले सर्व कर्तृत्व पणाला लावून सिध्द करावे लागले. अन त्याने आपले नाव याच मंडळीत राहून एवढे मोठे केले. बडया बॅनरला, मोठया तालेवार निर्माता-दिग्दर्शकना ओ.पी.नय्यरचा सिनेमा प्रदर्शित होणार म्हटला की त्यांच्या चित्रपटाचे रिलीज पुढे ढकलावे लागत.त्याचे नाव ऐकून दबून रहावे लागले. एकदरीत बघितले असता संगीतकार ओ.पी.नय्यर यांच्या संगीतातील जादू ही अदभूत होती,हे कुणीही मान्य करेल. १९६० ते १९७५ या काळातले तालेवार रुबाबदार स्वतःच्या शर्ती -अटीवर संगीत देणारे हुकमी संगीतकार होते.

लता मंगेशकर यांचा आवाज आपल्या संगीतात एकदाही चुकूनही न वापरता त्यांनी जी सिनेसंगीतसृष्टीत जी गगन भरारी वा गरुड भरारी मारली आहे ती स्तिमित करणारी आहे.ती बरोबरी कुणीही करु शकणार नाही.स्व.महंमद रफी, आशा भोसले, गीतादत्त वा शमशाद बेगम यांना वजा केले तर ओ.पी.नय्यर यांच्या संगीतात काय उरते. या ना कारणाने त्यांचे या कलाकाराशी कधी संगीतकार व गायक म्हणून नाते दुरावले व प्रत्येकाशी त्यानी पंगा घेतला.पण शमशाद बेगम व गीतादत्त वगळता या अबोल्याचा तोटा ओ.पी. नय्यर यांनाच सोसावा लागला. गीतादत्तची जागा आशा भोसले यांनी समर्थपणे घेतली.

पण गीता दत्तची उणीव जाणवत होतीच. पण यथावकाश सर्वव्यापी आशाजीचा वरचश्मा ओ. पी. नय्यर यांनाच खटकू लागला. पण आशा भोसले वजा ओ. पी. कुणीच उरत नव्हते ते त्यांना उमगायला बरेच काही सोसावे लागले, बरेच अपयश, घसरण बघावी लागली. "चैन से हमको कभी तुमने तो जिना ना दिया या गाण्यासाठी सर्वोत्कृष्ट पार्श्वगायिकेचा पुरस्कार आशाजींना फिल्मफेअरने जाहिर केला. पण आशा भोसले त्यावेळी त्यांच्या पूर्वनियोजित कार्यक्रमामुळे मुंबईत नसल्यामुळे ओ.पी.नय्यर यांनाच पुढे होऊन आशाजीची ती पुरस्कार ट्रॉफी स्विकारावी लागली. पण मनात इतका ताठा व दुराभिमान स्वतःबद्दल होता की आणि

आशा जी बद्दल इतका कमालीचा तिरस्कार व्देष भरून राहिला होता की वाटेत त्यांनी ती ट्रॉफी गाडीतून जाताना रस्त्यावर भिरकावून दिली.त्याने काही पार्श्वगायकांबरोबर विनाकारण किंवा अकारण पंगा घेतला किंवा किरकोळ कारणाकरता तंटाबखेडा

उकरुन आशा भोसले बददलचा हा कमालीचा राग वा दुरावा त्यांना फार मोठा व्यावसायिक धक्का देऊन गेला.

असो. कायमची कटटी घेतली.(ज्यात मनमिळावू मृदु स्वभावाच्या महंमद रफीसाहेबांचा सुध्दा समावेश होता) त्याच्यानंतर बरेच पाणी पुलाखालून वाहून गेल्यानंतर त्यांचा त्याला पश्चातापही झाला. ( उदा. एका मुलाखतीमध्ये त्याने महंमद रफीशी घेतलेल्या चुकीच्या निर्णयाची कबूली देताना " महेंद्र कपूरने आपल्या चालीचा व संगीताचा विचका केला.. अशी विचवांची नांगीही मारली.)तसे आशा भोसलेबाबतही झाले पण ते त्याने कधीच कबूल केले नाही. आपल्या कारकिर्दीच्या अखेरच्या पर्वात नगण्य चित्रपटांना चव गेलेले विटके संगीत देताना त्याने पुष्पा पांगधरे, दिलराज कौर, कविता कृष्णमुर्ती, उत्तरा केळकर, वाणी जयराम सारख्या ओ.पी.ची गाणी गाण्याची औकात नसलेल्या" पार्श्वगायिका वापरुन आपले हंसे करुन घेतले.

असो अब पछताये तो क्या होत जब चिडीयाॅ चुग गयी खेत. त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या पर्वात योगायोगाने त्यांच्याशी त्यांच्या ठाण्यातील घरी भेटायचा प्रसंग आला तेंव्हा ते पूर्ण कृष्णमय झाले होते.त्याच्या जुन्या गाण्यांबददल,संगीताबददल ऑर्केस्ट्रेशन बददल त्यांच्याशी बोलायला गेलो तर तेंव्हा ते आत्यंतिक त्राग्याने म्हणाले.., मर गया वो म्युझिकार रिदमकिंग ओ.पी. ... कभी का मर गया....अब सिर्फ ओंकारनाथ नय्यर नामकी जिंदा लाश है."…. एका महान संगीतकाराचे ते बोल ऐकून फार वाईट वाटले. मनाला असंख्य वेदना झाल्या.... रिदमकिंग म्हणून सर्वज्ञात असलेले ओ. पी. नय्यर यांची गाणी तशी ३६५ दिवस रेडिओवर (एफएम., विविध-भारती, रेडिओ सिलोन वर) किंवा दूरदर्शनवरील कोणत्या ना कोणत्या वाहिनींवर वाजतच असतात.गाजत तर ती पहिल्यापासूनच होती.ध्वनीमुद्रीत झाल्यापासून च वाजत गाजत-गरजत असलेल्या अशा ओ.पी.नय्यरच्या ढंगदार ठेकेबाज गाण्यातील अन ओ.पी.या नावातील जादू किंवा उत्कंठा आल इतकी वर्ष झाली तरी तसूभरही कमी होत नाही.उलट दिवसेंदिवस ही जादू वा संगीतातील नशा अधिकाधिक वाढत आहे.अशा या थोर मनस्वी संगीतकाराच्या जन्मशताब्दिनिमित्त आठवणी काढताना ऊर अभिमनानाने भरुन येतो. असा संगीतकार झाला नाही व होणारही नाही या खात्रीने स्वतःचाच अभिमान वाटतो की, आपण ओ. पी. च्या त्या युगाचे साक्षीदार आपण आहेत.त्यांच्या जन्मशताब्दि वर्षानिमित्ताने त्यांच्या कर्तृत्वाला सलाम."

**- दिलीप कुकडे**
**मोबा.-८४४६०९२१७१**

■■■



# पद्माकर शिवलकर : क्रिकेटमधला शापित यक्ष

गुरुप्रसाद दि पणदूरकर



भारतीय क्रिकेटला असंख्य गुणवान क्रिकेटपटू देणाऱ्या मुंबईच्या खाणीत अशीही काही अभागी रत्ने निपजली जी कधीही देशाचे प्रतिनिधित्व करू शकली नाहीत. यातले सर्वात ठळक आणि चर्चिले जाणारे नाव म्हणजे 'पद्माकर काशिनाथ शिवलकर'.या महान डावखुऱ्या फिरकी गोलंदाजाने यंदा जीवनाच्या क्रीडांगणातून 'एक्झिट' घेतली. त्या फिरकीच्या जादूगाराचे हे संस्मरण.

मुंबईतल्या दादर,पोर्तुगीज चर्च येथे १४ सप्टेंबर १९४० रोजी त्यांचा जन्म झाला आणि बराचसा काळ तेथेच व्यतीत झाला. मित्रमंडळीत 'बाळ'नावाने ओळखले जाणारे शिवलकर शाळेत बऱ्यापैकी विद्यार्थी असले तरी त्यांचे जास्त लक्ष खेळात आणि जुनी हिंदी गाणी ऐकण्यात असे. त्यांच्या घराच्या आसपास तेव्हा शेते होती आणि घराजवळून जाणाऱ्या एकमेव काँक्रीटच्या रोडवर रबरी किंवा टेनिस बॉलने क्रिकेट खेळले जाई.सुरवातीला फक्त प्रेक्षक असणारे शिवलकर मग त्यात प्रत्यक्ष भाग घेऊ लागले. थोड्याच काळात मग डावखुरा गोलंदाज म्हणून ते टेनिसबॉल क्रिकेटमध्ये नावारूपास आले. याच काळात मॅट्रिक झाल्यानंतर मेकॅनिकल इंजिनीयर होण्याची त्यांची मनीषा होती.पण मॅट्रिक झाल्यानंतर ३ वर्षे ना त्यांना VJTI च्या कोर्सला ॲडमिशन मिळाली ना चांगली नोकरी.

आता पुढे कसे होईल या विवंचनेत असतानाच 'दत्तू साटेलकर' हा त्यांचा मित्र देवदूतासारखा धावून आला. ब्रॅडबरी मिल्समध्ये एका फिरकी गोलंदाजासाठी नोकरी उपलब्ध होती, म्हणून ते तेथे ट्रायल द्यायला घेऊन गेले.पण तेथे प्रथमच सीझन बॉल हाताळायची पाळी आली आणि ट्रायल घ्यायला होते साक्षात विनू मंकड. या दुहेरी दडपणाने त्यांचे पहिले तीन चेंडू स्वैर पडले. आता नोकरीची आशा संपली असे वाटत असतानाच त्यांची गोलंदाजीची शैली आणि प्रामाणिकपणा बघून विनूभाईंनी त्यांच्यावर विश्वास टाकला आणि नोकरीबरोबरच क्रिकेटविश्वाची कवाडे उघडली. विनूभाईंच्या मार्गदर्शनाखाली मग त्यांच्या गोलंदाजीत सुधारणा होऊ लागली. सहजसुंदर शैलीबरोबरच विविध डावपेच, अचूकता आणि तासनतास गोलंदाजी करण्याची क्षमता आत्मसात केली.अशातच पुरुषोत्तम शील्डच्या अंतिम सामन्यात मिल्सच्या 'रुईया क्लब'कडून दादर क्रिकेटर्सच्या संघाविरुद्ध खेळताना त्यांनी प्रभावी गोलंदाजी केली.त्या प्रतिस्पर्धी संघातील माधव मंत्री आणि विजय मांजरेकरसारख्या खेळाडूंना त्यांनी अडचणीत आणले. आपल्या भंडारी समाजातील एवढा गुणवान युवा खेळाडू पाहून मांजरेकर खुश झाले आणि त्याला आपल्या 'शिवाजी पार्क जिमखान्या'त (शिपाजि')* सामावून घेतले. याच काळात शिवलकर आपल्या सहकाऱ्यांमध्ये 'पॅडी' या टोपणनावाने लोकप्रिय होऊ लागले.

'शिपाजि'*मध्ये त्यांना मांजरेकर,रमाकांत देसाई, हर्डीकर, बाळू गुप्ते, चंदू पाटणकर, वाडेकर, मधु पाटील यांसारख्या दिग्गजांबरोबर कांगा लीगचे सामने खेळायला मिळू लागले. तिकडेच त्यांना क्षेत्ररचनेतले बारकावे शिकायला मिळाले. याचवेळी त्यांना सुधाकर अधिकारींनी सिद्धार्थ महाविद्यालयात प्रवेश मिळवून दिला आणि मग पुढची ४ वर्षे त्यांनी आंतरमहाविद्यालयीन स्पर्धा गाजवल्या. यानंतर माधव मंत्रींमुळे त्यांना प्रतिष्ठित'सीसीआय'क्लबचे २ वर्षांसाठी काँट्रॅक्ट मिळाले.तिथे रामचंद,आपटे बंधू, अधिकारी, मश्रुवाला, सेटलवाड यांच्याबरोबर खेळायची संधी मिळाली. दरम्यान मिलची नोकरी सोडून दोन वर्षे 'स्टेट बँक'तर्फे खेळले आणि काँट्रॅक्टर, रामनाथ केणी, रमाकांत आचरेकर यांच्यासाथीने 'बँक शील्ड' जिंकून दिली. १९६२ साली त्यांची 'टाटा स्पोर्ट्स क्लब'साठी खेळायला सुरवात झाली. या प्रवासात शिपाजि*, सीसीआय दोन्हीसाठी पदार्पणात कांगा लीग जिंकली तर टाटासाठी 'टाइम्स शील्ड'.या उमेदवारीच्या काळात त्यांनी 'आर्मर' चेंडूवर प्रभुत्व मिळवले ज्यावर भलेभले फलंदाज चकत असत.फलंदाजीला अनुकूल खेळपट्टीवर चांगली गोलंदाजी टाकण्याबरोबरच, फिरकीला

पोषक खेळपट्टीवर भेदक गोलंदाजी टाकण्यातही ते पारंगत झाले. शिवाय ते चेंडूला फसवी ऊंची देण्यात वाकबगार बनले.यामुळे अनेक नामी फलंदाजांचा 'मामा' होऊन ते यष्टीचीत होत, ज्याचा स्वतः शिवलकरांना फार आनंद मिळे.

त्यांचा पहिला प्रथमश्रेणी सामना झाला तो 'सीसीआय' साठी एप्रिल १९६२ मध्ये,जागतिक दौऱ्यावर असलेल्या 'आंतरराष्ट्रीय संघा'विरुद्ध ब्रेबॉर्न स्टेडियमवर. बॉब सिम्पसन, टॉम ग्रेव्हनी, काउड्रे, वीक्स, बेनॉ,रामाधीन यांसारख्या दिग्गज खेळाडूंचा समावेश असलेल्या या संघाविरुद्ध शिवलकरनी सामन्यात ७ बळी घेतले. यामुळे त्यांची मुंबई रणजी संघात निवड झाली. पण पहिला रणजी सामना खेळण्यासाठी त्यांना आणखी तीन वर्षे वाट बघावी लागली. दरम्यान 'सीसीआय' क्लबबरोबर ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यावर जाण्याची त्यांना संधी मिळाली. तेथील वेगवान गोलंदाजांना अनुकूल खेळपट्ट्यांवरही त्याांनी २० सामन्यात १०७ बळी मिळवून साऱ्यांनाच दखल घ्यायला लावली.

बळी ४२ वेळा आहेत.

१९७१ ते १९७५ हा त्यांच्या कारकीर्दीचा सुवर्णकाळ म्हणता येईल.१९७१-७२ या रणजी मोसमात त्यांनी १४.१८ च्या सरासरीने ६४ बळी घेतले, तर १९७२-७३ या मोसमात १५.०८ च्या सरासरीने ७९ बळी. १९७१ साली रणजी उपांत्य सामन्यात बंगालविरुद्ध दहा बळी घेतले तर अंतिम सामन्यात महाराष्ट्राविरूद्ध आठ. तसेच १९७२ साली म्हैसूरविरुद्ध उपांत्य सामन्यात तेरा बळी आणि अंतिम सामन्यात बंगालविरुद्ध नऊ बळी घेत मुंबईच्या विजयांत सिंहाचा वाटा उचलला.यावरही कडी केली ती १९७३ सालच्या अंतिम फेरीत तामिळनाडूविरुद्ध. चेपॉकच्या भिंगरी खेळपट्टीवर अवघ्या ३५ धावांत १३ बळी घेत मुंबईला फक्त २ दिवसांत विजय मिळवून दिला.

सातत्याने नेत्रदीपक कामगिरी करणाऱ्या शिवलकरांना एकही कसोटी खेळायला न मिळणे अतिशय आश्चर्यकारक आणि दुर्दैवी म्हणावे लागेल.सुरवातीला बापू नाडकर्णी, सोलकर, दुर्राणी यांच्यामुळे








१९६५ साली महाराष्ट्राविरुद्ध रणजी पदार्पण केल्यावर मात्र त्यांनी मागे वळून बघितले नाही. १९८१ साली निवृत्त होईपर्यंत ते मुंबई संघाचा कणा होते. यादरम्यान मुंबईसाठी त्यांनी ८ रणजी विजेतेपदे मिळवली आणि ४ इराणी चषकाची जेतेपदे. इतकेच नव्हे तर १९८७-८८ साली चांगल्या डावऱ्या फिरकीपटूची उणीव भासल्याने कर्णधार वेंगसरकरच्या आग्रहाखातर ४८ व्या वर्षी त्यांनी मुंबई रणजी संघात पुनरागमन केले आणि संघाला उपांत्य फेरीत पोहोचवताना आणखी २ सामने खेळले. उपांत्यपूर्व फेरीत त्यांनी कर्नाटकचे विश्वनाथ आणि बिन्नी हे महत्वाचे बळी मिळवले. एकूण ७४ रणजी सामन्यात तब्बल ३६१ बळी टिपले जो अजूनही मुंबईसाठी सर्वोच्च बळींचा विक्रम आहे. एकंदरीत प्रथमश्रेणी क्रिकेटमध्ये १२४ सामन्यांत त्यांच्या नावावर ५८९ बळी आहेत, तेही अवघ्या १९.६९ च्या सरासरीने. यात सामन्यात दहा बळी १३ वेळा तर डावात पाच

त्यांना भारतीय संघात जागा नव्हती. नंतर बिशनसिंग बेदी उदयाला आला तेव्हा तो अधिक तरुण असल्याने त्याला प्राधान्य दिले गेले. त्याच्या जोडीला चंद्रा, प्रसन्ना, वेंकट असल्याने इतर फिरकी गोलंदाजांना संधी नव्हती. तर १९७९ सालपर्यंत बेदीसह फिरकी चौकडी निवृत्त झाल्यावर शिवलकरना डावलून दिलीप दोशीला संधी दिली गेली. दोनदा ते भारतीय संघात समावेश होण्याच्या उंबरठयावर होते असे अनेकांना वाटले.एकदा १९७७ साली ऑस्ट्रेलियाच्या दौऱ्यापूर्वी संभावित खेळाडूंच्या कॅम्पसाठी त्यांची निवड झाली तेव्हा,आणि दुसऱ्यांदा बेदी निवृत्त झाला तेव्हा. पण दोन्ही वेळा नियतीने त्यांना दगा दिला.नाही म्हणायला १९७३-७४ मध्ये त्यांना भारतीय संघासह श्रीलंकेचा दौरा करायला मिळाला. तिकडे दोन 'अनधिकृत' कसोटी सामन्यात त्यांनी चार बळी मिळवले. १९७९-८० मध्ये शिवलकर इंग्लंडमध्ये मायनर काऊंटी चॅम्पियनशिपमध्ये

'डरहॅम'साठी खेळले.

१९८१ साली मुंबईसाठी खेळणे थांबवल्यानंतरही नाउमेद न होता, ते उत्साहाने शिपाजि✲, सीसीआय आणि टाटा क्लबसाठी ५५ वयापर्यंत समर्पित वृत्तीने,फिटनेस राखून खेळत राहिले. पॅडीना मैदानावर कुठल्याही परिस्थितीत कधीच निराश झालेले वा आक्रस्ताळेपणा करताना कोणी बघितले नाही. पॅडी क्रीडाकौशल्या बरोबरच साध्या, शांत स्वभावाने संघातील लहानथोरांना हवहवेसे असायचे. उशिरा का होईना पण १९९५ साली त्यांना संभाजीनगरमध्ये बेनिफिट मॅच मिळाली ज्यात सुनिल, कपिलसह सचिन, अझर वगैरे भारतातले तेव्हाचे सर्व प्रमुख खेळाडू अगदी आपलेपणाने खेळले आणि पॅडीना थोडी फार आर्थिक मदत झाली.

दरम्यानच्या काळात 'टाटा केमिकल्स'मध्ये पॅडीनी निवृत्तीपर्यंत इमानेइतबारे नोकरी केली. पुढे मुंबई क्रिकेटशी प्रशिक्षक आणि निवडकर्ता अशा स्वरूपात जोडलेले राहिले. शिवाजी पार्कवर त्यांनी मैदानातील होतकरू प्रतिभा पारखण्यात आणि जोपासण्यात योगदान दिले. कसोटीपटू प्रवीण आमरे यांच्या पुढाकाराने 'शिवाजी पार्क जिमखाना अकादमी' सुरू झाली, तेथे त्यांनी १० वर्षे आपल्या अनुभवाचा फायदा तरुण खेळाडूंना करुन दिला. तिथूनच श्रेयस अय्यर, शार्दुल ठाकूर, हरमीत सिंग सारखे आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू घडले आहेत. आपल्या प्रत्येक कार्यात त्यांनी जीव ओतला व आनंद घेतला, 'आपल्यापेक्षा संघाला प्राधान्य' ही भावना स्वतःही जोपासली आणि शिष्यांमध्येही रूजवली.



क्रिकेटव्यतिरिक्त पॅडीना संगीताची खूप आवड होती. आपली गायनकला घर, ड्रेसिंगरूम इतपत मर्यादित न ठेवता सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम, वाद्यवृंद इथेही आपली कला सादर करीत. कदाचित क्रिकेटमध्ये मिळालेली निराशा ते गायनातून घालवत असावेत. महम्मद रफीचे ते मोठे चाहते होते आणि त्यांची अनेक गाणी ते सुंदररित्या सादर करीत.'सुषमा श्रेष्ठ'सारख्या मोठया गायिकेबरोबरही त्यांनी गाणी सादर केली आहेत.शांताराम नांदगावकर लिखित आणि संगीतबद्ध,त्यांनी गायलेली दोन गाणी चांगलीच गाजली –"कशासाठी वेडय काळजी उद्याची" आणि "हा चेंडू दैवगतीचा फिरतसे असा उसळून".कालांतराने ते स्वतः गीतांची रचनादेखील करू लागले होते. मकरंद वायंगणकर,संजय कऱ्हाडे यांच्या आग्रहाने त्यांनी 'षटकार' क्रिकेट पाक्षिकात काही काळ लेखनही केले. पुढे अरुण घाडीगावकर यांच्यासह त्यांनी 'हा चेंडू दैवगतीचा' हे मोकळेढाकळे आत्मकथन लिहिले. हे शीर्षक त्यांनीच गायलेल्या गीताचे ध्रुपद होते,जे त्यांच्या आयुष्याचे सारही म्हणता येईल. आपल्यावरील अन्याय त्यांनी आधी ओरडून सांगितला नसला तरी अखेरच्या काही वर्षात त्याबाबत ते भावुक झाले होते. आपल्याला कोणी गॉडफादर नव्हता आणि कोणाला तरी आपण नको होतो, त्यामुळे गुणवत्ता, पात्रता असूनही आपली भारतीय संघात निवड झाली नाही, अशी खंत ते बोलून दाखवत.त्यांच्या ह्या भावनेशी बहुसंख्य क्रिकेटप्रेमी सहमत असतील.रवींद्र नाट्यमंदिरमध्ये एकदा "मराठी माणसावर अन्याय होतोय का?' या विषयावरील परिसंवादात व्यासपीठावरून त्यांनी हीच भावना मांडली. "मला केवळ एक कसोटी सामना खेळावयास मिळायला असता तरी त्यामुळे माझे हात आभाळाला टेकल्याचे समाधान मिळाले असते. भारतीय संघाची कॅप मला मिळू दिली नाही, ही भळभळणारी जखम आणि त्यातून होणारी असह्य वेदना मी एकटयाने भोगली", अशी हृदयद्रावक कैफियत त्यांनी मांडली.

सुनिल गावसकरन यांनी आपल्या 'आयडॉल्स' पुस्तकात मोठ्या सन्मानाने पॅडींचा समावेश केला आहे.ते कप्तान असताना पॅडींचा भारतीय संघात समावेश करण्यासाठी निवड समितीला राजी करू शकले नाहीत,अशी खंत व्यक्त केली आहे. द्वारकानाथ संझगिरी यांनी एका लेखात त्यांना 'दधीची'ची उपमा देऊन त्यांच्या अपरिमित कष्टांना नमन केले आहे.त्यांचे वाडेकर,सोलकर, वेंगसरकर,संदीप पाटील,मांजरेकर सारखे सहकारीच नव्हे तर विश्वनाथ, कपिलदेव, अमरनाथ, किरमाणीसारखे अनेक प्रतिस्पर्धीही त्यांच्याबद्दल गौरवोद्गार काढतात. कोणीही क्रिकेटतज्ञ जेव्हा 'सर्वकालीन सर्वोत्तम मुंबई संघ' काढतो तेव्हा त्यात पॅडींचा समावेश हमखास असतो. २०१७ साली 'बीसीसीआय'ने त्यांना 'सी.के.नायडू जीवनगौरव पुरस्कार' देवून काही प्रमाणात पापक्षालन केले. टाटा कंपनीनेही त्यांना 'लाइफटाइम अचीव्हमेंट अवॉर्ड' देऊन गौरव केला आहे.

आपल्या पश्चात शोकसभा आयोजित करू नये, कोणी रडू नये असे त्यांनी शेवटच्या काळात लिहून ठेवले. आपला अखेरचा प्रवास 'आनंदयायी' म्हणून घडू दे, इतकीच त्यांची माफक अपेक्षा होती. ३ मार्च २०२५ रोजी त्यांचे अल्पश्या आजाराने मुंबईत निधन झाले. तेव्हा चालू असलेल्या 'चॅम्पियन्स ट्रॉफी'च्या उपांत्य फेरीच्या सामन्यात भारतीय संघाने हातावर काळी पट्टी बांधून शिवलकर यांना श्रद्धांजली वाहिली. आपल्या लाडक्या रफीचे "मैं ज़िंदगी का साथ निभाता चला गया, हर.फिक्र को धुएँ में उड़ाता चला गया", हे गीत जीवनसूत्र मानणारा हा शापित यक्ष,आपल्या जादुई डावऱ्या फिरकी गोलंदाजीच्या दंतकथा मागे ठेवून अनंतकाळच्या प्रवासाला निघून गेला.



(छायाचित्र ) : इंटरनेटवरून साभार)

गुरुप्रसाद दि पणदूरकर (माहीम,मुंबई)

■■■

# शापित प्रतिभाशाली कलावंत चित्रकार विन्सेंट व्हेन गॉन...

प्रा.डॉ.माधवी खरात




जगप्रसिद्ध चित्रकार विन्सेंट व्हेन गॉन ,नेदरलँड मध्ये जन्माला आला.ज्याच्या कुंचल्यामध्ये जादुई अलौकिक चित्रकारिता होती. आज इतक्या वर्षानंतर सुद्धा जगभरच्या प्रसिद्ध म्युझियममध्ये त्याच्या चित्रांचा प्रचंड किमतीने लिलाव होतो .रसिकांना या चित्रांनी अक्षरशाः वेड लावलेले आहे. मात्र काळाला पुरून उरलेल्या या कलावंताला त्याच्या हयातीत प्रसिद्धी अजिबातच वाटयाला आली नाही. किंबहुना अवहेलना,यातना आणि प्रचंड वैफल्यग्रस्त अवस्थेतच त्यांचा २९ जुलै रोजी मृत्यू झाला .

१३५ वर्षांपूर्वी या दिवशी वैफल्यग्रस्त,तणावग्रस्त ,मनोरुग्ण अवस्थेमध्ये, एक अपयशी कलाकार किंवा व्यक्ती म्हणून स्वतःला दोष देतच त्याने या जगाचा निरोप घेतला. त्याच्या मृत्यूनंतरच पाश्चात्या जगातील तो एक प्रतिभावंत कलावंत म्हणून प्रसिद्ध झाला.अवघे ३७ वर्षाचे आयुष्य त्याला लाभले, परंतु यातील त्याच्या आयुष्यातला अतिशय महत्वाचा कालखंड म्हणजेच १८८१ ते १८९० ...अवघ्या या नऊ वर्षांमध्ये त्यानं आपल्या अलौकिक प्रतिभेने ,चित्रकारितेमध्ये संपूर्ण जगामध्ये महत्वपूर्ण स्थान निर्माण केले .त्याच्या आयुष्याचा जर विचार केला तर या दहा वर्षात ,एकूणच ,त्याच्या आयुष्याला फार महत्वपूर्ण वळण लागलेले दिसते.१ ८८१ ते ८५ या काळामध्ये हा सगळा त्याचा अत्यंतिक संघर्षाचा कालखंड होता .या काळांत चित्रांबद्दल तो अतिशय उत्साही असला तरी,उदरनिर्वाहाचे त्यांचेकडे साधन नव्हते.त्याच्या वडिलांनी चित्रकलेतील त्याचा कल बघूनच ,पुढे त्याला त्याच्या काकाच्या हेग,येथील कला विषयक अकॅडमी त रवाना केले. काकांनी त्याला नेहमीच आयुष्यात स्थिर करण्याचा प्रयत्न केला,त्यासाठी वेगवेगळ्या नोकऱ्या आणि काही पदही देण्यात आली. सुरुवातीला शिक्षक,मग धर्मोपदेश आणि खाणकामगारांसाठी चा प्रमुख म्हणूनही त्याने काम केलं.या सगळ्या कालखंडामध्ये चित्रकारिता चालू होती. चित्रांची ही देण त्याला त्याच्या आईकडून मिळाली होती. ती अगदी सहजपणे रेखाटन करीत असे. अत्यंत मनस्वी असणारा

विन्सेंट व्हेन गॉन च्या व्यक्तिमत्वात एक प्रकारचे भय,अस्वस्थता आणि अधीरता होती. त्यामुळे नोकरीतही त्याला स्थिरता लाभली नाही आणि चित्रांमध्ये एकतानता असूनही अस्वस्थता होती. ही अस्वस्थता एकलीपणा किंवा भावनांचा प्रचंड कोंडबारा त्याच्या प्रसिद्ध असणाऱ्या या चित्रात नाही उमगून येतो.

थिओ हा त्याचा भाऊ ,हा त्याच्या आयुष्याचा भरभक्कम आधार होता. थिओ ने त्याला प्रचंड मदत केली. किंबहुना त्याची चित्रकारिता ,त्याचं जगप्रसिद्ध कलावंताचे हे रूप ,केवळ त्याच्या या धाकटया भावामुळेच निर्माण झालं .अगदी सुरुवातीच्या काळात त्यांने जी चित्र काढलेली आहेत ,ती त्याच्या आयुष्यातील तणावग्रस्त अवस्थेचे प्रतिबिंबे आहेत .

समाजातील कष्टकरी वर्गाबद्दलची करुणा ,त्याचबरोबर ईश्वराबद्दलचे चिंतन या काळात सतत त्याच्या मनात होते. सातत्याने चर्चला भेटी देणे, बायबलचे भाषांतर करणे,गोरगरिबांना मदत करणे यासारख्या बाबी या काळात घडत होत्या. गरीब मजुरांच्या समस्याने तो इतका व्यथित होत असे की,आपल्या अंगावरचे उत्तम ,सुखासिन कपडे किंवा ,आपले उत्तम अन्न याचाही त्यांने त्याग केला होता केला .अर्थातच यामुळे तो आपले व्यावसायिक काम उत्तम प्रकारे करू शकला नाही .आणि त्यामुळे उदरनिर्वाहाची त्याची साधने आपोआपच नष्ट होत होती.

मात्र हातात कुंचला आला की,त्याची प्रतिभा फुलत असे. त्याच्या चित्रांना बहर येई.मनातील अतिशय अमूर्त अशा साऱ्या

भावना चित्रात व्यक्त होत असत त्यामुळेच थिओ ला याबद्दल कौतुक वाटत असे.आपल्या धाकट्या भावाशी विचारविनिमय करून त्यांने चित्रकारितेत स्वतःला झोकून दिले.परंतु या कालखंडामध्ये ज्या ज्या समूहाला तो भेटत होता किंवा जे सामूहिक प्रश्न त्याच्या डोळ्यासमोर होते,ती त्याच्या चित्रातून प्रतिबिंबित होत होती. , (the sower, peasant women,Beach with figures and sea, the peasant man and woman , the loom




)या साऱ्या चित्रातून सामान्यांचे जीवन ,त्यांच्या अशा अपेक्षा आणि त्यांच्या चेहऱ्यावरील कारुण्य स्पष्ट दिसत असे.याच कालखंडामध्ये तो प्रेमातही पडला होता . विषयी त्याला आकर्षण निर्माण झालं होतं.ती त्याची मॉडेलच होती .आणि वेश्या होती.तिला आणि तिच्या मुलाला अतिशय प्रेमाने त्यांने वर्षभर सांभाळलं. अर्थातच या प्रेमाला त्याच्या कुटुंबीयांचा विरोध होता . त्यामुळे स्त्रीचा सहवास ,कुटुंबाचे सुख त्याच्या वाटयाला आले नाही .ऐकलेपणा,भावनिक गुंतागुंत,अस्वस्थतेचा,सतत त्याच्या मनावर दाब निर्माण होत राहिला.स्त्रीसहवासाची ओढ,आणि कौटुंबिक अभावग्रस्तता यामुळे सतत तो तणावलेला असे.

अर्थात यातूनही चित्रकला चालूच होती.पुढे पॅरिसला तो रवान झाला .पॅरिसच्या लुरे म्युझियम भेटीने तो प्रभावित झाला. त्याच्या चित्रांना एक गती आणि त्याच्या मनात एक उत्साह निर्माण झाला.१८८५ ते १८८८ हा त्याचा अतिशय उत्तम असा काळ होता. अनेक चित्रकारांशी त्याच्या भेटी झाल्या. त्याला नवं आणि उत्तम काही शिकता आलं .त्याच्या प्रतिभेला बहर आला. आपल्या चित्रकारितेला त्याने अभिनव वळण दिले. अनेक म्युझियम , संग्रहालययांना भेटी, चित्रांबाबत नवीन प्रयोग प्रसिद्ध चित्रकारांशी चर्चा, या काळात होत्या,चित्रकलेतील जुन्या पद्धतीपेक्षा नव्या बाबींचा तो विचार करू लागला. कॉरमान या प्रसिद्ध कलावंताचा सहवास लाभला. याशिवाय एमिली बर्नाड ,तुलौस लुत्तैक पिसारो, गोंगे या चित्रकारांचा सहवास महत्तपूर्ण ठरला .याच काळात जपानी चित्रकलेशी त्याचा आलेला संबंध त्याला अधिक आनंद देणार होता .आपली बहीण ऑना हिला लिहिलेल्या एका पत्रात त्याने म्हटले ""the envy the Japanese artistic for the incredible .neat, clarity which all their works hove. it is never boring and you never get the impression that ,they work in hurry. it is as simple as ,breathing .they draw a figure with a couple of strokes with such an unfailing easiness as, if it were as easy as buttoning one's waist coat.".पॅरिसचा दक्षिणेकडचा भाग त्याला जपान सारखा वाटत असल्याने १८८८ ते १८८९ मध्ये तो आल्स (Arles )मध्ये राहिला

मात्र पॅरिसमधील चकचकीत वातावरणाचाही त्याला कंटाळा आला . त्याचा उमद्या, मनमुराद मोकळ्या आणि अगदी सहज भाव असणाऱा स्वभाव,तिथे रममाण झाला नाही. .या काळात मात्र भरपूर चित्रे त्यांने काढली. साधारणतः पिवळ्या रंगाचे त्याला अधिक आकर्षण वाटत असे. त्याच्या घराचं नावही त्याने ,,"यलो हाऊस" ठेवलं होतं .या काळामध्ये twelve sunflowers in vest ,draw bridge with carriage, draw bridge with lady with Parasol,ही चित्रे रेखाटली .सामान्य माणसे किंवा सामान्यांच्या जीवनाविषयी त्याच्या वैशिष्ट्यपूर्ण व्यक्तीत्वाचा तो शोध घेत होता. साहजिकच ,त्यामुळे त्याच्या चित्रात एक प्रकारची स्वाभाविकता आणि जिवंतपणा आढळून येतो. . zouave Milliet , हे चित्र रेखाटताना त्याला विलक्षण आनंद झाला होता .हे

चित्र सध्या न्यूयॉर्कमध्ये मला पाहता आलं .त्याबद्दल त्यानं थिओ ला पाठवलेल्या पत्रात म्हटले होते

""I have finally found a model .a Zouave – a small chap with a bull's nake and tiger's eyes .I began a portrait and then began a second one...




The uniform is off the same blue as the..." त्याच्या चित्रातली प्रचंड गतीमानता आणि बाह्य रंगरेषांचा परिणामकारक वापर, विषयातील वैविध्यता ,किंवा विविधतेतून एकच प्रसंग सादर करण्याचे कौशल्य या महत्वपूर्ण बाबी होत्या.. the starry night , olive Orchard, Van gogh's bedroom in Arles ,Peasent woman with straw hat, peachtree, wheat field with crows, sunflower in a vase

यासारख्या त्याच्या चित्रांनी एकूणच, या काळामध्ये बहर आणलेला होता .मात्र हा उत्सव फार काळ टिकत नसे अचानकच प्रचंड अस्वस्थता,उदासी येई आणि तो तणावग्रस्त होई. त्याच्या मनातल्या अमूर्त कल्पना कागदावर उतरवल्यानंतर त्याबद्दलचा संवादही तो आपल्या भावाशी करत असे .त्याचे मित्र तसे फारसे नव्हते .जे काही मित्रहोते,त्या मित्राशी सुद्धा झालेला त्याचा प्रचंड वाद आणि त्यातूनच स्वतःचा त्याने कापून टाकलेला कान...ही घटना तत्कालीन काळात अतिशय महत्वपूर्ण होती. गोगे या प्रसिद्ध चित्रकार मित्राश झालेल्या वादावादीचे रूपांतर, त्याला चाकू दाखवण्यापर्यंत झाल्यामुळे या वादाला भयंकर रूप लाभले .सहाजिकच हा मित्रही निघून गेला.परंतू पश्चातापाने किंवा अतिरेकी संतापाने विंग्सेंट व्हॅन गॉन ने मग स्वतःचा कानच कापून टाकला. ही घटना अनेकांना त्रासदायक होती. किंबहुना त्यामुळे त्याला ते गावही सोडण्याची वेळ आली .अशा वैफल्यग्रस्त अवस्थेत तो अतिशय भयभीत होत असे,त्याचा एकाकीपणा वाढत जाई. मनोरुग्णालयातही .तो दाखल होई. तिथे काही काळ तो स्वस्त असला तरी, पुन्हा अतिरेकी उत्साह ,हेकेखोपणा आणि घुसमट त्याची वाढत जात असे. त्यांना काढलेल्या स्वतःच्याच अनेक पोट्रेटमध्ये ही प्रचंड अस्वस्थता लक्षात येते. पिळवटून गेलेल्या वेदनांचे प्रतिबिंब त्याच्या स्वतःच्या चित्रात स्पष्ट दिसून येते.

निळा, पिवळा या रंगातून त्याच्या भावनात्मक उद्रेकाचेही दर्शन घडते.अर्थात आपल्या धाकट्या भावावर विश्वास आणि प्रेम असणाऱ्या या कलंदर चित्रकाराला अखेरच्या काळात ,या प्रचंड अंतरिक अस्वस्थतेनेच मृत्यू पंथावर सोडले .जगभरच्या ख्यातनाम म्युझियममध्ये आज त्याची चित्रे संग्रहित करण्यात आलेली आहेत .न्यूयॉर्क, वॉशिंग्टन डीसी, सन फ्रान्सिस को ..या अमेरिकेतील संग्रहालयात मला ती अगदी शांतपणे पाहता आली. याचा आनंद वाटला. . त्याच्या मृत्यूचे प्रचंड दुःख झालेला त्याचा भाऊ थिओ यानेही पुढल्या पाच –सहा महिन्यातच आपला देह ठेवला .

जेव्हा जेव्हा "विन्सेंट व्हॅन गॉन "...याच्या कर्तृत्वाचा पाढा गायला जातो ,तेव्हा तेव्हा त्याचा विलक्षण प्रेमळ आणि सातत्याने त्याला प्रोत्साहन देणारा भाऊ "थिओ "आपल्या स्मरणात राहतो.हे मात्र खरे. !! एक शापित कलावंत असेच त्याच्याबद्दल म्हणावे लागेल.

**प्रा.डॉ.माधवी खरात**
**वॉशिंग्टन डी.सी. यु.एस.ए.**
**मो. ९८८१५४६८८४**

■■■

# झोंबीः ग्रामीण शिक्षण व्यवस्थेवरील अस्वस्थ ओरखडे

किरण शिवहर डोंगरदिवे




आनंद यादव हे मराठी साहित्य सृष्टीतील ग्रामीण साहित्याला एक निश्चित दिशा देणारे नाव होय.कादंबरी आणि कथा यातून ग्रामीण जीवनाचा आढावा घेण्याचे काम आनंद यादव यांनी केले आहे. झोंबी, गोतावळा, नटरंग, एकलकोंडा, माऊली ह्या त्यांच्या महत्वाच्या कादंबऱ्या आहेत. ३० नोव्हेंबर १९३५ रोजी कागल येथे जन्मलेल्या आनंद यादव यांनी ४० पेक्षा जास्त साहित्याकृती मराठी विश्वाला दिल्या आहेत.झोंबी या त्यांच्या १९८७ मध्ये प्रकाशित झालेल्या आत्मचरित्रात्मक कादंबरीला १९९० मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. पु ल देशपांडे यांची २६ पानाची दीर्घ अशी प्रस्तावना झोंबीला लाभलेली आहे. प्रस्तावनेमध्ये पु ल देशपांडे झोंबी एक बाह्य हरवलेले बालकांड असे शीर्षक देतात त्यावरून ही कादंबरी आनंद यादव यांच्या बालपणाशी निगडित आहे हा प्राथमिक अंदाज वाचकांना येतो आणि बालपणात शेतात राबराब राबणे आणि शिक्षणासाठीची प्रचंड तळमळ आणि संघर्ष याची गाथा म्हणजे झोंबी असे खात्री झोंबी वाचन झाल्यावर आपल्याला पटते.

तसे पाहता कागल हे थोर समाज सुधारक आणि शिक्षणाचे भोक्ते राजश्री शाहू महाराज यांचे गाव याच गावात रतन आप्पा जकाते आणि तारा या एका जोडप्याच्या कुटुंबात आनंद यादव यांचा जन्म झाला. लग्न झाले तेव्हा तारा ही उणीपुरी एक वर्षाची आणि तीही पाळण्यात झोपलेली असणे यातच हे कुटुंब किती मागासलेले आहे ?हे आपल्या लक्षात येते.आधी सासूचा पुढे रताप्पाच्या बहिणीचा सासुरवास भोगलेली,मुली होतात म्हणून नवऱ्याचा प्रचंड मार खाणारी तारा आनंदला शाळेत पाठवताना आपले पांग फिटतील आणि मुलगा शिकला म्हणजे संसार सोन्याचा होईल, निदान मुलाचे आयुष्य तरी सुखाचे होईल या विचारातून मुलाला शाळेत पाठवताना प्रचंड खुश होती. शाळेतल्या पहिल्या दिवसाचे वर्णन लेखकाने ज्या पद्धतीने केले आहे ती पाहता जगातील कोणतीही कष्टकरी आई मुलाला शाळेत पाठवताना स्वतःचे किती स्वप्न शाळेत पूर्ण होण्यासाठी पाठवत असते याची आपल्याला कल्पना येते. राम मंदिरात असलेली शाळा आणि त्या शाळेचे वर्णन वाचताना त्या काळात शाळेत भौतिक सुविधांचा किती अभाव होता? ते आपल्या लक्षात येते. त्या वर्षभरातील शिक्षण,राम मंदिरातील घंटा वाजवण्याची इच्छा अशा अनेक बालसुलभ आठवणी सुरुवातीला लेखकाने झोंबी मधून सांगितल्या आहेत.साकेकर मास्तर असो की निंबाळकर दोघांच्याही हातात मुलांना मारण्यासाठी छडी असेच, सोना सारख्या उच्चभ्रू घरातील मुली आणि आनंद यांच्या परिस्थितीचे वर्णन आणि तफावत ही प्राथमिक स्वरूपात त्या काळातील गरीब आणि श्रीमंत मुलांच्या आर्थिक परिस्थितीतील विषमतेचे प्रतीक आहे. इयत्ता पहिलीतील आनंद जेव्हा त्याच्या व्यायाम करणाऱ्या आणि पहिलवानासम भासणाऱ्या माने गुरुजींना व्यायाम करतात तर कुस्ती का करत नाही? असा प्रश्न विचारतो. आणि त्यावर," अरे, शिक्षकांनी कधी कुस्त्या करायच्या असतात का?" असे सांगून त्या काळात लायकी आणि सिद्धता असली तरी शिक्षक समाजाच्या किती दबावाखाली राहत होते हे आपल्याला कळते. त्याचप्रमाणे शिरपा नावाच्या गरीब मुलाने फुटलेल्या खापरी पाट्यांचे तुकडे खाणे, पैसे चोरणे, त्याच्या खिशात बीड यांचे थोटके सापडणे असे काही वर्णन त्या काळातील विद्यार्थ्यांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीची जाणीव करून देणारे आहेत.

इयत्ता दुसरी मध्ये काजी मास्तरांचा मार खाल्ल्याचे लक्षात राहिले. तर तिसऱ्या वर्गात बेरीज वजाबाकी शिकण्याचे, चौथीच वर्ष घाटगे मास्तरच्या स्वभावामुळे लक्षात राहिल्याचे लेखक सांगतात.घाटगे मास्तरांच्या शिकविण्याच्या प्रसंगाचे वर्णन करतांना लेखक म्हणतात, "घाटगे मास्तर एकदा महाराणा प्रतापची गोष्ट

सांगत होते. रंगात आले होते. बाहेर आवाज जाऊ नये म्हणून वर्गाची दारं बंद केली होती. तरी एक–दोन पाचवीची पोरं दाराच्या खाचांतून मास्तरांचा अभिनय बघत उभी होती. त्यावरून कोणती ऐतिहासिक कथा चालली आहे याचा अंदाज बांधत होती. आम्ही सर्व विसरून कानांत प्राण आणून ऐकत होतो. हळदीघाट, राणाप्रतापाची घोडदौड, त्याची अकबराच्या मुलाशी होणारी लढाई हे सर्व मनासमोर दिसत होतं, चुर्रर म्हटलं तर कुठं आवाज होत नव्हता. मुलं बाहुल्यांसारखी खिळलेली. मास्तर टेबलापुढं स्टेजवरल्याप्रमाणं इकडं–तिकडं जात संवाद म्हणत असलेले,माहिती सांगत असलेले." प्रसंगाचे हुबेहूब वर्णन उभे करून शिकवणारे मास्तर लोक आनंद यादव ह्यांना मिळाले होते असे याठिकाणी लेखक आपल्याला सांगत असतात. रणदिवे मास्तर सारखे गणित शिकवणारे शिक्षक अशा काही शिक्षकांच्या तन्मयतेने शिकविण्याच्या पद्धती सुद्धा लेखकाने झोंबी मधून वाचकांसमोर उलगडून दाखवल्या आहेत.

इयत्ता पाचवी पासून मोठा झालेला आनंदा शेतात काम करू शकतो या जाणीवेतून रत्नाप्पा त्याच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करून त्याला कामाकडे वळवणे यासाठी धडपडू लागला. त्यातही पुढे पैशाच्या अडचणी, पुस्तकाच्या पैशाच्या अडचणी यातून खऱ्या अर्थाने या कादंबरीची सुरुवात होते असे मला वाटते.शेतातील सर्व काम करणे आणि सर्व करून होईल तसे शाळेत जाऊन बसणे, शिक्षकांचा मार खाणे, घरी वडिलांचा मार खाणे, दुष्काळजन्य परिस्थितीत आई–वडिलांची जगण्यासाठी तगमग आणि यातूनच लेखकाच्या शिक्षणाची दैना अस्वस्थ करत जाते. लेखकाची आई तारा, ती मात्र आनंदने शिकावे म्हणून स्वतःकडून होईल तशी त्याला साथ देत राहते.ताराच्या जीवनात राब राब राबावे आणि मुलांना जन्मी घालावे एवढेच आयुष्य तिच्या वाटयाला आले होते. आठ मुलं झाली तरी तिचा नवरा तिला कायम मारत असे ह्या असल्या आयुष्यापेक्षा किमान लेखकाने म्हणजे मुलांपैकी एकाने शिकले तरी सर्वांचे आयुष्य सुधारेल या सुप्त इच्छेतून ती आनंदला शिकवायला धडपड करत असते. शिवा हा लेखकाचा लहान भाऊ तो नाळ रोगी असल्यामुळे त्याला शाळेतच घातलं नाही. त्याला शाळेत घालावं म्हणून लेखकाने जेव्हा आईला सांगितले तेव्हा, सगळी पोरं शाळेत घालून का भीक मागत हिंडू?' असा प्रश्न ती विचारते तेव्हा आजच्यासारखे मोफत शिक्षण नसल्यामुळे आर्थिक परिस्थिती नसलेल्या कुटुंबाला शिक्षण घेणे किती कठीण होते हेही आपल्या लक्षात येते. आनंदाच्या शिक्षणाच्या संदर्भात एके ठिकाणी तारा आणि रत्नाप्पा यांच्या अंतर्गत भांडणात तारा जेव्हा ," एवढी सातवी झाली की नोकरी लागल. मग पगार येईल तवा? पोराटोरांची न्हाई का पोट भरायची?" असं म्हणते तेव्हा आनंदाचे शिक्षण आपली परिस्थिती बदलण्यासाठी कामी पडेल अशी आशा तिच्या मनात आहे हे आपल्या लक्षात येते. एका प्रसंगात पाचवीतली पुस्तक एका मुलाकडनं निम्म्या किमतीत त्याच्या हाता पाया पडून विकत घेतली होती मात्र तसे पुस्तके सहाव्या वर्गात घेता आली नाही असे जेव्हा लेखक सांगतात तेव्हा पुस्तक विकत



घेण्याची सुद्धा अनेक शिक्षणासाठी धडपडणाऱ्या मुलांची ऐपत नसते हे आपल्याला समजून घ्यावे लागते. आर्थिक परिस्थितीमुळे खचलेल्या रत्नापाने आपल्या रखडत चाललेल्या संसाराला हातभार व्हावा म्हणून आनंदला सुद्धा शाळेतून काढून टाकले होते,गावातील प्रतिष्ठित अशा हळदीकर आणि त्यांचे मित्र, विठोबा अण्णा दिवाणजी, अशा लोकांचे प्रयत्न थकल्यावर तारा आणि आनंद हे दत्ताजीराव देसाई यांच्याकडे जाऊन त्यांच्यावतीने रत्नाप्पाला समज देतात आणि आनंद शिक्षण सुरू होते. असे विलक्षण प्रसंग झोंबी मधील शैक्षणिक भवताल अधिक गडद करणारे आहेत. पुढे रणनवरे मास्तर,

तु बा नाईक, अशा शिक्षकांसोबत सौंदलगेकर मास्तर ह्या स्वतः कवी असलेल्या शिक्षकाची त्यांच्यातील साहित्यिकाला प्रेरणा देण्यासाठी झालेली मदत यांचे संदर्भ शिक्षक चांगला असला म्हणजे विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण कसे चालना घेतात?याचा उत्कृष्ट असा वस्तूपाठ आहे.

आनंद यादव यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासामध्ये विविध प्रकारचे शिक्षक भेटले कधी गणित आणि भूमिती या विषयाची शिकवणी घेणारे शिक्षक, कधी आनंद यादव यांच्याकडून फी न घेता शिकविताना दिसतात तर कधी हा मुलगा कबाड कष्ट करून स्वतः शिक्षण घेतोय या जाणिवेतून त्याच्या हजेरीचे दिवस कमी भरले तरी तरी त्याला परीक्षेची संधी मिळावी म्हणून प्रयत्न करताना दिसतात. आनंद सारखाच वसंत पाटील नावाचा मुलगा शिक्षण सोडून स्वतंत्र उद्योगाला लागल्याचे चित्र समोर उभे असताना आनंद मात्र सातत्याने शिक्षणाचा ध्यास धरतो आणि शिकत राहतो. काही कारणामुळे मध्ये शाळा बंद झाली तरी ड्रॉइंगची परीक्षा देण्याची तयारी करणे पण शिकत राहणे ही त्याची जिद्द त्याला आनंदया पासून आनंद यादव पर्यंत घेऊन गेली हे झोंबीचे वैशिष्टय आहे.

आठवी नववी दहावी मधील शिक्षणात समाजातील जातीयता,सामाजिक विषमता जात पाहून विद्यार्थ्यांना मिळावयाची वागणूक,शिक्षकाच्या वेगवेगळ्या मानसिकता अशा अनेक गोष्टी झोंबी मधून आनंद यादव यांनी अधोरेखित केल्या आहेत.आर्थिक परिस्थितीमुळे फी देता आली नाही म्हणून जिथे शाळेचे हेडमास्तर आनंद यादव यांना फी बद्दल सूट देताना दिसतात तिथेच अक्कोळकर नावाचे शिक्षक त्यांच्यावर राग घेऊन त्यांना सतत शिक्षा करताना दिसतात. शाळेमधील मळ्यात फुकट काम केल्यपेक्षा आपल्या मळ्यात काम केले तर दोन पैसे आपल्या घरात उपयोगी पडतील असा व्यवहारी दृष्टिकोन शाळेतील विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण होईल इतक्या विरक्त पणे मुलांना फी साठी अडवणाऱ्या शिक्षण संस्था आपल्या समाजात आहेत हे सुद्धा आनंद यादव यांनी झोंबी मधून स्पष्ट केले आहे. ड्रॉइंगची परीक्षा पास झाल्यावर फॉर्म भरण्याची अडीच रुपये आणून दिल्याशिवाय सर्टिफिकेट मिळावे म्हणून नववी दहावी अकरावी अशी तीन वर्ष खटपट करूनही पैशाशिवाय त्यांना ते सर्टिफिकेट मिळाले नाही. अशी अडवणूक भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्येच दिसून येते हे आपल्याला ध्यानात घ्यावे लागेल. दहावीच्या वर्षात स्वतःच्या वह्या पुस्तकासाठी आणि फी साठी शाळेतच गाण्याचे आणि नकलाचे कार्यक्रम करून पैसा मिळवण्यापासून शाळेच्या ओसाड जमिनीवर जमिनीवर मेथी वांगी टमाटे असे पीक काढून ती शिक्षकांना घरी नेऊन पोहोचवले आणि चार पैशाची अपेक्षा केली मात्र त्या शिक्षकांनी शिक्षकांकडून पैसे घेतोस, असे म्हणून बहुतेकांनी पैसे देणे नाकारले. पैसे नाकारूनच चेष्टा करण्यात आघाडीवर असणाऱ्या शिक्षकाचे नाव जोशी असावे ही एक शिक्षण व्यवस्थेवर असलेली काळी छाया याही ठिकाणी गडद होताना दिसते. त्याशिवाय रणदिवे आणि कट्टी सर या दोन शिक्षकासोबत बोलताना स्वतःच्या फी बद्दल काहीतरी करा असे म्हटल्यावर त्यांनी कडवटपणे, " तू जोशी देशपांडे असतास तर नक्की मिळाली असती, निदान त्यांचा भाचा पुतण्या तरी पाहिजे होतास." असे म्हटले तेव्हा ब्राह्मणांसाठी माधुकरी पासून शाळेतील फी सवलती मोठया प्रमाणात दिल्या जातात मात्र बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना फी अभावी परीक्षेपासून वंचित ठेवण्यापर्यंत आपली शैक्षणिक व्यवस्था निगरगट्ट झालेली होती असे आनंद यादव यांनी दाखवून दिले आहे.शिक्षण क्षेत्रातील जातीयतेला वैतागून एका ठिकाणी आनंद यादव म्हणतात ,"

...वाटत होतं;मी एखाद्या गरीब ब्राह्मणाच्या पोटी जरी जन्माला आलो असतो,तर बरं झालं असतं.निदान मला अंगावर रोज धुतलेली कापडं मिळाली असती. घरात बसून अभ्यास करता आला असता. वेळेवर शाळेला जाता आलं असतं.शुद्ध भाषा बोलण्यासाठी मला धडपड करावी लागली नसती.मनात आहे ते धडाधडा मी बोलू शकलो असतो.आईवडिलांनी माझ्या शिक्षणाला विरोध केला नसता. मला फुल फ्रीशिप मिळाली असती.माझ्या मनासारखं शिकता आलं असतं नि यश मिळवता आलं असतं..."



दहावीच्या निकालाच्या दिवशी सुद्धा देशपांडे मास्तर त्यांना तीन महिन्याचे फी दिलेली नाही म्हणून निकाल सांगत नाही. दहावी नंतरची अकरावी म्हणजे त्यावेळची एस एस सी आनंदासाठी सतत जीव तोडणाऱ्या आणि आनंदाच्या शिक्षणासाठी मदत करणाऱ्या आबाजी नावाच्या मुलाला परीक्षेला बसण्याची संधी मिळत नाही मात्र त्याला त्याचं वाईट वाटण्यापेक्षा आनंदाची परिस्थिती पाहून त्याला फॉर्म मिळाला आणि परीक्षा देण्याची संधी मिळाली याचा आनंद जास्त झाला. यातून आनंदाची शिक्षणाची आंतरिक तळमळ आणि घरचे आर्थिक परिस्थिती किती निकराची होती हे आबाजी

सारख्या त्याच्यासोबत शिकणाऱ्या मुलांनाही कळत होते. मात्र त्याच्या बापाला कोर्ट कचेरी आणि देवाच्या यात्रा नवस इत्यादी बाबी मुलाच्या शिक्षणापेक्षा मोठया वाटतात. मॅट्रिकच्या परीक्षेसाठी आनंद सारखे गरीब मुलाच्या फी बद्दल शाळेचा हेडमास्तर किंवा वर्गशिक्षक कोणीही हमी घेत नाही. त्यातही धर्माधिकारी सारखे शिक्षक आनंदच्या आईला म्हणतात, " आनंदाचे मी ३५ रुपये भरतो मात्र ते एका अटीवर. तुम्ही उद्यापासून रोज एक शेर दूध घालायचं मला, सहा आण्याप्रमाणे महिन्याचे अकरा बारा रुपये होतील. असं जवळ जवळ तुम्हाला तीन महिने दूध घालावे लागेल. दूध मात्र चांगल मिळाला पाहिजे सात साडेसात आणे शेराचं दूध आईने सहा आणे शेराने घालायचं लगेच कबूल केलं, या ठिकाणी धर्माधिकारी मास्तरचा स्वार्थीपणा आणि व्यवहारीपणा तर आनंद यादव यांची शिक्षण घेण्यासाठी होणारी प्रचंड तगमग आणि अवहेलना त्याचबरोबर ताराचे म्हणजे आनंद यादव यांच्या आईचे मुलाच्या शिक्षणासाठी आपण खस खाल्ली तरी चालेल मात्र त्याला परीक्षा देता आली पाहिजे ही भोळी भावना असे भारतीय शिक्षण संस्कृतीचे फार विदारक चित्र आपल्यापुढे उभे करते. या कादंबरीच्या शेवटी लेखक मॅट्रिकची परीक्षा पास होतात त्या ठिकाणी कादंबरी थांबते मात्र संपूर्ण कादंबरीत कुठेही स्वतः वरील अन्याय अत्याचाराबद्दल आवक्षरही न काढलेले आनंद यादव शेवटच्या परिच्छेदात आपल्या शाळेबद्दलची नाराजी आणि शाळेतील शिक्षकांनी आपल्यावर जाणीवपूर्वक केलेल्या अन्याय अत्याचाराची जाणीव आपल्या मनाला होती हे सांगण्यासाठी म्हणतात,एवढं झालं तरी पास झालो. सेकंड क्लासमध्ये पास झालेल्यांच्या यादीत माझा नंबर होता. तो पुनःपुन्हा वाचून, माझा नंबर ताडून खात्री करून घेतली नि मगच शाळेकडं गेलो. ....

हायस्कूलच्या विद्यार्थ्यात तिसऱ्या नंबराने पास झालो होतो.दोन मार्कांनी पहिला हुकला होता. गणितात पहिला वर्ग मिळाला होता.तीन विषयांत डिस्टिंक्शन मिळालं होतं.मराठी भाषाही अशुद्ध बोलणाऱ्या मला कुणबटाला,संस्कृतमध्ये सर्वात जास्त मार्क्स होते.माझं मलाच ते खरं वाटेना.फुल फ्रीशिप मिळालेले मास्तर मंडळींचे सगळे गणगोत खाली होते.तीन वर्षं खोल खोल दडपले गेलेले माझे मार्क्स, एस. एस. सी.च्या गुणपत्रिकेत वरती आले होते. अन्यायाला वाचा फुटली होती. पण आता त्याचा मला फ्रीशिपसाठी काहीही उपयोग नव्हता. तीन वर्षं जे कष्ट नि फरफट सोसावी लागली ती सोसलीच.

पैसे भरून गुणपत्रिका घेतली नि हायस्कूलच्या कंपाउंडबाहेर पडलो. त्या कुंपणाबाहेर पडलो नि हायस्कूलकडं परतून पुन्हा पाहावंसं वाटेना. शिक्षकांच्या नातेवाईकांना, फुल फ्रीशिप मिळवून देण्यासाठी त्यांना खोटेपणा करून जास्त मार्क देणे,आनंद सारख्या कष्टाळू विद्यार्थ्याला जाणीवपूर्वक त्रास देणे,प्रसंगी मारणे,मुलींसोबत छेडछाड करतो असे आरोप करणे. तो गरजवंत असूनही त्याला फ्री शिप न देता त्याने शाळेच्या मळ्यावर भाजीपाला लावण्यासाठी घेतलेल्या मेहनतीची, त्याच्या आईच्या दुधाच्या पैशांमध्ये स्वतःचा स्वार्थ साधून उपकार केल्याचे जाणीव करून देणारे स्वार्थी शिक्षक यांच्या नाकावर टिच्चून आनंदाचे बोर्डाच्या परीक्षेतील यश फार मोठे आहे मात्र शाळेतील प्रसंग आणि शिक्षकांचे वर्तणूक यामुळे त्याला शाळेकडे पुन्हा वळून पाहण्याचे वाटत नाही, यात फक्त आनंद यादव यांच्या शाळेची नव्हे तर संपूर्ण शिक्षण व्यवस्थेची हार आहे असे मला वाटत.

शिक्षण व्यवस्थेत गरिबांच्या शिक्षणासाठी काय करावे? असा प्रश्न जेव्हा उपस्थित होतो तेव्हा प्रत्येक शिक्षणप्रेमी आणि शिक्षणतज्ञाने झोंबीचे वाचन केले तर महाराष्ट्रातील गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मूलभूत सोयीपासून कसे दूर ठेवले जाते? त्यांच्या आवश्यकता काय आहे? त्यांना शिक्षणाच्या संधी कोणत्या द्याव्या लागतात? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे आपसूकच मिळून जातात म्हणून झोंबी ही तळागाळातील समाज मनाच्या पटलावर उमटलेल्या शैक्षणिक ओरखडा आहे असे मला वाटते.

पु ल देशपांडे यांच्या प्रस्तावनेचा विचार करता, एका दारिद्र्याचे आसूड खात जीव जगवित ठेवणाऱ्या कुटुंबातल्या एका पोराच्या हाती पाटी पेन्सिल आल्यापासून ते तो मॅट्रिक परीक्षा पास होईपर्यंत करीत रहावे लागणाऱ्या झोंबीची आनंद यादवने ही कहाणी सांगितली आहे. प्रस्तावनेमध्ये पु ल देशपांडे यांनी शैक्षणिक व्यवस्थेचा मुखवटा फाडत असताना केलेले भाष्य मला फार महत्वाचे वाटते ते म्हणजे , गरीब बामनाच्या शिक्षण घेणाऱ्या मुलांना माधुकरी या गोंडस नावाखाली भिक्षा मागण्याची मुभा होती अशी मुभा बहुजन समाजातील शिक्षणासाठी झटणाऱ्या, तडफडणाऱ्या मुलांना तर नव्हतीच शिवाय ब्राह्मण असले तरी मुलीच्या जातीला मात्र माधुकरी मागण्याचा अधिकार नव्हता.यावरून तत्कालीन काळात फक्त आणि फक्त ब्राह्मण मुलांनाच शिक्षण मिळावे मुलींनी आणि बहुजन समाजातील इतर घटकांच्या शिक्षणाचा कसलाही विचार भारतीय शिक्षण व्यवस्थेमध्ये केलेला नव्हता असे दिसून येते. राजश्री शाहू महाराज,सावित्रीबाई फुले,ज्योतिबा फुले,डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर,पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील अशा शिक्षण विषयक आग्रह धरणाऱ्या समाजसुधारकांचा फक्त महाराष्ट्रावरच नव्हे तर संपूर्ण भारतीय शिक्षण व्यवस्थेवर किती मोठे उपकार आहेत याची जाणीव सुद्धा आपल्याला झोंबी सारख्या कादंबऱ्या वाचल्यावर होते.

**किरण शिवहर डोंगरदिवे**
**वॉर्ड न ७, समता नगर, मेहकर**
**ता मेहकर जि बुलडाणा पिन ४४३३०१**
**मोबा ७५८८५६५५७६**

■■■

# अठराशे सत्तावन्नचे स्वातंत्र्य समर निबंध स्पर्धा

रामकृष्ण भगवंत अघोर



गतवर्षीचा विचार करता कोणालाही विचारले की, २००६ हे साल कशामुळे प्रसिध्दीस आले,तर कोणीही सहजपणे सांगेल जिकडे – तिकडे दशहतवादी कारवाया आणि घडवून आणलेले अतिरेकी संघटनेने बॉम्बस्फोट.

अजून ही आठवण ताजी ताजी असताना २००६ ला गुड बाय करुन २००७ साल भारतीयांना एक अविस्मरणीय घटनेकडे घेऊन जात आहे आणि त्याा घटनेचे उस्फुर्त स्वागत देखील होत आहे. सर्व भारतीय नागरिकांच्या रोमारोमात ही क्रांतीकारक घटना प्रवेश करत आहे. १० मे २००७ ह्या दिवशी अठराशे सत्तावन्नच्या स्वातंत्र्या समरास दीडशे वर्षे पूर्ण होत आहेत. भारत मातेच्या गर्भात रुजलेला ब्रिटीशांच्या पारतंत्र्याचा वटवृक्ष उखडून भारत मातेला स्वातंत्र्याचे सौभाग्य लागले. ह्यात विशेष म्हणजे दीडशे ह्या आकड्याला फारच महत्व आहे.कारण दीडशे वर्षाच्या ब्रिटीश सत्तेला उलथून पाडण्याचे समराचे बीज हे अठराशे सत्तावन साली पेरले गेले होते,हे विसरता कामा नये.

अठराशे सत्तावन्नच्या स्वातंत्र्या समर ह्या विषयी शाळा, कॉलेजच्या आभ्यासक्रमात फारशी माहिती मिळत नाही. त्यामुळे अठराशे सत्तावन्नचे स्वातंत्र्या समर ही काहींतरी छोट्या स्वरुपात झालेली दंगल आहे असे वाटते.

ही निराशा पदरी पडत असताना त्यात एक आशेचा मोठा किरण दिसतो आहे की, “अठराशे सत्तावन्नचे स्वातंत्र्या समर” ही क्रांतीकारी घटना एका प्रख्यात,सुप्रसिध्द अजूनही ब्रिटीशांनी त्या क्रांतीकारकाचे नाव ऐकले की अंगावर असणारे केस ताठ होतात,अशा ह्या क्रांतीकारकाचे नाव आहे “स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर“ हे या पुस्तकाचे लेखक आहे. ह्या पुस्तकाचे लिखाण त्यांनी १९०७ साली प्रकाशित केले आणि या घटनेला देखील आज पावेतो शंभर वर्षे पूर्ण होतात.त्यामुळे “दुग्ध शर्कराचा“ योगच मानावा लागेल.

“प्रत्येक अंधाराला प्रकाशाची भित्ती असते,ह्या पेक्षा प्रत्येक अंधाराला प्रकाशाचे भाग्य लाभते“अशी विचार सरणी हवी, आणि ती अठराशे सत्तावन्नच्या स्वातंत्र्य समराने दाखवून दिले. प्रत्येक पारतंत्र्याला स्वातंत्र्याचे भाग्य असते.हे जगाच्या पाठीवर भारतीयांनी दाखवून दिले.

एस मुथय्या आणि प्रा.के राजयन ह्या दोघा इतिहासकारांनी दक्षिणमध्ये १८५७ पूर्वी झालेल्या उठावाकडे लक्ष वेधले आहे,“द हिंदु“ह्या वृत्तपत्रात ह्या वृत्ताच्या ओझरताच उल्लेख आहे. एवढ्यावरुन हे स्पष्ट होते की, भारतामध्ये ब्रिटीशांनी इस्ट इंडिया कंपनीने हातपाय पसरण्यास सुरुवात केली,आणि तेव्हापासून तिच्या कारभाराविरुध्द असंतोष निर्माण झाला हे मात्र सत्य आहे. ह्या

कालावधीत कंपनीच्या मनमानी व जुलमी कारभाराने खुद्द कंपनीच्या सेवेत असणाऱ्या शिपायांना सुध्दा त्यांनी भंडावून सोडले.तेव्हा कॅप्टन केग्विन याने सहनशक्तीचा अंत झाल्याने अखेर कंपनीचे वर्चस्व झुगारुन दिले.

१८५७ चा स्वातंत्र्य समर इतका प्रचंड होता की, स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी लिहलेल ४२५ पानांच्या महान ग्रंथावरुन त्याच्या तीव्रतेची कल्पना येते. हा ग्रंथ इतका महत्वाचा आणि पवित्र आहे की सद्याच्या काळात रामायण व महाभारत इतका महत्वाचा आहे. क्रांतीकारकांना स्फूर्ती देणारा ऐतिहासिक महत्वाचा असा महान ग्रंथ आहे.

१८५७ चा स्वातंत्र्य समर हा पवित्र ग्रंथ थोर क्रांतीकारक स्वा.सावरकर यांनी लंडनमधील कागदपत्र आभ्यासून १९०७

साली प्रथम मराठी भाषेत लिहला आहे. परंतु तत्कालीन ब्रिटिश सरकाने प्रकाशनपूर्वीच बंदी घातल्याने महाराष्ट्रात हे पुस्तक छापणे शक्य झाले नाही.परदेशात मराठी भाषा नसल्याने आणि पुस्तक नागरिकांपर्यत छापून येणे जरुर असल्याने त्यांनी युरोपमध्ये इंग्रजीत भाषांतर करुन प्रकाशात आणले. मात्र त्यांनी लिहलेली त्यांच्या हस्ताक्षराची कॉपी शत्रूच्या ताब्यात आहे.इंग्रजी पुस्तकावरुन त्याचा मराठी अनुवाद १९४७ साली नथुराम गोडसे व नारायण आपटे यांनी प्रसिध्द केली.मुंबई शासनाच्या सुचनेनुसार ब्रिटिश राज्यकर्त्यांनी ह्या पुस्तकाची प्रत नष्ट केली असण्याची शक्यता आहे. पण सावरकर सतत सावध असल्याने एक कच्ची प्रत त्यावेळेचे कुटिन्हो हा पोर्तुगाल ख्रिश्चन असून देशभक्त होते. ते पुढे अमेरिकेत वास्तव्यास गेले.अगदी गुप्तपणे

त्यांनी ही प्रत ४० वर्ष स्वतःजवळ ठेवून मे १९४९ मध्ये पुन्हा सावकर यांच्याकडे दिली.रामदास स्वामी यांनी आपल्या श्लोकात म्हटले आहे,

धर्मासाठी मरावे,मरोनी अवघ्यांसि मारावे
मारिता मारिता घ्यावे, राज्य आपुले ॥

वरील श्लोक हा १८५७ च्या स्वातंत्र्य समराचा महामंत्र आहे. १८५७ चे

स्वातंत्र्य समर का झाले याला एखादे विशिष्ट कारण नसून अनेक कारणांनी ब्रिटिशांनी हिंदुस्थानांवर जो जुलमी आणि स्वार्थी अत्याचाराचे प्रयोग केले, त्यातून १८५७ चा समर ही एक प्रखर ठिणगी होती. त्यातले प्रमुख कारण जर काय असेल स्वधर्म व स्वराज्य. भारतीय नागरिकात स्वधर्माविषयी आणि स्वराज्याविषयी नितांत प्रेम आहे. स्वराज्य व स्वधर्म ही दोन तत्वे हिंदुस्थानच्या देशप्रेमीयांच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबात भिनली गेलेली आहे. म्हणूनच ब्रिटीशा विरुध्द भारतीयांनी थोपटलेले दंड म्हणजे १८५७ चे स्वातंत्र्य समर होय.

सूरा सो पंचाजिये जो लढे दिनके हेत |
पुरजा पुरजा कट मरे तबहू न छोडे खेत ॥
– गुरु गोविंदसिंह.

अशारितीने स्वधर्मासाठी रणांगणावर तिळतीळ तुाकडे झाले तरी जे हटत नाहीत अशा प्रसंगांनी भारतभूमीचा इतिहास परिपूर्ण आहे. १८४८ साली साम्राज्याचा प्रणेता ही पदवी धारण केलेला आग्ल डलहौसी हिंदुस्थानात आला आणि आपल्या धाडसाने हिदुस्थानची भूमी भूईसपाट करण्यासाठी भारत भूमीवर पाय ठेवला आणि त्याने पाहिल्यांदा ज्या भूमीवर पाय ठेवला ती भूमी पंजाबची होती. पंजाबमध्ये रणजित सिंह हा खऱ्या अर्थाने सिंह होता. त्याला ब्रिटिश घाबरत असत. त्याला समोरासमोर बाजूला काढणे अशक्य होते. त्यामुळे गुजराथच्या मागच्या बाजूने घुसून गुहेत असणाऱ्या सिंहाला पिंजऱ्यात अडकावले.अशा रितीने १८३९ साली रणजितसिंह कायमचा संपला.रणजितसिंहाच्या मुत्यूनंतर शीख साम्राज्यास कर्तबगार वारसा न मिळाल्याने शीख समाज गोंधळून गेला आणि इंग्रज व शीख यांचे युध्द जुंपले. त्यामुळे हिमालयापासून ते कन्या कुमारीपर्यतची सर्व भुमी तांबडी झाली. इंग्रजांनी पंजाबचा पन्नास हजार चौरस मैलाचा प्रदेश आणि पाच पवित्र नद्या असलेली चाळीस लाख लोकसंख्या असलेली भूमी अलेक्झांडरनी आपल्या ताब्यात ठेवली.लॉर्ड डलहौसीने नागपूरच्या राज्याला दत्तक नाही म्हणून, तर दत्तक वासर नसतो म्हणून सातारचे राज्य खालसा केले. नागपूरचे राज्य खालसा करून डलहौसीने ७६४३२ चौ.मैलाचा विस्तीर्ण प्रदेश आणि पाच लक्ष सालीच्या उत्पन्नाचा मुलूख मिळविला. इंग्रजांचे शिपाई राजवाडयात घुसून सोन्याचांदीच्या जिनसा हिसकावून घेऊन, तसेच हत्तीवर बसलेल्या राज्यांना खाली खेचून ते हत्ती अशी सर्व मालमत्ता व संपत्ती रस्तोरस्ती विक्रीस ठेवली.

हिंदुस्थानात जेवढे राजे होते, त्याा सर्वांनी जर इंग्रजाविरुध्द एकत्रितरित्या जर लढण्याची तयारी दर्शविली तर आपला देश आपल्या ताब्यात परत येईल ही गोष्ट नानांच्या ध्यानात आली. इंग्रज लोक संस्थाना मागून संस्थाने खालसा करत चालले होते ही वस्तुस्थिती सर्व राजेरजवाडयांसमोर मांडून कोल्हापूर, दक्षिणेतील पटवर्धन,अध्योध्देतील जमिनदार, दिल्लीपासून म्हैसूरपर्यंत सर्व राज्यधान्या यांना एकत्र करण्याचा प्रयत्न केला.हे ब्रिटीशांना समजताच त्याने हे सर्व मोडून काढले. तसेच सर्व शिपायांची फ्रंत फोडण्यास सुरुवात केली आणि सर्वांना दम दिला की, “आमच्या विरुध्द उठण्याची तुमची छाती कशी झाली ?” पण हिंदुस्थान शिपायांनी देखील ब्रिटिशांना चोख उत्तर दिले. “हिंदुस्थानी शिपाई एक झाला तर गोरा चटणीला देखील पुरणार नाही.” १८५६ साली अयोध्येचे राज्य खालसा होताच तेथील जनतेने ठरवले की, गुलामगिरीत खिचपत मरण्यापेक्षा मरण बरे म्हणून प्रत्येक जण तलवारी घेवून जाऊ लागला. त्यामुळे हिंदुस्थानच्या इतिहास प्रसिध्द राजधानीला चेतना मिळाल्यासारखे होऊन स्वातंत्र्य युध्दाची खलबते सुरू झाली. दिल्लीच्या दिवाण –इ –आम मध्ये व ब्रह्मवतीच्या राजमंदीरामध्ये स्वातंत्र्य युध्दाची गुप्त संघटना चाललेली होती परंतु इंग्रजांसारख्या धुर्त लोकानाही १८५७ च्या तोफांचे गडगडाट होई तो पर्यंत काहीच समजले नव्हते.१८५६ साली इराणच्या शहाने भारताच्या पातशाहीस मदत करतो असे कळविले होते. १८५७ साली सर्व मशिदीवरुन सार्वजनिक जाहिरनामे कळवू लागले होते.ब्रिटिशांच्या ताब्यातून हिंदुस्थानची मुक्तता करण्यासाठी इराणी सैन्य लवकरच येत असून सर्व वृध्द,तरुण,लहान थोर,सुशिक्षित व अशिक्षित, रयत व लष्कर अशा सर्वानी समरांगणात उडी घ्यावी व भिक्षेच्या निमित्ताने घराघरातून स्वतंत्र चेतना उत्पन्न करण्यासाठी मौलावी व पंडीत, फकीर व सैन्याशी यांना धाडण्यात आले.श्री नानांच्या व अझीम उल्लाखानांच्या पत्रांनी व उपदेशानी हजारो ठिकाणी आंदोलनाच्या शाखा उघडल्या गेल्या.

१९५७ च्या क्रांतीयुध्दाच्या इतिहासातील एक महत्वाची व आश्चर्याची गोष्ट म्हणजे राज्यकत्या च्या चळवळीचा सुगावा एक वर्षापर्यंत ब्रिटिशांना लागलेला नव्हता.बंडाचे कारण काहींच्या

मते काडतुसे हे होते,पण काडतुसे हे निमित्त पात्र होते.अशा प्रसंगी ब्राम्हण कुंटुबात जन्म घेतलेला मंगल पांडे नावाचा क्षात्र तेजानी भारलेला स्वधर्मावर प्राणापलिकडे निष्ठा ठेवणारा,तरुण शूर शिपाई उदयास आला. त्याने आपली बंदुक खाडदिशी उचलली आणि "मर्द व्हा, उठा!"अशी गर्जना करून परेडच्या मैदानात उडी घेतली.आपल्या स्वातंत्र्यासाठी तुटून पडा !अशी गर्जना करुन सर्वांना आव्हान करु लागला.सार्जटं मेजर ह्युसन यांनी तर मंगल पांडेला पकडयाचा हुकुम दिला. परंतु त्यावेळी एक ही शिपाई मंगल पांडे याला पकडण्यास पुढे सरसावला नाही. त्या क्षणी मंगल पांडे याच्या बंदुकीतून सू-सू करीत गोळी बाहेर पडली आणि दुसऱ्या क्षणी मेजर ह्युसन जमिनीवर धाडकन कोसळला. तोच लेफ्टनंट बॉ हाही तेथे आला. तो घोड्यावर आरूढ झाला होता. तोच मंगल पांडे याच्या बंदुकीतून दुसरी साबध गोळी बाहेर पडली आणि घोड्याच्या पोटात शिरली. लेफ्टनंट साधव झला,हातात पिस्तुल घेऊन त्वरीत मंगल पांडे समोर उभा राहिला आणि एक क्षणाचा वेळ वाया न घालविता त्याने मंगल पांडे वर गोळी झाडली. पण मंगल पांडे याला भारत मातेचा आशीर्वाद होता,तिने मंगल पांडेला तलवार उपसण्याची खूण केली.अशा अविर्भावात, लेफ्टनंटच्या बंदुकीचा नेमतर चुकलाच पण त्याला मंगल पांडेच्या तलवारीचा बळी होण्याचे भाग्य त्याच्या नशिबी आले.इतक्यात मंगल पांडेवर गोरा चालून येत होताच.जवळच्या एका शिपायाने सावधगिरीने बंदुकीच्या दस्त्याने त्याचे डोके ठेचून काढले.सर्व शिपायांनी गोऱ्यांना दम दिला की मंगल पांडेशी दोन हात कराल तर याद राखा. शेवटी काय, "देव तारी त्याला कोण मारी हेच खरे !" मात्र नंतर मंगल पांडे याच्यावर ठपका ठेऊन कोर्ट मार्शल पुढे चौकशी झाली.त्यावेळी मंगल पांडे याचे नाव शहीदांच्या यादीत न देता खुनी माणसांच्या यादीत नाव आले असते.पण मंगल पांडेचे कोणत्याही अधिकाऱ्याविषयी द्वेष भावना नव्हती. तशी असती तर अनेक खून त्यांच्या हातून पडले असते.परंतु ८एप्रिल१८५७ रोजी मंगल पांडे याला फाशी झाली.हा पहिला हुतात्मा ठरला.

बराकपूर येथे मंगल पांडे याच्या फाशीचे बीज रुजते ना रूजते तोच मंगल पांडे प्रमाणे लखनौ,अयोध्या येथील शिपायांनी देखील काडतूस काढण्यास नकार दिला.२ मे १८५७ रोजी मेरठच्या घोडदलानेही त्यास नकार दिला. तेव्हा त्या सर्वांना दहा वर्षाची शिक्षा ठोठावण्यास आली. तेव्हा १० मे रोजी मेरठ येथील शिपायांनी सापडेल त्या शस्त्रांनी ब्रिटिशांना कापून काढले. दारुगोळा हस्तगत केला,सहकाऱ्यांची सुटका केली आणि चलो दिल्लीच्या घोषणा दिल्या. मेरठ शहरापासून दिल्ली ३० मैल अंतरावर आहे. ११ मे १८५७ रोजी क्रांतीकारकांनी दिल्ली ताब्यात घेऊन मोगल बादशहा बाहदुरशहा यास गादीवर बसविले.त्यानंतर फिरोजपूर,लखनौ, मथुरा, वाराणशी, कानपूर, झाशी,अलाहाबाद,सातारा,कोल्हापूर इत्यादी ठिकाणी शिपायांनी ब्रिटिशाविरुध्दचा सशस्त्र उठाव केला. कानपूरला ब्रिटीश छावणीत हिंदी शिपायाने ५ जून रोजी बंड पुकारले नानासाहेबांना "पेशवा " म्हणून घोषित केले. अयोध्येची राजधानी लखनौ येथे अहमदुल्लाशाहने ३० मे १८५७ रोजी उठाव केला. त्यांनी ब्रिटिशंची सत्ता उलटून टाकली. बेगम हजरत महाल यांनी बंडाचे नेतृत्वकेले.१८५८ रोजी नेपाळी फौजेने इंग्रजांसाठी लखनौ परत जिंकुन घेतले.झाशी येथे हिंदी सैनिकांनी ६ जून १८५७ रोजी बंड पुकारले.बंडाचे नेतृत्व झाशीची राणी लक्ष्मीबाई हिने स्विकारले. मध्य भारतात त्यात टोपे, बिहारमध्ये कुँवरसिंह याने बंडाचे नेतृत्व केले. बनारस व अलाहाबाद येथे बंडाचा उद्रेक झाला.

ग्वाल्हेर हे तर क्रांतीकारकाचे केंद्र होते.पण तेथील समराने या उठावाचा शेवट झाला.राणी लक्ष्मीबाई ठार झाल्या. नानासाहेब, हजरत महाल यांनी अज्ञातवास स्विकारला. त्यात टोपे फासावर गेले. अशा प्रकारे प्रमुख नेत्याबरोबर उठावाचा शेवट झाला. २० जून १८५७ च्या स्वातंत्र्य समराचा शेवट झाला.

१८५७ चा स्वातंत्र्य समर एक महाभंयकर ज्वालामुखी होता. ज्याच्या विस्तीर्ण मुखातून क्रोधाविष्ठ होऊन मांसाचे, रक्ताचे, प्रेतांचे,विजांचे,वादळाचे आणि रससरणाऱ्या लाव्हारसाचे कल्लोळ बाहेर पडत होते.तो ज्वालामुखी पुन्हा एकवार आपले तोंड मिटवू लागला,त्याच्या तप्त लाव्हा थंड होऊ लागल्या.त्याच्या तलवारीप्रमाणे तळपणाऱ्या जिव्हा, पुन्हा म्यानात कोशबध्द झाल्या. त्याच्या लकलकणाऱ्या विजा,कानठळ्या बसविणारे गडगडाट, झंझावात त्याच्या भयंकर हालचाली व प्रचंड उलथापालथी सर्व काही जादुगाराच्या पोतडीत शिरल्या आणि उद्दव्य हवेत विरुन गेल्या.ज्वालामुखीने पडलेली प्रचंड भेग व त्यावर पुन्हा हिरवेगार गवत उगवू लागले.त्यावर शेती लागवड चालू झाली.शांतता, सुरक्षितता व प्रेमभाव पुन्हा नांदू लागला आणि ज्वालामुखीचा पृष्ठभाग इतका मऊ व हासरा दिसू लागला की,त्याच्याच पृष्ठभागाखाली एखादा ज्वालामुखी असेल याची कोणास शंकासुध्दा येणार नाही.

राणीच्या मृत्यूनंतर तिच्याशी लढणाऱ्या सर ह्यु ने उद्गार काढले ते असे - " ,(Although a lady ,she was the best Military lrader of the erbels . "

स्वातंत्र्यवीर सावरकर आपल्या प्रतिभा संपन्न लेखणीने अशी श्रध्दाजंली वाहतात"सत्तावनच्या स्वातंत्र्य समरातील अग्निकल्लोळाची ही शेवटची ज्वाला होती, जातीने स्त्री,वयाने पंचवीसच्या आतील आचणाने स्वच्छील, स्वदेश भक्तीची ज्वाज्यलंय ज्वाला स्वातंत्र्याचीच स्वतंत्र अशी विभुत्ती लक्ष्मी राणी आमची आहे."हा मान इंग्लंडच्या इतिहासात अजुन तरी कोणाला मिळालेला नाही.

वंदे मातरम्? !!

**कथाकथनकार : रामकृष्ण भगवंत अघोर**
**४३०, दक्षिण कसबा, सद्गुरू अपार्टमेंट.**
**जुने विठ्ठल मंदिराजवळ, सोलापूर - ४१३००७.**
**भ्रमणध्वनी - ९९७०५९५२८५**

■■■

# || कुसुमाग्रजांचा ईश्वरशोध ||

डॉ.प्रकाश जाधव

विष्णू वामन शिखाडकर ऊर्फ कवी कुसुमाग्रज (जन्म २७ फेब्रु. १९१२. मृत्यू १० मार्च १९९९) यांनी मराठी साहित्य क्षेत्रात कवी, नाटककार व कादंबरीकार या तिन्ही नात्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.त्यांची नटसम्राट, वीज म्हणाली धरतीला यासारखी श्रेष्ठ दर्जाची नाटके रसिकमान्य ठरली. रविकिरण मंडळाच्या पिढीनंतर जे कवी उदयास आले त्यात बा.भ. बोरकरांप्रमाणेच अग्रक्रमाने कुसुमाग्रजांचेही नाव पुढे येते. त्यांचे जन्म गाव पुणे तर शिक्षण नाशिक येथे झाले. बी. ए.झाल्यानंतर ते काही काळ चित्रपट व्यवसायात वावरले. मुंबई-पुणे येथील काही नियतकालिकात संपादक म्हणून राहिले. १९४७ नंतर वास्तव्य नाशिक येथे केले. त्यांनी कॉलेज जीवनात वयाच्या १९ व्या वर्षी काव्यनिर्मितीस सुरूवात केली. तेव्हा त्यांच्यावर माधव ज्यूलियन यांचा काहीसा प्रभाव पडला होता. पण लगेच ते या प्रभावापासून दूर झाले.जीवन लहरी



हा त्यांचा पहिला काव्यसंग्रह १९३३ मध्ये प्रसिध्द झाला. तद्नंतर विशाखा, समिधा,किनारा, मराठी माती, स्वगत, हिमरेषा, वादळवेल असे १९७० पर्यंत काव्यसंग्रह प्रसिध्द होत गेले.तर नटसम्राट,विदूषक,ययाती आणि देवयानी, वीज म्हणाली धरतीला, दूरचे दिवे,दुसरा पेशवा, कौंतेय, मी एक मुख्यमंत्री इ. नाटके प्रसिध्द झाली. वैष्णव, जान्हवी,कल्पकतेच्या तीरावर या कादंबऱ्या प्रसिध्द आहेत. फुल वाली,सतारीचे बोल आणि इतर कथा असे कथासंग्रह आहेत.

१९८८ साली कुसुमाग्रजांना भारतीय साहित्या जगतातील सर्वोच्च अशा ज्ञानपीठ पुरस्काराने सन्मानित केले गेले.वि.स. खांडेकरानंतर १४ वर्षांनी महाराष्ट्राच्या वाटयाला हे भाग्य आले. ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान समारंभ दि.११ मार्च १९८९ रोजी मुंबईच्या बिर्ला मातोश्री सभागृहात पार पडला. तेव्हा कुसुमाग्रज – तात्यासाहेब म्हणाले, मी कविता जगलो नाही, कवितेसाठीही जगलो नाही ; कवितेने मला जगवले आहे.

आणि मी कवितेच्या प्रेमात पडलो !

काव्यप्रवासाच्या प्रारंभाबद्दल २७ फेब्रुवारी १९९० रोजी आकशवाणीच्या जळगाव केंद्रावरून त्यांनी काही विचार व्यक्त केले ते असे, माझं काव्यलेखन शाळा–कॉलेजच्या काळात सुरू झालं . काव्यलेखन हे मधुमेहासारखं किंवा दम्यासारखं आनुवंशिक असतं, असं समजायचं कारण नाही. ते केव्हाही आणि कुठंही अकस्मात उद्भवू शकतं. मात्र राजापुरी गंगेसारखा काही चमत्कार होतो असं मात्र मुळीच नाही. केशवसुतांनी कवींना देवाचे लाडके म्हटले आहे. आणि रामदासांनी तर की हे परमेश्वर वेदावतारी असं म्हणून त्याला देवघरात बसवलं आहे. कवितेचं नातं अद्भुताशी जोडण्याचा हा प्रयत्न जुनाच असला तरी खरा नाही. नदीचं वाहतं पाणी एखाद्या खड्ड्यात थांबतं, साचतं नि तिथे डोह तयार होतो. त्याप्रमाणे जीवनासंबंधीच्या प्रतिक्रिया काही व्यक्तित्वांत थांबतात आणि काव्याला जन्म देतात. ही निर्मिती देखील पूर्णतः स्वयंभू नसते. तर अपरिहार्यपणे संस्कारित असते. हे संस्कार

पूर्वसूरींचे असतात. प्रचलित ज्ञानाचे असतात आणि ज्या परिसरात कवी जन्मतो, वावरतो, त्या परिसराचेही असतात.

मनोरंजन मासिकात कविता मोठ्या सन्मानानं छापल्या जात. फुलांच्या वेलबुट्टीमध्ये गद्य मजकूर पायदळ चालत असे. पण कविताना मात्र पालखी मेण्यातून मिरविले जाई. काव्य हे प्रकरण वाचनीय नसलं तरी प्रेक्षणीय होतं आणि प्रतिष्ठेचंही होतं.... शिखरिणी वृत्त निवडलं आणि मापामध्ये धान्य भरतात त्याप्रमाणे माझ्या मनातला नारायणरावाच्या वधाचा ऐतिहासिक प्रसंग थोडय अलंकारासह त्यात भरून दिला. ही पहिली कविता.तिच्यात काव्य काहीच नव्हतं. वृत्ताचा वापर मात्र निर्दोष होता.काव्य हे आपल्या आंतरिक सुखदुःखाचं वाहन असतं. हे माझ्या लक्षात आलं. मी कवितेच्या प्रेमात पडलो. पण प्रेमात पडणं म्हणजे स्वतःचं विसर्जन करणं नव्हे.काव्यासाठी व साहित्यासाठी जगणं मला कधीच पटलेलं नाही... कवितेनं मला मार्गदर्शन केलं नाही तर हातात एक दिवली घेऊन ती सतत माझ्याबरोबर चालत राहिली. तिच्या या दिवलीमुळे जे सुंदर होतं ते अधिक सुंदर झालं. जे विद्रूप होतं ते असह्य होण्याइतकं विद्रूप वाटलं." (लोकसत्ता. २७ फेब्रु. २०११)

.आठवणीतील कुसुमाग्रज या लेखात डॉ. विठ्ठल प्रभू म्हणतात, "तात्यासाहेब समाजवादी असावेत अशी माझी कल्पना. ते नेहमी श्रीराम, श्रीराम म्हणत. हे ताणपरिहारार्थ की मोक्षप्रीत्यर्थ याचे उत्तर सापडत नव्हते. मनात आले, एकदा विचारूनच बघू. धीर करून मी एकदा विचारले, तात्यासाहेब, देव आहे की नाही ? तात्यासाहेब म्हणाले, ज्याला देवाची गरज आहे, त्याच्यासाठी तो आहे; आणि ज्याला गरज नाही त्यासाठी तो नाही. देव आहे की नाही हा वादाचा विषय ठरू नये. प्रश्न मिटला. तात्यासाहेबांना दगडधोंड्यात देव

दिसला नाही; तो माणसात दिसला. " (स्नेहबंध : मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई-४. आ. २०१०. पृ.२१).

परमेश्वराचे अस्तित्व की मृगजल –

समाजातील दैन्य, विषमता नाहीशी करण्याच्या कामी देव, धर्म, भूतदया कल्पनांचा उपयोग होणार नाही. अशी त्यांची श्रध्दा बनली. अससि कुठे तू कवितेमध्ये परमेश्वराचे अस्तित्व म्हणजे मृगजलाप्रमाणेच आहे की काय,अशी कवीने प्रगट केली आहे. असे असले तरी मृगजल मानवाच्या प्रगतीला आवश्यक आहे असे त्याला वाटते :

|अससि कुठे तू?अखंड मानवयात्रा तुज शोधते
अथवा अससी मृगजल, परि जे प्रगतिपथीं ओढतें |

जीवनमार्गावर प्रवास करत मानवयात्रेला देवकल्पना सापडली. ती मानवाचा उध्दार करूशकेल असे त्याला वाटले. मग देवकल्पनेची उपासना चालविली गेली.

नंतर सुरू हो | वेड्यांचे पूजन |
घूमतें कडयांत | नर्तन गायन |

इतक्या भक्तिनंतर देवकल्पना प्रसन्न झाली नाही. मग मानव निराश झाला.

सरले गायन | सरले नर्तन |
चालले अखेरीं | भीषण क्रंदन |
पडून तिच्या त्या | सुंदर पायापाशी |
ओरडे रडे तो | उपाशी तापाशी |
खुळाच ! कळे न | पाषाणापासून |
अपेक्षा कशाची | उपेक्षेवांचून |

पाषाणाच्या देवापासून कसली अपेक्षा करावी ? ही देवकल्पना मानवाचा उध्दार करू शकत नाही. असे कुसुमग्रज सांगतात.

इ.स. १९३२ पासून म्हणजे त्यांच्या वयाच्या २० व्या वर्षापासून ईश्वरशोधाचा प्रवास चालू झाला. तर्कनिष्ठ बुध्दीला निरीश्वरवाद पटतो. तर सौंदर्यवेडया प्रेमशील मनाला ईश्वराचे अस्तित्व जाणवत राहते. कुसुमाग्रज या दोन विचारधारात आयुष्यभर आंदोलीत राहून अनिश्चित भूमिकेत वावरतात. देवाच्या दारी ही कविता त्यांनी १९३२ ते १९३९ या सात वर्षांत तीन भागात लिहली. १९३२ साली ते लिहतात,

" नाम तुझे गाती गाती थोर सान |
दारी तुझ्या दीन दान घेती ||
चिखलात येता मूल माखोनिया |
प्रेमे न्हाऊ तया उधळीत आज घालतोसी ॥
भक्तीचीच फुले |डोळे तुझे ओले करीन मी
"तर १९३७ साली ते देवाला पृच्छा करतात,
"चिमण्यांच्या घरा लावसी मशाल
केवढी विशाल दया तुझी ?
तुझ्या महिम्याची प्रचंड पुराणे
गमती तराणे अर्थहीन "
ते म्हणतात, तुझ्या पाषाणाने |
पहिलीच मूर्ति |घडविली, मति | थोर त्याची |
आणि आतां त्याच | मूर्ति पूजवून |
वेडें विडम्बन | करितात |
(विशाखा)

शेवटी १९३९ साली शेवटच्या तीसऱ्या कवितेत कुसुमाग्रज नास्तिकवादाकडे आले आहेत.

आणि आज मन शंकित हे होई |
आहेस की नाही मुळात तू ॥
भित्या भावनेला शोधायासी धीर |
पाषाणास थोर मींच केले ॥
दुर्बलता माझी दडवाया गेलो |
अधिक जाहलों दुर्बल मी ॥
माझ्या जीवनाचा मीच शिलेदार |
व्यर्थ हा पुकर आहेस की नाही
तुझ्या दारी ॥
(विशाखा)
आज नसे चिंता |भेद नुरे !दोहोंमध्ये आतां

आस्तिकता आणि नास्तिकता या परस्परविरोधी जाणिवांमध्ये कुसुमाग्रजांचे मन द्वंद्व अवस्थेत राहते. ईश्वर जर अस्तित्वात असता तर माणसांची दीनवाणी, दारूण स्थिती झाली नसती.असे त्यांना वाटते. ईश्वराचे अस्तित्व नाकारावे असे त्यांना वाटते. पण पारंपरागत संस्काराने भरलेले मन त्याचा स्वीकार करीत नाही.

मग ते जोगीण कवितेत म्हणतात,
मला हवी आहे नास्तिकता,
पण सहस्र वर्षे
मनाला मिठी घालून बसलेली
ही आस्तिकता होत नाही दूर माझ्यापासून ...

" मात्र सामाजिक दुःखे, विषमता निवारणासाठी पाषाणाच्या देवाची उपासना करणे बुध्दिहीनतेचे लक्षण आहे.या समाजवादी तत्वज्ञानाचा त्यांच्या मनावर बराच खोलवर परिणाम झाला आहे.हे स्पष्ट दिसते." असे सुप्रसिध्द समीक्षक डॉ. स. रा. गाडगीळ त्यांच्या मराठी काव्याचे मानदंड द्वितीय खंडात पृ.९९ वर म्हणतात.(पद्मगंधा प्रकाशन, पुणे.३८. आ. २००५).

सुप्रसिध्द साहित्यिक लेखक सुभाष भेण्डे साहित्य संस्कृती मधील"प्रेम कुसुमाग्रज नामक ताऱ्यावर करावं "या लेखात म्हणतात, "खरोखरी कुसुमाग्रज नावाचं नक्षत्रं गेली पासष्ट वर्षं मराठी मनावर अविरत अधिराज्य गाजवीत आहे... भोवतालचं वास्तव शब्दबध्द करताना कधी उपरोधाचा आश्रय घेतात.गाभाऱ्यातला देव महारोग्यांच्या वस्तीत राहायला गेला म्हणून खंतावलेला पुजारी, गाभारा सलामत तो देव पचास म्हणत नव्या मूर्तीची जयपूरला ऑर्डर देतो. आणि गाभाऱ्याच्या किनखापी महिरपीचं स्तुतिस्तौत्र गात राहातो ! त्याच त्या पारंपारिक प्रतिमा वापरणाऱ्या कवींना ते बजावतातः पुरे झाले चंद्रसूर्य | पुरे झाल्या तारा | पुरे झाले नदीवाले | पुरे झाला वारा ॥ " ( श्री विद्या प्रकाशन, पुणे - ३०. पृ. १५३.१९९९).

स्वतःच्या द्विधा मनःस्थितीची टिंगल करताना ते, मार्जिन कवितेत म्हणतात, अचेतनाला करी सचेतन, शून्याला दे अर्थाचे धन

मन अपुल्या नजरेने जीवन सदा पाहते–म्हणून माझ्या डोळ्यापुढती किरीटधारी रूप प्रभुचे (मंदिरातले, तसबिरीतले) उभे राहते.असो तसे पण–ईश्वर नाही या प्रश्नावर –अपुले जमते. ईश्वराला नाकारणाऱ्या स्वतःलाच ते तो कवितेत म्हणतात,

पण तरीही मला माहीत आहे
मला मानणाऱ्यांमध्ये तू अग्रेसर आहेस
फक्त तुझा दिवाणखाना
तुझ्या काळजापासून फार दूर आहे,

इतकेच.तर रिटायर परमेश्वर कवितेत ईश्वर आहे की नाही या प्रश्नाची थट्टा उडवितात. नास्तिकतेची श्रध्दा पल्लवित होताना याच मातीतून कवितेत ते लिहतात,

पण याच,जागेवरच्या मातीतून, आता उगवतोय
एक लखलखित अंजिरी कोंब नव्या ईश्वरतेचा,
जिचे पर्यायी नाव, नास्तिकताही असू शकेल.

जीवन प्रवासात कुसुमग्रजांची नास्तिकताही हळूहळू कमी होत गेली.ते देवाला म्हणाले,

जेव्हा माझ्या शून्यारलेल्या मनाला
तुझ्या अस्तित्वाची यादही नसते
तेव्हा, सर्वांकडून दुर्लक्षित असा तू.
माझ्या खांद्यावर हात ठेवून
माझ्याबरोबर अनामंत्रित चालत आहेस.

तात्यासाहेबांच्या तोंडात सतत सिगारेट आणि मुखात श्रीराम नाम असे तारूण्यात त्यांनी परमेश्वराचे अस्तित्व मानले नाही.पण जीवन प्रवासात विश्वातील गूढ प्रश्न मनाला जाणवू लागले,एकाकीपणा वाढू लागला तसतसे आस्तिकता अंतरंगात पसरू लागली. तेव्हा अंतिमतः त्यांना जाणवले की,माणसाची आस्तिकता ही अखेरतः त्याच्या सौंदर्यशोधनाचा एक आविष्कार आहे.न मानण्यापेक्षा मानण्याचे सौंदर्य निखालस अधिक आहे. ते लिहतात,

हे राम श्रीराम, श्रीराम राम, संसारी तारील,तुझेच नाम ॥
दयेच्या सागरा, आर्तांच्या आधारा,
आम्हाला आसरा, तुझेच नाम ॥

पांथस्थ कवितेत ते म्हणतात,

"अज्ञाताच्या गूढ धुक्यात
(लोकसत्ता–२६ फेब्रु.२०१२).

अस्पष्टपणे तरंगणाऱ्या तुझ्या अस्तित्वापर्यंत कोणाची पावले कधीं पोचलीं नाहींत आणि तरीहि –

राहिली नाही आवश्यकता
तेथपर्यंत पोहोंचण्याचीही
कारण या गतीतच आहे त्या श्रेयाचे संपादन
या प्रवासातच आहे प्रवासाची अंतिम सांगता "

कुसुमाग्रज म्हणतात त्याचप्रमाणे, आता आता,या मृत्यूयात्रेत मात्र.११ मार्च १९९९ रोजी, त्यांना सर्वोच्च मानाचा ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान समारंभाची तारीख ११ मार्च १९८९ ठळकपणे स्मरणात राहील.११ मार्चचा सर्वोच्च सन्मान पुरस्कार व ११ मार्चची त्यांची मृत्युयात्रा कोण विसरेल ?

पृथ्वीचे प्रेमगीत –कुसुमाग्रज
युगामागुनी चालली रे युगे ही
करावी किती भास्करा वंचना
किती काळ कक्षेत धावू तुझ्या मी
कितीदा करू प्रीतीची याचना
नव्हाळीतले ना उमाळे,उसासे
न ती आग अंगात आता उरे
विझूनी आता यौवनाच्या मशाली
उरी राहिले काजळी कोपरे !
परी अंतरी प्रीतिची ज्योत जागे
अविश्रान्त राहील अन्? जागती;
न जाणे न नेणे कुठे चालले मी
कळे तू पुढे आणि मी मागुती !
दिमाखात तारे नटोनी थटोनी
शिरी टाकिती दिव्य उल्का–फुले
परंतू तुझ्या मूर्तिवाचून देवा,
मला वाटते विश्व अंधारले !
तुवा सांडलेले कुठे अंतराळात
वेचूनिया दिव्य तेजःकण
मला मोहवाया बघे हा सुधांशू
तपाचार स्वीकारूनी दारुण.
पिसारा प्रभेचा उभारून दारी
पहाटे उभा शुक्र हा प्रेमळ
करी याचना प्रीतिची लाजुनी लाल–
होऊनीया लाजरा मंगळ.
निराशेत संन्यस्त होऊन बैसे
ऋषींच्या कुळी उत्तरेला ध्रुव
पिसाटापरी केस पिंजारूनी हा
करी धूमकेतू कधी आर्जव !
परी भव्य ते तेज पाहून पूजून
घेऊ गळ्याशी कसे काजवे
नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहूनी साहवे !
तळी जागणारा निखारा उफाळून येतो
कधी आठवाने वर
शहारून येते कधी अंग, तूझ्या–
स्मृतीने उले अन्?सले अन्तर–
गमे की तुझ्या रूद्र रूपात जावे
मिळोनी गळा घालुनिया गळां
तुझ्या लालओठातली आग प्यावी
मिठीने तुझ्या तीव्र व्हाव्या कळा !
अमर्याद मित्रा, तुझी थोरवी अन्?
मला ज्ञात मी एक धूलीकण
अलंकारण्याला परी पाय तूझे
धुळीचेच आहे मला भूषण !

(विशाखा : कुसुमाग्रज. कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे–३०. आ. ८ वी १९७३. पृ. ६१–६२.)

वरील कविता कुसुमाग्रजांच्या विशाखा (१९४२) या संग्रहात समाविष्ट असून या कवितेने मराठी मनावर अनेक वर्षे अधिराज्य केले आहे. येथे सूर्यमालेचा रंगमंच भव्यतेने साकारला आहे. सूर्यमालेचा केंद्रबिंदू सूर्य हा दिव्यतेजाच्या आकर्षणाने कुसुमाग्रजाना लुभावतो. येथे सूर्य हा नायक तर पृथ्वी नायिका आहे.पृथ्वी सूर्याभोवती फिरते. चंद्र पृथ्वीभोवती फिरतो. अन्य बुध,गुरु, शुक्र, मंगळ, उल्का, ध्रुव, धूमकेतू इ. आकाशस्थित घटकांना कविने मानवीरूप देऊन वैज्ञानिक सत्यता अबाधित ठेवली आहे.पृथ्वीचे कोटयावधीचे वय पाहता युगामागुनी चालली रे युगे. हे शब्द सार्थ ठरतात.येथे पृथ्वीला मोहित करणारे चंद्राचे तपाचरण,मंगळाचे लाजून लाल होणे,संन्यस्त ध्रुव,केस पिंजारणारा धूमकेतू, अशा अनेकविध कल्पना येथे



दृक्कोचारित होतात. पृथ्वीची भ्रमणकक्षा विचारात घेता पृथ्वी आणि सूर्य यांचे मीलन अशक्यप्राय ठरते. त्यांच्यातील चुंबकीय आकर्षण हेच दृढ प्रेमाचे प्रतिक बनते. मग हे प्रेम अशारीर पातळीवर राहिल्यावर कारूण्याची किनार लाभते.ते म्हणतात,

नको क्षुद्र शृंगार तो दुर्बळांचा | तुझी दूरता त्याहूनी साहवे ॥

या कवनामधून प्रेमकल्पनेचे मूल्यमापन नेमकेपणाने प्रत्ययास येते. मात्र कुसुमाग्रजांच्या निवडक कवितांचे संपादन श्री बा.भ.बोरकर आणि श्री शंकर वैद्य यांनी केले असून ते रसयात्रा नावाने १९७० साली ते प्रसिध्द झाले आहे.प्रस्तावनेमध्ये श्री. शंकर वैद्य कुसुमाग्रजांना बहिर्मुख वृत्तीचे म्हणतात येथे एक लक्षात घ्यावे की अंतर्मुखता असल्यावाचून कलावंताला व्यक्त होणेच शक्य नाही. वरील कविता स्त्रीच्या परिदृष्टीने पाहता व रसग्रहण करताना नीलिमा गुंडी यांना खटकते. त्या आपल्या भावना ललित मध्ये स्त्रीची परिदृष्टी आणि दोन कविता लेख लिहून व्यक्त करतात त्या म्हणतात, "मुळातच या कवितेत स्त्रीकडे दुय्यम भूमिका आली आहे. सूर्य हा स्वयंप्रकाशित तारा आणि पृथ्वी हा परप्रकाशित ग्रह. या वैज्ञानिक सत्यामुळे यात स्त्रीप्रतिमा दुय्यम दर्जाची आहेच. शिवाय वंचना करणाऱ्या प्रियकरामागे युगामागून युगे फिरणारी ती समाज मनाला अपेक्षित अशी सोशीक आणि क्षमाशील आहे.ती त्याच्या प्रेमाची याचना करते,स्वतःला धूलिकण म्हणवून घेत त्याच्यापुढे कमीपणा स्वीकारते.

या साऱ्या संदर्भातून अंकुरित होणारी स्त्रीप्रतिमा मला अस्वस्थ करू लागली.या कवितेतील प्रेमभावना भक्तीच्या पातळीवर गेली आहे. (पाहा : परंतू तुझ्या मूर्तीवाचून देवा) त्यामुळे यातील स्त्रीची ही दुय्यम प्रतिमा सर्वांनाच खटकेल असे नाही. अशी नायिका असू शकते, हे ही मला मान्य आहे. तरीही स्त्रीची याच रूपातली प्रतिमा जनमनावर गारूड करीत राहावी.हे मला नक्कीच खटकले.. अशा मनःस्थितीत या कवितेचे सूक्ष्म वाचन करताना माझ्या लक्षात आले की, या साऱ्या निसर्ग घटितातील एक शास्त्रीय सत्य कवीने येथे लक्षातच घेतलेले नाही ! ते सत्य म्हणजे पृथ्वी स्वतःभोवतीही फिरते हे होय.हे लक्षात घेतले तर पृथ्वी आहे त्याच चौकटीतले सक्षम रूपात सामोरी येऊ शकते ! तिच्यातील स्त्री प्रतिमेला आत्मभान या जाणिवेला पाया भक्कमपणे मिळू शकतो. पृथ्वी स्वतःभोवती फिरते म्हणजेच तिला स्वतःची अशी गती आहे. स्त्रीच्या परिदृष्टीतून पाहता तिची ही दैनंदिन गती मला तिच्यातील सामर्थ्याची आणि आत्मविश्वासाची प्रचीती देणारी वाटली.. मला एक कविता सुचली." (ललित–दिवाळी अंक २०१५. पृ.१५०.मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई–४)

डॉ. लीला दीक्षित रसमुद्रा मध्ये म्हणतात, "कुसुमाग्रज ज्या प्रतिमा आणि प्रतिके वापरतात, ती फार वैशिष्ट्यपूर्ण आहेत. ही प्रतीके रसिकांना अनुभवाचा प्रत्यय उत्कटतेने आणि साक्षात देतात. अनेक वेळा ही प्रतीक रचना विरोधात्मक लय साधणारी असते. . . प्रतिकातील विरोधात्मक लय एक सौंदर्यपूर्ण नाट्यात्म रूप घेऊन अवतरते. अत्यंत रेखीव, बांधेसूद शिल्पसौंदर्य या कवितेला लाभते. . विरोधपूर्ण कलात्मक लय आणि अपूर्व शब्दकळा ही कुसुमाग्रजांच्या कवितेची बलस्थाने आहेत. मुक्तेश्वर या पंतकवीच्या काव्यात भव्यता भेटते–

पृथ्वी खंडु त्या साळूंका | अनेक लिंगे शिवपिंडीका |
इंद्रे मांडिले अभिषेका | गगनपात्री बहुधारी ॥ – महाभारत

तर ज्ञानदेवांच्या कल्पना विलासात सौंदर्य, सौष्ठव आणि नावीन्य यांचा अपूर्व मेळ दिसतो." (दिलीपराज प्रकाशन, पुणे–३० पृ. २४०–४१.आ.२०११)

पृथ्वीचे प्रेमगीत या काव्यसुमनाचे वैज्ञानिक सत्य अभ्यासता,सूर्यापासून आपली पृथ्वी निर्माण झाली. म्हणजे सूर्य व पृथ्वी हे पिता–पुत्रीचे नाते होय.मग या कविकल्पनेला अर्थच उरत नाही.दुसरे असे की मुक्तेश्वर पंतकवीचा संदर्भ येथे चपलखपणे

बसतो.स्कंद पुराणात पृथ्वी ही साळुंका व आकाश हे शिव अशी कल्पना आहे.आकाशगंगा सुध्दा शिवाच्या पिंडीसारखीच आहे. शिवलिंग म्हणजे अणूचे प्रतीक.मध्ये बाण व भोवती साळुंका. मध्ये केंद्रक (Nucleus) व भोवती कवच ( Electron Fild) साळुंका म्हणजे पार्वती किंवा माया. माया दिसत नाही. कवचही दिसत नाही. साळुंकेवर तीन वलये असतात. इलेक्ट्रॉन कवचालासुध्दा तीन कक्षा असतात. बाणामध्ये हरिहर हरि म्हणजे पुरूष (proton) विरक्त हर म्हणजे उदासीन Nutron . हरीच्या बेंबीतून कमळाचे देठ निघाले व कमळावर ब्रह्मदेव बसलेला असतो अशी कल्पना आहे. हरी व ब्रह्मा या विराट पुरुषांच्या मानाने कमलदेठ नाजूक व सूक्ष्म शक्तीने एकमेकांशी बध्द असतात. ती शक्ती म्हणजेच आकर्षण शक्ती. ही सर्व माया होय. प्रोटॉनशी बांधलेला इलेक्ट्रॉन म्हणजे हरीशी बांधलेला ब्रह्मा.

ब्रह्मा उत्पत्ती करतो. शक्ती मात्र शिवाचीच.माया म्हणजे रेणुका. रेणुका मातृस्वरूप मात्र तिचे रौद्ररूप दुसरे आहे. तिला रूद्राणि म्हणतात. रुद्राणि नेहमी रूद्राजवळ असते.रूद्र म्हणजे न्यूट्रॉन त्याच्याजवळ असते. या केंद्रकाचे विभाजन( Nuclear Fission )केले तर रौद्रशक्ती मुक्त होते व संहार करते. Atomic energy ती रुद्राणि ही( Eletromagnetic)असते.तिला धन (Positive) व ऋण (Negativ) टोके असतात. हे समजूनच शिवपिंडी तयार केली आहे. म्हणूनच साळुंकेचे टोक नेहमी उत्तरेला असते. पृथ्वीचा ( साळुंका ) उत्तर ध्रुव हा ऋण (Negativ) असतो. हे आपल्या पूर्वसूरींना माहित होते. पदार्थाची अंतिम तत्वे म्हणजे शिवशक्ती होय. काली (शक्ती) शिवाभोवती नृत्य करते. नृत्यात कंपन,परिवलन व परिभ्रमण या तिन्ही गती येतात.

आपली आकाशगंगा, कैलासशिखर, शिवनेरी इ. सुध्दा शिवलिंगाकार आहेत. सजीव निर्जीवाचे सूक्ष्मरूप सुध्दा शिवलिंगाकार आहेत. शरीरातील D.N.A,Moleculeसुध्दा शिवलिंगाकार आहेत.म्हणजे शिवलिंग हे दिव्य विज्ञानाचे प्रतीक आहे.हे येथे समजून आहे. मग पिंडी ते ब्रह्मांडी हे तत्व लक्षात येईल. हे बा.सी. मर्ढेकरांनी आपल्या कवितेतून प्रकटले आहे.

शिवलिंग माझे लिंग | हेंच अशांतीचें बिंग
शिवलिंग माझें लिंग | हेंच अशांतीचे बिंग,
ज्यांच्या झुंजे संज्ञारिंग | व्यापिलें गा ॥
दोन्ही खवीस खमंग | एक अंगातला अनंग,
दुजा निर्गुणाचा ढंग | झटपटीं ||
एका शब्दाचा आधार | दुजा शरीरांत तर्र,
मध्ये लुंगासुंगा फकीर | मीच मात्र ॥
एक मांडी काल बाजार | दुजा उद्या दे उधार,
माझा आज चा व्यापार | अगतिक |
जैसे विमानाचे पंख | फडफडल्याविनाही डंख
मारितां हवेस, शंख | हवा करी ॥
तैसें ज्ञान आणि वासना | दृश्य प्रदर्शनाविना
दंश करितां मन्मना | ओरडे तें ॥ वासनेंतून व्हावें ज्ञान | ब्रह्मज्ञानीं विषयसेवन,का मिथ्या जगीं मिथ्या भान | अशांतीचें ?॥ चालणें ही अशीच | मर्त्यांश –अमर्त्यांश–खेच,जो जिवंत सृष्टीचा पेच | तोच पाया ! ॥

मर्ढेकरांची कविता : बा.सी.मर्ढेकर
(प्र.आ.१९५९.१९९४. पृ. ३७.)
मौज प्रकाशन,मुंबई–४

या काव्यावर टीप्पणी देताना विजया राजाध्यक्ष मर्ढेकरांची कविता : स्वरूप आणि संदर्भ खंड पहिला मध्ये पृ.९० वर लिहतात.ते सारांशरूपे असे, “या कवितेत काही व्यापक द्वंद्वांचा मागोवा आहे. अलौकिक व लौकिक,आत्मिक व शारीर यांच्यातील हे सर्वव्यापी द्वंद्व. दोन्ही पक्ष समान तोलामोलाचे!संज्ञेच्या रिंगणात हे द्वंद्व खेळले जाते. खमंग खवीसां ची एकमेकांशी समर्थपणे झटापट चालू असते. एकाला ज्ञानातून जाणलेला तर दुसरा शरीरातच वस्ती करून तर्र अवस्थेत असलेला.या झटापटीत लुंग्यासुंग्या फकिरासारखी अवस्था होऊन जाते. एकाचा संबंध “काला”शी–भूतकाळ,परंपरा इत्यादीशी. तर दुसऱ्याची आश्वासने उद्या बद्दल (मुक्तीबद्दल ?)पण दोहोंपैकी कोणीच आजचे प्रश्न सोडवत नाही. ते तसेच अनुत्तरित राहतात. आणि माझी अगतिकता कायम राहते.“शिवलिंगा”च्या सनातनाच्या जाणिवेशी संबंधित असलेले ज्ञान व लिंगा च्या जाणिवेशी संबंधित असलेली वासना यांचे अदृश्य दंश(न फडफडणाऱ्या पंखांनी हवेला केलेला डंख)मनाला होत राहतात.आणि ते मन विव्हळत राहते. ज्ञान व वासना या विरोधात या मिथ्या जगात अशांती सोसणे भाग पडते.वासनेतून ज्ञान झाले की हे प्रश्न संपतील. पण ते अजून शक्य झालेले नाही.मर्त्यांश (माझे लिंग–जीव)व अमर्त्यांश (शिवलिंग –शिव) यांच्यातील खेच अनादी अनंत आहे. ती खेच– संघर्ष हाच जीवसृष्टीचा पाया. तोच मूलभूत पेच ! तो सुटणे कसे शक्य आहे ?“ (मौज प्रकाशन गृह, मुंबई–४, पृ. ९०. २००८).!

येथे एक कविवर्य कै. मंगेश पाडगावकरांचे उदासबोध मधील विडंबनपर स्मग्लिंगमाहात्म्य आठवते,

लिंगात लिंग शिवलिंग, त्याहून मोठे स्मग्लिंग
हे ज्याने जाणिले बिंग, संस्कृतीचे.
तोचि नरोत्तम जाणावा, तोचि विश्वमानस मानावा.
त्याचाचि आदर्श बाणावा, चित्तांतरी.
.....घाम गाळोन अन्न पिकवावे, हे पोराबाळांसि न शिकवावे,
येणेकरोन सुज्ञे टिकवावे, चारित्र्य राष्ट्राचे.
(मौज प्रकाशन गृह, मुंबई – ४. पृ. ४९. ५१.२०१३)

अंतिमतः कुसुमाग्रजांचा ईश्वरशोध आत्मभान जागवितो. आस्तिक–नास्तिकतेच्या द्वंद्वात आस्तिकतेकडे झुकतो. हे ही नसे थोडके. याचाच आपण शोध घेऊन अंतरंगी डुंबायला हवे. मग ईश्वरशक्ती दूर नाही. हेच उमगते. इति |

**डॉ. प्रकाश जाधव**
**क्लिनिक,राममंदिर चौक,**
**मु.ता.खानापुर,जि.सांगली, पिन – ४१५३०७,**
**मोबा.– ९४२११२६३५०.**

■■■




# सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव-रामराज्याच्या दिव्य युगाचा प्रारंभ!

**श्री.अभय वर्तक**

**प्रस्तावना**

सध्या संपूर्ण जग तिसऱ्या महायुद्धाच्या दाराशी येऊन ठेपले आहे.वाढते सामरिक तणाव,धार्मिक संघर्ष,आणि मूल्यहीन राजकारण यांमुळे तिसऱ्या महायुद्धाची ठिणगी केव्हा पडेल,हे सांगता येत नाही.अशा अस्थिरतेच्या काळात भारताने सनातन राष्ट्र म्हणून उभारी घेणे, ही काळाची गरज ठरते आहे.याच दिशेने भव्य आणि ऐतिहासिक पाऊल म्हणून १७ ते १९ मे २०२५ या काळात गोव्यात पार पडलेला सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव हा एक विलक्षण आध्यात्मिक आणि राष्ट्रजागृतीचा पर्वणीक्षण ठरला. या महोत्सवात भारतासह २३ देशांतील ३०,००० हून अधिक धर्मप्रेमी, संत,राष्ट्रनिष्ठ विचारवंत, साधक आणि युवाशक्ती एकत्र आले. सनातन संस्थेचे संस्थापक परात्पर गुरु डॉ.आठवले यांचा ८३ वा जन्मोत्सव आणि संस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षाच्या निमित्ताने, हा सोहळा म्हणजे रामराज्य स्थापनेच्या दिशेने केलेला निर्णायक संकल्प होता.ब्राह्मतेज आणि क्षात्रतेजाचे समन्वय साधणाऱ्या या महोत्सवाने धर्म,राष्ट्र आणि संस्कृती यांच्या संरक्षणासाठी सज्ज होण्याचे बळ प्रत्येक हिंदूच्या मनात निर्माण केले.

**२५ लढवय्यांना 'हिंदु राष्ट्ररत्न' आणि 'सनातन धर्मश्री' पुरस्कार !**

महोत्सवाचे केंद्रबिंदु असलेले सच्चिदानंद परब्रह्म डॉ. आठवले यांनी त्यांच्या मार्गदर्शनातून वैयक्तिक उपासनेसह म्हणजेच व्यष्टी साधनेसह समष्टी साधना करण्याचे अर्थात् धर्मरक्षण आणि राष्ट्ररक्षण यांसाठी कृतीशील होण्याचे बोधामृत दिले. सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्या शुभहस्ते 'सनातन धर्मध्वजा'चे जयघोषात आरोहण करण्यात आले. महोत्सवामध्ये श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू.स्वामी गोविंददेव गिरिजी, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष पू.महंत रविंद्र पुरीजी महाराज, अयोध्या हनुमानगढी येथील पू.महंत राजू दास,श्रीक्षेत्र तपोभूमी (गोवा) पिठाधीश्वर पद्मश्री सद्गुरु ब्रह्मेशानंदाचार्य स्वामीजी, 'सनातन बोर्ड'चे प्रणेते पूज्यश्री देवकीनंदन ठाकूरजी महाराज, केंद्रीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपादजी नाईक,गोव्याचे मुख्यमंत्री डॉ.प्रमोदजी सावंत, माजी केंद्रीय माहिती आयुक्त श्री.उदय माहुरकर,भाग्यनगरचे आमदार टी.राजा सिंह, तसेच काशी-मथुरा येथील मंदिरांचा खटला लढवणारे सर्वोच्च न्यायालयातील अधिवक्ता विष्णु शंकर जैन आदी अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.संत-महंत,विचारवंत, हिंदुत्वनिष्ठ नेते यांनी त्यांच्या मार्गदर्शनातून सनातन राष्ट्र स्थापनेसाठी केवळ वैचारिक दिशा दिली, असे नाही, तर उपस्थित प्रत्येकाला त्यासाठी कृतीप्रवण केले.या वेळी समर्पित भावाने राष्ट्र-धर्म कार्य करणाऱ्या २५ लढवय्यांना 'हिंदु राष्ट्ररत्न' आणि 'सनातन धर्मश्री' पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.सनातन संस्कृती धर्मरक्षणासाठी शस्त्र आणि शास्त्र या दोन्हींचा पुरस्कार करते. त्याचा उद्घोष या महोत्सवात करण्यात आला.

'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव' हा देशस्तरावर स्तरावर आध्यात्मिक, सांस्कृतिक आणि राष्ट्रीय चेतना निर्माण करणारा एक अपूर्व सोहळा ठरला. या तीन दिवसीय ऐतिहासिक महोत्सवाने 'न भूतो न भविष्यति'असा ठसा उमटवला असून खऱ्या अर्थाने 'सनातन राष्ट्रा'चा शंखनाद झाला आहे.गोव्याच्या इतिहासात भारतासह २३ देशांतील ३० हजारांहून अधिक लोकांचा एवढे भव्य, नेत्रदीपक आणि नियोजनबद्धपणे झालेला एकमेव कार्यक्रम होता, असे मत अनेक विचारवंत, प्राध्यापक, उद्योजक, लेखक, संपादक, केंद्रीय मंत्री आणि प्रतिष्ठित यांनी व्यक्त केले.

**ब्राह्मतेज आणि क्षात्रतेज यांचा अद्वितीय संगम !**

सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाचे एक विशेष आकर्षण म्हणजे सोमनाथ मंदिरातील १००० वर्षांपूर्वीच्या शिवलिंगाचे पवित्र अवशेष, जे श्रद्धावान पुजाऱ्यांनी क्रूर महंमद गझनीच्या आक्रमणानंतरही सुरक्षित ठेवले होते.हे दिव्य अवशेष प्रथमच जनतेसमोर आले. त्याचप्रमाणे समर्थ रामदास स्वामींपासून गगनगिरी महाराजांपर्यंत १५ महान संतांच्या पादुका एकाच ठिकाणी विराजमान होणे,हे दुर्मीळ व

पुण्यदायक दृश्य ठरले. तसेच रामराज्याच्या निर्मितीसाठी करण्यात आलेला १ कोटी सामूहिक रामनाम जपयज्ञ,महाधन्वंतरी याग,सनातन धर्मध्वजाचे आरोहण ही या महोत्सवाची आध्यात्मिक वैशिष्ट्य होती.

याच वेळी छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील प्राचीन शस्त्रांचे प्रदर्शन झाले.प्रदर्शनात कोल्हापूरच्या सव्यासाची गुरुकुलम आणि पुण्याच्या शिवाई संस्थान यांचे शस्त्रप्रदर्शन,गोव्यातील सौंदेकर घराण्याची प्राचीन शस्त्रे, तसेच सरदार येसाजी कंक यांची तलवार आणि सरदार कान्होजी जेधे यांचे चिलखत प्रमुख आकर्षण ठरले. त्यात सर्वात हृदयस्पर्शी ठरले ते छत्रपती संभाजी महाराजांना औरंगजेबाने बंदिस्त करताना वापरलेले मूळ साखळदंड, जे शिवले कुटुंबाने पिढ्यान् ?पिढ्या जतन केले आहेत. या साखळदंडांचे प्रथमच सार्वजनिक दर्शन याच महोत्सवात झाले.प्रदर्शनात शिवकालीन युद्धकलेत वापरण्यात येणारी दुर्मिळ शस्त्रे: विविध प्रकारच्या तलवारी, बंदुका, ढाली, जांबिया, तोफा, कटयारी, चिलखत,शिरस्त्राण,भाले, कुऱ्हाडी, त्रिशूल, अंकुश, सिकल, पुरबा इत्यादींचे प्रदर्शन करण्यात आले. याशिवाय छत्रपतींच्या सैन्यातील सरदारांची सचित्र पराक्रमाची माहितीही उपस्थितांना इतिहासाचे प्रत्यक्ष दर्शन घडवणारी ठरली. या शस्त्रदर्शनाने प्रत्येकाच्या अंतःकरणात छत्रपतींच्या शौर्याची आणि रणनीतीची स्फूर्ती जागृत केली. या महोत्सवात ब्राह्मतेज व क्षात्रतेजाचा अद्वितीय संगम झाल्यामुळे 'सनातन राष्ट्र'स्थापनेसाठी आवश्यक असलेली आध्यात्मिक आणि लढाऊ ऊर्जा नव्याने चेतवली गेली!

**सजीव युद्धकला सादरीकरण !**

या महोत्सवात कोल्हापूरस्थित 'सव्यासची गुरुकुलम' संस्थेने युद्धकला,स्वसंरक्षण आणि शौर्यप्रदर्शनाचे सजीव अन्? रोमांचक प्रात्यक्षिक सादर केले. त्यातून महोत्सवात सहभागी झालेल्यांमध्ये वीरश्री निर्माण झाली.यामध्ये 'पारंपरिक मैदानी खेळ आणि युद्धकला




तंत्र'; 'शिवकालीन शौर्यप्रदर्शन व अंगकौशल्य'; 'महिलांवर होणाऱ्या छेडछाडीच्या प्रसंगी तिने कशाप्रकारे आत्मरक्षण करावे याचे वास्तवदर्शी प्रात्यक्षिक'; 'अनेकांनी मिळून महिलेवर आक्रमण केल्यास तीने कशा प्रकारे धैर्याने लढा द्यावा, याचे सजीव दर्शन' या सादरीकरणामुळे उपस्थित प्रेक्षकांच्या मनात वीरश्रीची आणि आत्मरक्षणाची जाणीव प्रबळ झाली.असे प्रशिक्षण सर्वांनी घेणे आवश्यक आहे, असा संदेश या सादरीकरणातून प्रभावीपणे पोहोचला.या वेळी श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासाचे कोषाध्यक्ष प.पू. स्वामी गोविंददेव गिरीजी यांनी आपल्या भाषणात सांगितले, "प्रत्येक संतांनी आपल्या शिष्यांना अशा प्रकारचे युद्धकला आणि आत्मसंरक्षणाचे प्रशिक्षण द्यावे."या सजीव युद्धकला सादरीकरणाने महोत्सवातील वातावरण अधिक उर्जादायी व प्रेरणादायक बनवले.

**'हिंदु राष्ट्र' ही धारणा मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न !**

सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवात विचारवंत, संत, धर्मगुरु यांच्या भाषणांतून सनातन विचारांचे राष्ट्र स्थापन करण्यासाठीची वैचारिक बैठक मजबूत झाली. उपस्थितांनी कृतीशील राष्ट्रनिष्ठ साधनेसाठी कटिबद्ध रहाण्याचे संकल्प केले. युद्धकलेच्या प्रात्यक्षिकांमुळे युवक–युवतींमध्ये स्वसंरक्षण, शौर्य आणि सज्ज रहाणे याची जाणीव निर्माण झाली.



शास्त्रासमवेतच शस्त्रसज्ञता हेही धर्मरक्षणाचे महत्वाचे अंग असल्याचे अधोरेखित झाले. गोरक्षण, गुरुकुल व्यवस्था, पारंपरिक विधी,सनातन आचारधर्म यांची आवश्यकता पुनः अधोरेखित झाली. अनेक सहभागी संस्थांनी पुढील कृतीसाठी सहकार्य आणि समन्वय यांचे आराखडे सिद्ध करण्याचा निर्धार केला. 'सुदर्शन न्यूज'सारख्या माध्यमांनी ही चळवळ व्यापक स्तरावर पोचवण्याचा संकल्प केला. सोशल मिडिया आणि वृत्तमाध्यमे यांतून महोत्सवाची चर्चा चालू झाली, ज्यातून 'हिंदु राष्ट्र' ही धारणा मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत दिसत आहे.

गायन,कीर्तन आणि नृत्या कलेच्या माध्यमातून गुरुसंकीर्तन !

महोत्सवात प्रसिद्ध कीर्तनकार श्री. चारुदत्त आफळे यांनी सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ.जयंत आठवले यांचा जीवनपट कीर्तनाच्या माध्यमातून भावपूर्णरित्या उलगडला. यातून राष्ट्रगुरु कसे असतात, त्यांचे कार्य कसे असते आणि त्यातून समाज धर्मप्रवण कसा होतो हे लोकांसमोर मांडले. डॉ.चारुदत्त आफळे यांनी 'युद्धाय कृतनिश्चयः'हे कीर्तन सादर केले. अधर्माविरुद्ध लढण्याची वेळ आली असून धर्म आणि राष्ट्र रक्षणासाठी प्रत्येकाने कृतीप्रवण व्हायला हवे,हाच या कीर्तनाचा संदेश होता.या जोडीला महोत्सवामध्ये गायन आणि नृत्य कलेच्या माध्यमातून गुरुसंकीर्तन करण्यात आले.

**अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी 'श्री महाधन्वन्तरि याग'!**

'सांप्रत काळ समस्त जगासाठी अतिशय वाईट काळ म्हणजेच आपत्काळ आहे. युद्धाचे सावट डोक्यावर येऊन ठेपले आहे. या घनघोर आपत्काळात शत्रू केवळ शस्त्रांनीच नव्हे,तर आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे

रोगजंतूच्या माध्यमातूनही आपल्यावर आक्रमण करू शकतो.या न पाहिलेल्या नवीन आपत्तींना तोंड देण्यासाठी सर्वांचे शारीरिक,मानसिक आणि आध्यात्मिक बळ चांगले असणे आवश्यक आहे. 'सर्वांचे कल्याण व्हावे', या उद्देशाने या 'श्री महाधन्वन्तरि यागा'चे आयोजन करण्यात आले होते. 'लोकाः समस्ताः सुखिनो भवन्तु |' म्हणजे 'सर्व लोक सुखी होवोत', याउद्देशाने सनातन संस्था आयोजित ऐतिहासिक आरि भव्य अशा 'सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा'च्या ठिकाणी 'श्री महाधन्वन्तरि याग' करण्यात आला. या वेळी देशविदेशातील २० हजारांहून अधिक साधक आणि हिंदू धर्मप्रेमींची उपस्थिती होती.या महायागासाठी सनातन संस्थेचे संस्थापक सच्चिदानंद परब्रह्म डॉ. जयंत बाळाजी आठवले यांच्यासह त्यांच्या आध्यात्मिक उत्तराधिकारी



श्रीसत्‌शक्ति (सौ.) बिंदा सिंगबाळ, श्रीचित्‌शक्ति (सौ.) अंजली गाडगीळ, गोव्याचे आरोग्यमंत्री श्री. विश्वजित राणे आणि त्यांच्या सुविद्य पत्नी आमदार सौ.दिव्या विश्वजित राणे यांच्या अनेक संत-महंत, प्रतिष्ठित यांची विशेष उपस्थिती होती.

**शतचंडी यज्ञाचा दिव्य महोत्सव !**

महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी महाधन्वंतरी यज्ञ पार पडल्यानंतर भारत-पाकिस्तान युद्धात भारताचा विजय व्हावा, यासाठी शतचंडी यज्ञ होणार होता. मात्र त्याच दिवशी गोव्यात धुवांधार पाऊसाला सुरूवात झाली. मैदानावर गुडघाभर पाणी साचले होते. मात्र ज्या मुख्य मंडपात शतचंडी याग चालू होता. त्या परिसरात पावसाचा एक थेंब पाणी आत आले नाही. शतचंडी यज्ञ निर्विघ्नपणे पार पडला. येथे झालेला वैचारिक शंखनाद म्हणजे हिंदूंना आत्मविश्वास, दिशा आणि उद्दिष्ट मिळवून देणारा रणघोष ठरला.हा केवळ महोत्सव नसून हिंदवी स्वराज्याच्या नवयुगाचा आरंभ आहे.

**गोमंतक भूमीचे आध्यात्मिक महत्व अधोरेखित झाले !**

या महोत्सवासाठी आलेल्या सनातनप्रेमींनी या निमित्ताने गोव्यातील मंदिरे, ऐतिहासिक स्थळे यांना भेटी दिल्याने गोव्यातील आध्यात्मिक पर्यटनाला मोठया प्रमाणात चालना मिळाली. देश-विदेशांतून आलेल्या मान्यवरांवर गोवा ही 'भोगभूमी' नसून ती 'योगभूमी' आहे, हे ठसवण्यात या महोत्सवामुळे मोठे यश मिळाले.

**सनातन राष्ट्राचा दिव्य मार्ग !**

हॉलंडमधील भविष्यवेत्ता पीटर हर्कोस यांनी 'भारतात सनातन



धर्माचा शंखनाद होईल आणि अध्यात्मामुळे तो विश्वगुरु बनेल', अशी भविष्यवाणी केली होती. या महोत्सवामुळे गुरुदेवांच्या संकल्पाने कार्य सिद्धीस जाणार आहे आणि'भारत लवकरच विश्वगुरु होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे', याची आता सर्वांना निश्चिती झाली आहे. सनातन राष्ट्राचा हा दिव्य मार्ग प्रकाशमान रहावा आणि भारत हा धर्मध्वज उंचावत जागतिक पातळीवर पराक्रमशाली राष्ट्र म्हणून उभा रहावा, यासाठी प्रत्येक हिंदु सज्ज व्हावा,हीच गुरुचरणी प्रार्थना !

**कार्यक्रमाच्या यशस्वीतेची साक्ष !**

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात गोवा शासन,पोलीस प्रशासन, गोवा इंजिनिअरिंग कॉलेज,स्थानिक लोकप्रतिनिधी,सरपंच,ग्रामस्थ यांचे मोठ्या प्रमाणात सहकार्य लाभले,तसेच पत्रकार,उद्योजक व सेवाभावी संस्थांचे योगदान अत्यंत मोलाचे ठरले. त्याचबरोबर सर्व आध्यात्मिक, सामाजिक आणि राष्ट्रीय विचारांच्या संस्थांनी यामध्ये सक्रिय सहभाग दिला.या भव्य महोत्सवाची चर्चा देशभर पसरली असून 'शंखनाद'ही संकल्पना आता देशभरात राष्ट्रनिर्माणाची चेतना निर्माण करत आहे. एकूणच या महोत्सवातून 'राष्ट्रीय एकात्मता', 'भारतीयत्वाची भावना', 'आध्यात्मिक ऊर्जा', 'सांस्कृतिक चेतना' आणि 'शौर्य' यांचा प्रभावी जागर झाला. त्यामुळे अनेक मान्यवरांनी तसेच सामान्य नागरिकांनी 'असा महोत्सव दरवर्षी आयोजित व्हावा', अशी मागणी केली. ही एकप्रकारे कार्यक्रमाच्या यशस्वीतेचीच साक्ष म्हणावी लागेल.

**तेजोमय हिंदू राष्ट्र साकार होईल !**

भारत-पाकिस्तान युद्धाच्या पार्श्वभूमीवर पार पडलेल्या शतचंडी यज्ञात प्रकट झालेली दैवी कृपा आणि पावसाला रोखणारा अद्भुत चमत्कार, हे हिंदू धर्माच्या पुनरुज्जीवनासाठी दैवी संकेतच मानावे लागतील. महोत्सवातील ब्राह्मतेजाने आत्मबळ जागवले,तर क्षात्रतेजाने संघर्षाचे स्मरण करून दिले. या महोत्सवाने हिंदूंना केवळ श्रद्धा नव्हे, तर धर्मरक्षणासाठी आवश्यक असलेली दिशा, आत्मविश्वास आणि उद्दिष्ट दिले. त्यामुळेच आता हिंदूंनी वेळ न दवडता वैयक्तिक साधनेसह समष्टी साधनेत सक्रिय सहभाग घेतला,तरच हे तेजोमय हिंदू राष्ट्र साकार होईल.

**श्री.अभय वर्तक,प्रवक्ते, सनातन संस्था.**
**(संपर्क : ९९८७९२२२२२)**



# सर्वकारण सामाजिक प्रदूषण

धीरज वाटेकर

कोणाही मनुष्याचे विचार ही त्याच्या व्यक्तिमत्वाची व्याख्या असते आणि व्यक्तिमत्व त्याच्या चारित्र्याचा पाया असतो. मनुष्याने आपल्या व्यक्तिमत्वाकडे लक्ष देणे आणि विचार शुद्ध ठेवणे महत्वाचे असते.प्राचीन भारतातील जीवनपद्धतीचा मूळ उद्देश हाच होता.त्याकाळी विचारांच्या शुद्धीकरणाला खूप महत्व दिलेले होते.यामुळे प्राचीन मनुष्य आणि निसर्ग व पर्यावरण यांच्यात सखोल संबंध होता.निसर्ग पूजनीय होता.पिढयांनी निसर्गाचे संतुलन राखले होते.दुर्दैवाने आजचा मनुष्य हा स्पर्धा,इर्षा,भौतिक सुख,मोठाल्या इमारती,निर्भयपणे धावणारी वाहने आदी चकचकीत प्रगतीच्या मागे धावू लागला.त्याने निसर्गाला शरण न जाता पूर्वांपार पूजनीय मोकळ्या नद्या बांधून काढल्या. अतुलनीय पर्वत फोडले. मनुष्याच्या या वर्तमान प्रगतीचा वेग इतका भयंकर की त्याला एकदाही क्षणभर थांबून 'या प्रगतीची किंमत काय?'असा विचार करायलाही वेळ नसावा?बारकाईनं अभ्यासलं तर लक्षात येईल,निसर्ग आणि पर्यावरणातील प्रदूषण ही आपल्या देशाची मुख्य समस्या नसून ते सामाजिक प्रदूषणाचे एक लक्षण आहे.आपल्या मनातील वाढती असूया,विचार,निर्जीव गोष्टींबद्दलची ओढ,स्पर्धा,मोबाईलद्वारे माहितीच्या भोवती फिरणारे जग, समाजमाध्यमांनी निर्माण केलेले आपले दुहेरी व्यक्तिमत्व यातून सर्व समस्यांचे मूळ असलेले 'सामाजिक प्रदूषण'अधिकाधिक गंभीर बनते आहे.

निसर्ग नियमनानुसार भारतीय जीवनशैलीला आकार देणाऱ्या सभ्यता आत्मसात करत जपलेले अस्तित्व आपण हरवले. १९९१नंतर वेगाने,परंपरागत भारतीय सभ्यता सोडून आपण भौतिक सुखाच्या मागे लागलो तेव्हापासून सामाजिक प्रदूषण वाढत गेले. कालानुरूप लोकसंख्येचा गतिमान विस्फोट,शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे'सामाजिक प्रदूषण'गंभीर बनले.भारतीय मन सामाजिक हितसंबंधांपासून दूर जात वैयक्तिक व्यक्तीची गरज महत्वाची मानू लागलं तेव्हा सामाजिक प्रदूषणाने डोकं वर काढायला सुरुवात केली. वाढत्या लोकसंख्येचे उदरनिर्वाहाच्या शोधात ग्रामीण भागातून स्थलांतर होऊन शहरी संसाधनांवरचा ताण वाढला. प्रत्येकाकडे वाहन,प्लॅस्टिक आणि बाटलीबंद पाणी आदी अविचारी विकासाला वाढत्या लोकसंख्येने खतपाणी मिळाले.अकरा मे दोनहजार रोजी दिल्लीतील एका रुग्णालयात पहाटे ५ वाजता 'आस्था' नावाच्या बालिकेने जन्म घेतला आणि भारताची लोकसंख्या एक अब्ज (१०० कोटी) झाली.एका जगव्यापी जनगणनेच्या अहवालानुसार २०५०पर्यंत भारताची लोकसंख्या १.६ अब्ज तर चीनची १.४ अब्ज असेल. प्रश्न नुसता थेट लोकसंख्यावाढीच्या गतीशी संबंधित नाही. आपल्याकडे पर्यावरण संसाधने मर्यादित आहेत. या मर्यादित संसाधनाच्या वातावरणात किती लोक जगू शकतात? हा आहे. याचे उत्तर आपल्या सर्वांच्या जीवनशैलीवर अवलंबून आहे. उपभोक्ता म्हणून संसाधनांचा अतिवापर सामाजिक प्रदूषणाला कारणीभूत ठरतो आहे.प्राचीन काळापासून चुलीला वापरले जाणारे सरपण, खाणकाम किंवा इतर मध्ययुगीन काळातील क्रियाकलाप हे प्रदूषणाचे प्रकार असूनही तितकेसे त्रासदायक ठरले नव्हते. त्यानंतर विकास प्रक्रियेने वेग घेताना त्यात धुळीची भर पडली जिने जमीन,पाणी आणि हवा अशुद्ध करायला सुरुवात केली. तरीही एका अर्थाने जोवर 'वनराई' गर्द होती तोवर प्रदूषण मर्यादेत होते. मात्र एकविसाव्या शतकात वेगाने 'वनराई' तुटत गेली आणि तंत्रज्ञानाच्या अफाट प्रगतीमुळे आम्ही प्रदूषणाच्या अधिक भिन्न स्त्रोतांकडे पोहोचलो. आपण हवामान बदलाबद्दल जितके चिंतित आहोत तितकेच सामाजिक प्रदूषणाबद्दल असायला हवे आहे. विसाव्या शतकात आमच्या बालपणी, प्रचंड गरम डोक्याची माणस कोणत्याही सेवेत एकत्र नांदलेली आम्ही पाहिली. सामाजिक प्रदूषण नव्हतं असं नाही,पण तीव्रता आणि प्रमाण नक्की कमी होतं.आपण समाजाचं काहीतरी देणं लागतो याची जाणीव प्रचंड होती.समाजाची रचना एकसंघ होती.सोशल मिडिया नव्हता. एखाद्याबाबत कागाळ्या करायला आणि त्या गावभर पोहोचवायला वेळ लागायचा.त्यामुळे कोणाच्याही मनातील द्वेष, मत्सर जिरवायला जो काळ लागतो तो मिळायचा.आज सोशल मिडीयाने तो काळ आणि वेळ शिल्लक ठेवलेला नाही. ज्यातून समाजमाध्यमांचा प्रभाव व्यापून राहिलेल्या एकविसाव्या शतकात सामाजिक प्रदूषणाचा मुद्दा दिवसेंदिवस तीव्र बनत चालला आहे.

एका व्यक्तीच्या मनात जे सुरू होते, ते अनियंत्रित वेगाने पसरून इतरांच्या मनाला संक्रमित करते आणि शेवटी संपूर्ण समाजाला वेढते त्याला आपण सामाजिक प्रदूषण म्हणतो. या प्रदूषणाचा गरिबीशी जवळचा संबंध आहे. प्रदूषणामुळे होणाऱ्या मृत्यूंपैकी सुमारे ९०% मृत्यू हे कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये होत आहेत. आज जगातील शहरे फुगताहेत.उंचउंच इमारती, आठ–आठ पदरी रस्ते,लाखो वाहने अशा गोंडस रचनेत निसर्गाची हिरवाई दिसणे अवघड झाले आहे.उत्क्रांतीच्या घडयाळात लाखो वर्षांपूर्वीपासून जैवविविधता अस्तित्वात होती.तर कोकणातील कातळखोदचित्रे वगळता उर्वरित जगातील शहराचा प्राचीन इतिहास जेमतेम आठ–दहा हजार वर्षांचा असेल. संयुक्त राष्ट्राच्या लोकसंख्या विभागाच्या २०११च्या अहवालानुसार २०५०पर्यंत पृथ्वीवरील ७०टक्के मनुष्यप्राणी शहरात वास्तव्यास असणार आहेत. हे स्थलांतर ग्रामीण भागामधील समृद्ध निसर्ग संपत्तीकडून होणार आहे.१९८४मध्ये प्रा.एडवर्ड ओ.विल्सन या अभ्यासकाने बायोफिलीया नावाचे गृहितक मांडले होते. विल्सन यांच्यानुसार, मनुष्य आणि त्याच्या पूर्वजांच्या मेंदूची जडणघडण हजारो वर्षापूर्वी सभोवती असलेल्या सुदृढ पर्यावरण, म्हणजे वृक्षवेली, प्राणी, वाहत्या नद्या, तलाव, झरे, गवताळ कुरणे यांच्या सहवासात विकसित झालेली आहे. त्यांचे ठसे आजही त्यांच्या मेंदूत आहेत. म्हणून शहरात कुठेही सुदृढ निसर्ग आढळला की आपली पावले तिकडे वळतात. संशोधनाने हे सिद्ध केले आहे, निसर्ग सहवासामुळे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य सुधारते.शरीराच्या चयापचयाशी जोडलेल्या सर्व आजारांचे उगमस्थान हे आहाराबरोबर आपल्या मानसिक आरोग्याशी निगडीत असते.निसर्गाचे सान्निध्य ताणतणाव आणि नकारात्मक विचार निष्क्रिय करते. सकारात्मक विचारांना प्रोत्साहित करून,निसर्गाबद्दलचे प्रेम वाढविते. विविध प्रकारचे बागकाम, कुंडीत झाडे लावणे, त्यांना नियमित पाणी घालणे, रोपांची काळजी घेणे आदींमुळेही विविध आजारांवर सहज नियंत्रण मिळवता येते.वाढत्या शहरीकरणात हे शक्य होत नाही,परिमाणातः सामाजिक प्रदूषण वाढीस लागते.

या साऱ्याबाबत पुण्यातील नोकरी सोडून कोकणातल्या रत्नागिरी जिल्ह्यातल्या कुडावळे गावी निसर्गाच्या सानिध्यात स्थायिक झालेल्या कृतिशील पर्यावरणप्रेमी,व्याख्याते,लेखक दिलीप कुलकर्णी सरांचे उदाहरण पुरेसे बोलके आहे.लोकसंख्येकडून होणारा संसाधनांचा होणारा अतिरेकी वापर,अनावश्यक वस्तूंचा संग्रह हे पर्यावरणविषयक विविध समस्यांचे मूळ कारण आहे. यावर अंतिम उपाय म्हणजे उपभोग कमी करणे हाच आहे.पैशांचा अतिरेकी संचय,जीवघेणी स्पर्धा,शिक्षणातील चढाओढ,धावपळ यातून सामाजिक प्रदूषण वाढले आहे.ते टाळण्यासाठी जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलायला हवी आहे. उपभोग हे जगण्याचे साधन आहे, साध्य नव्हे असं स्वामी विवेकानंद यांनी सांगितलेले आहे. मनुष्य हे विचारात घेत नसल्याने समस्या निर्माण होत आहेत. आपल्याकडे 'पाणी कसे वापरावे?'याचे शिक्षण दिलेले नाही. शहरी लोक पाण्याची अक्षरशः नासाडी करतात.भूजलपातळीत होणारी प्रचंड घट सुरूच आहे. आपली दैनंदिन कामे कमी पाण्यात होऊ शकतात.पाण्याचा पुनर्वापर महत्वाचा आहे. अन्यथा हे सारे वाढत्या लोकसंख्येमुळे सामाजिक प्रदूषणास हातभार लावणारे ठरते आहे, ठरणार आहे.

उपभोग कमी करणारी जीवनशैली स्वीकारताना जाणीवपूर्वक त्रास सोसावा लागतो.ऊर्जेचे पुनर्घटन होऊ शकत नसल्याने तिचा कमीत कमी वापर करणे हाच उपाय असतो. प्रत्येक जण खेड्यात जाऊन राहू शकत नाही हे खरे असले तरी तो आपल्या नित्य जीवनशैलीत बदल घडवू शकतो. एका आकडेवारीप्रमाणे नेदरलँड (९९%), डेन्मार्क (८०%), जर्मनी (७६%), स्वीडन (६४%), नॉर्वे (६१%), फिनलँड (६०%), जपान (५७%), स्वित्झरलँड (४९%), बेल्जियम (४८%), चीन (३७%) सायकलींचा वापर करतात. जगातील अनेक शहरांत सायकल ट्रॅक आहेत. नेदरलँडचे उट्रेच शहर जगात अव्वल सायकलप्रेमी आहे. डेन्मार्कची राजधानी कोपनहेगन सायकलींचे शहर आहे. 'ॲमस्टरडॅम' या नेदरलँडच्या राजधानीत लोक सायकलने नियमित प्रवास करतात. इथे सायकली भाड्यानेही सायकली दिल्या जातात. कोलंबियाची राजधानी बोगोटात १३ टक्के लोकांकडे चारचाकी गाडी आहे.या शहरातील मुख्य रस्त्यांना आठवडयातील एक दिवस सायकलचा वापर करून वाहनमुक्त ठेवले जाते.अमेरिकेतील पोर्टलॅण्ड, स्पेनमधील बार्सिलोना, स्वित्झर्लंडमधील बासेल, चीनची राजधानी बीजिंग, नॉर्वेची ट्रान्डहीम आणि ब्राझीलमधील क्युरितिबा शहराने आपल्या नियोजनात सायकल प्रवासावर लक्ष दिले आहे. भारतात पुण्याची अशी ओळख होती. जी पुसली गेली आहे. आपल्याकडे तसे रस्ते, सोयी नाहीत, लोकांत वाहतूक शिस्त नाही आणि सायकलिंग वाढवण्याबाबत निरुत्साह आहे. दुसरीकडे जगातील सर्वाधिक सायकलींचे उत्पादन होणाऱ्या देशात भारत आहे. आपल्याकडे अन्य कोणताही पर्याय नसलेला वर्ग सायकल चालवतो.अनेकांना सायकल चालवणे प्रतिष्ठेच्या विरुद्ध वाटते. सायकल जीवनशैली कितीही मागास वाटत असली तरी हीच भविष्यासाठी आवश्यक आहे. टीव्ही, इंटरनेट, मोबाईल ही ज्ञानोपासनेची साधने मानल्यास ती गरजेपुरती आणि विधायक कामासाठी वापरली जायला हवीत.ती काळाची आवश्यकता आहे. मात्र ही साधने नेमकी गरजेपुरती आणि विधायक कामासाठी वापरली जात नाहीत.अतिरिक्त वापरामुळे प्रचंड वीज खर्च होते.महात्मा गांधींनी उद्योग आणि भांडवलदारीला विरोध करीत 'खेड्याकडे चला'असा सल्ला दिला होता.भारतीयांनी तंत्रज्ञानाची वाट धरली. यातून विकास साधताना लोकसंख्येच्या दृष्टीने पर्यावरणातील संसाधनांना काही मर्यादा असतात याचा विसर पडला आणि आपला देश कर्जबाजारीपणाकडे झुकला.

आपण नैसर्गिक संपत्तीचा प्रचंड वापर करून भावी पिढयांच्या उपजीविकेच्या साधनांचा व नैसर्गिक संपत्तीचा विनाश करीत आहोत.हे टाळण्यासाठी आपली विकासाची नीती बदलण्याची गरज

आहे' हे कुलकर्णी सरांचं कायमचं सांगणं सामाजिक प्रदूषणाच्या मूळावर बोट ठेवतं.कुलकर्णी हे, 'आत्मज्ञान हेच जीवनाचे ध्येय असायला हवे' या स्वामी विवेकानंदांच्या विचारांनी प्रभावित झालेले आहेत. कुडावळे गावी मातीचे घर,घरातली जमीन मातीने सारवलेली, पाणी शेजारच्या विहिरीवरून आणून त्याचा पुनर्वापर म्हणून सांडपाणी अंगणातल्या झाडांना सोडण्याची त्यांची पद्धत आहे. त्यांची पर्यावरण सुसंगत शैली जगण्यासाठी प्रत्येकाला खेडयात जाऊन राहणे शक्य नाही. पण त्यांनी सांगितलेली चतुःसूत्री अंमलात आणली तर 'सामाजिक प्रदूषण' नक्की दूरू होण्यास मदत होईल. कुलकर्णी सरांनी सांगितलेली चार सूत्रे अशी : १) चैन आणि गरजा यांत भेद करावा,चैन टाळावी, गरजा कमी कराव्यात. हाव निर्माण झाली की निसर्ग (संसाधने) पुरा पडू शकणार नाही.२) पाण्यासारख्या गरजेच्या विविध वस्तूंचाही कमीत कमी वापर करावा.३)एखाद्या वस्तूचा पूर्णतः वापर करावा. उदाहरणार्थ : कागद. कागदाच्या पाठपोट लिखाण करावे. कागदाचा तुकडा तयार करण्यासाठी एक झाड तुटलेले असते. ४) वस्तूंचे पुनर्घटन करण्यासाठी योगदान द्यावे. कोणतीही वस्तू कचरा म्हणून निसर्गात जाता कामा नये. वर्तमानपत्राची रद्दी रद्दीवाल्याकडेच जायला हवी.म्हणजे त्या रद्दीपासून पुन्हा कागद तयार होईल. अर्थात कुलकर्णी सरांसारखे जगणे आपल्याला जमेल का? असा प्रश्न पडणं स्वाभाविक असलं तरीही ते म्हणतात त्याप्रमाणे, 'शक्य तेवढी उपभोगवादी वृत्ती सोडून आपण पर्यावरण सुसंगत जीवनशैलीचा अवलंब करून आपल्यापुरता निसर्गाचा ऱ्हास थांबवू शकतो.

आपल्याकडे फॅशन बाजार करोडोंचा व्यवहार करतात. इथले स्टायलिश कपडे घाण होण्याची भीती असते.साधे कपडे मात्र आपल्याला स्वातंत्र्य देतात. ते घातले की गवतावर लोळायची, बांगेत काम करायची भीती वाटत नाही. यातून वृत्तीतील खुलेपणा जिवंत होत जातो.वस्तु संचयाबाबत असेच आहे. सुरक्षित आणि आरोग्यपूर्ण आयुष्यासाठी आपल्याला अन्न,वस्त्र आणि निवारा ह्यांची गरज असते.आपण गरज नसलेल्या वस्तूचा संचय करणं टाळलं पाहिजे. त्यामुळे जीवनाची गुणवत्ता सुधारेल.आयुष्यातली गिचमीड पर्यायाने प्रदूषण कमी होईल.मानसिक समाधान मिळेल.सध्याचा युगाचं वस्तू विकत घेण्याचं मानसशास्त्र भयंकर आहे.कारण वस्तूच्या जाहिरातीचा प्रभाव ओसरला की,घेतलेली वस्तू फार उपयुक्त नाही ह्याचं भान आपल्याला येत असतं.डिडेरॉट परिणाम असे सांगतो की,आपण घरात एक नवी वस्तू घेतली की आजूबाजूच्या इतर वस्तू आपल्याला अचानक जुनाट वाटायला लागतात. कालांतराने सत्य लक्षात येतं.मुलाच्या शिक्षणाच्या निमित्ताने,शालेय साहित्य व्यवस्थापन दप्तराच्या ओझ्याइतके किचकट झाल्याचे आम्हाला जाणवले.ते चूक की बरोबर? हे ठरवणारे आम्ही तज्ज्ञ नाही. म्हणून आम्ही व्यक्तिगत पर्याय शोधला.समाजाच्या एका वर्गाकडे पायात घालायला चप्पल नाही,अंग झाकायला कपडे नाहीत म्हणून शाळेची पायरी चढताना असंख्य अडचणी सहन केलेली पिढी आम्ही पाहिलेय.ते दिवस आजच्या पिढीने पाहावेत,असं अजिबात नाही. मात्र यातली तफावत आणि होणारे सामाजिक प्रदूषण आम्हाला कळायला हवे आहे. विसाव्या शतकाच्या अखेरच्या दीड दशकात आमचं बालपण एका सुशिक्षितांच्या नगरात गेलेलं आहे. आम्ही शाळा शिकलो तेव्हा घराबाहेर कुठेही जाण्यासाठी एकच पायताण (स्लीपर) वापरलेली आठवते.आज शाळा शिकणाऱ्या लेकरांची पायताणं पाहातो तेव्हा अचंबा वाटतो. पूर्वी आम्हा मुलांना शालेय 'पुस्तकपेढी'च्या माध्यमातून, मागील वर्षीची पुस्तके पुन्हा-पुन्हा वापरायची सवय होती.अलिकडे शासनाने बहुतेक मुलांना सरसकट नवीन पुस्तके द्यायला सुरुवात केली आणि मुलांनी पहिल्याच महिन्यात फाडायला! सामाजिक प्रदूषणाच्या काळजीपोटी शासनाने घेतलेला निर्णय नक्की चांगला होता, पण त्यातील गांभीर्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यात आम्हाला अपयश आले असावे. म्हणून आम्ही मुलाला,शालेय साहित्य देताना वरच्या वर्गात शिकणाऱ्या आजूबाजूच्या मुलांकडील उपलब्ध साहित्य आवश्यक बदल करून जाणीवपूर्वक वापरु द्यायला सुरुवात केली. चिरंजीवाने'जुनेच का?'अशी तक्रार केली नाही.सध्याच्या जीवनशैलीविषयी असमाधानी लोकं जगभर आहेत.अनेकजण मुख्य प्रवाह सोडून वेगळी,निसर्गस्नेही जीवनशैली जाणीवपूर्वक स्वीकारण्याचा, जगण्याचा प्रयत्न करतायत. आम्ही मुलांना हे सारं दैनंदिन शिकवणार नसू तर वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात जसजशी संसाधने अपुरी पडत जातील तसतसे आम्हाला तग धरणे अवघड होऊन 'सामाजिक प्रदूषण' वाढत जाईल.

सर्व क्षेत्रांतील भ्रष्टाचारामुळे समाजात प्रदूषण वाढले आहे. समाजाचा तोल सुटला आहे.समानतेचा विचार मांडून तो आचरणात आणण्यासाठी राज्यकर्त्यांना वेळ उपलब्ध नाही आहे. शासनाकडून संत गाडगेमहाराज ग्रामस्वच्छता अभियान, शिवकालीन पाणी योजना आदी नावे देऊन समाजातील समतोल आणि प्रदूषण कमी करण्याचे प्रयत होत असताना दुसरीकडे शासनच्या योजनांमध्येच भ्रष्टाचार बोकाळल्याचे दिसते. गुटखा, प्लॅस्टिक, वृक्षतोड बंदी कायदे असूनही त्याची अंमलबजावणी होत नाही.यामुळे सामाजिक प्रदूषणावर सकारात्मक काम करणारे सर्व क्षेत्रातील अधिकारी,कार्यकर्ते काळाच्या कसोटीवर टिकत नाहीत.दुर्लक्षित होतात अशी भयंकर स्थिती आहे.आमचे समारंभ जितक्या मोठ्या प्रमाणात होतात तितक्या मोठया प्रमाणात ते कचरा निर्माण करतात.भपका, डामडौल,उधळपट्टी ह्यातून लूट आणि स्पर्धा वाढते.विशेषतः विवाहांच्या बाबतीत हे घडतं, आमच्याही घडलं. 'समारंभ म्हटला की एवढा खर्च येतोच' अशी आपली मानसिकता आहे.या भव्य समारंभांतून सामाजिक समस्यांना, प्रदूषणाला प्रारंभ होतो. सर्वात मोठी समस्या म्हणजे असा खर्च हळूहळू अत्यावश्यक बाब बनते. संसार हा स्नेहाच्या धाग्यांनी बांधला जाण्याचा संस्कार लोप पावतो.खर्च करण्याची अघोषित स्पर्धा सुरु होते. आपल्या महाराष्ट्रात शेतकऱ्यांनी कर्जबाजारी होऊन ज्या आत्महत्या केल्या त्यापैकी अनेक मुलीच्या लग्नासाठी काढलेलं कर्ज फेडता येणार नाही

ह्या चिंतेनं झाल्याचे वाचलेले आठवते.शेतकऱ्यांनी कर्ज शेतीसाठी नव्हे तर नाईलाजानं कराव्या लागणाऱ्या भव्य विवाहसमारंभासाठी काढलेलं होतं.अशा समारंभांची प्रथा निर्माण करणारे आणि ती फॉलो करणारे आपण सारे या सामाजिक प्रदूषणाचे बळी आहोत.

लग्न हे एक सामाजिक बंधन आहे.समाजव्यवस्था आणि कुटुंबव्यवस्था टिकवण्यासाठी विवाहाचे महत्व आहे.विवाहात स्त्री (चरश्रश) आणि पुरुषासोबत (थेरप) त्यांच्या कुटुंबाची आणि नातलगांचे देखील संबंध जोडले जात असतात.असं जरी असलं आज विवाहास विलंब होणे, विवाह न जमणे ही एक सामाजिक समस्या (डेलरळश्र झीलश्रशी ) म्हणून पुढे आली आहे. पूर्वीच्या काळी एखाद्या मुला–मुलीचा विवाह घरातील वडीलधारी मंडळी, कर्ते व्यक्ती परस्पर ठरवायची. आज समाजात चौकसपणा वाढला, माणसं हुशार झाली. मुला–मुलींचे उच्च शिक्षण झाले. संगणक आणि मोबाईलच्या युगात आणि करिअरचा विचार करून उत्पन्नाचा,शिक्षणाचा विचार



करून विवाह ठरायला लागले. यात अनेक मुला–मुलींचे वय वाढत चालले आहे. त्यांचे विवाहाचे वय आणि शारीरिक अवस्था निघून जाते आहे. अनेकांनी तर या जन्मात आपला विवाह होईल ही आशा देखील सोडून दिलेली आहे.समाजातील या गंभीर समस्येला नेमकं जबाबदार कोण आहे?अनेक विवाह संस्था, विवाह जमवणारी मंडळी रात्रंदिवस प्रयत्न करूनही समस्या सुटत नाहीत.वैद्यकीय दृष्ट्या, मुला–मुलींचं वय जसं वाढत जाईल तसतसं संतती प्रक्रिया गुंतागुंतीची होत जाते. असे असूनही या समस्येकडे फारसे कोणी गांभीर्याने बघत नाही. मुला–मुलींचे परीक्षण–वैद्यकीय चाचण्या करायचे सर्वांना कळते मात्र दुर्दैवाने आत्मपरीक्षण करायचे लक्षात येत नाही. त्यातही समाजात मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण कमी आहे. साहजिकच त्यामुळे मुलींना खूप मागणी असल्याचा गोड गैरसमज काही ठिकाणी तयार झालेला आहे. अर्थात लिंग गुणोत्तर कसेही असले तरी दिवसेंदिवस निर्व्यसनी, होतकरू, हुशार मुलांची समाजात प्रचंड कमतरता निर्माण होते आहे,हे सत्यही सर्वांनी स्वीकारणे आवश्यक आहे. विवाह न जमण्याच्या कामात जे मुद्दे पुढे येतात त्याच्याही मुळाशी ‘सामाजिक प्रदूषण’ आहे. मुलाचा पगार, त्याच शिक्षण,त्याची संपत्ती,दिसणं याबाबत प्रचंड तुलना होताना दिसते. शिक्षण पूर्ण झाल्यावर आणि वर्ष–दोन वर्षांपूर्वी नोकरीला लागलेल्या मुलांकडे गाडी,बंगला,बँक बॅलन्स कुठून येणार?याचाही विचार होत नाही.शेतकऱ्यांच्या मुलांना थेट नकार मिळतो. दुसरीकडे नोकरी करणाऱ्या मुलाला, घरी शेती आहे का?असेही विचारले जाते.वास्तविक विवाह झाल्यानंतर एक परिवार तयार होणार असतो. एकमेकांना समजून घेणारा,मान आणि मन राखणारा, सुख–दु:खा सोबत राहणारा साथीदार एकमेकांकडे पाहायला हवे.लग्नानंतर पगार वाढू शकतात.घर,गाडी,बंगला होण्यासाठी वेळ द्यावा लागतो. मुलींप्रमाणे मुलांच्याही अटी विसंगत असतात. त्यांना मुलगी उच्चशिक्षित मात्र घरी राहणारी हवी असते. जे शक्य होत नाही. झालंच तर विवाह झाल्यावर फारकतीचे प्रमाण वाढते. पूर्वीची हुंडा प्रथा प्रबोधनाने बऱ्यापैकी कमी होत असताना विवाहाचा वाढता खर्च चिंताजनक विषय बनला आहे. विवाह जमवणे आणि विवाह यशस्वी होणे यातील सामाजिक प्रदूषण खूप मोठे बनले आहे.

सामाजिक प्रदूषणाच्या अंगाने विचार करता, महिला अत्याचाराच्या घटनांची नोंद क्रूर हिंसा म्हणूनच करावी लागेल.आपण आपली संस्कृती आणि समाज व्यवस्थेपासून किती दुरावलो आहोत याची जाणीव अशा घटना समोर आल्यावर येते. खरंतर आम्ही जसजसे अधिकाधिक उच्चशिक्षित होत गेलो तसतशी आम्ही आमची कुटुंब व्यवस्था मोडीत काढली आहे. ‘लिव्ह इन रिलेशनशिप’ सारख्या नात्यांना न्यायालयाने मान्यता देऊन जणू भारतीय समाजव्यवस्थेला विकृत वळण देण्याचा प्रयत्न केलेला आहे.तथाकथित उच्चशिक्षितांमधील किमान ७०टक्के तरुण आणि ४०टक्के तरुणी व्यभिचारी आणि व्यसनाधीन झालेले असावेत.सामाजिक प्रदूषणाच्या या प्रकाराची पातळी इतकी खालावलेली आहे की, नुसता निषेधाचा सूर काढून काहीही उपयोग होणार नाही. याच्या विरोधात समाजातून प्रतिकाराची प्रतिक्रिया उमटणे आवश्यक आहे. दुष्कृत्या करणाऱ्यांच्या मनात सामाजिक दहशत निर्माण व्हायला हवी आहे.विवाहित महिलांवर पतीकडून होणारे अन्याय अत्याचार आपल्याकडे नवीन नाहीत.यातून आजही कित्येक मुलींचे आयुष्य उद्ध्वस्त होते आहे. दुर्दैवाने अशा प्रकारात समाज किंवा पोलीस खाते अत्याचार करणाऱ्याला साथ देत असल्याची उदाहरणे आहेत.ज्याप्रमाणे आपण तांदूळ निवडताना एखादा खडा निवडून बाहेर टाकतो. घाण स्वच्छ करतो. त्याचप्रमाणे

अशा प्रसंगातील नराधमांना समाजापासून दूर ठेवले पाहिजे.आपल्या न्याय व्यवस्थेने यासाठी चोख योगदान द्यायला हवे आहे. अर्थात नियतीच्या न्यायाला साक्षीपुरावे लागत नसतात. पापाचा घडा भरला की झालं! पण संबंधितांच्या जीवनाचे नुकसान होते त्याचे काय? म्हणूनच सामाजिक प्रदूषणाच्या दृष्टीने कौटुंबिक अत्याचाराच्या घटना खूपच गांभीर्याने घ्यायला हव्या आहेत.

सातत्याने वाढत असलेल्या लोकसंख्येमुळे देशात जमीन, पाणी, जंगल आणि खनिज आदी नैसर्गिक संसाधनांवरील ताण वाढला आहे. संसाधनांचा जास्त वापर झाल्याने कृषि उत्पादकता आणि पाण्याची कमतरता आदीतही घसरण होत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे रहिवास, परिवहन, आरोग्य आणि शिक्षण सुविधांशी संबंधित पायाभूत सुविधांचा विस्तार करण्याची गरज असते. मात्र मोठया लोकसंख्येच्या आवश्यकता पूर्ण करणं अवघड बनून लोकसंख्येच्या एका मोठया वर्गाला बिकट परिस्थितीत जगणं भाग पडून सामाजिक प्रदूषण वाढू लागतं.अति लोकसंख्येमुळे नियोजन शून्य शहरीकरण आणि विषमतेमुळे गुन्हेगारी वाढते.कायदा आणि सुव्यवस्था कायम राखणं कठिण होतं.स्थलांतरामुळे देशातील शहरी भागात घरांचा प्रश्न निर्माण झाला आहे.औद्योगिक भागात लोकसंख्येचा ताण वाढला आहे. रस्त्यालगत, रेल्वेमार्गाजवळ झोपडपट्ट्या विकसित झाल्यात. झोपडपट्टया ही औद्योगिक विकासाची आणि महानगरांची निर्मिती आहे. यात लोकांना छोटं-मोठं काम मिळतं.पण राहायला घर मिळत नाही.त्यातून झोपडपट्ट्या चिंता,तणाव,संघर्ष,निराशा आदीद्वारे सामाजिक प्रदूषणाचे क्षेत्र बनतात. एप्रिल २०२३मध्ये चीनला मागे टाकत भारतानं लोकसंख्येत जगात पहिल्या स्थानी उडी मारल्याचे आपण जाणतो. युनायटेड नेशन्सच्या लोकसंख्या आकडेवारीत १९५०पासून भारताची लोकसंख्या चीनपेक्षा जास्त नोंदवली जाण्याची ही पहिलीच वेळ होती.तत्पूर्वीच्या नॅशनल कमिशन ऑन पॉप्युलेशनच्या २०२०च्या लोकसंख्या अंदाजानुसार, २०११ ते २०३६ या पंचवीस वर्षांत भारताची लोकसंख्या १५२ कोटी २० लाखांपर्यंत जाईल,असं सांगण्यात आलं आहे.दुसकडे,भारतात आयुर्मान वाढलं आहे. जन्मदर घटलेला आहे. त्यामुळे लोकसंख्या वाढीचा दर खाली आलेला असला तरीही भारतात लोकसंख्येत वाढ होणं पुढच्या काही वर्षांपर्यंत सुरू राहाणार आहे.अ.पां.देशपांडे यांनी डॉ.वसंतराव गोवारीकर यांच्या लिहिलेल्या चरित्रात 'लोकसंख्यावाढ'या विषयातील डॉ. गोवारीकर यांच्या चिंतनाची नोंद करताना,भारतात लोकसंख्येचे स्थिरीकरण साधारणपणे इ.स.२०४० ते २०५० च्या दरम्यान येईल असे म्हटले होते.या पार्श्वभूमीवर देशासमोर जी काही आव्हाने निर्माण होताना दिसताहेत त्यात 'सामाजिक प्रदूषण' हा कळीचा मुद्दा ठरणार आहे.

'जिस देश में गंगा बहती है' या चित्रपटातील 'होठों पे सच्चाई रहती है,जहाँ दिल में सफ़ाई रहती है! हम उस देश के वासी हैं, जिस देश में गंगा बहती है! या शैलेंद्र यांच्या गीतातून भारतीय स्वातंत्र्यालढ्यातील 'चारित्र्य' या मूल्याकडे लक्ष वेधले गेले होते.आपल्या सध्याच्या आधुनिक जीवनपद्धतीत, अर्थकारणात, राज्यकारभारात त्याची उणीव असल्याने सामाजिक प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर आहे.तरीही काही प्रयत्न कौतुकास्पद आहेत. ओरिसाच्या किनारपट्टीवरील बंदर शहर असलेले पारादिप हे भारतातील सर्वात स्वच्छ छोट्या शहरांपैकी एक आहे. २०१९पूर्वी पारादिप शहरातील रस्ते,नाले आणि मोकळ्या जागा कचऱ्याने भरलेल्या होत्या.तेथे घनकचरा व्यवस्थापनाची कमतरता होती. मात्र नंतर ८०हजार लोकसंख्या असलेल्या याच पारादीपवासियांनी कचरा व्यवस्थापनाचे सामाजिक-आर्थिक मॉडेल तयार केले. जे स्वतःला स्वयंपूर्ण बनवण्यासाठी पुरेसा महसूल निर्माण करते आहे. 'गावाचा वाढदिवस' हे आणखी एक कौतुकास्पद उदाहरण, २०२०च्या दीपावलीनंतर कोरोना अनलॉक वातावरणातील (२३ नोव्हेंबर) भेटीत ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी सांगितलेलं. अण्णा सांगत होते, 'लोकं आपले वाढदिवस करतात. राळेगणसिद्धी परिवार गावाचा वाढदिवस करते.गावाचा वाढदिवस म्हणजे काय? जन्माला येऊन एक वर्ष पूर्ण झालेल्या मुलांना गावाने झबलं-टोपरं (अंगडं) घ्यायची. लग्न होऊन येऊन १ वर्ष झालेल्या गावातल्या सुनांचा खण, नारळ, साडी-चोळी देऊन सन्मान करायचा. गावातील वयोवृद्ध स्त्री-पुरुषाचं गावानं पूजन करायचं. सायंकाळी सर्वांनी एकत्रित भोजन करायचं. गावाच्या विकासाचं काम करणारे तरुण, शाळेतील यशस्वी विद्यार्थी आदिंना सन्मानित करायचं. हे सामाजिक पर्यावरण संतुलित राखण्याचं काम आहे. म्हणून गावाचा वाढदिवस देशभरातील गावागावात व्हायला हवा. यातून सामाजिक प्रदूषण दूर होईल.गावात पारिवारिक,एकोप्याची भावना वाढीस लागेल. गाव एक होईल.'राळेगणसिद्धीप्रमाणे शासनाचे विविध पुरस्कार पटकावणारं वाशिम जिल्ह्यातील जांभरूण महाली गावही 'गावाचा वाढदिवस'साजरा करतं.महाराष्ट्र राज्य पाठय पुस्तक मंडळाने बारावीच्या नवीन अभ्यासक्रमाच्या इंग्रजी पुस्तकात'टुवर्डस्? आयडियल व्हिलेजेस' पाठात या गावाची दखल घेतली आहे. राज्यात वैशिष्टयपूर्ण काम करणारी पोपटराव पवारांचे हिवरेबाजार, कोकणातल्या डॉ.प्रसाद देवधरांचे झाराप आदी काही गावं आहेत. समाजाने आणि माध्यमांनी अशा गावांची आणि तिथल्या प्रयोगांची सातत्याने विशेष दखल घ्यायला हवी आहे. यातून सामाजिक प्रदूषण कमी होण्यास मदत होईल.

विकासाच्या प्रक्रियेत, माणसाने निसर्गाचे महत्व नाकारले, परिणामी मनुष्य आणि निसर्ग यांच्यात असमतोल निर्माण झाला. असमतोलामुळे माणसाची शारीरिक व मानसिक क्षमता कमी होत गेली, त्यामुळे त्याचे आचरण,विचारशैली आणि जबाबदारीची भावना प्रदूषित झाली.या प्रदूषणामुळे गरिबी, बेरोजगारी, लोकसंख्या वाढ, गुन्हेगारी, अल्पवयीन गुन्हेगारी, पांढरपेशा गुन्हेगारी, मद्यपान आणि अंमली पदार्थांचे व्यसन,विद्यार्थी अशांतता, वेश्याव्यवसाय, आत्महत्या, भिकारी, घरांची संकुचितता, झोपडपट्ट्यांची समस्या,

समाजातील निरक्षरता, कामगार समस्या, जातीयवाद, प्रादेशिकता, भाषावाद, सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार, हुंडाप्रथा, बालविवाह, घटस्फोट, वाढती अनैतिकता आणि राष्ट्रीय चारित्र्य नसणे अशा अनेक समस्या निर्माण झाल्यात. ज्या सामाजिक प्रदूषणाचे मूळ स्त्रोत आहेत.अशा विकासाचं सध्याचं रुपडं घडलं कसं? हे समजून घेणंही आवश्यक आहे. मुळात शेती,उद्योग आणि सेवा या तिन्ही क्षेत्रातील वाढीला प्रोत्साहन देऊन राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपी) वाढवणं ही सध्याच्या विकासाची मूळ कल्पना आहे. मात्र भ्रष्टाचार आणि कामचुकार नोकरशाहीमुळे यात १९९०पर्यंत अडचणी येत होत्या. १९९१साली पंतप्रधान नरसिंहराव सरकारच्या काळात मनमोहनसिंग अर्थमंत्री असताना खाजगीकरण-उदारीकरण-जागतिकीकरण ह्या त्रिसूत्रीच्या आधारे विकास कार्यक्रमाला गती देण्याचा प्रयत्न केला. मात्र २००८ मधल्या मंदीनंतर विकासदराला उतरती कळा लागली. तो वाढवण्यात आलेलं अपयश,भ्रष्टाचार,घोटाळे ह्यांमुळे मनमोहनसिंग सरकारची अवस्था केविलवाणी होऊन अखेर ते पडलं. यानंतर नरेंद्र मोदी पंतप्रधान झाले. त्यांची 'विकासपुरुष' ह प्रतिमा कितीही अभिमानास्पद वाटत असली तरी पर्यावरणीय दृष्ट्या गुजरातचे मुख्यमंत्री म्हणूनची कारकीर्द तपासली तर त्यांची विकासाची संकल्पना ही मनमोहनसिंहांच्या संकल्पनेपेक्षा वेगळी नसल्याचे लक्षात येते. त्यांनीही पूर्वीचे धोरण उद्योगक्षेत्रात राबवले. शेती प्रक्रिया मूलतः सेंद्रिय असल्याने उत्पादन एका मर्यादेबाहेर वाढूच शकत नाही. तरीही आपण कृषि उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढवलं गेलं. जमिनी नापीक होऊ लागल्या. अति कीटकनाशकांमुळे हवा-पाणी, जमीन मोठया प्रमाणावर प्रदूषित झाली. देशाच्या वाढीमधला सर्वाधिक हिस्सा हा औद्योगिक उत्पादनवाढीचा असतो. मोदींनी असाच सुरुवातीला गुजरातचा आणि नंतर देशाचा विकास केला. यामुळे बँका आणि अन्य वित्तीय संस्था,माहिती तंत्रज्ञान, वाहतूक, पर्यटन अशा विविध क्षेत्रांची वाढ झाली. १९९१नंतर ही सर्व क्षेत्र आपल्याला फुगलेली दिसताहेत. अशा विकासामुळे जगभर समस्या निर्माण झालेल्या आहेत.भारतात प्रचंड लोकसंख्या असल्याने त्या अधिक तीव्र आहेत. जणू देशातील निसर्गरम्य गावांच्या राखेवर वसलेल्या शहरांमध्ये आमची विचारधाराही कृत्रिम झाली आहे. आज जी शहरं आम्ही सजवतोय ती उद्या समाधी बनण्याचा धोका आहे. आमच्या नद्यांना आम्ही आईचा दर्जा दिला पण त्यांना सांभाळण्यासाठी आम्ही जणू अनाथाश्रमात सोडले अशी परिस्थिती आहे.

मनुष्याने आपल्या भौतिक सुखासाठी निसर्गाचा दुरुपयोग करून घ्यायला सुरुवात केल्याने ऋतू वेळेवर आपले काम करू शकत नाही आहेत.पूर्वी आपल्याकडे सामाजिक संतुलनासाठी अनेक नियम केले होते.आज ते सैल झालेत.मनुष्य स्वतःला जसे वाटेल तसे वागू लागलेला आहे.आज आम्ही पूर्वजांप्रमाणे निसर्गाच्या सान्निध्यात राहतही नाही आणि निसर्गाकडून काही बोधही घेत नाही आहोत.त्यामुळे निसर्गाचे व समाजाचे संतुलन बिघडलेले आहे.निसर्गाचे संतुलन कायम राखण्यासाठी आपण वृक्षारोपण, पाणी अडवा,पाणी जिरवा,अवैध वाळूउपसा बंदी, निसर्गाशी छेडछाड न करणे आदी उपाय करू शकतो. पण सामाजिक प्रदूषण दूर करण्यासाठी समाज म्हणून आपल्याला सुरवात करावी लागेल. समाजाचे प्रदूषण कमी होऊन शुद्ध सामाजिक मन तयार झाल्यास निसर्गावर मात करण्याची वृत्ती कमी होऊन भारत प्रदूषणमुक्त होईल.

(पर्यटन-पर्यावरण क्षेत्रातील कार्यकर्ते असलेले लेखक-पत्रकार धीरज वाटेकर (चिपळूण) हे, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वर्गीय 'वृक्षमित्र' आबासाहेब मोरे यांनी स्थापन केलेल्या निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाचे सचिव आहेत.कोकणच्या विकासासाठी प्रयत्नशील असलेल्या वाटेकर यांची पर्यटन आणि चरित्रलेखन विषयातील नऊ पुस्तके प्रकाशित झाली आहेत.गेली २८ वर्षे ते'पत्रकार' म्हणून कोकण इतिहास व संस्कृती,ग्रंथ चळवळ,पर्यटन, निसर्ग आणि पर्यावरण आदी सामाजिक जागृतीपर विषयात कार्यरत आहेत.)

**धीरज वाटेकर**
**विधिलिखित,१२६३-ब,कांगणेवाडी रोड,**
**खेंड,चिपळूण ४१५६०५, जि.रत्नागिरी.**
**मो. ९८६०३६०९४८**

■■■






# व्यक्तीगत आणि सामाजिक स्तरावर ज्योतिषशास्त्राची उपयुक्तता

श्री. राज कर्वे

'ज्योतिषशास्त्र हे कालज्ञानाचे शास्त्र आहे. 'कालमापन' आणि 'कालवर्णन' ही त्याची २ अंगे आहेत. कालमापनाच्या अंतर्गत काळ मोजण्यासाठी आवश्यक घटक आणि गणित यांची माहिती असते.कालवर्णनाच्या अंतर्गत काळाचे स्वरूप जाणण्यासाठी आवश्यक घटकांची माहिती असते.कालवर्णनाच्या दृष्टकोनातून ज्योतिषशास्त्राची व्यक्तीगत आणि सामाजिक स्तरावरील उपयुक्तता या लेखाद्वारे समजून घेऊ.

## १. व्यक्तीगत स्तर

### १ अ. व्यक्तीला जन्मतः लाभलेली अनुकूल आणि प्रतिकूल परिस्थिती कळणे

प्रत्येक व्यक्ती तिचे प्रारब्ध सोबत घेऊन जन्माला येते. जगातील प्रत्येक व्यक्ती इतरांपेक्षा निराळी आहे,ती तिच्या प्रारब्धामुळेच. काही व्यक्तींचे जीवन बालपणापासून सुखात जाते; त्यांना सर्व साधन–सुविधांचा लाभ होतो, तर काहींचे जीवन कष्टमय आणि दुःखमय असते.सुखी व्यक्तीकडे सर्वच सुखे असतात,असेही नाही.काहींना विवाहसुख लाभते;पण संततीसुख नसते.काहींना संततीसुख लाभते; पण आर्थिक परिस्थिती बेताची असते.काहींची आर्थिक परिस्थिती चांगली असते;पण आरोग्य चांगले रहात नाही, इत्यादी. जन्मकुंडलीद्वारे 'व्यक्तीच्या जीवनात कोणत्या गोष्टी अनुकूल अन्? कोणत्या गोष्टी प्रतिकूल रहातील',हे कळते. त्यामुळे जीवनात ज्या गोष्टींची अनुकूलता नाही, त्याविषयी त्रागा करून न घेता ज्या गोष्टींची अनुकूलता आहे, त्यांच्याकडे लक्ष देऊन त्यांचा सदुपयोग करून घेण्याची सकारात्मक दृष्टी ज्योतिषशास्त्रामुळे मिळते.

### १ आ. व्यक्तीच्या प्रकृतीला अनुकूल अशा कार्यक्षेत्राच्या संदर्भात दिशादर्शन करता येणे

प्रत्येक व्यक्तीची प्रकृती निराळी आहे. स्थूलमानाने व्यक्तीमत्वाचे ३ प्रकार पडतात.

#### १ आ १. चर स्वभाव

काही व्यक्ती जन्मतः गतीशील, कार्यतत्पर, महत्वाकांक्षी, धाडसी, पुढाकार घेणाऱ्या आणि शारीरिक बळ असणाऱ्या असतात. याला ज्योतिषशास्त्रात 'चर स्वभाव' म्हणतात.

#### १ आ २. स्थिर स्वभाव

काही व्यक्ती एका जागी स्थिर रहाणाऱ्या, उच्चपद प्राप्त करण्यासाठी धडपडणाऱ्या, अधिकारीवृत्ती असणाऱ्या, व्यवहारबुद्धी लाभलेल्या आणि सुखवस्तू असतात. याला 'स्थिर स्वभाव' म्हणतात.

#### १ आ ३. द्विस्वभाव

काही व्यक्ती कधी गतीमान तर कधी स्थिर, तर्कशक्ती लाभलेल्या, विषयाच्या खोलात जाणाऱ्या, ज्ञान मिळवण्यासाठी धडपडणाऱ्या, बौद्धिक बळ असणाऱ्या आणि विरक्त असतात. याला 'द्विस्वभाव' म्हणतात.

व्यक्तीच्या जन्मकुंडलीवरून तिच्या प्रकृतीची कल्पना चांगल्याप्रकारे येते. व्यक्तीच्या प्रकृतीचा तिच्या शिक्षणक्षेत्राशी आणि कार्यक्षेत्राशी संबंध असतो. चर स्वभावाच्या व्यक्ती वैद्यक, अभियांत्रिकी, सुरक्षायंत्रणा, उत्पादन, राजकारण, प्रसारमाध्यमे, क्रीडा इत्यादी क्षेत्रांत अग्रणी असतात.स्थिर स्वभावाच्या व्यक्ती प्रशासन, व्यवस्थापन, व्यापार, वित्त, लेखापाल, वाणिज्य, कला इत्यादी क्षेत्रांत पुढे असतात. द्विस्वभावाच्या व्यक्ती संशोधन, तत्वज्ञान, विद्या, शिक्षणसंस्था, न्यायप्रणाली, समुपदेशन, समन्वय इत्यादी क्षेत्रांत प्रवीण असतात. जन्मकुंडलीद्वारे व्यक्तीला तिच्या प्रकृतीला अनुकूल असलेले शिक्षण आणि कार्यक्षेत्र यांच्यासंदर्भात दिशादर्शन करता येते.


### १ इ. व्यक्तीच्या जीवनातील अनुकूल आणि प्रतिकूल काळ कळणे

काळ परिवर्तनशील आहे; त्यामुळे परिस्थितीही परिवर्तनशील आहे. कोणतीही चांगली किंवा वाईट परिस्थिती कायमस्वरूपी टिकत नाही. त्याचप्रमाणे जन्मकुंडलीत असणाऱ्या शुभ किंवा अशुभ ग्रहयोगांचे फळ जीवनभर एकसारखे मिळत नाही. ते फळ विशिष्ट कालावधीत प्रकर्षाने मिळते. ज्योतिषशास्त्रात कालनिर्णयाच्या विविध पद्धती आहेत. या पद्धतींद्वारे आपल्या जीवनातील विशिष्ट

काळ कोणत्या गोष्टींसाठी अनुकूल किंवा प्रतिकूल राहील,याचा बोध होतो.

**१ ई.जन्मकुंडलीद्वारे व्यक्तीच्या समस्येमागील आध्यात्मिक कारण कळणे**

जीवनातील कोणत्याही समस्येमागे शारीरिक,मानसिक किंवा




आध्यात्मिक कारणे असतात.समस्यांमागील शारीरिक आणि मानसिक कारणे बुद्धीला कळतात आणि त्यावरील उपाययोजना व्यवहारात उपलब्ध असतात. समस्यांमागील आध्यात्मिक कारणे मात्र बुद्धीला कळत नाहीत, उदा. अतृप्त पूर्वजांचा त्रास, सूक्ष्मातील अनिष्ट शक्तींचा त्रास, प्रारब्ध आदींमुळे उद्भवलेल्या विविध समस्या. अशा समस्यांवर शारीरिक आणि मानसिक स्तरांवरील उपाययोजना अवलंबण्यास मर्यादा येते. अशा समस्यांवर देवतांचा नामजप करणे, धार्मिक विधी करणे,तीर्थक्षेत्री जाणे,संतसेवा करणे,प्रायश्चित्त घेणे इत्यादी आध्यात्मिक स्तरावरील उपाय लागू पडतात. जन्मकुंडलीद्वारे व्यक्तीच्या समस्येमागील आध्यात्मिक कारण लक्षात येते आणि त्या अनुषंगाने आध्याात्मिक उपायांचा अवलंब करण्याविषयी दिशादर्शन करता येते.






**१ उ. समस्यांच्या निवारणासाठी नवग्रहांची उपासना सांगणे**

'दैवी उपासना' हे हिंदु धर्माचे वैशिष्ट्य आहे. उपासनेच्या माध्यमातून व्यक्तीला आवश्यक असलेली सूक्ष्म-ऊर्जा प्राप्त होते. ज्योतिषशास्त्रात ग्रहदेवतांच्या उपासेनला महत्व आहे. ज्या ग्रहाशी संबंधित सूक्ष्म-ऊर्जा व्यक्तीत अल्प आहे, त्या ग्रहाशी संबंधित उपासना करण्यास सांगितले जाते. ग्रहाशी संबंधित रत्न धारण करणे, मंत्रजप करणे, यज्ञ करणे, नामजप करणे इत्यादी ग्रह-उपासनेचे प्रकार आहेत.जीवनातील अधिकतर समस्यांमागे आध्यात्मिक कारणे असतात; त्यामुळे व्यावहारिक प्रयत्नांना दैवी उपासनेची जोड देणे आवश्यक ठरते.

## २. सामाजिक स्तर

**२ अ. शुभाशुभ दिवसांचे ज्ञान होणे**

'काळाचा प्रभाव ओळखणे' या उद्देशाच्या पूर्तीसाठी ज्योतिषशास्त्राची निर्मिती झाली. ज्योतिषशास्त्रामुळे शुभाशुभ दिवसांचे ज्ञान होते.भारतात वैदिक काळापासून महत्वाची कार्ये आणि धार्मिक संस्कार शुभ मुहूर्तांवर करण्याची परंपरा आहे. 'काळानुरूप केलेल्या कार्यात यश मिळते', हा त्यामागील दृष्टीकोन आहे.

**२ आ. काळाच्या स्वरूपाचे ज्ञान होणे**

सृष्टीतील सर्व क्रिया काळाच्या आश्रयाने घडतात. काळ स्वतः कर्म करत नाही; परंतु तो सृष्टीचा आश्रय असल्याने त्याला सत्त्व, रज आणि तम या गुणांची उपाधी लावली जाते.काळ सात्त्विक असतांना उत्पत्ती, नवनिर्मिती, विधायक कार्य, ज्ञानवृद्धी आणि धर्मसंस्थापना होऊन समाजाचा लौकिक आणि आध्यात्मिक उत्कर्ष होतो. काळ तामसिक असतांना विनाश, अज्ञान, षड्रिपू, भोगवाद आणि आसुरीवृत्ती प्रबळ होते. भारतीय ज्योतिषशास्त्रातील युगपद्धतीवरून काळाच्या स्वरूपाचे ज्ञान चांगल्याप्रकारे होते.

**२ इ. समाजाचे प्रारब्ध कळणे**

एका शरिरात एक आत्मा निवास करतो, तर एका राष्ट्रात अनेक व्यक्ती म्हणजे अनेक आत्मे निवास करतात. एका व्यक्तीने केलेल्या चांगल्या-वाईट कर्मांची फळे त्या व्यक्तीला भोगावी लागतात; याला आपण 'व्यष्टी प्रारब्ध' म्हणतो. त्याप्रमाणे एका राष्ट्रातील लोकांच्या एकत्रित कर्मांची फळे त्या राष्ट्राला भोगावी लागतात. याला 'समष्टी प्रारब्ध' म्हणतात. व्यक्तीप्रमाणे राष्ट्राचीही कुंडली असते. ज्योतिषशास्त्राच्या 'मेदिनीय' या शाखेत ग्रहांच्या स्थितीचा राष्ट्रावर होणारा परिणाम अभ्यासला जातो. गुरु, शनि, हर्षल इत्यादी मोठ्या ग्रहांमध्ये महत्वाचे योग झाल्यावर मोठी स्थित्यंतरे पहायला मिळतात. मेदिनीय ज्योतिषशास्त्राद्वारे राष्ट्र आणि विश्व यांच्यासंदर्भात आगामी काळाचे स्वरूप कसे असेल,याचा वेध घेता येतो.'

**श्री. राज कर्वे, महर्षि अध्यात्म विश्वविद्यालय,**
**ज्योतिष विशारद, गोवा.**

■■■



# माझ्या लावणीचा संस्मरणीय प्रवास

उद्धव भयवाळ

असे म्हणतात की,नोकरीतील पहिल्या पोस्टिंगचे ठिकाण हे आपल्या कायम लक्षात राहते.

१९७३ ते १९८२ या माझ्या वैजापूरच्या कार्यकाळातील किती आठवणी सांगू आणि किती नको असे मला झालेले आहे.

मला बँकेच्या नोकरीची ऑर्डर आली आणि दोन मार्च १९७३ रोजी मी स्टेट बँक ऑफ हैदराबादच्या वैजापूर शाखेत “कॅशियर कम गोडावून कीपर” या पदावर रुजू झालो. तिथे माधवराव दिवाण नावाचे खूप प्रेमळ शाखा व्यवस्थापक होते. नियमितपणे वर्तमानपत्रांमधून प्रसिद्ध होणाऱ्या माझ्या कविता वाचून मला कविता करण्याचा छंद आहे, हे थोड्याच दिवसांमध्ये सर्व स्टाफला कळले आणि सर्वांनीच माझ्या या छंदाचे कौतुक केले.“मी माझ्या विद्यार्थी जीवनापासूनच कविता करतो” हे सांगितल्यावर तर त्या सर्वांनाच खूप आनंद झाला.मी लिहिलेल्या प्रत्येक कवितेचे माझे पहिले श्रोते म्हणजे माझे बँकेतील सहकारी होत. अशातच एके दिवशी बँकेचा शिपाई माझ्या कॅश काऊंटरपाशी आला आणि मला म्हणाला, “तुम्हाला मॅनेजरसाहेबांनी केबीनमध्ये बोलावले आहे.” हे ऐकताच मी ड्रॉवरला कुलूप लावून साहेबांच्या केबीनमध्ये गेलो, तर तिथे प्रख्यात ग्रामीण साहित्यिक रा. रं. बोराडे सर बसलेले दिसले. मी त्यांना अनेक कार्यक्रमांमधून पाहिलेले असल्यामुळे मी त्यांना ओळखले आणि नमस्कार केला. मॅनेजरसाहेबांनी त्यांच्याशी माझी ओळख करून दिली आणि मी कवी आहे हेसुद्धा त्यांना सांगितले. मी कविता करतो हे ऐकून बोराडे सरांना खूप आनंद झाला. “बोराडे सर हे वैजापूरच्या विनायकराव पाटील महाविद्यालयात प्राचार्य आहेत” असे मॅनेजरसाहेबांनी सांगितले तेव्हा तर मला खूपच आनंद झाला.

माझ्याच वयाची काही तरुण कवी मंडळी वैजापूरमध्ये असल्याचे लवकरच कळले आणि आदरणीय बोराडे सरांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही “शब्दवेध” नावाचे एक काव्यमंडळ स्थापन केले. वैजापूरचे तेव्हाचे गट विकास अधिकारी श्री शरद कट्टी हे आमच्या मंडळाचे अध्यक्ष झाले. शरद कट्टी यांचा 'चौथे अपत्य हा काव्यसंग्रह नुकताच प्रकाशित झाला होता. माझ्यासह ज.रा.नेवाडकर, उत्तम बावस्कर,श्याम खांबेकर, आशा पैठणे, क.मा. साळुंके इत्यादी या मंडळाचे सदस्य होते. दर महिन्यातून एकदा शब्दवेध मंडळाची बैठक होऊ लागली. त्या बैठकीत प्रत्येक सदस्याने आपली एक नवीन कविता वाचून दाखवायची असे ठरले. वैजापूरच्या अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य आणि उर्दू कवी बशीर अहमद “असिर” अधूनमधून तिथे येत असत आणि उर्दू शायरी ऐकवत असत. या सर्व कविमित्रांच्या सहवासात तसेच आदरणीय बोराडे सरांच्या प्रोत्साहनाने माझी कविता फुलतच गेली, हे मी कदापी विसरू शकणार नाही.

या काळात मला इतर कवितांसोबतच लावणी प्रकारातील कविता लिहिण्याचा छंद लागला. त्या लावण्यांना मी स्वतंत्र चाली देऊन कविसंमेलनातून गाऊ लागलो.

बहुधा १९७८ साल असावे. मी लिहिलेली एक लावणी वैजापूर येथे एकदा एका कविसंमेलनात मी गाऊन दाखवली. त्या लावणीला मी नाव दिले होते, लावणी कडीची. त्या ठिकाणी बोराडे सर उपस्थित होते.बोराडे सरांना ती लावणी इतकी आवडली की त्यांनी मला नंतरच्या आठवडयात परळी येथे होणाऱ्या 'अभिव्यक्ती साहित्य संमेलनासाठी सोबत नेले.. तिथे त्या माझ्या कडीच्या लावणीला 'वन्स मोअर मिळाला. तेव्हा मला जो आनंद झाला त्याचे मी वर्णन करू शकत नाही. रात्री नऊ वाजता सुरु झालेले कविसंमेलन पहाटे चार वाजता संपले. एकंदर १०५ कवींनी त्या कविसंमेलनात भाग घेतला होता. विशेष म्हणजे त्या ठिकाणी झालेल्या कविसंमेलनाचे अध्यक्ष प्रख्यात कवी फ.मुं.शिंदे सर होते.

माझ्या लावणीला वन्स मोअर मिळाला त्यावेळीच मी ठरवले की आपण आता एकापेक्षा एक दर्जेदार लावण्या लिहायच्या. पुढे मी कवितांसोबतच बालकविता, लावणी, बालकथा आणि विनोदी कथासुद्धा लिहायला सुरुवात केली. दरवर्षी अनेक दर्जेदार दिवाळी अंकांमधून माझ्या कविता, बालकविता, विनोदी कथा, कौटुंबिक कथा प्रसिध्द होऊ लागल्या. मी लिहिलेल्या लावण्यांचा एक अल्बम काढावा असा माझ्या कुटुंबीयांचा सतत आग्रह असायचा; मी लिहिलेल्या आणि मीच चाली लावलेल्या लावण्या जेव्हा घरी सर्व कुटुंबियांना गाऊन दाखवायचो, तेव्हा मनोज, अंजली आणि रवींद्र ही मुले लगेच म्हणायची की,” दादा, तुमच्या लावण्या आणि त्यांना तुम्ही लावलेल्या चाली खूपच छान आहेत. या लावण्यांचा एक अल्बम प्रकाशित करा.” तसेच माझी पत्नी निर्मलासुद्धा अल्बम

प्रकाशित करण्यासाठी आग्रह धरायची; "बघू कधी योग येतो ते" असे म्हणून मी तो विषय टाळायचो. शेवटी जून २०२४ मध्ये एके दिवशी छत्रपती संभाजीनगर येथील ए. एम. डी. स्टुडीओचे सर्वेसर्वा आणि लोकप्रिय संगीतकार श्री अतुल दिवे यांच्याशी मी संपर्क साधला. त्याानंतर त्यांच्या स्टुडीओमध्ये माझ्या आठ लावण्या आणि दोन गीतांचे रेकॉर्डिंग झाले आणि एकूण दहा गीतांचा अल्बम तयार झाला. या अल्बम मधील लावण्या ए.एम. डी. स्टुडीओमधील गायक कलाकारांनी आपल्या सुमधुर आवाजात गायलेल्या आहेत.

मीसुद्धा लगेच या अल्बमचे नामकरण करून टाकले आणि अल्बमला नाव दिले, "लावण्य बहार".

मित्र हो,जेव्हा माझ्या लावण्यांचा अल्बम काढायचा विचार माझ्या डोक्यात आला,तेव्हाच मी ठरवून टाकले होते की,अल्बमचे नाव "लावण्य बहार" हे ठेवायचे,

"लावण्य बहार"या अल्बमचा प्रकाशन सोहळा थाटात करावा असे माझी मुलगी अंजली धानोरकर प्रथितयश लेखिका, प्रेरक व्याख्याती तथा उपजिल्हाधिकारी हिने सुचविले. त्यानुसार दिनांक २७ डिसेंबर २०२२ रोजी आमच्या बँकेचे निवृत्त सहाय्यक महाप्रबंधक आदरणीय श्री आचार्य साहेब, चित्रपट निर्माते आणि गायक श्री भारत अण्णा लोळगे आणि प्रसिद्ध कवी, गीतकार आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे संमेलनाध्यक्ष आदरणीय फ.मु. शिंदे सर या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीत एका दिमाखदार सोहळ्यात"लावण्य बहार"हा माझ्या लावण्यांचा अल्बम प्रकाशित झाला आणि त्याचं ठिकाणी या लावण्यांची संगीत मैफिल श्री अतुल दिवे आणि त्यांच्या सहकलाकारांनी सादर केली. उपस्थित प्रेक्षकांनी या संपूर्ण कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

२७ डिसेंबर २०२२ ची सायंकाळ माझ्या जीवनातील एक न भूतो न भविष्यती अशी सायंकाळ ठरली...

प्रेक्षकांनी ओसंडून वाहणाऱ्या'मराठवाडा महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी'च्या सभागृहात माझ्या लेखणीतून साकार झालेल्या लावण्या आणि गीतांच्या अल्बमच्या विमोचनाचा पार पडलेला भव्य सोहळा आणि त्या पाठोपाठ माझ्या लावण्यांनी आणि गीतांनी सजलेली संगीत मैफिल म्हणजे माझ्या जीवनातला अविस्मरणीय प्रसंग ठरला.

महसूल प्रबोधिनीच्या मुख्य गेटवर आणि आतील परिसरात जागोजागी लावलेले "लावण्य बहार" सोहळ्याचे बॅनर्स ज्यावर कार्यक्रमाचे अध्यक्ष, उद्घाटक आणि प्रमुख पाहुणे यांचे फोटो होते प्रबोधिनीच्या परिसरात शिरणाऱ्या प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत होते. सभागृहाच्या दर्शनी भागात रेखाटलेली सुंदर रांगोळी पाहूनच रसिक प्रेक्षक सभागृहात प्रवेश करीत होते.

साधारणपणे सायंकाळी पावणे सहा वाजता सुरू झालेला हा कार्यक्रम रात्री पावणे नऊच्या सुमारास संपन्न झाला.

सुरुवातीला सर्व मान्यवर मंचावर स्थानापन्न झाल्यावर सर्वांचे स्वागत करण्यात आले. यानंतर मी लिहिलेले स्वागत गीत श्री धनंजय गोसावी यांनी सुरेल आवाजात गाऊन सर्वांचे गीत रूपाने स्वागत केले. या स्वागत गीतास श्री अतुलजी दिवे यांनी सुंदर चाल लावली होती. यावेळी मंचाच्या बाजूला लावलेल्या पडद्यावर प्रोजेक्टर्सद्वारे मेकिंग ऑफ अल्बम ची क्षणचित्र दाखविली जात होती. टी एम टी स्टुडीओचे श्री सचिनजी अनर्थे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी तयार केलेले हे व्हिडिओ सभागृहातील प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेत होते.मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले.

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी स्टेट बँक ऑफ हैदराबादचे निवृत्त सहाय्यक महाप्रबंधक श्री अनंत आचार्य साहेब होते. "लावण्य बहार" या अल्बमचे विमोचन ज्येष्ठ चित्रपट निर्माते आणि गायक श्री भारत अण्णा लोळगे यांच्या हस्ते झाले. या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध कवी आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष प्रा. फ. मु. शिंदे सर लाभले होते. आधी स्वरसाक्षी प्रॉडक्शन्सचे सर्वेसर्वा श्री अतुल दिवे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. त्यानंतर मी माझे मनोगत मांडले. "अनेक वर्षे मी ऊराशी बाळगून असलेले अल्बमचे स्वप्न आज साकार होत आहे, याचा मला आनंद होत आहे" असे मी यावेळी सांगितले.



लोळगे अण्णांनी आपल्या भाषणानंतर खड्या आवाजात तुळजाभवानीला जे साकडे घातले त्याला तोड नव्हती.

फ. मुं. शिंदे सरांच्या भाषणाने नेहमीप्रमाणेच सभागृहात हास्याचे कारंजे उडत होते.

श्री आचार्य साहेबांनी अत्यंत सुंदर आणि समर्पक शब्दांमध्ये कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला.

या नेत्रदीपक सोहळ्याचे सूत्र संचालन श्री निलेश चव्हाण यांनी केले तर आभार प्रदर्शन माझी मुलगी अंजली धानोरकर हिने केले.

विमोचन सोहळ्यानंतर झालेल्या संगीत मैफिलीत " स्वरसाक्षी प्रॉडक्शन्स" चे सर्वेसर्वा श्री अतुलजी दिवे आणि त्यांच्या सहकारी कलाकारांनी माझ्या लावण्या आणि गीते गाऊन खूपच रंगत आणली. विशेष म्हणजे माझी प्रसिद्ध " कडीची लावणी" माझी मुलगी अंजली धानोरकर (उपजिल्हाधिकारी) हिने या संगीत मैफिलीत गाऊन सर्वांना आश्चर्यचकित केले. मीसुद्धा शेगावच्या गजानन महाराज यांच्यावर रचलेले आणि अल्बममध्ये असलेले एक भक्तीगीत या मैफलीत गायलो. मैफिलीतील लावण्या आणि गीते ऐकण्यात प्रेक्षक हरवून गेलेले असतांनाच मैफिलीचा शेवट करण्याचा तो क्षण आला.

"पसरला चहूकडे अंधार सखे ग, चहूकडे अंधार" ही माझी



भैरवीतील रचना गाऊन श्री अतुल दिवे यांनी या मैफलीचा शेवट केला आणि अनिच्छेनेच प्रेक्षकांना ते सभागृह सोडावे लागले.

२७ डिसेंबर २०२२ च्या त्याा आनंद सोहळ्याचे सर्व श्रेय या अल्बमसाठी माझ्यामागे सतत धोशा लावणारी माझी मुलगी अंजली आणि मुले मनोज आणि रवींद्र ही भावंडं या तिघांना जाते.तसेच माझी पत्नी सौ. निर्मला हीसुद्धा अधूनमधून या गोष्टीची आठवण करून देऊन माझ्या मनातील अल्बमचा विचार सतत जिवंत ठेवण्यास मदत करायची तिलाही हे श्रेय जाते. त्याचप्रमाणे, ज्यांनी या "लावण्य बहार" अल्बमला मूर्त स्वरूप देण्यासाठी भरपूर मेहनत घेतली, ते ए एम डी स्टुडीओचे आणि स्वरसाक्षी प्रॉडक्शनचे सर्वेसर्वा श्री अतुलजी दिवे आणि त्यांच्या सहकारी कलाकार वैशालीताई आणि त्यांच्या टीममधील सर्व गायक वादक कलाकार यांनासुद्धा हे श्रेय जाते.

जानेवारी २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात श्री अतुल दिवे यानी मला मुंबईच्या एका स्टुडिओमधून फोन करून एक अत्यंत आनंदाची बातमी सांगितली. ती म्हणजे, "लावण्य बहार" या माझ्या अल्बममधील "आज त्यो खुशीत दिसतोय गं" ही लावणी एका मराठी चित्रपटासाठी निवडली गेली असून तिचे रेकॉर्डिंगसुद्धा मुंबईच्या त्या स्टुडिओत झाले. प्रसिद्ध गायिका ज्योत्स्ना शिवा ज्योत्स्ना राजोरीया यांनी ही लावणी गायल्याचे त्यांनी सांगितले.

ती बातमी ऐकून मला खूप म्हणजे खूप आनंद झाला. त्या अनुषंगाने मी गुरुवारी १८ जानेवारी रोजी छ.संभाजीनगर येथे श्री अतुल दिवे सरांच्या स्टुडिओत जाऊन त्यांची सदिच्छा भेट घेतली. माझी लावणी ज्येष्ठ अभिनेते श्री मकरंद अनासपुरे यांनी दिग्दर्शित केलेल्या "राजकारण गेलं मिशीत" या चित्रपटात घेतल्याचे श्री अतुल दिवे सर यांनी सांगितले.

२१ एप्रिल २०२४ ची सायंकाळ मी कधीच विसरू शकणार नाही. कारण ती सायंकाळ माझ्यासाठी आणि माझ्या परिवारासाठी अमर्याद आनंद घेऊन आली होती. त्याला कारणही तसंच होतं.

ज्येष्ठ अभिनेते श्री मकरंद अनासपुरे यांनी दिग्दर्शित केलेल्या "राजकारण गेलं मिशीत"या चित्रपटाचा प्रिमियर शो त्या दिवशी छत्रपती संभाजीनगर येथील प्रोझोन मॉलच्या आयनॉक्स चित्रपटगृहात होता. मकरंद अनासपुरे यांच्यासह या चित्रपटातील इतर कलाकारांसोबत मी, माझी पत्नी सौ.निर्मला, मुलगी अंजली धानोरकर आणि जावई डॉ. अभयकुमार धानोरकर असा आम्ही सर्वांनी मिळून तो चित्रपट बघितला.

या चित्रपटात माझी लावणी आहे, हे आपणास मी सांगितलेले होतेच. चित्रपटाच्या मोठया रुपेरी पडद्यावर माझ्या लावणीचे नृत्यांगनेद्वारे सादरीकरण पाहतांना आणि श्रेयनामावली मध्ये गीतकार म्हणून माझे नाव पाहतांना डोळ्यांमध्ये आपोआप आनंदाश्रू दाटले.

त्या वेळेस ज्या भावनांनी माझ्या मनात गर्दी केली त्यांचे वर्णन शब्दांमध्ये करणे केवळ अशक्य आहे.

चित्रपट संपल्यानंतर चित्रपटाचे दिग्दर्शक मकरंद अनासपुरे आणि चित्रपटातील इतर कलाकारांसोबत फोटो सेशन करण्याचा आनंदही काही औरच होता. मित्रांनो, असा आहे माझ्या लावणीचा संस्मरणीय प्रवास.

**– उद्धव भयवाळ**
**१९, शांतीनाथ हाऊसिंग सोसायटी**
**गादिया विहार रोड, शहानूरवाडी**
**छत्रपती संभाजीनगर ४३१००९**
**मो. ८८८८९२५४८८**

■■■



# पुण्यतिथी

**श्री.विठ्ठल कदम**

दिनांक १६ ऑगस्ट रोजी निसर्गवासी जनार्दन महाराज बाबा वळवी यांची पुण्यतिथी. त्यांचे कार्य हे सातपुडयातील आदिवासी समाजासाठी लाख मोलाचे. त्यांनी आदिवासींना शिक्षणाचा प्रकाश दाखविला आणि वयाच्या एकोन्नवदाव्या वर्षी निसर्गवासी झाले. मी संस्थेच्या गोरंबा येथील आश्रमशाळेत बाबांची दुसरी पुण्यतिथी साजरी करण्यासाठी माझ्यासोबत किशोरींचे आरोग्य शिक्षण उपक्रम राबविणाऱ्या मंगेश नवेज यास घेऊन गेलो.माझ्या इंडिका गाडीतून ३५ किमी अंतर डोंगरातील घाट,वळण,नदी, नाले,कच्चा पक्का अशा रस्त्याने काही अंतर धुक्यातून तर काही अंतर बारीक मूर मूर पावसातूनच शाळेत पोहोचलो.

आश्रमशाळेतील इयत्ता १ ली ते इयत्ता १० वी पर्यंतची सर्व मुलेमूली शाळेच्या मैदानात बाबांची पुण्यतिथी साजरी करण्यासाठी वर्गनिहाय वेगवेगळे रांगेत बसलेलीच होती.समोर शिक्षक व प्रमुख पाहुण्यांसाठी खुर्च्या मांडलेल्या होत्या आणि समोर मध्यभागी एका खुर्चीवर शाल टाकून त्यावर बाबांचा फोटो पूजेसाठी ठेवला होता. सर्वाना नमस्कार झाला आणि शाळेचे अधीक्षक अशोक पटले सर यांनी आम्हाला चहा दिला आणि म्हणाले "सभापती दादा आले कि आपण कार्यक्रमाला सुरुवात करूया."चहा संपता संपता सभापती दादा आले आणि आम्ही सर्वजण खुर्च्यावर स्थानापन्न झालो नी कार्यक्रमाला सुरुवात झाली.

शाळेचे मुख्याध्यापक श्री.साळवे सरांनी आपल्या प्रस्तावनेत सांगितले कि "आज आपल्या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कै.जनार्दन पोहऱ्या वळवी यांची दुसरी पुण्यतिथी साजरी करण्यासाठी आपण एकत्र आलेलो आहोत.आपल्या सातपुडयातील आदिवासी समाजाला बाबांनी शिक्षण घेण्यास चालना दिली. आदिवासी समाजाला ज्ञानाचा सूर्य दाखविला असे हे बाबा बाबासाहेब आंबेडकर यांचेच वारसदारच आहेत, त्यांची आज दुसरी पुण्यतिथी आहे तरी आलेल्या मान्यवरांनी व शिक्षक कर्मचाऱ्यांनी बाबांच्या प्रतिमेचे पूजन करावे."

मा.कालूसिंग पाडवी सभापती पंचायत समिती धडगाव यांचे शुभ हस्ते बाबांच्या प्रतिमेचे पूजन झाले नंतर सर्वांनी पूजन करून प्रतिमेला नमस्कार करून स्वर्गीय बाबांचा आशीर्वाद घेतला. आणि सूत्रसंचालक श्री. एस. सी. पाटील सर वरती आकाशाकडे बोट करीत बोलले, "आज आपणास बाबा स्वर्गातून उंच आकाशातून बघत असतील आणि म्हणत असतील माझ्या गोरंबा आश्रमशाळेतील मुले कशी असतील? ते अभ्यास करतात कि नाही?" तसे सर्व मुलामुलीनी एकदम वरती आकाशाकडे बघितले तसे सर्वांच्याच चेहऱ्यावर हास्य पसरले त्या सर्व बालकांच्या डोळ्यात चमक आली, चेहरा उजळला आणि जणू खरोखरच त्यांच्या समोर बाबाच प्रकट झाल्यासारखे चैतन्य सर्वत्र पसरले. त्यांनी प्रतिमेचे पूजन झाले असे जाहीर करून आज कार्यक्रमासाठी आलेले प्रमुख पाहुणे श्री. विठ्ठल कदम भाऊसाहेब ज्यांना बाबांचा खूपच जवळचा सहवास लाभला ते आपणास मार्गदर्शन करतील असे सांगितले आणि मी बोलायला उभा राहिलो.

"आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. कालूसिंगदादा पाडवी सभापती पंचायत समिती धडगाव,शाळेचे मुख्याध्यापक श्री.साळवे सर,मुख्याध्यापक श्री. पाटील सर, शिक्षक व कर्मचारी वृंद आणि बालकांनो! आज आपण परम पूजनीय कैलासवासी जनार्दन पोहऱ्या वळवी माजी आमदार,संस्थापक अध्यक्ष आदिवासी सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळ धडगाव यांना आपण बाबा म्हणून ओळखतो; त्यांची दुसरी पुण्यतिथी

साजरी करण्यासाठी एकत्र आलेलो आहोत." पुढे बोलत असतानाच मला पाटील सरांनी आकाशाकडे हात करून म्हणाले होते बाबा बघत असतील हे मला आठवले आणि मी त्यांच्या आठवणीने डोळे पाणावले आणि आवाज दाटून आला. त्याच भारलेल्या आवाजात पाऊणतास बाबांच्या कार्याचा आढावा घेताना त्यांच्या गोष्टी सांगितल्या. सातपुडयाच्या दक्षिणेला तापी तर उत्तरेला नर्मदा या पश्चिम वाहिन्या नद्या वहात आहेत आणि याच सातपुडयात आदिवासी समाज पसरलेला आहे. या दोन्हीही नद्यांच्या पाण्याचा त्याला आतापर्यंत कधीही काहीच उपयोग झाला

नाही म्हणून जनार्दन महाराजांनी आदिवासी समाजासाठी मोलगी, रायसिंगपूर, डणेल,मांडवा,माकडकुंड,सुरवाणी, राजबर्डी, बिलगाव, गोरांबा येथे आश्रमशाळा, धडगाव कन्साई येथे माध्यमिक शाळा, धडगाव मध्ये उच्च शिक्षणसाठी महाविद्यालय, राहण्यासाठी धडगाव, सिसा ,मुंदलवड,कन्साई येथे छात्रालय सुरु करून शिक्षणाची नदी – गंगाच आणली. आणि सातपुड्यातील आदिवासी त्यात न्हाऊन निघाला. असे त्यांच्या ईश्वरी कार्याचा गौरव करून समोरच्या बालकांना आवाहन केले कि आपण पुढे शिक्षण घेऊन कुठेही जा पण बाबांच्या गुणांचा एक टक्का तरी अनुकरण करा म्हणजे बाबांच्या




स्वप्नातील समृद्ध आदिवासी समाज निर्माण होईल यासाठी आपणस सर्वाना शुभेच्छा देतो; मला शाळेने योग्य मान देऊन विषय मांडण्याची संधी दिल्याबद्दल त्यांचे आभार माणून माझे भाषण संपवितो. प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बी. आर. पाटील सर यांनी आलेल्या मान्यवरांचे आभार मानून कार्यक्रम संपला असे जाहीर केले. यावेळी दुपारचे दीड वाजले होते. परत एकदा चहा झाला मी परत सर्वांना नमस्कार करून निरोप घेतला आणि मंगेश सोबत धडगावकडे निघालो. एव्हाना पाऊस थांबून कडक ऊन पडले होते.

सकाळी जाताना पोह्याचा नाष्टा केलेला होता. मला दुपारी साडेबाराच्या नंतर भयंकर जोराची भुक लागते. मग त्यावेळी मला काहीच सुचत नाही आणि भाषण पाऊणतास, येताना चहा यामुळे पित्त चांगलेच वाढले होते.खरवड घाट उतरल्यानंतर जरा भुक शांत झाली आणि मुंगबारी फाट्याच्या पुलावरील कठडयावर माझे मित्र गुजऱ्या वळवी केंद्र प्रमुख व वीरसिंग वळवी गुरुजी हे मोटार सायकल बाजूला उभी करून गप्पा मारत उभे होते.मला वाटले यांनी जर मला बघितले तर ते मला गप्पा मारण्यासाठी थांबवतील म्हणून मी गाडीला रस्त्याच्या उजव्या बाजूने म्हणजेच रॉन्ग साईडने घेऊन अगोदरच्यापेक्षा जास्त स्पीड दिला आणि काय समोरून कालीपिली गाडी येत होती. मला दिसतेय मी चुकीच्या बाजूने जात आहे. कालीपिलीतील दोन्ही बाजूच्या खिडकीतून ड्रायव्हर व प्रवासी हात बाहेर काढून ओरडू लागतात हे मला दिसत स्पष्ट दिसत होते. माझ्या शेजारीच बसलेला मंगेश ही शांतच होता तोही काहीच बोलला नाही. शेवटी कालीपिलीच्या ड्रायव्हरने त्याच्या उजव्या बाजूने म्हणजे राँग साईडला गाडी घेतली नी मला कट मारला आणि मी परत माझ्या डाव्या साईडला गाडी घेतली आणि थांबून उतरून त्या कालीपिलीकडे बघितले; तेही गाडी उभी करून माझ्याकडे हात करून ओरडत होते. माझी चूक माझ्या लक्षात आली आणि पटकन गाडीत बसून दहाच मिनिटात शांतपणे घरी पोहोचलो.नेहमी प्रमाणे घरी कोणीच नव्हते. आमच्या हातानेच सारे जेवण घेऊन बसलो. मंगेश सोबत शांतपणे जेवण करताना त्याला सहज विचारले "काय रे.. आपली गाडी राँग साईडला होती.. समोरून कालीपिली येत होती.. तुला भीती नाही वाटली का? कि आता आपण जोरात कालीपिलीवर आदळून अपघात होऊ मरलो असतो ना". तर तो नेहमीप्रमाणे फक्त हसला. जेवण करून बाजूलाच ऑफिस कामाला गेला.

मग मी शांतपणे पलंगावर पडून आराम करू लागलो. आणि मला भाषणातील जनार्दन महाराज दिसू लागले पाटील सर म्हणतात त्याप्रमाणे खरच जनार्दन महाराज बाबा आकाशातून मला बघत असतील का? त्यांनी हा अपघाताचा क्षण बघून काय सांगितले असेल आणि मला संत एकनाथ महाराजांचा प्रसंग आठवला.ते गुरूच्या आज्ञेने शुलभंजन पर्वतावरील सूर्यकुंडावर अनुष्ठान करत होते. त्या दरम्यान एक नाग त्यांना चावण्यासाठी आला होता पण त्यांची शांत, निश्चल, ध्यानस्थ, समाधी अवस्था पाहून उलट तो नागच नाथांच्या पाठीमागे उभा राहून त्यांच्या डोक्यावर स्वतःचा फना काढून सावली करून डौलत होता.

**"आम्हा डसावया आला काळ |**
**तो काळचि झाला कृपाळ ॥**
**भली ओळख जाली आता |**
**चित्त मिनलेसे अचुता ॥**
**एका जनार्दनाच्या पायी |**
**जीण्या मरण्या सौरस नाही" ॥**

**श्री.विठ्ठल कदम,**
**धडगाव जि.नंदुरबार**
**मोबा.-९३०७१४३०१६**

■■■

# विधवा स्त्रीची घालमेल

ॲड रामचंद्र बाजीराव पाचुनकर



भारतीय स्त्री म्हटलं की हृदयी अमृत,नयनीं पाणी, काय ?वर्णावी तिच्या जीवनाची कर्म कहाणी. मनु स्मृतीत सांगितल्या प्रमाणे स्त्रीला अनेक रूढी,परंपरांनी जखडून ठेवले.स्त्रीला अधिकार,हक्क नव्हतेच स्त्रीच्या नशिबी दास्यत्व होतं स्त्रीचं अस्तित्व हे दुय्यम समजत, भोगवाद,चंगळवाद,स्त्री अश्रू,करुणा,काचेचं भांड समजत.समाजाला भोगवादाचा मधुमेह झाला होता. आजही आहेच म्हणून स्त्रीची हुंड्यासाठी हत्या होते .वैष्णवी सारख्या अनेक जणी जळत आहेत,आत्महत्या करत आहेत.जग सुधारलं पण आम्ही नाही सुधारलो. स्त्री ही समाज व्यवस्थेचं ऋण आहे. सिंधुताई सकपाळ म्हणत असत बाई नाही तर काहीच नाही.स्त्री. भावना,आशा,आकांक्षा,स्वप्न पाहणारी भावना प्रधान माणूस आहे.प्रत्यक्षात ती चूल मूल अन्? घराच्या पिंजऱ्यात अडकलेली हतबल हरिणी आहे.पुरुषी रिंग मास्टरच्या चाबकाने फोडलं जाणारं सावज आहे. तेव्हां ती नक्कीच त्या विधात्याला म्हणाली असेल नकोरे हा स्त्री जन्म, विधात्याने सृष्टी निर्माण करतांना सुंदर निसर्गाचा उपभोग घेण्यासाठी सुंदर जोडप्याला पाठवलं असावं स्त्री भविष्याला आपल्या कुशीत उजवणारी गतकाळाला पदरात झुलवणारी नवीन पिढी निर्माण करून तिच्या हाती पाळण्याची दोरी,तीच जगाला उद्धारी. मग अश्या स्त्रीने विवाह करतांना "शालू हिरवा पाचूनी मढवा वेणीत पेडी घाला साजनी बाई येणार साजन माझा" किती गोड वाटत ऐकायला लग्न म्हटलं की हुरहूर अनामिक ओढ,मनाला गुदगुल्या करणाऱ्या भाव भावनांचे तरंग,दोन मनांचे,दोन कुटुंबांचे,दोन देहांचे मधूर मिलन,पवित्र बंधन,एक आनंद सोहळा,संसार सुखाचा हाच तर विश्वासाचा पाया,असतो.खरं तर लग्न ही खूप व्यापक, खोल,सर्वार्थाने एकमेकांना सुखी करण्याची भावना असते. हीच भावना समाज,रूढी,परंपरा, मनु स्मृतीने, चाकोरीबद्ध जीवनाची राख रांगोळी करून टाकली,

"विधवा मुलींच्या वाट्याला तर खूप मानसिक त्रास येतो.त्यांची सत्वपरीक्षा असते,त्रासाच्या अडचणींच्या,चक्रव्यूहा सारख्या अग्नीदिव्यातून,वासनांध, पुरुषांच्या नजरेला टाळून अपमान ,निंदा,,दूषणं पाणउतारा, अवगुणी,पांढऱ्या पायांची, अपशकुनी,नाही नाही ती दूषणं दिली जातात. एखादं लेकरू असेल तर तोच तिचा भविष्यातील आधार आशेचा किरण असतो. तो तिचा चंदा हैं तू मेरा सूरज है तू, ओ मेरे आखोंका तारा हैं तू म्हणत,दिवस ढकलत असते.असा आशेचा किरण नसेल तर दुष्काळात १३ वा महिनाच उजाडतो. काही जणी सहन न झाल्यामुळे आत्महत्याच करतात खरं तर तिचा नवरा त्याच्या अंगच्या गुणांनी दारूपायी, अपघात, एडस्? खून, मारामाऱ्या, इ मुळे तिला वैधव्यात लोटून गेला तरी, कुटुंब,समाज,सगळे दोष तिच्या माथ्यावर मारत असतो.तिला दुसरा पुनर्विवाह करायचा म्हटलं तर लेकुरवाळी आहे म्हणून,स्वीकारत नाहीत,तिची मात्र सगळीकडे तडजोड स्वीकारायची तयारी असते.पण आडमुठी पुरुष प्रधान संस्कृती ते अव्हेरत असते. तिला पतीच्या घरात स्थान नसते, आयुष्य भर ज्याच्या नावाने कुंकू लावलं त्याची विधवा म्हणूनच राहावं लागतं.

अलीकडच्या काळात,महात्मा फुले शिक्षण, हक्क,अधिकार यासाठी झटले, महर्षी कर्वे यांनी तर विधवेशी लग्न करून नवा आदर्श घालून दिला अन्? बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले हे दाखवलं. डॉ बाबासाहेबांनी, स्त्रीची व्यथा जाणली,तिला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार हक्क, पुनर्विवाह हक्क स्त्री पुरुष समानता हक्क, मालमत्तेत हक्क,पेन्शन,पोटगीचा हक्क, देऊन सर्व जाती धर्मातील स्त्रीयांना रूढी परंपरा, अंधश्रध्देच्या जोखडातून मुक्त करून जीवन सुसह्य केलं,यशस्वी,कर्तबगार,पुरुषामागे कर्तबगार स्त्रीच असते,पण भारतातील सर्व यशस्वी स्त्रियांच्या मागे एकमेव बाबासाहेब होते.त्यांनी लिखित घटनेतून योगदान दिलं.


हे सुवर्ण अक्षरांनीच लिहायला हवे कारण विधात्याने स्त्रियांच्या उद्धारासाठी विघ्नहर्ता म्हणून त्यांना पाठवलं असावं असे वाटते. समाजसुधारकांनी स्त्रियांसाठी योगदान दिल्यामुळेच स्त्रिया समाधानाचा श्वास घेऊ शकल्या तरी विधवा स्त्रीची घालमेल मात्र

चालूच आहे.

आता आपण विधवा स्त्रियांसाठी काय कायदे आहेत,पाहू या---

भारतीय विधवा स्त्री ही सासरी व माहेरी एक जादा भार समजला जातो अन्?हो बाहेर म्हणण्या इतपत मजल जाते. ती असहाय्य माणूस बनते .पूर्वी हिंदू समाजात दुष्ट, वाईट,रूढी,परंपरा होत्या.त्यामुळे पती निधनानंतर जर तिला मूलबाळ नसेल तर ती सासरी भार होऊ नये म्हणून तिला पती निधनानंतर पती बरोबरच अग्निकाष्ठ भक्षण करावे लागत होते. पूर्वीच्या काळी पतीच्या निधना नंतर पुनर्विवाह करण्याची समाजाची मानसिकताच नव्हती. खरं तर हिंदू धर्मात पुनर्विवाह करू नये असे कुठेही म्हटलेलं नाही. तरी स्त्रीला आयुष्यभर विधवेचे खडतर जीवन जगावे लागत होते.त्या





काळी सतीची प्रथा बंगाल मध्ये प्रचलित होती.त्या प्रथे विरोधात राजाराम मोहन रॉय यांनी लढा दिला. १९८७ ला सतीबंदी कायदा आला.राजस्थानच्या काही भागात रजपूत या लढवय्या समाजात पतीचे शारीरिक पावित्र्य जपण्याची जबाबदारी पतीची समजली जात असे.ही जबाबदारी इतरांवर पडायला नको म्हणून तिला पती बरोबरच जीवन संपवावे लागत होते. त्यामुळेच राजस्थानात युद्धानंतर विधवा स्त्रिया एकत्रित येऊन जोहार करत होत्या. पुढे ही सतीची प्रथा कायद्याने बंद झाली.

भारतीय हिंदू स्त्रीचा माहेर अन्? सासर या दोन घरांशी वारसाच्या दृष्टीने संबंध येतो. जन्मदात्या घरात कुलकन्या लग्नानंतर सासरच्या घरात ती कुलवधू होते.

माहेरच्या घरात कुलकन्या म्हणून मिळालेला हक्क जन्मसिद्ध असतो.२००५ नंतर कायद्यातल्या तरतुदीमुळे माहेरच्या मालमत्तेत भावा इतकाच म्हणजे समान हिस्सा दिला गेला आहे. सासरच्या घरातील वारसा हक्क मात्र पतीच्या निधनानंतर मिळतो. माहेराकडून मिळालेली मिळकत ही ती मृत्युपत्र न करताच निधन पावली तर तिच्या मुला मुलींना वारसा हक्काने मिळते. पण तिला अपत्य नसेल तर ती मिळकत वारसा हक्काने परत माहेरच्या घरी जाते.त्याचं प्रमाणे सासर कडून वारसा हक्काने मिळालेली मिळकत तिला मुलं नसतील तर ती परत सासरच्या घरी जाते.सासर माहेर ही दोन्ही घरं प्रकाशमान करणाऱ्या सौभाग्याचं लेण ल्यालेल्या हिरकणीला कायद्याने ती एखाद्या मृत मुलाची आई असेल तर तिलाही मुलाच्या मिळकतीत सून,नातवंडं यांच्या प्रमाणे तिला हिस्सा मिळतो. पण त्या मृत मुलाच्या बापाला मात्र काही मिळत नाही.

म्हणजेच कायद्याने स्त्रीला अधिक आर्थिक संरक्षण देण्याचा प्रयत्न केला गेला आहे. ही तिची जमेची बाजू असल्याचे व दिलासा दिल्याचे दिसून येते.त्यामुळेच स्त्रिया शिकल्या,पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून,समानतेच्या युगात,गॅस अन्? बॉस झाल्या आहेत,तर काही उच्चपद विभूषित सबला स्त्री तर सगळ्या कामांसाठी नोकर,चाकर ठेऊन आनंदी,स्वावलंबी,स्वतःच्या इच्छेप्रमाणे स्वच्छंदी जीवन जीवन जगत,आहेत काळानुसार कायदे बदलत आहे.आता ती मुल जन्माला घालायचं किंवा नाही,हे ठरवत आहे,बहुदा ती काळाच्या पुढे जाऊन,विचार करून,उगीच वेड्या सारखी लोकसंख्या वाढवून कश्याला जबाबदारीच्या लोढण्यात,बंधनात अडकू इच्छित नाही.असेच दिसून येत आहे. मुलींचा.जन्मदर घटलाय आहेत त्यांचा भाव वाढलाय,म्हणून विवाह इच्छुक तरुणांचा तर लिलाव होऊ लागला आहे. सोलापूर सारख्या शहरांमध्ये तर लग्नाळू तरुणांना मुलीचं मिळत नाही म्हणून मोर्चे निघत आहेत.

**ॲड रामचंद्र बाजीराव पाचुनकर**

**बावधन,पुणे.४११०२१, मो ९९२२४३०१८२**

■■■



# आईचं घर

शब्दांकन प्रकाश देशपांडे

बहुतेक महिलांचं लेखन आपलं माहेर,आई बाबा यांच्या घराविषयी भावनिक नातं यांच लेखन झाले आहे असे दिसते.मी माझ्या गेलेल्या आईचे वतीने त्यांच्या आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न करणार आहे.

माझ जन्मगाव सातारा भागातील कृष्णानदी काठचे नितांतसुंदर क्षेत्र माहुली. पेशवाईतील रामशास्त्री प्रभुणे आमच्याचगावचे. किर्तनकार आफळे, प्रभुणे, देव, गिजरे, अराणके, सामक, चावरे ही आमच्या गावची महत्वाची घरं.

आमचे घर साघं पण कौलारु नाही.वाडा एकत्र पण तीन काकांची वेगळी घर लागूनच फक्त मधे भिंत मुख्य दरवाज्यातून आत शिरल्यावर एकेक खोली व समोर डावीकडे दत्तात्रय (मास्तरांची)खोली,मधलं आमच(वामनरावांचे)घर, बाजूला केशवकाकांच घर.मध्यभागी प्रशस्त आंगण. अंगणात तुळशीवृंदावन होत.डावीकडे आडवा सोपा माझ्या लग्नापर्यंत व नंतर बरेच दिवस या सोप्यात गाय,म्हशींचा गोठा होता.चंद्री नावाची म्हैस माझी आवडती होती.काकांनी म्हणजे वडील (वामनरावांनी) मला लग्नानंतर चंद्री दिली होती आमच्या सासरी (परळी चे देशपांडे) ती पुढे बरेच दिवस होती.

आईच घर दगडी जोत व त्यावर मातीच्या विटांनी,सागवानी लाकडांनी कडिपाटने व मातीच्या,शेणाच्या गिलाव्याने सजलेले घर होतं.तीन पायऱ्या चढून गेल्या की ओसरी,माजघर,माजघरात कांडण्यासाठी ऊखळ होता शेजारी ताक घुसळण्यासाठी रवी व दोरी बांधलेली असे.एक पायरी उतरुन स्वयंपाक घर या पायरीवर मी नेहमी बसत असे.पून्हा पाच पायऱ्या उतरून गेल्यावर वरच परसं व परत खालच्या परसात उतरून गेल्यावर नदी कडेजाणारा रस्ता.परसात सदोदित बहरलेल कण्हेरीचे झाड,बाजूला शेवग्याचे झाड होते.आमच्या घरी जेवणात आमटीत शेवगा हमखास असे.

. तीनही भावांची घर एक सारखीच फक्त केशव काकांचे घरी झोपाळा होता.आम्ही तीन बहिणी व एक भाऊ केशव काकांची नलू झोपाळ्यावर धिंगाणा घालत असू वरच्या कडिपाटाला पाय लागेपर्यंत उंच झोके घ्यायचे व शाळेतल्या कविता,गाणी म्हणायची.

डावीकडच मास्तरांच घर .मास्तरांना दोन मुले व एक मुलगी काकू लवकर गेल्यामुळे त्यांची मुले स्वावलंबी व लवकर नोकरी धंद्याला लागली.

थोरला वासूदेव(दादा)सातारा रोडला कुपर कारखान्यात कामाला लागला होता.माहुली ते कुपर कारखाना तो भल्या पहाटेच स्वत स्वयंपाक करून सायकल वर कामाला जात असे.धाकटा




आप्पा सरकारी नोकरीत होता.वाड्यात एकेकाची लग्न होतांना आमची गडबड गोंधळ घातला,किंवा नदी वर मनसोक्त डुंबून आलो म्हणुन आईची रागावण्याची,माराची भिती होतीच.तीनही घरात ओसरीवर भिंत नव्हती.लग्नाच्या पंक्ती या ओसरीवर उठत असत.

वैशाख महिन्यात नृसिंहजयंतीचे वेळेस भटजींना पायधुणे व पुजेचा मान आंब्याची डाळ, पन्ह देवघर माजघरात तर जेवणाचा मान याच ओसरीवर मिळत असे.चैत्रमहिन्यात आमचे अजून आकर्षण होते चैत्रगौरीचे हळदीकुंकू गावातील सामकांच्या घरची चैत्र गौर अजूनही माझ्या लक्षात आहे.छानशी,साडी नेसवलेली खूप सजावट असणारी सामकांची चैत्रगौर प्रसिद्ध असे.

अशीच देखणी गौर बाळु काका देव (मठ) यांची असे

त्याच दरम्यान येणारा आमचा लाडका ,जीवाभावाचा कृष्णाबाई चा उत्सव यात घर माहेरवाशिणींनी पाव्हण्यांनी गजबजू जात असे. या उत्सवात किर्तन करणारे किर्तनकार बुवा आमच्या घरी नृसिंह जयंतीच्या पारण्याच्या दिवशी हमखास जेवायला येत.जेवणाचा बेत हमखास आमरस असे.आमचे नेहमीचे भटजींना (गोपाळ बुवा) जेवणाचे आमंत्रण असे ते पैज लावून मोठ पातेलभर आमरस सहज खात असत.संध्याकाळी गावातील महिलांना हळदीकुंकू समारंभाचे आमंत्रण असे.पुरुषांना पन्हं पीण्याचे आमंत्रण असे.

आंब्यांची डाळ,पन्ह,दवणा,अत्तर,गुलाब,उदबत्ती यांनी सर्व वाडा दरवळून जात असे.सर्व घर वेगवेगळ्या वासांनी,घमघमटाने गजबजून जात असे.

उत्सवासाठी आलेल्या किर्तनकार बुवांचा मुक्काम आमच्या घरी असे रात्री किर्तनकार घाटावर किर्तनासाठी जाण्यासाठी तयार होऊन बसत.मग उत्सव मंडळाचे कार्यकर्ते,गावची गुरव मंडळी शिंग घेऊन येत व शिंग वाजवत घाटावर मानाने नेत.तेव्हा गावात लाईट आलेले नव्हते गॅसबत्तीच्या उजेडात नेले जात असे.

किर्तन वरुन आठवलं !

आमच्या घरात सुध्दा किर्तन कार होते.माझा थोरला भाऊ

आण्णा ( दामुअण्णा) माहुलीतील प्रसिद्ध काळाराम मंदिरात रामनवमी उत्सवात रामजन्माचे किर्तन करत असे.

माहुली मधील दुसरं प्रसिद्ध देऊळ गोराराम

यात रामनवमी चे आफळे यांची किर्तन होत असे.

आजही घराची आठवण झाली की ते सगळं चित्र डोळ्यासमोर येतं मन भूतकाळात हरवून जातं.त्या घराची आठवण मनाला अनेक वर्ष मागं घेऊन जाते.

आठवणी शीला देशपांडे,

**शब्दांकन प्रकाश देशपांडे**
**मानसी ई बिल्डिंग फ्लॅट नंबर ५,**
**जनसेवा बॅक लेन, बिबवेवाडी, पुणे ४११०३७**
**मोबाईल फोन९४२०८६००३०**

■■■


ग्रामपंचायत लवळे
कै.निलेश भाऊ गावडे
माजी सरपंच
श्री. नाथासाहेब राऊत
मा. सरपंच
आनंदाचे गाणे गात दिवाळी येते अंगणात,
सुखाची मग होते बरसात तेजाची मिळते साथ.
हि दिवाळी आनंदाची, सुखसमृध्दीची जावो’
सर्व नागरिकांना दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
श्री. रंजीत राऊत
सरपंच
श्री.शिवराम सातव
उपसरपंच
श्री.विठ्ठल.दे.साकोरे
ग्रामपंचायत अधिकारी
-: विद्यमान सदस्य :-
श्री. संजय सातव
मा. सरपंच
श्री.बाळासाहेब राऊत
ग्रा.पं.सदस्य
श्री.अजित चांदिलकर
ग्रा.पं.सदस्य
श्री.राहुल खरात
ग्रा.पं.सदस्य
सौ.नर्मदा.बा.टकले
ग्रा.पं.सदस्या
सौ.सुजाता.द. मोरे
मा.उपसरपंच/ग्रा.पं.सदस्या
सौ.किमया.ग.गावडे
ग्रा.पं.सदस्या
सौ.सारिका.पो.कळमकर
ग्रा.पं.सदस्या
सौ.वर्षा.ऋ.राऊत
ग्रा.पं.सदस्या
श्रीमती.राणी.रा.केदारी
ग्रा.पं.सदस्या
सौ.साधना.म.सातव
ग्रा.पं.सदस्या
सौ.सायली.अ.सातव
ग्रा.पं.सदस्या
समस्त लवळे ग्रामस्थ मंडळी आणि ग्रामपंचायत कर्मचारी



नवी स्वप्ने नवी क्षितिजे, घेउन येवो ही दिवाळी,
ध्येयार्पण प्रयत्नांना, दिव्य यशाची मिळो झळाळी,
आयुष्यात सोनेरी क्षण घेऊन येवो, ही दिवाळी...
शुभ दिपावली
श्री.अशोक आप्पासाहेब साठे
( उद्योजक )
॥श्री॥
शक्ती वजन काटा
CAPACITY 100 TONES
(10Kg.Accu.)
16 METER COMPUTERISE
TRAILER BRIDGE
शुभ दिपावली
शुभ दिपावली
२४ तास सेवा
उपलब्ध असलेला...
पत्ताः-सर्व्हे नं.१८९,राजीव गांधी माहिती-तंत्रज्ञान उद्यान टप्पा क्रं.३,
एम.आय.डी.सी.ऑफीस समोर,माण,ता.मुळशी,जि.पुणे-४११०५७
संपर्क-9511666768



लक्ष लक्ष दिव्यांनी उजळू दे आकाश,
होऊ दे दुष्ट शक्तींचा विनाश, मिळो
सर्वांना प्रगतीच्या पाऊल वाटेचा
प्रकाश, असा साजरा होवो
आपला सर्वांचा दिवाळी सण खास
शुभ
दिवाळी
निमित्त आपणास
व आपल्या परिवारास
हार्दिक शुभेच्छा!
सौ.निकिताताई रमेश सणस
मा.सरपंच : ग्रामपंचायत भुगांव
श्री. रमेश नाना सणस



हर्षदा कन्स्ट्रक्शन
सर्व नागरिकांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा !
शुभ दीपावली
मा.श्री.बाबाजी कुंभार
सरचिटणीस कॉन्टॅक्टर संघटना पुणे जिल्हा
अध्यक्ष कुंभार समाजो न्नती मंडळ पुणे जिल्हा
शुभेच्छुक,
सिव्हील इंजिनिअर अँड कॉन्ट्रॅक्टर
मु.पो.मारुंजी.ता.मुळशी,जि.पुणे
बांधकाम क्षेत्रातील सर्व प्राकरची कामे करून मिळतील
."आनंदाचे गाणे गात दिवाळी येते अंगणात,
सुखाची मग होते बरसात तेजाची मिळते साथ.
हि दिवाळी आनंदाची, सुखसमृध्दीची जावो"
सर्व नागरिकांना..
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
श्री.अविनाश बलकवडे
युवा सेना विभाग सचिव,पश्चिम महाराष्ट्र
शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे
संपर्कः-युवा सेना संपर्क कार्यालय,हॉटेल दिपक शेजारी,मु.पो.पौड,ता.मुळशी,जि.पुणे.मोबा-९५५२५९६२०२,८३०८५०११११



चला आज पुन्हा एकदा दीप लावूया, रुसलेल्यांना मनवूया,
डोळ्यातील उदासी दूर करून, जखमांवर फुंकर घालूया.
चला दिवाळीच्या शुभेच्छा देऊया..!!
शुभ दीपावली
मा.श्री.रामचंद्र ठोंबरे
मा.संचालक: पुणे जिल्हा सहकारी दूध उत्पादन संघ,कात्रज.
मा.संचालक: पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या.पुणे.
मा.संचालक: श्री.संत तुकाराम सहकारी साखर कारखाना लि.
संस्थापक चेअरमन: श्रीराम विविध कार्यकारी सेवा सोसायटी जा.
सर्व नागरिकांना दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा !
श्री.लक्ष्मण(आप्पा) ठोंबरे
शुभेच्छुक,
श्री.योगेश.ल.ठोंबरे
संस्थापक : सह्याद्री तरुण मंडळ,जामगाव
मा.सदस्य : ग्रुप ग्रामपंचायत जामगाव-दिसली
उपाध्यक्ष : पुणे जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेस
मा.उपसरपंच : ग्रुप ग्रामपंचायत जामगाव-दिसली
पत्ता:-रामलिला,मु.जामगाव,पो.शेरे,ता.मुळशी,जि.पुणे



."स्नेहाचा सुगंध दरवळला, आनंदाचा सण आला.
विनंती आमची परमेश्वराला,सौख्य, समृध्दी लाभो तुम्हाला.
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
सर्व नागरिकांना..
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
श्री.दगडुकाका करंजावणे
मा.उपसरपंच-भुगाव,ता.मुळशी, जि.पुणे
उपसभापती-कृषी उत्पन्न बाजार समिती ता.मुळशी




."आनंदाचे गाणे गात दिवाळी येते अंगणात,
सुखाची मग होते बरसात तेजाची मिळते साथ.
हि दिवाळी आनंदाची, सुखसमृध्दीची जावो"
शिवसेना
सर्व नागरिकांना..
शुभ दीपावली
श्री.प्रकाश किसनराव भेगडे
शिवसेना पुणे जिल्हाप्रमुख , मा.तालुका प्रमुख,मुळशी
मा.सरपंच ग्रा.पं.घोटावडे, मा.चेअरमन घोटावडे
शुभेच्छुक,
राजयोग उद्योग समुह


अमराळे
ASCO PROPERTIES
शुभ दिपावली
आपणांस हि दीपावली सुख-समृद्धीची,
भरभराटीची आनंदाची अन् आरोग्यमय जावो
हिच ईश्वरचरणी प्रार्थना...
आपणांस व आपल्या परिवारास
मंगलमय शुभेच्छा !
सचिन सुभाष अमराळे
उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, पुणे जिल्हा


शुभदीपावली...
निमित्त आपणांस व आपल्या
परिवारास हार्दिक शुभेच्छा..!!
श्री. गणेश जयवंत वरपे
अध्यक्ष : खडकवासला मतदार संघ पश्चिम मंडल
सौ. अल्पना गणेश वरपे
मा. नगरसेविका, पुणे म.न.पा.



दिवाळीचे दिवे नुसता प्रकाश देत नाहीत..
आपल्या जगण्याला एक नवे आकाश देतात..
आपणा सर्वांना..
शुभ दिपावली
शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे
सचिन अनंत खैरे
शिवसेना तालुकाप्रमुख, मुळशी




सर्व नागरिकांना..
दिवाळीच्या
हार्दिक शुभेच्छा
."आनंदाचे गाणे गात दिवाळी येते अंगणात,
सुखाची मग होते बरसात तेजाची मिळते साथ.
हि दिवाळी आनंदाची, सुखसमृध्दीची जावो"
श्री. अमित यशवंत जोरी
सिव्हील इंजिनिअर अँड कॉन्ट्रॅक्टर
मोबा.- ९८२३१५००२५
बांधकाम क्षेत्रातील सर्व प्राकरची कामे करून मिळतील



# देह-देश आणि देव

**आनंद देशमुख**

**देह मंदिर चित्त मंदिर एक तेथे प्रार्थना |**
**सत्य सुंदर मंगलाची नित्य हो आराधना ॥**

वसंत बापटांच्या या ओळी आपल्या देहाचे यथोचित वर्णन करतात. आपला देह हा मंदिर आणि त्यात आत्मा परमेश्वर. या मंदिरात नेहमीच सत्य-सुंदर-मंगलाची आराधना व्हायला हवी.प्रत्येक आत्म्याने ठरवले पाहिजे, सूर व्हायचे, असूर नाही. ज्यावेळी माणूस पृथ्वीवर अवतरतो तेव्हा असतो एक कोरा कॅनव्हास.जो आपला आपणच चितारायचा असतो.त्या चित्रात देहासोबत देव असावा तसा देशही असावा.स्वातंत्र्यावीर सावरकर म्हणतात, देहाकडून देवाकडे जातांना देश लागतो. तसा सर्वच महापुरुषांनी देहापेक्षा देवाचा आणि देशाचा विचार दिला आहे.

**नमो जन्मभूमी जिथे जन्मलो मी**
**नमो आर्यभूमी जिथे वाढलो मी**
**नमो पूण्यभूमी जियेच्याच कामी**
**पडो देह माझा सदा ती नमो मी**

हा विचार आपल्याही देहात भिनायला हवा.देशाचा विचार घेऊन देह झिजायला लागला की,तो देव होऊन जातो. एकदा एक म्हातारा टिळकांकडे आला.अचानक टिळकांच्या पायावर डोकं ठेवू लागला. टिळक लगबगीने उठले."बाबा, हे काय करताय ? "

म्हातारा म्हणाला," माझं खूप वय झालं. खूप दिवसांपासून तुमचं नाव ऐकतोय. तुम्हाला भेटावं असं वाटलं पण जेव्हा जेव्हा तुमच्याकडे आलो तुम्ही तुरुंगातच होता.आज देवाच्या कामाला निघालो होतो,पंढरपूरला. म्हटलं जाऊन पहावं.तुमचं दर्शन झालं तर झालं.विठुराया पावला आणि तुमचं दर्शन झालं."

चहापान झालं, गप्पा झाल्या. म्हातारा धन्य झाला. मध्येच विचारले," तुम्हाला या वयात हे सारं जमतं कसं ? हा तुरुंगवास, या यातना ?"

टिळक हसत म्हणाले, "बाबा, तुम्हीही या वयात पंढरपूरला पायी जाताच ना ? पंढरपूरचा विठोबा हा जसा आपला देव तसा हा देशसुद्धा आपला देवच ना ? "



म्हाताऱ्याचे डोळे अश्रूंनी चिंब झाले. आज साक्षात विठोबाचं दर्शन टिळकात झालं होतं.टिळक धार्मिकही होते.देशसेवा करायची असेल तर मजबूत देहसुद्धा हवा अशा विचारांचे होते. देह,देश आणि देवाच्या विचारांचा त्यांच्या ठायी त्रिवेणी संगम होता. थोड्याफार फरकाने का असेना तो समन्वय आपल्यातही असायलाच हवा.

पण घडतंय मात्र वेगळंच.देवाकडे जाणाऱ्या रस्त्यावरुन देशाला टाळून जाण्याचा प्रयत्न आज काहीवेळा दिसून येतो.मंदिर–मशीद वाद तसा जुनाच झालाय पण वादाचा रंग मात्र आजही पक्का खात्रीलायक आहे. देशाचे भान सुटत आहे. कोणताही सुवर्णमध्य सहसा निघत नाही. खरं ते माझं नव्हे तर माझं तेच खरं हा अट्टाहास सुरु आहे. ज्या देवासाठी ही लढाई लढली जात आहे त्या देवाला तरी अशा लढाया आवडतील काय ? देवाचा विचार व्हावा,भक्ती व्हावी यात वावगे काहीच नाही पण असे करताना देश दुर्लक्षिला जावा हे योग्य नाहीच. आपल्या स्वार्थासाठी, वाजवी–अवाजवी मागण्यांसाठी आपण रस्त्यावर उतरतो. संप पुकारतो. रस्तारोको करतो.जमावाचं मानसशास्त्र वेगळं असतं. प्रसंगी दगडफेक होते, दंगली होतात.निरपराधांचे बळी जातात. राष्ट्रीय मालमत्तेचं प्रचंड नुकसान होतं.अमूल्य वेळेचा अपव्यय होतो.आपल्या वाजवी–अवाजवी मागण्या मग मान्य होतातही.आपण धन्य होतो.शासकही धन्य धन्य होतात. मध्ये मात्र माणुसकीचा मुडदा पडतो.आपल्याला आपलीच फिकीर असते.देशासाठी तन–मन–धन अर्पण करणाऱ्या शहिदांच्या स्वप्नांचा विचार आपल्या मनाला शिवत नाही.

धार्मिक स्थळांत पैशांचा अक्षरशः पाऊस पडतोय.याउलट गरजू मात्र वंचीतच आहे.देशकार्यासाठी,समाजकार्यासाठी असेच औदार्य सहसा दिसून येत नाही. जनसेवा हीच ईश्वरसेवा हे संतांचे ब्रीद विसरायचे आणि नुसत्याच त्यांच्या प्रतिमा डोक्यावर मिरवायच्या याला अर्थ नाही.

**श्रद्धा–अंधश्रद्धांचा सुटत नाही गुंता**
**श्रीमंत झाली देवस्थानं ,गरीब झाली जनता**

अशी काहीशी गत झाली आहे.आजिवन ज्यांनी अंधश्रद्धेविरुद्ध लढा पुकारला त्या दाभोलकरांची हत्याा होते.ज्यांच्या मारेकऱ्यांचा तपास पूँचेटद्वारे सुद्धा केला जातो यापेक्षा मोठा विरोधाभास तो कोणता?शहीदांनी देशासाठी देवाला म्हटले, देवा मला माफ कर,माझ्या मातृभूमीच्या सेवेतून तुझ्या सेवेसाठी वेळ नाही काढता येत. आपले खरे नायक तेच.पण दुर्दैवाने आज आपले नायक अभिनेते आणि क्रिकेटरच आहेत.शहीद भगतसिंगांचेविचार अंगावर रोमांच उभे करतात.

**मेरे जज्बातोंसे इस कदर वाकिफ है मेरी कलम**
**मै इश्क भी लिखना चाहूँ ,तो इन्कलाब लिखा जाता है |**

शहिदांच्या जीवनातील एक अंश जरी आपल्या जीवनात आला तरी आपल्या जीवनात तेजस्विता येऊन जाईल. देह चंदनाचा होईल आणि नेत्र होतील यज्ञधुनी.प्रत्येक वेळा देशाने,समाजाने माझ्यासाठी काय केले ? असे रडगाणे गात बसण्यापेक्षा मी देशासाठी काय करु शकतो याचे चिंतन व्हावे. मग ते अल्प–स्वल्प का असेना,सकारात्मक असावे. नकारात्मक नको.देह–देश–देव यांच्याकडे समान दृष्टीने पाहता आले पाहिजे. एकाला खूष करण्यासाठी दुसऱ्याची प्रतारणा नको.ज्या धर्माला ग्लानी आल्यावर प्रत्यक्ष भगवंताला जन्म घ्यावा लागतो तो राष्ट्रधर्म हाच सर्वश्रेष्ठ धर्म होय.आणि जो धर्म देवाला मान्य आहे तो देहालाही मान्य असलाच पाहिजे? जयहिंद.....!

जय भारत......! ??

**आनंद देशमुख**
**९१,दंडवतेनगर,शिरपूर, जि.धुळे ४२५४०५**
**(९८६०६३०२३०)**

■■■



# चला झिम्माड होऊ

**सौ.भारती सावंत**

**श्रावणमास आला सयांनो**
**चला मिळूनी नाचू गाऊ**
**फांद्यावरती झोके घेऊ**
**माहेराच्या गावी जाऊ**

खरंच!श्रावण आला की मन कसं प्रफुल्लित होतं.सकाळचा चहा पीत खिडकीजवळ उभे राहिले की श्रावणसरी खिडकीतूनही थेंबांचे सिंचन करतात. सकाळचा थंडगार वारा अंगावर शहारा फुलवतो नि मन प्रसन्न होऊन उठते. निसर्गही हिरवाईने फुललेला असतो. वसुंधरा हिरव्या रंगाचा मखमाली गालीचा ओढून नवपरिणीत वधुप्रमाणे सजलीय असे वाटते. झाडेवेली,वृक्ष, लतिका हिरव्या पानांनी चकाकलेल्या दिसतात. नवीनच पालवी फुटलेली रोपे पोपटा प्रमाणे भासतात. मधूनच कोकिळेची सुरेल तान आनंदाला द्विगुणित करते. डोंगर, टेकड्या हिरवळीमुळे शोभायमान दिसतात. काळेनिळे ढग दाटल्यामुळे आभाळ जरी बरसून गेले तरी एक जोरात सर आली की पुन्हा निरभ्र होते. भास्कर जणू आकाश निरभ्र होण्याची प्रतिक्षा करत असतो. निळ्या आकाशात सोनेरी किरणांनी चमकवत रुपेरी लकाकी चढवितो आणि ते टपोरी दवबिंदू हिऱ्या प्रमाणे चमकतात.किती मनोहारी दृश्य! डोळ्यांचे पारणे फिटावे असा हा श्रावणातील निसर्ग! सजीव सृष्टीसाठी जसे वरदानच आहे.

पांढऱ्या पंखांची बलाकमाला आकाशात झेपावताना दिसणारे विहंगम दृश्य नयनरम्य वाटते. दूरवरच्या रानां मधून म्याओचा टाहो फोडत मोर जेव्हा सप्तरंगी पिसारा फुलवत नृत्य करू लागतो तेव्हा वाटते स्वर्गही याहूनी निराळा नसेल ना! खरोखर, विधात्याने निर्मिलेला हा निसर्ग श्रावणात निरखून पहावा. आबालवृद्धांना घराबाहेर पडून अशी ही मनोहारी सौंदर्यदृष्टी पाहण्याचा मोह होणार नाही हेच नवल! दऱ्याखोऱ्यातून दुधाळ फेसाळणारे झरे नि उंचावरून पडणारा पाण्याचा लोट.अहाहा! असे वाटते तिथून हलूच नये. अरसिक मनालाही काव्यस्फूर्ति व्हावी असा हा श्रावण सर्वांनाच खूप आवडतो. चित्रकार, कवी, कवयित्री आणि छायाचित्रकार यांनातरी श्रावणात या सौंदर्यदृष्टीची मेजवानीच असते. आनंदाने किलबिल



करणारे पक्षी जणू हे सूचित करतात की बेधुंद जगा आणि आम्हालाही जगू द्या.

**नका ठेवू पिंजऱ्यात आम्हां**
**जगू द्या स्वैर स्वच्छंद जीवन**
**निसर्गच आमचा असे सखा**
**घरकुल आम्हां हेच रान वन**

पशुदेखील आनंदाने भावविभोर होताना दिसतात. आपल्या जोडीदाराला ते साद घालत असतात. पर्जन्यधारांत भिजलेली पाडसे,मनमौजी हुंदडत असतात. सर्वांसाठी श्रावण म्हणजे आनंदाचीच पर्वणी. कुणी खाण्याचा तर कुणी फिरण्याचा आनंद लूटत जीवनाचाही आनंद व्यक्त करत असतो.रिमझिम सरींना अंगावर घेत पावसाची गाणी गात गोल गोल गिरक्या घेताना दिसतात. मुली वडाच्या झाडाला उंच–उंच झुलत राहतात.श्रावणमास म्हणजे व्रतवैकल्ये आणि सणसोहळ्यांची पर्वणीच! नागपंचमी, बेंदूर, रक्षाबंधन,नारळी पौर्णिमा,कृष्णजन्माष्टमी अशा अनेक सणांची परंपरा सांगणारा हा मास गोडधोड आवडणाऱ्या खवय्यांसाठी चंगळच. विविध पक्वान्नांची रेलचेल असतेच. परंतु पावसात भिजून आल्यावर भजी, वडापाव आणि चहा पिण्याची मजा काही औरच! मक्याचे भाजलेले कणीस खात, श्रावणसरी अंगावर घेत, कुडकुडत फिरणारी प्रेमी युगुले पावसाची पुरेपूर अनुभूती घेताना दिसतात.

लोकांना अनेक ग्रंथांचे पठण करण्याचा हा मास.देवपूजा नि व्रतांची सांगता करत हा महिना पवित्र मास म्हणून साजरा केला जातो. नागपंचमीला सासुरवाशिणी मुराळी येऊन माहेराला घेऊन जाईल म्हणून वाट पाहतात. माहेरी गेल्यावर रोज पंचमीची गाणी म्हणत फेर धरतात. तसेच फुगडी, झिम्मा आणि विविध खेळांना ऊत येतो. रक्षाबंधनाला बहिणी बंधूराजाच्या हातात राखी बांधून संरक्षणाची जबाबदारी सोपवतात. भावाच्या आवडीचे पक्वान्न बनवून त्याच्याकडून घसघशीत ओवाळणी वसूल करण्याची मजा लुटतात. नारळी पौर्णिमा हा सण कोळी बांधवांसाठी जास्त महत्वाचा. त्यांचा चरितार्थ पूर्णतः सागरावर अवलंबून असल्याने नारळी पौर्णिमेला सागराला हळदीकुंकू नि नारळ वाहिला जातो. "तुझ्या भरोशावर नाव सोडून वल्ही मारतोय दर्याराजा, आमचे रक्षण कर" असे सागराला आवाहन करतात. तेव्हापासून त्यांच्या मासेमारीचा प्रारंभ होतो.

**दह्यादुधाची लावू हंडी**
**आला मथुरेचा कान्हा**

मारुनी खडा घड्यांवरी फुटती यशोदेला प्रेम जन्मदिन दहीहंडी बांधून मोठया जल्लोषात साजरा केला जातो आयोजकांकडून जास्त जाते परंतु तरुण मुली मुले पावसात हंडी फोडण्याचा आनंद लुटतात याच दरम्यान १५ ऑगस्टला भारताला स्वातंत्र्य मिळाले त्यामुळे तोही दिवस आनंदाने साजरा केला जातो. देशावर असणारे प्रेम व्यक्त करण्यासाठी दिवसभर देशभक्तीपर गाणी ऐकली गायली जातात आणि स्वातंत्र्योत्सव साजरा केला जातो. स्वातंत्र्याचे महत्व प्रतिपादले जाते. जनगणमन हे रवींद्रनाथ टागोर यांनी लिहिलेले राष्ट्रगीत प्रसारित होत राहते. काही ठिकाणी लता मंगेशकर दीदींच्या सुमधुर स्वरातील जनगणमन हे राष्ट्रगीत रेकॉर्डवर ऐकवले जाते. सर्व मुलांना आणि उपस्थितांना चॉकलेट्स वाटले जातात आणि या सुंदर अशा सोहळ्याची सांगता होते. निसर्गसौंदर्याने नटलेला हा ऋतू सर्वांनाच वेड लावणारा आहे. वरूणाची कृपा झाल्याने जगाचा पोशिंदा, बळीराजा सुखावलेला असतो. पेरणी करून तरू चांगलेच फोफावल्याने तोही आपला आनंद साजरा करत असतो. मनातल्या मनात मालाला चांगला भाव येईल याचे गणित मांडत असतो. असा हा ऋतू चराचराला आनंद देणारा मनसोक्त जगायला शिकवणारा तसेच दुनियेचे ज्ञान मिळवून देणारा, मनभावन असा लहान थोर स्त्रिया पुरुष सर्वांचाच आवडता आहे.

**सौ.भारती सावंत**
**९०१/ महाप्रज्ञा हाईटस्?,प्लॉट ४९,**
**सेक्टर २०, खारघर, नवी मुंबई ४१०२१०.**

■■■

# हुंदका

सौ.भारती सावंत

**आपली गुड्डी आता बरीचशी मोठी दिसते! तिला आठवण वगैरे येत नाही..कारण आम्ही तिची खूप काळजी घेतो..“दिदी तेरा देवर दिवाना“ ह्या गाण्यावर ती चांगली हातपाय हालविते आणि तोंडाने तोतरे बोल काढून नाचायला लागल्यावरसाऱ्यांच्या कौतुकाचा विषय बनते ! आम्ही सर्वजण म्हणजे मी, गुड्डी आणि हे होळीला बैतुलला येणार आहोत. तुम्हीही या. भेट तिथेच होईल.**

**आपलीच**
**अलका.**


नारायणची ही मागील १५ मिनिटांपासून पत्र वाचायची तिसरी वेळ होती. त्यानं चौथ्यांदा वाचायला सुरुवात केली, तर बाहेर कसलासा आवाज आला. दोन पोरं कंपाऊंडच्या आतल्या ताराचा बंडल काठीने ओढत होते .त्याने दरवाज्यात ठेवलेलीकाठी संपूर्ण ताकतीने त्या पोट्ट्यांच्या दिशेने भिरकावली.पोरं तार टाकून पळाली.

आता त्याचं मन मात्र पत्रात लागत नव्हतं. कारण तो नुकत्याच गेलेल्या पॅसेंजर गाडीने येणाऱ्या शंकरची वाट पाहत होता. तो मागच्या आठवड्यात, जो गेला तो अजूनही आला नव्हता. आणि आजच्या पॅसेंजरने येतो असं त्यांना सांगितलं होतं.परवाची होळी असल्यामुळे आजच जब्बार सुद्धा उद्या येतो. म्हणून त्या आत्ताच्या पॅसेंजरने गेला होता . पण शंकर परतलानव्हता .तो आलाच नाही.

रेल्वे खात्यात नारायण ठेकेदारीत काम करायचा. शंकर ,जब्बारही त्याचे सहकारी होते. ब्रॉड गेजचं काम सुरू असल्यानेलाखो रुपयांच सामान शेडमध्ये नि शेडच्या कंपाउंड मध्ये पडलेलं होतं ..त्याची राखण करण्यासाठी सेक्युरिटी म्हणून तीनशिफ्ट मध्ये तिघं काम करत होते आणि एक जास्तीचा होता. शंकर मात्र मागच्या आठवड्यात गेला तो अजून उगवलाच नव्हता.त्यामुळे शंकरची डयुटी नारायण ,जब्बार आळीपाळीने करीत होते.

हे इतकं महागडे सामान आपण दोन–दोन, तीन तीन दिवटया लागोपाठ करून राखायचं म्हणजे जिकरीचं काम आहे . थोडसं झोपतो म्हटलं तरी बाजूच्या झोपडपट्टीतील पोट्टे काही ना काही पळवायला तयारच असायचे! त्यामुळे नारायण जराचिडला होता .त्यातल्या त्यात हे पत्र वाचून त्याला कधी गावाला जातो आणि कधी नाही ! असं वाटत होतं.

पण शंकर यायला हवा.. शंकर तर गोंड आहे! त्यांच्यामध्ये होळी आणि दसरा खूप जोशात मनवतात मग दोन दिवसांवरहोळी असताना तो येईलच कसा? ह्या विचाराने मात्र शंकरचा नारायणला खूप राग आला . सालं, आपण किती दिवस झालेबैतूलला गेलो नाही. ह्यांचं काय ह्यांना रोज रोज घरचे लोक भेटतात. मला कुठे तसे? धड आठवडयातून एकदा तरी भेटता येतनाही. रेल्वेशी संबंधित म्हणून बरं ! साहेब लोक तिकीट तरी विचारीत नाही. मागे असंच ह्यांच्या



अशा सुट्ट्या मारण्याने आपणगावाला जाणार ..पण गेलो नाही. बायकोने तिच्या भावाला अजनी हेडक्वार्टरला कां आले नाही ? म्हणून चौकशी करायलापाठवलं तिथून तो इथे साइटवर भेटायला आला होता.. ह्या खेडयात.. किती समजावून सांगावं लागलं होतं त्याला आणि हेमस्त उद्या येतो म्हणून चार चार दिवस गायब होतात ..मी तक्रार करीत नाही याचा अर्थ असा थोडीच होतो ..आता मी जर उद्यागावाला गेलो नाही तर काय वाटेल घरच्यांना ..बाबा घरचा कर्ता माणूसच लगोलग कळवून सुद्धा आला नाही! आणि आपल्यालहान भावाला काय वाटेल ? तो तर तेवढया लांबून डेहराडून वरून येतोय ..सोबत अलका येणार आहे..गुड्डीला घेऊन.. लग्नझाल्यावर आपली त्याच्याशी भेटत नाही ..सालभर झालं बहुदा.. अलकाच्या लग्नात आपली गुड्डी केवढीशी होती. धड तिचंदूधही सुटलं नव्हतं ..तर अलकानं आपल्या बायकोकडून तिला मागून नेलं होतं ..आम्हांला करमणार नाही म्हणायची... शेखरड्युटीवर गेला की तिला कॉर्टरवर गुड्डीची साथ मिळणार होती ..आपण ह्यांचं नुकतंच लग्न झालंय कशाला मध्ये गुड्डी.. वगैरेपाठवायला नको ..म्हणून नाही नाही म्हटलं तरी रडून रडून तिला नेली होती..शेखरही हट्टाला पेटला होता. शेखरचा हट्टआपल्याला कधीच मोडवत नाही मग आपणच गुड्डीला त्या दोघांच्या स्वाधीन केलं होतं.. शेखर किती लहान होता. तेव्हाच आपले बाबा वारले होते .मधल्या भावाने बैतुलला एमआयडीसीत नोकरी पकडली होती.तिथे बायकोसह स्थायिक झाला होता. त्यामुळे शेखरच शिक्षण,आईचा सांभाळ आणि आपली नोकरी एवढं सगळं सांभाळावं लागायचं आपल्याला!तेव्हाचा आपला पगार फक्त दीडशे रुपये होता आता शेखरला एकदम साडेपाच हजार रुपये पगार आहे. आईच्या मताचं ऐकलं असतं तर शेखर आज मिलिटरीत नसताच!!

बैतुलला त्यावेळी मिल्ट्री कॅम्प लागला होता .शेखर सकाळी तिथे दूध पोचवायचा .आपल्यापेक्षा तो धट्टाकट्टा वाटायचा. एक दिवस त्याच्या पेपरमुळे आपण दूध द्यायला गेलो तर मिलिटरीच्या साहेबांनी शेखर विषयी विचारून त्याला मिल्ट्रीत टाका असं म्हटलं . मी किती समजूत घालून शेखरला मिलिटरीत टाकला .आता पाहता पाहता त्याच सातव वर्ष सुरू आहेमिलिट रीतलं! मागच्या वर्षी त्यानं लग्न केलं. अलका सारखी सोज्वळ भाऊसून मिळाली.. शेखरला पाहिजे होती अगदी तशीच ती आहे. आणि आता ते सर्वजण होळीला येणार आहे.. मी येथे अडकून पडलो एकटा.. नारायणला हे सारं आठवून आठवूनहुंदका दाटून आला . तो बिछान्यावर आडवा पडला.. तर लगेच बाहेर पुन्हा कसला तरी आवाज आला.. नारायण चिडला.. त्यानं पुन्हा काठी उचलली आणि बाहेर आला.. तर दरवाजा उघडून शंकर आत येत होता .त्याला पाहून नारायणचा दाटलेला हुंदका अश्रूच्या रूपाने बाहेर पडला...

**प्रा.भरत खैरकर**
**बी-१/७, काकडे पार्क,तानाजी नगर चिंचवड**
**पुणे ३३, मो. ९८८१६१५३२९.**

■■■





# एक ध्यास परिपूर्णतेचा...

सौ.आसावरी अभिजीत ऐनापुरे

ध्यास या दोन शब्दात जीवनाचं सार सामावलेलं आहे. एखाद्या गोष्टीचा ध्यास लागणे म्हणजे नक्की काय? तर त्या गोष्टीची इतकी आस लागणं की ती गोष्ट करताना स्वतःचाही विसर पडावा आणि ती गोष्ट केल्याशिवाय जीवाला स्वस्थता मिळू नये. आस लागल्याशिवाय ध्यास नाही. माणूस एखाद्या गोष्टीचा ध्यास का घेतो? त्याला ती गोष्ट हवी असते म्हणून,ती गोष्ट मिळवायची आंतरिक इच्छा प्रबळ असते म्हणून, स्वतःतल्या जिद्दीला दिलेलं ते एक आव्हान असतं म्हणून की स्वतःला सिद्ध करण्याच्या धडपडीचा एक भाग असतो म्हणून? उत्तरं अनेक आहेत.

ध्यास घेणं आणि ध्यास लागणं यातही फरक आहे. माणूस एखाद्या गोष्टीचा ध्यास जाणीवपूर्वक घेत असतो आणि एखाद्या वेळी त्याच्याही नकळत ध्यास हा लागत असतो त्याला. म्हणजेच माझं ध्येय निश्चित करून ते पूर्ण करण्यासाठीची माझी धडपड,ही माझ्या ध्यास घेण्याचं निदर्शक असते. तर जेव्हा एखाद्या गोष्टीने मी मनापासून भारावून जाते –उदाहरणार्थ – माझी देवावरची श्रद्धा किंवा एखाद्यातला चांगुलपणा. तेव्हा त्या गोष्टीचा ध्यास मला लागला असे मी समजते. दोन्हीतही वेड आहेच. फक्त ध्यास घेण्यामध्ये मी ते मुद्दामहून अंगीकारलय तर ध्यास लागण्यामध्ये बाह्य गोष्टींमुळे मला ते लागलय. काहीही असलं तरी हे वेड जिद्दीला जन्म देतं एवढं मात्र नक्की.

ध्यास घेतल्यावर किंवा ध्यास लागल्यावर माणूस त्या गोष्टीने पछाडून जातो. रात्रंदिवस त्याला ती गोष्ट पूर्ण करण्याची स्वप्नं पडू लागतात. जगण्याला एक प्रकारचा अर्थ प्राप्त होतो. एक प्रकारचं उद्दिष्ट येतं. म्हणजे ध्यास हा ध्येयाच्या दिशेने केलेला एक,स्वप्नांच्या जिद्दीचा प्रवास आहे. स्वतः विसरून केलेला. कुठल्या गोष्टींचा ध्यास माणूस घेतो? वास्तवातल्या –उदाहरणार्थ परीक्षेत चांगल्या गुणांनी उत्तीर्ण होणे आणि कल्पनेतल्या –उदाहरणार्थ भविष्यात काहीतरी बनवून दाखवण्याचा. त्या दृष्टीने ध्यास हा ध्यासच असतो. फक्त गोष्टी बदलतात. कधी त्या वास्तव असतात तर कधी काल्पनिक. काल्पनिक गोष्टींना वास्तवात आणण्याचे काम ध्यास करतो. ध्यास भरपूर आनंद देऊन जातो आपल्याला. कारण आवडत्या गोष्टींचा पाठपुरावा आपण करत असतो.

प्रत्येक वेळी नवीन गोष्टींचा ध्यास घ्यावा माणसाने. त्यामुळे नवीन गोष्टी शिकता येतात. आपली बौद्धिक आणि वैचारिक क्षमता वाढीस लागते आणि स्वतःचा विकास होतो. ध्यासाचा हा प्रवास खूप छोटया छोटया गोष्टींची निर्मिती करणारा आणि म्हणूनच आनंददायी असतो. आपल्याला सतत प्रयत्नशील ठेवतो. ध्यास म्हणजे .(obsession obsession is essential to creativity ). ध्यासाचा जन्म केव्हा होतो? तर ( when passion meets inspiration obsession is born ) अंतस्थ प्रेरणा ध्यासाला जन्म देते. आयुष्यात यशस्वी होण्यासाठी आणि जागृत राहण्यासाठी कसला ना कसला ध्यास आवश्यक असतो. त्यामुळे जे जे चांगले आहे त्याचा ध्यास घेऊया. स्वतःतला चांगुलपणा जपूया. एक सुंदर ध्यास जगूया. जगणं शिकूया.

"Good ruqires motivation,great requires obsession "

**सौ. आसावरी अभिजीत ऐनापुरे**
**/१७०१, पंकज हाइट्स,**
**डॉक्टर देशमुख लेन, व्ही पी रोड,**
**गिरगाव, मुंबई – ४००००४.**

■■■



# पती पत्नीचे नाते जन्मजन्मांतरीचे

**सौ.स्नेहा मुसरीफ**

नुकताच एका केसचा निकाल छान,मनाप्रमाणे लागल्यामुळे आशिलाने पेढ्यांचा बॉक्स आणि बुके दिलेला समोरच टेबलवर पडला होता. इतकी मेहनत घेऊन केस जिंकल्यामुळे थकवा असूनही एक प्रकारचे समाधान वाटत होते.शांतपणे खुर्चीवर मागे मान टेकून आरामात बसले होते.आता पाच दहा मिनिटे थोडासा आराम करून घरी निघूया असा विचार करत होते तोच ..खाडकन् दरवाजा ढकलून निकिता आत आली. चेहरा वैतागलेला,रडून बहुतेक डोळे सुजलेले ,लालसर दिसत होते. गोरीपान,नाजूक असल्यामुळे नाकाचा शेंडा,कानसुलेही लाल लाल दिसत होती.धापा टाकत धपकन ती समोरच्या खुर्चीत बसली. मी तिला आधी थंड पाण्याचा ग्लास दिला.वाळवंटातून तहानेने व्याकूळ होऊन आल्यासारखे एका दमात सर्व पाणी संपवले .पेढ्यांकडे कडवट नजर टाकली.

जोरदार काहीतरी बिनसले असल्याचे स्पष्ट दिसत होते. तरीही विषयाला तोंड फुटावे म्हणून मी विचारलेच ,काय ग,आज इकडे कशी आलीस? झाले..मग स्फोट झाल्यासारखे भराभर बोलत सुटली. मावशी,इतके दिवस सहन केले मी निखिलचे नखरे, पण आता नाही सहन होत.. आईच्या पदराखालीच राहायचं होत तर लग्न कशाला केलं? आईनाही मी सर्व त्यांच्यासारखेच करावे अशी अपेक्षा असते. मी जॉब वरून आल्यावर खरच खूप थकते इतक्या लांबून आल्यावर. थोडावेळ आराम करावा म्हटले तर शप्पथ! .त्या दोघांना उशीरा सोसत नाही, गोळ्या असतात म्हणून लगेंच रात्रीच्या जेवण्याची तयारी सुरु करतात.मग काय, मदतीला यावे असे त्या म्हणत नाहीत पण हाच म्हणतो,आई आता थकत चाललीय, सुधरत नाही तिला मग तिखटमीठ कमी जास्त होते त्यापेक्षा तूच कर ना भाजी आमटी..कौतुक तर काडीचे नाही. मला आता नाही हे सहन होत त्यापेक्षा सरळ वेगळेच झालेले बरे म्हणजे माझ्या चिडचीड , त्राग्यातुन तो पण सुटेल आणि मी पण सुटेन एकदाची!

कित्ती सहज बोलली?मी विचारले ,तू इथे येणार आहेस हे घरी सांगून आलीस का?ती म्हणाली,"त्याची काही गरज नाही,तरीही सासूबाईंनी विचारले म्हणून फक्त तुझ्याकडे चाललेय ,इतकेच सांगितले.कुणाला काळजी आहे माझी?.."आज मॅडमचा सूर काही वेगळाच लागलेला दिसत होता.नेहमी हसतमुख असणारी,उत्साही,धडपडी निकिता खूपच भडकलेली दिसत होती.मला तर तिचे हे रूप अगदीच नवीन होते.निखिल खरंतर खूप समंजस, तिला अनुरूप असाच देखणा,आय टी कंपनीत इंजिनीअर, एकुलता एक ,उच्चमध्यमवर्गीय घरंदाज मुलगा

होता.माझ्या नणंदेच्या नात्यातील,माहितीची माणसे होती म्हणून मीच पुढाकार घेऊन भाचीचे आणि निखिलचे लग्न जमवले होते. निकिताला तरी अगदी लहान असल्यापासून पहात आहेच.खरंतर दोघेही इतके हुशार,एका

क्षेत्रातील, समंजस असूनही असे काय झाले तेच समजेना. निकिता पण एकुलती एक लाडाची लेक असल्यामुळे जितकी समंजस तितकी हट्टी होती. एकदा चिडली,रुसली की एकदम टोकाला जाते, पण थोडा वेळ गेला, थोडे समजावले की समजूत पण लगेंच पटते हे सुद्धा मला ठाऊक होतेच.त्यामुळे आज नक्की काहीतरी कुणीतरी बोलले असणार हे लगेंच लक्षात आले. सासूसासरे तर अगदी साधेभोळे,सुनेचे कोण कौतुक त्यांना! मुलाचा नसेल इतका निकिताच्या नावाचा सतत जप सुरु असतो. ते नक्कीच हिला दुखावणार नाहीत. म्हणजे नक्कीच या दोघातच काहीतरी बिनसले असणार याचा अंदाज आला.मग मी पण तिला आधी पूर्ण बोलून मोकळे होऊ दिलेआणि मग हळूहळू तिच्या कलाकलाने समजवायला सुरु केले.

मी तिला विचारले,आमच्या समोर राहणारे जोशी आजोबा आज्जी माहिती आहेत का गं तुला निकिता?ती म्हणाली हो..किती आयडियल कपल आहे ना ते.. मला तर बाई आज्जींचा हेवाच वाटतो. बस्स! एवढे पुरेसे होते मला तिला चावी देण्यासाठी. गेल्या महिन्यात त्यांच्या लग्नाचा वाढदिवस होता तर या दोघांनी तो अनाथाश्रमात

छोटया मुलांबरोबर दिवसभर घालवून,त्यांना खाऊ, खेळणी आणि देणगी देऊन मोठ्ठा केक आणून सर्वांना वाटून साजरा केला.खरंतर स्वतःची मुले,नातवंडे परदेशी आहेत, ते सतत त्याना तिकडे बोलावतात .पण त्यांना तिकडे करमत नाही, थंड हवामान सोसत नाही त्यामुळे तिकडे राहणे शक्य पण नाही पण त्यांनी हे ॲक्सेप्ट केले आणि दर रविवारी त्या सर्वांशी दोघे अगदी मनसोक्त गप्पा मारतातआणि एकमेकांना सांभाळत मजेत राहतात.

पंचाहत्तरीच्या या वयात सुद्धा आजोबा दररोज न चुकता आज्जींना खूप आवडतो म्हणून गजरा आणतात.आज्जीपण त्यांनी आठवणीने आणला म्हणून छोट्याश्या पांढऱ्याशुभ्र आंबाड्यावर कौतुकाने माळतात. आम्ही कधी थट्टा केली तर लाजतात पण कित्ती गोड? वाटते हेच खरे प्रेमाचे गोड अतूट नातं! सिनेमात दाखवतात तसे अगदी गळ्यात गळे घालून धिंगाणा करत,खोटे खोटे प्रेमाचे लाडीक चाळे करत तुझे चांद पर ले जाऊंगा किंवा ताजमहलं दूंगा.. म्हणण्यापेक्षा हे किती गोड वाटते. त्यांनी तरी लग्नातच एकमेकांना पाहिले होते म्हणे,ते सुद्धा सर्वांच्या नजरा चोरून! एकत्र मोठ्ठे कुटुंब ,त्यात वडिलधारे सासू सासरे,मोठे दोन दीर,जावा आणि छोटी नणंद असल्यामुळे दिवसभर ते बाहेर कामावर जायचे तेंव्हा जाताना सर्वांची नजर चुकवत तिरपा कटाक्ष टाकत नजरभेट व्हायची. सर्व कामे आटोपून रात्री उशीरा आज्जी खोलीत जायच्या तेंव्हाच दोघांची खरी भेट व्हायची. पण त्यात जी ओढ, हुरहुर, आतुरता होती ती शब्दात नाही सांगता येणार ,अगं, आमचा संसार म्हणजे मुरांबा आहे. जेवढा जुना, मुरलेला तेवढा गोड होत जातो .कित्ती सुंदर उदाहरणाने सांगितले होते नात्यातील गोड गुपित आज्जींनी मला!मी सहजपणे बोलता बोलता ही गोष्ट सांगितली तेंव्हा तिला इतके आश्चर्य वाटले होते,इतके प्रश्न पडले होते तिला आणि आजोबा आज्जींकडे पाहून हे शक्यच नाही,त्यांचे मला तरी लव्हमॅरेज असेल असे वाटले होते असे म्हणाली चक्क. साहजिकच आहे कारण आता हा प्रेमाच्या मुरांब्यातील गोडवा धावपळीच्या पिझ्झा,बर्गर, वडापाव खात घड्याळाच्या काटयावर चालणाऱ्या पिढीला कसा अनुभवता येणार?

आणखी एक गोष्ट सांगते तुला निकिता, आम्ही मध्यंतरी बागेत फिरायला गेलो होतो तिथे जवळपास ८०..८२ वर्षांचे एक वृद्ध जोडपे आले होते. थकलेले असूनही इतके उत्साही, आनंदात, एकमेकांना सांभाळत, आधार देत होते की त्यांना पाहून मी यांना म्हणाले सुद्धा, आपण सुद्धा कितीही म्हातारे झालो ना, तरी असंच राहूया एकमेकांच्या साथीने. खरे आदर्श आहेत हे सर्वांसाठी , विशेषतः आजच्या आणि पुढच्या पिढ्यांसाठी.

खरे आहे किनई निकिता? आता हळू हळू निकिता शांत होताना दिसत होती. मी माझे समजावणे रेटून सुरूच ठेवले होते . काय आहे ना,इतर सर्व नाती काळानुरूप तात्पुरती रहात असतात. अगदी जन्म दिलेली मुले सुद्धा पंख फुटले की बाहेर पडून उंच आकाशात झेप टाकतात, त्यांच्या स्वतःच्या नव्या विश्वात दंग होतात,पण हे एकच बंधन पवित्र शेवटपर्यंत एकमेकांना सावरत, सांभाळून घेत भक्कमपणे साथ देणारं असतं. कारण ये बंधन तो प्यारका बंधन है ,जन्मोंका संगम है... हेच त्रिवार सत्य आहे. या नात्यातील गमती काही औरच आहेत बरकां .

सकाळी तू तू मै मै करत कडाक्याचे भांडण झाले तरी रात्री थोड्या लटक्या रागात आणि शेवटी सकाळी तरी जादुची कांडी फिरल्यागत दोघांच्याही चेहऱ्यावर त्याभांडणाचा मागमूसही

रहात नाही ,उलट जास्तच गोडीत दिसताना पाहून मजा येते.काल साताजन्माचा वैरी वाटतो तोच आज हक्काचा मित्र वाटतो. तुझं माझं जमेना म्हणणारे पती पत्नीच मग तुमचं आमचं जमलं म्हणत तुझ्यावाचून करमेना म्हणायला लागतात. हे नातेच इतके गुंतागुंतीचे आहे, की जितका हळुवारपणेअलगद हा सोडवू तितके हे नाते प्रेमाने,मायेने भरते आणि मग ओढ निर्माण होऊन हा गुंता छान सुटतो.पण त्यासाठी "तडजोड, त्याग, माघार " ही त्रिसूत्री

आत्मसात करता आली की बस्स!

अत्यंत नाजूक तरीही मजबूत असलेले हे नाते एखाद्या लवचिक रबरा प्रमाणे असते. त्यामुळे हे दोन्हीकडून कधीही ताणु नये नाहीतर तुटते.एकाने ताणले तर दुसऱ्याने सैल सोडावे लागते हे समजून घेणे महत्त्वाचे आहे.परिपूर्ण असा कोणीच नसतो, म्हणूनच्? दुसऱ्याचे दोष,चुका काढून उगाळत बसण्यापेक्षा कधी आत्मपरीक्षण केले तर संघर्ष नक्कीच टाळता येतात .

तन,मन,धन एकमेकाना समर्पित केलेले हे अत्यंत पवित्र, सुंदर असे एकमेव नाते आहे.

आपण म्हणतो,रक्ताची नाती आहेत,ओढ असणारच!पण या पतीपत्नीच्या नात्यात तर एक रक्त नसूनसुद्धा शेवटपर्यंत साथ निभावत कधी रुसत,चिडत,कधी लाडीगोडीत,कधी भांडत, कधी भरभरून प्रेमाच्या वर्षावात चिंब भिजत हे पतीपत्नीचे नाते संसार फुलवतं,बहरतं. कधी कर्तव्य म्हणून तर कधी प्रेमाने,कधी जबाबदारी म्हणून तर कधीआनंदाने एकत्र राहताना सहवासाने कधी मुरांबा बनते हे समजतही नाही.म्हणूनच या गोड नात्याचा मुरांबा बनण्यासाठी,मुरण्यासाठी, त्यातगोडवा येण्यासाठी तेवढा वेळ द्यायला हवा ना?त्यासाठी मग सारे इगो बाजूला ठेवून थोडेसे ॲडजेस्ट करावे लागते. हुशार निकिताच्या लक्षात आले मला काय म्हणायचे आहे ते! तिचा पण मध्ये येत होता आता. मी पुन्हा मूळ ट्रॅक वर गाडी आणत म्हटले,खरतर तू इतकी समंजस, गोड आहेस, सगळे आटोपून ड्युटी करून पुन्हा तेवढीच उत्साही असतेस,एकवेळ निखिल बाबांची औषधे विसरेल,पण निकिताचे

मात्र सारे लक्षात असते हो,सर्वांच्या आवडी, माझे गुढघे दुखतात म्हणून परवा इतकी महाग औषधी तेलाची बाटली आणली आणि त्या दिवशी तर स्वतः लावून पण दिले आणि दररोज विचारतेसुद्धा लावले का नाही,दुखणे कसे आहे साऱ्यांची अगदी मनापासुन काळजी घेते.खरचं खुप नशीबवान आहोत आम्ही वगैरे इतके कौतुक करत होत्या सासुबाई आणि बाबाही तुझे.. ! निकिता आता मात्र मनातून

खूप सुखावलेली दिसली.मी सुरूच ठेवले होते...

निखिल पण खरंच खूप मायाळू आहे गं,पण बिचारा दिवसभर इतका लांब जातो,दमत असेल ना, शिवाय जबाबदारीची पोस्ट आहे त्याची.तिथेही प्रेशर्स असतील थकल्यामुळे कदाचीत नसेल बोलत काही,पण मनातून त्यालाही खरच तुझ्या कष्टाची, ओढाताण होते याची जाणीव आहेच ग,सर्वांत महत्वाचे म्हणजे

तुझ्यावर त्याचे इतके प्रेम आहे की तू आल्यावर घरात दिसली नाहीस की कावराबावरा होतो.हो किनई? मग त्याने ते बोलूनच कशाला दाखवले पाहिजे,काही गोष्टी न बोलताही समजून घेता आल्या पाहिजेत ना?आता मात्र निकिताच्या लक्षात आले.चेहरा गोरमोरा झाला.ती म्हणतच होती,खरंच मी अशी अचानक आल्यामुळे सगळे काळजीत असतील,बाबांच्या औषधाची गोळ्यांचीही वेळ होईल,निघायला पाहिजे आता तेवढ्यात निखील आलाच! काय हे निकिता,का अशी अचानक इकडे आलीस ,कित्ती फोन केले,उचलले नाहीस..तुझ्या मैत्रिणींनाही फोन केले होते.तू नाहीस म्हटल्यावर आईने तू इकडे आल्याचे सांगितले म्हणून गाडी घेऊन आलोय.बऱ्या आहात ना मावशी?

मी म्हणाले,काही नाही रे..बऱ्याच दिवसात ही भेटायलाच नाही आली म्हणून आज वेळ असेल तर ये म्हणाले तर लग्गेच आली बघ. मग ठीक आहे,घाबरलो होतो मी,काय झाले असेल म्हणून.चला येतो आम्ही आता,जाताना वाटेत काहीतरी पार्सल घेऊन जाऊ,खूप धावपळ होते मावशी हिची पण काय करणार,आईला आता पूर्वीसारखे झेपत नाही, त्यामुळे तिचीही फारशी मदत होत नाही ,तिला जड जाते थोडे आणि खरं सांगू का,निकिता इतके टेस्टी बनवते ना सारे,की बाहेर खायला मला तर नकोच वाटते आणि आई बाबाही तिच्याच हातचा साधा भात आमटी सुद्धा चालेल पण बाहेरचे सोसत नाही,नको म्हणतात. ...

आता निकिताचा रुसवा कुठल्याकुठे पळून गेला होता.मी सुचकपणे तिच्याकडे पाहिले, बघ,काय करत होतीस तू आज रागाच्या भरात? असा क्षण आला की शांतपणे विचार करावा आणि मगच पुढे जावे . तिला बरोबर समजले मला काय म्हणायचे आहे ते! तिने नजरेनेच माझे आभार मानले. आधी रागाने लाल झालेला गोरपान चेहरा आता लाजून गुलाबी झाला होता.समोरच्या बॉक्स मधील पेढे आता गोड वाटायला लागले होते. दोघांच्याही हातात पेढे देऊन मी पण तृप्त मनाने गोड पेढा खाल्ला.जणू आज मी ही दुसरी पण केस पहिल्याच झटक्यात जिंकले होते.आनंदात हसत जाणाऱ्या पाठमोऱ्या या पतीपत्नीच्या नात्याकडे पाहून मन अगदी प्रसन्न झाले होते.

**सौ.स्नेहा मुसरीफ,पुणे.**

■■■





# रथ एक चाके दोन!

नागेश शेवाळकर

**तुझ्या माझ्या संसाराला आनिक काय हवं**
**तुझ्या माझ्या लेकराला घरकुल नवं**

बहुतांश नवविवाहितांच्या ओठांवर घोळणारे हे गीत! नुकताच संसार सुरु झालेला असताना पती आपल्या पत्नीला हमखास असेच काही तरी विचारत असतो.बावरलेली, काहीशी घाबरलेली, लाजणारी पत्नी हलकेच तिला काय हवे ते त्याच्या कानात सांगते. तिला बाळही हवं असतं नि बाळासाठी घरही हवं असतं. अशा आशा, अपेक्षा, आणि स्वप्नांची इमले रचत संसार सुरु होतो. दिस जातील, दिस येतील या ओळीप्रमाणे संसार सुखाचा होत असताना अनेक अपेक्षांची पूर्ती होत असताना, स्वप्नं प्रत्यक्षात उतरत असताना मात्र काही आशा अपेक्षा आणि स्वप्नं ही स्वप्नंच राहतात. त्याला कारणेही अनेक असतात. त्यामध्ये आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक अशा बाबी असतात परंतु अनेकदा अंथरूण पाहून पाय पसरणे या म्हणीचा विसर पडल्यामुळे इच्छा,आकांक्षाची पूर्तता एक तर दूर जाते किंवा मग धुसर होत जाते आणि मग संसारात धुसफूस सुरु होते, त्यात वादविवादाची ठिणगी पडते.

वैवाहिक जीवन म्हणजे एक रथ आणि त्याच रथाची दोन चाके म्हणजे पती-पत्नी असे समजण्याची एक परंपरा पूर्वापार चालत आलेली आहे! परंतु काही दशकांपर्यंत आणि आताही थोड्या फार प्रमाणात पुरुष संस्कृती कवटाळलेली असल्यामुळे संसाररुपी रथाची चाके समांतर धावताना दिसत नाहीत. पतीरुपी चाक पुढे जाण्याच्या प्रयत्नात असते तर पत्नी त्याच्या मागे चालताना दिसते. लग्नविधीत सप्तपदीच्या वेळीही पतीपत्नीची गाठ मारुन फेऱ्या मारतानाही पती पुढे,पत्नी मागे अशीच स्थिती असते. मुलामुलींनी तारुण्यात प्रवेश केला की,त्यांच्या घरी त्यांच्या लग्नाच्या चर्चा सुरू होतात आणि मग मुलेमुली आपापल्या जोडीदाराच्या बाबतीत विचार करायला आणि स्वप्न पाहायला सुरुवात करतात. एकमेकांबद्दलच्या अपेक्षा म्हणजे नवरा कसा असावा? बायको कशी असावी?यात रंग-रुप यासोबतच एकमेकांच्या शिक्षणासंदर्भात, आर्थिक,सामाजिक संदर्भातही मनोमन विचार सुरु होतो. तारुण्य सुलभता असल्यामुळे अशी स्वप्नं पडणे, उराशी बाळगणे सहज स्वाभाविक आणि नैसर्गिक असते. दोघांना आयुष्यभर सहचारिणी आणि सहचारी म्हणून एकत्र यायचे असते, नांदायचे असते.

काही दशकांपूर्वी मुलींना पाहायला मुलगा जात नसे तर मुलाच्या घरातील वडील मंडळी मुलगी पाहायला जात असे. त्यांनी पसंत केलेल्या मुलीच्या गळ्यात मुलाला आणि मुलीला मुलाच्या गळ्यात हार घालावे लागत याचा अर्थ त्याकाळी मुलामुलींना आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य नव्हते तर तिथे आपल्या जोडीदाराबद्दल आशा अपेक्षा कुठून प्रत्यक्षात येणार. त्याहीपूर्वीची परिस्थिती पाहायची असेल तर तो बालविवाहाचा काळ होता. जिथे स्वतःला पूर्णपणे ओळखले नसायचे, स्वतःच्या शारीरिक स्थितीची, अवयवांची ओळख झालेली नसायची, लग्न म्हणजे काय ही संकल्पनेची ओळख

झालेली नसताना एकमेकांना वरावे लागे.

प.पू. गोपाळ फडके लिखित श्री सद्गुरुलीलामृत या प.पू.गोंदवलेकर महाराज यांच्या चरित्रात याबद्दल लिहिलेल्या ओव्या उद्धृत करण्याचा मोह अनावर होतो आहे...

वर पहावया अनेक| गांवोगांवचे येती लोक| विद्या वैभव वागणूक| वररुप पाहती| कोणी वैभव वांछिती| कोणी वयसीमा पाहती| कोणी शरीरसंपत्ती| आणि स्वरूप| कोणी म्हणती पाहिजे वर केवळ| नको सासूसासऱ्यांचा छळ| नणंदा जावांचा जोंजाळ| असूच नये| म्हणती वर विद्वान असावा| कोणी म्हणे उद्यमी हवा|धारिष्टें असावा बरवा| सकला ठायी|....

वधू कैसी योजावी| मातुलगृहींचे आचार| संतती करिते अंगीकार| जाणोनि हा आधार| सूक्ष्मदृष्टी न्याहाळी| कुलवंत बुद्धिवंत| आचारशील दयावंत| विवेकी आणि भगवद्भक्त| असता भली|

वरील ओव्यांवरुन त्याकाळची परिस्थिती कमी-अधिक प्रमाणात कशी होती हे लक्षात येते.

काही दशकांपासून ही सारी परिस्थिती बदलली आहे. विशेषतः मुलींच्या शिक्षणाचे आणि नोकरी करण्याचे प्रमाण वाढले आणि मग दोघांच्याही आशा,अपेक्षांना, स्वप्नांना पंख फुटू लागले. त्याची परिणती म्हणजे आजकाल मुलं एकमेकांना भेटून समोरची व्यक्ती आपल्या आकांक्षांना अनुरूप आहे का नाही हे बघतात. मोकळेपणाने चर्चा करतात. काही प्रमाणात सामाजिक अनुभवांची कमतरता असल्यामुळे किंवा जोडीदाराच्या बाबतीत पाहिलेले स्वप्न प्रत्यक्षात समोर बसलेले पाहून आनंद माझ्या पोटात माईना रे माईना अशी स्थिती होते आणि मग जोशात येऊन अवाजवी आश्वासनांची देवाणघेवाण होते अर्थात ही तारुण्यसुलभता असते. भविष्यात अधिक कष्ट करून एकमेकांच्या स्वप्नांना बळ देण्याची, ते वास्तवात आणण्याची जिद्द असते, धमकही असते परंतु केवळ आशा, अपेक्षा आणि स्वप्नं पाहून संसार चालत नाही तिथे प्रसंगी काट्याच्या वाटेवरून जावे लागते म्हणून आजही बहिणाबाईंच्या ओळी महत्वाच्या ठरतात...

**अरे संसार संसार**
**जसा तवा चुलीवर**
**हाती हाताला चटके**
**तेव्हा मिळते मीठ भाकर**

असे वास्तव जेव्हा लक्षात येते, आपल्या आकांक्षा वास्तवात येऊ शकत नाही किंवा त्यांना पूर्ण होण्यासाठी अधिक काळ लागेल हे लक्षात येताच पतीपत्नीमध्ये धुसफूस सुरु होते.काही वेळा पूर्तता होण्यासाठी आज-आत्ता-ताबडतोब मुहूर्त असावा अशीही आशा असते. अनेकदा अगदी छोटया छोटया अपेक्षा असतात परंतु परिस्थिती अशा वळणावर असते की ते एकमेकांची लहानातील लहान मागणीही पूर्ण होऊ शकत नाही.

केवळ अत्याधुनिक सुविधा, स्वतःचे घर अशा गोष्टींची पूर्ती म्हणजे यशस्वी संसार असे नाही. अगदी छोटया छोटया गोष्टी असतात ज्या जोडीदारांना अपरिमित आनंद देतात, प्रफुल्लित करतात,संसारात चैतन्य निर्माण करतात परंतु आज बहुतेक कुटुंबात नवरा बायको दोघेही नोकरी करतात, छोटामोठा व्यवसाय करतात त्यामुळे त्यांना तिकडे लक्ष द्यावे लागत असल्यामुळे दोघांचीही ओढाताण होते अशा परिस्थितीत जोडीदाराकडे दुर्लक्ष करतात असे नाही परंतु एकमेकांना हवा तेवढा वेळ देऊ शकत नाहीत.

आज समाजात जी स्पर्धा सुरू झाली आहे तिला आजची तरुणाई बळी पडतेय की काय अशी शंका उपस्थित होत आहे.कारण घरापासून बारा- चौदा तास बाहेर राहणारी ही तरुणाई घरात पुरेसा वेळ देऊ शकत नाही हे कटुसत्या आहे. त्यामुळे संसारात राग, संताप, चिडचिड, वादविवाद इत्यादी विषारी गोष्टींचे बीजारोपण होत आहे. त्यातून नात्यामध्ये क्षणिक कडवटपणा, टोमणे, रुसवेफुगवे अशा बाबी डोके वर काढतात. खरे तर संसारात एका मर्यादेत रुसवेफुगवे असतील तर ते संसारात रसरसशीतपणा,जिवंतपणा आणतात.हसणे जसे ताणतणाव दूर करायला, चैतन्य निर्माण करायला सहाय्यभूत असते तसेच अल्पकालीन वादाचे असते. अशा शाब्दिक चकमकी पेल्यातील वादळ ठरल्या तर संसारात गोडवा, मधाळपणा निर्माण होतो, संसार अळणी होत नाही. दोघांनीही एकमेकांना समजून माझे ते खरे याऐवजी खरे ते माझे ही वृत्ती अंमलात आणली तर आनंददायी संसारासाठी ती पोषक ठरते. पूर्वी असं म्हणत की, नवरा- बायकोची दिवसा झालेली भांडणं रात्री अंथरुणात मिटतात. खरेतर या वाक्यात खूप मोठा भावार्थ आहे. या विधानाकडे एका वेगळ्या दृष्टीने पाहणे आवश्यक आहे. परंतु एक परंपरागत दृष्टिकोन म्हणजे अंथरुणात मिटतात याचा सरळ सरळ अर्थ शृंगार असा समजल्या जातो. रात्री निवांत वेळ असतो, दिवसा झालेल्या भांडणात खरे कोणाचे यावर चर्चा करता येते, चूक लक्षात आणून देता येते.काय हवे, काय नको याची उजळणी होते, दिवसा शब्दाने वाढलेला शब्द, रात्री शब्दानेच मागे घेता येतो. काही बाबतीत झालेला गैरसमज, ठिणगी का पडली याचा शोध घेऊन त्यावर विचार मंथनातून भविष्याच्या दृष्टीने सकारात्मक बोध घेता येतो. काही तासांपासून सुरु असलेला दुरावा खालील ओळी ओठांवर घोळवून दूर करता येतो...

**का हा दूरावा**
**असा का हा अबोला**
**अपराध कुणाचा**
**असा काय झाला?**

परंतु अनेकदा दोघांमध्ये असलेला इगो सकारात्मक विचार, योग्य कुणाचे ही भावना दाबून टाकतो.आपली चूक समोर दिसत असतानाही तो इगो ती चूक कबूल करण्याची संधी देत नाही. ही खरी शोकांतिका आहे. त्यासाठी हवा असतो सुसंवाद! पण आज अनेक घरात सुसंवाद हरवला आहे का अशी शंका येण्याजोगी परिस्थिती आहे. महत्वाचे म्हणजे तेवढा पुरेसा वेळ अनेक जणांकडे नसतो. त्यामुळे उद्भवलेली परिस्थिती, अचानक होत असलेला वाद शांतपणे, संयमाने हाताळायला हवा. एकमेकांना समजून

घेणे, हमरीतुमरीवर न येणे, एकमेकांना मदतीचा हात देणे आणि कुणी एक चिडत असेल... रागारागाने बोलत असेल तर दुसऱ्याने स्वतःचा संताप बाजूला ठेवून शांत राहावे, शब्दाने शब्द वाढवू नये, समोरच्या व्यक्तीचा राग कमी झाला की मग शांतपणे चर्चा करावी. याचा अर्थ असा नव्हे की, प्रत्येक वेळी कुणी एकानेच पडती बाजू घ्यावी. शब्द नि शस्त्र सारखीच असतात,ती एकदा निघाली की परतीचा दोर कापूनच निघतात. अशावेळी शब्दांचा दुतर्फा मारा होणे घातक ठरु शकते, यशस्वी जीवनात मिठाचा खडा टाकू शकते. प्रश्न एक पडतो की, विवाह ठरल्यावर एकमेकांच्या अनेकदा भेटी घेतल्या नंतर ज्या चर्चा होतात, जी एकंदरीत सर्व प्रश्नांवर चर्चा होते अगदी एकमेकांच्या मित्र–मैत्रीणी... बॉयफ्रेंड, गर्लफ्रेंड याविषयी मनमोकळेपणाने बोलले जाते मग तेव्हा असलेला मोकळेपणा नंतर कुठे हरवला जातो?आजची मुलं स्वतःच्या व्यसनाबद्दलही सांगतात मग त्या व्यसनापोटी नंतर दुरावा का निर्माण व्हावा?अगदी वेगळं राहण्यापर्यंत मजल का जावी?

क्या हुआ तेरा वादा
वो कसम वो इरादा

असे एकमेकांना विचारण्याची वेळ येऊ नये...

संसारात एकमेकांवर विश्वास असणे, दुसऱ्याबद्दल संशय नसणे हे खरे तर सुखी संसाराचे एक प्रमुख लक्षण आहे. आगामी काळातील नियोजन, संसारातील स्वतःची जबाबदारी, एकोपा टिकून राहण्यासाठी खबरदारी घेणे, वेळेनुसार आणि कष्टानुसार कामांची विभागणी करणे आवश्यक ठरते कारण जसे दोघेही आर्थिक दृष्ट्या स्वयंपूर्ण व्हावे म्हणून घराबाहेर पडतात तसेच घरातील कामांचेही असावे. जिथे अशी सोशिकता नांदते, कोणताही विनाकारण अट्टाहास नसतो, एकमेकांना समजून घेण्याची वृत्ती असते तेव्हा त्या घरात हे गीत नक्कीच निनादत असणार...

**जीवनात ही प्रिती**
**अशीच राहू दे**
**प्रितीच्या फुलावरी**
**वसंत नांदू दे**

पती–पत्नीच्या नात्यात पारदर्शकता असणे गरजेचे आहे. आपण जे काही करतो ते जोडीदाराला माहिती असणे आवश्यक असते. भलेही एखादा निर्णय तातडीने घ्यावा लागला तरी नंतर ती माहिती जोडीदारास द्यायलाच हवी. मान सांगावा जनात, अपमान ठेवावा मनात ही वृत्ती आपल्या जन्मभराच्या साथीदारासोबत ठेवणे घातक ठरु शकते. जे काही असेल ते स्पष्टपणे सांगितले तर नात्यामध्ये जिवंतपणा येतो,नाती प्रदीर्घ काळ टिकण्यासाठी मदत होते.आयुष्यात एकमेव जिवलग मैत्रीण बायकोच असते आणि जिवलग मित्र हा केवळ आणि केवळ नवराच असतो! मैत्रीचे हे नातं सुंदर, भक्कम, सुदृढ, विश्वासमय असलं की जीवनातले कुठलेही चढ–उतार सहज पार करता येतात. प्रेम हे दोघांसाठी अमृत आणि संजीवनी ठरावे इतके ते मधाळ असते.ज्या जोडप्यांमध्ये प्रेमाचे,एकनिष्ठतेचे बीजारोपण झालेले असते त्यामध्ये संशय, अविश्वास अशा काही गोष्टी शिरल्या की, मानव कितीही प्रतिभावंत असला तरीही त्याची सारासार विचार करण्याची शक्ती नष्ट व्हायला लागते आणि मग प्रेमात दुरावा निर्माण होतो.

एकदा का या मधाळ,गोड,रसरशीत नात्यात अस्पष्टता आली,संशय मनात वळवळू लागला की मग भांडयाला भांडं लागतं, वाद होतात,सुसंवाद संपतात,प्रसंगी कडाक्याची भांडणं होतात, नात्यामध्ये काही प्रमाणात दुरावा निर्माण होतो,एकमेकांना बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. हा वाद इतका चिघळतो की, इतर कोणत्याही मार्गाचा विचार न करता सरळ सरळ अनेक जोडपी घटस्फोटाची भाषा बोलू लागतात. खरेच का नाती इतकी तकलादू असतात की ती अशी सहजासहजी तोडावीत?भलेही आज अनेक ठिकाणी विभक्त कुटुंब असेल परंतु घटस्फोटाच्या निर्णयाचा परिणाम केवळ त्या पती–पत्नीवर होत नाही तर कुटुंबावरही होतो. वृद्ध आईवडील या कृतीचे बळी ठरण्याची शक्यता असते. भाऊ–बहीण लग्नाचे असतील तर त्यांचे लग्न ठरताना हा निर्णय अडसर ठरु शकतो. घटस्फोटाचा अविवेकी निर्णय घेणाऱ्या जोडप्याला संतती असेल तर त्या चिमुकल्याचे काय होईल? भलेही दोघांपैकी कुणी त्याला सांभाळेल, कदाचित आळीपाळीने सांभाळतील परंतु अपत्याला सर्वांगीण विकासासाठी एकाच वेळी, एकाच छत्राखाली मायबापाची उब, माया,ममता,प्रेम हवे असते. ते त्याच्यापासून हिरावून घेण्याचा अधिकार मायबापाला कुणी दिला?एक नाही अनेक आयुष्य उद्ध्वस्त करण्याचा हक्क असा अविचार करणारांना आहे का?

घटस्फोटाचा विचार करण्यापूर्वी दोघांनीही एकत्र,शांतपणे बसून एकमेकांच्या चुकांबद्दल न बोलता, एकमेकांना कमी न लेखता, परस्परांच्या इच्छेचा आदर करत,आयुष्यात एकत्रितपणे ज्या चांगल्या गोष्टी केल्या आहेत, एकमेकांच्या आशा आकांक्षा फलद्रूप होण्यासाठी जी मदत केली आहे त्यावर मंथन करावे. आपल्या जीवनात आपल्याला सहाय्यभूत ठरणाऱ्या अनेक व्यक्ती असतात प्रसंगी त्यांच्याशी मनमोकळी चर्चा करावी. आपल्या विभक्त होण्यामुळे आपल्याच नव्हे तर इतर कुणाकुणाच्या जीवनावर बरेवाईट परिणाम होणार आहेत ह्यावरही विचार करावा.सारेच मार्ग बंद नसतात, इच्छा तिथे मार्ग असतोच असतो,शोधत गेलो तर अनेक वाटा सापडतात पण आपण त्या एकाच रस्त्याने जायचे ठरवले तर ते विनाशकारी चक्रव्यूह ठरते.नंतर पश्चाताप झाला तरी त्यात गरगरत राहावे लागते.

**शेवटी साहिर लुधियानवी यांच्या दोन ओळी...**
**साथी हाथ बढ़ाना,साथी हाथ बढ़ाना**
**एक अकेला थक जाएगा**
**मिलकर बोझ उठाना |**

**– नागेश शेवाळकर, पुणे**

■■■

# मागे वळून पाहताना...

डॉ.पूजा पराग सामंत



हल्लीच कृष्ण जन्मभूमी मथुरेला जाण्याचा योग आला. त्या पवित्र भूमीत प्रवेश करताना कृष्णाची अनेक रूपं डोळ्यांसमोर आली. त्याचबरोबर बऱ्याच दिवसांपूर्वी वाचनात आलेला, 'दुर्गा भागवत' यांनी लिहिलेला कृष्णावरील एक लेख मनात घोळू लागला. दुर्गा भागवत कृष्णाला संबोधून लिहितात "तुझ्याइतका मानवी जीवनात मिसळलेला कुठलाच देव नाही बघ प्रत्येक नातं तू समरसून जगलास आणि वेळ येताच ते नातं त्यागून मोकळा ही झालास. कधी परत वळून बघितलं का रे?तुझ्या मागे त्या माणसांच काय झालं असेल तुझाशिवाय" यातील मला भावलेली गोष्ट म्हणजे, कृष्ण प्रत्येक नातं अगदी समरसून जगला. पण वेळ आल्यानंतर ते नातं त्यागून,त्यातून तो मोकळाही झाला. परत मागे वळून त्याने पाहिले देखील नाही.आपल्या आयुष्यात देखील असं आपल्याला मोकळं होता आलं तर ? किती चांगलं होईल. आपण भूतकाळातल्या अनेक गोष्टींमध्ये रमत जातो. त्या गोष्टी हातातून निसटत आहेत की काय?या भावनेने घाबरूनच आपल्याला वर्तमानात जगणं कठीण होऊन बसतं. वेळ आली की प्रत्येक गोष्ट त्यागून, नवीन गोष्ट अंगीकारणं, भविष्यात चालत राहणं ही कृष्णाकडून शिकण्यासारखी गोष्ट वाटली मला.

मागे वळून बघताना, आपल्याला अशी नाती त्यागून पुढे चालत जाणं जमेल का? आणि परवडेल का?हाही तितकाच महत्वाचा मुद्दा ठरतो. कृष्ण देव होता. त्याला सगळंच माफ होतं. पण तुम्हा-आम्हा सर्वांना भूतकाळ, वर्तमानकाळ आणि भविष्यकाळ यांची सांगड घालतच आपलं आयुष्य जगावं लागतं. त्यात आनंद निर्माण करावा लागतो. पण इथे एक गोष्ट सांगावीशी वाटते,ज्या भूतकाळामुळे, ज्या गोष्टीमुळे त्रास होतो, त्या गोष्टी कृष्णा प्रमाणे त्यागून वर्तमानात जगणं काय वाईट आहे ?

भूतकाळातल्या आठवणींमध्ये जास्त रमतात त्या स्त्रिया. कारण पुरूषांपेक्षा संवेदनशील मन हे स्त्रीला प्राप्त असतं. म्हणूनच तर बालपण,माहेर,सासर अशा अनेक गोष्टींमध्ये स्त्री अधिक गुंतत जाते.आणि हे आत्तापर्यंत सिद्ध देखील झालं आहे. लग्न झालेली प्रत्येक स्त्री ही आपल्या माहेरात, तिथल्या आठवणींमध्ये कित्येक वर्ष अडकून राहते. पण तेही अगदी बरोबरच आहे म्हणा. जिथे आयुष्याची इतकी वर्ष आपण घालवली आहेत,ते आपण कसं विसरू शकू ? मी किंवा अन्य कोणी आपल्याला आजचा दिवस, आजचा क्षण असाच थांबून राहावा, आजची नाती अशीच कायम राहावीत. काळ पुढे सरकू नये असंच मनात येत राहतं.

खरंतर आयुष्य म्हणजे गंमतच आहे. कधीकधी मनातील ढग नुसतेच दाटून येतात आणि मन सैरावैरा इतरत्र धावू लागतं. त्यावेळी भूतकाळातील रम्य आठवणी, तुटलेल्या मनाचे बांध सांधण्यासाठी धावून येतात.तो असतो 'स्वतःचाच स्वतःशी' असलेला संवाद. मला वाटतं कृष्णाने मागे वळून न बघता आपला रस्ता चालत राहणं

स्वीकारलं. पण तिथेच राधेला मात्र भूतकाळातील रम्य आठवणीनेच जगण्याला ऊर्मी दिली. राजा नंद, यशोदा मैया यांनादेखील कृष्णाच्या भूतकाळातील बाललीला आठवणींनी जगण्याचं बळ दिलं. भूतकाळातील सुखद आठवणींचा क्षणनक्षण वर्तमानातल्या मैफिलीला दरवळून टाकतो. असाच काहीसा तो अनुभव असावा.

मला मागे वळून पाहताना बालपणीचे दिवस आठवतात. कोणतीही जबाबदारी नाही, कोणतंही कर्तव्य नाही. संपूर्ण दिवस कसा हसत-खेळत घालवायचा. अभ्यासाचं देखील टेन्शन नसायचं. तेव्हा छोटया-छोटया कुरबुरी असायच्या. मैत्रिणींचा रुसवा-फुगवा असायचा. पण आता हे सर्व आठवताना देखील चेहऱ्यावर एक स्मितहास्य येतं. कुठल्याही अपेक्षांचं ओझं नसणारं आयुष्यच सुंदर होतं. आयुष्यात असे मागे वळून पाहताना मन मात्र रम्य आठवणीत हरवून जातं. आपलं गाव, आपली माणसं, आपली नाती, आपले संस्कार, आपला अभिमान कितीतरी गोष्टी डोळ्यांपुढे तरळू लागतात. कधीकधी याच आठवणी अलगद गालांवरही ओघळतात.

आपल्याला जगताना सारखं भूतकाळात मागे वळून बघण्याची सवय असतेच असते. पण काहींना मागे वळून पाहताना कधीकधी मोजक्याच गोष्टी आठवतात म्हणजे अगदी चुकलेली गणितं, अपूर्ण राहिलेले क्षण.अशावेळी आयुष्यातील सारी ओझी विसरून आयुष्याची वाट चालत राहणं गरजेचं ठरतं. कृष्णासारखं आपल्याला सर्व भूतकाळातील सर्व त्यागून, मागे वळून न बघता पुढे जाणं सहजशक्य होणार नाही. पण मागे वळून बघताना जर दुःख, वेदना यामुळे पुढे जाणं कठीण होत असेल; तर कृष्णाप्रमाणे ते सर्व त्यागुन पुढे जाण्यातच शहाणपणा ठरतो. भूतकाळाकडे, त्यातील दुःखद क्षणाकडे बोट दाखवून काहीच फरक पडत नसतो आणि भूतकाळात चुकलेली गणित खोडताही येत नसतात नि सुधारताही येत नसतात.

चला तर मग, जीवनात मागे वळून बघताना सुखद क्षण हळुवार झेलत, दुःखद क्षणांना तिलांजली देत, आपलं आयुष्य आनंदाने किनाऱ्यापर्यंत 'स्वतः' नीट अनुभवत जगूया. अशा या भूतकाळातील सुंदर आठवणींच्या फुलांची उधळण करत वर्तमानकाळातील आयुष्याचा रस्ता सुंदर फुलांनी सजवूया. म्हणूनच तर वाटतं, कधी तरी मागे वळून बघूया.

**डॉ.पूजा पराग सामंत**
**औंध, पुणे.**

■■■



# गोमातेचे (देशी गायीचे) आध्यात्मिक महत्व स्पष्ट करणारे महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाचे संशोधन!

सौ. मधुरा धनंजय कर्वे

**प्रस्तावना**

जगभरातील जिज्ञासूंना अध्यात्म अन्?साधना यांचे महत्व समजावे आणि सर्वांनी स्वतः साधना करून आनंदप्राप्ती करून घ्यावी,यांसाठी परात्पर गुरु डॉ.आठवले आधुनिक वैज्ञानिक परिभाषेत अध्यात्म अन्? साधना समजावून सांगतात. यासाठी वर्ष २०१४ पासून 'महर्षि अध्यात्म विश्वविद्यालया'च्या वतीने हिंदु धर्मातील आचार, धार्मिक कृत्ये, सामाजिक कृत्ये (उदा. दीप प्रज्वलन, उद्घाटन इत्यादी), यज्ञ,अनुष्ठान,मंत्रपठण इत्यादी विषयांचे आध्यात्मिक महत्व आधुनिक वैज्ञानिक परिभाषेत समजावून सांगण्यासाठी परात्पर गुरु डॉ.आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली वैज्ञानिक स्तरावर संशोधन करण्यात येत आहे.यासाठी 'इलेक्ट्रोसोमॅटोग्राफिक स्कॅनिंग', 'यूनिव्हर्सल ऑरा स्कॅनर (यू.ए.एस)', 'पॉलीकॉन्ट्रास्ट इंटरफेरन्स फोटोग्राफी (पी.आय.पी.)', 'थर्मल इमेजिंग', 'गॅस डिस्चार्ज व्हिजुअलायझेशन (जी.डी.व्ही.)' इत्यादी आधुनिक वैज्ञानिक उपकरणे आणि प्रणाली यांचे साहाय्य घेण्यात येत आहे. या संशोधन कार्याला पंचज्ञानेंद्रिये, मन आणि बुद्धी यांच्या पलीकडील ज्ञानाची, म्हणजे सूक्ष्म परीक्षणाची जोड देऊन विश्लेषण करण्यात येत आहे.

'हिंदु संस्कृतीत गायीला 'गोमातेचे' स्थान दिले आहे. गोमाता मुळातच सात्विक आहे. तिचे दूध, गोमूत्र आणि गोमय (शेण) यांमध्येही सात्विकता असते. त्यामुळे गायीचे दूध,गोमूत्र आणि गोमय यांचा उपयोग यज्ञयाग अन्? धार्मिक विधी यांमध्ये केला जातो. पूर्वी भारतातील प्रत्येक घरामध्ये गाय होती. प्रत्येक जण गोमातेचे दूध पीत असे. या दुधामुळे माणसे निरोगी, बुद्धीमान आणि बलशाली होती.गोमूत्र आणि गोमय यांचा वापर शेतीमध्ये होत असे. त्यामुळे झाडेझुडुपेही रोगमुक्त आणि सशक्त होती. आता मात्र देशी गायीपेक्षा विदेशी गाय आणि म्हैस यांचे दूध वापरण्याकडे लोकांचा कल दिसून येतो. या लेखाद्वारे आपण गोमातेचे (देशी गायीचे) आध्यात्मिक महत्व स्पष्ट करणारे महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाने केलेले संशोधन पाहूया.

'विदेशी गाय, म्हैस आणि देशी गाय यांच्याकडून वातावरणात प्रक्षेपित होणाऱ्या स्पंदनांचा वातावरणावर काय परिणाम होतो ?',हे विज्ञानाद्वारे अभ्यासण्यासाठी एक चाचणी करण्यात आली.या चाचणीसाठी 'पी.आय.पी. (पॉलीकॉन्ट्रास्ट इंटरफेरन्स फोटोग्राफी)'या तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात आला. या तंत्रज्ञानाद्वारे एखाद्या वस्तूची सामान्यपणे डोळ्यांना न दिसणारी,अशी रंगीत प्रभावळ (ऑरा) पहाता येते.

या प्रयोगात चाचणीसाठी छायाचित्रे ठेवण्यापूर्वी 'पी.आय.पी.' तंत्रज्ञानाद्वारे वातावरणाचे छायाचित्र घेण्यात आले. ही 'मूलभूत नोंद' होय. त्यानंतर एकेक करून विदेशी गाय, म्हैस आणि देशी गाय यांची छायाचित्रे ठेवून त्यांची 'पी.आय.पी.' छायाचित्रे घेण्यात आली. या छायाचित्रांचा तुलनात्मक अभ्यास केल्यानंतर 'विदेशी गाय,म्हैस आणि देशी गाय यांच्या छायाचित्रातून प्रक्षेपित होत असलेल्या स्पंदनांचा वातावरणावर काय परिणाम होतो ?', हे समजले.

प्रथम आपण 'पी.आय.पी. (पॉलीकॉन्ट्रास्ट इंटरफेरन्स फोटोग्राफी) या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने केलेल्या वैज्ञानिक चाचणीतील 'पी.आय.पी.'छायाचित्र आणि निरीक्षणे समजून घेण्याच्या दृष्टीने उपयुक्त सूत्रे पाहूया.

**१. पी.आय.पी. तंत्रज्ञानाची ओळख**

१ अ. चाचणीतील घटकांची आध्यात्मिक स्तरावरील वैशिष्ट्ये वैज्ञानिक उपकरण किंवा तंत्रज्ञान याद्वारे अभ्यासण्याचा हेतू

एखाद्या घटकात (वस्तू, वास्तू, प्राणी आणि व्यक्ती यांत) किती टक्के सकारात्मक स्पंदने आहेत ? तो घटक सात्विक आहे कि नाही किंवा तो घटक आध्यात्मिमकदृष्टया लाभदायक आहे कि नाही ?, हे सांगण्यासाठी सूक्ष्मातील कळणे आवश्यक असते. उच्च पातळीचे संत सूक्ष्मातील जाणू शकत असल्याने ते प्रत्योक घटकातील स्पंदनांचे अचूक निदान करू शकतात. भाविक आणि साधक, संतांनी सांगितलेले शब्द प्रमाण मानून त्यावर श्रद्धा ठेवतात; परंतु बुद्धीप्रामाण्यवाद्यांना मात्र शब्दप्रमाण नाही, तर प्रत्यक्ष प्रमाण हवे असते. त्यांना प्रत्येक गोष्ट वैज्ञानिक उपकरण किंवा तंत्रज्ञान याद्वारे सिद्ध करून दाखवली असेल,तरच ती खरी वाटते.

१ आ.पी.आय.पी.तंत्रज्ञानाच्या साहाय्याने घटकांची सकारात्मक आणि नकारात्मक स्पंदने रंगांच्या माध्यमातून दिसण्याची सुविधा असणे

या तंत्रज्ञानाद्वारे आपण एखाद्या घटकाची (वस्तू, वास्तू, प्राणी आणि व्यक्ती यांची) सामान्यपणे डोळ्यांना न दिसणारी अशी रंगीत प्रभावळ (ऑरा) पाहू शकतो. पी.आय.पी. या संगणकीय प्रणालीला व्हिडीओ कॅमेऱ्याशी जोडून त्याद्वारे वस्तू,वास्तू,प्राणी किंवा

व्यक्ती यांची ऊर्जाक्षेत्रे विविध रंगांत पहाता येतात.यात सकारात्मक आणि नकारात्मक स्पंदने रंगांच्या माध्यमातून दिसण्याची सुविधा आहे.




पी.आय.पी. तंत्राज्ञानाच्या साहाय्याने चाचणी करणे

## २. चाचणीसंबंधाने घेतलेली दक्षता

अ. या चाचणीची पिप छायाचित्रे घेण्यासाठी विशिष्ट कक्ष (खोली) वापरण्यात आला.या कक्षाच्या भिंती,छत आदींच्या रंगांचा चाचणीतील घटकाच्या प्रभावळीतील रंगांवर परिणाम होऊ नये, यासाठी भिंती,छत आदींना पांढरा रंग दिला होता.

आ. संपूर्ण चाचणीच्या वेळी कक्षातील प्रकाशव्यवस्था एकसारखीच ठेवली होती,तसेच कक्षाबाहेरील हवा,प्रकाश,उष्णता यांचा कक्षातील चाचणीवर परिणाम होऊ नये, यासाठी चाचणीच्या वेळी कक्ष बंदिस्त ठेवण्यात आला होता.

३. चाचणीतील पी.आय.पी. छायाचित्रे आणि निरीक्षणे समजून घेण्याच्या दृष्टीने उपयुक्त सूत्रे

**३ अ. मूलभूत नोंद (वातावरणाची मूलभूत प्रभावळ)**

चाचणीमध्ये एखाद्या घटकामुळे वातावरणात झालेला पालट अभ्यासण्यासाठी त्या घटकाचे पी.आय.पी. छायाचित्रे घेतात; पण वातावरणात सातत्याने पालट होत असल्यामुळे घटकाची चाचणी करण्यापूर्वी घटक ठेवणार असलेल्या वातावरणाचे पी.आय.पी. छायाचित्र प्रथम घ्यावे लागते. याला मूलभूत नोंद म्हणतात.नंतर घटकाच्या पी.आय.पी. छायाचित्राची मूलभूत नोंदीशी (वातावरणाची मूलभूत प्रभावळ दर्शवणाऱ्या पी.आय.पी.छायाचित्राशी)तुलना केल्यानंतर त्या घटकामुळे वातावरणात झालेला पालट लक्षात येतो.

३ आ.मूलभूत नोंदीच्या तुलनेत वस्तूची प्रभावळ दर्शवणाऱ्या पी.आय.पी. छायाचित्रातील रंगांच्या प्रमाणात वाढ किंवा घट होण्यामागील तत्व–

चाचणीसाठी घटक ठेवण्यापूर्वीच्या (मूलभूत नोंदीच्या) तुलनेत घटक ठेवल्यानंतरच्या प्रभावळीतील रंगाच्या प्रमाणात वाढ किंवा घट होते. ही वाढ किंवा घट त्या घटकातून प्रक्षेपित होणाऱ्या त्या रंगाशी संबंधित स्पंदनांच्या प्रमाणानुसार असते,उदा. चाचणीसाठी घटक ठेवल्यानंतर त्यातून चैतन्याच्या स्पंदनांचे प्रक्षेपण पुष्कळ प्रमाणात झाल्यास प्रभावळीतील पिवळ्या रंगाचे प्रमाण वाढते,तर चैतन्याच्या स्पंदनांचे प्रक्षेपण न झाल्यास किंवा इतर स्पंदनांच्या तुलनेत अल्प प्रमाणात झाल्यास प्रभावळीतील पिवळ्या रंगाचे प्रमाण घटते.

**३ इ. प्रभावळीत दिसणाऱ्या रंगांची माहिती**

चाचणीतील वस्तूच्या (किंवा व्यक्तीच्या) पी.आय.पी. छायाचित्रांत दिसणाऱ्या प्रभावळींचे रंग हे त्या वस्तूच्या ऊर्जाक्षेत्रातील विशिष्ट स्पंदने दर्शवतात.प्रभावळीतील प्रत्येक रंगाविषयी पी.आय.पी. संगणकीय प्रणालीच्या निर्मात्यांनी प्रसिद्ध केलेल्या कार्यपुस्तिकेतील (मॅन्युअल मधील) माहिती आणि महर्षि अध्यात्म विश्वविद्यालयाने केलेल्या शेकडो चाचण्यांतील निरीक्षणांचा अनुभव यांच्या आधारे प्रत्येक रंग कोणत्या स्पंदनाचा दर्शक आहे?,ते निश्चित केले आहे.ते खालीलप्रमाणे आहे.

| प्रभावळींचे रंग | रंग | प्रभावळींचे रंग कशाचे दर्शक आहेत ? |
|---|---|---|
| १. नकारात्मक स्पंदने दर्शवणारे रंग | | |
| १ अ. भगवा | | वातावरणातील नकारात्मकता |
| १ आ. नारिंगी | | भावनिक तणाव |
| १ इ. राखाडी | | कार्यरत त्रासदायकता |
| १ ई. गुलाबी | | राजसिकता |
| १ उ. राखाडी हिरवा | | कार्यरत त्रासदायकता |
| | | |
| २. सकारात्मक स्पंदने दर्शवणारे रंग | | |
| २ अ. पोपटी | | सूक्ष्म स्तरावरील आध्यात्मिक उपायक्षमता (टीप १) |
| २ आ. निळसर पांढरा | | शुद्धता किंवा पवित्रता |
| २ इ. पिवळा | | चैतन्य किंवा ज्ञान |
| २ ई. गडद हिरवा | | स्थूल स्तरावरील आध्यात्मिक उपायक्षमता (टीप २) |
| २ उ. हिरवा | | सकारात्मकता |
| २ ऊ. निळा | | सात्त्विकता किंवा शांती |
| २ ए. फिकट गुलाबी | | प्रीती किंवा आनंद |
| २ ऐ. जांभळा | | उच्च स्तरीय शक्तीरूपी कंपने |

टीप १ –घटकाच्या अंतर्बाह्य स्तरांवरील नकारात्मक स्पंदने अल्प किंवा नष्ट करण्याची आणि सकारात्मक स्पंदनांची वृद्धी करण्याची क्षमता

टीप २ – घटकाच्या केवळ बाह्य स्तरांवरील नकारात्मक स्पंदने अल्प किंवा नष्ट करण्याची आणि सकारात्मक स्पंदनांची वृद्धी करण्याची क्षमता

**३ ई. सकारात्मक स्पंदने**

पी.आय.पी. छायाचित्रातील फिकट गुलाबी, पोपटी, निळसर

पांढरा, पिवळा,गडद हिरवा,हिरवा,निळा आणि जांभळा हे रंग अनुक्रमे आध्यात्मिकदृष्ट्या अधिक लाभदायक ते अल्प लाभदायक स्पंदने (रंग) दर्शवतात. या सर्व आध्यात्मिकदृष्ट्या लाभदायक असणाऱ्या स्पंदनांना(रंगांना)लिखाणात एकत्रितपणे सकारात्मक स्पंदने असे संबोधले आहे.

**३ उ. नकारात्मक स्पंदने**

पी.आय.पी. छायाचित्रातील राखाडी,गुलाबी,नारिंगी आणि भगवा हे रंग अनुक्रमे आध्यात्मिकदृष्ट्या अधिक त्रासदायक ते अल्प त्रासदायक स्पंदने दर्शवतात. या सर्व आध्यात्मिकदृष्ट्या त्रासदायक असणाऱ्या स्पंदनांना (रंगांना) लिखाणात एकत्रितपणे नकारात्मक स्पंदने असे संबोधले आहे.

३ ऊ. पी.आय.पी. छायाचित्रात सर्वसाधारणपेक्षा उच्च सकारात्मक स्पंदनांचे दर्शक रंग दिसणे अधिक चांगले असणे

पी.आय.पी.छायाचित्रात पोपटी किंवा निळसर पांढरा हे उच्च सकारात्मक स्पंदनांचे दर्शक असलेले रंग दिसू लागल्यास काही वेळा पिवळा, गडद हिरवा किंवा हिरवा या सर्वसाधारण सकारात्मक स्पंदनांच्या दर्शक रंगांचे प्रमाण घटते किंवा ते रंग पूर्णपणे दिसेनासे होतात.हा चांगला पालट समजला जातो; कारण त्या वेळी सर्वसाधारण सकारात्मक स्पंदनांचे स्थान (जागा) त्यापेक्षाही उच्च प्रतीच्या सकारात्मक स्पंदनांनी घेतलेले असते.

३ ए. पी.आय.पी. छायाचित्रातील रंगांच्या वैशिष्ट्यांचा त्या रंगाच्या प्रत्यक्षातील आध्यात्मिक वैशिष्ट्याशी संबंध नसणे


पी.आय.पी.संगणकीय प्रणालीच्या निर्मात्यांनी पी.आय.पी. छायाचित्रात नकारात्मक स्पंदनांसाठी भगवा आणि नारिंगी, हे रंग निर्धारित केले आहेत. त्याचा आणि त्या रंगांच्या प्रत्यक्षातील आध्यात्मिक वैशिष्ट्यांचा (उदा. भगवा रंग त्याग अन्? वैराग्य यांचे प्रतीक आहे.) कोणताही संबंध नाही.

**गोमातेचे (देशी गायीचे) आध्यात्मिक महत्व स्पष्ट करणाऱ्या संशोधनाची चित्रे!**


**विदेशी गाय (होल्स्टिन फ्रिजियन), म्हैस आणि देशी गाय (भारतीय गोमाता) यांतील आध्यात्मिक स्तरावरील भेद स्पष्ट करणारी 'पी.आय.पी.' या तंत्रज्ञानाच्या साहाय्याने केलेली वैज्ञानिक चाचणी**

सूचना: ही वातावरणातील प्रभावळीची चाचणी असल्याने 'पी.आय.पी.' (पॉलीकॉन्ट्रास्ट इंटरफेरन्स फोटोग्राफी)' छायाचित्र क्र. २, ३ अन् ४ यांची तुलना मूलभूत प्रभावळीशी (छायाचित्र क्र. १ शी) करतांना छायाचित्रांतील पटल, तसेच प्राण्यांची छायाचित्रे यांवरील रंग येथे ग्राह्य धरलेले नाहीत.

**१. चाचणीसाठी छायाचित्र ठेवण्यापूर्वी रिक्त स्थान : वातावरणाची मूलभूत प्रभावळ**





**२. विदेशी गाय (होल्स्टिन फ्रिजियन) : वातावरणातील नकारात्मकता पुष्कळ वाढणे**





टीप : येथे सकारात्मकतेच्या हिरव्या रंगाची व्याप्ती वाढलेली दिसत असली, तरी चैतन्याच्या पिवळ्या रंगाची व्याप्ती पुष्कळ घटली आहे.

**३. म्हैस : वातावरणातील नकारात्मकता थोडी वाढणे**




**४. देशी गाय (भारतीय गोमाता) : वातावरणातील नकारात्मकता पुष्कळ घटणे आणि पवित्रता वाढणे**




टीप : येथे सकारात्मकतेचा हिरवा रंग दिसत नाही; मात्र त्याहीपेक्षा उच्च प्रतीचा पवित्रतेचा निळसर पांढरा रंग पुष्कळ प्रमाणात दिसत आहे.

**४. वैज्ञानिक चाचणीतील 'पी.आय.पी.' छायाचित्रांतील (प्रभावळीतील) नकारात्मक आणि सकारात्मक स्पंदनांचे एकूण प्रमाण,तसेच सकारात्मक स्पंदनांपैकी काही महत्वाच्या स्पंदनांचे प्रमाण (टक्के)**

| पी.आय.पी.' छायाचित्रे | 'पी.आय.पी.' छायाचित्रांतील नकारात्मक अन् सकारात्मक स्पंदनांचे प्रमाण (टक्के | | 'पी.आय.पी.' छायाचित्रांतील सकारात्मक स्पंदने दर्शवणाऱ्या काही महत्त्वाच्या रंगांचे प्रमाण (टक्के) | | |
|---|---|---|---|---|---|
| | नकारात्मक स्पंदने दर्शवणाऱ्या रंगांचे एकूण प्रमाण | सकारात्मक स्पंदने दर्शवणाऱ्या रंगांचे एकूण प्रमाण | पिवळा (चैतन्य किंवा ज्ञान) | निळसर पांढरा (शुद्धता किंवा पवित्रता) | पोपटी (सूक्ष्म स्तरावरील आध्यात्मिक उपायक्षमता |
| १. चाचणीसाठी छायाचित्रे ठेवण्यापूर्वी (मूलभूत नोंद) | ३८ | ६२ | ४० | ० | ० |
| २. विदेशी गायीचे छायाचित्र ठेवल्यावर | ५३ | ४७ | ८ | ० | ० |
| ३. म्हशीचे छायाचित्र ठेवल्यावर | ४२ | ५८ | ३० | ० | ० |
| ४. देशी गायीचे छायाचित्र ठेवल्यावर | १४ | ८६ | ३६ | ३० | ५ |

पुढे दिलेल्या विवेचनात चाचणीतील घटकांच्या प्रभावळींची तुलना 'मूलभूत नोंदी'च्या प्रभावळीशी केली आहे.

४ अ. चाचणीसाठी छायाचित्रे ठेवण्यापूर्वी तेथील वातावरणात सकारात्मक स्पंदनांचे एकूण प्रमाण ६२ टक्के आहे. यापैकी चैतन्याच्या पिवळ्या रंगाचे प्रमाण ४० टक्के आहे.

४ आ. विदेशी गायीचे छायाचित्र ठेवल्यावर वातावरणातील सकारात्मक स्पंदनांचे एकूण प्रमाण पुष्कळ घटणे : विदेशी गायीचे छायाचित्र ठेवल्यावर वातावरणातील सकारात्मक स्पंदनांचे प्रमाण ४७ टक्के आहे, म्हणजे मूलभूत नोंदीच्या तुलनेत ते पुष्कळ घटले आहे. यापैकी चैतन्याच्या पिवळ्या रंगाचे प्रमाण ८ टक्के आहे, म्हणजे तेही पुष्कळ घटले आहे.

४ इ. म्हशीचे छायाचित्र ठेवल्यावर वातावरणातील सकारात्मक स्पंदनांचे एकूण प्रमाण घटणे : म्हशीचे छायाचित्र ठेवल्यावर वातावरणातील सकारात्मक स्पंदनांचे प्रमाण ५८ टक्के आहे, म्हणजे मूलभूत नोंदीच्या तुलनेत ते घटले आहे. यापैकी चैतन्याच्या पिवळ्या रंगाचे प्रमाण ३० टक्के आहे, म्हणजे तेही घटले आहे.

४ ई. देशी गायीचे छायाचित्र ठेवल्यावर वातावरणातील सकारात्मक स्पंदनांचे एकूण प्रमाण पुष्कळ वाढणे : देशी गायीचे छायाचित्र ठेवल्यावर वातावरणातील सकारात्मक स्पंदनांचे प्रमाण ८६ टक्के आहे,म्हणजे मूलभूत नोंदीच्या तुलनेत ते पुष्कळ वाढले आहे. यापैकी चैतन्याच्या पिवळ्या रंगाचे प्रमाण ३६ टक्के, शुद्धता किंवा पवित्रता दर्शवणाऱ्या निळसर पांढऱ्या रंगाचे प्रमाण ३० टक्के आणि सूक्ष्म स्तरावरील आध्यात्मिक उपायक्षमतेच्या पोपटी रंगाचे प्रमाण ५ टक्के आहे. यातून लक्षात येते की,देशी गायीचे छायाचित्र ठेवल्यावर वातावरणातील सकारात्मक स्पंदनांचे एकूण प्रमाण पुष्कळ वाढले आहे.विशेष म्हणजे गायीच्या छायाचित्रातून चैतन्यासह पवित्रतेची अन्?सूक्ष्म स्तरावरील आध्यात्मिक उपायक्षमतेचीही स्पंदने प्रक्षेपित झाली आहेत.


## ५. निष्कर्ष

विदेशी गाय आणि म्हैस यांच्या छायाचित्रांमुळे वातावरणातील सात्विकता घटली.याउलट देशी गायीच्या छायाचित्रामुळे वातावरणातील सात्विकतेत पुष्कळ वाढ झाली.याचे कारण हे की, देशी गायीमध्ये ईश्वरी तत्व ग्रहण करण्याची क्षमता आहे, तशी विदेशी गाय आणि म्हैस यांच्यामध्ये नाही. विदेशी गाय आणि म्हैस हे तमोगुणी आहेत,तर देशी गाय सत्वगुणी आहे. त्यामुळे विदेशी गाय अन्? म्हैस यांच्याकडून तमोगुणी स्पंदने,तर देशी गायीकडून सात्विक स्पंदने प्रक्षेपित होतात.

थोडक्यात देशी गायीकडून प्रक्षेपित होणाऱ्या सात्विकतेमुळे वातावरण पुष्कळ चैतन्यमय अन्? पवित्र बनते. 'हिंदु धर्मात गायीला 'गोमाता' म्हणून का पूजतात ?', तेही यातून लक्षात येते.'

**मार्गदर्शक – परात्पर गुरु डॉ. आठवले,**
**संस्थापक, महर्षि अध्यात्म विश्वविद्यालय, गोवा.**
**लेखिका – सौ. मधुरा धनंजय कर्वे,**
**महर्षि अध्यात्म विश्वविद्यालय, गोवा.**

■■■






# फटाके आनंद दायक की हानिकारक

**सौ. स्नेहा मुसरीफ**

आज शाळेतून आल्यापासून सिया गाल फुगवूनच होती.एरव्ही आल्या आल्या चिवचिव करत शाळेतील सर्व गमतीजमती सांगणारी आमची चिऊताई इतकी शांत?म्हणजे नक्कीच काहीतरी बिनसले असणार.पण होमवर्क तर व्यवस्थित केलेला होता काल, मग कुणाशी भांडण वगैरे झाले की काय? सगळ्याच टीचरची ती लाडकी होती .सुट्टी काढत नाही,होमवर्क व्यवस्थित असतो, दररोज युनिफॉर्म सुद्धा स्वच्छ, नीटनेटका असतो, शाळेत सुद्धा अभ्यासाबरोबरंच सर्व ॲक्टिव्हीटीमध्ये कायम पुढे असते. मग काय बरे झाले असेल आज? मी पण विचार करत गप्पच होते.म्हटले आधी फ्रेश होऊन थोडेसे खाल्ले की मग सांगेल.थोडासा वेळ जाऊदे.सगळे झाले तरी ती गप्पच होती. आता मात्र मलाही राहवेना.

तिला जवळ घेतले, आज बरे वाटत नाही का चिऊताईला, काय काय झाले आज स्कुलमध्ये, विचारले मात्र.. एकदम चिडून म्हणाली, बघ ना आजी..आज कविता टीचरनी आम्हाला या वर्षी दिवाळीत फटाके उडवू नका..त्याऐवजी झाडे लावा, छान पणत्या रंगवा, आकाशदिवे, भेटकार्ड बनवा,घरातील सजावटीला मदत करा, आईला फराळ बनवताना मदत करा असे सांगितले. फटाकेच नाहीत तर मग काय मजा दिवाळीची? तुला माहित आहे ना, मला किती मजा येते फटाके फोडायला.. मागे एकदा स्टोरी सांगताना तू पण म्हणाली होतीस किनई, तुम्ही पण दिवाळीत खूप मजा करत होता, फटाके फोडत होता. मग आता आम्हालाच का नको म्हणत आहेत ..खरंच स्मरणशक्ती खूप छान आहे बरंका तिची? मला आठवले,गोष्ट सांगताना एकदा तिने माझ्या लहानपणी कशी होती ग आज्ञी दिवाळी,विचारले तेंव्हा मी तिला सांगितले होते..

तुझ्यासारखीच मलाही दिवाळी खूप आवडत होती. दिवाळीच्या सुट्ट्या कधी सुरु होतात असे व्हायचे. हवेत बदल,गारठा जाणवायला लागायचा.गुलाबी थंडी, रंगीत ऊबदार स्वेटर्स घालायचे.गोधडी पांघरून मस्त ताणून द्यायचो.

लहानपणापासुनच दिवाळी म्हटले की मनात कित्येक आनंदांची रंगीबेरंगी कारंजी थुईथुई नाचायला लागायची. रंगीबेरंगी रंगांची अंगणात सुंदर काढलेली रांगोळी, पहाटे उठून केलेले लाल,हिरव्या,पिवळ्या रंगाच्या सुगंधी तेलाने केलेले मॉलिश, मग

मोती साबणाने, सुगंधी केशरी उटण्याने केलेली थंडीत कुडकुडत केलेली गरम गरम पाण्याने मस्त आंघोळ,नंतर नवीन कपडे घालून देवदर्शन करायचे अन मग चिवड्यापासून ते लाडू,करंजी, चकली, अनारसे,शंकरपाळी असे कित्तीतरी फराळाचे एकत्र ताट

भरून दिलेले पदार्थ खायचे,शाळांना सुट्टी असायची.असंख्य बैठे,मैदानी खेळ मनसोक्त खेळायचो. रंगीबेरंगी आकाशदिवे,भरपूर पणत्या,दिवे यांची रोषणाई असायची आणि सर्वांत आवडती आणि ज्या क्षणाची वर्षभर आतुरतेने वाट पाहायचो फटाके उडवण्याचा.. फोडण्याचा तो मुहूर्त आला की आनंद गगनात मावायचा नाही.

बाबा ठराविक फटाके आणायचे खरंतर दरवर्षी,तरीही ते पाहण्याची उत्सुकता अगदी शिगेला पोहोचायची. कधी आणायला त्यांच्याबरोबर जायला मिळाले तर मग तो आनंदोत्सवच असायचा. आमच्यासारखे नशीबवान कुणीच नाही असे वाटायचे. ती रांगेने असलेली फटाक्यांची इतकी सारी दुकाने,त्यातील रंगीत,आकर्षक तऱ्हेतऱ्हेचे फुलबाजी, टिकल्या,तोटे,आपटबार,आगगाड्या,रॉकेट ,लवंगी तोटयांची माळ,त्रिकोणी चिमण्या,भुईचक्र,झाडे असे सारे फटाके पाहून कित्ती घेऊ आणि किती नको असे व्हायचे. पण बाबा मोजके,पण आम्हा भावंडांना पुरतील असे आणायचे.आम्हीही कधी हट्ट केला नाही, आल्यावर ते सर्वांना सारखे वाटून द्यायचे. छोटी



पिंकी मोठ्या आवाजाच्या फटाक्यांना घाबरायची म्हणून तिला आम्ही आमच्यातील फुलबाजी आणि वायर द्यायचो उदार होऊन तेंव्हा आपण मोठे आहोत,मोठेपणाने दिले याचा आनंद वाटायचाखूप.देण्यात सुद्धा खूप आनंद, समाधान असते हे तेव्हाच समजले होते.

फटाके सांभाळून उडवावेत म्हणून आई,बाबा आधीच सूचना द्यायचे. एकेकांनी उडवा,घाई गडबड करु नका,सावकाश ..काळजीपूर्वक उडवावेत म्हणून आमच्या बरोबर ते सुद्धा संपेपर्यंत उभे असायचे लक्ष ठेवण्यासाठी. आळीपाळीने, सावकाश फटाके उडवल्यामूळे भरपूर उडवल्यासारखे समाधान वाटायचे.

फटाके अगदी जपून,पुरवून शेवटी असलेल्या तुळशीच्या लग्नापर्यंत दररोज थोडे थोडे उडवायचो.लवंगी तोटयांची माळ तरी फक्त लक्ष्मीपूजनालाच उडवायचो. एरव्ही या सुट्ट्या करून त्यातले एकेक तोटे उडवण्यात जास्त समाधान वाटायचे.भरपूर तोटे उडवल्याचा आनंद वाटायचा. पहाटे अभ्यंगस्नानाच्या वेळी फुलबाजी उडवायची.दिन दिन दिवाळी ,म्हणत गोल गोल फिरवायची संपेपर्यंत. फराळानंतर मग एकेक टिकल्या दगडाने आपटून फोडण्यात

खूप मजा यायची.भरपूर फोडल्याचा आनंद मिळायचा. म्हणजे कमी फटाकेच उडवायचो पण बाबांच्या सांगण्यावरून हळूहळू, मजा घेत उडवल्यामुळे जास्त आनंद मिळायचा. आपटबार उडवायलाआणि रंगीत आगपेटीतील काड्या ओढून रंगीत ज्वाला पाहताना तर मजा यायचीच पण नागगोळी पेटवली की काळाभोर लांबचलांब नाग फसफसत तयार व्हायचा ते पाहताना तर खूपच गंमत वाटायची.फुलबाज्या झाडे,भुईचक्र यांची तर एक वेगळीच शान असायची.टपटप उडून पडणारी रंगीबेरंगी प्रकाश देणारी छोटीछोटी फुले पडताना पाहून तर ते खूप वेळ पहातच रहावे असे वाटायचे.रॉकेट,भुंग्यांची तर फारच धमाल यायची. कधी कसे उडून कुठे जातील याचा नेमच नसायचा. खूप खूप धम्माल वाटायची. खरे तर तुम्हा मुलांसारखे आम्हालाही एखादेवेळी वाटायचे की अजून थोडे हवे होते फटाके उडवायला! पण मग आईने आम्हाला समजावून सांगितलेले

पटवून दिलेले, जास्त फटाके फोडले तर आपले आजोबा म्हातारे आहेत ना,त्यांना त्रास होईल.. मनी पण घाबरते फटाक्यांना.. अन आपली झाडे ? ती पण दूषित हवा मिळाली तर कोमेजून जातील .. वगैरे सगळे आठवायचे आणि आता बस्स, हे जाणवायचे. पुढे वर्षभर हे सगळे आठवून मजा यायची.एकूणच फटाके उडवण्याचा आनंद म्हणजे स्वर्गसूखच वाटायचे अगदी. या फटाके उडवण्यासाठी तरी दिवाळी लवकर यावी असे वाटायचे. पण खरं सांगू का,त्या काळातील दिवाळीची मजा आता कधी येणारच नाही. कारण त्यावेळी दिवाळीत थंडी इतकी असायची की कुडकुडून,गारठून जायला व्हायचे.कारण


भरपूर मोकळी जागा,हिरवीगार धनदाट झाडे, जंगले,शेते, मळे होते.त्यामुळे हवा स्वच्छ,मोकळी होती. हवेत भरपूर ऑक्सिजन होता,प्रदूषण नव्हते त्यामुळे.पण आता लोकसंख्या वाढ,लोकांच्या वाढत्या गरजा,यामुळे भरपूर प्रमाणात वृक्षतोड झाली, जंगले नष्ट झाली, त्याजागी सिमेंटच्या मोठमोठ्या इमारती बांधल्या जात आहेत. लोकांच्या गरजेपोटी, आनंदासाठी भरभरून वाहने मोठ्ठ्या मोठ्या रस्त्यांवरून इंधनांचा धुर सोडत प्रदूषण करत आहेत. अनेक कारखाने शेत जमिनीवर उभे आहेत.अशा अनेक कारणांमुळे प्रदूषण वाढतच चालले आहे. वाढत्या प्रदूषणाची समस्या दिवसेंदिवस इतकी गंभीर होत चालली आहे की लोकांना अनेक प्रकारचे शारीरिक त्रास,नवनवे रोग पसरत चालले आहेत.यांना कुठे आणि कसा आळा घालावा यासाठी उपाययोजना,नियम करणे भागच आहे. यापैकीच एक उपाययोजना केली गेली आहे ती म्हणजे फटाकेबंदी!

यामुळे बरेच लोक,विशेषतः मुले खूप नाराज झाली आहेत

हे मान्यच आहे,पण काही लोकांच्या काही क्षणांच्या आनंदासाठी कित्येक लोकांना गंभीर आजाराना समोरे जावे लागते, लोकांचे आरोग्य,आयुष्य पणाला लागते. त्यासाठी ही करणे अत्यंत जरुरीचेच आहे.पूर्वी लोकसंख्या कमी होती, फटाकेही कमी प्रकारचे कमी प्रदूषण करणारे आणि लोकांच्या गरजा कमी असल्यामुळे मोजकेच फटाके उडवले तरी त्यातून मिळणारा आनंद खूप मोठा होता. आणि त्यामुळे थोडेसे जरी प्रदूषण होत असले तरी बाकीच्या पर्यावरणातील गोष्टी पूरक असल्यामुळे हानी होत नव्हती.

याच्या अगदी विरुद्ध आताची परिस्थिती,आधीच वाढते असलेले प्रदूषण या गोष्टी तर आहेतच.पण या स्पर्धेच्या युगात जास्तीतजास्त पैसा कमावण्यासाठी नेहमीच्या पारंपारीक फटाक्यांबरोबरंच आता असंख्य प्रकारचे फटाके प्रचंड प्रमाणात बनवले जात आहेत.आधी आकाशात फक्त रॉकेट दिसायचे पण आता सिंगलबार,डबलबार पासून ते सेव्हनबार पेक्षाही असंख्य प्रकारचे वायू,ध्वनी प्रदूषण अगदी प्रचंड प्रमाणात करणारे फटाके प्रमाणाबाहेर निर्माण होऊन ते कितीही किंमत असली तरी आनंदापोटी घेऊन मनसोक्तपणे

उडवले जातात. रंगीबेरंगी चमचमणारे संपूर्ण आकाश बनते फाटक्यांचे आणि त्याच्या बरोबरंच काळेभोर अगदी विषारी वायू सुद्धा सर्वत्र पसरलेले दिसतात. या वायुचा त्रास विशेषतः लहान मुले,वृद्धाना आणि आजारी माणसांना होतो. अगदी मुकी जनावरे सुद्धा यामुळे खूप त्रासली जातात. यात वापरली जाणारी रसायने अत्यंत स्फोटक, हानिकारक असल्याने ती आरोग्याच्या दृष्टीने खूपच घातक असतात. शोभेचे फटाके बनवण्यासाठी जास्त पॉवरची दारू वापरली जाते.याचा इतका अतिरेक होतो की अवघ्या विश्वाला याच्या दुष्परीणामाना तोंड देण्याची वेळ येते. मग हे योग्य आहे का? आपलाच आनंद आपलाच शत्रू बनत असेल तर त्याचा काय फायदा?



याखेरीज दरवर्षी कित्येक ठिकाणी या फटाक्यांमुळे भाजून, किंवा फटाक्यांच्या स्टॉल,दुकानाना आग लागून कित्येकांचे प्राण जातात,कित्येक कायमचे अधू होतात,जखमी होतात मग अशा त्रासदायक गोष्टींना थोडेसे दूर ठेवणेच योग्य आहे ना?हे झाले दिवाळीतील उडवण्याच्या फटाक्यांच्या बाबतीत.पण पूर्वी फक्त फटाके हे दिवाळीतच उडवले जायचे. आता पाहिले तर काहीही छोटे,मोठे आनंदाचे कार्यक्रम असले की फटाके उडवतातच. मग लग्न कार्य असो किंवा निवडणूक जिंकून आल्यावर मिळालेले यश साजरे करण्यासाठी! आनंद साजरा करण्याचे साधन म्हणून जेवढा आनंद मोठा तेवढे जास्त फटाके उडवतात.अगदी कानठळ्या बसवणारे,वायू प्रदूषण करणारेच फटाके आणि शोभेचे जास्त प्रमाणात असतात.खरेतर हे पण आपण सर्वांनी मनाने आणि एकमताने ठरवून थांबवायला हवे. आपल्या आणि समाजाच्या हिताचा विचार करणे सर्वांत जास्त महत्वाचे आहे.यांचबरोबर दुसरी गोष्ट अशी की,आपण ज्या लक्ष्मीचे पूजन या दिवसात करतो,त्या लक्ष्मीचे चित्र असलेले तोटे,फटाके आपण पेटवतो.ते फुटले की त्याचे असंख्य तुकडे होऊन जागोजागी विखूरले जातात. त्याचा अक्षरशः कचरा होतो. जे फटाके आनंद मिळवण्यासाठी फोडतो,त्याचेच तुकडे तुकडे होऊन जातात.तो कचरा पायदळी तुडवला जातो. आपण पैशाला लक्ष्मीच मानतो.मग या पैशाने विकत आणलेल्या फटाक्यांचाच आपण उडवून राख ,कचरा करणे योग्य वाटते का ? आपल्या आनंदासाठी आपण कचरा करणार आणि आजूबाजूचा परिसर खराब करून, प्रदूषित करून टाकणार आणि ते साफ करण्यासाठी मात्र सफाईकामगार कष्ट करणार,हे किती चुकीचे आहे ! यांचबरोबर हे सुद्धा पहावे की हे फटाकेबंदीचे बंधन फक्त दिवाळीसाठीच का? इतर सर्व समाजातील सर्व सणांच्या वेळी, उत्सवाच्या काळात सुद्धा ही तशीच सक्तीने करण्यात आली पाहिजे.

यासाठी कित्तीतरी फाटक्यांचे कारखाने, कामगार राबतात. कित्येकांना रोजगार मिळतो.यासाठी अगदी पूर्णपणे बंदी करणे शक्यही नाही आणि योग्यही नाही ,पण त्यातल्यात्यात कमी प्रदूषण करणाऱ्या फटाक्यांचे उत्पादन करण्याची परवानगी लायसन्स दिले जावे. त्यामुळे ते उडवून सर्वांना सणाचा आनंद पण मिळेल आणि प्रदूषण सुद्धा कमी होईल. फटाके बनवणाऱ्या कामगारांना वेगळा दृष्टिकोन द्यावा. दिवाळीत लोकांना खूप गोष्टींची गरज असते फटाक्यांच्या शिवायही! त्या म्हणजे आकाशदिवे,रंगीत हार,माळा, सजावटीच्या, शोभेच्या वस्तू,रंगीत पणत्या,कपडे,दागिने ..या वस्तू बनवाव्यात. म्हणजे उलट त्यांना जास्तच फायदा होईल. असा सुवर्णमध्य काढून त्याचबरोबर सणाना वृक्षारोपण करून पर्यावरणाचा समतोल पण व्यवस्थित राखला जाईल याची सर्वांनीच काळजी घेतली तर सणांचा सर्वांनाच खरा आनंद लुटता येईल. हो ना?

म्हणून तर तुझ्या कविता टीचरने सांगितले असेल ना सिया ,फटाके उडवू नका म्हणून?बरोबर आहे किनई त्यांनी सांगितलेले? आता मात्र चिऊताईला मनापासून हे पटलेले दिसले. चेहऱ्यावरचा रुसवा दूर पळून गेला होता.ती म्हणाली, हो आज्ञी, बरोबर आहे गं.. आता यंदा मला फटाके नकोतच आणि माझ्या सगळ्या फ्रेंडसना पण सांगते हेच. मलाही आता खूप समाधान वाटले रुसवा गेल्यामुळे.

**सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.**

■■■

सुतेजा सुभाष दांडेकर

# नशिबाचे भोग



"आहे का जुना पत्रा, लोखंड, प्लॅस्टिक, भंगार. ताई माई अक्का ऐका सगळ्यांनी,आहे का भंगार? टेम्पोवाला आला टेम्पो घेऊन तुमच्या दारी.रद्दी, जुना पत्रा, लोखंड, प्लॅस्टिक भंगार आहे का?"

असे ओरडत एक टेम्पोवाला रोज सकाळी नऊ वाजता दारोदारी यायचा.ही गोष्ट साधारण ८० व्या शतकातली आहे.तेव्हा एवढे भंगारवाले ही नसायचे.आता म्हणजे एक भंगारवाला गेला की दुसरा येतो अशी परिस्थिती आहे.तर हा भंगारवाला–आपल्याला भंगारवाला म्हटलं की रंगाने काळा, केसाला तेल नसलेला,केस अस्ताव्यस्त असलेला,कुठले तरी जुने पुराणे कपडे घातलेला,ते कपडे तरी धड आहेत का नाहीत अशी परिस्थिती.पण हा तेंव्हाचा भंगारवाला अप टू डेट असायचा.सगळ्यांना आश्चर्य वाटायचं इतका हँडसम दिसणारा भंगारवाला कसा काय घरोघरी जात आहे? त्याला बघण्यासाठी म्हणून,आपले थोडेसे भंगार देण्यासाठी म्हणून, घराघरातून बायका, मुली बाहेर यायच्या. कारण तो खरोखरच दिसायला सुरेख होता. टेम्पोमध्ये तो एकटाच असायचा. त्याच्या हाताखाली कोणीही सहकारी नसायचा. रद्दी, पत्रा, लोखंड, प्लॅस्टिक याचे व्यवस्थित वजन करून योग्य ते पैसे समोरच्या व्यक्तीला द्यायचा मग पुढे जायचा. रविवारी तर आवर्जून सगळ्याजणी याची वाट बघत असायच्या. कारण रविवारी यजमानांना, मुलांना हाताशी घेऊन घर आवरायला घेतलेले असायचे. त्यामुळे भंगार बरेच निघायचे.

तर असा हा भंगारवाला याचे नाव शशांक हे सगळं एका घरातली आजीबाई रोज बघत होती. तिला राहावंल नाही म्हणून तिने एक दिवस टेम्पो थांबवला.

" काय आजी, तुमच्याकडेही काही आहे का भंगार?"

आजी म्हणाली,"नाही रे बाबा, मीच आता भंगारमध्ये निघाली आहे. तुला कुठे काय देऊ? माझ्याकडे काही देण्यासारखे नाही, फक्त प्रेम व माया आहे देण्यासाठी दोन मिनिटं येशील का आंत."

"असं काय म्हणता आजी,आलोच.असे असे म्हणून शशांक टेम्पोमधून खाली उतरला व आजींच्याकडे गेला. प्रथम आजींना वाकून नमस्कार केला.आजींना ते बघून इतके भरून आले की डोळ्यातून पाणी येऊ लागले.

'अरे, किती छान संस्कार केले आहेत तुझ्यावर आई–वडिलांनी. बस तुला पाणी देते.आज मी गरम गरम उप्पीट केले आहे ते तुला खायला देणार आहे. रोज बघत आहे, एवढा जोर जोरात ओरडत असतोस, अर्थात तुझा तो व्यवसाय आहे, त्यामुळे तुला हे काम केलेच पाहिजे. प्रथम जरा पाणी घे . आता गरम गरम उप्पीट खा. शांतपणे बस जरा आणि मला सांग तू हा व्यवसाय का पत्करला आहेस?"

आजी, त्याआधी मी तुम्हाला सांगतो, उप्पीट मस्त झालेले

आहे . गरम गरम उप्पीट मिळणे यासाठी सुद्धा योग यावा लागतो. आज चांगलाच योग आलेला आहे."

अरे बाबा, मला रोज वाटायचं तुला हाक मारावी. पण तुझे कपडे बघून मला वाटायचं माझ्या म्हातारीच्या घरात तू येशील का नाही?"

अहो आजी, असे काय म्हणता?मी तर तुमचा नातूच आहे. मला तर तुमच्यासारख्यांचे आशीर्वाद कायम पाहिजे आहेत." "खरच रे बाबा, आता परत कधी काही वेगळे केले की तुला हाक मारत जाईन, ये मात्र आजीच्या घरी."

'हो हो,नक्की येणार आजी, चला येऊ का आता मी,व्यवसाय करायचा आहे ना! परत एकदा नमस्कार करतो."

अरे, भरपूर छान व्यवसाय होऊ दे तुझा पण मला एक सांग तुला जर वाईट वाटत नसेल तर तू माझ्या प्रश्नाचे उत्तर दिले नाहीस – तू हा व्यवसाय का पत्करला आहेस?"

का

अरे खरंच की.खाण्याच्या नादात हे विसरूनच गेलो मी. त्याचे काय आहे माहिती आहे

माझे नाव शशांक. माझे वडील धनंजय, आई विद्या. यांचा एकुलता एक मुलगा. मला त्यांनी लहानपणापासून लाडाकोडामध्ये वाढवले. माझी सगळी हौस पुरवली. मला चांगल्या शाळेमध्ये घालून योग्य प्रकारे शिक्षण द्यायचे ठरवले नंतर चांगले कॉलेज असे करत करत मी इंजिनियर झालो.पुढील शिक्षणासाठी मी परदेशात गेलो.तिथे डबल ग्रॅज्युएट झालो.बाबांना आपल्या मुलाचा खूप अभिमान वाटला. बाबा स्वतः शून्यातून वर आलेले होते तरीसुद्धा त्यांनी व त्यांच्या पत्नीने–विद्याने काटकसरीने संसार करत करत मला योग्य पद्धतीने वाढवले.ते स्वतः एका बँकेमध्ये मॅनेजर पदापर्यंत पोहोचलेले होते . हळूहळू बाबांनी स्वतःची जागा घेऊन त्याच्यावर दोन मजली बंगला बांधला.सर्व काही स्वतःच्या कर्तृत्वावर केले.त्यामुळे त्याचा त्यांना अभिमान वाटत होता.आणि सोबत आईची त्यांना चांगली साथ होती.मी आता परदेशातून परत आलो व नोकरी शोधू लागलो पण माझ्या शिक्षणाच्या मानाने मला इथे नोकरी मिळेना.खूप प्रयत्न केले.बाबांनीही खूप प्रयत्न केले पण कुठेच मनासारखी नोकरी मिळत नव्हती.आता बाबांनी नाईलाजास्तव ज्योतिषाला विचारायचा निर्णय घेतला व ते ज्योतिषाकडे गेले. ज्योतिषाने विचारले,"शशांकची पत्रिका केली आहे का?"

" नाही."

" मग पहिले शशांकची पत्रिका करू या. मग त्या पत्रिकेचे मी वाचन करून तुंम्हाला सर्व काही सांगेन."

त्याप्रमाणे शशांकची जन्मवेळ, जन्म ठिकाण सांगून पत्रिका बनवली व त्याप्रमाणे ज्योतिषाने सांगितले की,

खरे तर हा परदेशात शिकून डबल ग्रॅज्युएट होऊन आलेला आहे .पण याच्या पत्रिकेनुसार हा एक तर भंगाराचा धंदा करेल किंवा कांदे बटाटे विकण्याचा धंदा करेल. मला हे सांगायला कठीण जात आहे पण जे पत्रिकेत आहे ते खरे काय ते तुंम्हाला सांगितलेच पाहिजे. तुंमच्या या सुसज्ज घरामध्ये, सुशिक्षित घरामध्ये, हे असे सांगणे म्हणजे मला धाडसच करायला लागत आहे पण ठीक आहे. बघा, पण मी तुंम्हाला एक नक्की सांगतो अर्थात पत्रिकेवरूनच त्याने या दोन्हीपैकी कोणताही एक व्यवसाय स्वीकारला तर त्याची भरभराट होईल .पुढे त्याचे लग्न, मुले यामध्ये कुठेही अडथळा येणार नाही. बघा विचार करून."

हे सर्व ऐकून गोंधळलेल्या परिस्थितीमध्ये सगळेजण घरी आले व विचार करत बसले. काय करायचे आता? शेवटी मीच धाडस करून आई–बाबांना म्हणालो, "मी इतके ठिकाणी नोकरीसाठी प्रयत्न केले,तुम्ही पण माझ्यासाठी प्रयत्न केले, आपल्याला कुठेच काही जमले नाही, तर ठीक आहे त्यांच्या म्हणण्याप्रमाणे हे ही करून




पाहू या. झाला उपयोग तर झाला, नाही तर सोडून दिला.ते म्हणतात ना

'गाजराची पुंगी वाजली तर वाजली, नाहीतर मोडून खाल्ली तसे आपण करू या."

बाबा म्हणाले,"ठीक आहे, तुझी तयारी आहे ना! मग आमची काही हरकत नाही .नाहीतर तुलाच वाटेल मी इतका डबल ग्रॅज्युएट झालेलो आहे आणि मी असला व्यवसाय करायचा? पण ठीक आहे, तुझ्या मनाने उचल घेतली आहे तर करू या त्यापैकी एक व्यवसाय."

"पण बाबा एकच सांगतो, मी आता पहिल्यांदा भंगार गोळा करू शकतो.पण पुण्यात सायकलवरून दिवसभर गल्लोगल्ली फिरणे हे


जरा मला अशक्य आहे. त्यासाठी तुम्ही मला पहिल्यांदा एक टेम्पो विकत घेऊन द्या. टेम्पोमध्ये फिरून मी सर्व भंगार गोळा करेन. माझा व्यवसाय जेव्हा भरभराटीला येईल,मला जेव्हा यामध्ये फायदा होईल तेव्हा मी तुम्हाला तुमचे टेम्पोचे पैसे परत करीन चालेल का तुम्हाला?"

" हो चालेल . "

असे म्हणून बाबांनी मला टेम्पो विकत घेऊन दिला आणि हा टेम्पो घेऊन निघालो गल्लो गल्ली आणि भंगार गोळा करायला सुरुवात केली. अशा तऱ्हेने आजी हा माझा व्यवसाय सुरू झालेला आहे. चला येऊ का मी आता परत एकदा धन्यवाद."

अरे, पण मला सांग हे सगळं भंगार घेऊन तू करतोस काय?"

"आजी तुमचे प्रश्न संपतच नाहीत. आई-बाबांनी सुद्धा मला एवढे प्रश्न विचारले नाहीत.पण सांगतो तुम्हाला कारण तुम्ही प्रेमाने विचारत आहात.तुम्हालाही काळजी आहे ना नातवाची म्हणून



तुम्ही विचारत आहात.काही नाही हे सगळं भंगार घ्यायचं त्यातील प्लॅस्टिक, पत्रा ,लोखंड,रद्दी सगळे वेगवेगळं करायचं व आमच्या वरती एक मोठा भंगारवाला असतो त्याचे एक मोठं दुकान असतं. त्या दुकानांमध्ये नेऊन हे सगळं घालतो. समजा मला तुम्ही आत्ता दहा रुपये किलोप्रमाणे भंगार दिले आहे तर मी ते पंधरा रुपये किलोने त्या दुसऱ्या मालकाला विकतो. म्हणजे प्रत्येक किलो मागे मला पाच रुपये फायदा होतो.आता हा जो मालक आहे तो हेच भंगार पुणे मुंबई या ठिकाणी वीस रुपये/ तीस रुपये किलो याप्रमाणे विकतो त्यामुळे त्या मालकालाही फायदाच होतो. पुणे मुंबई वाले काय करतात हे सगळं भंगार वेगवेगळे वितळतात प्लॅस्टिक वेगळं पत्रा वेगळा, लोखंड वेगळं आणि या सगळ्यातून वेगवेगळ्या वस्तू तयार करतात व त्या विक्रीसाठी दुकानांमध्ये, कारखान्यांमध्ये येतात. असे हे सगळं चक्र असते. मी तुला सांगतोय या भंगारच्या व्यवसायामध्ये प्रत्येक जणच फायदा घेत असतो. सर्वजणच मालक होऊन जातात कळले का आजीबाई. फायदा बघितल्याशिवाय कोणताही धंदा होत नाही आणि मी तर त्याची डिग्री केलेली आहे. एम. बी. ए. त्यामुळे मला फायदा कसा काढायचा हे बरोबर समजते. म्हणजे आपण घेतलेल्या शिक्षणाचा उपयोग होतोच की नाही. कळले का आजी? कुठलाही व्यवसाय गौण नाही फक्त तो मनापासून केला पाहिजे."

"कळले बर, जा बाबा तुझा खूप वेळ घेतला."

आता शशांक हा व्यवसाय खूप भरभराटीला आलेला असतो. त्यातून तो वडिलांचे टेम्पोचे पैसे परत देतो.शिवाय स्वतःसाठी जागा खरेदी करतो. स्वतः घर बांधतो. म्हणजे भंगारवाल्यांना सुद्धा किती फायदा होतो बघा. त्या घराला नाव काय देतो माहिती आहे का 'स्वप्नपूर्ती .कारण त्याला नोकरीचे स्वप्न होते ते त्याला हे भंगारच्या रूपात पूर्ण करायला लागले. असो, जे होते ते चांगल्यासाठी आई-वडिलांनाही खूप कौतुक वाटते की शशांकने एकदम वेगळी वाट निवडून, ती वाट चोखंदळपणे पुढे नेलेली आहे. त्यामध्ये त्याला काहीही गैर वाटले नाही. आता एवढे स्वतःचे घर, स्वतःच्या गाडया झाल्यावर,मुली यायचा तर काही प्रश्नच नाही ना! मग काय मुलींची स्थळ त्याला येऊ लागली. योग्य मुलगी बघून पत्रिका बघून शशांकचे लग्न ठरवले.

आता लग्न ठरवले म्हटल्यावर घराला रंग देणे, घरातली आवराआवरी करायला पाहिजे ना! तसे आई-वडिलांनी आपले घर आवरायला घेतले. घर आवरताना जे भंगार निघाले ते सगळे शशांकला दिले, सरळच आहे ना! घर आवरताना त्यांना जुनी कागदपत्रे सापडली. ती कागदपत्रे वाचत असताना त्यांच्या लक्षात आले की शशांकचे पणजोबा त्रिंबक नाव त्यांचे.त्यांचे शिक्षण कमी,कोकणातून ते शहरात आलेले,त्यामुळे काहीच व्यवसाय करू शकले नाहीत. म्हणून त्यांनी त्या काळामध्ये भंगारचा व्यवसाय सुरू केलेला होता व आपले घर वरती आणलेले होते. त्यामधून मिळालेल्या पैशातून त्यांनी आपल्या मुलाला व्यवस्थित शिक्षण दिले व मुलाने या व्यवसायात पडू नये म्हणून त्याला नोकरी करायला लावली व आता मी पण नोकरी करत आहे पण परत पणतू म्हणजे तू . तू मात्र परत भंगाराचा व्यवसाय करत आहेस. बघ कसे असते ना! हे आपल्या आयुष्याचे चक्रच आहे ना! पण ते केव्हा कोणत्या गतीने चालते व कुठे येऊन मिळते हे आपल्याला कळत नाही .जसे पणजोबाचा भंगार व्यवसाय पणतू परत तोच व्यवसाय करत आहे. एक चक्रच आहे ना!

**सुतेजा सुभाष दांडेकर**
**६६८१/२ मंगळवार पेठ, सातारा ४१५००२**
**९४२३३१८४५२**

■■■



# जपानमधील बुध्द मंदिरे

अंजली फडके

जपान ६८५२ बेटानी मिळून बनलेले राष्ट्र ७३ टक्के शेती व औद्योगिक वापरासाठी अयोग्य त्यामुळेच उरलेल्या जमिनीवर लोकसंख्येचे प्रमाण अत्युच्च आहे.

जपान हा प्राचीन देश असला तरी बुध्द लेणी वगैरे येथे नाहीत.त्याला मुख्यकारण हेच असावे ते म्हणजे भूकंप एशियातच बुध्द धर्माचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला उदा. चीन,भारत, डोनेशिया,श्रीलंका वगैरे वगैरे जपानमध्ये देखील बौध्द धर्मिय लोक मोठ्या प्रमाणात आढळतात इथे हजारो पंथही आढळतात जपानमध्ये बौध्दधर्म खूप पूर्वीपासून रूजला आहे २० व्या शतकात जपानमधल्या ३ व्यक्तींनी बुध्द धर्माचा प्रसार केला.सुने साबुरो, जोसेई तोडा,दायसाकु एकोडा जॅपनीज लोकांचे हे तिघेही श्रध्दास्थान आहेत. जॅपनीज देव धर्म,गुरू वगैरे मानतात व त्यांचे समोर उभे राहून आपल्या मनावरचे ओझे हलके करतात.

जुन्या नव्या संस्कृतीला सामावून घेणारे हे चिमुकले राष्ट्र.आपले व जपानचे घनिष्ठ मैत्रीचे संबंध आहेत.

मी या देशात बाकीच्या प्रेक्षणीय स्थळाबरोबरच बौध्द प्रार्थना स्थळांना भेट दिली.त्या बद्दलच सांगणार आहे.

प्रथम आम्ही टोकियोतील आसाकुसा येथे सनसोजी किंवा जे कनन टेंपल आहे ते पहाण्यास गेलो हे मंदिर दुसऱ्या महायुध्दात नष्ट झाले होते. त्याची पुर्नबांधणी केली व ते बोधीसत्वाला अर्पण केले. ६२८ ए.डी. सुमीधा नदीत दोन कोळ्यांना ही मूर्ती सापडली त्याचेच हे पुढे मंदिर बांधण्यात आले.या मंदिराच्या प्रवेशद्वारावर लाल व काळ्या रंगाच्या कागदाने बनवलेला आकाश–कंदील टांगलेला असून आकाश कंदिलाच्या तळाला.लाकडात कोरलेला ड्रॅगन..... आहे. हा आकाशकंदील १३ उंच व ११ रूंद एवढा मोठा आहे.

प्रवेशद्वारातून सभामंडपापर्यंत जाताना दोन्ही बाजूस छोटी विक्रेत्यांची दुकाने आहेत. सभामंडप मोठे असून त्याला ५

पॅगोडे आहेत. यात बोधीसत्वाची मूर्ती असून बौध्द धर्मातल्या टेंडाई सेक्ट या संबंधी माहिती लिहिलेली आहे.

दुसरे प्रेक्षणीय स्थळ म्हणजे गोटांबे सीटी मधील Peace –park पार्क येथे आहे Peace –park त प्रवेश केल्या केल्या दिसतो तो एक पांढरा स्तूप.भूतपूर्व पंडित जवाहरलाल नेहरूंनी बुध्दाचे कांही अवशेष जपानला दिले होते.जपानने स्तूप बांधवांना त्या स्तूपात ते अवशेष ठेवले असे सांगण्यात येते.डाव्या बाजूला बुध्दाचा स्त्रीवेषातील सोन्याचा पुतळा दिसतो.

पुढे गेल्यावर एकाच एकाच समुद्रावर एक थाळी ठेवलेली होती थोड्या अंतरावर एक लाकडाचा ओंडका दोऱ्याने बांधलेला होता मनात इच्छा धरून त्याला लाकडाच्याओंडक्याचा दोर आपल्या कडे खेचून जोरात सोडला की नाद निर्माण झाला तर कामना पूर्ण झाली असा समज आहे.स्तूपाच्या रक्षणासाठी एशियातील सर्व देशांचे संरक्षक सिंहाच्या प्रतिमा आहेत या सर्व मूर्ती न दे कानन या नावाने ओळखल्या जातात चारी बाजूस सोन्याच्या बुद्धाच्या आसनस्थ मूर्ती आहेत.त्याच्या सभोवार जापनीस फ्लॉवर गार्डन आहे हे पाहून हळुवार मन प्रसन्न होते मधूनच वाऱ्याची झुळूक मग काही विचारू नका पाय दुखत होते हे विसरून गेलो.

तिसर प्रार्थना स्थळ पाहिलं ते नागोयात येथे फेरी टोरागेट पर्यंत गेलो हे प्रथम ११६८ मध्ये प्रथम बांधले १८७५ साली पुनर्बांधणी केली हे समुद्रातील एकमेव स्वाइन असून मियाजीमा असे या जागेचे नाव आहे या जागेला वेनेस्को वर्ल्ड हेरिटेज साईट म्हणून जाहीर केले आहे. मेरोडो श्राइन, तेनजिम श्रीइन, मून टेन ट्री स्टेज हे तिन्ही मुख्य श्री इन शी जोडले गेलेले आहे.

चौथे प्रार्थना स्थळ आहे क्युटो मधील सागानो या खेड्याजवळ येथे बांबूचे घनदाट जंगल आहे जंगलातून वाट काढत बरंच आत गेल्यावर आपल्याला झेन टेम्पल दिसतं येथे बुद्धांची आसनस्थ मूर्ती असून याला नोनीमिया श्राईन म्हणून ओळखले जाते येथे राजघराण्यातील कुमारी का सेवेसाठी म्हणून ठेवल्या जात कुमारीकेंचे पावित्र्य सांभाळले जाते प्रथम हे मंदिर १३३९ मध्ये बांधले आठ वेळा या मंदिराला अग्नीच्या भक्ष स्थानी जावे लागले. तरीदेखील पुन्हा पुन्हा मंदिराची पुनर्बांधणी केली गेली याला देखील वेनेस्को वर्ल्ड हेरिटेज साईट घोषित करण्यात आले.

आता पाचवे प्रार्थनास्थळ म्हणजे ओसाकातील सिटी टूर मधून केलेले किनकाकुजी टेम्पल हे गोल्डन पॅव्हेलियन झेन टेम्पल आहे कांगायोशी तीत्सुयानी स्वतःच्या निवाससाठी येथे घर बांधले पुढे त्यांच्या निधनानंतर त्यांच्या इच्छेनुसार त्यांचे रूपांतर झेन टेम्पल मध्ये झाले पण एका धर्म वेड्या मॉकने ते जाळून टाकले पण १९५५ मध्ये पुन्हा बांधले सध्या या मंदिरात आत जाण्यास प्रवेश नाही फक्त बाहेरून पाहता येते हे मंदिर दोन मजली असून सोन्याच्या पत्रांनी मढवलेले आहे प्रत्येक मजल्यावरचे आर्किटेक्ट वेगळे आहे.


याच्या भोवती तळे आहे त्यामुळे मंदिराचे प्रतिबिंब या पाण्यात पडते इथले वातावरण पर्यावरण पूरक आहे छान शुद्ध हवा सिनरी खूपच सुरेख सर्वांनी आपापल्या कॅमेरात कैद करून घेतले एखादा चित्रकार असता तर त्याने ते एखाद्या चित्रात टिपले असते.

या तळ्याच्या काठावरून आपल्याला याशी मित्सू यांचे पुतळे दिसतात या पवेलियन भवती फिरण्यासाठी मार्ग काढलेला आहे या टेम्पल वर सोन्याचा मूलमा दिलेला फोनिक्स बर्ड आहे.

खरंच जपानने निसर्गाला खूप झोपले आहे असा छोटासा देश असला तरी महान आहे आज सर्व जग आदराने त्यांच्याकडे पाहते थोडयाशा अवधीत त्यांनी पुष्कळ गोष्टी साध्य केल्या अशा या देशाला सायोनारा म्हणत मी भारतात परतले.

**अंजली फडके,**
**कर्वेनगर, पुणे.**

■■■



४ जानेवारी २०२२ या दिवशी एक अभुतपूर्व घटना घडली . सर्वसामान्य शेतकऱ्याचा मुलगा सुनील चांदेरे पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा संचालक झाला. पुढे १५ जानेवारी या दिवशी उपमुख्यमंत्री अजितदादा पवारांनी या आपल्या मुळशी च्या सुपुत्रावर बँकेच्या उपाध्यक्ष पदाची टाकली. ही सामान्य गोष्ट नाही. पहिल्यांदाच निवडून आलेल्या नवख्या संचालकावर एवढी मोठी जबाबदारी सोपवली म्हणजे दादांनी नक्कीच चांदेरें मधील काहीतरी गुण हेरले असावेत.

# देशातील नंबर १ पीडीसीसी बँकेचा लौकीक!

**ह.भ.प.रामचंद्र महाराज भरेकर**

आज या घटनेला साडेतीन वर्षे झाली. गेल्या साडेतीन वर्षातील संचालक मंडळाच्या कार्यकालात बँकेने खूपच चांगली प्रगती केली आहे. आपल्या मुळशी तालुक्यातील सुनील चांदेरे प्रचंड मेहनती कार्यकर्ता. सतत अभ्यास करून काहीतरी नाविन्यपूर्ण करण्याचा ध्यास घेतलेला. बँकेच्या माध्यमातून सतत शेतकरी व सर्वसामान्य माणसाला दिलासा देण्याचे काम करीत आहे. मुळशी तालुक्यात सुनीलभाऊंनी सहकारात आणि बँकींग क्षेत्रात खूप चांगले काम केले आहे. तालुक्यात काम करतानाच पुणे जिल्हा बँकेच्या उपाध्यक्ष पदाला देखील न्याय देताना ते कुठेही कमी पडले नाही.जिल्ह्यात सतत दौरे , शाखांची पाहणी , विविध कार्यक्रमांच्या माध्यमातुन जिल्ह्यात देखील अतिशय उत्तम काम करीत आहे.

मुळशी तालुक्यातील सामान्य माणूस व शेतक-यांना बँक समजुन देण्याचे अतिशय महत्त्वाचे काम त्यांनी केले आहे. पुणे जिल्हा बँकेतील योजना लोकांना समजेल अशा भाषेतून सांगितल्या.

कोणत्याही सामान्य माणसाला बँकेत काही अडचण आली तर तो लगेच सुनीलभाऊंना फोन लावतो. लागलीच त्याचे काम मार्गी लावले जाते. सामान्यपणे नेत्याकडे काही काम असेल तर लोक फोन करून नेत्याच्या घरी येतात. इथे फोन आल्यावर लगेच सांगितलं जातं. काम काय आहे ? त्यावर फोनवरच तोडगा काढला जातो. परीणामतः माणसाचा वेळ व इंधन वाचलं जातं. शिवाय कामही जलद गतीने होतं. हा अनेकांना आलेला अनुभव आहे. केवळ बँक



नाही तर बँकेच्या चाकोरीबाहेरची कामे देखील मार्गी लावली जातात. शेतकऱ्यांसाठी भात खरेदी योजना राबवली. शेतकऱ्यांचा भात खरेदी करून तो विकणं हे बँकेचं काम नाही. परंतू शेतकऱ्यांसाठी १० टक्के व्याजदराने बँकेचं कर्ज सोसायट्यांना दिलं. व त्यातून भातखरेदी केली. शेतकऱ्यांना किलोला पाच रुपये जास्तीचे मिळाले. सोसायट्यांना देखील नफा मिळाला.

मुख्य म्हणजे व्यापा-यांच्या जाचातून शेतकऱ्यांची सुटका झाली.शेतकऱ्यांना हे सर्व नवीन होतं. परंतु ह्या एका कृतीमुळे मुळशीतील शेतकरी सुनील चांदेरेंचे चाहते झाले. अनेक नेते म्हणतात की लोकं माझ्यावर प्रेम करतात . ते किती खर अनं किती खोटं हे परमेश्वरच जाणो. परंतु शेतकरी ख-या अर्थाने कोणावर प्रेम करीत आहेत तर ते सुनीलभाऊंवर. फक्त भात खरेदी नाही. तर शेतक-याच्या प्रत्येक अडचणीत बँकेच्या माध्यमातून मदत करणारा नेता



म्हणून त्यांच्याकडे आदरानं पाहिलं जातं. शेतक-याला तलाठी, तहसिलदार, जिल्हाधिकारी ते विभागीय आयुक्त या रचनेत कुठेही अडचण येवो. शंभर टक्के मदत करणारा नेता म्हणून चांदेरेंची ख्याती आहे. मोजणी कार्यालय, वन विभाग, पाणी परवाना विभाग ते पोलीस स्टेशन या सर्व ठिकाणी हक्काची मदत करण्यासाठी सुनीलभाऊ हे सातत्याने पुढे असतात. म्हणूनच आज नाना नवलेंप्रमाणे शेतक-यांचा नेता म्हणून सुनील चांदेरेचं नाव अग्रक्रमाने पुढे येतं.

उपाध्यक्ष पदाची जबाबदारी अंगावर पडल्यावर त्यांनी प्रथम बँक नीट समजून घेतली. बँकेचं दिवसभराचे कामकाज संपल्यावर तिथेच कार्यालयात बसून प्रचंड वाचन केलं . जुने संदर्भ ग्रंथ डोळ्याखालुन घातले . सहकार आणि बँकींग संदर्भातील जे जे साहित्य उपलब्ध आहे. त्यावर वाचन करून चिंतन, मनन केलं. मलाही अनेकदा त्यांचे यासंदर्भात फोन आले. जुनी माहिती विचारून त्यावर चर्चा केली. सहकारात काम केलेल्या दिग्गज नेत्यांची आत्मचरित्र त्यांनी वाचली. अनेक तज्ज्ञांशी त्यांनी यासंदर्भात चर्चा केली. त्यांच मार्गदर्शन घेतलं. या सर्व गोष्टींचा त्यांना काम करण्यासाठी खूप मोठा उपयोग झाला. एका बाजुला बँकेचं काम तर दूस-या बाजूला शेतक-यांचे प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी सतत प्रयत्न केले. त्यामुळे आज जिल्ह्यात व राज्यात त्यांची सहकारातील एक अभ्यासु व कामसु नेता म्हणून त्यांची प्रतिमा तयार झाली आहे.

### शेतकरी कर्ज प्रकरण.

कर्ज प्रकरणात त्यांनी जातीने लक्ष घातले. प्रकरण बँकेत दाखल झाल्यानंतर त्यावर तात्काळ मंजुरी मिळावी म्हणून स्वतः लक्ष घातले. कुठे काय कागद लागेल याचा अधिका-या इतका त्यांचा अभ्यास झाला आहे. म्हणूनच आज शेतक-यांना लागलीच कर्ज उपलब्ध होत आहे.

शेतकरी हितासाठी बळीराजा कर्ज योजना आणली . शेतकऱ्यांना अनेक प्रकारच्या अडचण असतात. मुलांचे शिक्षण, आरोग्य, घरबांधणी , लग्नकार्य या व अशा अनंत अडचणी येतात. अशा वेळी शेतकरी जिल्हा बँकेकडे धाव घेतो. वरील पैकी कोणतीही अडचण असु देत गाई , म्हशीचं कर्ज प्रकरण केलं जायचं. अन शेतकऱ्यांची अडचण दूर केली जायची. परंतु गाईला बील्ले मारणं , वीमा उतवणं आणि मॉरगेज करणं यासाठी शेतकऱ्यांचा खूप मोठा खर्च होत असे. यावर उपाय म्हणून " बळीराजा मुदती कर्ज योजना " हा अत्यंत किफायतशीर पर्याय चांदेरेंनी आणला . त्यामुळे एकरी दोन लाख याप्रमाणे एका शेतकऱ्यां-याला दहा लाखांचे कर्ज दोन दिवसांत केवळ शेत जमिनीच्या ई करारावर मिळू लागले. पुणे जिल्ह्यातील लाखो शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात या योजनेचा उपयोगी झाला .दरवर्षी वसुली ला प्रोत्साहन मिळण्यासाठी १००% वसुली असलेल्या संस्था सचिव व चेअरमन यांचासाठी बक्षीस समारंभाचे आयोजन ते करतात.

तरूणांना उद्योग व्यवसायासाठी कर्ज प्रकरण मंजूर करताना त्यात ते जातीनं लक्ष घालतात .महाराष्ट्र शासनाच्या विविध योजना बँकेला लागू केल्या .

१)मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना २)पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना ३)अण्णासाहेब पाटील विकास महामंडळ

४) आई योजना आणि इतर सर्व शासकीय योजना बँकेला लागू केल्या. त्यामुळे महीलांना उद्योग व्यवसायासाठी ३५ टक्के तर पुरुषांना २५ टक्के शासकीय अनुदान मिळू लागले. बँकेच्या कर्जपुरवठ्यावर त्याचा चांगलाच परीणाम झाला. कर्ज पुरवठ्याचं प्रमाण चांगलंच वाढलं. यामुळे शेतकऱ्यांच्या मुलांनी विविध उद्योग व्यवसाय सुरू केले. त्याच बरोबर शेती पुरक व्यवसाय देखील सुरू केले गेले. पोल्ट्री , वातानुकूलित पोल्ट्री , ग्रीन हाऊस , शेडनेट , पॉली हाऊस , कृषी पर्यटन हे व इतर अनेक उद्योग व्यवसाय उभे राहिले. हे सर्व व्यवसाय सुरू करताना शासकीय कार्यालयात एखादा परवाना मिळविण्यासाठी काय त्रास होतो. याचा अनुभव आपण घेतलेला आहे. वीज परवानगी , तहसिल कचेरीतील कागदपत्रे , शासकीय मोजणी , वन खात्याशी संबंधित कागदपत्र हे व इतर अनेक कागदपत्र , परवाने मिळविण्यासाठी तरूणांना अनेक चकरा माराव्या लागतात. शासकीय यंत्रणा दाद देत नाही. कर्ज देताना ही कागदपत्रे मिळवण्यासाठी सुनीलभाऊ फोन करून ताबडतोब ही सर्व मदत करतात. एवढचं नाही तर प्रसंगी स्वत : संबंधित कार्यालयात येऊन युवक युवतींना मदत करतात. त्याचा परिणाम व्यवसाय सुरू करण्यासाठी फार वेळ लागत नाही. बँकेचा आपला शेतक-यांचा प्रतिनिधी एवढी काळजी घेत असेल तर शेतक-यांची मुले का नाही व्यवसायात पुढे जाणार ?

बारामती कृषी विज्ञान केंद्र आणि नारायणगाव कृषी विज्ञान केंद्र . पुणे जिल्ह्यात बारामती व नारायणगाव कृषी विज्ञान केंद्र ह्या दोन महत्त्वाच्या संस्था शेतकरी वर्गासाठी उपलब्ध आहेत. आपला मुळशी तालुका हा नारायणगाव कृषी विज्ञान केंद्राशी संलग्न आहे. चांदेरेंनी या दोन्ही केंद्राचा आपल्या मुळशीतील शेतक-यांना चांगला उपयोग करून दिलेला आहे. तालुक्यातील आंबा उत्पादन वाढीसाठी उपाययोजना या विषयावर मार्गदर्शन शिबीर आयोजित केले. दुग्ध व्यवसायासाठी बारामती तर शेळी , कोंबडी पालनासाठी नारायणगाव कुषी विज्ञान केंद्रामध्ये शेतक-यांना प्रशिक्षण दिले. पौडला संबंधित संस्थांचे तज्ञ आणून माती व पाणी परीक्षण परीषद घेतली. असे अनेक उपक्रम राबवले. आपल्या. मुळशी तालुक्यातील शेतकरी सक्षम व्हावा. त्याने निरनिराळी पिके घ्यावीत. त्याला अधिकचे चार पैसे मिळावेत म्हणून चांदेरेंनी एक वेगळा प्रयोग केला.

सातारा व कोल्हापूर जिल्ह्यात शेतकरी अभ्यास सहल काढली. पाचशे शेतकरी या सहलीत सहभागी झाले होते. पुरूषांबरोबर महीलाही सहभागी झाल्या होत्या. त्यात सर्वपक्षीय नेते व कार्यकर्ते सहभागी झाले होते. संपूर्ण सहल मोफत होती. एक रूपया कोणाला खर्च आला नाही. नियोजन अतिशय उत्तम होतं. या सहलीत सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील शेती व शेती पुरक

व्यवसाय लोकांनी पाहिले. विकास सोसायटी पाहील्या. त्यांचे विविध व्यवसाय पाहिले. त्यातून प्रेरणा घेऊन अनेकांनी आपल्या शेतीत तसे प्रयोग केले. प्रभाकर शिंदे, सुनील कदम व अनेक शेतकऱ्यांनी याचा योग्य उपयोग करून घेतला. मुळशी तालुक्यातील एवढ्या मोठ्या प्रमाणावर शेतकरी सहल पहील्यांदाच काढली अन की विनातक्रार यशस्वी देखील झाली.

एका बाजूला असे खुप भरीव काम बँकेच्या माध्यमातून केले. तर दूस–या बाजूला त्यांनी बँकेच्या पायाभूत सुविधा मजबूत करण्याचे काम केले. तालुक्यातील व जिल्ह्यातील आवश्यक त्या शाखांचे नुतनीकरण केले. माले शाखा पावसाळ्यात पाण्यात जात असे. शाखेत गुडघाभर पाणी साचुन राहत होते. ताबडतोब जागा बदलून नविन इमारत बांधली. आधुनिक पद्धतीने फर्निचर करून अत्यंत सुसज्ज अशी शाखा तयार केली. याप्रमाणे घोटावडे, हिंजवडी, कासारसाई या सर्व शाखा नविन जागेत स्थलांतरित करून अद्ययावत केल्या . वाकड शाखेची दुरावस्था झालेली होती. नवीन जागेत अत्यंत सुंदर शाखा तयार केली. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे शुभहस्ते उद्घाटन समारंभ घडवुन आणला. दादांनी शाखेचे काम पाहून सुनीलभाऊंचे कौतुक केले. तालुक्यातील सर्व शाखा अशाच पद्धतीने तयार करीत आहे. त्याच सभासद व खातेदारांना समाधान आहे.

सर्व शेतकरी सभासदांना सोयीस्कर व्हावे या हेतूने व सचिव कामकाज सुरळीत व्हावे यासाठी पौड येथे सचिवालयाची स्थापना केली.खासदार सुप्रियाताई सुळे यांचे शुभहस्ते या सचिवालयाचे उद्घाटन केले. केंद्र सरकारच्या संस्था संगणकीकरण योजनेमार्फत वि.का.सोसायटी चे कामकाज,दफ्तर संगणकीकृत केले. त्यामुळे कारभारात पारदर्शकता आली. शेतकऱ्यांना कमी दरात विविध शासकीय दाखले सुलभ पद्धतीने मिळावे यासाठी विकास सोसायटी मार्फत कॉमन सर्व्हिस सेंटर चालू केले.बँकेत सेवकांच्या विमा पॉलिसीमध्ये त्यांच्या पाल्यांचा समावेश करण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला.पगारदारांची कॅश क्रेडिट मर्यादा १० लाखाहून २० लाख केली.हे अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेतल्याने बँक सेवक ,अधिका–यांचे व त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. एका बाजूला एक शिस्तबद्ध प्रशासक तर दूस–या बाजूला बँक सेवकांची काळजी घेणारा एक वेगळाच नेता मला यानिमित्ताने अनुभवायला मिळाला.

जिल्हा देखरेख संघाचा गेल्या अनेक वर्षापासूनचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावून तालुक्यातील १९ सचिवांना जिल्हा देखरेख संघमार्फत नियुक्ती केली.यासाठी तत्कालीन सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील ,उपमुख्यमंत्री अजितदादा पवार ते विद्यमान सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचेकडे त्यांनी चेअरमन डॉ. दुर्गाडे सरांबरोबर सतत पाठपुरावा केला. शेतकऱ्यांच्या ५० होतकरू मुलांना बँकेत नोकरीची संधी दिली.सचिवांसाठी मेडिक्लेम उतरविण्याची सुरवात केली.बँकेत यूपीआय,शेतकऱ्यांसाठी कमी दरात ७/१२ उतारे,व्यापारी वर्गासाठी क्यूआर कोड यांसारख्या काळानुसार गरजेच्या योजना अमलांत आणल्या.कृषिपर्यटन कर्ज धोरणात योग्य बदल करून शेतकऱ्यांना सोयीस्कर असे धोरण तयार केले.त्यासाठी अजितदादांच्या माध्यमातून शेतकऱ्यांसाठी पी. एम. आर. डी. ए. च्या परवानगीची अट काढुन टाकली.प्रत्येक महिन्याच्या आढावा सभेला उपस्थित राहून सेवकांना मार्गदर्शन करतात,कामकाजाचा आढावा घेऊन योग्य दिशा दाखवतात. दरवर्षी कर्ज वसुलीला प्रोत्साहन



मिळण्यासाठी १००% वसुली असलेल्या संस्था सचिव व चेअरमन यांच्यासाठी बक्षीस समारंभाचे आयोजन. दरवर्षी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या वाढदिवसानिमित्त १०वी १२ वी च्या विशेष प्रावीण्य मिळवलेल्या गुणवंत शेतकरी पाल्यांचा सत्कार समारंभ ते आयोजित करतात.या कार्यक्रमांमध्ये गरजू विद्यार्थ्यांसाठी वह्या वाटपाचा कार्यक्रम घेतला जातो.

ते स्वतः सर्व वि.का. संस्थांच्या वार्षिक सभेला उपस्थित राहून शेतकरी सभासदांना मार्गदर्शन करतात.सभासद शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेतात.म्हणूनच ऑगस्ट , सप्टेंबर या पावसाळी महिन्यात भाऊंच्या गावागावातील वार्षिक सर्वसाधारण सभांना

शेतकरी गर्दी करतात. वक्तृत्व कला त्यांच्या नसानसात भिनलेली आहे . सरस्वतीचे वरदान त्यांना लाभले आहे. त्यांच्या भाषणांनी बँक त्यांनी सर्वसामान्यांच्या पर्यंत पोहोचवली. एका अर्थाने ते बँकेचे ब्रँड अॅबॅसिटर शोभतात . होय यासाठी लागणारे सर्व गुण त्यांच्यामध्ये आहेत.लोकांच्या काळजाला भिडणारा भारदस्त आवाज, आवाजाला साजेशी उंची , नजरेत भरावी अशीच त्यांच्या शरीराची ठेवण आहे .निसर्गतः परमेश्वराने त्यांना सबकुछ बहाल केलं आहे. जणू काही



वक्तृत्वासाठीच त्यांची निर्मिती आहे की काय ? असा मला प्रश्न पडतो.

स्वतः उत्तम वक्ता असल्यामुळे अनेक व्यांना त्यांनी मुळशीत आणलं . लोकांना त्यांचे विचार ऐकवले. ही फार वेगळी बाब आहे. महाराष्ट्र राज्याचे सहकार आयुक्त अनिल कवडे साहेब, दिपक कोकरे साहेब , पर्यटन विभागाच्या संचालीका शमा ढोक , सहकार उपनिबंधक प्रकाश जगताप , मिलींद सोबले, शरद बुट्टे पाटील , सहकार महर्षी माऊली दाभाडे, शिक्षण तज्ञ दिलीप देशमुख साहेब , दै. सकाळ चे मा. संपादक यमाजी मालकर साहेब , बँकेचे चेअरमन प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे सर , ह. भ. प. चंद्रकांत महाराज वांजळे, ह. भ. प. संतोष महाराज पायगुडे ,बँकींग तज्ञ गौतम कोतवाल हे व इतर अनेक वक्ते त्यांनी तालुक्यात आणले . बँकेच्या पुणे येथील मुख्य कार्यालयाती त्यांनी असाच उपक्रम राबवला. रिझर्व्ह बँकेचे संचालक सतिश मराठेंपासुन ते सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचेपर्यंत त्यांनी अनेकांना बँकेत आणलं .

दरवर्षी श्रावण महिन्यात सत्यनारायण पूजेची प्रथा सुनीलभाऊंनी सुरू केली. सर्व शेतकरी सभासद व बँक सेवक सचिवांना ते स्वखर्चाने ते यानिमित्ताने भोजन देत असतात.

शेतकऱ्यांसाठी माती परीक्षण,गाय म्हैसपालन,शेळीपालन,पोल्ट्री उद्योग यासाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन दरवर्षी करतात. दरवर्षी सहकार क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी सहकार मेळाव्याचे आयोजन ते करतात. शेतकरी मेळावा आयोजित करून सेंद्रिय शेती व त्याचे फायदे समजावून सांगतात.जिल्हा बँक आपल्या दारी,विकासाची गंगा घरोघरी या योजनेतून व आर्थिक डिजिटल साक्षरतेच्या माध्यमातून गावोगावात शिबिरे घेऊन बँकेची माहिती त्यांनी सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवली.त्यातून नवीन खाती उघडणे या सारखे अभिनव उपक्रम ते घेतात.यामुळे ग्रामीण भाग आर्थिक साक्षर होण्यास खूप मदत झाली.ते स्वतः उत्तम साहित्यिक आहेत. वाचना बरोबर लिखाणाची आवड त्यांना आहे. " मुळशीकरांची दिल्ली सफर " आणि " ऐकलंत का ? " ही दोन पुस्तके त्यांनी लिहिली आहेत. गेली तीन वर्षे शेतकरी संघाला सोबत घेऊन शेतकरी साहित्य संमेलन ते भरवतात. २५ एप्रिल २०२५ या दिवशी पुण्यातील बालगंधर्व रंगमंदिरात महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे शुभहस्ते त्यांच्या " ऐकलंत का ? " या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ संपन्न झाला. डोळ्यांत भरून ठेवावा असाच हा देखणा समारंभ झाला. राज्याचे मंत्री दत्तात्रय मामा भरणे, जेष्ठ कवी रामदास फुटाणे ,आमदार शंकरभाऊ मांडेकर ,बँकेचे चेअरमन प्रा. डॉ. दिगंबर दुर्गाडे सर , बँकेचे सर्व संचालक, जिल्ह्यातील अनेक आजी माजी आमदार , साहित्य क्षेत्रातील नामवंत मंडळी यावेळी उपस्थित होती. बालगंधर्व रंगमंदिर भरून बाहेर लोकांनी स्क्रीनवर कार्यक्रम पाहिला. आपल्या तालुक्याला सुनीलभाऊंच्या रूपाने पाहिला साहित्यिक नेता लाभला आहे. याच समारंभात दादांनी बँकेच्या चेअरमन , व्हाईस चेअरमन यांचेबद्दल गौरव उद्गार काढले. मी या दोघांना संधी दिली सा दोघांनी चांगले काम केले. गेल्या साडेतीन वर्षात पुणे जिल्हा बँकेला आठ पुरस्कार मिळाले ही सुनीलभाऊ चांदेरेंच्या कामाची पावती आहे . दिपावलीच्या सर्वांना मनापासून हार्दिक शुभेच्छा !

**ह.भ.प.रामचंद्र महाराज भरेकर**
**सेवानिवृत्त अधिकारी**
**पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्या. पुणे**

■■■



# एक तिबेटी लोककथा

समीर गायकवाड

लोनपो गार हा तिबेटच्या बत्तिसाव्या राजाचा प्रधान होता. अत्यंत हुशार आणि हजरजबाबी होता तो. त्याच्या तल्लख बुद्धीची चर्चा दूरवर पसरली होती. राजा आणि प्रजा त्याच्यावर बेहद्द खूष होते. परंतु आपल्या मुलाविषयी तो सदैव चिंतित असे. त्याचा मुलगा अगदी भोळाभाबडा होता.

सार्वजनिक जीवनात आवश्यक असणारी चलाखी त्याच्या गावीही नव्हती. आपल्या भोळ्या मुलाचे आपल्या पाठीमागे कसे होईल हा विचार त्याला नेहमी सतावत असे. निदान त्याला पत्नी तरी चलाख आणि हुशार मिळावी असं त्याला वाटे. फार विचाराअंती त्याने एक योजना आखली.

एका सकाळी त्याने आपल्या मुलाला शंभर मेंढ्या देऊ केल्या आणि सांगितलं की, "यांना घेऊन शहरात जा. मात्र याद राख यांना मारायचं नाही की विकायचं नाही मात्र शंभर पोती जव(सातू) सोबत घेऊनच तू घरी परत यायचंस. तोवर तोंड दाखवू नकोस कळलं का?"

मुलगा बुचकळ्यात पडला. शंभर मेंढ्या घेऊन तो शहरात गेला खरे मात्र शंभर पोती जव घेण्यासाठी फुटका छदाम देखील त्याच्यापाशी नव्हता. एका रस्त्याच्या कडेला बसून तो विचारमग्न झाला. त्याला तसं चिंतातुर बसलेलं पाहून त्या रस्त्याने जाणारी एक सुंदर तरुणी तिथे आली आणि तिने त्याला कारण विचारलं. त्याने सगळी हकीकत सांगितली. मुलीने निमिषार्धात उपाय सांगितला.

सर्व मेंढ्यांची लोकर काढून घ्यायची आणि आलेल्या पैशात शंभर पोती जव येईल ते घरी घेऊन जा असं तिने सुचवलं. मुलगा आनंदीत झाला. त्याने लोकर काढून विकली आणि शंभर मेंढरे, शंभर पोती जवासह घरी घेऊन पोहोचला.

घरी गेल्यावर त्याने शहरातला सगळा वृत्तांत सांगितला.

मात्र त्याच्या अपेक्षेनुरूप लोनपो गार काही खूष दिसले नाहीत.

त्यांनी काहीशा नाराजीनेच बरं ठीक आहे असा सूर लावला.

दुसऱ्याच दिवशी सकाळी त्यांनी मुलाला परत एकदा तीच शंभर मेंढरे त्याच अटीसह त्याच्या हवाली केलं आणि शहराकडे पिटाळून लावलं.

मुलगा खिन्न मनाने शहरात आला आणि पुन्हा त्याच सडकेच्या कडेला येऊन बसला. एक प्रहर उलटल्यानंतर तीच मुलगी त्या रस्त्याने मार्गस्थ होताना तिला तो पुन्हा एकदा नजरेस पडला.

तिने सवाल करताच मुलाने सगळी कथा नव्याने ऐकवली.

तिने चुटकीसरशी उपाय सांगितला.

शंभर मेंढ्यांची बारकाली आखूड शिंगे काढून विकली तर सहज शंभर पोती जव खरेदी शक्य होती. तिचा सल्ला ऐकून त्याने मेंढ्यांची शिंगे काढून विकली.

अगदी हर्षोल्हासित मनाने तो घरी परतला. त्याने पुन्हा सगळा वृत्तांत कथन केला. सगळा घटनाक्रम ऐकून लोनपो गार सुखावला.

आपला आनंद लपवत त्याने मुलाला नवी मोहीम देऊन पुन्हा शहराकडे पाठवलं.

"माझ्यासाठी त्या मुलीकडून नऊ हात लांबीचा राखेचा हार घेऊन ये" अशी त्याची नवी आज्ञा होती.

त्याचा आज्ञाधारक भोळा मुलगा पुन्हा शहराकडे आला आणि ज्या वळणावर ती मुलगी भेटली होती तिथेच येऊन थांबला.

काही वेळातच ती मुलगी तिथे आली. तिने त्याला पृच्छा करताच त्याने वडिलांची इच्छा तिच्या कानी घातली.

तिने होकार दिला मात्र बदल्यात एक अट घातली. तिने बनवलेला राखेचा हार त्याच्या वडिलांनी गळ्यात घातला पाहिजे असं तिने सुनवलं. लोनपो गार च्या भोळ्या मुलाने कसलाही विचार न करता तत्काळ होकार दिला. मुलीने घरातून नऊ एक जाडजूड दोरखंड आणला. एका दगडी पाट्यावर तो दोरखंड जाळला.

काही वेळातच दोरखंड जळून राख झाला. मात्र ती राख दोरीच्या पिळासह हाराच्या आकारात होती.मुलीने तो पाट सोबत घेतला आणि मुलासोबत लोनपोच्या घरी गेली. पाट्यावर ठेवलेला हार गळ्यात घालणं फार लांबची गोष्ट होती, नुसता स्पर्श जरी केला असता तरी राखेचा पिळ विस्कटून गेला असता आणि केवळ भस्मस्वरूप हाती आले असते हे लोनपो गार ओळखून होता. तो त्या मुलीच्या हुशारीवर अफाट खुश झाला. तत्काळ त्याने विवाहासाठी तिला विचारणा केली आणि आपल्या मुलाचा हात तिच्या हातात देऊ केला. त्यांचे थाटात लग्न लावून दिले. लोनपोची चिंता मिटली होती, त्याच्या मुलाचा संसार करण्यास समर्थ सुनबाई त्याला लाभली होती! यातून दोन गोष्टी उमगतात – पत्नी हुशार असेल तर संसार अधिक उत्तम होतो आणि आजच्या नवरात्रीचा रंग जाहीरच झाला नाही, कारण यंदाची नवरात्र दहा दिवसांची आहे!

– समीर गायकवाड

■■■

# ती, आरसा, आणि मी...

**शीला पतकी**

नापास शाळेच्या ॲडमिशन सुरू झाल्या.. पालक विद्यार्थी हितचिंतक अशा नापास मुलांना घेऊन माझ्याकडे येत असत. कुणाकडे पैसे नाहीत कोणी खूप गरीब आहे दहावी मध्ये नववी मध्ये नापास होऊन शिक्षण थांबले आहे असे खूप विद्यार्थी येतात.

सकाळी नऊ वाजता माझे काम सुरू झाले आणि एक रिक्षावाले गृहस्थ आले. त्यांनी आपली ओळख करून दिली आणि म्हणाले "माझी मुलगी येथील एका कन्या शाळेत होती पण शाळेने तिला काढून टाकले आहे. इयत्ता नववी मध्ये शिकत होती. तेव्हापासून ती घरीच आहे."

मी त्यांना मध्येच थांबून विचारलं, "अहो पण शाळेतनं काढायचं कारण काय?"

त्यावर ते दोन मिनिट गप्प राहिले आणि मग त्यानी मला सांगायला सुरुवात केली. म्हणाले, "दोन वर्षांपूर्वी माझी मुलगी तळल्या तेलात पडून गंभीर जखमी झाली. तिचा चेहऱ्याचा भाग, मानेचा भाग, हात, म्हणजे जवळपास अर्ध शरीर भाजून निघाले तिचे.. सात आठ महिने दवाखान्यातच गेले ..ती जगेल असे मुळीच वाटत नव्हते पण माहित नाही आमच्या सुदैवाने की तिच्या दुर्दैवाने ती जगली. त्यानंतर तिचा चेहरा, कातडी विद्रूप झाल्यामुळे तिच्या बाई म्हणतात की त्यांच्या शाळेतील मुली तिला घाबरतात, आणि अशी विद्रूप मुलगी आम्हाला वर्गात नको" .....हे सांगताना त्यांना अक्षरशः रडायला येत होते. त्यांनी हुंदका दिला.

मी उठून त्यांना पाण्याचा ग्लास पुढे केला.. पाठीवरती थोपटलं ..आणि म्हणलं, "काळजी नका करू, आपण करू काहीतरी. ..तुम्ही मुलीला घेऊन या!"

ते म्हणाले, "बाई ती खूप निराश झाली आहे. आता दीड दोन वर्ष झाले ती घरीच आहे. कोणाशी फार बोलत नाही, मिसळायचा तर प्रश्नच नाही. तिला कोणी मिसळूनच घेत नाही. घरातली खोली आणि ती ! बरं, लहानगा जीव, काय समजते हो १४/ १५ वर्षाच्या मुलीला. आमच्या डोळ्यासमोर तिचं सगळं भविष्य उभं रहातं."....

मलाही थोडं आश्चर्यच वाटलं .. "भाजली आहे ना, एवढं काय काळजी करण्यासारखं, होईल बरं. हल्ली प्लास्टिक सर्जरी वगैरे करतात."

ते म्हणाले, "हो, पण त्याला ठराविक कालावधी जावा लागेल.... मुलगी बऱ्यापैकी हुशार आहे. घरी बसून खूप कंटाळली आहे. तुम्ही तुमच्या शाळेत प्रवेश दिला तर फार उपकार होतील."

मी म्हणाले, "उपकाराची भाषा करू नका. शिक्षण घेणं हा तिचा हक्क आहे. आपण तिला शिकवूयात."

माझ्या शब्दाने त्यांना खूप धीर मिळाला. मी म्हणाले, "मुलीला घेऊन या. मी तिच्याशी बोलते आधी, आणि मग आपण ठरवू."

ते थोडे सुखावले होते. त्यांना कुठेतरी खात्री वाटत होती की इथे माझ्या मुलीला प्रवेश मिळेल. ते तातडीने घरी गेले आणि एका तासाभराने आपल्या मुलीला आणि बायकोला घेऊन माझ्या ऑफिस मध्ये आले.

तोपर्यंत काही ॲडमिशनचे इंटरव्यू चालले होते. मी मुलांशी, पालकांशी बोलत होते, त्यांचे समुपदेशन करत होते. त्यानंतर समोरचे पालक बाहेर पडले. मी खाली वाकून काही फॉर्म वरती टिपणं करत होते आणि हे रिक्षावाले गृहस्थ पुन्हा ऑफिसमध्ये प्रवेश करते झाले. सोबत त्यांची पत्नी ही होती. त्यानी सांगितले, "बाई, मुलीला घेऊन आलो आहे. आपण तिच्याशी बोला."

सुरुवातीला तीची आई माझ्याशी बोलली. त्या म्हणाल्या, "दिवाळीचं तळण तळत होते हो, आणि ही पोरगी धावत आली आणि त्या मोठ्या कढईत पडली." ते सगळं ऐकताना माझ्या अंगावर काटा येत होता. त्या वेदना, ते हॉस्पिटल, सगळं त्या वर्णन करून सांगत होत्या. मी म्हणलं, "एवढ्या लहान लेकराने हे कसं सोसलं असेल ना ?"

इतक्यात ती मुलगी आत आली. सुरेखा तिचं नाव होतं आणि मीही इतर मुलांना जसा दिलासा देण्यासाठी त्यांच्या नावाने हाक मारते ये ये ...तसं मी हिला हाक मारली "ये ये सुरेखा ..."

सुरेखा आत आली. तिला पाहिलं आणि मी खुर्चीवरून नकळत उठले. समोर तिच रूप पाहून मला काय वाटलं मी सांगू शकत नाही.. भीती, किळस.. भयानक चेहरा होता.. डोळे बाहेर आलेले, गालाची हाडं वर आलेली, त्याच्यावर जळलेलं मास थोडसं लोंबणारे.. जागोजागी असंख्य जळकट सुरकुत्या, मानेभोवती अशाच सुरकुत्यांचे जळकट जाळे.. केस तुटके तुटके भुरे.. डोक्यावर थोड्याशा जखमा भाजलेल्या.. ओठ भाजल्याने किंचित पुढं आलेले, कानाच्या पाळ्यांची तीच अवस्था.

मी तिच्या हाताशी पाहिलं, हातावरचं मांस दिसावं तसा तांबूस रंग होता. दोन्ही हाताची बोटं आतून मुडपलेली होती आणि अगदी बारीक बारीक बोटं म्हणजे नुकत्याच जन्मलेल्या पक्षाच्या पिलाचा जसा रंग असतो ना आणि शरीर असतं तसं ते सगळं होतं. ...

मी एक क्षणभर म्हटलं हे रोज बघू शकतो का आपण...? मुळात तिच शरीर अतिशय कृष होतं. म्हणजे हाड आणि लोंबणारी कातडी.. बाहेर आलेले डोळे.. तुटके केस हे थोडक्यात वर्णन ....आणि मी स्वतःलाच प्रश्न विचारला 'शीला पत्की, सामाजिक सेवा करायला निघाला आहात, हे सोसणार आहे का तुम्हाला ? दररोज नुसतं बघणं तरी काय भयानक होतं ते, छे छे, हे होणे नाही...!'

पण माझ्या दुसऱ्या मनाने मला सांगितलं... 'मग तू समाजसेवेचा खोटा आव आणतेस का? इतकं साधं तुला सोसता येत नाही.. फक्त बघायचे तर तुला एवढी किळस आली... ती कशी ते सगळं रूप घेऊन समाजात मिरवेल ना? काय सांगणार आहेस तिला तू '

...आणि मग कुठून अवसान आलं माहित नाही, आतून एक आवाज आला.. 'नाही नाही, हीच माझी परीक्षा आहे' ....आणि मी मलाच आजमावण्यासाठी असेल बहुदा.. तिला म्हणलं "हाय सुरेखा...." आणि तिचा तो मांसल वेडा वाकडा हात मी हातात घेतला... तो स्पर्श अगदी थंड होता. कुणीतरी पहिल्यांदा तिचा हात प्रेमाने हातात घेत होतं.. कुणीतरी तिला स्पर्श केला होता.. आणि तिच्या त्या चेहऱ्यावर ओठामधून एक छानसं हसू फुटलं. म्हणजे डब्यात ठेवलेल्या जाईच्या कळ्या उमललेल्या असाव्यात आणि एखादी तळातली कळी न उमललेली ..वरची फुलं काढल्यावर अलगद आणि पटकन उमलते ना तशी तशी ती हसली..! मला वाटतं खूप दिवसांनी ती हसली असावी.

मी माझी स्वतःची परीक्षा घेणं किंवा स्वतःला आजमावणं याच्यासाठी तो हात तिच्या हातात तसाच ठेवला आणि दोन मिनिटांनी त्या स्पर्शात काय संवेदना होती माहित नाही, मी तिच्या दुःखाशी तद्रूप झाले. क्षणभरात दिसणारे विद्रूप रूप माझ्यासमोरून नाहीस झालं आणि माझ्यासमोर दिसत होती एक छोटी मुलगी, तिला पुन्हा एकदा आपलं आयुष्य फुलवायचं आहे, माझ्या थोड्या मदतीची याचना ती करत होती.

बस, मी ठरवलं आणि तिला प्रवेश दिला. तिच्याशी खूप गप्पा मारल्या. बहुदा मी स्वतःला तिला सहन करू शकते का हे आजमावत होते.

तिला प्रवेश दिल्या मुळे तिचे आई-वडील दोघेही रडायला लागले. "बाई फार उपकार झाले. आज तुम्ही माझ्या मुलीला जवळ घेतलेत."

मी त्यांच्याही पाठीवरून हात फिरवला. त्यांना धीर दिला... शाळेचे नियम समजावून सांगितले आणि सुरेखाचा प्रवेश झाला ..!

पण इथे मुद्दा संपला नव्हताच. आमच्या मुख्याध्यापकांना मी तिचा विषय समजून सांगितला. त्या दोघी खूप चांगल्या होत्या. मी त्यांना सांगितले, "आपल्याला त्या मुलीला समजून घ्यायचे आहे."

.....तिथे मुख्याध्यापक म्हणून काम करणारी माझी मैत्रीणच होती आणि त्या माझ्या शाळेच्या निवृत्त मुख्याध्यापिका होत्या, वयाने मोठ्या होत्या.. आई होत्या. त्यानी त्या गोष्टी समजून घेतल्या!

शाळा सुरू झाली. मुलींचा वर्ग, मुलांचा वर्ग सुरुवातीला एकत्रच असे. मग ॲडमिशन सगळ्या झाल्या की मुला मुलींचे वर्ग वेगळे करत असू...

मी तेव्हा सेवासदन मध्ये नोकरी करत होते. मी एक तास सकाळी आणि एक तास संध्याकाळी शाळेमध्ये उपस्थित राहत असे. बाकी सगळे व्यवस्थापन माझा स्टाफ पाहत होता. शाळा माझी अगदी माझ्या संस्थेला लागूनच होती त्यामुळे मुख्याध्यापकांच्या परवानगीने मधल्या सुट्टीतही मी एक चक्कर टाकून जात असे. त्याप्रमाणे मी मधल्या सुट्टीत गेले. मुख्याध्यापिका म्हणाल्या, "बाई बरं झालं तुम्ही आलात. एक प्रॉब्लेम आहे..."

मी म्हणाले, "काय झालं ..?"

त्या म्हणाल्या, "ह्या मुलीबरोबर कोणी डबा खायला तयार नाही, हिला कोणी एक एकत्र बसून घेत नाहीत. आम्ही खूप समजून सांगितलं दोन-तीन दिवस, पण मुली ऐकायलाच तयार नाहीत. तुम्ही काही करता का पहा..."

मी दुसऱ्या दिवशी सकाळी प्रार्थनेच्या वेळेला मुलींना सांगितले की, "..मुलींनो समाजातले एक दुर्दैवी मुल आपण स्वीकारू शकत नसू तर तुम्ही पुढे जाऊन काय करणार. एखाद्याला मानसिक आधार देणे, मदत करणे हे आपण करायला नको का...? बरं, तिला कुठला रोग नाहीये. तो अपघात झाला होता आणि त्यामध्ये तिच्या शरीरावर हे वैगुण्य आले आहे. हे तुमच्या बाबतीत घडले असते आणि न करो पण पुढे तुमच्या एखाद्या मुलाच्या बाबतीत घडले, नातेवाईकाच्या बाबतीत घडले तर तुम्ही अशा वागणार आहात का? तुमच्या सहकार्यामुळे तिला मानसिक उभारी मिळणार आहे मुलींनो.. आणि मी तुमच्या विश्वासावरच तिला शाळेत प्रवेश दिला आहे. मला खात्री आहे की तुम्ही माझ्या सगळ्या मुली.. एका मुलीला समाजामध्ये शिक्षण घेण्याच्या कामी नक्कीच मदतीला उभे रहाल. पण तुम्ही तर मला निराशच केलं. मला ही अपेक्षा नव्हती तुमच्याकडून. अगं दहावी काय, तुम्ही पास व्हाल, पण आयुष्यामध्ये ज्या अनेक परीक्षा द्यायच्यात ना, त्याच्यामध्ये सामोरे जाताना द्याव्या लागणाऱ्या अनेक परीक्षांची तयारी आहे, त्यात तुम्ही नापास होणार आहात का? मुळीच नाही. तुम्ही पतकी बाईंच्या विद्यार्थिनी आहात हे लक्षात ठेवा. संकट आणि दुःखाशी सामना करणाऱ्या प्रत्येक माणसा बरोबर उभे रहाण्याची ताकद तुमच्यात आली पाहिजे...." आणि मी बरंच बोलत राहिले.

मुली खाली मान घालून बसल्या होत्या. "तुम्हाला डबा खायचा नसेल तर उद्या मधल्या सुट्टीत मी इथे येईन तिच्याबरोबर डबा खायला.. कारण तिला मी शाळेत घेतले आहे, ती माझी जबाबदारी आहे, तुमची नाही. आणि मी तुम्हाला याबाबत सक्ती करू शकत नाही."

दुसऱ्या दिवशी मी माझा डबा घेऊन संस्थेत गेले. मी, मुख्याध्यापक आणि ती मुलगी असा मी डबा माझ्या खोलीत खाल्ला. त्यानंतर तिसऱ्या दिवशी मी परत मधल्या सुट्टीत गेले त्यावेळी मात्र मला दृश्य वेगळे दिसले. माझ्या सगळ्या मुलींनी त्या मुलीला आपल्याबरोबर डब्यामध्ये बसवले होते आणि त्या आनंदाने गप्पा मारत डबा खात होत्या. ते दृश्य पाहून माझे डोळे वाहिले.

त्यांच्या डब्याच्या मध्ये जाऊन मी म्हणलं.. "तुम्ही माझ्या मुली आहात हे सिद्ध केलेत गं ..खूप छान वाटलं.... दहावी होण्यापेक्षा ह्या अशा गोष्टी शिकणं खूप गरजेचे आहे. खूप मोठ्या व्हाल. माझा आशीर्वाद आहे तुम्हाला ...!"

मुलीनाही खूप आनंद झाला. आपण चुकलो याची जाणीव झाली आणि वर्गात पुन्हा प्रश्न निर्माण झाला नाही... शाळा सुरळीत चालू झाली काहीच प्रॉब्लेम नव्हता

सुरेखाच्या डोळ्यात मला हळूहळू आत्मविश्वास दिसायला लागला. अभ्यासाला ती बरीच होती पण फार कृश होती. मी तिच्या पालकांना 'डॉक्टरांना दाखवून एखादं टॉनिक घ्या' असा सल्ला दिला. त्यानंतर नागपंचमी चा सण आला. म्हणजे साधारण ऑगस्ट महिना. शाळा सुरू होऊन दीड एक महिना झालेला. माझी मुलींची शाळा असल्यामुळे सेवासदनला सुट्टी होती ...शाळेला सुट्टी असली की पूर्ण वेळ मी नापास मुलांच्या शाळेत थांबत असे. आमच्या नापास शाळेला सुट्ट्या अगदी कमी, म्हणजे १५ ऑगस्ट, २६ जानेवारी आणि रविवार याखेरीस सुट्ट्या नाहीत, कारण मला नऊ महिन्यात अभ्यासक्रम पूर्ण करायचा असे. त्यामुळे या दिवशी शाळा चालू होती.

अर्धी शाळा झाल्यानंतर मुलांना सोडून देण्यात आले आणि त्यानंतर चार वाजता मुलींसाठी फेर धरण्याचा कार्यक्रम होता. मुलींना असे कार्यक्रम फार आवडायचे. त्यानंतर आम्ही त्यांना खाऊही देत असू.

माझ्या त्या शाळेची रचना अशी होती की एक मोठा हॉल होता, त्याच्या बाजूला एक छोटी खोली, नंतर अगदी एंट्रन्स लाईक छोटा व्हरांडा आणि त्याच्या बाजूला माझं ऑफिस. त्यावेळी संस्था लहान जागेत कार्य करत होती. ती जागा भाड्याची होती. त्याच्या व्हरांड्यामध्ये माझ्या बंधूनी भिंतीला एक मोठा आरसा बसवून दिलेला होता, कारण सकाळी तिथे लहान मुलांची शाळा म्हणजे नर्सरी होती.. ती मुले आले की आरशात बघून मग प्रवेश करीत असत.

त्या दिवशी मधल्या सुट्टीनंतर डबा खायला एक वेळ दिलेला होता. तेव्हा या सगळ्या मुली एकमेकींच्या हातावर मेंदी काढत होत्या. आज त्यांना काहीही करायला मुभा होती. गटागटांनी मेहंदी काढण्याचे काम चालू होते. मी सहज आत डोकावले तर ..सुरेखा च्या हातावर दोन मुली मेंदी काढत होत्या. मला खूप आनंद झाला. तिची ती दुमडलेली बोटं, तो भाजलेला हात, पण त्याच्यावर मुली आनंदाने मेंदी काढत होत्या. मला कुठेतरी मनात समाधान वाटले. मुलींचे आत मध्ये ड्रेसिंग चालले होते, लिपस्टिक लावत होत्या.. वेण्यांमध्ये गजरे घालत होत्या ..कुणी फेराच्या गाण्याची प्रॅक्टिस करत होत्या.. त्यांच्या शाळेत त्यांना संधी मिळाली नव्हती. आज इथे त्यांना ते मुक्तपणे अनुभवता येणार होते ...!

माझ्या ऑफिसमध्ये बसून मी समोर व्हरांड्याकडे पाहत असताना मला आरशासमोर सुरेखा दिसली. ती ही नटून आली होती. छान गुलाबी पंजाबी ड्रेस घातला होता. हाताला नुकतीच मुलींनी मेंदी लावलेली होती, आणि तिने गळ्यामध्ये एक हार घातला होता ज्याच्यावर आर्टिफिशियल खड्यांचे डिझाईन होते. तो हार ती व्यवस्थित करून आपल्या स्वतःच्या चेहऱ्याकडे पाहत होती आणि आनंदीत होत होती. ती हार पुन्हा पुन्हा व्यवस्थित करत होती.

मी आश्चर्यचकित झाले ... मुळात सुरेखाने आरशात आपल्याला पहावं हे धाडस होते आणि ती पुन्हा पुन्हा आपला तो गळ्यातला हार सारखा करून आपल्या छबीकडे पाहत होती. अर्थात आरशात बघायचे तिचे वयच होते, परंतु पूर्वी दुर्दैव हे की आरशातले रूप तिला आनंद देत नव्हते पण आता मात्र तसे नव्हते. त्या सुरकुतलेल्या भाजक्या जळक्या मानेवर रुळणाऱ्या त्या हाराला ती व्यवस्थित करत होती आणि पुन्हा पुन्हा तो नीट बसलाय ना हे निरखत होती. ..कदाचित तिला आपल्या चेहऱ्यात एक नवीन सौंदर्य दिसत असावे.

मी ते दृश्य डोळ्यात साठवून घेत होते... मी मनात म्हणत होते हिला त्यात जळक्या कातडीवर दिसणाऱ्या त्या हारातले कोणते सौंदर्य जाणवत होते ठाऊक नाही, पण तिला जगण्यातली सुंदरता मात्र जाणवली होती. तिचं ते आरशात पाहणं मला मोहून टाकणारे होते. सुरेखला समवयस्क मुलींनी स्वीकारणे... तिच्या कुरूपतेचा मनापासून सर्वांनी स्वीकार करणे.. तिला थोडे प्रेम देणे आणि पुन्हा वर्गात बसून शिकायची संधी मिळणे... या सर्व कृतींमुळे सुरेखाच्या चेहऱ्यावर जो आत्मविश्वास आला होता त्या आत्मविश्वासाचे विलोभनीय सौंदर्य मी पाहत होते.

आज सुरेखाच काय, मला सगळे जग सुंदर दिसत होते.. त्या आरशासमोरची मुलगी मला सर्वात सुंदर दिसत होती... कारण तिला जगणे सापडले होते.... खूप आनंदाचा क्षण होता. कदाचित त्या आरशानंही तिला सांगितलं असेल.. "सुरेखा, आज तू खूप सुंदर दिसतेस"..

नंतर सुरेखा अगदी सहज रुळली, उत्तम गुणांनी पास झाली. त्यानंतर तिच्या त्वचारोपणाच्या ऑपरेशन साठी एक सामाजिक संस्था पुढे आली. त्यांनी मदत केली. पुढे सुट्टीमध्ये तिची तीन-चार ऑपरेशन झाली आणि सुरेखाचे हात छान काम करायला लागले. बोटं सरळ झाली. चेहऱ्यावरचे आणि मानेवरच्या.. गळ्यावरच्या.. सुरकुत्या कमी झाल्या ! 'सुंदर मी होणार' चे सेशन दोन-चार महिन्यात बऱ्यापैकी यशस्वी झाले ..एका स्थानिक आमदाराने या कामी खूप मदत केली ..!

सुरेखा पास झाली आणि त्यानंतर तिने जवळच्याच कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. ती बीए झाली. बालवाडीचा कोर्स केला. एका अंगणवाडी मध्ये ती आता शिक्षक म्हणून कार्यरत आहे...!!!

आता माझे आरशात पाहण्याचे वय नाही, तरीही मी जेव्हा जेव्हा आरशात पाहते तेव्हा तेव्हा माझ्या आधी मला तिची प्रतिमा दिसते, कारण मला नेहमी जाणवत राहतं की आरशावर सुरेखाचा पहिला हक्क आहे, त्यानेच तिला सांगितलं, 'तू खूप सुंदर दिसतेस', आणि तिथूनच तिचा आत्मविश्वास वाढला. मुळतः आरशात बघण्याचे धाडस तिच्यात निर्माण झाले आणि आमची सुरेखा सुंदर झाली, अगदी अंतर्बाह्य.....!

**शीला पतकी, सोलापूर. ८८०५८५०२७९**

■■■

# खास डीश

– सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.

## मूगाची जामुनी चक्रीभोपळा मिठाई :

मुगाच्या डाळीचा हलवा ,लाडू वगैरे गोडाचे पदार्थ सर्वांना आवडतात आणि बनवलेली जातात .हलवा तर मोठया समारंभात खास डिश म्हणून बनवला जातो.मुगाची डाळ पचायला एकदम हलकी तर असतेच शिवाय

उग्र नसून सौम्य स्वाद असतो .त्यामुळे मिठाई खूप स्वादिष्ट बनते .आज सुद्धा आपण अशीच एक थोडीशी गुलाबजामून सारखी साखरेच्या पाकात मुरलेली एक मुगाच्या डाळीची मस्त मिठाई पाहूया . ही साखरेच्या पाकात मुरवलेली असल्यामुळे बंगाली वाटू शकते पण तेवढी स्वीट नसते . पाहायची ना मग ? लागा तयारीला. .

**साहित्या :** १ सपाट वाटी मुगाची डाळ , पाऊण वाटी तांदुळाचे पीठ , १ वाटी साखर ,१चमचा वेलची

पावडर ,१ चमचा कॅन्डेन्स्ड मिल्क ,१ वाटी झालेले ३ चमचे साजूक तूप ,आवडत असेल तर केशर काडया नाहीतर ऑरेंज फूड कलर .



**कृती :** प्रथम मुगाची डाळ गॅसवर छान गुलाबी होईपर्यंत भाजून घ्यावी.मग ती थंड झाल्यावर स्वच्छ धुवून १०..१५ मिनिटे पाण्यात भिजत ठेवावी .मग गॅसवर कढई ठेवून त्यात १ वाटी दूध व अर्धी वाटी पाणी घालून ते गरम करण्यास ठेवावे .ते गरम झाले की त्यात भिजलेली मुगाची डाळ घालावी व ते पूर्ण आटे पर्यंत आणि डाळ एकदम सॉफ्ट होईपर्यंत शिजवावी .डाळ सॉफ्ट झाल्यावर हे मिश्रण मिक्सर मधून छान बारीक वाटून घ्यावे .नंतर कढईत १ चमचा साजूक तूप घालून दुधातील आटलेले मुगडाळीचे वाटण त्यात घालावे.त्यातच कॅन्डेन्स्ड मिल्क घालून वेलची पावडर घालावी .नंतर तांदुळाचे पीठ घालावे व व्यवस्थित परतून एकजीव करून ते सतत परतत रहावे.घट्ट गोळा बनत आला की त्यात साजूक तूप घालावे व मस्त घोटत रहावे म्हणजे बुडाला लागणार नाही .खव्यासारखा घट्ट गोळा झाला की तो खाली काढून ठेवावा . आता गॅसवर कढईत साखर घालून त्यात ती पूर्ण बुडावी म्हणून दीड वाटी पाणी घालून त्याचा जेमतेम एकतारी पाक बनवून घ्यावा . मग त्यात केशर काड्या किंवा ऑरेंजफूड कलर घालावा .

आता हे मुगाच्या डाळीचे मिश्रण थंड झाले असेल व छान घट्ट झालेले असेल .मग त्याचे छोटया पळीमध्ये हे मिश्रण घालून त्याचे एकसारखे गोळे बनवावेत.मग हातावर एक गोळा घेऊन त्याला पेढेधाटी लाडूसारखा गोल ,बसका आकार द्यावा .मग करंगळीने मध्यभागी थोडेसे भोक पाडून टुथपिक च्या सहाय्याने आधी चारही बाजूना समोरासमोर दाबून रेषा पाडव्यात.मग मध्ये तशाच उभ्या रेषा पाडाव्यात त्याचा आकार चक्रीभोपळ्यासारखा दिसेल . अशाप्रकारे सर्व भोपळ्याच्या आकारात बनवून ठेवावेत .

आता गॅसवर कढई ठेवून त्यात तळण्यासाठी तेल घालावे.तेल गरम झाले की हे भोपळे तेलात सोडून मंद आचेवर खुसखुशीत लालसर रंगावर तळावेत व नंतर तेल व्यवस्थित निथळून

तारेच्या चाळणीत काढून ठेवावेत .तेल पूर्ण निथळून गेल्यावर ते गरम साखरेच्या पाकात टाकावेत १..२ तास छान पाक मुरु द्यावा . नंतर पाकातून बाहेर काढून सर्व्हिंग डिश मध्ये

काढून घ्यावेत आणी पिस्त्याचे तुकडे मधल्या छिद्रात भरावेत आणि सजवून खाण्यास द्यावे.

**वैशिष्टय:** ही मुगाची मिठाई गुलाबजामून सारखीच सॉफ्ट ,स्पंजी बनते . गरम व पातळ पाकामुळे तो पूर्ण मिठाईमध्ये लवकर आणि व्यवस्थित अगदी आतपर्यंत जातो.त्यामुळे ते खूप सॉफ्ट आणि स्पंजी होतात . आणि पाक पूर्ण निथळल्यामुळे जास्त गोड पण लागत नाहीत. वेलचीचा स्वाद खूप छान लागतो.मुगडाळ हलकी असल्यामुळे पौष्टीक असते.शिवाय चवदारही लागते.पिस्त्यामुळे हिरव्या देठाचा भास होतो.आणी खातानाही आज येते.ही मिठाई साखरेच्या पाकातील असल्याने बंगाली मिठाई वाटते , गुलाबजामुनच्या प्रकारात मोडणारी आणि दिसायला अगदी लाल चक्रीभोपळयासारखी दिसते . रसरशीत अशी हि आकर्षक मिठाई सर्वांना नक्कीच आवडेल.

## हेल्दी मखाणा डिझार्ट :

आता काळामानाप्रमाणे बरेच लोक हेल्थ कॉन्शस झाले आहेत. त्यामुळे लो कॅलरीज,हाय प्रोटीन,शुगरफ्री,ऑइल फ्री असे रोस्टेड किंवा बॉईल्ड फूड खाणे जास्त पसंत करतात.सुरुवातीला तेलकट, तूपकट ,खमंग फ्राईड ,चमचमीत पदार्थ खाण्याची सवय असणाऱ्यांना जड जाते,पण मग वजन, आरोग्य याचा विचार आला की आपोआपच या पदार्थांचा विचार करावा लागतो.पण एकदा याची चव आवडली की मग यातच नवीन प्रयोग करत छान छान पदार्थ बनवता येतात आणि गोड नसले तरी गोडी लागते याची. अगदी स्टार्टर पासून ते डिझार्ट पर्यंत असंख्य डाएटचे सुंदर सुंदर पदार्थ आपण सहज बनवू शकतो. पहायचे मग एक डिझार्ट बनवून? खरेतर डिझार्ट म्हणजे जेवणानंतरची खास सर्वांची लाडकी अशी गोड,थंडगार,आकर्षक अशी देखणी डिश!साहजिकच गोड असल्यामुळे थोडी हेवी,जेवणानंतर ही खाल्ल्यावर मस्त सुस्ती



आणणारी अशी टेस्टी असते.पण आज आपण थोडीशी वेगळी पण तितकीच गोड,टेस्टी,आकर्षक अशी हेवी तरीही पौष्टीक, आरोग्यासाठी उत्तम अशी डिश बनवूया. आता जास्त उत्सुकता न ताणता लागूया तयारीला..

**साहित्याः** १ वाटी मखाणे, १ चमचा चिया सीड्स, ४..५ बिया काढलेले खजूर, १०..१२ पिस्त्याचे काप, ५..६ बदामाचे काप,

१ कप शक्यतो गायीचे दूध, अर्धा चमचा सब्जा बी, केशराच्या २-३ काड्या, पाव चमचा वेलची पावडर, मध गोडीनुसार, सफरचंद किंवा संत्रा,अननस यासारख्या कोणत्याही फळाचे सजावटीसाठी एकदम पातळ काप.

**कृतीः** प्रथम चिया सीड्स,सब्जाचे बी भिजत ठेवावे.मग मंद गॅसवर कढई मध्ये मखाणे छान फुलून येईपर्यंत मस्त भाजावेत. त्यामुळे ते हलके होतात. थंड झाल्यावर मस्त कुरकुरीत बनतात. एरव्ही सुद्धा मधल्यावेळी खाण्यासाठी याला अगदी किंचीत गाईच्या तुपावर परतून मिरपूड, सैंधव,चाट मसाला किंचीत आवडत असेल तर तिखट लावून कुरकुरीत खाण्यासाठी बेस्ट डाएट फूड आहे. सर्व छान चिकटण्यापूरतेच तूप लावावे.तूपाचाही स्वाद मस्त येतो त्यामुळे खाताना मजा येते. मग हे मखाणे थंड झाले की त्यात बदाम पिस्त्यांचे काप,भिजवून ठेवलेले चियासीड्स,सब्जा बी,वेलची पावडर घालावी. खजुराचे अगदी जास्तीतजास्त बारीक काप करुन ते घालावेत. दूध गरम करतानांच १..२ केशर काड्या घालाव्यात म्हणजे त्या विरघळून त्यांचा रंग आणि स्वाद दोन्ही सुरेख दुधात उतरतो. हे दूध थंड झाले की मग या सर्वांवर घालावे. मग

आवडीनुसार जसा गोड लागेल तसा मध घालावा.सर्व छान मिक्स करावे व शेवटी वरती सजावटी साठी एखादी केशर काडी ठेवावी.

मग हे सेट होण्यासाठी फ्रीझ मध्ये २ तास तरी ठेवावे म्हणजे मखाणे मस्त फुगतात, टेस्ट पण एकत्र खूप छान येते. आता आपले डिझार्ट सर्व्ह करण्यासाठी तयार आहे. सर्व्ह करताना यावर फळांचे पातळ काप ठेवून थंडगार सर्व्ह करावे. डालिंबदाणे वरून घातल्यास डिश जास्तच आकर्षक दिसते.

**वैशिष्ट्यः** मखाण्यात खुप प्रमाणात प्रोटीन ,कॅल्शियम, आणि अनेक पोषक द्रव्यें असतात जी आपल्या शरीरासाठी ऊर्जा,उत्साह देतात त्यामुळे यातून आपल्याला भरपूर एनर्जी मिळते. यशिवाय यात भरपूर प्रमाणात फायबरस असल्याने पचनसंस्था व्यवस्थीत कार्य करते. सर्वांत कमी कॅलरीज असून मधुमेह ,रक्तदाब नियंत्रित करण्याचा महत्वाचा गुणधर्म यात आहे. खजूरामध्ये भरपूर आयर्न असून साखर,गुळ नं घालताही गोड व टेस्ट वाढवतो. मध तर आयुर्वेदात सर्वांत औषधी ,आरोग्यदायी असतो.त्यामुळे चव आणि स्वाद,गोडीही वाढते. चियासिड्स,सब्जा दोन्ही हेल्दी आहेच,वेलची आणि केशराचा मंद सुगंधी स्वाद तर जिभेवर मस्त रेंगाळतो. फ्रुट्स पण सिझनलं सर्व आरोग्यासाठी उत्तमच असतात. शिवाय गायीचे दूध वापरल्यामुळे ही नक्कीच उत्तम आहे. सर्वांत महत्वाचे म्हणजे ही टेस्टी आणि तितकीच आकर्षक आहे.उपवासालाही ही डिश खाल्यामुळे पोट तर भरतेच पण पित्ताचा त्रास नं होता उलट दिवसभर एनर्जी उत्तम राहते. मग आता नेहमी बनवणार ना?खात्रीच आहे मला.

## यम्मी ढोकळा स्टार्टर :

स्टार्टर हा सर्वांचाच अत्यंत आवडीचा भाग आहे. पूर्वी लग्न कार्य असले की डायरेक्ट भात,वरण,भाजी,पोळी,चटणी,कोशिंबीर, मसालेभात,मठ्ठा,एखादी पातळ भाजी,भजी ,जेवणातच स्वीट असे श्रीखंड,बासुंदी,जिलेबी असे पदार्थ असायचे. पण आता जेवणाचे स्वरूप विशेषतः पार्टी मध्ये बदललेले दिसते.वेगवेगळी सूप, तऱ्हेतऱ्हेचे स्टार्टर्स यांनी पार्टीची सुरुवात होते. त्यानंतर मग

मेनकोर्स म्हणजे जेवण आणि शेवटी स्वीट,डिझार्ट असे खूप बदलले आहे. स्टार्टर मध्ये हलके फुलके स्नॅक्स असतात.जसे मंचुरिअन, हराभरा कबाब, व्हेज६५, व्हेज क्रिस्पी असे असंख्य आणि टेस्टी, चटपटीत स्टार्टर्स बनवून खाल्ले जातात.आजही आपण एक सोपे, छान स्टार्टर बनवूया.



**साहित्याः** दीड वाटी बेसन,पाव चमचा सायट्रिक ॲसिड किंवा दीड चमचा लिंबाचा रस, २ चमचे साखर,

१ चमचा खाण्याचा सोडा किंवा इनो १ पाऊच, चिमुटभर हळद पावडर, पाव चमचा तेल, चवीनुसार मीठ. ग्लासला लावण्यासाठी थोडेसे वेगळे तेल.

**चटणीसाठीः** १ वाटी कोथिंबीर, २..३ हिरव्या मिरच्या, जिरे, आल्याचा छोटासा तुकडा, पाव वाटी नारळ, ५..६ लसूण पाकळ्या,चवीनुसार मिठ आणि किंचीत साखर, १ चमचा शेव.

सजावटीसाठी लाल टोमॅटो केचप.

ढोकळा बनवण्यासाठी कागदी छोटे छोटे ग्लासेस, लाकडी चमचे आणि मोदकपात्र किंवा वाफवण्यासाठी मोठी पसरट कढई, रिंग.

**कृतीः** प्रथम एका बाऊल मध्ये साखर, घालून साधारण अर्धा चमचा मिठ, हळद पावडर घालून त्यात १ बाऊल पाणी घालून व्यवस्थित मिक्स करावे. मग त्यात सावकाशपणे ढवळत ढवळत बेसन छान गुठळ्या होऊ नं देता मिक्स करून घ्यावे. आता त्यात पाव चमचा तेल घालावे. आणि पुन्हा हलवावे.

नंतर आपण चटणी बनवून घेऊ. त्यासाठी मिक्सरच्या भांड्यात चटणीचे सर्व साहित्य घालून नारळ,मिरची,कोथिंबीर, आले,लसूण, शेव,मिठ,साखर,जिरे सर्व घालून त्यात एक बर्फाचा खडा फोडून घालावा व मिक्सर फिरवून छान बारीक हिरवीगार चटणी बनवावी.

आता मोदकपात्रात किंवा कढई मध्ये पाणी घालून मध्ये स्टीलची रिंग किंवा मोठी वाटी ठेवून त्यावर डिश ठेवावी व गॅसवर ठेवावी. आता ग्लासना आतून तेल लावून घ्यावे.

त्यानंतर बॅटर मध्ये सोडा किंवा इनो घालून एकाच दिशेने गोलाकार भरपूर फेटावे म्हणजे ते फुगून येते आणि एकदम हलके बनते. रंग किंचीत पांढरट होऊन लेमन यलो दिसतो.आत हे बॅटर ग्लासेस मध्ये घालून ते मोदकपात्रातील डिशमध्ये ठेवावेत.वरून झाकण ठेवून साधारण ७..८ मिनिटे दणकून वाफ काढावी. म्हणजे आपला ढोकळा हलका फुलका,मस्त फुललेला बनेल. मग झाकण काढून सगळ्या ग्लास मध्ये मध्यभागी लाकडी चमचे खुपसावेत. ग्लास बाहेर काढून घ्यावेत व कोमट झाल्यावर गोल फिरवून चमचा हळुवार,अलगद्पणे घट्ट धरून ग्लास दोन्ही हातांच्या तळव्यावर अलगद चोळून ढोकळा चस्मच्यासहित बाहेर काढावा. आता ही आपली ढोकळा कुल्फी त्यात झाली. मग त्याचा पुढचा अर्धा भाग हिरव्यागार चटणीमध्ये बुडवावा.म्हणजे अर्धा हिरवा आणि अर्धा पिवळा दिसेल.आता अजून सुरेख दिसण्यासाठी आपण या दोन्ही भागांच्या मधोमध लाल टोमॅटो केचप एका छोटया चमच्याने किंवा पाऊच असतील तर एक टोक कापून त्याची मस्त धार निघते,असे सुरेख सजवून सर्व्हिंग डिश मध्ये काढून सर्व्ह करावेत

**वैशिष्ट्यः** काहीवेळा स्टार्टर खूप हेवी,तेलकट असतात,स्पायसी असतात. त्यामुळे त्रास होऊ शकतो. आणि पोट लगेच भरून जेवण्यासाठी भूकच राहात नाही त्यामुळे पुढील पदार्थांचा छान आस्वाद घेता येत नाही.हे स्टार्टर हलके असुन तेलकट,स्पायसी नाही उलट चटपटीत आणि टेस्टी आहे. कुल्फीसारखे बनवल्यामुळे हात खराब होत नाहीत.हिरवा,लाल,पिवळा अशी आकर्षक रंगसंगती असल्यामुळे लक्षवेधक होते.आवडत असेल तर बनवून झाल्यानंतर थोडासा पाण्याचा शिपका मारून फोडणी घातली तरी चालेल.यामुळे कोरडेपणा जातो आणि बराचवेळ झाकला नाही तरीही कोरडा पडून तोठरे बसत नाहीत. नक्की ट्राय करून पहावी अशीच सुरेख डिश आहे.

## बर्ड्स नेस्ट विथ एग्स :

दिवाळीच्या सुट्ट्या लागल्या आहेत.मुलांना काहीतरी छान आकर्षक खाऊ केला की खूप मज्जा वाटते खायला .त्यातून चटपटीत चाट म्हणजे तर मुलांचाच काय ,आपल्या सर्वांचाच अगदी वीक पॉईंट ! सकाळी फराळ, दुपारी गोडाचे जेवण झाल्यावर संध्याकाळच्या वेळी काहितरी असेच चटपटीत खावे वाटते . बाहेर फिरायला गेल्यावर भेल,पाणीपुरी ,शेव पुरी वगैरे चाट खातोच ,पण घरीच मस्त आणि हटके चाट आज आपण बनवू .वेगळे काहीतरी करतानाही मज्जा येते.म्हणतात ना ,कामातला बदल म्हणजेच विश्रांती वाटते . दररोज तेच पोळी भाजी बनवण्याचा आणि खाण्याचा कंटाळाच येतो .म्हणून चेंज म्हणून ही खास पोटभरीची डिश बनवूया .

**साहित्य :नेस्ट साठी :** ३ मोठ्ठे उकडलेले बटाटे , २०० ग्राम बारीक शेवया ,अर्धी वाटी खिसलेले पनीर , १ बारीक चिरलेला कांदा , ५..६ हिरव्या मिरच्या + ५..६ लसूण पाकळ्या + १ इंच आले + पाव वाटी कोथिंबीर यांचा बारीक वाटलेला ठेचा , अर्धा चमचा

धने ,जिरे पावडर , चाट मसाला ,चवीनुसार मिठ,तळण्यासाठी तेल.

**एग्स साठी साहित्य :**

१ वाटी खिसलेले पनीर किन्वा कॉटन चीज ,२..३ चमचे लागेल तसे कॉर्न फ्लोअर ,४..५ चीज क्युब्ज,चिमूटभर मिरपूड ,चवीनुसार मिठ .

**डिप करण्यासाठी** :-४ चमचे मैदा , ३ चमचे कॉर्नफ्लोअर , पाव चमचा मिरपूड ,पाव चमचा मिठ .

चिंचगूळ चटणी,हिरवी चटणी ,चाट मसाला ,बारीक शेव ,बारीक चिरलेली कोथिंबीर ,सहज असेल तर पाव वाटी बारीक चिरलेली कांदापात.

**कृती :-** प्रथम नेस्ट बनवायला घेऊ .त्यासाठी बटाटयाची साल काढून एकदम बारीक कुस्करावेत .मग त्यात कांदा ,ठेचा,पनीर , धनेजिरे पावडर ,घालावे .व व्यवस्थित मिक्स करून गोळा करून घ्यावा .त्याचे मोठया लिंबाएवढे बॉल्स बनवून मग वाट्या बनवून घ्याव्यात.

एका बाऊल मध्ये डिप करण्यासाठी मैदा ,कॉर्नफ्लोअर , मिठ व मिरपूड एकत्र करून त्यात थोडे थोडे पाणी घालून भज्याच्या पिठापेक्षा किंचित पातळ असे पीठ भिजवावे म्हणजे गाठी न होता छान एकजीव होईल .

आता दुसऱ्या बाऊलमध्ये शेवयांचा बारीक चुरा करून घ्यावा .तयार केलेल्या बटाट्याच्या वाट्या आधी डिप मध्ये बुडवून मग शेवयाच्या चुर्यात छान घोळवाव्यात .सर्व वाटीला शेवया हातानी दाबून व्यवस्थित चिकटवून घ्याव्यात .व अशाप्रकारे सर्व नेस्टस बनवून पालथे करून ठेवावेत म्हणजे त्यांचा आकार व्यवस्थित राहील .



त्यानंतर एग्ज् ? बनवून घेऊ .त्यासाठी एका बाऊलमध्ये पनीर , किंवा कॉटन चीज घेऊन तर छान मळून एकदम सॉफ्ट करावे .जेवढे मळले जाते तेवढेच ते सॉफ्ट व हलके होते शिवाय त्याला चिराही पडत नाहीत .मग त्यात मावेल तसे कॉर्नफ्लोअर घालावे ,चवीनुसार मिठ व मिरपूड घालावी व पुन्हा मस्त मळून त्याचे छोटे छोटे अंड्यासारखे बॉल्स बनवावेत.प्रत्येक अंड्यात मध्ये चीज क्युबचा छोटासा तुकडा ठेवावा व व्यवस्थित बंद करून अंडे बनवून ठेवावीत .नंतर गॅसवर कढईत तेल गरम करायला ठेवून ते गरम झाले की मध्यम आचेवर करून सर्व एग्ज त्यात घालून छान तळून घ्यावेत .मग नेस्ट बनवलेल्या वाट्या सुद्धा आतून व बाहेरून दोन्ही बाजूंनी लालसर रंगावर खुसखुशीत तळून घ्याव्यात व त्यावर लगेंच चाट मसाला भुरभूरावा म्हणजे चिकटतो आणि टेस्ट छान येते .

आता आपण घरटे सजवायला घेऊ .त्यासाठी नेस्ट घेऊन त्यात हिरवी चटणी घालावी .त्यावर चिंचगुळाची चटणी घालावी . त्यात मावतील तशी २..३ अंडी ठेवावीत व बाजूंनी रिकाम्या जागेमध्ये थोडी शेव ,कान्दापात,कोथिंबीरीचे पान असे ठेवून सजवावे आणि छान डिशमध्ये खाली बारिक शेव ,कोथिम्बिर ,कान्दापात पसरुन त्यावर बर्ड्स नेस्ट मध्ये ठेवून सर्व्ह करावे .शेजारी छोटया छोटया वाटयात चटण्या ठेवाव्यात .आवडत असेल तर मिठ, आले ,मिरची ,साखर घालून बनवलेले मस्त दही ठेवावे.आता आपली आकर्षक डिश खाण्यासाठी सज्ज झाली आहे .

**वैशिष्टयः-** ही दिसायला एकदम आकर्षक,नावीन्यपूर्ण, लक्षवेधक अशी सुरेख दिश आहे .पाहताच मोठयांना खाण्याचा मोह आवरणार नाही आणि मुले तर तुटून पडून पाहता पाहता फस्त करतील .उकडलेले बटाटे ,चीज ,पनीर ,चाटचे सर्व साहित्या तर सर्वांना आवडतेच कुरकुरीत शेवे बरोबरच शेवयाही मस्त कुरकुरीत लागतात. अंड्यातील चीज तेलात तळले गेल्यामुळे वितळून त्याची टेस्टही खूपच छान लागते.हिरवीगार स्पायसी चटणी,चिंच गुळाची ब्राउन चटपटीत चटणी,कांदापात आणी कोथिंबीरीचा मस्त हवाहवासा स्वाद ,पांढरेशुभ्र टेस्टी दही ,पिवळी सोनेरी बारीक शेव ,ग्रे कलरची अंडी , अशी कलरफुल डिश पाहिल्यावर कोणाला खाण्याचा मोह आवरेल..आणि बटाटा,चीज ,पनीर वगैरेमुळे हेवी आणि पोटभरीची अशी ही सुरेख डिश आहे. पोट पण भरणार आणि तृप्तही होणार हे नक्की.

## बिशी ब्याळी दलिया :

दिवाळीत सकाळी लवकर फराळ झाला की खुप सुस्तावल्यासारखे होते. मुले,पुरुष आराम करतात,पण बायकाना मात्र दुपारी,रात्रीच्या जेवणात काय करावे हा मोठाच प्रश्न असतो. अशावेळी काहीतरी नवीन,वेगळे असावे सुट्टीत अशी साऱ्यांची इच्छा तरी असते,पण बायका आधीच फराळाचे पदार्थ करून दमलेल्या असतात. त्यांनाही सर्वांबरोबर वेळ घालवावा,झटपट स्वयंपाक आटोपून थोडासा आराम करावा असे वाटतेच की!म्हणून यासाठी एक

उत्तम मार्ग आहे माझ्याकडे,वन डिश मिल!

हे पूर्णांन्न तरी आहेच,पण गरम गरम खास आणि पौष्टीक अशी नवीन डिश बनवल्यामुळे सारेच खुश होतील. कमी कष्टात, पोटभर आणि टेस्टी डिश सर्वजण एकत्र बसून जेवून नंतर आराम करून सुट्टी एन्जॉय करु शकतो. पाहायची आहे मग ही डिश ?

दलिया म्हणजे गहू भरडून काढलेला जाड चुरा.बिशी म्हणजे गरम ..ब्याळी म्हणजे डाळ! म्हणजेच गरमगरम डाळी आणि गव्हापासून बनवलेला हा सुरेख ,पौष्टीक असा खास पदार्थ आहे .हा एक भरपूर प्रोटीनचा मोठा खजिनांच आहे .शिवाय त्यात भरपूर फायबर असते जे पोटासाठी खूप उत्तम असते .दिवसभर यामुळे ऊर्जा मिळते व कार्य करण्यासाठी लागणारे बळ मिळते वेगवेगळ्या डाळी व भाज्यामधुन मोठया प्रमाणात जीवनसत्वे,कॅलरीज ,प्राथीने , आयर्न,कॅल्शिअम,मॅग्नेशीयम,आणि चिंचगुळाच्या वापरामुळे व्हिटॅमिन ,मिनरल्स मिळतात तर तेल, तूप यातून स्निग्धता मिळते . केस ,डोळे ,दात,नखे हाडे ,त्वचा व पर्यायाने संपूर्ण शरीराचे आरोग्य उत्तम राहते व सुधारते .चला मग बघूया ...

**साहित्या :-** १ वाटी दलिया ,पाव वाटी तान्दुळ ,१चमचा उडीद डाळ,पाव वाटी तुरीची डाळ,पाव वाटी हरभऱ्याची डाळ, पाव



वाटी मुगाची डाळ,१ मध्यम कांदा ,१ टोमॅटो ,१ वांगे ,१ मोठी सिमला मिरची ,अर्धी वाटी मुळ्याच्या मोठ्या फोडी ,अर्धी वाटी कोथिंबीर ,पाव वाटी चिंचेचा कोळ ,मध्यम आकाराचा गुळाचा खडा ,पाव चमचा मेथ्या ,जिरे,मोहरी ,हिंग ,हळद ,कढीपत्ता,१ चमचा लाल तिखट ,अर्धा चमचा काळा मसाला अर्धा चमचा सांबर मसाला , चवीनुसार मीठ ,२ चमचे नारळाचा चव,तूप .

**कृती :-** प्रथम उडीद डाळ सोडून सर्व डाळी,तांदूळ ,दलिया स्वच्छ धुवून कुकर मध्ये अर्धवट शिजवून घ्याव्यात.मग सर्व भाज्या थोड्या मोठ्या कट कराव्यात .कारण बारीक कट केल्या तर शिजल्या की एकदमच मऊ होतील .नंतर त्या कढई मध्ये १ चमचा तेल घालून गरम झाले की त्यात थोडी मोहरी,मेथ्या,कढीपत्ता व हळद घालून कांदा घालून थोडासा परतावा .मग हळू हळू एकेक सर्व भाज्या ,कोथिम्बिर घालून व्यवस्थित परतून घ्यावे .मग त्यात मसाले व तिखट घालून गूळ घालावा व त्यानंतर त्यात अर्धा शिजवलेला दलिया घालावा व चिंचेचा कोळ घालून नारळ व चवीनुसार मीठ घालावे व झाकण ठेवून मस्त शिजवून घ्यावा .व्यवस्थित शिजला की छोट्या कढल्यात २ चमचे तेल घालून ते गरम झाले की त्यात मोहरी ,जिरे ,उडीद डाळ हिंग ,हळद घालून मस्त फोडणी झाली की त्यावर घालावी.वरुन फोडणी घातल्यामुळे रंग छान यतो .वरून कोथिंबीर घालून मस्त नारळाचा चव घालावा .सर्व्हिंग डिश मध्ये काढून वरुन साजुक तूप घालुन गरम गरम सर्व्ह करावा .

**वैशिष्ट्य :-** हे वन डिश मील आहे. ब्रेकफास्ट,जेवण,रात्रीच्या जेवणासाठी उत्तम डिश आहे.या भाज्यांच्या व्यतिरिक्त तुम्हाला आवडणाऱ्या गवार ,ब्रोकोली ,दोडका शेवाग्याच्या शेंगा, कॉर्न,मटार अशा कोणत्याही भाज्या घालू शकता.थंडीच्या दिवसात तर खाताना खूपच मजा येते.आंबट ,गोड,तिखट,खारट,किंचित कडवट अशा सर्व चवी असल्यामुळे सर्व रस पोटात जातात. आरोग्यासाठी हे खुप गरजेचे असते.सर्व भाज्यांची यात एकत्र वेगळीच सुरेख चवं येते.तान्दुळामुळे जास्त एकजीव तर होतेच पण स्वाद ही छान येतो.खमंगपणा आणि साजूक तुपाची मस्त टेस्ट जिभेवर रेंगाळत राहते. एका डिश मध्येच पोट भरते ..

■■■





ग्रामपंचायत घोटावडे
.''आपल्या जीवनातल्या अंधाराचा नाश होवो,
कर्माची वात, भक्तीचं तेल
आत्म जाणिवेची ज्योत लावून
आपल्या ज्ञानाचा प्रकाश सदैव तेवत राहो
हीच ईश्वरचरणी सदिच्छा!!!
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!!!''
सौ.मंगल उत्तम गोडांबे
वि. सरपंच
श्री.भिमाजी रासू केसवड
उपसरपंच
श्री.राजाराम बीजीराव शेळके
मा.उपसरपंच
श्री.नवनाथ महादू भेगडे
मा.उपसरपंच
श्री.संतोष शंकर गोडांबे
मा.उपसरपंच
श्री.हनुमंत उत्तम घोगरे
सदस्य
श्री.संभाजी दत्तात्रय गोडांबे
सदस्य
सौ.स्वाती अजित भेगडे
मा.सरपंच
सौ.भाग्यश्री शिवाजी देवकर
मा.सरपंच
सौ.सारिका बाळासाहेब खानेकर
मा.सरपंच
सौ.वैशाली संदीप कुंभार
मा.सरपंच
सौ.निकिता मयूर घोगरे
सदस्या
सर्व नागरिकांना
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
सौ.सोनाली दत्तात्रय मातेरे
सदस्या
श्री.चंद्रकांत देवकांबळे
ग्रामपंचायत अधिकारी
-: समस्त ग्रामस्थ घोटावडे आणि ग्रामपंचायत कर्मचारी :-


जोरी पाटील एच.पी.गॅस
ग्रामीण वितरक-माले
HP GAS
your friendly gas
ऑफिस संपर्क-९३७०८००८२६
आर.बी.जोरी अँड सन्स
सिव्हिल कॉन्ट्रॅक्टर अँड बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स
९७६५१३३९२७
सर्व नागरिकांना..
शुभदिपावली
शुभेच्छुक
श्री.दिपक रमेश जोरी
९७६५१३३९२७
जोरी पाटील सप्लायर्स
बिल्डिंग मटेरियल तसेच जे.सी.बी,डंम्पर व टँकर भाड्याने मिळेल.
९६७३४२२०२१


सर्व नागरिकांना..
शुभ दीपावली
छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने,
पावन झालेल्या भुमीत,
आई जगदंब देवीच्या क्रुपेने,
तुम्हाला व तुमच्या सहपरिवाराला
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
श्री. गंगाराम मातेरे पाटील
मा.सदस्य : ग्रामपंचायत घोटावडे


दिवाळीच्या सणानिमित्त, तुमच्या घरी पवित्रता आणि प्रकाश
यांचा आगमन व्हावो, सुख, समृद्धी आणि शांती घेऊन! दिवाळीच्या शुभेच्छा!
धन्वंतरीच्या कृपेने, तुमच्यावर आनंद, आरोग्य आणि श्रीमंतीची बरसात व्हावो!
दिवाळीच्या शुभेच्छांसह, तुमच्या घरात एकात्मतेचा प्रकाश राहो!
शुभ
दिपावली
सर्व नागरीकांना
हार्दिक शुभेच्छा..।
श्री.दिपक दगडे पाटील
उपाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पुणे शहर
उपसरपंच, बावधन - बुद्रुक


."पुन्हा एक नवे वर्ष, पुन्हा एक नवी आशा,
तुमच्या कर्तृत्वाला पुन्हा एक नवी दिशा
नवे स्वप्न, नवे क्षितीज, सोबत माझ्या
दिवाळी आणि नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा...!!"
शुभ
दिपावली
श्री.बाळासाहेब कुरपे-पाटील
मा.संपर्कप्रमुख भाजपा मुळशी तालुका, पुणे
आपणा सर्वांना दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..!!



शुभ
दिपावली
आपणा सर्वांना दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
श्री.बाबाजी सोपानराव शेळके
मा. आदर्श सरपंच, पिंपळोली
अध्यक्ष, मुळशी ता. वारकरी सेवा
सौ.मंदाताई बाबाजी शेळके
ग्रा.पं.सदस्य, पिंपळोली
अध्यक्ष, गरजाई म.बचत ग.




शिवसेना
सर्व नागरिकांना..
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
."आपल्या जीवनातल्या अंधाराचा नाश होवो,
कर्माची वात, भक्तीचं तेल
आत्म जाणिवेची ज्योत लावून
आपल्या ज्ञानाचा प्रकाश सदैव तेवत राहो
हीच ईश्वरचरणी सदिच्छा!!!
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!!!"
श्री.ज्ञानेश्वर डफळ
अध्यक्ष : शिवसहकार सेना, मुळशी तालुका, पुणे
अध्यक्ष : शिवआरोग्य सेना, मुळशी तालुका, पुणे


यशस्वी वाटचालीचा रौप्यमहोत्सव २०००-२०२५
प्रथितयश लेखक, आंतरराष्ट्रीय पत्रकार
वाटचालीस २५ वर्ष पूर्ण
विक्रमी २५ वर्ष
विक्रमी २५,००० पुस्तक विक्री
ऑलिम्पिकवीर खाशाबा
MAJOR DHYAN CHAND
हार्दिक अभिनंदन
प्रा. संजय दुधाणे
आंतरराष्ट्रीय पत्रकार लेखक
महा वार्ता
संपादक- महावार्ता न्युज
अध्यक्ष - ध्रुवतारा फाऊंडेशन | मा.अध्यक्ष, मार्गदर्शक- मुळशी पत्रकार संघ
www.mahavarta.in
सौजन्य- पिरंगुट ग्रंथालय व अभ्यासिका समिती,.मुळशी, पुणे


प्रेमाच्या नात्यात मिसळू फराळाचा गोडवा
सुख समृद्धी घेऊन येवो दिवाळीचा पाडवा
सर्व नागरिकांना..
शुभदीपावली...
श्री. शंकर दत्तात्रय केमसे
•मा.सभागृह नेता,पुणे म.न.पा
•मा.नगरसेवक,पुणे म.न.पा •उपाध्यक्ष,राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी,पुणे शहर


.“उत्कर्षाची वाट उमटली
विरला गर्द कालचा काळोख
क्षितिजावर पहाट उगवली,
घेऊनिया नवा उत्साह सोबत
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..!!”
सर्व नागरिकांना..
शुभ दिपावली
श्री.अमितभाऊ कंधारे
मा.सदस्य : पुणे जिल्हा नियोजन समिती


.“आनंदाचे गाणे गात दिवाळी येते अंगणात,
सुखाची मग होते बरसात तेजाची मिळते साथ.
हि दिवाळी आनंदाची, सुखसमृध्दीची जावो”
सर्व नागरिकांना..
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
श्री.प्रशांत मोहन रानवडे
मा.आदर्श सरपंच ग्रा.पं.नांदे, मुळशी, पुणे
युवा नेते, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार पक्ष



शुभ दिपावली
छत्रपती शिवरायांच्या पदस्पर्शाने,
पावन झालेल्या भुमीत,
आई जगदंब देवीच्या कृपेने,
तुम्हाला व तुमच्या सहपरिवाराला
दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
श्री. रविकांत दादा धुमाळ
मा.सरपंच घोटावडे
मा.तालुका प्रमुख,मुळशी
शिवसेना
The Green Gate Resort
शुभदीपावली...
Booking :-8378938000
Web:- thegreengateresorts.com
Address - Dhokalwadi (Warak), Tal-Mulshi, Dist Pune - 4121038.


आपणा सर्वांना दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..!!
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
श्री.सुनिल बबन शिंदे
सरचिटणीस : राष्ट्रवादी काँग्रेस मुळशी तालुका
सौ.प्रिती सुनिल शिंदे
मा.सरपंच : ग्रा.पं. कासारआंबोली,मुळशी


आपणा सर्वांना दीपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..!!
शुभ दिपावली
श्री.हनुमंत चंद्रकांत सुर्वे
शिवसेना तालुका समन्वयक मुळशी
मा.आदर्श सरपंच जामगाव-दिसली
शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे

# काव्य विभाग

## जिजाऊमाता

रामकृष्णाच्या, भीमअर्जुनाच्या
पराक्रमांच्या सांगुनी गोष्टी
जिजाऊमातेने घडविला
बालशिवबा स्वराज्यासाठी..

शौर्याचे, धैर्याचे, धीराचे
बाळकडू दिले लढण्याचे
संस्कारांचे, संस्कृतीचे
धडे दिले चलाखीचे..

स्फूर्ती दिली, प्रेरणा दिली
शक्ती दिली, भक्तीही दिली
शिवबाला जिजाऊमातेने
स्वराज्याची नीती दिली..

जिजाऊमाता स्वराज्याभिमानी
शिवबा घडविला स्वदेशाभिमानी
शिवबा घडले, शूर बनले
स्वराज्याचे तोरण बांधले


शिवरायांच्या पाठीवर
जिजाऊंचा खंबीर हात
त्यांनी स्थापिले स्वराज्य
करुनी शत्रूवर मात..

अशी आमची जिजाऊमाता
थोर, महान, वीरा धुरंधर
शिवराय घडविले धाडसी
तिने शूर, चतुर, बहाद्दर..

तिच्या तोडीस तोड नाही
जगात कुठेही पृथ्वीतलावर
आमचे वीनम्र वंदन तिला
त्रिवार साष्टांग निरंतर

- प्रा.देवबा शिवाजी पाटील,
गोविंदनगर, (नांदुरा रोड),
खामगाव. जि.-बुलडाणा.४४४३०३
मो.९४२०७९५३०७





## पत्रिका हेतू

दो फूल
दो अक्टूबर को दो फूल खिले महान,
दो अजूबे नूरोंसें महका हिंदुस्तान
एक थे गाँधीजी और दूजे शास्त्रीजी,
करके महान कार्य ,बने राष्ट्रवादी
एक ने दिया रघुपती राघव राजाराम,
दूजे ने दिया जय जवान जय किसान
सत्य अहिंसा से अंग्रेजों को धूल चटाई ,
विश्वशांति का अग्रदूत बन आस जगाई
त्याग ,तपस्या,सादगी के दोनों बने मिसाल ,
कठिन परिश्रम की ज्वाला में तपे दोनों लाल
दोनों ने मिलकर देखा सुख समृद्धि का सपना,
कंटक राह पर चलकर देश को सर्वस्व अर्पण किया
युद्ध और शांति के लिए दोनों ने वीरगति पाई
याद रखेंगी दुनियां इनके तप व बलिदान को,
दोनों ने अपनी जान दे दी आनबान
शान पर
श्रद्धा सुमन चढ़ाए दोनों को जोखेले
अपनी जान पर,
मर मिट गए पर सादगी का चोला न
छोड़ा
सबमे प्रेम और सद भावना का अनूठा रंग घोला
एक थे बापू दूजे थे लाल ,
इस धराके अमर सपूतों को
याद करेंगे हम दोनों को
तन –मन समर्पित जैसी संस्कृति भारत आई,
ऐसे सच्चे दो वीर पुरुष मिले हिन्दुस्तान को
आओ मिलकर दिया जलाये,
जन्मदिन हम सब दोनों का मनाएं

– अविनाश खरे, पुणे ,महाराष्ट्र

## शोधूनही सापडेना

शोधूनही सापडेना
समाधान जीवनात
सुख सोहळे चालले
शांती वसेना घरात

वेगळाले आप्तजण
मन मनाशी जुळेना
स्वयंपूर्ण जीवनात
काही कुणाचे अडेना



नांदते परकेपण
घरातल्या घरात या
कसे येईना ध्यानात
ढासळतो हळू पाया

नात्यातल्या सागरात
नाव भरोशाची गळे
नसे चित्त थाऱ्यावर
गेली कोमेजून फुले

दुभंगली वीट वीट
अहंकार पदोपदी
नभ विशाल मायेने
तरी वाहणार नदी

– तुकाराम पुंडलिक खिल्लारे,
५७, पार्वती निवास ,गणपती मंदिराच्या बाजूला,
लोकमान्यनगर,परभणी – ४३१ ४०१
भ्रमणध्वनी : ८८३०५९९६७५



## चालायचे पुन्हा पुन्हा

उदास भकास
एकसारखे वाटते
सुगंध दुर्गंध
काही काही न कळते

खंतणे गुंतणे
दिनरातीत कोणत्या
उलटया सुलटया
दिशा फिरून त्याच त्या

वाढला खुंटला
सूर्य भूईवर तसा
पिकले सुकले
धान्याविण खुला पसा

कविता क्षणिका
खणखणाट नुसता
रडणे हसणे
भाव कळेना कोणता

फुलाया मिटाया
एकटया काळीज खुणा
धुळीत मातीत
चालायचे पुन्हा पुन्हा

**– तुकाराम पुंडलिक खिल्लारे,**
**५७, पार्वती निवास ,गणपती मंदिराच्या बाजूला,**
**लोकमान्यनगर,परभणी – ४३१ ४०१**
**भ्रमणध्वनी : ८८३०५९९६७५**





## धुंद उधाणवारा

आला पाऊस पाऊस
धुंदावला उधाण वारा
शीळ घालत पाखरेही
टिपती रानातला चारा

माळावरची रानफुले
बहरलीत ही नानारंगी
पिसारा फुलवून रानी
मयूर नाचतो बहुढंगी

पिसाटला पाऊसवारा
पानासंगे धरितो ताल
फेर धरूनी तो चौफेर
खेळतो दुडकीच चाल

फुलपाखरे भ्रमरासवे
वेडावलीत रानपाखरे
घेती मंजुळ लकेरतान
करत किलबिल नखरे

गोळा करूनी मकरंद
भिरभिरती फुलपाखरे
नाजुक इवल्या पंखांचे
रूप दिसते गोडगोजिरे

**– सौ. भारती दिलीप सावंत**
**खारघर, नवी मुंबई, ९६५३४४५८३५**

## कर्मकांड

जरा ओळखा कधीपासूनी कोणी लादले कर्मकांड हे
किती जणांना किती तऱ्हानी कसे बांधले कर्मकांड हे

सटवाईच्या ललाट रेषा कुणी पाहिल्या कुणी वाचल्या
जन्माआधी जन्मानंतर किती जाचले कर्मकांड हे

अज्ञानाच्या अंधाराने मेंदू सारे गुलाम केले
पिढ्यापिढ्यांना छळून गेले किती काचले कर्मकांड हे

असेच का हे तसेच का ते विचारण्याला सक्त मनाई
बनासारखे मनात साऱ्या कसे माजले कर्मकांड हे

धर्म कसा हा कर्मा वाचून ऐतोबांची मिजास आहे
राब राबतो त्याच्या पाठी कसे लागले कर्मकांड हे

प्रसंग मंगल आला अथवा दुःखाचा डोंगर कोसळला
पाठीवरच्या वेताळासम सदा गाजले कर्मकांड हे

नादानांच्या नादी लागून अवघे जीवन गेले वाया
अगाध  फसवा गाळ भरावा तसे साचले कर्मकांड हे

मेल्यावरही सुटला नाही मगरमिठीचा फास आवळला
गात्रागात्रातून टोचले किती वाढले कर्मकांड हे

– प्रा. विश्वनाथ गायकवाड
मु.पो.कमळापूर ता. खानापूर जि. सांगली
पिन.४१५ ३०३ . मो.नं.९४ २३० ३८० २६





## कवेतलं आभाळ

मी नाचून घेतलं
मी गाऊन घेतलं
मी हंसता हंसता

पाय काट्यानं भरलं
मन रक्तानं भिजलं
दुःख सांडून टाकलं
मन पुसून घेतलं

खंत कशाची करावी
पाग कुणाचा धरावा
प्रारब्ध माझं मीच
माझ्या ओटीत घातलं

माझा मलाच भरवसा
माझी मलाच सोबत
अवघं आभाळ आता
मी कवेत घेतलं

– नलिनी भोसेकर



## मोकळीच मी

कुणी म्हणाले मेंगळी
कुणी म्हणाले वेंधळी
कुणी म्हणाले नाटकी
हिची झोळी फाटकी

कुणी म्हणाले हिला
कसली आली कॅपॅसिटी
ही तर पूर्ण घाटी
हिची कोरी पाटी

जीवंतपणीच इतके हार
माझ्या गळ्यात पडले
या हारांचे ओझे झाले

हे माझे ओझे घेऊनी मी
येऊ कां तुमच्या घरी
मी देवाला विचारले
आणि एक नवल घडले

हारांचे ओझे तेंव्हा
गळून पडले
मोकळी आणि मोकळीच
मी देवाघरी निघाले.

– नलिनी भोसेकर
येरवडा पुणे





## हायकू बाशोचे

१. ऋतु बहर –
गंगा फक्त पहावी
सर्व बाजूंनी

२.
ऋतु असर –
कराया खारवणी
नसे बरणी


३.
थंड गारवा –
भयानक स्मशान
ओस ... उदास

४.
गाढ प्रेमाचे
संपले हितगुज –
रात्र वादळी



५.
मस्त शरद –
फुलपाखरू पिते
दंव झेंडूचे

– तुकाराम पुंडलिक खिल्लारे,
५७, पार्वती निवास , गणपती मंदिराच्या बाजूला,
लोकमान्यनगर,परभणी – ४३१ ४०१
भ्रमणध्वनी : ८८३०५९९६७५



## कन्यारत्न

पोटी नऊ मास वाढवूनी थकली काया
अतीव असह्य जाहल्या प्रसव वेदना
कन्यारुपी दिले देवाजीने दान पदरा
संतुष्ट माऊलीचा गगनात आनंद मावेना

नकट्या नाकाची कुरळ्या केसांची गोरी पान
ही छकुली माझी बाहुली आहे किती छान
तिज उरी कवटाळीता मातेचे हरपले भान
म्हणे देवा तुझे मजवरी असे थोर उपकार

आहे मोठी गुणाची माझी गं दुधावरची साय
मायेने आजी करी नातीचे कोडकौतुक फार
वयानुसार तिजवरी आजोबा करी संस्कार
कर्तव्यदक्ष बाबा चढवी शिक्षणाचे अलंकार

बघता बघता लेक झाली की हो पदवीधर
घरातील मंडळी शोधू लागली यथोचित वर
लेक शहाणी वदे नको मज हुंडा घेणारा पती
हवा सुशिक्षित सुसंस्कृत मनमिळाऊ साथी

एके दिवशी घेऊनी आली घरा तिचा सन्मित्र
तिजसम शिक्षित संस्कारी पती होण्यास पात्र
एकमुखी दिला घरातल्यांनी होकार सत्वर
सुपारी फुटली उडाला हुंड्याविना लग्नाचा बार

**- प्रिया फुलंब्रीकर**





## बळीराजा

बळीराजाच्या नशिबी सदा सुखाचा चकवा
जग चाली उजव्याला त्याला धूरविती डावा

क्रिकेटच्या शतकाचा जगभर गवगवा
औतामागे बाप माझा काढी हजारोंनी धावा

ताकासाठी तरसती त्याची चिमणीपाखरं
पशुधन ना पदरी यांच्या मुखी लोणी- खवा

बैल बनून राबतो बैलासवे  माझा बाप
कधी होई कर्जमाफ जग करी त्याचा हेवा

भूक दुष्काळाशी त्याची असे नित्याची लढाई
हार त्याची ठरलेली जिंके कसाबांचा कावा

येता निवडणूक नेते करती सुराज्याचा दावा
खुर्चीचा मोक्ष त्यांचा त्यांना लखलाभ व्हावा

धर्मकर्म रक्षणाचे असे ब्रीद तुझे देवा
धाव धावरे माधवा आता तुझाच रे धावा

**- आनंद देशमुख,**
**९१,दंडवतेनगर, शिरपूर, जि.धुळे २५४०५**
**(९८६०६३०२३०)**

## शोध

मी ..आत्म्याचा.. शोध घेतला
पण ,मी तो पाहू शकलो नाही
मी ..ईश्वराला..शोधले
पण, तो ही सापडला नाही
पण,
जेव्हा शोधले माझ्या आईला
तेव्हा तिघांचाही शोध लागला...

– पुरूषोत्तम रोहणकार

## चीतचोर

निल नभांगणी,विसावली चांदणी
चितचोर मनी ,कोण सांग साजणी
कशी गं चांदण दवात भिजली ....
पानाआड का रातराणी लाजली ...

नाजूक वेलित गंध दरवळला
कोवळ्या कळीचा जीव अडखळला
सोनकांती धवल रंगी सजली ...
पानाआड का रातराणी लाजली ...

जाळीत घनदाट सांडल्या तारकां
वेलीला गंधवेड्या नागिनीचा विळखा
रात्रीच्या कुशीत बिलगून निजली ...
पानाआड का रातराणी लाजली ...

भुलली,फुलली कळी खुलली
पहाटवाऱ्याची मोहित मुरली
पानात,मनात, तालात वाजली ...
पानाआड का रातराणी लाजली ...



– वर्षा झांबरे,
मारुती मंदिर नजीक,महानर्मदा,
मेन रोड,गडमुडशिंगी,
ता.करवीर,जि.कोल्हापूर.
पिन कोड ४१६११९
मो.नंबर ९०९६७६५८५६

## झुंजार

लोकशाहीचेच बारा वाजलेले पाहतो
सूडचक्राचे इशारे गाजलेले पाहतो

धर्मसत्ता राजसत्ता एक झाल्यासारख्या
वीष त्याचे रोज थोडे पाजलेले पाहतो

न्याय झाला अंधळा लाचार झाल्या वाहिन्या
मानभावी बोल खोटे योजलेले पाहतो

ूलथापा मारण्याचे वेड त्यांना लागले
कोडग्यांना काय कोणी लाजलेले पाहतो ?

घेतला कैवार बाणा रामशास्त्री दावीला
जिंदगीचे मोल त्यानी मोजलेले पाहतो

नेमके हातात आले पेटते कोलीत हे
टोळक्याने दानवाना माजलेले पाहतो

पेटत्या रानात कोठे सापडेना आसरा
राहिले झुंजार तेही भाजलेले पाहतो

– प्रा.विश्वनाथ गायकवाड
मु.पो.कमळापूर ता.खानापूर जि.सांगली
पिन. ४१५३०३ मो.नं. ९४ २३० ३८०२६



## सण अपूर्वाय

बायडीकरते खरेदी
दम मुळीचं  गं नाय
आहे  का बा हिंमत
पहा विचारुन व्हाय

फोनपे अन्? गुगलपे
संपले सगळे पर्याय
स्वॅप  करुन सारखे
करे हुश्श  हाय हाय

डेबिट क्रेडिट  कार्ड
दुखायं लागले पाय
वापरा  सगळे कार्ड
कुणावर ना अन्याय

ऑन लाईन  थकले
झालापार निरूपाय
संपता संपेना खरेदी
घेतात  काढता पाय

लिमीट हो सीमापार
क्रेडिटकार्ड असहाय
चेकबुकही एक्झॉस्ट
रे  आता सोसत नाय

खुशीमध्ये दुकानदार
भरभक्कम व्यवसाय
अद्भुत नवल वर्तलेले
नवरा होई गोगलगाय

लिमीट हो सीमापार
क्रेडिटकार्ड असहाय
चेकबुकही एक्झॉस्ट
रे  आता सोसत नाय

दिवाळीकाढे दिवाळे
करते फिश टाय टाय
तरीही आनंदआगळा
नव्या सुखाचा अध्याय

गरीबश्रीमान सारेजण
लुटे मोद सणअपूर्वाय
साजरे उत्साहे सोहळे
येवू द्या किती अंतराय

**– हेमंत मुसरीफ पुणे .**
**९७३०३०६९९६.**






## कवी

शेजारची राधा,
त्याला म्हणाली ..दादा..!
तेव्हापासून
सदा झाला कवी साधा..!

**– पुरूषोत्तम रोहणकार**

## नांव

ओल्या वाळूवर
तुझ्या हेअरपीननं
माझं कोरलेलं नांव...
होशील जरी दुसऱ्याची
...त्या स्मृति विसरू नकोस कधी
संसाराची स्वप्न सोनेरी पाहताना
मंतरलेले क्षण भुलू नकोस कधी
माझं नाव हृदयावर कोरलेलं
मिटवू नकोस कधी


**– पुरूषोत्तम रोहणकार**

## जीवनाचे गणित

टप्प्या-टप्प्याने
सोडवावे सदा
शांत डोक्याने
ज्याचे गणित बरोबर असते
त्याची जीवनात प्रगती होते
श्रध्दा नि शीलआनंद, समाधान
ह्यांची करावी बेरीज छान
मत्सराला वजा करावे नात्यांतून
स्वभावाला गुणावे चांगुलपणानं
कष्टांना भागावे मनोरंजनानं
प्रयत्न करावेत सदा दुपटीनं
आशा ठेवावी सदा महत्तम
आळस असावा जीवनात शून्य
संयम असावा जीवनात धन
संशयास करावे जीवनातून ऋण
सद्गुणांचा सदा वर्ग करावा
निंदा,चुगल्यांचा लघुत्तम काढावा
विचार,अनुभव चिंतन यांचे घनफळ
जीवनात देते कर्तव्याला बळ
जीवनाचा असतो कोन विशाल
तया छेद देतो मृत्यू खुशाल
छेदाला ठेवाव्या सदैव निरंतर
प्रेम, नम्रतेच्या रेषा समांतर
असे असते जीवनाचे गणित
पायरी चुकता होते विस्कळीत

- रामचंद्र पाचूणकर





## आपली मराठी

मराठी असे आमची मायबोली
महाराष्ट्र राज्याची गौरव बोली
अभिजात भाषा असे गौरविली
इंडो युरोपीय कुळ म्हणविली

सहस्त्र वर्षे इतिहास भाषेचा
गाथा सप्तशती ग्रंथ मराठीचा
संस्कृत प्राकृत मधून उगम
आम्हा अभिमान असे मराठीचा

ब्राम्ही लिपीत शिलालेख मराठी
अक्षीचा शिलालेख नोंद मराठी
चौदा कोटी जनांची भाषा मराठी
भारतात तिसरी मोठी मराठी

कोळी आगरी नि माणदेशी बोली
वऱ्हाडी कोकणी लेवा गणबोली
बोलीभाषा या महाराष्ट्री मराठी
शैली एकच स्वरूप भिन्न बोली

सातवाहन यादवकाळी भर
शिलालेख, ताम्रपट सिध्दी कर
संत साहित्य लेखन ते मराठी
संक्रमण भाषांचे नवीन तर

- बाबू फिलीप डिसोजा कुमठेकर
द्वारा डॉक्टर साईप्रसाद बाबू कुमठेकर
अनिका पिकॅडिली ए-५०३
भुजबळ वस्ती माळवाडी पुनावळे ४११०३३



## भक्त मागणी

तव चरणी प्रार्थना
जना सदबुध्दी द्या ना
बुध्दी दाता श्री गणेशा
आमची विनंती माना

नको वितुष्ट विद्वेष
जनकल्याणा याचना
देवा मागणी विशेष
नको युध्दाची भावना

सेनानायका देवेंद्रा
सुखकर्ता दुःख हर्ता
जय देवा भालचंद्रा
पाव सत्वर आर्ता

तव कृपा होता सार्थ
होवो अवघे कृतार्थ
ना जाऊ देवून व्यर्थ
मज मनीचा भावार्थ

**– बाबू फिलीप डिसोजा कुमठेकर**

## विरह


वेदना कशी सुंदर
हे कळले मला तेव्हा
त्या संध्या समयी
विरह असह्य झाला जेव्हा

**– पुरूषोत्तम रोहणकार**

## संचित

विरहाच्या आंधरात
सुखाचे कवडसे
झाले कोवळे ऊनही
भर दुपारी जरासे
हरवून गेले मी
माझ्याच सावलीत ...

बहरू नका तुम्ही
त्या ऋतुनांही कसे सांगावे
उन्हाला दान सावलीचे
कसे मागावे
मीच जीवापाड जपलेली
सोडून चाल रीत ...



फुलणाऱ्या कळीने
गंध द्यावा ओंजळीत
अन्? व्याकुळलेल्या
मनाला तृषार्त करण्या
नभाने उतरावे सरीत
दाटलेल्या कंटाने
कसे गावे सुरेल गीत ...

ही सांजवेळ ही भासे
वाळवंटातील दुपार भयभीत
वाटेला कसा मागावा
क्षणभर विसावा
अन्? तापलेल्या वाळूला
ओला गारवा अवचित
कसे कळावे क्षितजालाही
असते का संचित ...

हरवून गेले मी
माझ्याच सावलीत ...



**– वर्षा झांबरे.**
**कोल्हापूर ९०९६७६५८५६**



## लाक्षागृह

सर्व कौरव आणि पांडव मिळून
बनवताहेत एक लाक्षागृह
स्वतःसाठी...येणाऱ्या पिढयांसाठी...
तोडून वनराई बनवताहेत
सिमेंटची जंगलं
करताहेत प्रदूषित
अन्न,पाणी, हवा,ध्वनी
उडवायला निघालेत ठिकऱ्या...
ओझोनच्या कवचाच्या
फटाक्यांच्या दुकानांसारखी
थाटली त्यांनी दुकानं अण्वस्त्रांची !
सोडताहेत वातावरणात
जीवनविरोधी तत्वे
आणि वरून पिटताहेत हाकाटी
ग्लोबल वार्मींगची !
एक दिवस हेच वार्मींग
गाठणार आहे कळस
आणि मग लागणार आहे
कितीसा वेळ खाक व्हायला
पृथ्वीचं हे लाक्षागृह...!

- आनंद देशमुख
९१,दंडवतेनगर, शिरपूर, जि.धुळे
मो. ९८६०६३०२३०

## शाळू दिवस

पान पान आकसल
गारठून थंडावलं
पाखरांचं घरट्यात
येणंजाणं थंडावलं
अंग आक्रसून उभी
गुरंढोरं दावणीत
वारा घोटाळेना कुठे
ऊन असावा शोधीत
तृण पात्यानी दवांची
झंग ढटकूनी दिली
आणि मोतियाची रास
जमिनीत विखुरली
याच शाळू दिवसात
सारं शिवार नव्याने
हिरवाई नैसुनिया
फुले अस्मा आनंदात
उभ्या पिकत फिरूनी
बळीराजा सुखावतो
शेत मळ्यात वंदुनी
माती कपाळी लावितो

- विलास कदम
९२०९१७०८०८



## आयना

राठ दाढी पांढरी मिशी
हाडांचा सांगाडा गालावर
डोळे गेलेत खोलवर
माझे मला पहावत नाही
वृध्दापकाळची दया येते.
आयन्यात लक्ष जाते
आयना न्याय देत नाही.
फ्रेम त्याची निखळली
कायन काच तडकली

– अरूण कुमार यादव
अवंतीनगर डी–५
दुसर मजला,सोलापूर,
मोबाः– ९८९०७९५३८६


## पावसाळा

आला पावसाळा
संपला उन्हाळा तळा
सुगंधी माती खाऊन
भागवून डोहाळ्याला
देईन सग जन्म
गोजिरवान्या बाळाला

– अरूण कुमार यादव



## माझा सखा



माझा विठ्ठल सखा
माझा विठ्ठल सोबती
नही कळीकाळाची भिती
मित्र नाही खरा विठ्ठला सारखा
मायबाप भाऊ बहीण
विठ्ठलाचेच मज चरण
पंढरीला माझे सदन
चंद्रभागी नित्यस्नान
भाऊ नाही दुजा विठ्ठलासारखा
आकाशासम हरीची छाया
सागरासम अथांग माया
कृपावंन्त तो सर्वांवरती दया
नित्य नमावे विठूच्या पाया
स्नेही नाही जिवलग विठ्ठलासारखा
निःसंकोचपणे हरीशी बोला
हृदयाच्या पाकळ्या उकला
उचलुनी घेईल आपुव्या बाळा
हरीला भक्तांचा लळा
आत्प नाहीजवळचा विठ्ठलासारखा
ओटी विठ्ठलमय चित्ती विठ्ठल
सदैव गावे विठ्ठल
विठ्ठलमय ब्रह्मांड दिसेल
जिकडे तिकडे हरीची चाहूल
सोयरा नाही प्रपंची विठ्ठला सारखा
मिटूनी डोळे  स्मरा रूप सावळे
फुलतील सुगंधाचे मळे
नको वाद ,वैर,भेद सोवळे
भरेल मनी आनंदाचे तळे
दाता नाही कुणी विठ्ठला सारखा
व्यर्थ हेवा,स्वार्थ,दावा
प्रपंचाचा लोभ सुटावा
विठ्ठलापाशीच शान्ती विसावा
शाश्वत नाही धन सत्तेचा मेवा
त्राता नाही अन्ती विठ्ठलासारखा

– लक्ष्मीकान्त भोसेकर

## दिवसाकाठी एकदा तरी

तीळा सारखा स्नेह असावा
गुळा सारखी गोडी
काम करताना लक्षात असावी
तुमच्या हातातील घडी
स्वच्छ आणि प्रसन्न मुद्रा
नकोच उगा लाडी गोडी
शुभ मुहुर्तावर तुम्ही बसवा
विस्कटलेली संसार घडी
कर्तव्य पार करताना
दूर ठेवावी प्रेमबेडी
कधी,केव्हा,कशी संपेल
कळणार नाही जीवन घडी
दिवसाकाठी एकदा तरी
जवळ ठेवा रामनाम आवडी
द्यावा घ्यावा संदेश आजला
हीच मकर संक्रांत गोडी

– पंडित हिंगे



## घर सजाविताना

चिमणी म्हणे चिमण्याला
आपण साजरी करू दिवाळी
माणसे दारात लावतात पण त्या
अन काढतात रंगीबेरंगी रांगोळी
आपण सुध्दा गोळा करू या
जंगलातली वेगवेगळी पाने फुले
सुंदर त्यांची मांडणी करून
फुलवू आनंद उत्साह मळे
गोळा करून वेगवेगळी फळे
फराळाची उत्तम तयारी करू
सकाळी सकाळी उठल्यावर
आपण सारे भगंवताला स्मरू
घर देखील उत्तमच सजव
आणून झाडांची विविध फुले
मन प्रसन्नच वाटेल मग
घर सजविताना आपण आपले

– पंडित हिंगे







# दीपावली राशीभविष्य २०२५-२६

मानवी जन्म, त्याच्या जीवनातील शारीरिक आणि सांपत्तिक चढ उतार, अपघात, आजारपण, चोरीमारी, मृत्यू जवळच्या नातेवाईक मित्र मंडळीचा दुरावा, भांडण, कोर्टकचेरी, वाद विवाद भांडण अशा प्रकारे कितीतरी अडचणी, दु:ख मानवी जीवनात प्रत्येक वर्षी येत असते त्यातून राशी भविष्य वाचन करणे हितकारक असते, सर्वसाधारण कल्पना येते. भविष्य मार्गदर्शन, उपयुक्त सुचना मिळून दिवाळीचा आनंद वाचकांनी घ्यावा. अनुभव अभिप्राय अवश्य कळवावा. देशपांडे गुरुजी.



## मेष

राशी चक्रात प्रथम नंबराची ही राशी मंगळाची. धाडसी सतत पुढे येण्यासाठी धडपड करून सदैव उत्साही राहून कार्य करणारी राशी. हिमतीने, आत्मविश्वासाने पावले टाकाल. ह्यावर्षी नक्की यश मिळवता येणार आहे. आर्थिक लाभ, नोकरी व्यवसायात प्रगती, नवीन उद्योग सुरू करता येईल. **विवाह–** साखरपुडा, नवघर खरेदी इत्यादीसाठी यश मिळेल. शनिच्या साडेसातीचा कार्यकाल असल्याने ज्येष्ठांच्या मार्गदर्शनानुसार ठरवावे लागणार आहे. **आरोग्य –** शनिसाडेसाती संपूर्ण वाईट नाही. यंदाची दिवाळी नंतर आरोग्याबाबतीत आराम मिळणार आहे. किरकोळ अपघातापासून जपावे. आगामी गुरू चांगला असणार आहे. प्रॉपर्टीची कामे मार्गी लागतील. **संततिसौख्य –** शिक्षणाचे प्रश्न सुटतील, विवाह ठरतील मनाप्रमाणे शुभकार्ये होतील. प्रवास, तीर्थयात्रेचे योग येतील. पत, प्रतिष्ठा मिळून वर्ष समाधानाचे.



## वृषभ


ह्यावर्षी चौफेर प्रगती, नोकरी–व्यवसायाचे प्रश्न मार्गी लागतील. शुक्रग्रहाची राशी. प्रेम वत्सल, संसारी, सुखी ग्रह असल्याने ह्या व्यक्ती वागणाऱ्या चांगल्या असतात. कष्ट घेतात. ऐषाआराम कमी प्रमाणात असते. उमदा स्वभाव असतो. शब्दाला पक्के असतात. श्रद्धा व निष्ठा ठेवून वागतात. **नोकरी –** प्रगती बढती बदली हीतकारक असते. तशी प्रगती दिवाळीनंतर मिळेल. **संततिसौख्य –** मुलामुलींची शिक्षणात प्रगती दिसून येईल. त्यांच्या नोकरीची कामे मार्गी लागतील. योग्य कॉलेजमध्ये प्रवेश मिळेल. **विवाह –** विवाह इच्छूकांची विवाह ठरतील, काळजी राहणार नाही. थोडक्यात रखडलेले विवाह होऊन जातील. काहीना मनाप्रमाणे संतती सौख्य मिळेल. **प्रवास –** परदेशी प्रवासाची संधी मिळेल. तीर्थयात्रा लग्नानिमित्ताने प्रवास खरेदी करता येईल. **आरोग्य –** सर्वसाधारण आहे. म्हणून काळजी घ्यावी. खर्च सांभाळून करावा इतकेच.



## मिथुन

यशदायक स्थिती, जबाबदाऱ्या वाढतील, बढतीचे योग दिवाळीनंतर मिळतील. बुध ग्रहांची राशी. हुषार वायुतत्त्वाची बोलकी राशी. उत्तम ग्रहण शक्ती असते. बोलक्या स्वभावामुळे ह्याचा स्वभाव हवाहवा सारखा असतो. गतवर्षीपेक्षा हे वर्ष उत्तम जाणार आहे.

**व्यवसाय– नोकरी –** हे वर्ष यश देणारे आहे. प्रचार साहित्य लेख कलाकार मंडळींना यशकारक दिवाळीनंतर प्रगती होणार आहे. प्रॉपर्टी गाडी बंगला वाहन शेती ह्यासाठी अनुकूल हे वर्ष आहे. **संततिसौख्य –** शिक्षणासाठी योग्य आर्थिक मदत मिळून ॲडमिशनचे काम होईल. **प्रवास –** तीर्थयात्रा परदेशी प्रवास दिवाळी पूर्वी नंतर योंग येईल. **आरोग्य –** राहू आणि गुरू ग्रहांच्या अनुकूलतेमुळे आरोग्य ह्या वर्षी उत्तम राहणार आहे. पण आहाराचे पथ्य औषध उपचार चालू ठेवणे गरजेचे राहणार आहे.



## कर्क

कौटुंबिक सौख्य लाभेल तसेच मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील. एकूण गत वर्षापेक्षा हे वर्ष आनंदाचे आणि सौख्यकारक जाणार आहे. कर्करास राशी चक्रातील चौथी रास, चंद्र स्वामीची जलराशी. शीलता आणि प्रसन्नता या राशीतून दिसून येते. **व्यवसाय–नोकरी –** दिवाळीनंतर विशेष बदल संभवतो. शनी भाग्यस्थानी त्यामुळे स्वतंत्र व्यवसायांचे स्वप्न पूर्ण होणार आहे बेकारांना काम मिळेल. **प्रॉपर्टी –** घर, जमीन, बंगलागाडी खरेदी सहज करता येईल. **संततितिसौख्य –** मुलामुलींची शिक्षणाबाबत प्रगती दिसून येणार आहे. **प्रवास –** तीर्थ यात्रा, परदेशी प्रवास शुभकार्यानिमित्त उत्तम प्रवास योग येतील. प्रतिष्ठा मानसन्मान सार्वजनिक कार्यात यश मिळेल. आनंदाने, स्वच्छंदपणे मुक्तपणे जगावयाचे आणि आनंद द्याल. उत्तम वर्ष जाणार आहे. श्रद्धेने प्रसन्नपणे धार्मिक कार्य कराल.



## सिंह

राशी चक्रातील पाचवी राशी. रविची रास. ह्या वर्षी नोकरी व्यवसाय प्रगती मनातील शुद्ध हेतू असल्यास पूर्ण करणारे हे वर्ष आहे. **नोकरी –** हितशुत्राचा त्रास कमी राहणार आहे. अधिकार पद मिळेल. कर्तृत्वाला संधी मिळेल. स्वतंत्र व्यवसायात प्रगती मिळणार आहे. **वैवाहिक सौख्य –** ह्या वर्षी उत्तम मिळणार आहे, अर्थात, दिवाळीनंतर. **संतति सौख्य–** त्याच्या नोकरी उद्योगाची काळजी राहणार नाही. **प्रवास–** तीर्थयात्रा किल्ले, पर्यटन स्थळे सहली इत्यादीसह परदेशी विमान प्रवास सहज होईल. प्रवासातून लाभ होतील. **प्रॉपर्टी –** शेती बंगला प्लॉट खरेदी सहज करून शकाल किंवा घर दुरुस्ती कडे लक्ष देता येईल. **विवाह –** ह्या वर्षी मुलांमुलींचे विवाह ठरतील. वैवाहिक जीवनातील समंजसपणा उपयोगी पडणार आहे. राजकारण समाजकारण निवडणूकामध्ये मनाप्रमाणे यश मिळवता येईल.




## कन्या

कन्या राशीचा स्वामी बुध. राशीचक्रातील ६ वी राशी असल्याने हुषार बुद्धीवान ज्ञान मिळवणारी रास आहे. ह्या वर्षी घरात शुभकार्य होईल. त्यानुसार खरेदी विक्री बँकेची कामे करता येतील. शेअर, कर्जाची कामे होतील. नोकरी व्यवसायात प्रगती जाणवेल. **आरोग्य –** ह्या वर्षी गुरूबळ असल्याने आरोग्य सुधारेल. औषध बदलून घेण्यामुळे प्रकृतिस आराम पडेल. **मानसन्मान प्रतिष्ठा –** राजकारण, समाजाकारणात यश मिळवता येईल. **प्रवास –** काहीना लांबच्या परदेशी प्रवासाचे योग येतील. काहीना तीर्थ यात्रेचे योग येतील. हातून दानधर्म कुलधर्म कुलाचार करता येईल. एकूणच आरोग्य व्यवसाय धंदा नोकरीत चांगला काळ आहे. मनाप्रमाणे खरेदी शेअरबाजारमध्ये यश मिळवता येईल. शनी सातवा असल्याने जबाबदारी वाढणार आहे.



## तूळ

आगामी दिवाळी ते पुढील वर्षीची दिवाळीचा कालखंड खूपच प्रगती यशाचा भरभराटीचा जाणार आहे. पण अचूक मार्गदर्शन घ्यावे. विचारपूर्वक निर्णय घ्यावे. ह्या वर्षी तुमच्या जागेची, घराची, शेतीची कामे होतील निदान अडकून राहणार नाही. राशीचक्रांतील तुमची सहावी राशी शुक्राची स्वामीनी असल्याने वायुतत्त्व, कलावंताची राशी. सर्वांबरोबर मिळून मिसळून वावरणारी राशी मधुरवाणी कोमल वाणीने आपुलकीची वाटते. **प्रवास –** सहली, धार्मिक यात्रा, परदेशीवारी इत्यादीसाठी अनुकूल आहे. **आरोग्य –** ह्या वर्षी आरोग्य सर्व साधारण बरे जाईल, पण आहारावर लक्ष्य द्यावे. **व्यवसाय नोकरी –** नोकरीत प्रगती दिसून येईल. स्वतंत्र व्यवसाय असल्यास त्यातून लाभ मिळेल. **संतती सौख्य –** शिक्षणासाठी आर्थिक मदत मिळवता येणार आहे. सार्वजनिक कार्य, राजकारण, समाजकारण धार्मिककार्यात यश मिळेल.



## वृश्चिक

दिवाळी आनंदाची उत्साहाची जाणार आहे. पण बाकी संपूर्ण वर्ष सर्वसाधारण जाणार आहे. नव्या क्षेत्रात काम करण्याची संधी मिळणार आहे. राशी चक्राचीआठवी मंगळाची राशी असल्याने इच्छा शक्ती उत्साह वर्धक असते. विवेक

निग्रह रागीट हेकेखोर स्वभाव असतो. **नोकरी –** सर्वसाधारण आहे पण दिवाळी नंतर थोड्या फारकांने व्यवसायात फरक राहणार आहे. नोकरीत सहकारी मदत करतील. प्रवास – सर्वसाधारण ग्रहमानामुळे आवश्यक असल्यास प्रवास करावा. विवाह/वैवाहिक जीवन वैवाहिक सौख्य कमी करणार आहे. विवाहेच्छूंच्या विवाह ठरतील शुभकार्य होतील. सामाजीक कार्यात यश मिळवता येईल.काही नवीन क्षेत्रात यश मिळवता येईल. मित्र मंडळी संबंध जपावे भांडण वादविवाद टाळावे. एकूण सावधपणे वागावे.



## धनु

धनु ही राशी चक्रातील ९ वी राशी. गुरू स्वामीची असल्याने सुसंस्कृत, सभ्यता, परोपकारी व्यक्तीमत्त्व, आदरणीय, बुद्धीवादी, हुशार असतात. यंदाचे ह्यांचे वर्ष समाधानकारक स्थिती, व्यवसाय वाढेल. तीर्थयात्रा आणि हातून धार्मिक दानधर्म घडून अध्यात्मिक आनंद मिळवता येणार आहे. **आरोग्य –** सर्वसाधारण बरे राहणार आहे. **प्रवास –** धार्मिक तीर्थक्षेत्री यात्रा होतील काही परदेशी यात्रा सुद्धा करतील. **संततिसौख्य –** मुलामुलीना कॉलेजक्लास ॲडमिशन मनाप्रमाणे मिळतील. विवाहेच्छूंचे विवाह जमण्याच्या दृष्टीने ऑक्टोबर/डिसेंबर उपयुक्त राहणार आहे. प्रॉपर्टी–खरेदी विक्रीची कामे होतील. राहत्या घरांची दुरुस्ती सहज करता येईल. राजकारण समाजाकारणात यश मिळेल. **नोकरी–**व्यवसायात कमी अधिक प्रमाणात यश मिळणार आहे. व्यवसायात केलेला बदल योग्य राहील.



## मकर


आगामी कालखंड यशाचा, प्रगतीचा व संपन्नतेचा राहणार आहे. राशी चक्रातील १० वी रास शनि ग्रहाची असल्याने न्यायप्रिय, काटकसरी, कर्तव्य दक्ष, कष्टाळू असते. कामगार, शेती, लोखंडी सामानाचा व्यापारी, वकीली अशा कितीतरी कामसू लोकांची राशी. दिवाळीनंतर विशेष प्रगतीकारक होऊन त्याच्या स्वप्नाची इच्छा पूर्ण करता येईल. **नोकरी–** बदल प्रगती होईल कुतर ओढ कमी होईल. व्यवसायात बदल भाग्यकारक होईल. **आरोग्य –** शनिची साडेसाती संपल्यामुळे ह्याचे आरोय उत्तम राहण्यास मदत होणार आहे. असेच ग्रहमान आहे. **प्रवास –** धार्मिक यात्रा कुलदेवी–देवता दर्शन यात्रा होतील.

**संततिसौख्य –** मनाप्रमाणे हे वर्ष आहे. चिंता नसावी. कौटुंबिक सुखसमाधान मनाप्रमाणे मिळवता येणार आहे. प्रतिष्ठा, मानसन्मान, नावलौकिक, कीर्ती अधिकारी या दृष्टीने मकर राशीच्या व्यक्तीना दिवाळी नंतरचा काळ शुभ होणार आहे. एकूण हे वर्ष प्रगती पथावर नेणार आहे.



## कुंभ

राशीचक्रातील ११ वी राशी, शनि ग्रहाची राशी आहे. मकर राशीप्रमाणे थोड्या फार फरकाप्रमाणे राशी आहे. कुंभ म्हणजे ज्ञानाचा घडा. कष्टाळू, बुद्धीमान, जागृत, हुषार राशी. ह्या वर्षी नोकरीमध्ये प्रगती दिसून येणार आहे. शनिच्या साडेसातीच्या काळात मानसन्मानाचे योग येतील. **नोकरी –** ह्या वर्षी प्रगती आहे. व्यवसाय बदल फायदेशीर आहे. **प्रवास –** तीर्थयात्रा सहली धार्मिक यात्रा हातून घडतील. परदेशी प्रवास येतील. **संतति सौख्य –** ह्या वर्षी दिवाळी नंतर सुखाचे आनंदाचे राहणार आहे. **आरोग्य –** ह्या वर्षी आरोग्याबाबत विशेष काळजी घ्यावी. विवाह इच्छूकांची इच्छा पूर्ण होईल. मनाप्रमाणे विवाह ठरतील. श्रद्धा ठेवा, सतत मनस्थिती स्थिर ठेवण्यामुळे हे वर्ष सुखाचे जाणार आहे. राजकारण, समाजकारण मध्ये यश मनाप्रमाणे मिळेल.



## मीन

राशीचक्रांतील १२ वी शेवटची राशी. गुरू ग्रहांची राशी असून धनु राशीप्रमाणे असते. ही राशी द्विस्वभाव व स्त्री राशी देवाधर्माची साधूसंताची राशी. स्वभाव अतिशय गुंतागुतीचा असतो. सर्वांना मदत करणारी, मूळची धार्मिक वृत्तीची असते. आत्यांतिक भावनाप्रधान असल्यामुळे कोणत्याही प्रश्नाचा निर्णय विचारापेक्षा भावनेनेच घेण्याचा स्वभाव असतो. ह्या वर्षी नवीन दिशा, जीवनाला नवे वळण मिळणार आहे. शनिची साडेसाती असली तरी काळजी करण्याचे कारण नाही उत्तम मार्गदर्शन मिळाल्यामुळे कष्टपूर्वक, विचारपूर्वक वागण्यामुळे शनिचा त्रास जाणवणार नाही. **नोकरी –** संमिश्र स्वरूपाचे वर्ष आहे. **व्यवसाय–** सर्वसाधारण राहिल. बदल करू नका. थोडेकष्ट घेतल्यानंतर त्रास कमी राहणार आहे. **प्रवास –** प्रवास पूर्णपणे हितकारक, समाधान कारक होतील. **वैवाहिक सौख्य –** घरात शुभकार्य होतील. शुभकार्यामुळे घरगुती आनंद मिळेल. फारसे त्रासदायक वर्ष नाही. श्री गुरुदेवाचे नामस्मरण ग्रंथ पारायण अवश्य करावे.

**– चिंतामणी देशपांडे गुरुजी,**
**पुणे, मो.९७६४६७८५७९**





भारत सरकार व महाराष्ट्र शासन गौरवित ग्रामपंचायत..
ग्रामपंचायत माण
मु.पो.माण,ता.मुळशी,जि.पुणे
AN ISO 9001:9008 CERTIFIED ORGANIZATION..
दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
मा.श्री.पांडूरंग ओझरकर
मा.सभापती-पंचायत समिती,मुळशी
सौ.अर्चनाताई.स.आढाव
सरपंच
श्री.शशिकांत.प्र.धुमाळ
उपसरपंच
श्री.मदन.ह.शेलार
ग्रामविकास अधिकारी
श्री.प्रदिप.श्री.पारखी
मा.उपसरपंच
श्री.रवी.ब.बोडके
मा.उपसरपंच
श्री.संदीप.द.साठे
मा.उपसरपंच
श्री.देवीदास.रा.सावंत
सदस्य
श्री.पंडीत.उ.गवारी
सदस्य
श्री.विजय.के.भोसले
सदस्य
श्री.प्रशांत.गु.पारखी
सदस्य
सौ.छाया.बा.ओझरकर
सदस्या
सौ.सुवर्णा.नं.भोईर
सदस्या
सौ.युगंधा.न.पारखी
सदस्या
सौ.कोमल.दि.गवारी
सदस्या
सौ.अर्चना.र.गवारी
सदस्या
."दिवाळीची आली पहाट, रांगोळ्यांचा केला थाट
अभ्यंगाला मांडले पाट, उटणी, अत्तरे घमघमाट
लाडू, चकल्या कडबोळ्यांनी सजले ताट
पणत्या दारांत एकशेसाठ, आकाश दिव्यांची झगमगाट!
दिवाळीच्या लक्ष लक्ष शुभेच्छा!!!"
सौ.शुभांगी.रा.भोसले
सदस्या
सौ.रुपाली.न.बोडके
सदस्या
-: समस्त ग्रामस्थ माण आणि ग्रामपंचायत कर्मचारी :-


शुभ दीपावली
सर्व नागरिकांना..
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
From :-
SHELLPACK INDUSTRIES PVT. LTD.
SHUBHAM TRADING COMPANY
.''स्नेहाचा सुगंध दरवळला, आनंदाचा सण आला.
विनंती आमची परमेश्वराला,सौख्य, समृध्दी लाभो तुम्हाला.
दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
आपणा सर्वांना...
शुभदीपावली...
श्री.सागर दत्तात्रय साखरे
मा.सरपंच,हिंजवडी,मुळशी
मा.अध्यक्ष : राष्ट्रवादी युवक काँग्रेस मुळशी तालुका
सौ.कोमल सागर साखरे
मा.सभापती पंचायत समिती मुळशी




शिवतेज NEWS 24

महाराष्ट्राचं... झुंजार ऑनलाइन न्यूज पोर्टल...

www.shivtejnews.in

RNI.No.MAH-MAR/2003/09449

साप्ताहिक मुळशी दिनांक

३२ वर्षे वाचकांच्या सेवेत..

निरपेक्ष व सत्यवादी बाण्याचं साप्ताहिक.

महाराष्ट्र राज्य शासन मान्य...

जाहिरात यादीवरील साप्ताहिक...

आपणाकडून येणाऱ्या सकारात्मक बातम्या, राजकीय,
सामाजिक, भ्रष्टाचार,
गुन्हेगारी, अपघात, आजूबाजूला घडणारी बातमी, फोटो,
अपलोड करण्यासाठी आम्हाला पाठवा..
आपले विचार, विकासाबद्दल असणाऱ्या कल्पना..
आदि बिनधास्तपणे आम्हाला पाठवा..
त्याला 'शिवतेज न्यूज व साप्ता.मुळशी दिनांक'
मध्ये प्रसिध्दी दिली जाईल..

: www.shivtejnews.in

: 9765626828

मुख्य संपादक :- स्व. दत्तात्रय सुर्वे.

कार्यकारी संपादक :- श्री. केतन दत्तात्रय सुर्वे


शुभ
दीपावली
अंधारवाटा उजळुन निघाल्या
दीपावलीच्या या दिनी
सदैव मंगल होवो सर्वांचे
हीच कामना मनी
दिलीप वेडेपाटील
सदस्य - कार्यकारिणी, भाजपा महाराष्ट्र प्रदेश
मा.नगरसेवक, पुणे मनपा


दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा
आपणांस..
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा..!!
पीडीसीसी बँक
पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित
मा.श्री.सुनिल काशिनाथ चांदेरे
उपाध्यक्ष : पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादीत

स्थापना: 1972

'अर्थ' सार्थ करणारी बँक

# दि विश्वेश्वर सहकारी बँक लि., पुणे

# The Vishweshwar Sahakari Bank Ltd., Pune

मल्टीस्टेट शेड्युल्ड बँक

Multi-State Scheduled Bank

विश्वेश्वर परिवारातर्फे सर्वांना

## शुभ दिपावली



वाहन कर्ज

पर्यटन कर्ज

गृह कर्ज

शैक्षणिक कर्ज

**RTGS, NEFT, ABB, Mobile Banking, QR-Code, E-Payments, ATM-Cum Debit Card/POS, Safe Deposit Lockers, CTS/NACH/ACH/ECS, General, Life & Health Insurance, Mutual Funds Service and Net Banking Services Available**

**श्रीराम आपटे**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**राजेंद्र मिरजे**
उपाध्यक्ष

**अनिल गाडवे**
अध्यक्ष


**हेमंत वऱ्हाडपांडे**
मुख्य कार्यकारी अधिकारी (प्र)

शाखा : गणेश पेठ • फुरसुंगी • मार्केट यार्ड • धनकवडी • बाणेर रोड • यमुनानगर • पौड रोड • बार्शी • विजयानगर • सिंहगड रोड एरंडवणा • सोमवार पेठ • बुधवार पेठ • भोसरी • नगर रोड • निपाणी • वारजे • चाकण • पिंपळे सौदागर • विश्रांतवाडी • कोल्हापूर वाशी-तुर्भे • सातारा • पंढरपूर • शिवाजीनगर • चिंचवड • सांगली • बेळगावी • इचलकरंजी • लातूर

Head Office: 471/472, Market Yard, Gultekadi, Pune 411 037
Customer Care: +91 98819 09700 | Marketing: +91 92260 43805 | Toll Free: 1800 890 8474

vsbl@vishweshwarbank.com | www.vishweshwarbank.com | Follow Us:


KD'S
GROUP
Realty | Redevelopment Consultant | Marketing
-: Realty :-
Dealing in Sale, Purchase & Renting of Commercial Shop, Showroom, Restaurant, Hotel, Café & Plots...
-: Enterprises:-
Happy Diwali
-: Redevelopment Cosultant :-
- Marketing -
Sole Selling of Buildings & Plots.
-: Contact :- Ketan Dattaraya Surve - 7263 00 24 00
Office Add.:- Left Bhusari Colony, Paud Road, Kothrud, Pune


शुभ दिपावली
SAYRA
THE RENTAL STORE
ALL TYPES OF OUTFITS & JEWELLERY AVAILABLE ON RENT
-: Contact :-
Snehal Surve-Argade
7040131769 / 8698732679
-: Address :-
Pashan, Pune - 411008


B.J. HULAWALE
LANDMARK
शुभदीपावली...
COMING SOON... NEW PROJECT
@ Hinjawadi Phase 1
1 BHK NANO HOMES @ HINJAWADI
A Building
SOLD OUT
LAXMI PRIDE
SOLD OUT
LAXMI HEIGHT
1 Bhk / 2 Bhk Luxurious flats @ Hinjawadi
LAXMI BAPPA
SOLD OUT
मा. श्री. तानाजी बाबाजी हुलावळे
संचालक: बी.जे. हुलावळे प्रॉपर्टीज् पार्टनर
प्रोप्रा. श्रीनाथ डेव्हलपर्स, मो. ७७७३९९९७७७
सर्व नागरिकांना दिपावलीच्या
हार्दिक शुभेच्छा..!!
मा. श्री. गोरक्ष बबन हुलावळे
संचालक: बी.जे. हुलावळे
प्रॉपर्टीज, प्रमोटर्स ॲण्ड बिल्डर्स
FOR BOOKING CONTACT Mob. No.+91 9850148724 Cell No. +91 9822708417 Cell No. +91 9158658777


आतां कोठें धांवे मन...
मनासारखं घर फक्त इथेच!
Enchanting Dusk
Blending urban allure with nature's tranquil beauty
KEMSE CONSTRUCTIONS™
MAHARERA REGN. NO. P52100046580
Artist's Impression
KOTHRUD
Exquisite 1,2 & 3 BHK Homes
Enchanting Retail & Office Spaces
7718 957 999 | 7738 705 999
kemseconstructions.com
Site Office:
Survey No. 79/15, Surajnagar CHSL,
DP Road, Kothrud, Pune-411038.
Landmark: Opp Shantiban Ganesh Mandir,
Near Eklavya Polytechnic College.
SURAJNAGAR

BADHEKAR GROUP
नाते विश्वासाचे....



एक असं
# घर
जिथं रोज
# दिवाळी
साजरी होते.

| १५ | २४+ | २०+ | ३०००+ |
|---|---|---|---|
| वर्षांची गृहपरंपरा | पूर्ण प्रकल्प | पूर्णत्वाच्या दिशेने | आनंदी कुटुंब |

## बढेकर ग्रुपतर्फे दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!

साईट व्हिजिट आणि बुकिंगसाठी संपर्क:
**78-10-808080**

हेड ऑफिस: ३०३, ११ मयूर, श्री मृत्युंजयेश्वर मंदिराच्या समोर, कर्वे पुतळ्याजवळ, कोथरूड, पुणे

All Projects are MahaRERA registered. https://maharerait.mahaonline.gov.in/

शुभदीपावली...



“UPCOMING REDEVELOPMENT BRAND OF THE YEAR AWARD BY:
ET The Economic Times”

# VEDNIRMITEE REALTY

A Ganesh V. Jarande Venture

## आम्ही करतो तुमच्या आनंदाची निर्मिती!

गेल्या १२ वर्षांपासून बांधकाम क्षेत्रात आपली जागा निर्माण करून वेदनिर्मिती आता रिडेव्हलपमेंट क्षेत्रात सुद्धा उतरत आहे. मजबूत बांधकाम, वेळेवर डिलिव्हरी, आणि व्यवहारातील पारदर्शकता या स्तंभांवर आज वेदनिर्मितीने आपली ओळख बनवली आहे. बांधकामाच्या जगातील विश्वासू व जाणकार असणारी वेदनिर्मितीची टीम ग्राहकांना आनंदी जीवनाचा सहवास मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे. आमच्या रहिवासी ग्राहकांना उत्कृष्ट राहणीमान मिळवून देणे हेच आमचे उद्देश्य आणि ध्येय आहे.



ONGOING

ved laurels
Embrace the Majestic Lifestyle

2 & 3 BHK
ULTRA-LUXURIOUS HOMES
**AT KOTHRUD ANNEXE-WARJE**

**2 BHK: 83.66 L**
**3 BHK: 1.11 CR**
**ONWARDS**



ONGOING

THE CUBE

PREMIUM
COMMERCIAL SPACES
**AT KOTHRUD ANNEXE-WARJE**

**OFFICES: 77.70 L**
**SHOWROOMS: 3.64 CR**
**ONWARDS**




REDEVELOPMENT

वेद आनंदघन
इथे आनंद बरसतो

2 & 3 BHK HOMES
**AT DAHANUKAR COLONY LANE NO. 1**

**2 BHK: 1.33 CR**
**3 BHK: 1.71 CR**
**ONWARDS**



ONGOING

ved tanish

1 & 2 BHK HOMES
& COMMERCIAL SPACES
**AT UNDRI**

**1 BHK: 35 LAKH**
**2 BHK: 48 LAKH**
**ONWARDS**

UPCOMING REDEVELOPMENT PROJECTS COMING SOON AT: KOTHRUD | KALYANI NAGAR | S.B. ROAD | BIBWEWADI

Reg. Office: A-71/72,73 6th Floor, K K Market, Dhankawadi, Pune - 411043.
E-Mail: sales.vednirmitee@gmail.com | Phone: 41 208 233

Member of CREDAI PUNE METRO | MBVA

Follow Us:

www.vednirmiteerealty.com

84120 96007